# महादेवभाईंची डायरी, खंड ४

अनुवाद

**ब्रिजमोहन हेडा**

# प्रकाशकाचे निवेदन

पन्नास वर्षांच्या अल्पायुष्यात पंचवीस वर्ष महात्मा गांधींच्या चरणाशी बसून समर्पणभावाने महादेवभाईंनी जे महत्त्वाचे कार्य केले त्यात गांधीजी दररोज करत असलेली चर्चा, मुलाखती, बातम्या आणि पत्रे इत्यादींची त्यांनी केलेली नोंद असलेल्या या रोजनिश्याचे फार महत्त्व आहे. या रोजनिशा गांधी विचारांची खाण आहेत. महादेवभाई गांधीजींच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंचे जाणकार होते आणि गांधीजींच्या हृदयीच्या गूढ भावांची त्यांना चागलीच पारख होती. यामुळे या रोजनिश्यांना आंतरराष्ट्रीय साहित्यातही फार महत्त्वाचे स्थान आहे.

या रोजनिश्यामध्ये प्रसंगानुरूप भाषा असून ती गौरवशाली आणि साधीसरळ आहे. त्यांची शैली प्रवाही आणि रसाळ आहे. आणि जेव्हा महादेवभाई आत्मनिरीक्षण वा आत्ममंथन करत असतात तेव्हा तर त्यांच्या भाषेतून काव्याचा आस्वाद चाखायला मिळतो. प्रसंगांच्या चित्रणातसुद्धा साहित्यिकाच्या शैलीचा अनुभव आपल्याला येतो. यामुळे त्यांच्या लेखनात भूतकाळाचे शुष्क चित्रण नसते. स्वातंत्र्य आंदोलनातील घटनांची साखळी जेव्हा त्यांच्या लेखनातून उलगडत जाते तेव्हा सुंदर, रसाळ आणि प्रेरक इतिहास वाचल्याचा आनंद आपल्याला मिळतो.

महादेवभाईंच्या या रोजनिशांचे प्रकाशन ऑगस्ट १९४८ मध्ये सुरू झाले. पहिल्या पाच खंडांचे प्रकाशन 'नवजीवन न्यासाने' केले आणि ६ ते २० भागांचे प्रकाशन 'साबरमती आश्रम सुरक्षा आणि स्मारक न्यासाने' केले. या रोजनिशांनी डेमी आकाराची  ९०८५ पाने व्यापली आहेत. १ ते ५ आणि ११ ते १७ भागांचे जर पुनर्मुद्रण करण्यात आले तर पूर्ण संच उपलब्ध करून देता येईल असे वाटल्यामुळे आता हे पुनर्मुद्रण केले आहे. यामुळे हा १ ते २० भागांचा संच गांधी साहित्याचा अभ्यास करणारांकरिता सुलभतेने उपलब्ध झालेला आहे.

महादेवभाई जन्मशताब्दी समिती हा संपूर्ण संच गुजरातच्या चरणी अर्पण करत असताना धन्यता अनुभवते. साबरमती आश्रम सुरक्षा आणि स्मारक न्यासाजवळ पुनर्मुद्रण न करता ज्या खंडांच्या प्रती होत्या त्या त्यांनी कमी किंमतीत समितीला दिल्या. समितीचे काम सुव्यवस्थित पद्धतीने चालावे म्हणून नवजीवन न्यासाने आठ लाख रुपयांचा निधी वेगळा काढून ठेवला आणि त्याचबरोबर मुद्रणाच्या कामातही त्यांनी मदत केली. या बंधुभावाच्या कृत्याकरिता समिती नवजीवन न्यास आणि साबरमती आश्रम सुरक्षा आणि स्मारक समिती या दोघांचीही आभारी आहे.

दस्तावेजाच्या मूल्यावर डायऱ्यांचे हे वीस भाग एकत्र उपलब्ध होत आहेत. 'शुक्रतारक सभा महादेवभाई' आणि 'अग्निकुंडात उमललेले गुलाब' या पुस्तकांचे जसे प्रेमपूर्वक आणि जागरूकतेने स्वागत झाले, तसेच स्वागत या ग्रंथांचेही होईल अशी आशा आहे.

अमृत मोदी

सचिव

# प्रस्तावना

१९१७ साली महादेवभाई बापूंबरोबर काम करू लागले. तेव्हापासूनच त्यांनी रोजनिशी ठेवण्याचा विचार केला असावा असे वाटते. अगदी सुरुवातीला ते बापूंनी लिहिलेल्या महत्त्वाच्या कागदपत्रांची नोद आपल्या रोजनिशीत करत असावे. त्यानंतर बापूंचे उद्गार, प्रंसंगोपात त्यांच्याशी झालेली चर्चा आणि महत्त्वाच्या प्रसंगांच्या नोंदी ते आपल्या रोजनिश्यांमध्ये करू लागले. ही रोजनिशी १३-११-१९१७ ते १७-१-१९१९ या कालखंडातील आहे. त्यातही अनेक दिवस असे आहेत की जेव्हा रोजनिशीत नोंद केलेलीच नाही. येरवडा तुरुंगातील रोजनिशीत जी तीन पुस्तके बाहेर पडली त्याच्याइतकी ही रोजनिशी स्वाभाविकपणेच विस्तृत नाही. शिवाय महादेवभाईंच्या प्रयत्नांची ही सुरुवात आहे हेसुद्धा आपण लक्षात ठेवले पाहिजे. असे असले तरी त्या वेळी जो सीमित कागद मिळत असे त्यातूनच देशात विविध कार्यक्रम सुरू करत असताना गांधीजींसमोर कसकशा समस्या उपस्थित झाल्या, आपले जीवन घडवणाऱ्या तत्त्वज्ञानावर कायम राहून ते कोणत्या दृष्टीने त्या समस्यांकडे पाहत होते आणि त्या सोडवण्याचा प्रयत्न करत होते याचे सुंदर दर्शन आपल्याला या रोजनिश्यांमधून होते. अशा प्रकारे अभ्यासूला यांतून अतिशय रसाळ आणि मूल्यवान साहित्य मिळते तसेच सामान्य वाचकालाही बरेच माहितीप्रद विचार करण्यासारखे साहित्य मिळते.

चंपारणचा लढा आणि चौकशीचे काम पूर्ण झाले होते. समितीच्या शिफारशींप्रमाणे तयार करायच्या कायद्याला अंतिम रूप द्यायचे तेवढे शिल्लक राहिले होते आणि त्यामुळे ग्रामीण जनतेत जी जागृती निर्माण झाली होती ती टिकून राहावी आणि तिच्या शक्तीत वृद्धी व्हावी म्हणून बापूनी रचनात्मक कार्यक्रम सुरू केला होता. या काळापासून या रोजनिशीची सुरुवात आहे. या रोजनिशीत चंपारणमधील घडामोडींकडे लक्ष वेधेले जाईल अशी फार कमी कागदपत्रे आहेत. अभ्यासूंनी याच्या विस्तृत माहितीकरिता 'चंपारणचा सत्याग्रह (सत्याग्रह इन चंपारण)' हे पुस्तक पाहायला पाहिजे.

चंपारणचे काम पूर्ण झालेले नसल्यामुळे तिथे गांधीजींच्या उपस्थितीची जरी आवश्यकता होती तरी गांधीजी अधूनमधून बाहेर कुठे गेले तरी कार्यकर्ते तेथील समस्या हाताळू शकतील अशी परिस्थिती निर्माण झाली होती. एवढ्यात गांधीजींवर गुजरातमधील दोन मोठे काम येऊन पडले. खेडा जिल्ह्यातील पीक बुडाल्यामुळे शेतसारा तहकूब करण्यात यावा म्हणून पुकारण्यात आलेला लढा आणि

महागाईमुळे गिरणी कामगाराची मजुरी वाढवण्यासंबंधीचा लढा. या दोन्ही लढ्यांचा प्रामाणिक इतिहास शंकरलाल परीखकृत 'खेडानी लडत' आणि महादेव देसाईंच्या 'एक धर्मयुद्ध' या दोन पुस्तकांद्वारे आपल्याजवळ आहे. या रोजनिशीत यासंबंधित काही पत्रे आहेत. ते या लढ्यावर नवीन प्रकाश टाकतात आणि बापूजींचे अंतःकरण कशाप्रकारे काम करत होते हे त्यातून दिसते.

गिरणी मजुरांच्या लढ्यासंबंधात अहमदाबाद येथील जिल्हाधिकाऱ्याने बापूंसमोर आपल्या अंतःकरणातील असे उद्गार काढले होते - "गिरणीमालक आणि मजुरांमध्ये इतका स्नेहपूर्ण लढा माझ्या जीवनात मी इथेच पहिल्यांदाच पाहतो आहे." बापू म्हणाले, "मीसुद्धा दोन्ही पक्षांमध्ये असा सौहार्दपूर्ण लढा याआधी पाहिला नाही असे मलासुद्धा वाटते. (पृष्ठ ४५)" बापूंनी गिरणी मालकांना आणि विशेषेकरून अंबालालभाईंना लिहिलेल्या पत्रांवरून अगदी स्पष्ट दिसते की (पाहा पान ८ आणि ४८) या संपासंबंधात बापूंनी केलेल्या उपवासाचे महत्त्वसुद्धा या रोजनिशीवरून अजून चांगले कळते. एका पत्रात ते लिहितात, "अहमदाबादच्या हरताळात मला जीवनातील अतिशय मूल्यवान पाठ मिळाला. संपाच्या दरम्यान प्रेमाच्या शक्तीचे चमत्कारिक प्रदर्शन  झाले, असे पूर्वी कधीही झाले नव्हते. . . . हे चार दिवस माझ्याकरिता शांततेचे, धन्यतेचे आणि आध्यात्मिक उन्नतीचे होते. या दिवसांदरम्यान मला खाण्याची अणुमात्रही इच्छा होत नव्हती (पृष्ठ ६७)." दुसऱ्या एका पत्रात ते लिहितात, "माझा हा उपवास माझ्या जीवनातील मोठ्यात मोठे कार्य आहे असे मी समजतो. या उपवासादरम्यान मला जी शांतता लाभली ती अलौकिक होती. (पृष्ठ ७९)." या उपवासाची आवश्यकता आणि दुसरीकडे त्यात राहिलेले दोष त्यांनी प्रार्थनेत सुंदर पद्धतीने समजावून सांगितले आहे. याकरिता तर या रोजनिशीतील पृष्ठ ५५ ते ५९ वाचायला पाहिजे. श्री देवदासभाईंना पाठवलेल्या एका पत्रात ते लिहितात, "मी ३५ टक्के एका दिवसात जास्त चांगले घेतले नाही याचे रहस्य समजावून सांगणे सोपे आहे. मी याहून अधीक ताणून धरूच शकत नव्हतो. मालकांमध्ये मजुरांना देण्याची दृढ इच्छाशक्ती नव्हती. परंतु माझ्या उपवासामुळे कामगारांच्या मागण्या पूर्ण करण्याची इच्छाशक्ती त्यांच्यात आली. असे ते आता मान्य करतात. मी जर जास्त मागितले असते तर तो अत्याचार झाला असता. मी जास्त मागण्याच्या स्थितीत होतो, परंतु मी किमान घेतले. असे करणे मला माझा सरळपणा, नम्रता आणि माझ्या विवेकबुद्धीतून सुचले. मी उपवास केला नसता तर मजुरांना माघार घ्यावी लागली असती. उपवासामुळेच त्यांनी टिकाव धरला.

अशा प्रकारच्या निर्धारात किमान मागणीच योग्य असते. या निर्धाराचे शब्दशः पालन करण्यात आले. या किमान मागणीमुळे माझ्या उपवासात जे दोष होते तेही नाहीसे झाले."

खेडा सत्याग्रहासंबंधातसुद्धा भारत सेवक समाजाचे सदस्य श्री देवधर (पृष्ठ ४३) आणि श्री जोशी (पृष्ठ ६९) यांना तसेच उदार मतवादी विचाराचे श्री नटराजन (पृष्ठ ६४ आणि ७१-७२) आणि ब. क. ठाकोर (पृष्ठ ७७-७८) यांना लिहिलेली पत्रे विशेषतः वाचण्यासारखी आहेत. श्री देवधरना ते सांगतात, "असे गृहीत धरण्याची काय आवश्यकता की शासक आपल्याला जितके देईल तितकेच मिळू शकते?" श्री नटराजन आणि श्री ब. क. ठाकोर या दोघांनाही गावकऱ्यांना महसूल न भरण्याचा सल्ला देणे सुज्ञपणाची गोष्ट वाटत नव्हती. स्थानिक सरकार ऐकत नसेल तर व्हाईसरायकडे जा, संसदेकडे जा, हिंदुस्थानातील संपूर्ण जनतेचे जनमत जागे करा, ब्रिटिश जनमताला आवाहन करा आणि त्या दरम्यान गरीब लोक उपाशी मरू नये म्हणून त्यांना मदत करण्याकरिता निधी गोळा करा, परंतु अशी तातडीची उपाययोजना करू नका असे श्री नटराजनचे म्हणणे होते. सत्याग्रह शब्द ऐकताच भडकून न जाता त्यांनी स्वतः खेडा जिल्ह्यात येऊन चौकशी करावी आणि खेडूत किती आनंदाने हा लढा लढत आहेत हे आपल्या डोळ्यांनी पाहावे म्हणून आमंत्रित केले आणि श्री ठाकोरना सत्याग्रहाचा अर्थ आणि आवश्यकता यांचे प्रतिपादन करणारे पत्र लिहिले. हा लढा सुरू असतानाच त्या दरम्यान आयुक्त श्री प्रेंटना खूप पत्रे लिहावी लागली होती. परंतु खेडामधील जनतेची बाजू घेऊन सरकारी अंमलदाराची चुकीची कार्यपद्धती दुरुस्त करण्याकरिता आणि प्रजेलासुद्धा चुकीच्या मार्गाने जाण्यापासून अडवण्याचा उपाय सत्याग्रहच आहे हे दर्शवणारे एक सुंदर पत्र लिहिले (पृष्ठ ४५-४७). ते विशेषेकरून वाचण्यासारखे आहे. सत्याग्रहाचा प्रयोग नवीन असूनही जनतेला, जनतेच्या पुढाऱ्यांना, सरकारी अंमलदारांना समजावून सांगण्याची एकसुद्धा संधी बापूजी चुकवत नसत हेसुद्धा या रोजनिशीमध्ये आढळेल.

हा काळ (१९१४-१८) पहिल्या महायुद्धाचा होता. खेडाचा लढा सुरू होता तेव्हा व्हाईसरायनी युद्धपरिषद बोलावली होती आणि तिच्यात बापूजींना आमंत्रिले होते. बापूजी दिल्लीला तर गेले, परंतु टिळक महाराज आणि श्रीमती बेझंट यांना निमंत्रण नव्हते. आणि अलीबंधूंना सरकारने स्थानबद्ध करून ठेवलेले होते. जनतेचा पूर्ण विश्वास असलेल्या शक्तिशाली पुढाऱ्यांच्या उपस्थितीशिवाय युद्धपरिषदेचा हेतू यशस्वी होऊ शकत नाही. तसेच ब्रिटिश सरकारने तुर्कस्तानला दिलेल्या जाहीर अभिवचनाचा भंग

केला होता आणि काही देशांशी त्याने गुप्त करारमदार केले होते. अशा नैतिक कारणामुळेसुद्धा बापूजींची युद्धपरिषदेत भाग घेण्याची इच्छा नव्हती. यासंबंधीचे पत्र त्यांनी क्लॉड हिलच्या माध्यमातून व्हाईसरायला लिहिले (पाहा पृष्ठ ८७-८८). यानंतर त्यांची व्हाईसरायशी मुलाखत झाली. बापूजींच्या शब्दांत सांगायचे तर या मुलाखतीच्या परिणामी "न्यायवृत्तीवर क्षात्रवृत्तीने विजय मिळवला आणि त्यांनी युद्धपरिषदेत भाग घेतला." इतकेच नाही तर लष्करभरतीत पूर्णपणे मदत करायचेसुद्धा त्यांनी कबूल केले. लष्करभरतीत तर ते बिनशर्त मदत करणार होते. परंतु त्याचबरोबर हिंदुस्थानची परिस्थिती कशी आहे आणि हिदुस्थानच्या आकांक्षा कोणकोणत्या आहेत हे सांगणारे एक पत्रही परिषदेच्या शेवटी बापूजींनी लिहिले (पाहा पृष्ठ ९५ ते ९८). या पत्रात बापूजींच्या शब्दांत, "धर्म, सत्याग्रहाचे रहस्य आणि सर्व आदर्श ओतण्यात आले होते." व्हाईसरायना लिहिलेले हे पत्र आणि व्हाईसरायशी लष्करभरतीच्या निमित्ताने झालेली चर्चा हा या लष्करभरतीचा सर्वात महत्त्वाचा भाग आहे असे म्हणता येईल. तुम्ही अहिंसाधर्मी असूनही लष्करभरतीचे काम कसे काय करता? हा प्रश्न या वेळीच नाही तर यानंतरही चर्चीला जात होता. बापूजींनी हे विचार श्री ऍन्ड्र्यूज यांना लिहिलेल्या एका पत्रात चांगल्यात चांगल्या पद्धतीने शब्दबद्ध केले आहेत (पाहा पृष्ठ १४२-१४७). बापूंनी मांडलेले विचार श्रीयुत अँड्र्यूज यांना लिहिलेल्या एका पत्रात अतिशय चांगल्या पद्धतीने शब्दबद्ध झाले आहेत. त्या पत्रात आणि त्यांच्या इतर पत्रांमधून लष्करभरतीत सहभागी होण्याची कारणे स्पष्ट करणारे थोडे उतारे खाली देत आहे -

'ज्या जनतेत लढाई करण्याची पात्रता नाही ती लढाई न करण्याच्या गुण सिद्ध करू शकत नाही. यावरून मी असा निषकर्ष काढू शकत नाही की हिंदुस्थानने लढाईत भाग घेतलाच पाहिजे. परंतु इतके मात्र मी निश्चितच सांगू इच्छितो की हिदुस्थानने लढाईची कला शिकायला पाहिजे.'

"अहिंसाधर्माचे पालन करणारी माझ्यासारखी दुसरी व्यक्ती हिंदुस्थानात भाग्यानेच भेटेल. मी तर प्रेमाने भारलेलो आहे. इंग्रजांचे पाप माझ्याइतके दुसऱ्या कोणाला क्वचितच माहीत असतील. आणि त्यांचे पुण्यकृत्यही माझ्याइतके दुसऱ्या कोणाला क्वचितच माहीत असतील."

"ज्याला शस्त्रकला शिकायची आहे, ज्याला मारणे समजून घ्यायचे आहे त्याला मी हिंसा करण्याकरितासुद्धा शस्त्रकला शिकवीन. या वेळी मी काहीही करू शकत नसल्यामुळे माझी तपश्चर्या कमी पडते आहे असे तुम्ही समजू शकता. मारल्याशिवाय ज्याला मरता येत नाही त्याने मारून मरणे शिकायला पाहिजे."

"मी जेव्हा माझे नाव लष्करभरतीकरिता दिले तेव्हाच मला माहीत होते की मी शत्रूला म्हणा की मित्राला म्हणा मारणार नाही. परंतु ज्या लोकांचा लढण्याला आक्षेप नाही, परंतु जे भित्रेपणामुळे वा इंग्रजांबद्दलच्या द्वेषामुळे लढायला तयार होत नाहीत त्यांच्याबद्दल माझे काय कर्तव्य आहे? त्यांना मी असे म्हणायला नको काय की तुम्ही जर माझा मार्ग स्वीकारत नसाल तर तुम्ही तुमच्यात भित्रेपणा वा द्वेष जो काही असेल तो टाकून द्या आणि लढा? ज्या माणसात मारण्याची शक्ती नाही त्याला तुम्ही अहिंसा शिकवू शकत नाही."

"हिंसक माणसाच्या हिंसेपासून कमीतकमी नुकसान कसे होईल हे त्याला शिकवले पाहिजे. ते शिकवण्याच्या क्रियेतच अहिंसेचे सद्गुण समजावून सांगण्यात मी यशस्वी होईन. अशा प्रकारेच कदाचित मी अहिंसेच्या वा सत्याग्रहाच्या सिद्धांतांचा चांगल्या प्रकारे प्रचार करू शकेन."

"(पान 8 प्रस्तावनेतील) यामुळे अहिंसा म्हणजे मारहाण करण्याची वा इजा पोहोचवण्याची इच्छाच पूर्णपणे नाहीशी होणे. अहिंसा अशाच व्यक्ती आचरू शकते, जी सर्व बाबतींत स्वतःला समर्पित करायला तयार असते. याचा अर्थ असा होतो की अहिंसाधर्माचे पूर्ण आचरण करणारी व्यक्ती परिपूर्णता प्राप्त केलेली असली पाहिजे. याचा अर्थ असा होतो काय की आपण पूर्णपणे प्रेमधर्मी होण्याआधीच सँडोसारखे शक्तिशाली व्हायला पाहिजे? नाही. असे आवश्यक नाही. आपण इतकेच पाहिले पाहिजे की आपण जगासमोर खंबीरपणे उभे राहू शकलो पाहिजे. इतकी क्षमता आपल्या अंगी असली तर तितके पुरेसे आहे. काही जणांमध्ये असे धैर्य केवळ युद्धाची किंवा झुंजण्याची तयारी केल्यानंतरच निर्माण होऊ शकते."

"जनतेचे कर्तव्य निःशस्त्रीकरण करणे आहे. परंतु तिच्या अंतःकरणातील मारण्याची इच्छा किंचितही गेलेली नाही. . . . हिंदुस्थानबद्दल जास्तीतजास्त इतकेच म्हणता येईल की इथे काही व्यक्तींनी इतर देशांपेक्षा अहिंसेला लोकप्रिय करण्याकरिता जास्त प्रयत्न केले आहेत आणि त्यात अधिक यश मिळवले आहे. परंतु एवढ्याकरिता असे म्हणता येऊ शकत नाही की येथील जनतेच्या मनात अहिसेची मुळे खोलवर रुजली आहेत."

"अहिंसेचा पाठ तर ती व्यक्ती देऊ शकते जिचे जीवन उत्साहाने ओतप्रोत झालेले असते आणि जी आपल्या विरोधकांसमोर छाती ताठ करून उभी राहू शकते. मला वाटते की अहिंसा पुरेपूर समजून घेण्याकरिता आणि पचवण्याकरिता शारीरिक धैर्याचा पूर्ण विकास झालेला असणे अनिवार्य आहे."

"अशाच प्रकारे कोणत्याही माणसाच्या मनात अहिंसेचा म्हणजे पूर्ण प्रेमाचा सिद्धांत रुजवण्याकरिता त्याचे मन जोमदार शरीराद्वारे पूर्णपणे उमलून परिपक्व होण्याची मी वाट पाहिली पाहिजे."

इतकी विधाने केल्यानंतर ते त्यांच्यासमोर उभ्या असलेल्या अडचणी सांगतात -

"हे विचार व्यवहारात कशा प्रकारे उतरवावे? शरीर जोमदार असावे याचा काय अर्थ होतो? हिंदुस्थानींनी शस्त्रास्त्रांच्या प्रशिक्षणात कितपत भाग घ्यायला पाहिजे? प्रत्येक व्यक्तीने हे प्रशिक्षण स्वतः घ्यायला पाहिजे की स्वातंत्र्याचे वातावरण निर्माण झाले की शस्त्र धारण केल्याशिवायच आजूबाजूच्या वातावरणातून लोकांमध्ये असे आवश्यक धैर्य येणे पुरेसे होईल? मला असे वाटते की हा दुसरा विचार बरोबर आहे."

यानंतर युद्धाचासुद्धा आपल्या विचाराच्या पुष्टीकरिता कशा प्रकारे उपयोग करायचा त्यांचा विचार आहे हे ते समजावून सांगतात -

> "प्रत्येक हिंदुस्थानीला लष्करात सामील व्हायला जेव्हा मी सांगतो तेव्हा त्याचबरोबर सतत असेसुद्धा सांगत असतो की लष्करात तुम्हांला जे सामील व्हायला सांगतो आहे ते तुमची रक्ताची तहान भागवण्याकरिता नाही तर मृत्यूची भीती घालवण्याकरिता.... लष्करभरती संबंधीच्या माझ्या प्रत्येक भाषणात सैनिकाच्या कर्तव्यासंबंधीच्या भागावर मी जास्तीतजास्त भर देत असतो. माझे असे एकसुद्धा भाषण नाही की ज्यात 'जर्मनांना आपल्याला मारायला जायचे आहे' असे मी म्हणालो असेन. 'हिंदुस्थानच्या आणि साम्राज्याच्या रक्षणाकरिता आपल्याला लढाईत सामील व्हायचे आहे' हाच माझ्या प्रत्येक भाषणाचा सार आहे. माझ्या मागणीच्या उत्तरात खूप मोठी लष्करभरती झाली आणि आम्ही सर्व फ्रांसच्या मदतीकरिता जाऊन युद्धाचे पारडे जर्मनीविरुद्ध फिरवू शकलो तर माझ्या मते हिंदुस्थानचे म्हणणे ऐकले जाण्याचा त्याला अधिकार मिळेल आणि मग हिदुस्थान स्थायी शांतता स्थापित करू शकेल. याशिवाय अजून कल्पना करा की मी निर्भयी लोकांचे लष्कर उभारण्यात जर यशस्वी झालो आणि ते लोक जर खोल दऱ्यांमध्ये पोहोचले आणि त्यांनी प्रेमपूर्ण अंतःकरणाने जर आपल्या बंदुका फेकून दिल्या आणि 'या, आम्ही तुमचे भाऊच आहो, आम्हांला मारा' असे जर त्यांनी

आवाहन केले तर मी म्हणेन की जर्मन हृदयसुद्धा विरघळेल. केवळ जर्मनीतच राक्षसी वृत्तीचे लोक राहतात हे मला मान्य नाही."

"अशा प्रकारे या सर्व गोष्टींचा अर्थ असा होतो की अपवादात्मक परिस्थितीत एक आवश्यक वाईटपण म्हणून आम्हांला युद्धाचा आधार घ्यावा लागू शकतो. जसा आपण शरीराचा आधार घेतो तसाच. शरीरसुद्धा आवश्यक वाईटपण आहे. हेतू जर शुद्ध असेल तर युद्धाचेसुद्धा मानवजातीच्या भल्याकरिता तिच्यात परिवर्तन करता येऊ शकते. परंतु कोणताही अहिंसावादी युद्धाकडे तटस्थेच्या भावनेने पाहू शकत नाही. त्याला स्वतःची पसंती-नापसंती ठरवावीच लागत असते. एक तर तो युद्धाला सक्रिय सहकार्य करू शकतो वा युद्धाला सक्रिय विरोध करू शकतो."

वरील उतारे हे माझ्या मते बापूंचे लष्कराविषयी आणि युद्धाविषयी जे विचार या रोजनिशीत आहेत त्या विचारांच्या ते अर्कासारखे आहेत. असे जरी असले तरी त्यात अथवा रोजनिशीत या विषयाचे जे काही लेखन आलेले आहेत त्यात बापूजींनी आपल्या मनातील सगळ्याच भावना व्यक्त केल्या आहेत असे सांगता येत नाही. वरील विचारात 'अपवादरूप योगायोग म्हणून वा अनिवार्य अनिष्ट म्हणून युद्धाचा आश्रय घ्यावा लागत आहे' असे बापू सांगतात. त्यांच्याच लेखनातील शब्द घेऊन युद्ध अनिवार्य आहे आणि त्याद्वारे समाजाचे हितसुद्धा होऊ शकते असे जर कोणी दाखवण्याचा प्रयत्न करील तर कदाचित तसेही दाखवता येऊ शकेल. परंतु आपण लक्षात ठेवले पाहिजे की बापू स्वतःच म्हणत आहेत की 'मी नवीन अनुभवातून जातो आहे. माझ्या मनातील विचार व्यक्त करण्याकरिता मी धडपडतो आहे. अनेक गोष्टी अजूनही मला स्पष्टपणे दिसत नाहीत. ज्या गोष्टी मला स्पष्टपणे दिसत आहेत त्या दुसऱ्याला सांगण्याकरिता मी शब्दांचा शोध घेतो आहे. प्रकाश आणि मार्गदर्शनाकरिता मी प्रार्थना करतो आहे.' याशिवाय आपण एक दुसरी गोष्टही लक्षात ठेवली पाहिजे. या काळात बापू सहकारी होते. ब्रिटिश साम्राज्यावर त्यांचा विश्वास होता. ते स्वतःच म्हणतात की 'मी इंग्लंडशी निष्ठापूर्वक चिकटून आहे याचे कारण इतकेच आहे की इंग्लंड मुळातून वाईट नाही असा माझा विश्वास आहे. परंतु माझा असासुद्धा विश्वास आहे की हिंदुस्थान जगाला आपला संदेश इंग्लंडच्या माध्यमातून अधिक चांगला देऊ शकतो. दुसरीकडे हिंदुस्थानला निःशस्त्र करण्याचा इंग्लंडचा प्रयत्न, त्याचे अहंकारयुक्त वर्तन आणि आम्हांला भाग न घेऊ देणारे लष्करी धोरण आणि हिंदुस्थानच्या संपत्तीची आणि कलेची इंग्रजांनी व्यापारी

लोभाने केलेली लूट या सर्वांचा मी इतका धिक्कार करतो की माझ्यात जर आधीची श्रद्धा नसती तर मी कधीचाच बंडखोर झालो असतो.' आणि बंडखोर झाल्यानंतरसुद्धा जेव्हा १९३९ साली दुसऱ्या महायुद्धाचा स्फोट झाला तेव्हा ते इंग्लंडला सर्व नैतिक मदत करायला तयार झाले होते.

मुलांना अहिंसेचे शिक्षण कशा प्रकारे द्यावे हा प्रश्न किशोरीलालभाईंनी वरील पत्रात उपस्थित केला होता. 'अहिंसेच्या या नवीन दर्शनी स्वरुपामुळे तर मी विविध प्रश्नांच्या जाळ्यात फसलो आहे, या सर्व क्लिष्ट समस्यांवर एकच गुरुकिल्ली सापडत नाही. ती शोधायला पाहिजे.'

सामान्यपणे माणसाबद्दल असे म्हणता येईल की तो जे बालतो वा लिहितो वा जे विचार व्यक्त करतो त्यापेक्षा तो वास्तवात फार लहान असतो, याचे कारण तो जो संदेश देऊ इच्छितो वा आपली चांगली बाजू दिसेल अशा प्रकारे तो आपल्या विचाराची मांडणी करत असतो. परंतु असे महानुभाव विरळच असतात की ते जे बोलतात वा लिहितात त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करत असतात आणि तसे करून मोठे होत असतात. त्यांच्या अंतःकरणात खोलवर भावना व्यक्त करण्याकरिता त्यांची भाषा असमर्थ असते. बापूंबद्दल असे सांगता येईल की त्यांची भाषणे आणि लेख आपल्याजवळ असल्यामुळे ये इतके मोठे झाले आहेत. त्यांच्या लेखांमधून आणि भाषणांमधून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे आणि विचारांचे आणि भावनांचे पूर्ण दर्शन होऊ शकत नाही. हिंदुस्थानच्या जनतेला अहिंसेची शक्ती समजावून सांगण्याकरिता, तिला अहिंसापरायण करण्याकरिताच त्यांनी तिला सैन्यात दाखल होण्याचा सल्ला दिला होता. त्याकरिता ते कारणे बरोबर शब्दबद्ध करू शकले नसतीलही. परंतु त्यामुळे त्यांच्या अहिंसेच्या उपासनेत अडथळा येत नाही. त्यांनी आपल्या जीवनाद्वारे निर्भयता, प्रेम, सर्वांना आपल्यासारखे समजणे, ईश्वरशरणता वगैरे महान गुणांचा पाठ जगाला शिकवला असून याकरिता त्यांना आपल्याला अहिंसेच दर्शन घडवून द्यायचे आहे.

ज्या वेळी हे सैन्यभरतीचे काम सुरू होते त्याच वेळी देशासमोर सुधारणांची मॉन्टफर्ड योजना आली. देशातील सगळ्या राजकीय पक्षांनी शक्य तोवर एक होऊन आपली मागणी ठेवावी याकरिता प्रयत्न सुरू होते. याकरिता मुंबईत काँग्रेसचे विशेष अधिशन झाले. त्याआधी एक सर्वपक्षीय परिषद बोलावण्यात आली तिच्यात मवाळ आणि जहाल या दोन्ही पक्षांनी सामील व्हावे असा बापूजींचा आग्रह होता. परंतु बापू आपले विचार एकाही पक्षाला मान्य करायला लावू शकले नाही. यामुळे लष्करभरतीचे काम सोडून इतके दिवस वाया घालवणे त्यांना योग्य वाटले नाही. यामुळे ते मवाळांच्या वा जहालांच्या

सभेत जसे गेले नाही तसेच ते काँग्रेसच्या विशेष अधिवेशनातही गेले नाही. मवाळ पक्षाचे पुढारी सुरेंद्रनाथ बॅनर्जींना (पृष्ठ १८०-१), श्री समर्थना (पृष्ठ १९१) आणि श्री बी. चक्रवर्तींना (पृष्ठ १९२) तसेच जहाल पक्षाचे पुढारी टिळक महाराज यांना (पृष्ठ १९२-३) लिहिलेली पत्रे वाचण्यासारखी आहेत. लष्करभरतीच्या कामासंबंधात वा माँटफर्ड सुधारणासंबंधात बापू जितके पुढे जाऊ इच्छित होते तितके तितके पुढे जाण्याची दोन्ही पक्षांची तयारी नव्हती.

याशिवाय बापूंनी आपल्या कुटुंबियांना, मुलांना, आश्रमवासींना लिहिलेली पत्रे, विनोबांना लिहिलेले पत्र (पृष्ठ २१-२४), दूध न घेण्याच्या व्रतामुळे फार त्रास झाल्यामुळे बकरीचे दूध घेण्याच्या व्रतातून बाच्या आग्रहामुळे बकरीचे दूध घेण्याची निघालेली सूट आणि त्याबद्दल मगनलालभाईंना लिहिलेले पत्र (पृष्ठ २१८) अशा महत्त्वाच्या गोष्टींनी ही रोजनिशी भरलेली आहे.

महादेवभाई बापूजींच्या कार्यात सामील झाले याबद्दलचे त्यांचे चरित्र या खंडाच्या सुरुवातीला टाकण्याकरिता मी लिहिले होते. परंतु नवजीवन कार्यालयाला त्याचे वेगळे पुस्तक करणे योग्य वाटले आणि 'महादेवभाईनु पूर्वचरित्र' या नावाने ते बाहेर पडले.

खेडा जिल्ह्यातील लढ्यासंबंधी आणि लष्करभरतीसंबंधी जी पत्रके बापूजींनी प्रकाशित केली होती ती पत्रके परिशिष्टात दिली आहेत.

छपाई करत असताना राहिलेल्या एका चुकीकडे वाचकांचे लक्ष वेधण्याची परवानगी मागतो. पृष्ठ १५८ वर ता. २४-७-'१८ येते. त्यानंतर २९-७-'१८ चे लेखन येते. नंतर परत पृष्ठ १६३ वर तारीख २४-७-'१८ चे लेखन येते. २५ तारखेनंतर परत २९ तारखेचे लेखन येते. वाचकांनी ही चूक दुरुस्त करून घ्यावी ही विनंती. (ही चूक या मराठी अनुवादात दरुस्त केली आहे. तसेच इथे जे पृष्ठ क्रमांक दिले आहेत ते मूळ आवृत्तीतील आहेत.)

- नरहरी पारीख

# अनुक्रमणिका


प्रकाशकाचे निवेदन

प्रस्तावना

रोजनिशी

परिशिष्ट १

खेडा येथील लढ्याविषयी वर्तमानपत्रांना निवेदन

आयुक्त श्री प्रँटना उत्तर

सत्याग्रही खेडुतांना संदेश

सरकारी यादीचे उत्तर

खेड्याच्या लढ्याची पूर्णाहुती

परिशिष्ट २

१. लष्करभरतीकरिता आवाहन (पत्रक पहिले)

२. लष्करभरतीकरिता आवाहन (पत्रक दुसरे)

# महादेवभाईंची रोजनिशी

## खंड चौथा

१३-११-१९१७ ते १७-१-१९१९

जळो ते जाणीव, जळो ते शहाणीव । राहो माझा भाव विठ्ठलापायी
जळो ते आचार, जळो ते विचार । राहो ते मन स्थिर विठ्ठलापायी

- तुकाराम

पूळो मुकावो ते ज्ञानमां, पूळो मुकावो ते डहापणमां,
मारी भक्ती विठ्ठलना चरणमां (दृढ) रहो
पूळो मुकावो ते आचारमां, पूळो मुकावो ते विचारमां,
मारुं चित्त विठ्ठलना चरणमां स्थिर रहो.

तुकाराम

Like most human things, dicipleship has its good and evil, its strong and poor dangerous side: but it really has a good and strong side, - its manly and reasonable humility, the enthusiasm of having recognizing a great master and doing what he wanted done.

- Dean Church

अनेक मानवी वस्तूंप्रमाणे शिष्यभावनेची चांगली तसेच वाईट बाजू असते. मजबूत तशीच दुर्बल आणि भयानक बाजू असते. असे असतानाही खरे पाहता त्यात खरे आणि मजबूत तत्त्वच (जास्त) असते. त्यात पुरुषत्व तसेच योग्य नम्रता असते. याचबरोबर एका महान गुरूचा शोध लागल्याचा उत्साह असतो आणि तो जे म्हणतो ते करण्याचा (आग्रह असतो. ही त्याची चांगली बाजू आहे.)

- डीन चर्च

**इस्थर फेरिंगला लिहिलेल्या पत्रात**

इस्थर फेरिंगला लिहिलेल्या पत्रात होते - (या भगिनी डेनमार्कमध्ये राहत होत्या. सेवा करण्याकरिता एका डॅनिश मिशबरोबर त्या हिंदुस्थानात आल्या. बापूंच्या संपर्कात आल्यानंतर मिशनच्या कामातच व्यग्र राहणे त्यांना आवडले नाही. १९१९ साली त्या मिशनमधून मुक्त झाल्या. काही काळ त्या शांतिनिकेतनमध्ये होत्या आणि काही काळ आश्रमात. मग त्या स्वदेशात गेल्या. त्यांनी डॉ. मेनन या हिंदी गृहस्थाशी लग्न केले होते.)

## (इस्थर फेरिंग यांना पत्र)

१३ - ११ - '१७

"प्रवासात भटकत असल्यामुळे मी तुझ्या पत्राचे उत्तर देऊ शकलो नाही. . . .या जगात परिपूर्णता साध्य करता येणे शक्य नाही असे म्हणणे म्हणजे ईश्वराला नाकारणे आहे. आपण पूर्णपणे निर्दोष होऊ शकत नाही हे विधान जीवनाच्या एका अवस्थेलाच लागू होते हे स्पष्ट आहे. परंतु मी जे म्हणतो त्याच्या समर्थनाकरिता आपण शास्त्रांचा शोध घेण्याकरिता जाण्याची आवश्यकता नाही. प्रयत्न सुरू ठेवले आणि यमनियमांचे पालन करत गेलो तर माणूस सारखा वरवर चढत जात असतो. चढायच्या शक्तिला मर्यादा आहे असे मानण्याची आवश्यकता नाही. मला जर असे वाटले की या जगात मी संपूर्ण प्रेम मिळवू शकत नाही तर मला जीवनात अगदीच रस वाटणार नाही. मुद्द्याची गोष्ट तर ही आहे की प्रेम करण्याची आपली शक्ती सतत वाढत असते. ही प्रक्रिया खूप हळू असते हे खरे आहे. चांगले काम करत असतानाही आपल्याला अडवणाऱ्या माणसावर आपण कसे प्रेम करू शकतो? खरे म्हणजे अशा प्रसंगातच आपली खरी कसोटी असते. आशा आहे की तुझे चित्त आता बरेच शांत झालेले असेल.

"आश्रमावरील तुझ्या प्रेमामुळे तुझ्या कर्तव्यपालनाच्या प्रयत्नात तुला शक्ती मिळो. आपल्यासमोर आलेले काम खूप लक्षपूर्वक आणि काळजीपूर्वक कसे करायचे हे आपल्याला शिकवणे आश्रमाचा उद्देश आहे. आपल्या इच्छा (शुद्ध असूनही) जरी पूर्ण होत नसतील तरी आपण घाबरू नये. उलट त्यांनाच धरून ठेवले पाहिजे.

बापू"

आश्रमात मगनलालभाईना लिहिले -

## (मगनलालभाईंना पत्र)

१५ - ११ - '१७

"आजच्या मंगल प्रसंगी मी तुला काय देऊ? ज्याची तुझ्यात, माझ्यात, अनेकात उणीव आहे ते द्यायचा प्रयत्न करतो आहे. ज्यांच्यात असेल तेच देऊ शकतात. या न्यायाने मी काय देऊ शकतो?

"'मी जरी माणसाची आणि देवाची वाणी बोलत असेन तरी माझ्यात जर प्रेम नसेल तर मी रिकाम्या घटासारखा असेल. मी जरी भविष्य सागत असेन, मला खूप ज्ञान असेल, माझ्यात पर्वताला हलवण्याइतकी श्रद्धा असेल, परंतु जर प्रेम नसेल तर मी तृणवत आहे. मी जरी माझे सर्व काही गरिबांना दिले, माझे शरीर जाळून टाकले, परंतु माझ्यात जर प्रेम नसेल तर माझ्या कार्याचा मला कोणताही लाभ मिळू शकत नाही.

"प्रेम बरेच काही सहन करत असते. ज्याच्यात प्रेम असते त्याच्यात दया असते. प्रेमात द्वेषाला स्थान नाही. प्रेमात अहंभाव नाही, प्रेमात मद नाही, प्रेमात अयोग्यता नाही, प्रेम स्वार्थी नसते, प्रेमात माणूस झटकन चिडत नाही, प्रेमात दुष्टपणाचे विचार येत नाहीत, प्रेम अन्याय करत नाही, प्रेम सत्यानेच खुश असते. प्रेम सर्व काही सहन करते. प्रेम बरेच काही मान्य करते. प्रेम आशापूर्ण असते. प्रेम सहन करते, प्रेम निष्फळ होत नाही. परंतु भविष्यवाणी मिथ्या आहे, वाचा बंद होत असते आणि ज्ञानाचा नाश होत असतो.

"जेव्हा मी बालक होतो तेव्हा मी लहान मुलाप्रमाणे बोलत असे. लहान मुलाप्रमाणे माझी आकलनशक्ती होती. जेव्हा मी मोठा झालो तेव्हा मी बालपण सोडून दिले. आज तर आपल्या डोळ्यांसमोर पडदा असल्यामुळे आपल्याला अंधिक दिसते आहे. नंतर आपल्याला एखादी गोष्ट अगदी समोर उभी असल्यासारखी दिसू शकेल. सध्या मला कमी ज्ञान आहे. नंतर जसा मी असेन तसा मी ओळखला जाईन. अखेरीस श्रद्धा, आशा आणि प्रेम या तीन गोष्टीच स्थायी असतात. त्यात प्रेम श्रेष्ठ आहे.

“हे वाच, यावर विचार कर आणि मग परत वाच. हे इंग्रजीत वाचून त्याचे हिंदी कर. ते काहीही असले तरी प्रेमाचे खूप दर्शन घे. मीराला प्रेमाची कट्यार खूप लागली होती. तशी कट्यार जर आपल्या हाती लागली आणि ती खुपसण्याची शक्ती जर आपल्यामध्ये असली तर आपण जगात उलथापालथ करून टाकू. परंतु हे प्रेम माझ्यात असूनही सतत मी त्याचा अभाव अनुभवत असतो. ही उणीव खूप जास्त आहे. केव्हा केव्हा तर माझी अवस्था अर्धवट भरलेल्या घटाप्रमाणे होत असते. कालच मला काही लोक प्रेमाने थांबवत होते, परंतु त्यांच्याकरिता मला वेळ नव्हता. यामुळे मनातून मी दुःखी होत होतो. हे काही प्रेमाचे चिन्ह नाही. हे अर्धवट भरलेल्या घटातील पाणी फार हालत असल्याप्रमाणे झाले. तुला नवीन वर्ष फळो. तुझी शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक शक्ती वाढो आणि ती तू हिंदमातेच्या चरणावर प्रेमाने समर्पित कर. हीच माझी इच्छा आहे आणि हेच आशीर्वाद आहेत.

बापूचे आशीर्वाद”

मोतीहारी,

## (हर्मन कॅलेनबाखला पत्र)

(दक्षिण आफ्रिकेतील बापूंचे घनिष्ठ मित्र. बापूंबरोबरच ते इथे येणार होते. परंतु ते जर्मन होते. आणि महायुद्धामुळे त्यांच्यावर खूप बंधन होते. यामुळे ते येऊ शकले नाही. १९३८ साली ते काही काळाकरिता इथे आले होते.)

"प्रिय मित्र,

आजकाल मी फार अनियमित झालो आहे. मी इतका काही रखडतो आहे की प्रेमपत्र लिहायला मला वेळच मिळत नाही. विशेषेकरून जेव्हा हे पत्र चुकीच्या ठिकाणी जाते तेव्हा. तुझ्याकडून मला गेल्या तीन महिन्यात केवळ तीनचे पत्रे मिळाली आहेत. असे जरी असले तरी पोलाक आणि कुमारी विन्टरबॉटम मला तुझ्याबद्दल लिहीत असतात हे खरे आहे. तुला भेटायची मला किती तरी इच्छा होत असते ! इथे मला दररोज नवनवीन अनुभव येत असतात. त्यात तुला भागीदार करण्याची मला फार इच्छा असते. परंतु या राक्षसी युद्धाचा कोणताही अंत दिसत नाही. तडजोडीच्या सगळ्या गोष्टींनी तर वेदनाच वाढत असतात. असे जरी असले तर अनेक मानवी कृत्यांप्रमाणे याही गोष्टीचा अंत होईलच. तू जर स्थळकाळाचे अंतर सहन करू शकत असशील तर आपली मैत्री टिकून राहील. या लांब आणि कंटाळवाण्या वियोगापेक्षा तर सुदृढ आणि विशुद्ध प्रेम चांगले. अखेरीस हे क्षणभंगूर शरीर तरी काय आहे? काल मी वाऱ्याच्या झुळकीबरोबर समोरचा वृक्ष पाहत बसलो होतो. मला असे आढळले की नित्य परिवर्तन होत असलेल्या या वृक्षातही असे काही तरी आहे की जे चिरतन टिकत असते. प्रत्येक पानाचे वेगळे जीवन असते. ते पिकते आणि कोमेजते. परंतु झाड जिवंत असते. प्रत्येक झाड कालौघात अथवा घातकी कुऱ्हाडीने मृत्यूला शरण जात असते. परंतु जंगल, ज्याचे हे झाड एक भाग असते, ते मात्र जिवंत असते. आपणसुद्धा मानववृक्षाची पानेच आहो. आपलाही अंत होतो, परंतु आपल्यामध्ये जे चिरंतन असते ते कोणतेही परिवर्तन न होता अनंत काळ टिकून राहत असते. काल सायंकाळी असा विचार करत असताना मी फार आश्वस्थ झालो. मला तुझी आठवण झाली आणि मी एक निश्वास टाकला. परंतु लवकरच मी माझ्या मनावर नियंत्रण मिळवले आणि स्वतःलाच म्हणालो, "मला माहीत आहे की माझा मित्र हा काही त्याचे शरीर नाही, माझा मित्र त्या शरीरातील आत्मा आहे."

प्रेम,

तुझा जुना मित्र

## जमनादास खुशालचंद यांना पत्र

माझ्यावरील कामाचे ओझे वाढत चालले आहे, माझा स्वभाव चिडचिडा झाला आहे. अशा अवस्थेत मी जे जे आदर्श मानतो, त्यांची ओळख राष्ट्राला करून देण्यात स्वतःला झोकून देतो आहे.

## (अंबालालजी यांना पत्र)

सुज्ञ भाई अंबालालजी,

तुमच्या व्यापाराच्या कामामध्ये पडण्याची मला मुळीच इच्छा नाही. असे असतानाही आज भाई कृष्णलालचे पत्र मिळाले. ते असे आहे की माझ्याकडून लिहवल्याशिवाय राहवले नाही. श्रीमती अनुसयाबहेनकरिता तरी तुम्ही विणकरांचे समाधान केले पाहिजे असे मला वाटते. एकाचे समाधान केले तर दुसरा गोंधळ घालील असे मानण्याचे कारण नाही. जर ते गोंधळ घालतील तर वेळेवर उचित उपाययोजना करता येईल. मालकाने मजुरांना दोन पैसे दिले तर ते खुष का होणार नाहीत? त्याचे असमाधान दूर करायचा एकच मार्ग आहे - त्यांच्या जीवनात प्रवेश करा आणि प्रेमरुपी रेशमाच्या दोरीने त्यांना बांधा. हिंदुस्थानकरिता यात अशक्यप्राय काहीही नाही. पैशाचा उपयोगही तर अखेरीस देशकार्याकरिताच आहे. देशाकरिता खर्च कराल तर निश्चितच तो फळफळेल. भाऊ बहिणीचे अंतःकरण कसे दुखवू शकतो? आणि तेही अनुसयाबहेनसारख्या? मला तर त्यांचा आत्मा अतिशय पवित्र असल्याचे जाणवले आहे. त्यांचे वचन तुमच्याकरिता हितावह होतील असे म्हणालो तर अतिशयोक्ती होणार नाही. अशा प्रकारे तुमच्यावर दुप्पट ओझे आहे. नोकरांना खुश करा आणि बहिणीचे आशीर्वाद मिळवा. माझी धृष्टतासुद्धा दुहेरी आहे. एकाच पत्रात मी तुमच्या व्यवसायात आणि कौटुंबित संबंधात लुडबुडतो आहे. मला माफ करा.

लि. मोहनदास गांधीचे वंदेमातरम.

# (चिमणलाल चिनाईवाळा यांना पत्र)

मोतीहारी

१३-१-१८

भाईश्री चिमणलाल (चिनाईवाळा)

तुमचे पत्र मिळाले. मजूरवर्गाला मदत करणे आमचे काम आहे. याबद्दल मला शंका नाही. सध्या सुरू असलेल्या सहकार आंदोलनावर माझी श्रद्धा कमी आहे. मला वाटते की आपले पहिले काम मजूर वर्गाच्या स्थितीचा सूक्ष्म अभ्यास करणे आहे. ते कुठे राहतात? कसे राहतात? किती खर्च करतात? किती वाचवतात? किती कर्ज आहे? किती मुले आहेत? त्यांचे ते पालनपोषण कसे करतात? त्यांतील असहकार करणारे किती आहेत? त्यांच्या स्थितीत किती बद्‌ल झाला आहे? आता त्यांची कशी परिस्थिती आहे? या सर्व प्रश्नांचे उत्तर कळल्याशिवाय एकदम सहकारी समिती तयार करणे योग्य वाटत नाही. या वर्गात प्रवेश करणे आपल्याकरिता आवश्यक आहे. असे करू तर अनेक समस्या आपण फार कमी वेळात सोडवू शकू. सध्या तर मी तुम्हाला त्यांच्याशी मिसळून राहायचा आणि त्यांची परिस्थिती समजून घेण्याची सल्ला देतो आहे. आपण भेटू तेव्हा विशेष गोष्टी करू.

# (एस. के. रुद्र यांना पत्र)

मोतीहारी,

१६-१-१८

**भाईश्री रुद्र,** (दिल्लीत केंब्रिज मिशनद्वारे चालवण्यात येणाऱ्या सेंट स्टिफन्य कॉलेजचे प्राचार्य. या महाविद्यालयात ते पहिलेच हिंदुस्थानी प्राचार्य होते. श्री ऍन्ड्र्यूजनी हिंदुस्थानातील आपल्या कार्याची सुरुवात प्राध्यापक म्हणून याच महाविद्यालयात केली होती. हे मिशनचे महाविद्यालय असूनही इथे सर्वधर्मसहभावाचे वातावरण होते आणि इथे राष्ट्रीयत्वाला सुद्धा उत्तेजन दिले जात असे. बापूंशी सुशीलकुमारचा परिचय एँड्र्यूजद्वारा झाला होता. आधी बापू दिल्लीत त्यांच्याकडेच उतरायचे.)

“माझा डावा भाग खूप दुखत असल्यामुळे पत्र लिहावेसे वाटत नव्हते. यामुळे हे पत्र मी भाईश्री देसाईंकडून लिहवून घेत आहे. तुमच्याकडून मिळू शकत असेल तर मला आमच्या प्रांतिक भाषांकरिता घाईघाईत लिहिलेले पत्र नको असून तुमच्याकडून मला असे उत्साहपूर्ण आणि उत्तम समर्थन पाहिजे की ज्याचा मला जनतेची कर्तव्यबुद्धी जागृत करण्याकरिता उपयोग करता येईल. शिकवण्याकरिता तुम्ही देशी भाषा ठेवाल आणि परीक्षेकरिता मात्र इंग्रजी ठेवू असे कशाकरिता? प्रत्येक विद्यार्थ्याने इंग्रजी का शिकायला पाहिजे? इतके पुरेसे नाही काय की प्रत्येक प्रांतातील काही लोकांनी इंग्रजीचे विशेष शिक्षण घ्यावे आणि त्याद्वारे नवीन विचारांच्या आणि वैज्ञानिक शोधांच्या ज्ञानाचा प्रसार प्रादेशिक भाषांच्या माध्यमातून लोकांमध्ये करता येणार नाही काय? असे केले तरच आपण आपल्या मुलामुलींना नवीन ज्ञानाने ओतप्रोत करून टाकू शकू आणि जे नवजीवन आपल्याल्या गत साठ वर्षात लाभले नाही त्याचा त्यांना अनुभव मिळवून देऊ शकू. मला अधिकाधिक जाणीव होऊ लागली आहे की आपल्या मुलांना जर देशी भाषेत शिक्षण मिळेल तर ते वेगवेगळ्या विज्ञानाच्या गोष्टी पचवू शकतील. अतिशय आवश्यक असलेल्या या सुधारणांकरिता अर्धवट पाऊल टाकून चालणार नाही. जोपर्यंत ही स्थिती आपण निर्माण करत नाही तोपर्यंत मला भीती वाटते की आपल्याकरिता विचार करण्याची जबाबदारी आपल्याला इंग्रज लोकांवरच टाकावी लागेल. आपल्याला मात्र गुलामाप्रमाणे केवळ त्यांचे अनुकरणच करत राहावे लागेल. खूपच महत्त्वाचा आणि अत्यावश्यक असा हा बदल होत नाही तोपर्यंत स्वराज्याची कोणतीही योजना हे संकट टाळू शकत नाही. तुम्हालासुद्धा जर माझ्याप्रमाणेच वाटत असेल तर वरील विचार तुमच्या भाषेत लिहा आणि ते पत्र मला पाठवा.

"कलकत्त्यात मला खूप मजा आली. परंतु ती मंडपात (२९ ते ३१ डिसेंबर काँग्रेसचे अधिवेशन सुरू होते.) आली नव्हती, मंडपाबाहेर आली होती. कवी आणि त्यांच्या मंडळीने 'डाकघर' (रविंद्रनाठ ठाकुरांचे एक नाटक.) या नाटकाचा प्रयोग केला. तो पाहून मी मुग्ध झालो. हे लिहीत असतानाही कवीचा मनोहर आणि गोड आवाज माझ्या मनात गुंजन करतो आहे. आजारी मुलाचा अभिनयसुद्धा तितकाच सुंदर होता. बंगाली संगिताने मला मोहिनी घातली आहे. मला जरी अजून ते संगीत ऐकायला मिळाले नाही, आणि जरी हेच संगीत माझ्या कानात गुंजन करत राहिजे तरी माझ्या ज्ञानतंतुवर जो तणाव असतो तो निघून जाईल.

"तुम्हाला कळल्याने आनंद होईल की 'सामाजिक सेवा परिषदेचा' प्रमुख म्हणून मी माझ्या अधिकाराचा पूर्ण उपयोग केला. (पाहा भाषण, अखिल हिंदुस्थान समाजसेवा संघात भाषण.) बंगाली जीवनात जे काही चांगले आहे त्याचा प्रेमी असल्याचा लाभ घेत मी बंगाली प्रांताभिमावर खूप कडक टीका करण्याची सूट घेतली. (पाहा विद्यापीठातील भाषण.) श्रोत्यांमधील कोणालाही त्यामुळे वाईट वाटले नाही. माझ्या टिकेचे महत्त्व त्यांना जाणवत होते असे मला वाटते. माझ्या भाषणाची नक्कल तुम्हाला पाठवत आहे. अर्थात मी जे व्यक्तिगत आवाहन केले ते यात नाही.

"माझ्या अनुभवाचा एकदशांश भागही मी तुम्हाला सांगितला नाही. परंतु भाई देसाई मला आठवण देत आहेत की मी तुम्हाला एक अनुभव तर सांगायलाच पाहिजे. तिथे मानवदया संघात मी गेलो होतो. तिथेसुद्धा मी अध्यक्ष होतो. मला वाटले की कालीघाटवर जी आसुरी पूजा चालत असते तिच्यासंबंधी जर मी काहीही बोललो नाही तर मी माझ्या वर्गातील लोकांशी आणि श्रोत्यांशी प्रामाणिक राहणार नाही. यामुळे इतके तर मी कोणतीही लपाछपी न करता स्पष्टपणे बोललो. मी तेव्हा श्रोत्यांना सारखा न्याहाळत होतो. माझ्या बोलण्याने ते प्रभावित झाले की नाही हे मी सांगू शकत नाही. परंतु याबद्दल मनमोकळेपणाने बोलून मी माझ्या अंतःकरणावरील ओझे कमी केले हे मात्र खरे. माझ्यात जर पूर्ण जोम असता तर घाटावर जाणाऱ्या एखाद्या बोळीच्या तोंडाशी मी उभा राहिलो असतो आणि धर्माच्या नावाने ईश्वराला बदनाम करण्यापासून प्रत्येक स्त्रीपुरुषाला अडवले असते.

"प्रादेशिक भाषेवरील तुमच्या पत्रात तुम्ही मांडलेल्या मुद्द्यांची तुम्हाला आठवण राहावी म्हणून मी ते तुम्हाला परत पाठवतो आहे.

तुमचा,

मो. क. गांधी"

# (कल्याणभाई महेता यांना पत्र)

मोतीहारी,

१८-१-‘१८

“भाई कल्याणभाई,

“तुमचे पत्र मिळाले. दोनच मार्ग आहेत. एक उत्तम मार्ग आहे. तो असा - या भगिनीने मिळालेल्या विद्येचा शुद्ध उपयोग करावा आणि नशिबाने मिळालेल्या पतीला सुधारण्याचा प्रयत्न करावा. पूर्वीच्या स्त्रियांनी असे काम केले आहे. आणि ही भगिनी जर असे काम करण्याचे साहस करील तर संबंधित लोक लवकरच सुखी होतील. या कामाकरिता हिला योग्य ते आत्मज्ञान असले पाहिजे. परंतु इतके साहस जर तिच्याजवळ नसेल तर तिने आपल्या पतीजवळ जायला नकार दिला पाहिजे. या भगिनीला जर आपल्यावर बळजबरी केली जाईल अशी भीती वाटत असेल तर तिला गृहत्याग करायचा अधिकार आहे. अशा वेळी हिला कोणत्या तरी मित्राने आश्रय दिला पाहिजे. गावागाड्यात जर या बाईला आधार मिळत नसेल तर हिला बाहेर गावी नेले पाहिजे. तुमच्या मैत्रीचा उपयोग तुम्ही या बाईच्या रक्षणार्थ करावा अशी माझी इच्छा आहे. उत्तम मांर्गाचे अनुसरण आधी करून पाहा.”

# (एका मित्राला पत्र)

२१-१-'१८

माझ्या भाषणाचे लेख असलेल्या पुस्तकाला (मथुरादास त्रिकमदास संपादित 'महात्मा गांधीजीनी विचारसृष्टी.') चांगली प्रस्तावना कोण लिहू शकेल? अथवा प्रस्तावनेची आवश्यकता आहे की नाही? या प्रश्नाचे उत्तर छापणाराचे नाव आणि हेतू कळल्यानंतरच सांगता येईल. पैशाकरिता पुस्तक विकणारी प्रकाशनसंस्था जर पुस्तक छापत असेल तर त्याच्याकरिता सरोजिनीची प्रस्तावना असेल. जर भाविक वैष्णव छापत असेल तर तो रणछोडदासकडे (रणछोडदासकडे पटवारी) जाईल. मला न ओळखणाऱ्या अनोळखी माणसाच्या हाती जर माझे लेखन पडले आणि त्याला पुस्तकाची विक्री सुनिश्चित करण्याची इच्छा असेल तर त्याने माझे मित्र डॉ, महेतांचा शोध घ्यावा. आणि तुम्ही वा मथुरादास मालक होणार असाल तर प्रस्तावनेची आवश्यकताच नसेल. सध्या तर मी फेलिक्स सर्कसमधील जनावराप्रमाणे प्रसिद्ध आहे. यामुळे वरील कारणाशिवाय इतर कोणत्याही कारणाकरिता माझ्यावर दुसऱ्या कोणत्याही कारणाची आवश्यकता नाही. जेव्हा भरती येत असते तेव्हा माझ्या विचारसागरात ज्या कोणाला आंघोळ करायची असेल त्या सर्वांनी शक्य तितक्या लवकर आंघोळ करून घ्यावी. या प्रकाशनाचा हाच हेतू आहे. यामुळे या प्रकाशनाचा लाभ जितक्या लोकांना घेता येईल तितक्या लोकांना घेऊ देण्याची इच्छा होते. अशा प्रकारे हे पुस्तक छापण्यामागील सध्या तरी मी प्रेरणा आहे. याला प्रस्तावनेची काय आवश्यकता? माझे आचरण हीच याची प्रस्तावना. जे वाचू शकत असतील त्यांनी वाचून टाकावे."

## (मेसर्स लिंजियर ऍन्ड कंपनी, मदुरा यांना पत्र)

"ज्या लोकांनी विणाई सोडली आहे त्यांचा व्यवसाय पुनर्जिवित करण्याकरिता त्यांना किमान बाजारभावाने सूत देण्याची आणि त्यांनी विणून तयार केलेले कापड जास्तीत जास्त जो बाजारभाव असेल त्याने विकत घ्यावे अशी पद्धती मी अवलंबिली आहे. त्यांच्या सोयीनुसार ते सुताची किंमत हप्त्याहप्त्याने देऊ शकतील. या रकमेवर त्यांना व्याज द्यावे लागणार नाही. या पद्धतीने ते दरमहा सरासरी १७ रुपये कमाई करू शकतात. हे विणकर आपला सगळा वेळ विणाईला देत नसतात आणि कापडही जाड विणत असतात. याहून अधिक कमावण्याची त्यांना इच्छाही नसते. इतक्यात त्यांच्या गरजा भागतात. मला खात्री आहे की विणकर जर हुशार असेल, बारीक सूत विणत असेल आणि थोडी कारागिरी करेल तर तो पंचवीस रुपये कमाऊ शकतो. माझे मत आहे की कोणत्याही विणकराला जर आपला व्यवसाय सोडावा लागत असेल तर त्यामुळे राष्ट्राचीही हानी होते. आणि जितक्या विणकरांना आपण व्यवसायाकरिता प्रेरित करू तितकाच राष्ट्राचा फायदा होईल. माझी इच्छा आहे की तुम्ही कोणतीही योजना हाती घ्या, परंतु त्याबद्दलची मला वेळोवेळी माहिती देत राहा.

सेवक,

मो. क. गांधी

# (काका कालेलकरांना पत्र)

२४-१-‘१८

प्राध्यापक तुरुंगात गेले होते. मग सत्याग्रह कसा? आपले म्हणणे का मांडले नाही? (चंपारण सत्याग्रहाच्या वेळी एक मिऴणूक निघाली होती. तिच्यात आचार्य कृपलानी घोड्यावर बसलेले होते. त्यांच्यावर बेफिकिरपणे वाहन हाकण्याचा आरोप करण्यात आला होता. बेफाम वेगात घोडा पळवण्याचा आरोपाखाली त्यांना तीन आठवड्यांची शिक्षा झाली होती. या प्रसंगाला अनुलक्षून हे पत्र होते. आचार्य कृपलानी आश्रमात प्राध्यापक होते.)

उत्तर - “माणसावर जेव्हा आरोप करण्यात येतो तेव्हा तो एक तर गुन्हेगार असतो, वा गुन्हेगार नसतो. जर तो गुन्हेगार असेल तर प्रायश्चित्त म्हणून तुरुंगात जाईल, गुन्हेगार नसेल तर न्यायाधिशाने शिक्षा केली म्हणून तुरुंगात जाईल. जर सर्व लोक आपले निर्दोषित्व सिद्ध करण्याकरिता तुरुंगात जाणे पसंत करत असतील तर अखेरीस निर्दोषी माणसाला कोणी क्वचितच तुरुंगात पाठवील. सर्वसामान्य दृष्टिकोन हा असा असतो. प्राध्यापकांच्या प्रकरणी बरेच वैशिष्ट्य राहिले आहे. त्यांचे प्रकरण काही घोड्याला वेगात पळवण्याचे नव्हते. हे तर निमित्त होते. जमेल त्या प्रकारे मला आणि मी सुरू केलेल्या आंदोलनात भाग घेतलेल्या लोकांना बदनाम करणे हा या आरोपामागे हेतू होता. मला काहीही करायचे नाही, पण माझ्याकरिता काम करणारांना काही केले तर बरे अशी काही तरी मान्यता यामागे होती. अशा वेळी प्राध्यापकांनी तुरुंगात जाऊन आपले स्वरूप दाखवणे आवश्यक होते. शिवाय येथील जनता तुरुंगात जायला फार घाबरत असते. त्यांची ही भीती दूर करण्याची ही सुंदर संधी होती. ही सोडता येत नव्हती. प्राध्यापकांकरिता हा अनुभव असाच सोडून देण्यासारखा नव्हता. हे तर लक्ष्मी कुंकू लावण्याकरिता आली असता तोंड लपवण्यासारखे झाले असते. स्वतः दुःख भोगून अन्यायासमोर उभे राहणे म्हणजे सत्याग्रह. न्यायाधिशाने दिलेला निकाल हा शुद्ध अन्याय होता. तुरुंगात जाऊन त्रास सहन करायचे कबूल करून प्राध्यापकांनी सत्याग्रह केला होता. त्यावर दाद मागणे हा सत्याग्रहाचा विषयच नाही. शुद्ध सत्याग्रहात बचाव करण्याला स्थानच नाही. आपण जो सत्याग्रह पाहतो तो शुद्ध नसून मिश्रित आहे. हे मिश्रण करणे आपल्या दुर्बलतेचे प्रमाण आणि चिन्ह आहे. जेव्हा शुद्ध सत्याग्रह होईल, तेव्हा जग त्याकडे आश्चर्यचकित होऊन पाहील असा माझा दृढ विश्वास आहे. यामुळे सत्याग्रहाच्या दृष्टीने तर दाद मागायलाच नको होती. परंतु दाद न मागण्यामागे शुद्ध सत्याग्रहाचा हेतू गौण होता. मला वाटले की हा खटला इतका काही दुर्बल होता की त्याबद्दल दाद मागून त्याला मोठे

स्वरूप देण्याला अर्थ नव्हता. असे करून आम्ही न्यायाधिशाचे पक्षपाती धोरण आणि मूर्खपणा हे दोन्ही सहजपणे दाखवू शकलो. शिवाय दाद मागितली तर आपण जिंकूच असे आश्वासन कोणताही वकील देऊ शकत नव्हता. तुम्ही तुमच्या जोखिमीवर दाद मागा असे वकिलांचे म्हणणे होते. परंतु हारून आले तर मी निश्चितच दोष देईन. या खटल्यात दाद मागण्यासारखे काहीही नव्हते. फेरतपासणीच होऊ शकणार होती. वरीष्ठ न्यायालयसुद्धा वस्तुस्थिती काय आहे ते पाहत नसते. केवळ कायद्यातील दोष दुरुस्त करत असते. या प्रकरणी बचावाला कायदेशीर वाव नव्हता. तुम्ही पाहाल की यात सत्याग्रहाचे आणि ज्याला 'व्यवहार' म्हणतात त्याचेही रक्षण झाले आहे."

# (जमनादास यांना पत्र)

“चि. जमनादास,

“तू तुझे काम सोडून माझ्याजवळ जरी राहायला आला तरी तुला काहीही मिळणार नाही. थोड्याच दिवसात तुला कंटाळा येईल आणि मग तुला तुझ्या कर्तव्याची आठवण येईल.

“यामुळे तू तिथेच राहून आनंदाचा शोध घ्यायला पाहिजे. सध्या माझ्याजवळ राहण्याची तुझी इच्छा एक प्रकारचा ‘विषय’ आहे. आणि ज्याप्रमाणे विषयोपभोग घतल्यानंतर आपल्याला थकवा आणि नैराश्य येते त्याचप्रमाणे माझ्याजवळ राहिल्यानंतर तुला थकवा आणि निराशा जाणवेल. माझ्याजवळ येणे हा आदर्श मनाशी ठेव आणि जे काही कर्तव्य आता पार पाडणे आवश्यक आहे ते पार पाडून माझ्याकडे येण्याकरिता पात्र हो.”

# (डॉ. कुळकर्णी यांना पत्र)

“भाई श्री कुळकर्णी,

“तुम्ही जेव्हा तुमचे शेवटचे पत्र टपालात टाकले तेव्हाच तुम्ही पाठवलेले साहित्य माझे वाचून झालेले होते. परंतु माझ्या प्रयोगापासून मला खात्रीपूर्वक दूर करायला लावण्याकरिता हे पुरेसे नव्हते. तुम्ही म्हणता ते खरेही असू शकेल वा नसूही शकेल. मीठ जर सर्व रोगांवर उपाय असेल तर त्याचा वापर दुप्पट वा चौपट व्हावा म्हणून मेहनत करण्यात कोणताही कसूर ठेवायला नको. मला तर प्लेगसारख्या रोगावर मिठाचा काय परिणाम होतो याचे आकडे पाहिजे. वनस्पती आहारासंबंधात पुस्तकांमध्ये मी मिठाच्या प्रयोगासंबंधी बरेच काही वाचलेले आहे. यामुळे मी स्वतः मीठ सोडून पाहिले. जवळपास सात वर्षांपूर्वी कस्तुरबां जोरदार रक्तप्रदराने पीडित होत्या. कुन्हेचे कटिस्नानाचे आणि आहाराचे प्रयोग मी तिच्यावर करत होतो. परंतु त्यामुळे मी जवळपास निराश झालो होतो. तेव्हाच डॉ. वॅलेसनी मिठाविरुद्ध आणि डॉ. हेगेलनी डाळीविरुद्ध खूप काही लिहिले आणि मीठ सोडण्याचा प्रयोग करावा असे मला वाटले. डॉ. वॅलेसचा युक्तिवाद असा होता की मीठ उत्तेजक आणि सूज निर्माण करणारे आहे. ते प्राणीज नसल्यामुळे पचल्याशिवायच बाहेर निघून जाते आणि निघत असताना ते सर्वप्रकारचे नुकसान करत असते. अन्न पचवणाऱ्या ग्रंथींना ते अकारण जास्त उत्तेजित करते. माणसाला ते आवश्यकतेपेक्षा अधिक खायला लावते. अशा प्रकारे ते पचनशक्तीच्या इंद्रियांवर अकारण जास्त ओझे टाकते आणि रक्त दुर्बल करते. इतर अनेकांप्रमाणे कस्तुरबाई आणि मी - आम्हा दोघांनाही मीठ आवडत होते आणि आम्ही ते बऱ्याच प्रमाणात घेत होतो. माझ्या मनाशी मी युक्तिवाद केला की शरीराला जे मीठ मिळते आहे तेच कदाचित तिचा आजार लांबवण्याकरिता जबाबदार असेल. डाळीबद्दल मी जो युक्तिवाद केला होता तो स्वतःवर लागू करण्याची त्या वेळी मला आवश्यकता वाटली नाही. त्या वेळी माझी प्रकृती बरीच चांगली होती. प्रकृतीच्या कारणामुळे मला आहारात कोणताही बदल करण्याची आवश्यकता वाटत नव्हती. परंतु माझ्या लक्षात आले की मी जर मीठ आणि डाळी या गोष्टी सोडल्या नाही तर कस्तुबाईंची तसे करण्याकरिता मी समजूत घालू शकणार नाही. यामुळे या दोन्ही गोष्टी मी सोडल्या आणि कस्तुरबाईलाही सोडायला लावल्या. त्यांना मी दुसरा कोणताही बदल करायला लावला नव्हता. एका आठवड्यातच त्यांचा रक्तप्रवाह बंद झाला आणि त्यांचे हाडबंडल

झालेले शरीर परत भरू लागले. तेव्हापासून मी अजूनही मीठ खात नाही. परंतु कस्तुरबाईला तर मिठाची इतकी काही सवय लागलेली होती की ते सोडण्याची जेव्हा गरज राहिली नाही तेव्हा त्या त्या मोहाचा सामना करू शकल्या नाही. यामुळे पूर्णपणे चांगल्या झाल्यानंतर त्यांनी परत मीठ घ्यायला सुरुवात केली. आतासुद्धा त्यांना अधूनमधून रक्तप्रवाह सुरू होत असतो आणि मग त्या मीठ आणि डाळी सोडत असतात आणि घर्षण स्नान घेत असतात. असे करून त्या एकदम चांगल्या होतात. या सात वर्षांच्या दरम्यान मी दम्याच्या आणि फुफ्पुसांच्या इतर व्याधींच्या रुग्णांवर मिठाशिवायच्या आहाराचा प्रयोग केला आहे आणि प्रत्येक वेळी त्याचे चांगले परिणाम मिळाले आहेत. ज्या कोणाच्या संपर्कात नंतर मी आलो आहे त्यांना मीठ न घेतल्यामुळे अजून कोणताही नवीन आजार झालेला नाही. मी असेही समजतो की मिठाशिवायच्या आहाराची मला माझ्या ब्रह्मचर्य व्रतातही चांगलीच मदत झाली आहे. हे सर्व अनुभव माझ्यासमोर असल्यामुळे मिठाबद्दल तुमचा आग्रह मला धक्कादायक वाटतो. माझ्या शरीरात एक मोठा फेरबदल होत असल्याचे मला आढळते आहे आणि त्यासंबंधात मी डॉक्टरांशीही चर्चा केली आहे. परंतु तुम्ही त्यासंबंधात कोणताही प्रकाश टाकू शकत नाही. मला जर कोणतीही जखम झाली तर तिला मलम लावल्यानंतर आधीपेक्षा ती फार लवकर दुरुस्त होते. लांब प्रवास केल्यानंतर मला जो थकवा जाणवत असायचा तो आता जाणवत नाही. असे वाटते की माझ्यात परत 'हिरवाई (ग्रीनस्टिक)' आली आहे. माझी कातडी नाजूक आणि लवचित झाली आहे. सुरीने अपेक्षेपेक्षा ती लवकर कापली जाते. मी जरी नेहमी अनवाणी चालत असलो तरी माझ्या तळव्यात इतरांप्रमाणे राठपणा येत नाही, ते जाड होत नाहीत. माझ्या दाढा नरम झाल्या आहेत आणि माझ्या तोंडात जे थोडेसे दात आहेत ते उपयोगापेक्षा शोभेकरिताच जास्त आहेत. हा जो नाजूकपणा माझ्यात आला आहे तो मिठाशिवायच्या आहारामुळे आहे काय? माझ्या जीवनपद्धतीत मी इतरही अनेक फेरबदल केले आहेत. यामुळे या सर्व परिवर्तनाकरिता केवळ मिठाला जबाबदार धरता येणे कठीण आहे. माझ्या शरीरात हा जो बिघाड झाला आहे - जर त्याला बिघाड म्हणता येत असेल तर - त्याकडे जर माझे लक्ष वेधले गेले तर मला जे इतर अनेक लाभ आढळतात त्याकरिता मी मिठाशिवायच्या आहाराची जोरदार शिफारस करीन. मला जर तुमच्याकडून काही नवीन माहिती कळली तर थोड्या काळाकरिता का होईना मी परत मीठ खाणे पसंत करीन. आणि माझ्या शरीरावर त्याचे काय परिणाम होतात ते मी पाहीन. माझे प्रयोग थाडा वेळ बंद करायचे की नाही याची चर्चा मी डॉ. देवशी करत

असतानाच तुमचे पत्र आले. माझे मागीत पत्र मी त्याचेच उत्तर म्हणून लिहिले होते. या पत्रासंबंधात तुमच्याजवळ जर काही निश्चित माहिती असेल आणि तुम्ही वैज्ञानिक दृष्टी ठेवण्यासंबंधात इतके आग्रही असल्यामुळे आणि  उत्साहाच्या आवेगातही सत्याच्या मार्गावरून विचलित होणे तुम्हाला जर मान्य नसेल तर मी प्लेगची चौकशी आणि शोधाच्या दृष्टीने आहारात मिठाचे किती महत्त्व आहे याचा शोध घेण्याकरिता तुमच्या मदतीची अपेक्षा करीन. तुम्ही सांगितलेली पुस्तके मिळवण्याचा मी प्रयत्न करीन.

सेवक,

मो. क. गांधी

# (श्री मावळणकर यांना पत्र)

मोतीहारी

२७-१-‘१८

“भाईश्री मावळणकर,

“खेडासंबंधीच्या वृत्तपत्रातील निवेदना’च्या उत्तरार्थ सभेने तयार केलेल्या केलेल्या मसुद्यासंबंधीचे तुमचे पत्र मिळाले. तुमच्या उत्तराचा पहिला भाग मला आवडला. शेवटचा भाग तितकाच दुर्बल वाटला. ते दुरुस्त करण्याच्या भानगडीत मी पडत नाही. खेडा जिल्ह्याबाहेरील संस्था खेडा जिल्ह्याकरिता काहीही करू शकत नाही अशी जी या सरकारची मान्यता आहे तिच्या विरोधात त्याहूनही जबरदस्त उत्तर देता येऊ शकते. सभेचा एकही सदस्य जरी खेडा जिल्ह्यात आलेला नसेल तरी पण गुजरातच्या कोणत्याही भागासंबंधी सरकारला लिहिण्याचा त्याला केवळ अधिकारच नाही तसे करणे त्याचे कर्तव्यसुद्धा असेल. चौकशी करणाऱ्या सदस्यांची नावे देणे आवश्यक होते. नव्या (ज्युनिअर) आणि जुन्या (सिनि्अर) अंमलदारांमध्ये जे अंतर आहे असे सांगतात ते अयोग्य आहे. आणि जुने अंमलदार असते तर त्यांनी अधिक सूक्ष्मपणे चौकशी केली असती असे आपण नकळत कबूल केल्यासारखे जाणवते. (सरकार) अंमलदारांना आपल्या स्वार्थाकरिता घेत असल्यामुळे आपला दावा तर हा आहे की अंमलदार सरकारी अधिकारी असल्यामुळेच ते कमी अनुभवी आणि आपली जबाबदारी कळणाऱ्या जनतेपेक्षा कमी विश्वासार्ह आहेत. अंमलदांरांना जनतेच्या बोलण्यांकडे तिरस्काराने पाहण्याची आणि ते फेटाळून लावण्याची सवय लागली आहे. उलट जनतेच्या पुढाऱ्यांमध्ये स्वार्थ नसतो, ते तटस्थ असतात. आपल्या चुकीकडे दुर्लक्ष केले जाणार नाही हे त्यांना माहीत असते. यामुळे त्यांनी केलेली चौकशी जास्त विश्वासार्ह असते. या सर्व गोष्टी आपण चांगल्या प्रकारे दाखवायला पाहिजे. या संघर्षाद्वारे आपण जनतेला शिकवू इच्छितो आणि दाखवू इच्छितो की सरकार जसे आपल्या प्रतिष्ठेचे जतन करण्याकरिता उत्सुक आहे तसेच आपणही आपल्या प्रतिष्ठेचे जतन करण्याकरिता उत्सुक आहो. सरकार बहुधा आपल्या प्रतिष्ठेचे जतन आपल्या सत्तेच्या बळावर करत असते. परंतु आपल्याला आपल्या प्रतिष्ठेचे जतन मात्र न्याय्य कार्याद्वारे करावे लागत असते. जनतेला जर अशा

प्रकारचा विस्तृत अनुभव आणि निश्चित मार्गदर्शन मिळाले तर त्यामुळे तिला स्वरज्याचे प्रशिक्षण मिळेल.

दुसरी जी गोष्ट मी समजावून सांगू इच्छितो ती अशी की अशा वेळी केलेल्या कामाचे मूल्यन सहजपणे करता येऊ शकते. समितीने इतर सर्व काम सोडून आधी आपली सभा घेतली पाहिजे. थोडक्यात सांगायचे तर समितीचे काम स्थगित करता येऊ शकत नाही. समितीत असे हुशार आणि जबाबदार लोक असले पाहिजे की जे हव्या त्या वेळी हजर राहू शकतील. आपली बाजू खरी असेल तर त्यामुळे हजारो लोकांचे रक्षण होऊ शकते. ज्याप्रमाणे आपल्या वैयक्तिक स्वार्थामुळे अनेक गोष्टीत माघार घ्यावी लागणे न्याय्य वाटते, त्याचप्रमाणे सार्वजनिक स्वार्थाकरिताही आपली बांधिलकी आहे. प्रत्येक सार्वजनिक कार्यकर्त्याचा ही गर्भित प्रतिज्ञा असली पाहिजे. मला तर वाटते की आपण उत्तर द्यायला फार उशीर केला आहे. अनेकदा सरकार आवश्यकतेपेक्षा जास्त सावधगिरी बाळगूनच जनआंदोलन दाबत असते. झोपलेल्याला नाही तर जागे असलेल्या माणसालाच न्याय मिळत असतो. हे वाक्य काही केवळ न्यायालयात उच्चारण्याकरिताच नाही, ते आपल्या प्रत्येक व्यवहाराला लागू होते.

“तुम्ही सर्व अतिशय चांगले काम करत आहा आणि तुम्ही अढळ राहाल असे समजूनच मी वरील टीका केली आहे. तुम्ही आळशी आहा असे जर मला म्हणायचे असते तर मी तुम्हाला या गोष्टीची जाणीव काही न बोलताच करून दिली असती. असे सांगायला लेळ लावण्याची माझी पद्धतच नाही. तुम्ही अधिकाधिक सावध राहावे आणि तीस वर्ष जुन्या संस्थेची प्रतिष्ठा वाढावी या उद्देशानेच मी हे प्रेमोद्गार काढले आहेत. तो चाबकाचा मार आहे आहे असे समजू नका आणि दुःखी होऊ नका.

मोहनदासचे वंदेमातरम”

३१-१-‘१८

बांकीपूरात. अहमदाबादहून मावळणकरचे पत्र. खेड्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती खरोखरच वाईट असेल, तर त्यांनी कर्ज काढून किंवा जनावरे विकून महसूल न भरता सरकारला आपली जमीन विकू द्यावी आणि सरकारसमोर सत्याग्रह करावा, अशी सूचना भाई देवधर आणि ठक्कर यांनी काही अनोळखी तरुणांना केली आहे. त्यांनी असेही सुचवले आहे की, लाख रुपये गोळा करून आपण शेतसारा भरावा आणि अशा प्रकारे सरकारला लाजवावे. मावळणकरांची व्यथा. त्यांनी असे लिहिले आहे की “हा मार्ग तुमच्या सूचनेविरुद्ध आहे. आणि तुमच्या सूचनेविरुद्ध काम करण्यापेक्षा स्वस्थ बसून राहणे चांगले. अशा विचारांचे युद्ध सुरू आहे. किंकर्तव्यमूढ झालो आहे.”

याच्या उत्तरात -

## (ग. वा. मावळणकर यांना पत्र)

“तुमच्या धर्मसंकटाची मी पूर्णपणे कल्पना करू शकतो. दमयंतीला जेव्हा नळासारखे इतरही अनेक लोक दिसले तेव्हा तिच्यावर मोठेच संकट आले. त्या वेळी तिने जे दृढत्व दाखवले होते तोच खरा निर्धार आहे. परंतु हे सोपे नाही. यामुळे अशा वेळेच्या चुका अनेकदा क्षम्य असतात. एक लाख रुपये गोळा करून शेतसारा भरण्याचा काही लाभ तर आहे, परंतु अशा प्रयोगाचा सरकारच्या सुधारणेकरिता मुळीच उपयोग होणार नाही. खेडुतांतर्फे आपण कर भरला तर त्यामुळे सरकारला काही दुःख होईल असे वाटत नसते. परंतु गावकऱ्यांनी आपली जनावरे विकणे या लोकांकरिता लोखंडाचे चणे चावल्यासारखे होईल. सत्याग्रहाचा हेतू लोकांना धैर्यशाली आणि स्वतंत्र करणे आहे. आपले स्वतःचे नाक कापणे नाही. भीतीने वा आपल्यावरील अविश्वासाला घाबरून लोक जर पैसे भरत असतील तर ते पैसे भरण्यालायकच आहेत असे म्हणावे लागेल. विश्वासार्ह होण्याकरिता आपल्याला अधिक प्रयत्न करावे लागतील. याकरिता सत्याग्रहाचा मार्ग राजमार्ग आहे. माझ्याजवळ जरी एक लाख रुपये असले तरी लोकांच्या खरोघरी जाऊन मी म्हणेन की तुमची जनावरे विकल्या जात असतील तर जाऊ द्या, परंतु कर्ज काढून शेतसारा भरू नका. लिलाव झाला तर लाख रुपयात त्यांची जनावरे विकत घेऊ आणि जे संकटाच्या वेळी अढळ राहतील त्यांना संकटाच्या वेळी ती जनावरे परत करू. तुमची जनावरे

मी वाचवतो आहे हे मी लोकांना सांगणार नाही. ही अशी वेळ आहे की आपण जर या कामात पूर्णपणे यशस्वी झालो तर सरकारला जवळपास माफी मागणे भाग पडेल.

"माझे हे सर्व लिहिणे हे वेळ गेल्यानंतर शहाणपण दाखवण्यासारखे आहे. यामुळे त्याला काही किंमत नाही. तुम्ही काळाला जे अनुरूप असेल तेच करा. मला तुमचे कार्य दुरून तपासण्याचा अलभ्य लाभ मिळतो आहे. आणि या जगात कोणत्याही माणसाच्या अनुपस्थितीतही काम भागवता येऊ शकते असा अनुभव तुम्हाला मिळतो आहे."

## (कुमारी एडा वेस्टचे पत्र)

(दक्षिण आफ्रिकेतील सहकारी आणि 'इंडियन ओपिनियन'च्या छपाईत मदत करण्याऱ्या श्री वेस्ट यांच्या भगिनी. फिनिक्समध्ये त्यांना देवीबहेन असे म्हणत असत.)

"श्री गोविंद मला म्हणाले की मणिलालचे इतके वय झालेले असताही अजून त्याचे लग्न झालेले नसल्यामुळे तो फार दुःखी आहे. तू यात काय करू शकतोस? त्याला कायम अविवाहित राहायचे आहे काय?"

यासंबंधात मणिलालला असे लिहिले -

## (मणिलाल गांधींना पत्र)

देवीबहेन लिहीतात तुझे लग्न झालेले नसल्यामुळे तू असमाधानी आहेस असे तू सामला (दक्षिण आफ्रिकेतील एक सहकारी) सांगितले. तुझे विचार मला सांगायला संकोचू नकोस. तू माझा मित्र आहेस, कैदी नाही. मी योग्य सल्ला दिला आहे, परंतु तू तुला सुचेल त्या मार्गाने जा. माझ्या भीतीने तुझ्याकडून कोणतेही पापकर्म होऊ नये हीच इच्छा आहे. माझेच काय, कोणाचीही तुला भीती वाटू नये इतकेच मला हवे आहे.

"माझ्या विचाराप्रमाणे तर तू लग्नच करू नये. यातच तुझे श्रेय आहे. ही अवस्था जर तुला असह्य होत असेल तर तुला जेव्हा केव्हा सुटी मिळू शकेल तेव्हा इथे यायचा विचार कर. तिथे काहीही होऊ

शकणार नाही हे स्पष्ट आहे. तुला लग्न करायचेच असेल तर तुला मुलगी मिळू शकेल असे वाटते. केवळ लग्नाकरिता तू तेथील काम सोडणार नाहीस अशी आशा आहे. 'इंडियन ओपिनियन'ची नीट व्यवस्था करूनच तू लग्नाचा विचार करशील अशी आशा आहे. तुझा आनंद हरवू नकोस. स्वप्नावस्थेत जाऊ नकोस. आपल्याला हजारो गोष्टी हव्या असतात. सर्व मिळू शकत नाहीत. हे समजून घेऊन पूर्णपणे शांत राहा. जे करायचे ते शुद्ध अंतःकरणाने आणि उघडउघड करायचे असा असा निर्धार कर. इथे सर्व कुशल आहेत.

"महमदअलींसाठी कदाचीत मला फार मोठा संघर्ष करावा लागेल.कोणताही निर्णय झालेला नाही.

बापूचे आशीर्वाद"

याचसंबंधात कुमारी वेस्टना लिहिले -

## (कुमारी आडा वेस्ट यांना पत्र)

"प्रिय देवी,

"मणिलालचे प्रकरण दुःखद आहे. मी त्याला आश्वस्त करणारे पत्र लिहिले आहे. अजून काही वर्ष तो कुमारावस्थेत राहिला तर त्याला याची सवय होईल. मी त्याला लिहिले आहे की तू स्वतःला पूर्णपणे स्वतंत्र माणूस समज आणि माझा सल्ला एका मित्राचा सल्ला समज. सध्या तुम्हा सर्वांची अग्निपरीक्षा सुरू आहे. तुम्ही सर्व या आगीने न पोळता बाहेर पडाल अशी आशा आहे.

"इथे माझ्यासमोर सत्याग्रहाचे तीन लढे उभे ठाकले आहेत. यां ंतील किती लढे लढावे लागतील हे सांगू शकत नाही. परंतु सध्या तरी माझा सगळा वेळ यात जातो आहे आणि मला सतत आगगाडीतून प्रवास करावा लागतो आहे. आगगाडीतील प्रवास फार थकवणारा असतो. परंतु तो केल्याशिवाय सुटका नाही.

प्रेम,

तुझा भाऊ"

## (प्रभुदास गांधींचे पत्र)

आश्रमातून प्रभुदासचे पत्र -

“देवदासकाकाशिवाय आश्रमात करमत नाही. बापू, तुम्ही नसल्यामुळे आश्रमात सुनसान वाटते. आश्रमात काही जीव आहे असे वाटत नाही.”

याचे उत्तर -

## (प्रभुदास गांधी यांना पत्र)

२-२-‘१८

“माझ्याशिवायही आश्रमात बरेच काही आहे. याचा तुला शोध घेता यावा असे मी इच्छितो. कधी ना कधी शरीर पडणार असल्यामुळे माझा देह आश्रमात असेल तरच आश्रमात जिवंतपणा वाटत असेल तर ही काही चांगली परिस्थिती नाही. जर आत्म्याचे अस्तित्व तिथे जाणवत असेल तर तो तर सदैव तिथेच आहे. ज्याच्यावर आपले प्रेम असते त्याच्या शरीराची आसक्ती जसजशी कमी होत जाईल तसतसे त्याच्यावरील प्रेम विशुद्ध आणि विस्तीर्ण होत जाईल. आश्रमाचे वातावरण विशुद्ध करण्यासाठी आपण सर्वांनी जो प्रयत्न केला तशीच भावना आपण आपल्यामध्ये विकसित करू शकलो तर आपल्याला आश्रम कधीही सुनेसुने वाटणार नाही. इतकेच नाही तर त्यात लवकरच सामाजिक भावनाही निर्माण होईल.

“हे पत्र अर्थातच तुझ्या बुद्धीच्या बाहेर लिहिले गेले आहे. त्यातील जो भाग कळत नसेल तो चि. छगनलालला विचारून समजून घेशील. इतरांनाही वाचायला देशील कारण हे पत्र असे आहे की ज्यामुळे सगळ्यांचा लाभ होऊ शकेल. हे पत्र तू जपून ठेवशील आणि त्यांतील शब्दंशब्द खूप समजून घेशील.

बापूचे आशीर्वाद”

## (देवदास गांधी यांना पत्र)

देवदास गांधींना एका पत्रात -

“देवा, ज्या दिवशी तू माझी गादी घ्यायला तयार होशील त्या दिवशी तुला कोणीही अडवू शकणार नाही. परंतु तू खूप मजबूत व्हावे हीच इच्छा आहे. तुझ्यात पात्रता नाही असे समजू नकोस. जसजसे काम येत जाते तसतसे आपल्याला ते उमगत जाते.”

## राचीच्या एका गृहस्थांना पत्र

“आश्रमात प्रवेश न करताच जो माणूस आश्रमाच्या नियमाचे पालन करतो तो आश्रमवासीच असतो. आणि आश्रमात राहूनही जो त्या नियमांचे जाणीवपूर्वक उल्लंघन करतो तो बाहेरचा असतो.”

## श्रीमती जिनराजदास यांना लिहिलेल्या पत्राचा अंश

श्रीमती जिनराजदासनी बाला अखिल हिंदुस्थान महिला परिषदेचे सदस्य केले होते. त्यांना पाठवलेल्या कार्डात लिहीले -

“कस्तुरबाई जवळपास निरक्षर आहे. त्या आपले नावही इंग्रजीत लिहू शकत नाही. तुम्हाला तुमच्या सदस्यांच्या सूचीची शोभा वाढावी म्हणूनच हे नाव पाहिजे काय?”

त्यानंतर श्रीमती जिनराजदासचे गोड पत्र आले. त्याच्या उत्तरात लिहिले -

“कस्तुबाईला इंग्रजीत सहीसुद्धा करता येत नाही हे वाक्य बरोबर लिहिले नाही. यात पूर्ण विचार येत नाही. ‘शिक्षित’चा प्रचलित अर्थ आहे त्यानुसार कस्तुरबाई शिक्षित नाही. त्यांना गुजराती लिहितावाचतासुद्धा फार कमी येते. इंग्रजीत त्या स्वतःची सही करू शकत नाहीत. असे लिहिण्याचा

उद्देश मंडळाच्या सर्व सदस्या आपापल्या भाषेत वा इंग्रजीत तज्ज्ञ आहेत. अशा सदस्यात कस्तुरबाई सदस्य होण्याकरिता अगदी अयोग्य आहे ही वस्तुस्थिती आहे. इंग्रजी शिक्षणाचे ज्यांना महत्त्व वाटते त्यांना मला हे सांगायचे होते."

(हे पत्र साबरमतीहून १० फेब्रुवारी १९१८ला लिहिले होते.)

१०-२-१९१८

आश्रमाचे एक माजी विद्यार्थी विनायक नरहर भावे यांचे पत्र -

## (विनोबा भावेंचे पत्र)

“परम पूज्य बापूजी,

“एक वर्षापूर्वी प्रकृतीच्या कारणामुळे मी बाहेर गेलो होतो. दोन-तीन महिने वाईत राहून आश्रमात परतायचे ठरवले होते. परंतु एक वर्ष झाला तरी माझा काही पत्ताच नाही. तेव्हा मी येणार आहे की नाही, मी जिवंत आहे की नाही असे प्रश्न उपस्थित झाले असतील. मी अर्थातच कबूल केले पाहिजे की या बाबतीत सगळा दोष माझाच आहे. असे जरी असले तरी मी मामांना एक-दोन पत्रे लिहिली होती. त्यात मी लिहिले होते की ‘सत्याग्रहाची’ वेळ आली तर मला अवश्य लिहाल. मी सर्व काही सोडून लगेच परत येईन. नाही तर ज्या लोभामुळे मी आश्रमाबाहेर राहतो आहे तो लोभ पूर्ण झाल्यानंतरच आश्रमात दाखल होईन. मी आश्रमातून निघून गेलो आहे अशी शंकासुद्धा काही लोकांना आली असेल. तर यात माझाच दोष आहे. याचे कारण पत्र न लिहिण्याची मला सवय नाही. तरीसुद्धा मी इतके तर लिहायला पाहिजे होते की आश्रमाने माझ्या हृदयात विशेष स्थान मिळवले आहे. इतकेच नाही तर माझा जन्मच आश्रमाकरिता आहे अशी माझी दृढ श्रद्धा आहे. असे जर असेल तर मी एक वर्ष बाहेर राहण्याचे कारण काय?

“मी जेव्हा दहा वर्षांचा होतो तेव्हाच ब्रह्मचर्य व्रताचे पालन करून देशसेवा करायची मी शपथ घेतली होती. मग मी उच्च माध्यमिक शाळेत गेलो. त्यावेळी मला गीताजींचे वेड लागले. परंतु माझ्या वडिलांनी मला दुसरी भाषा म्हणून फ्रेंच घेण्याची आज्ञा केली. तरीही गीतेवरील माझे प्रेम कमी झाले नव्हते. आणि त्या वेळी मी घरी स्वतःच संस्कृतचा अभ्यास सुरू केला होता आणि वेदांत आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास करायचा मी निश्चय केला होता. तुमची परवानगी घेऊन मी वाईत दाखल झालो. त्यावेळी वेदांताचा अभ्यास करण्याची मला उत्तम संधी मिळाली. नारायणशास्त्री मराठे म्हणून एक आजन्म ब्रह्मचारी विद्वान वाईत विद्यार्थ्यांना वेदांत आणि इतर शास्त्रे शिकवण्याचे काम करत असतात. त्यांच्याकडून ‘उपनिषद’ वगैरे शिकण्याचा मला ‘लोभ’ झाला. या लोभामुळे मी अधिक काळ वाईत राहिलो. आता इतक्या सगळ्या काळात मी काय केले ते सांगतो.

ज्या लोभामुळे मी बाहेर राहिलो त्या विषयी मी केलेले काम पुढीलप्रमाणे - (१) उपनिषद (२) गीता (३) ब्रह्मसूत्र आणि शांकरभाष्य (४) मनुस्मृती (५) पातंजल योगदर्शन या ग्रंथांचा अभ्यास केला. याशिवाय (१) न्यायसूत्र (२) वैशेषिक सूत्र (३) याज्ञवल्क्य स्मृती या ग्रंथांचे वाचन केले. आता मला अजून काही शिकायचा मोहच नाही. मी स्वतःच्या बळावर अजून काही वाचू शकेन. प्रकृतीमुळे ज्या इतर कामांकरिता मी वाईला गेलो होतो त्याविषयी -

"प्रकृती सुधारण्याकरिता मी आधी तर १०-१२ मैल चालायला सुरुवात केली. मग ६ ते ८ शेर दळायला सुरुवात केली. आणि आता मी ३०० नमस्कार करतो. ही माझी कसरत आहे. यामुळे माझी प्रकृती चांगली झाली आहे.

"आहाराविषयी - पहिले सहा महिने मीठ खात होतो, नंतर मात्र ते सोडून दिले. मसाले वगैरे मुळीच खात नाही. आणि आजन्म मीठ आणि मसाले न खाण्याचे व्रत घेतले आहे. दूध सुरू केले. दुधाशिवाय चांगले चालू शकत नाही असे अनेक प्रयोग केल्यानंतर सिद्ध झाले. असे जरी असले तरी हेसुद्धा सोडावे अशी माझी इच्छा आहे. एक महिना मात्र केळी, निंबू आणि दुधावर काढले. शक्ती कमी झाली. आता माझा आहार पुढीलप्रमाणे आहे - दूध १।। शेर (वजन ६० तोळे), २ भाकरी (२० तोळे ज्वारीच्या), केळी ४-५, निंबू १ (मिळू शकेल तेव्हा.) आता आश्रमात आल्यानंतर तुमचा सल्ला घेऊन आहार ठरवण्याचा विचार आहे. स्वादाकरिता इतर कोणतेही पदार्थ खाण्याची इच्छा नाही. असे जरी असले तरी वरील आहारही फार श्रीमंती आहे आहे असे वाटते. रोजचा खर्च जवळपास याप्रमाणे - केळी आणि निंबू ४ पैसे, ज्वारी २ पैसे, दूध ५ पैसे असे एकूण ११ पैसे. यात काय बदल करावा हे मला तुमच्याकडून समजून घ्यायचे आहे. ते मला पत्राद्वारे लिहून कळवा.

"इतर काम -

(१) गीतीजींचा वर्ग चालवला. यात सात विद्यार्थी सर्वगीता सार्थ जवळ ठेवत असत अर्थात विनामूल्य.

(२) ज्ञानेश्वरी अध्याय सहावा. यात चार विद्यार्थी होते.

(३) उपनिषद नऊ. यात दोन विद्यार्थी होते.

(४) हिंदीचा प्रचार. मला स्वतःलाच चांगले हिंदी येत नाही. तरीही विद्यार्थ्यांना बरोबर घेऊन हिंदी वर्तमानपत्रे वाचत असे.

(५) दोन विद्यार्थ्यांना इंग्रजी.

(६) जवळपास ४०० मैल पायी प्रवास. राजगढ, सिंहगढ, तोरणगढ वगैरे इतिहासप्रसिद्ध किल्ले पाहिले.

(७) प्रवास करत असताना गीताजीवर प्रवचन करायचा कार्यक्रम असायचा. आजपर्यंत ५० प्रवचने झाली. आतासुद्धा आश्रमात येत असताना मी मुंबईला पायीपायी आलो आणि तिथून रेल्वेने आश्रमात दाखल झालो. माझ्याबरोबर एक सव्वीस वर्षांचा विद्यार्थी फिरत असतो. माझ्याकडून गीता शिकण्याचा त्याचा विचार आहे. हेसुद्धा प्रवासात सुरू असते. आश्रमात दाखल व्हायची मुदत जास्तीत जास्त चैत्र शुद्ध प्रतिपदा.

(८) वाईत मी विद्यार्थी मंडळ नावाची संस्था स्थापन केली. यात एक वाचनालय चालू केले आणि वाचनालयाला मदत म्हणून एक दळायचा वर्ग ठेवला होता. यात १५ विद्यार्थी आणि मी स्वतः दळत असू. जे गिरणीतून दळून आणतात त्यांचे काम करायचे. (दोन शेराला एक पैसा घेऊन.) आणि ते पैसे वाचनालयाला द्यायचे. मोठ्या सावकारांची मुलेसुद्धा या वर्गात दाखल झाली होती. वाई जुन्या विचारांचे स्थान असल्यामुळे आणि या वर्गात सर्व ब्राह्मणाची हायस्कूलमध्ये शिकणारी मुले असल्यामुळे सर्वांनी आमची मूर्खात गणना केली. असे असूनही या वर्गात दोन महिने चालला. वाचनालयात ४०० पुस्तके जमा झाली आहेत.

(९) सत्याग्रह आश्रमाचा प्रचार करण्याकरिता मी भरपूर प्रयत्न केला.

(१०) बडोद्यात १०-१५ मित्र आहेत. या सर्वांना लोकसेवा करण्याची इच्छा आहे. यामुळे त्यांनी मातृभाषेच्या प्रसाराकरिता तिथे तीन वर्षांपूर्वी एक संस्था स्थापन केली. या संस्थेचा जेव्हा वार्षिक उत्सव झाला तेव्हा मी तिथे गेलो. (उत्सवात सभेचे सदस्य मिळवण्याकरिता कसे आणि कोणते कार्य करावे यासंबंधी चर्चा.) तेव्हा मी हिंदी भाषेचा प्रचार केला पाहिजे असा विचार मांडला. आणि ही संस्था निश्चितच हे काम करील अशी माझी श्रद्धा आहे. तुम्ही हिंदी प्रचाराचे काम सुरू करायचा जेव्हा विचार कराल तेव्हा बडोद्याची ही संस्था काम करायला तयार असेल.

"अखेरीस सत्याग्रह आश्रमवासी म्हणून मी काय काम केले हे सांगणे आवश्यक आहे.

"आस्वाद व्रत - या संबंधात आणि आहारासंबंधात मी लिहिले आहे.

"अपरिग्रह - लाकडाचे ताट, वाटी, आश्रमाचा एक गडवा, धोतर, घोंगडी आणि पुस्तके इतका प्रपंच ठेवला आहे. सदरा, टोपी, कोट वगैरे न वापरण्याचे व्रत घेतले आहे. यामुळे शरीरावरसुद्धा धोतर वगैरे मागावर विणलेलेच कपडे वापरतो.

"स्वदेशी - विदेशी वस्तूंचा माझ्याशी संबंधच नाही. (मद्रास येथील तुमच्या भाषणात केलेला नसेल तरच.)

"सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, या व्रतांचे पालन मला कळते त्याप्रमाणे मी बरोबर केले आहे असे मला खात्रीपूर्वक वाटते.

"याशिवाय अजून काय सांगू? जेव्हा स्वप्न पडते तेव्हासुद्धा मनात एकच विचार येत असतो की - ईश्वर माझ्याकडून सेवा करवून घेईल काय? इतके मी पूर्ण श्रद्धेनिशी सांगू शकतो. आश्रमाच्या नियमाप्रमाणे (एक सोडून) मी चालतो आहे. यामुळे जणू काय मा आश्रमातच आहे. आश्रम हेच माझे साध्य आहे. वर जो एका गोष्टीचा उल्लेख केला आहे तो स्वतःचा स्वयंपाक स्वतः करायचा. (म्हणजे भाकरी.) याचासुद्धा मी प्रयत्न केला. परंतु प्रवासात हे जमले नाही.

सत्याग्रहाचा अथवा दुसऱ्याचा (कदाचित रेल्वेविषयी सत्याग्रह करायचा असेल तर) प्रश्न उठत असेल तर मी लगेच तिथे पोहोचेन. नाही वर मुदत लिहिली आहे.

"सध्या आश्रमात काही फेरबदल झाला आहे काय? तिथे किती विद्यार्थी आहेत? राष्ट्रीय शिक्षणाची योजना कशी आहे, आणि माझ्या आहारात मी कोणता बदल केला पाहिजे हे जाणून घेण्याची प्रबळ इच्छा आहे. तुम्ही स्वतः मला पत्र लिहिले पाहिजे असा 'विनोबाचा' - तुम्हाला पितृतुल्य समजणाऱ्या तुमच्या पुत्राचा - सत्याग्रह आहे.

"दोनचार दिवसात मी हे गाव सोडीन." (या पत्रातील भाषा मूळाप्रमाणे (गुजराती) राहू दिली आहे.)

हे पत्र वाचताच, “गोरखने मच्छिंद्रनाथला हरवले ! भीम आहे भीम !” असे उद्गार बापूजींच्या तोंडून निघाले. सकाळी त्यांनी असे उत्तर लिहिले -

## विनोबा भावेंना पत्र

“तुझ्याकरिता कोणते विशेषण वापरावे हे मला कळत नाही. तुझे प्रेम आणि तुझे चरित्र यांच्या मोहात मी बुडालो आहे. तुझ्या परीक्षेत आणि मोहात मी बुडालो आहे. तुझी परीक्षा घ्यायला मी असमर्थ आहे. तू घेतलेल्या परीक्षेचा मी स्वीकार करतो आणि तुझ्याबद्दलचे पितृपद ग्रहण करतो. माझा लोभ तू जवळपास पूर्ण केला असे वाटते. माझी मान्यता आहे की खरा पिता स्वतःपेक्षा अधिक चरित्रवान पुत्र निर्माण करतो. खरा पुत्र तो असतो जो वडिलांनी केलेल्या गोष्टीत भर घालतो. वडील जर सत्यवादी, दृढ, दयाळू असेल तर ते गुण त्याच्यात अजूनच विशेषत्वाने अभिव्यक्त होतील. तू केलेले सर्व यात येते. हे सर्व तू माझ्या प्रयत्नामुळे केले आहे असे जाणवत नाही. यामुळे तू मला जे पद दिले आहे त्याचा तुझ्या प्रेमामुळे मी स्वीकार करतो. या पदाकरिता पात्र होण्याकरिता मी प्रयत्न करीन. आणि जर मी हिरण्यकश्यप झालो तर भक्त प्रल्हादाप्रमाणे माझा सादर निरादर करशील.

“आश्रमाबाहेर राहून तू आश्रमाच्या नियमांचे फार चांगले पालन केले आहे हे तुझे म्हणणे खरे आहे. तुझ्या परतण्याबद्दल माझ्या मनात कधीही शंका आली नव्हती. शिवाय तू पाठवलेले निरोप मामा मला वाचून दाखवत होते. ईश्वर तुला दीर्घायुषी करो. आणि तुझा उपयोग हिंदुस्थानच्या प्रगतीकरिता होवो अशी माझी इच्छा आहे.

“तुझ्या आहारात फेरफार केला पाहिजे असे सध्या तरी दिसत नाही. सध्या दुधाचा त्याग करू नको. उलट आवश्यकता पडली तर दुधाचे प्रमाण वाढव.

“रेल्वेच्या सत्याग्रहाची गरज नाही. परंतु त्याकरिता ज्ञानी प्रचारकाची आवश्यकता आहे. शक्य आहे की खेडा जिल्ह्यासंबंधी लढा उभारावा लागेल. मी तर सध्या भटकणारा राम आहे असे समज. दोनेक दिवसात दिल्लीला जायचे आहे.

“विशेष तर तू येशील तेव्हा. तुला भेटायला सर्व उत्सुक आहेत.

बापूचे आशीर्वाद”

नंतर बापूंचे उद्गार -

"फार भारी माणूस आहे. मला असे वाटते की महाराष्ट्रीय आणि मद्रासी लोकांशी माझे फारच ऋणानुबंध आहेत. आता मद्रासी तर राहिले नाहीत. महाराष्ट्रीयांनी मला कधीही निराश केले नाही. ते संबंध विनोबाने तर दृढ केले आहेत."

## (हृदयनाथ कुंझरूंना पत्र)

पंडित हृदयनाथ कुंझरूंना कुभमेळ्यासंबंधी लिहिले.

"सध्या मी एका भयंकर परिस्थितीत हात घातला आहे आणि याहूनही भयंकर परिस्थितीत उतरण्याचा प्रयत्न करतो आहे. . . . यामुळे मी मेळाव्यात का आलो नाही हे तुम्हाला कळू शकेल. हिंदू धर्माचे आसुरी तसेच दिव्य स्वरूप पाहायची तिथे जी संधी मिळू शकणार होती तिचा लाभ घेण्याची माझी इच्छा होती. मला माहीत आहे की आसुरी स्वरुपाचा माझ्यावर काहीही परिणाम होत नाही असे नाही. परंतु हरिद्वारमध्ये त्याच्या दिव्य स्वरुपाचा जो परिणाम झाला त्याच प्रभावाचा लाभ घेण्याकरिता मी इच्छुक होतो. शिवाय तिथे तुमचीही भेट झाली असती. याशिवाय भारतसेवकाला दर दुसऱ्या महिन्यात आजारी पडण्याची जी वाईट सवय लागली आहे त्याविषयी थोडा उपदेश करण्याची संधीही मला मिळाली असती. परंतु तसे विधिलिखित नसेल.

सेवक,

मो. क. गांधी"

त्यांच्या (गांधीजींच्या) बहिणीचे पत्र. महागाईसंबंधी आणि जीवननिर्वाह करण्यात येणाऱ्या अडचणींसंबंधी आणि काही अधिक पैसे पाठवण्याची व्यवस्था झाली तर चांगले होईल अशा आशयाचे. त्याचे उत्तर -

# (रळियातबहेनला पत्र)

११-२-१९१८

"पूज्य बहेन,

"तुला पत्र तर लिहीत नसतो पण तुझी मूर्ती माझ्या डोळ्यासमोरून एक क्षणभरही दूर नसते. तू माझ्याजवळ नाहीस याची जी जखम मला झाली आहे ती कधीही भरून निघू शकणार नाही. ती तर तूच भरून काढू शकतेस. तू माझ्याजवळ असतीस तर तुझा चेहरा पाहून मला आईच्या किती तरी आठवणी आल्या असत्या. तरीही तू माझ्यापासून दूर राहतेस. तुझ्याबद्दलची माझी ही तक्रार कधीही थांबू शकत नाही. माझी बहीणसुद्धा माझ्या कामात मदत करते आहे असे अभिमानाने सांगण्याची संधी तू मला कधीही देत नाही. मी जर पत्र लिहिले तर त्यातही माझ्या मनातील दुःख व्यक्त करण्याशिवाय आणि जे टोमणे मी आता मारतो आहे तसे मारण्याशिवाय मी दुसरे काय करू शकलो असतो? यामुळेच पत्र लिहायला मन घेत नाही. मला माहीत आहे की आता महागाई वाढली आहे. परंतु तुला अधिक पैसे मी कुठून देऊ? मित्राकडून पैसे घेऊन ते तुला द्यावे लागत असतात. मी त्यांना कोणत्या तोंडाने पैसे मागू? ते पण विचारत असतात की तुझी बहीण तर तुझ्याजवळच असायला पाहिजे. याचे मी काय उत्तर देऊ? जग मला अपवित्र समजत नाही. परंतु तुझ्याकरिता तर मी अपवित्र आहे. अशा अवस्थेत मी तुला एकच गोष्ट सांगू शकतो. तू जशा अडचणी सहन करते आहेस त्याहून कमी अडचणी मी सहन करून राहिलेलो नाही. यामुळे तुझे दुःख मला असह्य वाटत नाही. तू दळण दळून कमी पडलेले पैसे मिळवतेस याची मला किंचितही लाज वाटत नाही. मी तर इतकेच मागतो की तुझ्यात जर थोडीशीही दयाभावना असेल तर आताच माझ्याजवळ येऊन राहा. माझ्या कामात भाग घे. तू जर असे करशील तर 'तुझा कोणी भाऊ नाही' अशी जी तुझी अवस्था झाली आहे ती ताबडतोब मिटून जाईल. तुला इथे एकच नाही तर किती तरी भाऊ भेटतील. आणि इथे तू अनेक मुलांची आई होऊन राहशील. हा शुद्ध वैष्णवधर्म आहे. जोपर्यंत तुला हे पटत नाही तोपर्यंत आपल्याला वियोगदुःख सहन करावेच लागेल."

आपल्या भाचेसुनेला (निर्मलाला) लिहिले -

## (निर्मला यांना पत्र)

“हे पत्र बहेन रळीयातबहेनला वाचून दाखवशील. तुला मी काय लिहू? तुझ्याकरिता इतके अधिक काम दिसतात की त्यांनी तुझे संपूर्ण जीवन सौंदर्याने भरून जाईल, आणि तू तुझे वैधव्य विसरून जाशील. किती तरी स्त्रिया मला मदत करत आहेत. दुर्दैवाने मला तुझी मदत मिळू शकत नाही. रळीयातबहेनला मी जसा दोष देतो तसा तुला देऊ शकत नाही कारण तुला तर दोन मुरब्बींना खुश करावे लागते, एक वडिलांना आणि दुसरे सासूला. परंतु तुला जर मला मदत करायची इच्छा असेल तर तुला याकरिता त्यांची परवानगी मिळू शकेल. आणि इतकेच नाही तर तू बहेन रळीयातलाही इथे आणू शकशील, कारण ती तुझ्याशिवाय जगूच शकत नाही. कधीना कधी तर तू माझ्याजवळ असशीलच असे मी समजतो. तुला इतके तर कळत असेल की गोकळदास जिवंत असताना तो माझ्यापासून क्षणभरही दूर राहू शकत नव्हता. माझ्याजवळ राहून तू गोकळदासच्या आत्म्यालाही शांती देऊ शकशील.

“बा बिहारमध्ये आहे. अनेकदा तुझी आठवण करत असते. मला या भागात अजून बरेच दिवस राहावे लागणार आहे.

. . . ला पत्र. पत्नीच्या मृत्यूनंतर अल्पकाळात होणाऱ्या लग्नामुळे लाजेची भावना. एक वर्षसुद्धा शोक पाळला नाही याबद्दल ग्लानी वाटत असतानाही नातलगांच्या आग्रह जर ऐकला नाही तर ते चुकीचा अर्थ घेतील, आताच लग्न केले नाही तर भविष्यात मुलगी मिळणार नाही असे म्हणून ते स्वतःचा बचाव करत होते.

# (एका सहकाऱ्याला पत्र)

"भाईश्री . . .,

"तुमचे पत्र मिळाले. तुमच्यावर शाब्दिक प्रहार करणे व्यर्थ वाटते. अनेकदा माणूस आपल्या दोषांचे वर्णन अशा प्रकारे करतो की ते गुणच वाटतात. तुमची अवस्था ही अशीच आहे. तुमच्यात सामान्य माणसापेक्षा किती तरी अधक वैशिष्ट्ये असल्यामुळेच तुम्ही सार्वजनिक जीवनात भाग घेत असता असे सांगतात. परंतु तुमच्या कामातून मात्र तुम्ही सामान्य माणसापेक्षाही जास्त दुर्बलता दाखवत आहा. पहिल्या पत्नीच्या मृत्यूने तुमच्यावर फार मोठा आघात झाला असल्याचे तुम्ही सांगता. तुम्ही असेही सांगता की तिच्या अखेरच्या शब्दांचा तुमच्यावर खोल परिणाम झाला आहे. तुम्ही ते विसरला. तिच्या अंतिम शब्दाचा तुमच्यावर खोल परिणाम झाला आहे असे तुम्ही म्हणता. खूप वेदनांनी रडणारा माणूस एकाएकी हसू लागला तर तो नाटककार तरी समजला जाईल वा वेड लागून हसू लागला असे समजले जाईल. काल तुम्ही रडत होता, आज हसू लागला. तुम्हाला कोणते विशेषण लागू होईल? ज्या माणसाचे विषयवासनांवर नियंत्रण नसते, जो माणूस किंचितही संयम पाळू शकत नाही तो माणूस सार्वजनिक सेवा करण्याकरिता पात्र असतो काय? तुमच्यापेक्षाही कमी प्रतीचे लोक सार्वजनिक कार्यात दिसत असतात, त्यांच्यापेक्षा तर मी बरा आहे असे म्हणून तुम्ही जितके अधःपतीत झाला आहा त्याहून अधिक अधःपात होऊ देऊ नका. .

"तुम्ही जे पाऊल उचलले आहे तो हिंदू वैवाहिक जीवन सुधारणेत फार महत्त्वाचा विषय आहे. विधवाविवाहापेक्षा जास्त आवश्यक तर विधुरांनी थोडीशी मर्यादा पाळणे जास्त आवश्यक आहे. तुम्ही तर मूळ तत्त्वावरच कुठाराघात करत आहा. गुजरात सेवा मंडळ तयार झाले आणि मला त्याच्याशी जर निकटचा संबंध ठेवावा लागला तर तुमचा त्यात प्रवेश असावा की नाही याबद्दल ठरवताना माझ्यासमोर फार मोठे धर्मसंकट निर्माण होईल. मी तुमचा न्याय करणार नाही, न्याय तर ईश्वरच करील. परंतु माझ्या जीवनात सहकारी निवडण्याचा अधिकार मी सोडणार नाही.

"तुमच्या पहिल्या पत्नीच्या मृत्यूने तुमच्यावर किती आघात झाला त्याचे प्रमाण तुम्ही जगाला दाखवले आहे. तुमच्या कार्याने माझ्यावर वज्राघात झाला आहे. ईश्वर तुमचे रक्षण करो आणि तुम्हाला सन्मती देवो.

मोहनदास गांधी"

फिनिक्सहून वेस्टची वरचेवर पत्रे. 'इंडियन ओपिनिअन' चालवणे दिवसेंदिवस कठीण होत आहे. ते डरबनला नेले पाहिजे आणि व्यापारी तत्त्वावर चालवले पाहिजे असे सर्वांचे आणि वेस्टचेही मत होते. इत्यादी. त्याचे उत्तर -

## (ए. एच. वेस्ट यांना पत्र)

"भाईश्री वेस्ट,

"आशा आहे की माझी सर्व पत्रे तुला मिळाली असतील. मी तुझ्या दोन पत्रांची पोच अजून पाठवलेली नाही. काय लिहावे हे खरोखरच मला सुचत नाही. रीच आणि डी. बोरची पत्रे मी वाचली आहेत. त्यांच्या दृष्टिकोनानुसार ते बरोबर आहेत. माझ्या मते तर आपण चांगले खेडूत होऊन राहायला पाहिजे. आपल्या आदर्शाची तू चांगल्या प्रकारे उपासना करू शकशील. मणिलालने जोहानिसबर्गमध्ये दिलेला सल्ला मला पटत नाही. त्याने फिनिक्समध्ये राहून गुजराती विभाग सांभाळायला पाहिजे. परंतु मी काहीही सांगत असलो तरी अंतिम निर्णय तुम्हा सर्वंचा असेल. तुम्हांला जे उत्तम वाटेल ते तुम्ही करा. असेच आपल्या आदर्शाबद्दल.

"फिनिक्ससंबंधी इतके सांगितल्यानंतर आता येथील माझ्या कामकाजाबद्दल सांगतो. मी पत्रे फार थोडक्यात लिहितो यावरून मी किती कामात आहे ते दिसेल. मी इतके काम करतो याचे सर्वांना नवल वाटते. परंतु मी एकही काम शोधायला गेलेलो नाही. जसजसे काम येत गेले तसतसे ते मी हाती घेत गेलो. बिहारच्या विधानसभेत कायदे करण्याचे काम सुरू आहे. त्यावर लक्ष ठेवण्याशिवाय तिथे काही शाळा उघडण्यात आल्या आहेत. त्यांची व्यवस्था करावी लागते. सामान्यपणे शिक्षक विवाहित आहेत. पती आणि पत्नी दोघेही काम करतात. गावात मुलांना शिकवायचे असते. पुरुषांना आरोग्य आणि स्वच्छता शिकवावी लागते. गावातील स्त्रियांच्या भेटीगाठीसुद्धा घ्याव्या लागत असतात. पडदा सोडण्याकरिता आणि मुलामुलींना शाळेत पाठवण्याकरिता त्यांची समजूत घालावी लागत असते. आम्ही औषध मोफत देत असतो. सामान्यपणे दुखणे तेच असते आणि त्यावरील उपायही तोच असतो आणि तो साधा असतो. यामुळे स्त्री-पुरुष जर इतर प्रकारे विश्वासार्ह असतील आणि मग ते जरी प्रशिक्षित नसतील तरी त्यांना हे काम सोपवायता काही हरकत वाटत नाही. उदाहरण म्हणून कस्तुरबाई एका शाळेत काम करत आहेत आणि मोकळेपणाने औषधही देतात. आतापर्यंत तीन हिवतापाच्या

आजाऱ्यांना मदत करता येणे शक्य झाले आहे. गावातील विहिरी आणि रस्ते आम्ही साफ करत असतो आणि या कामात ग्रामिणांचे सहकार्य मिळवत असतो. आतापर्यंत आम्ही तीन शाळा उघडल्या आहेत. त्यात मुले आणि बारा वर्षाखालील मुली मिळून २५० पेक्षा जास्त विद्यार्थी आहेत. सर्व शिक्षक स्वयंसेवक आहेत.

"गुजरातमध्येसुद्धा काम सुरू आहे. मी गोधरा आणि भरूचमध्ये दिलेल्या भाषणांप्रमाणे तिथे काम सुरू आहे. सध्यातरी एका प्रसंगी लवकरच सत्याग्रह करावा लागण्याची शक्यता दिसते आहे. ते पार पाडण्याचा प्रयत्न करतो आहे. गुजरातमध्ये विविध प्रकारचे काम सुरू आहे. शिवाय अलीबंधूंच्या सुटकेकरिता मी आंदोलन करायचा विचार करतो आहे. याशिवाय गोसेवा, सफाई, राष्ट्रीय शिक्षण, हातमाग, हिंदुस्थानची राष्ट्रभाषा म्हणून हिंदीचा प्रचार हे काम विकसित करण्याचा प्रयत्न करतो आहे. अर्थात आश्रम आणि तेथील राष्ट्रीय शाळा तर सुरूच आहेत.

"या सर्व कामांकरिता सुदैवाने मला चांगले सहकारी मिळाले आहेत. ही सगळी कामे मला चांगल्या प्रकारे पार पाडायची आहेत.

"आश्रम साबरमती नदीच्या काठावरील एका सुंदर ठिकाणी आहे. आम्ही दररोज नदीत आंघोळ करत असतो. बहुतेक मुलांना पोहणे आवडू लागले आहे. शाळेला हुशार मुख्याध्यापक मिळाले आहेत. ते गुजरात महाविद्यालयात प्राध्यापक होते. आश्रमाची व्यवस्था मगनलालच्या हातात आहे. या आश्रमाचे आणि शाळेचे भविष्य कसे असेल ते सांगू शकत नाही. सध्यातरी या दोन्ही संस्था लोकप्रिय आहेत.

"या सर्व कामात तेथील सहकाऱ्यांचे सहकार्य मिळावे अशी इच्छा असते. परंतु दर वेळी हे शक्य असतेच असे नाही हे मला माहीत आहे. परंतु इतके मात्र निश्चितच लक्षात ठेव की तुमच्यापैकी कोणाचा ना कोणाचा विचार मनात आला नाही असा एक क्षणही जात नाही. तुम्ही धैर्याने केलेल्या अनेक कामांचा मला इथे उदाहरण म्हणून उपयोग होत असतो. तिथे मिळवलेल्या अनुभवाच्या आधारेच मी येथील काम विकसित करतो आहे.

"श्रीमती वेस्टना सांग की त्यांना वा मम्माला मी विसरलो आहे असे क्षणभर सुद्धा वाटू देऊ नको. तसेच मी त्यांना जे वचन दिले आहे तेसुद्धा मी विसरलेलो नाही. नवीन संबंध आणि नवीन ओळखीपाळखी होत आहेत याचा अर्थ जुन्यांना विसरायचे असते असा होत नाही.

"हे पत्र प्रकाशित करण्याकरिता नाही, माझ्या कामाबद्दल मला कोणतीही जाहीर चर्चा करण्याची इच्छा नाही.

प्रेम - सदैव तुझा मो. क. गांधी

# (पार्वतीला पत्र)

“चि. पार्वती,

मुलामुलींना मी क्वचितच इंग्रजीत लिहीत असल्यामुळे मी तुला हे पत्र गुजरातीत लिहायला सुरुवात केली होती. परंतु मला माहीत आहे की मी तुला इंग्रजीत लिहायला पाहिजे. तू मला म्हणत असतेस की तुम्ही मला गुजराती आणि हिंदी शिकवण्याची व्यवस्था केली असती तर मला तुमची गुजराती आणि हिंदीतील पत्रे समजू शकली असती. तुला असे म्हणायचा हक्क आहे. मीसुद्धा इतकेच म्हणेन की तूसुद्धा माझ्याबरोबर जर हिंदुस्थानात आली असतीस आणि माझ्याबरोबर राहिली असतीस तर तू माझी खरी मुलगी झाली असतीस आणि हिंदी आणि गुजराती शिकली असतीस.

सॅम फिनिक्सची शेती यशस्वी करील अशी मी आशा करतो असे त्याला सांग. तिथे तुम्ही काय काय करताहात? राधा आणि रुखी तर खूप मोठे झाले आहेत. रुखी राधाएवढी दिसते. दोघींनीही हिंदीच्या अभ्यासात चांगलीच प्रगती केली आहे. तुम्हा सगळ्यांना प्रेम.

(सही तमीळमध्ये)

बापूजींच्या मनात कोणाला ना कोणाला राष्ट्रीय कार्याकरिता पकडायचा विचार नेहमीच असल्यामुळे काल वडाळ येथे पंड्याजींशी बोलत असताना मी बापूजींचा ‘शिकारी’ म्हणून उल्लेख केला होता. पहिल्या दिवशी माझे अक्षर सुंदर आहेत आणि मी वेगात लिहितो असे म्हणून त्यांनी माझी प्रशंसा केली. तुझ्या गुणांमुळे दोष विसरलेच जातात असे म्हणाले. तर एके दिवशी दुर्गाचे पितृपद स्वीकारून आणि तिला एका सुंदर पत्राच्या कृतज्ञतेत दाबले. एक दिवस ते बँकर आणि अनसुयाबहेनशी गोड गोड बोलून आणि त्यांना जेवायचा सारखा आग्रह करतात तर दुसऱ्या दिवशी वल्लभभाईंना ते दररोज सकाळी जेवायला येण्याचा आग्रह करत असतात. बारा वर्षांपूर्वी पत्नीचा मृत्यू झाल्यानंतरही वल्लभभाईंनी परत लग्न केले नसल्याबद्दल ते खूप समाधान दाखवतात. इतकेच नाही तर त्यांच्या अनेक चांगल्या गोष्टी सांगून त्यांनी शिष्यत्व पत्करावे म्हणून त्यांचा प्रयत्न सुरू असतो. त्याच्या या लीलेचे वर्णन करताना कोणताही माणूस थकत नाही. ‘नेती’, ‘नेती’ म्हणत तो शरण जातो.

रात्री गुजरात क्लबमधून येताना अनसुयाबहेनने अतिशय आग्रह करूनही मोटारीत न बसता बापूंनी पायी चालणेच पसंत केले. रस्त्यात अनेक गोष्टींची चर्चा झाली. ‘इंडियन ओपिनियन’मध्ये

आलेल्या सर्वोदयाच्या प्रकरणावर विवेचन करताना मी म्हणालो की त्यातील काही प्रकरणे अतिशय सुंदर आहेत तर काही फार कच्ची वाटतात. टीका कबूल करत ते म्हणाले, केव्हा केव्हा मी अतिशय जोमात लिहीत असे आणि तेव्हा ते फार सुंदर यायचे. तर केव्हा केव्हा मी कोर्टाच्या कामाने थकल्याभागल्या, जीर्णशीर्ण अवस्थेत लिहायला बसत असे. आणि त्या वेळी 'इंडियन ओपिनियन'च्या लेखनाकरिता जर कोणी आले तर मी त्याला लिहू देत असे. लिहितांना मी म्हणतही असे की हे वाक्य मला पसंत नाही. परंतु काही उपाय नसायचा. विचार करायला वेळ नसायचा. ते भाग कच्चे असण्याची शक्यता आहे.

'लेटर्स फ्रॉम जॉन चायनामन'मधील इंग्रजी तर अद्भुत आहे. लो डिकिनसनचे दुसरे कोणते पुस्तक याच्या तोडीचे आहे काय?

गोष्ट बदलवली. आज एका गोष्टीचा मला फार खेद होतो. मी जळतो आहे. . . . ला तर ज्वालामुखीप्रमाणे पत्र लिहून टाकले आहे. त्याच्या कार्याबद्दल जितका खेद झाला आहे तितकाच न केलेल्या कार्याबद्दलही होतो आहे. सार्वजनिक जीवनात पडल्यानंतर, मोठ्या कामात हात घातल्यानंतर, . . . असे वरचे पद स्वीकारल्यानंतर मूल जन्माला घालण्याचा त्यांना अधिकारच राहत नाही. . . . दोष आहे हे खरे आहे, परंतु मी तर . . . दोष पाहायला बसलेलो नाही. मला तर जी गोष्ट दुःखद वाटत असते ती मी तशीच सांगत असतो. मी तर असे गृहीत धरले होते की ते हे जीवन सोडून आता सार्वजनिक कार्याचे जीवन सुरू करतील. एक वर्षाआधी ही गोष्ट मी जेव्हा ऐकली तेव्हा मला फार आनंद झाला होता. आज तितकाच खेद होतो. हे लोककार्याकरिता पात्र आहेत हे कसे समजता येऊ शकते?

सकाळी . . . विषयी बोलताना . . . म्हणाले, "त्यांना त्या कार्यात प्रवेश घेण्याचा अधिकारच नव्हता. त्यांनी त्यातच आपले जीवन समर्पित करायला हवे होते. पण ते तिथे गेलेच नाहीत. त्यांनी या कार्यासाठी कोणताही त्याग केलेला नाही. आणि त्यांच्यात पैसे मिळण्याची पात्रता किती? २५, ३०, फार तर ५० रुपये – एवढेच आधी मिळायचे, ते आज २०० रुपये ... कडून घेत आहेत. आणि हे काम करण्याच्या पद्धतीमुळे मिळणारा मान, प्रतिष्ठा आणि दर्जा – यामुळे जे काम मिळते, त्याचे मूल्यसुद्धा त्याच मापाने मोजले पाहिजे.

रात्री म्हणाले - मी तर कोणालाही माझा शिष्य म्हणत नाही. परंतु तेच 'मी तर गांधीजींचा शिष्य आहे' असे म्हणत फिरत असतात. असे काम करून ते स्वतःला माझा शिष्य कसे म्हणवू शकतात? त्यांचे काम क्षम्य आहे असे म्हणता येऊ शकत नाही. '. . . जर असे म्हणाले असते की माझी पत्नी मला आवडत नव्हती, तिच्याबद्दल मला मुळीच प्रेम वाटत नव्हते' तर त्यांना तिच्या मृत्यूनंतर दुसऱ्याच दिवशी लग्न करण्याचा अधिकार असता. परंतु ते तर शोकात बुडालेले !

१५-२-'१८

आज थोरोचे 'ड्युटी ऑफ सिव्हिल डिसओबिडिअन्स' - कायद्यासंबंधी कर्तव्य या पुस्तकाचा बापूजींनी केलेला अनुवाद वाचला. हे पुस्तक परत परत वाचण्यासारखे आणि विचार करण्यासारखे आहे. इथे तो अक्षरशः दिला आहे. हिंदुस्थानात नवीन आवृत्ती काढताना यात सुधारणा केल्या होत्या. ते सुधारित स्वरूपच इथे दिले आहे -

**प्रस्तावना**

विचार वाणी आणि वर्तनात ऐक्य असलेले अग्रणी साधुपुरुष हेनरी डेव्हिड थोरो अमेरिकेत एकोणविसाव्या शतकाच्या मध्यात होऊन गेले. सत्यावर अढळ असल्यामुळे त्यांच्या विचारात जितका जोर होता तितकाच त्यांच्या वाणीत आणि वर्तनात होता. त्यांचे लेखन विचारांची खाण आहे. त्यांच्या शब्दाशब्दातून अग्नीचे स्फुल्लिंग उसळत असतात. यामुळेच लाखो लोक ते वाचत असतात आणि त्याचे मनन करत असतात. त्यातील जे प्रसिद्ध लेख आहेत त्यांचा सार देण्याचा हा प्रयत्न आहे. तो थोडक्यात असा आहे.

अमेरिकेतील संयुक्त राज्य मॅसॅच्युएटचे ते रहिवासी होते. या संयुक्त राज्यांनी मेक्सिकोविरुद्ध युद्ध जाहीर केले. ते त्यांना न्यायोचित वाटत नव्हते. गुलामगिरीची प्रथा ही एक घोर, क्रूर अन्याय्य गोष्ट आहे अशी त्यांची मान्यता होती. मॅसॅच्युएटसच्या राज्यसत्तेचा गुलामगिरीला पाठिंबा होता आणि ते गुलामांच्या मालकांना पाठिंबा देत होते. यामुळे त्यांनी निश्चय केला की राज्याला कर देणे बंद करायचे आणि राज्याच्या धोरणाचा तसेच राज्याच्या सत्तेचा अनादर करायचा. अशा प्रकारे राज्याच्या अत्याचारात भागीदार व्हायचे नाही. या निश्चयामुळे कर घेणारा जेव्हा आला तेव्हा ते त्याला म्हणाले, "जोपर्यंत माझ्या पैशाचा उपयोग लढाईकरिता वा गुलामांच्या खरेदीकरिता होतो तोपर्यंत तू

माझ्याकडून कर घेऊ शकत नाही.” कराची वसुली करणारासमोर कठीण समस्या निर्माण झाली. तो म्हणू लागला, ”त्याचे मला काय करायचे आहे?” “तू तुझ्या जागेचा राजीनामा दे, दुसरे काय?” परिणामी त्यांना तुरुगात जावे लागले. त्यांचे मित्र इमर्सन तुरुंगात त्यांना भेटायला गेले आणि त्यांनी विचारले, “हेनरी, तू इथे कसा?” थोरोंनी उत्तर दिले, “तू इथे कसा नाहीस?” तुरुंगात त्यांच्या मनात जे विचार आले त्याचा परिणाम म्हणजे हे पुस्तक. इतिहासकार असे म्हणतात की अमेरिकेतील गुलामगिरी बंद होण्याचे मुख्य कारण थोरोचे हे तुरुंगात जाणे आहे. तुरुंगातून बाहेर पडल्यानंतर त्यांचे हे लेख प्रकाशित झाले. लेख वाचल्यानंतर लक्षात येते की आपल्या देशाच्या सध्याच्या परिस्थितीकडे पाहिले तर हे लेख जनतेसमोर ठेवण्याची ही योग्य वेळ आहे.

मला पूर्णपणे मान्य आहे की जनतेवर राज्यसत्तेचे दडपण जितके कमी तितके ते राज्य चांगले. याचे कारण राज्यसत्ता हा एक रोग आहे, आणि या रोगापासून जनता जितकी मुक्त राहू शकेल तितके ते राज्य प्रशंसनीय असते. अनेक लोक असे म्हणतात की अमेरिकजवळ लष्कर नसेल वा अगदी कमी लष्कर असेल तर ते अधिक चांगले. ही गोष्ट बरोबर आहे. परंतु असे म्हणणाराला भ्रमिष्ट समजतात. ते म्हणतात की राज्यसत्ता लाभकारक आहे, परंतु तिचे लष्कर हानिकारक आहे. अशा लोकांना कळत नाही की लष्कर हे राज्यसत्तेचे शरीर आहे, आणि त्याशिवाय सत्ता थोडावेळही टिकाव धरू शकत नाही. आपण स्वतःही राज्यसत्तेच्या दडपणाखाली राहतो आहो हे कोणाच्या लक्षात येत नाही. खरी पद्धत तर ही आहे की लष्कर आणि राज्यसत्ता या दोघांनाही रयतच टिकवून ठेवत असते.

आपण इतके पाहिले आहे की आपण स्वतःचीच फसवणूक करत असतो. अमेरिकेतील राज्यांनी कोणतेही साहस स्वतःहोऊन केलेले असेल असे नाही. ना तर त्यांनी आपल्याला स्वतंत्र ठेवले ना त्यांनी आपल्याला शिक्षण दिले. आज आपल्याजवळ जे काही आहे ते राज्याच्या बळावर नाही, उलट राज्यसत्तेमुळे आपल्या शिक्षणात आणि चातुर्यात काही उणिवा निर्माण झाल्या आहेत.

असे असले तरी शासनव्यवस्थेला जमीनदोस्त करावे अशी मागणी मी केलेली नाही. सध्या तरी माझी मागणी केवळ चांगल्या शासनासाठी आहे. आणि अशी मागणी करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. ज्या देशात बहुमताने सरकार निवडले जाते, तिथे न्याय मिळतो असे समजणे ही मोठी चूक होईल. आणि या चुकीकडे दुर्लक्ष झाले तर शासनाकडून अनेक अन्याय घडत राहू शकतात. मोठी माणसे जे करतात ते बरोबरच असते अशी जी मान्यचा आहे ती चूक आहे, भ्रम आहे. असे राज्य का

असू शकत नाही की जिथे बहुमत म्हणते त्यानुसार अंमल होण्याऐवजी जे खरे असेल त्यानुसार अमंल होईल? लोक आपला आत्मा राज्यकर्त्यांना कसा विकू शकतात? ते काहीही असे तरी आपण माणूस आहो ना? मी तर म्हणेन की आपण आधी माणूस आहो आणि मग प्रजा. मला कायद्याचा मान ठेवण्याचा गुण शिकवण्याची मुळीच आवश्यकता वाटत नाही. सत्याचा मान ठेवण्याची आवश्यकता नेहमीच असते. माझे एकच कर्तव्य आहे - जे सत्य असेल ते करायचे. कायद्यामुळे माणसाची न्यायबुद्धी थोडीशीसुद्धा वाढली आहे असे मी कधीही एकले नाही. परंतु असे मी पाहिले आहे आणि पाहतो आहे की सामान्यपणे न्याय्य बुद्धीच्या लोकांचा त्यांच्या भोळेपणामुळे अन्यायाचा प्रसार करण्यात शस्त्राप्रमाणे उपयोग होत असतो. कायद्याला अपरिमित मान देण्याचा परिणाम बहुधा असा आढळून येतो की एकदा का राज्य युद्धात उतरले की आपण झटपट सैन्यात भरती होतो आणि गुपचूप वरीष्ठांच्या हुकुमांचे पालन करतो. अनेक माणसांचा व्यवसाय तर लष्करातील नोकरीच असतो. असे लोक अमुक एक लढाई वाईट आहे की नाही असा विचार करायचा ताण कसे काय घेऊ शकतील? अशांना माणूस समजायचे की कसायाच्या हातातील कुऱ्हाड समजायचे? त्यांच्या हाती माणूस आपली मान कसा देऊ शकतो? पशूपेक्षा माणसाचे मूल्य अधिक आहे हे त्यांना कसे कळू शकेल? शिवाय अनेक लोक कायद्याचे पुरस्कर्ते होतात, वकील होतात, मुत्सद्दी होतात. आपल्या अकलेद्वारे राज्याच्या रक्षणाची धुरा आपण उचलली आहे असे त्यांना वाटते. परंतु मला तर वाटते की ते कोणताही विचार न करता न कळत आपण सैतानाची सेवा करत असतो. खरे शूर तर वेगळेच असतात. आपले वीर पुरुष, आपले देशभक्त, आपले महान सुधारक तेच असतात. त्यांची सत्याधारे राज्याची सेवा करण्याची इच्छा असते आणि ते राज्याला समोर ठेवून सेवा करण्याकरिता इच्छुक असतात. सामान्यपणे अशा लोकांना राज्य आपला शत्रू शमजत असते.

सुज्ञ माणूस तर शूरवीराप्रमाणेच काम करत असतो. तो इतरांना नाचायला लावत नाही, स्वतः नाचतो. अमेरिका सध्याच्या राजवटीशी निभवून घेण्याचा जो प्रयत्न करते आहे तो नामर्दपणाचा समजायला पाहिजे. जे राज्य गुलामांवर सत्ता गाजवते त्या राज्याला मी माझे राज्य समजू शकत नाही. जेव्हा फार अन्याय होतो, तेव्हा त्या जुलमी राज्याविरुद्ध उभे राहणे माणूसजातीचा हक्क आहे. काही लोक म्हणतात की अमेरिकेची सध्याची राजवट जुलमी नाही; कारण त्या लोकांच्या स्वतःच्या जातीवर हल्ला झालेला नाही. आणि इतरांवर जो हल्ला होतो, त्याची अशा बोलणारांना काहीही फिकीर नसते.

जशी प्रत्येक गुप्त गोष्टीत काही ना काही उणीव असते, तशीच प्रत्येक शासनव्यवस्थेत काही ना काही त्रुटी असू शकते. या त्रुटी दूर करण्यासाठी लगेच बंडखोरी करणे आवश्यक असते असे नाही. पण जेव्हा तीच उणीव शासनपद्धती बनते, जेव्हा अन्यायच कायद्याचे रूप धारण करतो, तेव्हा अशा राज्यव्यवस्थेला स्वाभिमानी माणूस खऱ्या अर्थाने आपली शासनव्यवस्था समजू शकत नाही.

शरीर जर गेले तरी न्याय करायचाच याला सत्य समजावे. हे सत्य उमगले पाहिजे. एखाद्या माणसाची तुंबडी उसनी घेतली असेल आणि तो जर मरत असेल तर जीव जरी जात असेल तरी त्याची ती तुंबडी परत करायला पाहिजे. अशाच प्रकारे अमेरिकेचे राज्य जरी बुडत असेल तरी त्याने गुलामांची सुटका केलीच पाहिजे.

आपण म्हणत असतो की समाज अमूक कामाकरिता तयार नाही; परंतु चांगले करायला नेहमीच वेळ लागत असतो. कारण थोडी माणसे जेव्हा सुधारणा करण्याची मागणी करतात तेव्हा ते काही फार शूर नसतात. तुमच्यासारखी सर्व माणसे शूर नाहीत. परंतु समाजात काही लोक तरी पूर्ण शुद्ध असायला पाहिजे. ज्याप्रमाणे बोरिक ॲसिडचा लहानसा तुकडा जरी कणकेत टाकला तरी तो संपूर्ण पोळी फुगवतो त्याचप्रमाणे अशी माणसे संपूर्ण समाजात सुधारणा घडवून आणत असतात. विचारांच्या गुलामगिरीचा सामना करायला तत्पर असणारे लोक आहेत खरे, परंतु त्याचे आचरण अगदी त्याविरुद्ध असते. आणि ते स्वतःला वाशिंग्टन आणि फ्रेड्रिकचे वंशज म्हणवत असतात खरे, परंतु खिशात हात घालून ते मौजमजा करत असतात. आजचे देशसेवक आणि प्रामाणिक माणसे कशी आहेत? ते लेच्यापेच्या मनाचे आहेत. ते नाराजीने प्रस्ताव मंजूर करतात, अर्जविनंत्या करतात. पण त्यांच्या कृतींत जीव नसतो. यामुळे त्यां्च्यात सत्व कुठून आढळणार? आपल्यावर कोणतीही जबाबदारी येऊ नये म्हणून ते दुसरा कोणी पुढे येईल आणि दु:खाचे निवारण करील अशी वाट पाहतात बसलेले असतात.

जगात सत्याची गोष्ट करणारे हजारात नऊशे नव्याण्णऊ असतात, पण त्यानुसार आचरण करणारा एकच असतो. परंतु सत्याच्या हजार गोष्टी करणारांमुळे सत्याचे आचरण करणाऱ्या माणसाची किंमत खूप जास्त वाढत असते. खजिन्याची राखणदारी करणारे अनेक असतात, पण त्यांना खजिन्यातील एक पैसुद्धा मिळू शकत नाही. परंतु खजिन्याचा मालक एकच असतो. त्याला संपूर्ण खजिना लुटवून टाकायचा अधिकार असतो.

माणसाने सत्याच्या बाजूने मत दिले म्हणजे तो सत्याचे आचरण करणारा आहे असे म्हणता येत नाही. जोपर्यंत आपले मत सिद्ध करण्याची त्याच्यात आकांक्षा निर्माण होत नाही तोपर्यंत त्या मताला काहीही किंमत नसते. बहुसंख्य लोकांच्या निर्णयावर आपले तत्त्व सोडण्याऐवजी माणसाने त्या तत्त्वाकरिता एकट्याने झुंज दिली पाहिजे. बहुमताने जे काम होते त्यात करवण्यासारखे काय असते? जेव्हा अनेक लोक गुलामगिरी रद्द करण्याच्या बाजूने मत देत असतात तेव्हा गुलामगिरी रद्द करण्याचे काम आता आटोपले आहे असे समजायला पाहजे. गुलामगिरीशी झुंज देणारा जो पहिला खरा माणूस असतो त्यानेच गुलामगिरी रद्द केली असे समजायला पाहिजे.

मला असे म्हणायचे नाही की माणसाला जेव्हा केव्हा खोटेपणा दिसतो तेव्हा तो खोटेपणा दूर करण्याकरिता माणूस बांधलेला असतो. परंतु मी स्पष्टपणे म्हणेन की जर तो खोटेपणात भाग नसेल तर तो खोटेपणा दूर करण्याकरिता निश्चितपणे बांधलेला आहे. माणूस जसा विचार करतो तसा जर तो वागत नसेल तर त्यात काय मजा आहे? माझा माल जर चोरीला गेला असेल तर मी माझ्या घरी स्वस्थ बसून राहत नसतो, मी चोरी  गेलेला माल परत मिळवण्याचा प्रयत्न करत असतो. जो माणूस बोले तसा चालत असतो तो वेगळ्याच प्रकारचा माणूस होत असतो. तो माणूस ना तर देशाची, ना सख्यासोयऱ्यांची ना मित्रांची फिकीर करत असतो. तो सत्याची सेवा करत असल्यामुळे आपोआपच सर्वांची सेवा करत असतो.

कायदा जुलमी आहे हे आपण कबूल करत असतो. त्यासमोर आपण कोणत्या झाडाचा पालापाचोळा?  सामान्यपणे लोक म्हणत असतात की बहुमत जेव्हा कायद्याच्या विरोधात असते तेव्हा कायदा रद्द होत असतो. ते म्हणत असतात की जो कायद्याचा सामना करतो तो कायद्याची जितकी हानी करतो त्याहून जास्त तो स्वतःचे नुकसान करतो. परंतु तसे असेल तर तो दोष कायद्याचा सामना करणाराचा नसतो, अंमलदाराचा असतो.

मी बिनदिक्कतपणे म्हणेन की मॅसॅच्युएट्समध्ये एक हजार लोक तर सोडा, शंभर माणसेही सोडा, दहा लोकसुद्धा प्रामाणिक नाहीत. एक प्रामाणिक माणूस गुलामगिरीच्या विरोधात असेल आणि त्याने कर भरायला नकार देऊन गुलामगिरीतून मिळणाऱ्या लाभाचा त्याग केला असेल, त्यासाठी तुरुंगवास पत्करला असेल, तर आजच अमेरिकेतील गुलामगिरीचा शेवट होईल.

इतर लोक आपल्या मताचे नाहीत म्हणून जे गुलामांची मालकी सोडत नाहीत ते गुलामगिरीला विरोध करत नाहीत, तोपर्यंत गुलामगिरीत सहभागी होण्याचे पाप त्यांच्या माथी आहेच. जो एकटा उभा राहतो, तो खऱ्या अर्थाने एकटा कधीही नसतो — त्याच्या पाठीशी ईश्वर असतो हे सत्य त्याला अवगत नसते हेच याचे कारण आहे. मी जर इतरांपेक्षा प्रामाणिक असेन तर मी इतरांपेक्षा श्रेष्ठही असेन. राज्यसत्तेचा प्रतिनिधी जेव्हा माझ्याकडून कर वसूल करायला येतो तेव्हा वर्षातून एकदाच राज्यसत्तेशी माझा संबंध येत असतो. त्या वेळी मी त्याला कर देण्याकरिता नकार दिलाच पाहिजे. एक हजार लोक जर कर द्यायला नकार देतील तर तसे करण्यात कोणताही अत्याचार होत नाही. उलट राज्य जे अत्याचार करत असते त्याला कर देऊन आपण मदत करत असतो. कर देण्यातच अत्याचार आहे.

मला माहीत आहे की मॅसॅच्युएट्समध्ये एकच खरा शूरवीर असेल, ज्या माणसाला गुलामगिरी समोर दिसत असते आणि म्हणून तो जर कर द्यायला नकार देत असेल आणि तुरुंगात जात असेल तर त्याच दिवशी गुलामगिरीच्या बेड्या तुटायची सुरुवात होईल. जेव्हा एखादी गोष्ट बरोबर केली जाते तेव्हाच ती घडली असे म्हणतात. परंतु आपण लांब लांब गप्पा मारतो आणि अशा गप्पा मारणे हेच आपले काम आहे असे आपण समजत असतो. गुलामगिरी तोडण्याच्या आंदोलनाला पाठिंबा देणारी अनेक वर्तमानपत्रे आहेत, परंतु एकही मर्द नाही.

ज्या राज्यात खोट्या कारणाकरिता लोकांना तुरुंगात टाकण्यात येत असते त्या राज्यात न्यायी आणि चांगल्या माणसांचे घर तुरुंगच असते. यामुळे आज मॅसॅच्युएट्स राज्यात चांगल्या लोकांचा वास तुरुंगातच असायला पाहिजे. गुलामगिरी असलेल्या राज्यात माणूस तुरुंगातच स्वतंत्र असतो. तिथेच त्याला मान असतो. जे असे समजतात की सर्व चांगले लोक तुरुंगात गेले तर अन्यायाशी लढा देणारा बाहेर कोणी राहणार नाही. अशांना लढा कसा चालत असतो याचे भान नसते. खऱ्याची सत्ता खोट्यावर कशी चालत असते हे त्यांना कळत नाही. कारागृहात असलेली, आणि अन्याय व जुलूम यांचा अनुभव घेत असलेली व्यक्ती, तुरुंगात जेवढे कार्य करू शकते, तेवढे ती बाहेर राहून करू शकत नाही. थोडेसे विरुद्ध विचारांचे लोक जर इतर अनेकांना आपल्याकडे ओढू लागले, तर त्यांना खरे विरोधी विचारांचे म्हणताच येणार नाही. त्यांनी आपली सगळी ऊर्जा विरोधी प्रवाहात वापरली, म्हणून ती क्षीण होत गेली.

मी माझ्या शेजाऱ्यांशी बोललो असता माझ्या लक्षात आते की, जर ते सरकारविरोधात गेले तर त्यांचे सगळं काही हिरावून घेतले जाईल, आणि त्यांच्या बायकोमुलांचे हाल होतील अशी त्यांना भीती

वाटते. मला जर स्वतःला किंवा माझ्या कुटुंबीयांना राज्याच्या अशा आधारावर अवलंबून राहावे लागत असेल तर मी नक्कीच निराश होईन.

मला वाटते की आपण जुलमी राज्याच्या ताब्यात असणे ही गोष्ट आपल्याकरिता लज्जास्पद आहे. आणि त्याच्या विरोधात असणे ही स्वाभाविक आणि चांगली गोष्ट आहे. मी सहा वर्षांपासून कर दिलेला नाही. यामुळे मला एका रात्रीकरिता तुरुंगात टाकण्यात आले. मला जेव्हा तुरुंगात ठेवण्यात आले तेव्हा तुरुंगाच्या भिंती आणि त्याचे लोखंडी दरवाजे मजबूत आहेत की नाही हे पाहण्याकरिता तपासण्यात आले तेव्हा मला राज्याचा मूर्खपणा लक्षात आला. याचे कारण मला कैदेत टाकणारे तर असेच समजत होते की मी केवळ हाडामासाने बनलेलो आहे. त्या मूर्ख लोकांना कळत नव्हते की मी भिंतींमध्ये बंदिस्त असूनही मी इतरांकरिता मुक्त आहे. मी कैदेत आहे असे मला वाटतच नव्हते. मला तर असेच वाटत होते मी जसा बाहेर होतो तसाच मी कैद्याच्या स्थितीतही आहे. माझ्या मनाला असेच जाणवले की जे लोक बाहेर होते तेसुद्धा प्रत्यक्षात कैद्याच्याच स्थितीत होते. ते माझ्यापर्यंत पोहोचू शकले नाहीत, म्हणून राज्याने माझ्या शरीराला शिक्षा केली. यामुळे मी अधिकच मुक्त झालो आणि माझे विचार राज्यासाठी अधिक भयंकर झाले. मी पाहिले की एखाद्या मुलाला माणसाला जर काही करता आले नाही तर तो त्याच्या कुत्र्याला लाथ मारतो — तसेच राज्य जेव्हा मला काहीही करू शकले नाही तेव्हा त्याने माझ्या शरीराला इजा केली. आणि मी हेही पाहिले की शरीराला इजा करतानाही राज्य घाबरतच होते. यामुळे राज्याविषयी माझ्या मनात उरलेली जी काही आदरभावना होती होती तीही नाहीशी झाली.

* * *

एक गृहस्थ बडोद्याहून आले, थोडे दिवस आश्रमात राहिले. बापूजींशी गोष्टी केल्या आणि पूर्ण विचारांती त्यांनी प्रतिज्ञा केली की गुरुवारी मी परत येईन आणि मी स्वतःला राष्ट्रीय सेवेकरिता अर्पण करीन. मग बडोद्याला जाऊन गुरुवारी येणार नाही म्हणून त्यांचे पत्र आले. घरी गेल्यानंतर त्यांनी लिहिले की परतल्यानंतर माझ्या लक्षात आले की माझी प्रतिज्ञा माझ्या कुटुंबाकरिता अतिशय दुःखद आहे. त्यांना उपाशी मरावे लागेल इत्यादी."

त्याचे उत्तर -

## (बडोद्याच्या एका गृहस्थाला पत्र)

भाईश्री . . .,

“तुमचे पत्र माझ्याकरिता अतिशय दुःखद आहे. तुम्ही जी हकिगत लिहिली ती तुम्ही जेव्हा प्रतिज्ञा घेतली तेव्हा ती तुमच्या कल्पनेबाहेर नव्हती. तुमचे संपूर्ण कुटुंब जरी उपाशी मेले असते तरी तुम्ही प्रतिज्ञेचे पालन करायला पाहिजे होते. प्रजेची घडण अशा माणसांनीच होत असते. इतर माणसांना काहीही अर्थ नाही. तुम्ही प्रतिज्ञा करावी असे कोणाचेही दडपण नव्हते. तुम्हाला विचार करायला पूर्ण वेळ होता. आपली उन्नती लवकर होऊन राहिलेली नाही याचे कारण केवळ आपली दुर्बलता आहे. हे पत्र लिहिण्याचा हेतू आता तुम्ही या प्रतिज्ञेचे पालन करावे हा नाही. तुम्ही जरी आला तरी तुमचा स्वीकार होणार नाही. आता तुम्ही कुटुंबाच्या पोषणाकरिता थांबा, झालेल्या पापाचा विचार करा. दीनपणे वर्तन करून शांतपणे जीवन घालवा. पूर्ण विचार केल्याशिवाय परत कधीही प्रतिज्ञा करू नका. तुमच्याकरिता हेच प्रायश्चित्त आहे.

मोहनदास गांधीचे वंदेमातरम”

# (डाह्यालाल यांना पत्र)

भाईश्री डाह्यालाल,

"तुमचे पत्र मिळाले. भाई अमृतलालच्या मृत्यूची बातमी वाचून मनात विचार येतात. तुमचेच सहकारी बंधू नवलरामनी बातमी सांगितली की तुमचे अजूनही काही सहकारी प्लेगच्या रुग्णाची सेवा करता करता चालले गेले. ते जर अशी सेवा करत गेले असतील तर दुःखाचे कारण नाही. उलट मला तर ते हर्षाचे कारण दिसते. आपण सर्वांनी असा मृत्यू इच्छिला पाहिजे. रणांगणात झालेल्या मृत्यूपेक्षा दुसरा कोणताही मृत्त्यू श्रेष्ठ नसतो हे वाक्य इथेच लागू पडते. देह तर जेव्हा जीर्ण होईल तेव्हा जाणारच आहे, अशा मृत्यूची आपण मागणी केली पाहिजे. इतके तर आपण समजून घेऊन लक्षात ठेवायलाच पाहिजे की भाई अमृतलाल, मोतिलाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे आत्मे नव्याने अजून चांगले शरीर धारण करील आणि त्यांची वेळ येईल तेव्हा ते हिंदुस्थानची सेवा करतील.

"भाई अमृतलालच्या कुटुंबाचे माझ्यातर्फे सांत्वन कराल.

"भाई मोतिलालच्या पत्नीला शक्य तितक्या लवकर इथे पाठवण्याचा प्रयत्न करा. हीसुद्धा एक सेवाच आहे.

मो. गांधीचे वंदेमातरम"

# (देवदास गांधींना पत्र)

१६-२-१८

“चि. देवदास,

“इथे एका दिवसाकरिता आलो होतो, परंतु त्याऐवजी जवळपास एक महिना लोटला आहे. आज दिल्लीला जायचा विचार होता, परंतु त्याऐवजी खेडाला कामाकरिता जावे लागत आहे. हे ठिकाण जर मी सोडले तर हजारो लोकांचे फार मोठे नुकसान होईल. लोक दबतील आणि पूर्णपणे हताश होतील. अशी गोष्ट असल्यामुळे इथे थांबलो आहे. आशा तर अशी आहे की इथून दहा दिवसात सुटका होऊ शकेल. तुझी नेहमीच आठवण येत असते. मला माहीत आहे की तू रसिक आहेस आणि अनेक गोष्टींत रस घेऊ शकतो. यातून तुला क्षणोक्षणी सत्याचा महिमा आणि प्रभाव दिसेल. तुझ्याकरिता माझा हा वारसाच आहे. आणि तो अनंत आहे असे मी समजतो. ज्याला हे कळेल त्याच्याकरिता हा अमूल्य आहे. असा माणूस दुसरा वारसा मागणारही नाही आणि इच्छिणारही नाही. माझा समज असा आहे की तुला या वारशाची ओळख पटली आहे आणि तुला तो आवडतोही. आज मला स्वप्न पडले की तू मला फसवले, पेटीतून नोटा चोरून त्या तू मौजमजेसाठी वापरल्या. मला कळले, मी घाबरलो, खूप व्यथित झालो. एवढ्यात जाग आली आणि लक्षात आले की अरे, हे तर स्वप्न आहे. ईश्वराचे उपकार मानले. माझे स्वप्न तुझ्याबद्दलची आसक्ती सुचवते. तुला तर ही आसक्ती हवीहवीशी वाटते. ही आसक्ती या जन्मात पूर्णपणे चालली जाईल अशी भीती बाळगण्याचे तुझ्याकरिता काहीही कारण नाही. सर्वांबद्दल समत्वभाव ठेवण्याकरिता मी आटोकाय प्रयत्न करतो आहे. परंतु तुझ्याकडून काही तरी जास्त मिळण्याची आशा तर राहतच असते.

चि. छोटेलाल आणि चि. सुरेंद्रला वेगळे पत्र लिहून राहिलेलो नाही. तुला वाचून दाखवायचे असेल तर दाखवू शकतोस, अथवा त्यांना हे सांग. बापलेकाचे पवित्र संबंध लक्षात घेऊन हे लिहिलेले आहे. यामुळे हे संग्रहणीय आहे असे वाटल्यामुळे वाचायला द्यायचे नसेल तरी चालेल.

बापूचे आशीर्वाद”

चंपारणमधील एक स्वयंसेविकाबहेन आनंदीबाई यांना त्यांच्या वहिनीच्या निधनानिमित्त लिहिलेले पत्र. (गांधीजींनी मराठीत लिहिलेले हे पत्र मी पहिल्यांदाच पाहतो आहे. ते जसेच्या तसे देत आहे.) -

## (आनंदीबाई यांना पत्र)

"आपल्या भाऊजाई बाई वारल्या हे ऐकून अत्यंत वाईट वाटले. परंतु आपल्याला आत्म्याची जाणीव आहे हे मला माहीत आहे. यामुळे माझी खात्री आहे की जन्म आणि मरण या दोन्ही स्थिती वास्तविक पाहता एकाच स्वरूपाच्या आहेत, हें आपल्या ताबडतोब ध्यानात येईल. परंतु मृत्यू समयी दुःख व्हावे हा मनुष्य स्वभाव पडलेला आहे. या आपल्या दुःखाचा मी वाटेकरी होऊ इच्छितो. आणि त्या योगाने आपल्याला जी शांति मिळणार असेल ती मिळो. आपणासारख्या ज्यांनी सेवापरायण होण्याचा निश्चय केला असेल त्यांना सुतक पाळण्याचा एकच मार्ग आहे. आणि तो (म्हणजे) विशेष सेवापरायण होणे हाच.

आपला मोहनदास गांधी"

२१-२-'१८

'नॅशनल एज्युकेशन प्रमोशन सोसायटी'च्या सचिव म्हणून श्री अरुंडेलनी 'शिक्षण सप्ताहाकरिता' एक लेख लिहून पाठवण्याची विनंती केली होती. त्याचे पुढीलप्रमाणे उत्तर देण्याचा विचार होता -

## (जे. एस. अरुंडेलना पत्र)

तुमचे पत्र मिळाले. सध्या तर मी एकदोन अतिशय कठीण बाबींमध्ये बुडालेलो आहे. माझ्या मनात हवे तसे विचार येत नाहीत. एखाद्या विषयावर जर लोकांकरिता आपल्याला काही लिहायचे असेल तर त्या विषयाचे मनातल्या मनात चर्वीकरण व्हायला पाहिजे. मी इतकेच सांगू शकतो की तुमचे पत्र मी लक्षात ठेवीन आणि तुम्हाला काही पाठवण्याचा प्रयत्न करीन. परंतु फार मोठी शक्यता आहे की मी हे पाठवू शकणार नाही. हं, जी कामे मी हाती घेतली आहेत ती वेळेच्या आधी पूर्ण झाली तर गोष्ट वेगळी."

परंतु नंतर कळले की अरुंडेलच्या पत्रात उशिरात उशिराची तारीख २०-२-'१८ होती. यामुळे बापू म्हणाले, गंगेत घोडे न्हाले. त्यांना लिही -

"तुमचे पत्र कालच मिळाले. यामुळे तुम्ही लिहिलेल्या तारखेच्या आत लेख पाठवू शकत नाही."

स्लाईंना (चंपारण चौकशी समितीचे प्रमुख म्हणून यांना नेमण्यात आले होते.) पत्र लिहिले - "एखाद्या कामातून मुक्त झालो की एक काम आटोपले की त्यातून सुटल्याचा निःश्वास टाकतो."

कुमारी विन्टर बॉटमनला (इंग्लंडमधील बापूंचे एक जुन्या मित्र आणि मदतनीस.) पत्र लिहिले -

## (फ्लॉरेन्स विंटर बॉटमन यांना पत्र)

"तुला पत्र लिहून आठवडे लोटले, परंतु याचे कारण तुला माहीत आहे. इथल्या कामकाजाविषयी काही लिहिण्याआधी तू मला जो एक तातडीचा प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर देतो. तुझ्या प्रश्नावरून असे वाटते की तू या देशातील माझ्या कामकाजाकडे बारकाईने निरीक्षण करते आहेस. लंडनमध्ये मी म्हणत असे की 'जनतेबद्दल दयेची भावना असलेले निरंकुश राज्य हीच उत्तम शासनव्यवस्था असते'. या गोष्टीची तू आठवण देते आहेस आणि विचारते आहेस की 'तू (म्हणजे मी) तिथे होमरूल आंदोलनात कसा भाग घेतो आहेस? ही गोष्ट वरील कथनाशी कशी सुसंगत आहे?' लंडनमध्ये मी जे म्हणालो होतो त्यावर मी अजूनही कायम आहे. परंतु आज अशी शासनव्यवस्था अशक्य झाली आहे. हिंदुस्थानकरिता सांसदीय शासनव्यवस्थेतून जाण्याशिवाय दुसरा कोणताही उपाय नाही ही गोष्ट मला निश्चितपणे जाणवत असल्यामुळे ज्या आंदोलनामुळे चांगल्यातचांगली सांसदीय शासनव्यवस्था मिळू शकेल आणि सध्या जी शासनप्रणाली ना तर सांसदीय आहे ना जनतेच्या हिताकरिता इच्छुक असलेली हुकूमशाही आहे ती ज्या आंदोलनामुळे मिटवता येईल तिला मी पाठिंबा देतो आहे.

"दुसरी गोष्ट म्हणजे या आंदोलनात मी तितक्याच प्रमाणात भाग घेतो आहे ज्या प्रमाणात हे आंदोलन माझ्या त्या सिद्धांतांना मान्यता देईल, जे माझ्या मते कोणत्याही प्रकारच्या शासनव्यवस्थेला स्वीकारावेच लागतील आणि जनतेला मी जे मान्य करायला लावू शकेल आणि शासनाला ज्यांची अंमलबजावणी करायला लावू शकेन.

"नटेसननी माझ्या भाषणांचा संग्रह छापला आहे. त्याची एक प्रत तुला पाठवायला मी त्यांना सांगितले आहे. त्यात येथील गुजरात राजकीय परिषदेचा प्रमुख म्हणून मी जे भाषण दिले होते त्याच्या इंग्रजी अनुवादही छापलेला आहे. मी जे सांगतो आहे ते त्यात पूर्णपणे दाखवलेले आहे.

"इतर गोष्टींसंबंधीही लिहिता यावे म्हणून हे पत्र लिहिणे आठवडाभर थांबवून ठेवले होते. परंतु आता अजून विलंब करणे योग्य नाही. बाकी सगळे लिहिण्याकरिता पुढे येणारी अजून एखादी संधी घेईन.

तुझा,

मो. क. गांधी"

# (गोरधनदास पटेल यांना पत्र)

(या पत्राची संपूर्ण गांधी वाङ्मयमध्ये २०-२-'१८ दिलेली आहे.)

"भाई गोरधनभाई,

"पूज्य अनसुयाबहेन, भाई शंकरलाल बँकर आणि मी आताच विणकरांच्या सभेतून आलो. विणकरांना सांगितले की गिरणीमालक तुम्हाला आठ आणे देऊन तुमच्याकडून काही लिहून घेऊ इच्छितात. सल्लागारांचा सल्ला घेतल्याशिवाय कोणत्याही कागदावर सही करू नका असा सल्ला मी त्यांना दिला आहे. आणि मी त्यांना असेसुद्धा सांगितले आहे की एकदोन दिवसात किती वाढ मागणे योग्य राहील याचाही आम्ही तुम्हांला सल्ला देऊ. आणि ते जर या सल्ल्याप्रमाणे चालतील आणि तुम्ही सुचवलेला पगार जर ते पसंत करतील तर त्यांचे भले होईल. या कार्यातील माझी जबाबदारी मी गिरणीमालकांच्या सदस्यांना काल विनयपूर्वक सांगितलेली आहे. मला वाटते की पंचां ंचे तत्त्व अतिशय गूढ आहे आणि मजुरांचा त्यावरील विश्वास उडावा अशी माझी अगदीच इच्छा नाही. यामुळे अनायेसे माझ्यावर आलेली ही जबाबदारी मी सोडू शकत नाही. भाई शंकरलाल बँकर आणि भाई वल्लभभाई पटेल हेसुद्धा या विचाराशी सहमत आहेत. मजुरांनी अनिश्चित स्थितीत कामधंद्याशिवाय राहावे अशी इच्छा करणे हे त्यांच्याकरिता, आपल्याकरिता आणि सर्वांकरिता योग्य नाही. मुंबईच्या गिरण्या जी मजुरी देत आहेत त्याची माहिती भाई शंकरलाल बँकर घेऊन आले आहेत. येथील गिरण्या जे पगार देत आहेत त्याची नोंद जर मला लगेच मिळाली तर मी आभारी होईन. आणि गिरणीगटाचे लोक जर आमच्या मताशी कोणत्याही प्रकारे बांधिलकी न स्वीकारता आपल्या मताप्रमाणे वेगवेगळ्या विभागातील मजुरांना वेगवेगळे मत देत असतील तर ते मत त्यांनी द्यावे अशी आमची इच्छा आहे. तुमच्यातील कोणीही जर कोणतेही बंधन न स्वीकारता सल्लामसलतीत सामील होऊ शकत असतील तर तितक्याच प्रमाणात आमचा प्रस्ताव ज्ञानपूर्वक आहे असे समजले जाईल. माझ्या मनात मजुरांबद्दल ते मजूर आहेत म्हणून कोणताही पक्षपात नाही, न्यायाकरिता पक्षपात आहे. आणि तो बरेचदा मजुरांच्या बाजूने दिसत असल्यामुळे त्यांच्याबद्दल माझ्या मनात पक्षपात आहे अशी मान्यता सामान्यपणे पसरलेली दिसते. माझ्याकडून या महान उद्योगाचे अनहित होऊच शकत नाही. माझी इतकीच अपेक्षा आहे की या कठीण कामात तुमच्या मंडळाने आम्हांला मदत करावी. या पत्राचे उत्तर तुम्ही ताबडतोब

द्याल अशी अपेक्षा आहे. उशिरात उशिरा बुधवारी जर मजुरांना सांगता आले तर सांगेन असे मी त्यांना सांगितले आहे. यामुळे मला घाई आहे.

मो. क. गांधी

२६-२-‘१८

आज संध्याकाळी खूप विचार केल्यानंतर म्हणाले की, मला सुतार कामगारांच्या प्रतिनिधींकडे लगेच जावे लागेल आणि त्यांना माग कामगारांच्या वतीने असा सल्ला द्यावा लागेल की, त्यांनी आपल्याकडून ग्रुपला (व्यवस्थापनाला) जुलै महिन्याच्या पगारात ३५ टक्के वाढ मागावी. जर ती वाढ नाकारली गेली, तर माग कामगारांनी संप करावा आणि तिथून बाहेर पडावे. त्यांच्याशी पूर्वी अनेकदा वाद झाले आहेत, पण अजून ते जसे आहेत तसेच आहेत, हे त्यांच्या परिस्थितीमुळे त्यांना जाणवू द्यायचे नाही. हाच विचार मनात ठेवून बापूंनी अनुक्रमे अनसुयाबेहनला सांगितलं – ‘या महालातून बाहेर पडून तुम्ही मजुरांची बहीण बना’.

खेडाविषयी एक पत्र -

## (खेडाच्या परिस्थितीसंबंधी एक पत्र)

"तुमचे गुजरात सभेसंबंधीचे पत्र मी वाचले. खेडा जिल्ह्यातील रयतेकरिता चांगले काम करणे हे आपणा सगळ्यांचे कर्तव्य आहे. ही सभा जर हे काम करणार नाही तर हिला गुजरात सभा म्हणताच येणार नाही असे मी समजतो.

"रयतेला आम्ही जो सल्ला देऊ त्याची जबाबदारी माझ्या शिरावर असेल. रयतेचे म्हणणे हे आहे की पीक चार आण्यापेक्षाही कमी आले आहे. सरकार कबूल करते आहे की पीक जर चार आण्यांपेक्षाही कमी आले असेल तर या वर्षी शेतसारा घ्यायला नको. परंतु सरकार जर रयतेचे म्हणणे कबूल करत नसेल तर रयतेजवळ एकच उपाय आहे आणि तो म्हणजे तिने स्वतः कर भरू नये आणि सरकारला आपली मालमत्ता विकायची असेल तर तीसुद्धा विकू द्यावी. किसान जर असे करणार नाहीत तर आपल्या स्वतःला खोटारेडे ठरवण्याकरिता पैसे देण्यासारखी ही गोष्ट होईल.

"जमिनीच्या उत्पादनक्षमतेवर शेतसारा अवलंबून असतो. जमिनीतून जर उत्पन्न होणार नाही तर सरकार तिच्यावर शेतसारा लावू शकत नाही ही गोष्ट स्पष्ट आहे. सरकारने हप्त्याची व्यवस्था केली आहे. ही काही कृपा नाही, ही तर आवश्यकता आहे.

"परंतु. मला असे दिसते या संबंधीत तुमच्यात आणि सभेत मतभेद उत्पन्न होण्याची शक्यता आहे. परंतु मतभेद सहन करणे हा तर सार्वजनिक कामाचा एक भागच आहे. जनतेसमोर दोन्ही मत ठेवता येऊ शकतात आणि मग त्यातून निवड करणे जनतेच्या हाती असू शकते.

"अन्याय होत असल्याची भावना आदरपूर्वक व्यक्त करणे आणि कर न भरता जप्ती येऊ देणे यात काहीही बेकायदेशीर नाही ही गोष्ट तर मला स्वयंसिद्ध असल्यासारखी वाटते.

लि. तुमचा मोहनदास"

# (श्री गो. कृ. देवधर यांना पत्र)

"तुमची दोन्ही पत्रे आणि अहवाल मला मिळाला. मला निश्चितपणे वाटते की तुम्ही नकळतपणे का होईना खेडाच्या लढ्याला नुकसान पोहोचवले आहे. आणि स्वतःला श्री प्रेंटच्या हातातील खेळणी होऊ दिले आहे. शेतकऱ्यांनी आपल्या पिकाची आणेवारी कमी केली आहे हे तुमचे म्हणणे अतिशय अपूर्ण हकिगतीवर आधारित आहे. श्री अमृतलाल ठक्कर, जे या लढ्यात उतरले आहेत ते असे समजत नाहीत की साडेतीन आणे पीक आल्याचा जो हिशेब आहे तो चूक आहे. तुम्हाला माहीत आहे की सरकारी आणेवारीत परत फेरफार करण्यात आला आहे.

"ते काहीही असले तरी पुरेशी मदत करण्यात आली आहे असे कसे म्हणता येते? तुम्हाला माहीत आहे की आतापर्यंत काहीही मदत करण्यात आलेली नाही. श्री प्रेंट म्हणाले होते की रबीचे पीक २५ टक्क्यापेक्षा कमी आले तर मदत केली जाईल. तेव्हा हे आपल्याला केवळ खेळवणे होते काय? तुम्हाला माहीत नाही काय की रबी पिकात कापूस, तंबाखू, तूर आणि एरंडी येत नाही?

"आणि तुम्हाला तुमचा अहवाल प्रकाशित करण्याची आवश्यकता काय होती? मी जेव्हा या लढ्यात पडलो तेव्हा अहवाल केव्हा प्रकाशित करायचा हे माझ्या विवेकावर आधारलेले असायला पाहिजे होते.

"अखेरीस आपण असे का समजायचे की अंमलदाराने देऊ केले तितकेच आपल्याला मिळू शकते? जितके आपल्याला मिळणे योग्य आहे तितके मिळायलाल पाहिजे असे का मसजत नाही?

"मला वाटते की तुम्ही तुमच्या क्षमतेपेक्षा जास्त काम हाती घेतले आहे आणि यामुळे तुम्ही ना तुमच्या कामाला न्याय देऊ शकता आणि ना स्वतःला. तुम्ही आजारी आहा आणि जितके काम तुम्ही सांभाळू शकता त्याहून जास्त काम तुम्ही तुमच्या शिरावर घेतले आहे. तुम्ही सांगायला पाहिजे होते की ही चौकशी करायचे काम मी करू शकेन असे नाही. मला माहीत आहे आहे की माझ्या पत्राचा तुम्ही चुकीचा अर्थ लावणार नाही. तुमच्या हातून समजूनउमजून अन्याय होऊ नये इतकीच माझी इच्छा आहे. माझ्या हृदयाचे दार तुमच्यासमोर उघडून त्यात जे काही आहे ते तुम्हाला पाहू देऊनच तुमच्याबद्दलचा आदर मी व्यक्त करू शकतो. कोणताही मित्र याहून अधिक काही करू शकत नाही. याहून जर मी काही कमी करेन तर मी तुमचा तितकाच कमी प्रतीचा मित्र असेन.

"तुम्ही माझी विनंती मान्य करायला पाहिजे आणि अमृतलालकडे गुजरातचे काम सोपवून द्यायला पाहिजे. असे करून तुम्ही समजाची अधिक चांगली सेवा करू शकाल. असे केल्याने गुजरातच्या कामात त्यांची प्रतिभा अजूनच चांगली उजळून निघेल. विधानसभेचे काम तर ज्यांच्यात बुद्धी असेल ते करू शकतात, परंतु अस्पृश्यांचे काम तर तोच करू शकतो ज्याचे हृदय बुद्धीला मार्ग दाखवू शकतो. अमृतलाल अशा प्रकारचा माणूस आहे."

# (रामदास गांधी यांना पत्र)

२७-२-'१८

"चि. रामदास,

"आता तू आमची काळजी का करतोस? तुझ्या कारणात मला निराशा दिसते. तुला शिक्षणाचा अभाव जाणवतो. आपल्याला कोणतेही ठिकाण नाही असेसुद्धा तुला वाटते. माझ्यासमोर जर तू असतास तर माझ्या कडेवर घेऊन मी तुला आश्वस्त केले असते. तुझे समाधान मी करू शकलो नाही ही माझी उणीव मी समजू शकतो. माझ्या प्रेमातही किती तरी उणीव असू शकते. अनाहूतपणे माझ्याकडून या उणिवा राहून गेलेल्या असू शकतील याबद्दल मला क्षमा करशील. मुलांचा आईवडिलांवर अधिकार असतो. ते आईवडिलांजवळ नेहमीच नम्रपणे राहत असतात. आईवडिलांच्या चुकीने ते कोमेजून जात असतात. आपल्या शास्त्रांनी आईवडिलांना परमेश्वराची उपमा दिली आहे. अशी जबाबदी पार पाडू शकण्यासारखे आईवडील जगात सदैव जन्मत नसतात. आईवडील गृहस्थ जीवन जगणाऱे असल्यामुळे मुलांना गृहस्थ जीवनाचाच वारसा मिळत असतो. आणि अशा प्रकारे सर्वांचे शरीर स्वार्थाने भरलेलेच निर्माण होत असते. तू स्वतःला नालायक पुत्र का समजतोस? तू नालायक असशील तर मी नालायक ठरेन हे तर तुला कळू शकते ना? मला नालायक ठरायचे नाही, यामुळे तू नालायक कसा ठरू शकतो? तुला जरी पैसा कमावण्याची इच्छा असली तरी तू सत्य सोडत नाहीस. तुला लग्न करायची इच्छा असली तरी तू विवेकाचा वापर करतोस. यामुळे मी तुला पात्र पुत्र समजतो.

"तू माझी क्षमा मागू नकोस. तू मला असमाधान दिलेले नाहीस. तू तुझे तेथील प्रयोग पूर्ण करूनच माझ्याकडे यावे अशी माझी इच्छा आहे. तुझ्या लग्नात मी भाग घेईन. तुला शिकायचे असेल तर मी मदत करीन. तू जर तुझे शरीर लोखंडासारखे केले तर इतर गोष्टी मी पाहून घेईन. सध्या तर आपण सर्व विखुरलेलो आहो. तू तिथे, मणिलाल फिनिक्समध्ये, देवा बडहरमध्ये, हरिलाल कलकत्तत्यात आणि मी भटकण्यात. अशा वियोगात देशसेवा सुरू आहे. यातच आत्म्याची उन्नती आहे. ते काहीही जरी असले तरी हा त्रास प्रसन्नचित्ताने भोगायलाच पाहिजे.

बापूचे आशीर्वाद"

आज सकाळी प्रार्थनेच्या वेळी खेडा सत्याग्रह आणि मजुरांच्या संप यामुळे सध्या उत्पन्न झालेल्या परिस्थितीसंबंधी म्हणाले, "मी सांगत आलो आहे की सत्याग्रह केवळ सरकारविद्धच केला जात नसतो. सत्याग्रह कोणत्याही परिस्थितीत आणि गोष्टीच्या विरोधात करता येऊ शकत असतो. आज आपण याचे उदाहरण पाहू शकतो. आपण आज याचे उदाहरण पाहतो आहो. अहमदाबादमध्ये श्रीमंतांविरुद्ध सत्याग्रह सुरू आहे. अंत्यजांच्या प्रश्नासंबंधात शास्त्रांच्या विरोधात सत्याग्रह सुरू आहे. मला असे वाटते की या सर्व बाबतीत आपला विजयच आहे. सत्य आपल्याबरोबर आहे. खेड्यात सरकार उद्धटपणाचे वर्तन करत आहे. आणि त्याच्या विरोधात सत्याग्रह केल्याशिवाय चालू शकत नव्हते. अशा परिस्थितीत जर विजय मिळणार नसेल तर तसे आपल्याच अर्धवट प्रयत्नामुळे होईल. सत्याग्रहात अर्धवटपणाला स्थान नसते. बिहारमध्ये सत्याग्रहाला विजय मिळाला कारण तिथे काम करणारे मला अतिशय पवित्र सत्याग्रही मिळाले होते. इथे मला इतकी पवित्रता दिसत नाही. असे जरी असले तरी मी कल्पना करत होतो त्यापेक्षा मला अधिक मिळते आहे. अहमदाबादमध्ये निर्माण झालेली परिस्थितीसुद्धा उत्तम आहे. काल जिल्हाधिकारी मला जी गोष्ट म्हणाले होते ती गोष्ट तुम्हांला सांगायची माझी इच्छा आहे. ही गोष्ट मी दुसऱ्या कोणालाही सांगितलेली नाही. आश्रमात ही गोष्ट सांगणे मला योग्य वाटते. जिल्हाधिकारी म्हणाले म्हणून मी तुम्हांला हे सांगून राहिलेलो नसून त्यांनी फार चांगले उद्गार काढले म्हणून मी तुम्हांला हे सांगतो आहे. ते म्हणाले की गिरणीमालक आणि गिरणीमजूर यांच्यात इतक्या स्नेहभावाने चाललेला लढा मी माझ्या जीवनात पहिल्यांदाच पाहतो आहे. मलासुद्धा असे वाटते कारण दोन्ही पक्षांमध्ये इतके चांगले संबंध मी यापूर्वी कधी पाहिले नाही. तुम्ही पाहत आहा की अंबालालभाई विरोधी पक्षाचे आहेत. परंतु काल ते जेवायला आले होते. आणि मी त्यांना परत सांगितले की उद्यासुद्धा तुम्हाला इथेच जेवायचे आहे, आणि यामुळे परिस्थिती त्यांच्या लक्षात आली. मी जेवायला का सांगतो आहे हे त्यांच्या लक्षात आले. आणि ते लगेच कबूल झाले. याहून अधिक सुदर काय असू शकते? मला वाटते की प्रसंगानुरूप दृढता, पावित्र्य आणि ऐक्य जर आपल्यामध्ये असेल तर आपल्याला माघार घेण्याची आवश्यकता नसते. हे जे आंदोलन सुरू आहे त्यासंबंधी मी तुम्हांला काही सांगत नाही यातच तुमचा संयम सामावलेला आहे. परंतु आवश्यकता पडेल तेव्हा तुम्ही लोकांनी याकरिता काम करायला तयार राहायला पाहिजे. याकरिता आपल्याला निर्धार आणि संयम शिकावा लागेल."

आज तीनचार दिवसांपासून रात्री बारा-साडेबारा वाजता झोपणे आणि सकाळी तीनचार वाजता उठणे सुरू आहे. दिवसा थोडेसेसुद्धा अंग टाकायला मिळत नाही. आज थोडे लवकर म्हणजे अगदी सकाळीसच उठून काही सुंदर पत्रे लिहून टाकली. त्यांतील एक वर दिले आहे. दुसरे खाली आहे. त्यात गिरणी मजुरांचा संप आणि खेडाची समस्या सोडून अलीभाईंचा प्रश्न हाती घेण्याकरिता तिथे येऊ शकत नाही असे दुःख व्यक्त करत लिहिले. पत्र न्यू एराचे संपादक जनाब शोएब कुरेशींना लिहिले आहे.

# (शोएब कुरेशी यांना पत्र)

"प्रिय मित्र,

"मला लाज वाटते. तिथे पोहोचण्याकरिता मी खूपच इच्छुक होतो. परंतु घटनाचक्राने असे काही वळण घेतले आहे की त्यासमोर माझे काही चालले नाही. अजूनही संप सुरूच आहे आणि परिस्थिती अशी काही नाजूक आहे की हे सोडून मी इतर कुठेही जाण्याची हिंमत करू शकत नाही. खेडाच्या प्रकरणीसुद्धा लाखो लोकांच्या हक्काचा प्रश्न गुंतलेला आहे. यामुळे त्याकडेही मला पूर्ण लक्ष देणे भाग आहे. मला माहीत आहे की अलीभाईंच्या संबंधातही ढील करणे भयंकर गोष्ट होईल. परंतु येथील कामातून सुटका होईपर्यंत तर मला इथेच राहावे लागेल. मला माहीत आहे की इथल्याच कामात मी रखडत राहावे अशी तुमची इच्छा नाही. माझ्याकडून मौलानासाहेबांची माफी मागू शकाल काय? तिथे जे काही सुरू आहे त्याची मला माहिती देत राहा."

२८-२-‘१८

# (प्रेंट यांना पत्र)

प्रिय बंधू,

काल तुम्ही स्पष्टपणे बोलल्यामुळे हे पत्र लिहिण्याकरिता मला उत्तेजन मिळाले आहे.

संपूर्ण हिंदुस्थानात परिस्थिती पुढीलप्रमाणे आहे. जुन्या युगाच्या ठिकाणी नवीन युग येते आहे. या नवयुगाची स्थापना शांततापूर्ण पद्धतीने होईल की आधीप्रमाणे दुःखाने भरलेल्या झंझावाताच्या मार्गाने होईल? या दोनमधून काय होईल हे सम्राटांच्या उच्चतम अधिकाऱ्यापेक्षा तुमच्यासारखा नागरी अधिकाऱ्यांवर अधिक अवलंबून आहे. तुमची इच्छा भले करायची आहे, परंतु तसे तुम्ही प्रेमसंबंधामुळे नाही तर अधिकाराच्या दडपणाधारे करू इच्छिता. लोक तर असेच समजतात की नागरी सेवा अधिकाऱ्यांची शक्ती हीच ब्रिटिश संविधानाची शक्ती आहे. या घटनेचा अर्थ तुम्ही लोकांना चांगल्या प्रकारे समजावून सांगू शकला नाही. यात तुमचा काहीही दोष नाही. परंतु परिणाम असा होतो की तुमच्या शिक्षा करण्याच्या शक्तीची लोकांना भीती वाटते आणि जनतेचे हित करण्याची तुमची इच्छा लोकांना दिसू शकत नाही. यामुळेच ज्यांना ‘होमरूल’वाले म्हणतात ते तुमची सत्ता घालवण्याकरिता अधीर झालेले आहेत. त्यांच्या शक्तीत तीव्र गतीने वाढ होते आहे. नागरी सेवेच्या लोकांच्या कारभारामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी दाखवणे त्यांना कठीण जात नाही. आपले मुक्तिदाता म्हणून लोक त्यांचे स्वागत करत आहेत. मातृभूमीचे प्रेम आणि अंमलदारांबद्दलचा अविश्वास याशिवाय त्यांच्यासमोर दुसरे काहीही नाही. परिणामी ते असंतोष पसरवत आहेत. ज्या व्यवस्थेचे तुम्ही प्रतिनिधी आहा त्या व्यवस्थेशी ते चांगलेच परिचित आहेत, आणि स्वाभाविकपणेच या अपमानामुळे त्यांचा संताप होतो. अशा प्रकारे या दोघांमधील अंतर वाढत चालले आहे. मी हे सांगण्याचे धार्ष्ट्य करीन की हे वाढते अंतर मी नाहीसे करू शकतो आणि नवयुगात प्रवेश करण्याआधीच हे दुःखद वादळ शमवू शकतो. या नवयुगात परस्परांबद्दलचा अविश्वास आणि जोरजबरदस्तीच्या प्रशासनाच्या ठिकाणी परस्परांवरील विश्वासाच्या आणि प्रेमाच्या शासनाची सुरुवात व्हावी अशी माझी इच्छा आहे. ही गोष्ट मी लोकांना तेव्हाच सांगू शकतो जेव्हा मी लोकांना अन्याय दूर करण्याचा अधिक चांगला आणि परिणामकारक उपाय सांगू शकेन. भीतीमुळे अन्यायी शासनाला शरण जाणे आणि मनात द्वेषभावना साठू देणे हे वाईट

आहे हे स्पष्ट आहे. आणि यामुळे आपण चुकीच्या मार्गाचे अनुसरण करतो आणि हिंसेचा आश्रय घेतो हे तर त्याहूनही जास्त वाईट आहे. आपला असंतोष दाखवण्याचा गौरवपूर्ण, खरा, कायदेशीर आणि शासकांचीही उन्नती करणारा मार्ग हाच आहे की तुमचे जे हुकूम त्यांना अन्याय्य वाटतात त्यांचा त्यांनी सविनय भंग करावा आणि असा भंग केल्यामुळे जी काही शिक्षा होईल ती त्यांनी विनयाने आणि समजूनउमजून सहन करावी. कोणत्याही प्रकारच्या अन्यायाला विरोध करण्याकरिता माझा हा सल्ला निःसंशयपणे देता येऊ शकतो. यात अट इतकीच आहे की अन्याय दूर करण्याच्या इतर सगळ्या उपायांचा त्याआधी प्रयोग करून पाहिलेला असला पाहिजे. मी हा जो दृष्टिकोन मांडला आहे तो तुम्ही समजून घेऊ शकाल अशी आशा आहे. हे पत्र लिहिण्याचे मी जे धार्ष्ट्य केले आहे त्याबद्दल तुम्ही मला क्षमा कराल हे मला माहीत आहे. अर्थात खेडाच्या जनतेला बाजूला ठेवून मी हे लिहितो आहे. शक्य आहे की ज्याबद्दल कोणताही वाद नाही असे अनेक काम तुमच्याबरोबर करण्याची मला संधी मिळेल. यामुळे माझे सगळे विचार तुम्हाला कळणे अधिक चांगले राहील असे मला वाटते. (खेडा सत्याग्रहाच्या वेळी श्री प्रेंट उत्तर विभागाचे आयुक्त होते आणि सत्याग्रह आंदोलन दाबून टाकण्याकरिता त्यांनी खूप मेहनत घेतली होती. त्यानंतर लांब रजा घेऊन ते इंग्लंडला गेले होते. तिथून त्यांनी लिहिलेले पुढील पत्र सत्याग्रहाचा सरकारी अंमलदारांवर काय परिणाम झाला हे सुचित होते.

१८-२-१९२०

"भाई श्री गांधी,

"हिंदुस्थानातील माझ्या अनुपस्थितीच्या दरम्यान इंग्लंडमधील तसेच हिंदुस्थानातील वर्तमानपत्रांमधून हिंदुस्थानात घडत असलेल्या घटनांची मला चांगली माहिती आहे. एका आठवड्यापूर्वीचे अमृतसर येथील काँग्रेसमध्ये झालेले तुमचे भाषण मी वाचले. या काँग्रेसमध्ये तुम्ही आणि जिना संशय आणि निराशेऐवजी विश्वास आणि सहकार्याच्या आधारावर लढा चालवत आहा. मला असे वाटले की तुम्ही लिहिलेल्या पद्धतीबद्दल तुम्हाला लिहावे आणि तुमचे अभिनंदन करावे. हे मी एक खाजगी व्यक्ती म्हणून लिहितो आहे. भूतकाळात आपले संबंध फारसे चांगले नव्हते. माझ्याबद्दल सांगायचे तर मला असे वाटते की तुमच्यासमोर मी फार कठोर विचार व्यक्त केले होते. त्यांचा मी कोणताही बचाव करू शकत नाही. परंतु भूतकाळापेक्षा भविष्यकाळ जास्त महत्वाचा आहे. आणि तुमच्या अद्भुत भाषणाद्वारे तुम्ही मैत्री आणि सहकार्याचा हात पुढे केला आहे. आणि याच भावनेने मी तुमचा हात धरू इच्छितो. मी आशा करतो की मी बहुतेक मार्चच्या अखेरीस अहमदाबादला येऊन पोहोचेन. तुमची परत भेट घेऊन आनंद मिळवण्याकरिता मी उत्सुक आहे.)

सेवक,

मो. क. गांधी

१-३-‘१८

# अंबालाल साराभाई यांना पत्र

सुज्ञ भाईश्री,

आज सकाळी उठल्याबरोबर मी विचारात पडलो की आपण काय करतो आहो? माझ्या कामाचा काय परिणाम होईल? तुमच्या कामाचा काय परिणाम होईल? मी असे समजतो की मी माझ्या कामात यशस्वी झालो तर तुम्ही मजुरांच्या मागणीचा स्वीकार कराल. आणि तुम्ही जर शेवटपर्यंत ताणाल तर मजूर वेगळा कामधंदा करू लागतील. मजूर जर आपला निर्धार सोडतील आणि तुम्ही सांगितलेला पगार मान्य करतील तर माझे काम निष्फळ झाले असे म्हणावे लागेल. परंतु वरील परिणामांमुळे जनतेची हानी होनी होणार नाही.

परंतु तुमच्या कामाचा काय परिणाम होईल? तुम्ही जर यशस्वी झाला तर दबलेले मजूर अधिक दबतील, त्यांच्यातील पौरुष अजूनच कमी होईल आणि पैसा कशालाही वश करू शकतो हा विचार दृढ होईल. तुमच्या कामापेक्षा मजुरांना जर जास्त मिळाले तर तुम्ही स्वतःला अयशस्वी समजाल आणि इतरही तुम्हाला अयशस्वी समजतील. तुम्ही पहिल्या प्रकारचे यश इच्छिता काय? पैशाचा अहंकार वाढावा असे इच्छिता काय? मजुरांचे पूर्णपणे निर्माल्य व्हावे अशी तुमची इच्छा आहे काय? तुम्ही मजुरांचा इतका द्वेष करता काय की त्यांना त्यांचा हक्क मिळाला वा त्याहूनही त्यांना दोन कवड्या जास्त मिळाल्या तर तशा परिस्थितीला तुम्ही तुमचे यश समजणार नाही? तुम्हाला हे दिसत नाही काय की तुमच्या अपयशातच तुमचे यश सामावलेले आहे? तुमचे यशच तुमच्याकरिता भयंकर आहे. रावण यशस्वी झाला असता तर? तुमच्या यशामुळे संपूर्ण जगाला धक्का बसेल हे तुम्हाला दिसत नाही काय? परंतु ही प्रवृत्ती दुराग्रह आहे. माझ्या कामाला जर यश मिळाले तर ते सर्वांना आपले यश वाटेल. आणि माझ्या अपयशाने कोणालाही धक्का लागणार नाही. त्यातून इतकेच सिद्ध होईल की मजुरांची अजून पुढे जायची तयारी नव्हती. या कामात सत्याग्रह आहे. तुम्ही खोलवर विचार करा. तुमच्या अंतःकरणातील सूक्ष्म ध्वनी ऐका. आणि तो ध्वनीच यशस्वी व्हावा हीच माझी मागणी आहे. तुम्ही इथेच जेवाल?

३-३-'१८

संप सुरू असतानाच्या दरम्यानच मजुरांच्या सभेतून घरी परतत असताना मुसलमानांची शक्ती आणि उन्मादाची गोष्ट निघाली असताना बापूंनी पुढील उद्गार काढले -

दोन गोष्टींसंबंधात मला माझ्या मनावर फार बळजबरी करावी लागत असते. इस्ट इंडिया कंपनीचा अहवाल वाचल्यानंतर ब्रिटिशांच्या राज्याबद्दल मला जी निष्ठा वाटत असते ती मी माझ्या मनावर बलात्कार करून ठेवत असतो. वरवर विचार केला तर असेच वाटत असते की इंग्रजाना हिंदुस्थानातून काढून टाकले पाहिजे. परंतु खोलवर विचार केला तर त्यांच्याबरोबर संबंध असण्यात हिंदुस्थानचे हितच आहे अशी भावनासुद्धा मनात निर्माण होत असते. यामुळे मी बळजबरीने त्यांच्यावर प्रेम करत असतो. अशीच गोष्ट मुसमानांसंबंधात आहे. हिंदू आणि मुसलमानांना आपण दोन भाऊ म्हणतो, परंतु आज ते आपले भाऊ आहेत असे माझ्या मनात येऊ शकत नाही. मी हिंदुस्थानातील पुढाऱ्यांशीसुद्धा बोललो आहे. आणि अनेकांना तर हिंदू-मुसलमान ऐक्य मान्यच नाही. ते हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याबद्दल बोलत असतात, परंतु अंतःकरणापासून ते ही गोष्ट मान्य करत नाहीत. यामुळे खोलवर विचार केला असता मलासुद्धा एक ना एक दिवस हिंदू-मुसलमान एक होतील असेच वाटत असते. ते एक झाल्याशिवाय त्यांची सुटकाच नाही. भूतकाळ पाहिला तर ते एक होणार नाहीत असेच वाटत असते. परंतु मागील आपल्याला विसरावेच लागेल. जगात असे होत आले आहे. हे बळजबरीने प्रेम करण्याचे उदाहरण आहे. हिंदू धर्म इतका विशाल आहे की त्यात हे साध्य होऊ शकते असे मी समजतो. या दोन धर्मातील भेद पुसले जातील असे काही नाही. परंतु हिंदू धर्म आपल्या दयाभावनेच्या बळावर त्यांना आपलेसे करू शकेल. हिंदू धर्माच्या मुळात ही गोष्ट राहिलेली आहे. परंतु हिंदू जेव्हा इतक्या उच्च पातळीवर चढतील तेव्हाच ही गोष्ट शक्य होईल. आपल्यामध्ये जर शुद्ध दया असेल तरच आपण मुसलमानांना आपलेसे करू शकू. परंतु हिंदू इतक्या उच्च दर्जावर केव्हा पोहोचतील हे सांगणे कठीण आहे.

स्त्रियांना इंग्रजी शिकवण्यासंबंधी गोष्ट रस्त्यात निघाली असता -

तुम्ही स्त्रियांवर जुलूम करत आहे असे पत्र मला अनेकदा प्रा. कर्वेंना लिहावेसे वाटत असते. स्त्रियांकरिता इंग्रजी ऐच्छिक असेल तर गोष्ट वेगळी. परंतु महिला विद्यालयात तर ती आवश्यक भाषा झाली आहे. मला तर स्त्रियांना इंग्रजी शिकवणेसुद्धा आवश्यक वाटत नाही. इंग्रजी शिकण्यात शब्द

घोकण्यातच इतका वेळ जात असतो आणि मेहनत करावी लागत असते की त्यामुळे माणूस इतर अनेक कामांकरिता नालायक ठरतो. आणि स्त्रियांची शक्ती इंग्रजी शिक्षणातच खर्च होत असेल तर त्यामुळे देशाचे फार मोठे नुकसान होईल. पुरुषांनीसुद्धा इंग्रजी शिकण्याची काहीही आवश्यकता नाही. परंतु शासकवर्ग, विदेशात जाणारे वकील आणि साहित्यसेवकांनी इंग्रजी शिकावी. इतर लोकांनी इंग्रजी शिकण्याची आवश्यकता नाही. मी याचा असा अर्थ करत नाही की इंग्रजीत जे चांगले असेल त्याच्याशी आपण अनभिज्ञ असलो पाहिजे. ज्यांनी इंग्रजीचा सखोल अभ्यास केला असेल त्यांनी ते वाचून आपल्या भाषेत उतरवावे आणि जनतेसमोर मांडावे. ही गोष्ट अर्थशास्त्राच्या दृष्टीनेसुद्धा लाभदायी आहे.

# (एका पत्रातील काही भाग)

"भाईश्री,

". . . जगण्याकरिता आपण इतके काही आतुरलेलो असतो की मृत्यूच्या वेळी आणि त्यातही प्रियजनांच्या मृत्यूच्या वेळी भीतीचे वातावरण उत्पन्न करतो. मला तर अनेकदा असे वाटत असते की असे प्रसंग आपल्या खऱ्या परीक्षेचे प्रसंग असतात. ज्याला आत्म्याचे किंचितही भान असते त्याला मृत्यूचे स्वरूप कळत असते. असे लोक मृत्यूचा शोक का करतील? हा विचार नवीन नाही. परंतु संकटसमयी कोणी याची आठवण करून दिली तर त्यामुळे दुःखी माणसाचे सांत्वन होईल. तुम्हाला असे सांत्वन मिळावे म्हणून हे पत्र लिहिले आहे."

“मणिलालला पत्र लिहीत असताना -

## मणिलाल गांधींना पत्र

“विचार न करता लोक माझी पूजा करतात ही गोष्ट फार कंटाळवाणी असते. मी जसा आहे तसाच लोकांना कळलो पाहिजे आणि त्याप्रमाणे लोक मला मान देतील तर त्याचा उपयोग मी जनसेवेकरिता करू शकेन. माझ्या धार्मिक मान्यता दाबून मला कोणताही सन्मान नको आहे. सदाचार केल्यामुळे कोणी जर माझा तिरस्कार करत असेल तर त्याचेही मी स्वागत करीन. . . .

“आपल्याला हजारो गोष्टींची इच्छा असते. सर्व मिळवू शकत नाही. हे लक्षात ठेवून आपण आपले मन पूर्ण शांत ठेवले पाहिजे.”

# (श्रीमती मिली ग्रॅहम पोलक यांना पत्र)

६-३-‘१८

“प्रिय मिली,

“सध्या इथे खेडात मी एका सत्याग्रहाचे आणि अहमदाबादमध्ये एक संपाचे संचालन करतो आहे. अशा प्रकारे माझा सत्याग्रह जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मनमोकळेपणाने खेळू लागला आहे. या लढ्यांमुळे मी अमदाबादमध्येच अडकून पडलो आहे. यासंबंधातील काही पत्रे मी सरळ हेन्‍रीला लिहिली आहेत. त्याचे काम मी न्याहाळतो आहे. प्रगतीच्या दिशेने हेन्‍री किती जरी पुढे गेला तरी मला आश्चर्य वाटणार नाही. तो जर काही कमी करील तर मला निश्चितच दुःख होईल. सर वेडरबर्नची उणीव तर जाणवेलच, परंतु ते वेळेआधीच जग सोडून गेले. तू अंबालालभाईंना पत्र लिहीत असतेस. तेच संपाचे प्रमुख विरोधक आहेत.”

देवधरांच्या पुढील पत्राचे उत्तर दिले - त्यांनी गांधीजींनी लिहिलेली कोणतीही गोष्ट कबूल केली नाही. आजाराबद्दल तक्रार केली. त्यांना उत्तर लिहिले -

## (जी. के. देवधर यांना पत्र)

“तुम्ही अवश्य इथे या. आपण चर्चा करू. दरम्यान आपल्यात मतभेद आहेत हे आपण समजून घेऊ. पाहू या. प्रेंट आणि घोशाल या दोघांशीही माझा निकटचा परिचय झाला आहे. मला असे वाटते की मी दोघांनाही ओळखतो.

“मला वाटते की तुमच्या अर्धवट मेहनतीवरच मला समाधान मानावे लागेल. जो माणूस आपल्या जीवनात अर्धा वेळ आजारी असतो त्याचा अर्धाच उपयोग होत असतो. खरे की नाही? आरोग्य मिळवण्यासाठी एक गोष्ट करणे आवश्यक आहे, पण तुम्ही ती करता कुठे?

७-३-‘१८

# (प्राणजीवन मेहता यांना पत्र)

“भाई प्राणजीवन,

“खेडा जिल्ह्याचा परिणाम काहीही जरी आला तरी अंमलदार वर्गाला आणि रयतेला चांगले शिक्षण मिळते आहे. लोकांमध्ये असीम जागृती आली आहे. कर न देण्याची गोष्ट आधी राजद्रोहाचे द्योतक समजली जात असे. आता ती गोष्ट लोक बेधडकपणे करू लागले आहेत. शिक्षकवर्गातील जे लोक स्वयंसेवक झाले आहेत त्यांचाही अलभ्य लाभ झाला आहे. ज्या लोकांनी कधीही गाव पाहिले नव्हते त्यांना जवळपास सहाशे गाव पाहण्याची संधी मिळाली आहे. अजून खेडा जिल्हा पूर्ण झालेला नाही. असाच प्रकार मजूर आणि मालकांमध्ये सुरू आहे. हिंदुस्थानातील जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रवेश होतो आहे. दहा हजार मजूर शांतपणे राहत आहेत आणि त्यांना एक रुपयासुद्धा खर्च करावा लागून राहिलेला नाही. ही काही अशीतशी गोष्ट नाही. असे जरी असले तरी हे खरे आहे. लोकांना कळले आहे की आत्मबळासारखे दुसरे कोणतेही बळ नाही. माझ्या आधाराने नाही तर त्यांच्याच्या आधाराने त्यांचा विजय होईल, समजूनउमजून दुःख भोगल्याशिवाय विजय मिळू शकत नाही. हे दोन वाक्य दोन्ही ठिकाणी विजयाचा आधार असतील.”

*　　*　　*

डॉ. महेतांचा विचार जहाज उद्योगात शिरायचा होता. आणि स्वदेशीचा व्यापार जहाजाने करायचा की नाही असा प्रश्न विचारण्यात आला होता. या संबंधात -

## (डॉ. प्राणजीवन महेता यांना पत्र)

तुम्ही या व्यवसायाला अधिक वेळ दिला पाहिजे की नाही हे तुमच्या हेतूवर अवलंबून आहे. जीवनाचा विमा नाही. चांगले काम करता यावे म्हणून भरपूर पैसा कमावण्याची इच्छा आहे, परंतु कमावत असतानाच जर मृत्यू आला तर पश्चात्ताप राहून जाईल. परंतु पैसा वाढवायचा हेच जर ध्येय असेल म्हणजे पैसा वाढवण्यातच चांगुलपाणा आहे अशी कल्पना केली असेल अथवा व्यापाराचा अधिक प्रसार करण्याकरिताच जर व्यापार वाढवणे हे कर्तव्य समजत असाल तर मग व्यापार वाढवणे हाच एकमेव मार्ग आहे.

# (मनसुखलाल मेहतांना पत्र)

७-३-‘१८

“भाई मनसुखलाल,

“तुमच्या टीकेने मला वाईट वाटले नाही. काठेवाडचा प्रश्न मला गौण वाटत नाही. तो इतका मोठा प्रश्न आहे की मला तर तो माझ्या शक्तीपलीकडचा आहे असे वाटते. मी विचार केला नाही असेही नाही. मी विचारपूर्वक हा प्रश्न बाजूला केला आहे. यात माझी दुर्बलता असण्याची शक्यता आहे. तसे असेल तर मला शक्तीसंपन्न केले पाहिजे. परंतु तुम्ही जरी मला शक्ती दिली तरी ती माझ्यात येईलच असे नाही. आतून जी आग पाहिजे तीच नाही.”

१०-३-‘१८

आज बापूंनी प्रसन्न चित्ताने कौटुंबिक गोष्टीत वेळ घालवला -

हरिलालला लिहिलेल्या पत्राने हरिलालला दुःख झाले असेल हे खरे आहे. परंतु मी त्याला दुसरे काहीही देऊ शकत नाही. जगात आईवडिलांच्या प्रेमाची मला जितकी कल्पना असेल तितकी कदाचितच कोणाला असेल. याबाबतीत माझा दावा फार मोठा आहे. जगात माझ्यापेक्षा आईवर वा बापावर जास्त प्रेम करणारा अजून कोणी तरी आहे असे जर कोणी सांगत असेल तर त्याला माझ्याजवळ आणा, मीसुद्धा पाहीन. माझ्या आईवडिलांचा मी आवडता होतो. माझे वडील लहानात लहान कामसुद्धा नोकरचाकरांना नाही तर मला करायला लावत असत. पाणी पाहिजे असो की पाय चेपायचे असो - कोणतेही जरी काम असले तरी ते मला बोलावत असत. माझ्यावरील त्यांचे प्रेम काही अलौकिक होते. असे वडील होणार नाहीत. मी ज्या दिवशी नाटक पाहिले त्या दिवशी माझे वडील डोके घेऊन रडले होते. नेहमीप्रमाणे मी त्यांचे पाय चेपत होतो. पाय चेपता चेपता विचार करत होतो की आज सुटी मिळाली तर चांगले होईल, नाटक पाहीन. सांगू लागलो, “बापू . . . ” परंतु बापू ऐकतील तर ना? त्यांच्या लक्षात आले की आज मुलाचे मन कुठे तरी भटकते आहे. मी परत म्हणालो, “आज चांगले नाटक आहे”. तरीही उत्तर मिळाले नाही. परंतु मला तर त्या दिवशी इतका काही मोह झाला होता की मी काही सावध झालो नाही. मी तिसऱ्यांदा म्हणालो, “बापू फार चांगले नाटक आहे, पाहायला जाऊ?” “ज . . . जा.” हे शब्द त्यांच्या तोंडातून निघाले, परंतु मला त्यांचा अर्थ कळला नाही. त्यांचा अर्थ होता “नको जाऊ.” यामुळे मी गेलो. नाटकाचा पहिलाच पडदा उघडलेला होता. आणि मी तर नाटकाचा रस घेण्याकरिता खूप उत्सुक झालेलो होतो. तेवढ्यात घरून कोणी तरी आला आणि सांगितले की ‘बापू तर घरी रडून डोके घेत आहेत.’ मी तसाच निघालो. घरी जाऊन बापूंची माफी मागितली. ते काहीही म्हणाले नाही. एकही कटू शब्द उच्चारला नाही. ते स्वतःच रडून आणि डोके फोडून असमाधान दाखवत होते. त्यानंतर त्यांच्या जिवंतपणी तरी मी कोणतेही नाटक पाहिले नाही.

“‘फार कडक होते’. ‘असे तर व्हायलाच पाहिजे’, ‘हे असे का?’ ‘तो असा का वागला?’” प्रत्येक बाबतीत ते ठरवतील तसेच व्हायला पाहिजे. कितीही गुप्त गोष्टी होत असल्या, मोठ्यात मोठा मुत्सद्दी आला तरी मला तर ते जवळ बसवूनच ठेवत असत. सर्व काम मी जवळ असतानाच होत असे. मी त्यांच्याकरिता अफूचे पेयसुद्धा तयार करत असे. कोणत्या तरी वैद्याने त्यांना सांगितले होते की तुम्ही

जर अल्प प्रमाणात दररोज अफू घ्याल तर तुमची शक्ती कायम राहील. राजकोटचे ठाकोरसाहेबसुद्धा अनेकदा घरी यायचे. एकदा असे झाले की राजकोटचे ठाकोर साहेब लग्न करून दोन राण्या आणणार होते. एक कानपूरची आणि एक धरमपूरची. धरमपूरचे दरबार चांगले होते. यामुळे ते वराला आणि वराबरोबर आलेल्यांना चांगले वस्त्रालंकार इत्यादी भेट देऊ शकत होते. कानपूरला इतके सगळे मिळण्याची शक्यता नव्हती. बापू म्हणाले मी आणि माझा भाऊ कानपूरला जाऊ. घरात याबद्दल खूप चर्चा सुरू झाली. माझी आई म्हणाली, “माझा मुलगा काय कानपूरला जाईल?” ज्या दिवशी वधूला आणायला जायचे होते त्या दिवशी ठाकोरसाहेबांकडे आपल्याला जायचे आहे असे आमच्या आईने सांगितले. आम्ही सकाळीसच ठाकोरसाहेबांकडे पोहोचलो. बापू तिथे बसलेलेच होते. आमच्याकडे त्यांनी लालभडक डोळ्यांनी पाहिले. आम्ही रडू लागलो. ठाकोरसाहेबांनी विचारले, “काय गांधी, मुलांना का घाबरवतोस? यांची काय मागणी आहे?” आम्ही म्हणालो, “आम्ही दिवाणसाहेबांची मुले असल्यामुळे आम्ही कानपूरला जाणार नाही.” ठाकोर म्हणाले, “अजून तर लोक पादरेला पोहोचलेच नसतील. जा, पोरांनो, तुम्ही तर धरमपूरलाच जायला पाहिजे.” परंतु बापू कशाचे ऐकतात? ते म्हणाले, “नाही, आपल्याला तर कानपूरच शोभते.” त्यांचे मत होते की या वयात मुलांनी अशा श्रीमंती वातावरणात राहणे काय कामाचे? अखेरीस बापूंच्या हुकमाप्रमाणे झाले आणि आम्ही कानपूरला गेलो.

“सहाव्या आणि सातव्या वर्गात मला शिष्यवृत्ती मिळत होती. पहिल्या वर्गात पाच रुपये आणि दुसऱ्या वर्गात दहा रुपये. परंतु मी एक पैसाही जवळ ठेवला नव्हता.”

मी लल्लुभाईंच्या मुलांबद्दल विचारले. बापू म्हणाले, “काठियावाडमध्ये ही चांगली पद्धत आहे. या सगळ्या प्रथा देवदासला नीट कळल्या आहेत असे वाटते. आणि तो त्यांचे बरोबर पालनही करतो आहे असे दिसते.”

१२-३-१९१८

श्रीमती बेझंट अहमदाबादला आल्या. रात्री अंबालालकडे त्यांना जेवण होते. जेवणाआधी गप्पाटप्पा सुरू होत्या. तिथे मीसुद्धा होतो. गिरणीमालक आणि मजुरांमधील तक्रारीबद्दल गोष्टी सुरू झाल्या. बापूजी अंबालालकडे पाहत श्रीमती बेझंटना म्हणाले, "अहो, हे लोक तर गिरणीमजुरांना चिरडून टाकायच्या तयारीत आहेत." यामुळे अंबालालने अशाच शब्दांत प्रत्युत्तर दिले, "आणि या लोकांना गिरणीमालकांची तशीच परिस्थिती करून टाकायची इच्छा आहे." मग बेझंट म्हणाल्या, "याबाबतीत सरकारला मी काय सांगावे अशी तुमची इच्छा आहे?"

बापू - नाही, या बाबतीत मला सरकारला मध्ये पाडायची अगदीच इच्छा नाही. आमच्यामध्ये पूर्ण सद्भावना आहे.

यामुळे श्रीमती बेझंट म्हणाल्या, "ही गोष्ट तर अगदीच असामान्य आहे. परंतु श्री गांधी खेडाच्या लोकांचे काय?"

बापू - मला वाटते की याबाबतीतल विशेषण वापरताना मला काटकसर करण्याची आवश्यकता नाही. सरकारने अगदी मूर्खपणाची भूमिका घेतली आहे. त्यांना कळायला पाहिजे होते. परंतु आम्ही इथपर्यंत जायला तयार झालो हे या लोकांना दिसत नाही. या लढ्यासंबंधात वर्तमानपत्रांमध्ये फारसे येऊ नये म्हणून आम्ही विशेष काळजी घेतो आहो. असे नसते तर वर्तमानपत्रांना आम्ही बरेच काही देऊ शकलो असतो. खेडात असाधारण काम सुरू आहे. आम्ही प्रत्येक गावात प्रत्येक घरी पोहोचलो आहो. आणि खेडातील गावकरी खूप शूर आहेत. खेडातील शेती हिंदुस्थानातील सर्वात सुपीक शेतीत येते. तिथे भव्य वृक्ष आहेत. बिहारमध्येही भव्य वृक्ष आहेत परंतु ते आपोआप उगवलेले आहेत. खेडात तर ते लोकांनी लावलेले आहेत. खेडातील शेती कसदार करण्याकरिता तेथील शेतकऱ्यांनी आपली सगळी शक्ती लावली आहे.

आज अंबालालभाईंचे एक वैयक्तिक आणि खाजगी पत्र आले. लांब पत्र होते. वाचून फाडून टाकले. अनसुयाबहेन तिथे होत्या. त्यांनीच उत्तर लिहिले. समोर उभे राहूनच उत्तर वाचले. मग त्याची नक्कल ठेवण्याची मी मागणी केली. म्हणाले, "याची नक्कल करता येणार नाही. अशा गोष्टी प्रसिद्ध होऊ शकत नाहीत. हे रोजनिशीत राहू शकत नाही." मग मी म्हणालो, "मला आठवते तितके तर मी

लिहू शकतो ना?” त्यावर ते म्हणाले, “ठीक आहे” गिरणी मालकांच्या ‘लॉकआऊट’चा हा शेवटचा दिवस होता. विणकर आपल्याला खूप साथ देतील अशी अंबालालना आशा होती. परंतु तसे काही होऊ शकले नाही. एकही विणकर त्यांच्या बाजूने गेला नाही. अंबालालच्या पत्राचा सार असा होता की आमच्या मजुरांना इतर मजूर दाबतात. बळजबरी करतात आणि त्यांना येऊ देत नाहीत. यामुळे तुम्ही या लोकांना सूचित केले पाहिजे. बापूंच्या पत्रातील भावना पुढीलप्रमाणे होती –

## (अंबालाल साराभाई यांना लिहिलेल्या पत्राचा सार)

तुमचे पत्र आले. वाचून मी ते फाडून टाकले. मजुरांवर दडपण आणण्याची मला मुळीच इच्छा नाही. मजुरांवर दडपण आणले जात असल्याबद्दलची तुम्ही जर अजून काही निश्चित माहिती देऊ शकला तर मी निश्चितच काही व्यवस्था करीन. मजूर कामावर जावो वा न जावो, मी त्याबद्दल अगदी बेफिकीर आहे. परंतु गिरणीत जाणाऱ्या कोणालाही अडवण्यात येऊ नये अशा सूचना मी दिल्या आहेत. मजुरांची इच्छा असूनही त्यांनी गिरणीत जाऊ नये असे मी मुळीच इच्छित नाही. कोणा मजुराची जर गिरणीत जाण्याची इच्छा असेल तर मी तर त्याला तिथे स्वतः पोहोचवून द्यायला तयार आहे. मजूर सहभागी होतात की होत नाही याबद्दल मी अगदीच बेफिकीर आहे.

तुम्ही मला विचारता की तुमच्याबरोबर राहण्याचा मी आनंद कसा घेऊ शकतो? तुमच्या मुलांना भेटण्याची मला फार इच्छा आहे. परंतु सध्या ते कसे शक्य आहे? ही तर भविष्यातील गोष्ट आहे.

१७-३-१९१८

सकाळच्या प्रार्थनेनंतर प्रतिज्ञेबद्दल बोलताना -

मी आता जे पाऊल उचलतो आहे ते खूप भयंकर आहे परंतु त्यामागे फार मोठा विचार आहे. हे पाऊल भयंकर याकरिता आहे की हे ऐकून हिंदुस्थानात जितके लोक मला ओळखतात त्यांना यामुळे भयंकर दुःख होईल. ते विलाप करायला सुरुवात करतील. परंतु याचबरोबर या लोकांना एक सुंदर तत्त्व समजावून सांगण्याची मला संधी मिळते आहे, आणि ती मी चुकवू शकत नाही या विचाराने मी हे पाऊल उचलतो आहे. त्यामागील हेतू तुम्हांला समजावून सांगण्याकरिता दोन दिवसांपासून मी फार अधीर झालो आहे. परंतु याकरिता आवश्यक असलेला शांततापूर्ण वेळ मला मिळत नव्हता. सकाळ-संध्याकाळी होणाऱ्या प्रार्थनेच्या वेळी मी आश्रमात हजर राहू शकत नाही ही गोष्ट मला फार बोचते. आणि शिवाय काल संगीतशास्त्री आलेले असल्यामुळे त्यांचा आवाज ऐकण्याचा आनंदसुद्धा मी सोडू शकत नव्हतो. मी अनेक मोहांपासून आता अलिप्त झालो आहे, परंतु अजूनही माझ्यात अनेक मोह शिल्लक राहिलेले आहेत. आजकाल तर संगिताबद्दल जो काही मोह असतो त्याची पूर्ती आश्रमात होत असते. यामुळे काल अनसुयाबहेनने तिथे राहण्याकरिता खूप आग्रह केल्यानंतरही मी इथे आलो. अशा

प्रसंगी येथील संगितानेच मला फार शांती मिळत असते. माझ्या अंतःकरणात जे काही सुरू आहे ते तुमच्यासमोर ओतण्याचा हा चांगला प्रसंग आहे. इतर कोणत्याही वेळी तुम्ही तुमचे कर्तव्य पार पाडत असता. अशा वेळी तुम्हांला इथे बोलावून कर्तव्य करण्यापासून वंचित करणेही योग्य वाटत नाही.

आपल्या हिंदुस्थानातील प्राचीन संस्कृतीत मला एक असे तत्त्व आढळले आहे की जे इथे बसलेल्या थोड्याशाच लोकांना जरी कळले तरी ते संपूर्ण जगाचे साम्राज्य उपभोगू शकतील. परंतु ते समजून सांगण्यापूर्वी मला तुम्हांला एक गोष्ट सांगायची आहे. आज हिंदुस्थानात एकच अशी व्यक्ती आहे की जिच्यामागे लाखो लोक पागल झालेले आहेत, जिच्याकरिता लाखो लोक आपला जीव द्यायला तयार आहेत. ती व्यक्ती आहे टिळक महाराज. मला अनेकदा असे वाटते की टिळक महाराजांजवळ हे फार मोठे भांडवल आहे. त्यांनी 'गीतारहस्य' लिहिले आहे (मंडाले येथील तुरुंगात). परंतु मला असे वाटत असते की हिंदुस्थानच्या प्राचीन भावभावनांना, हिंदुस्थानच्या आत्म्याला त्यांनी ओळखले नाही आणि यामुळे देशाची ही अशी अवस्था राहिली आहे. त्यांच्या मनात खोलवर असे रुजले आहे की आपण युरोपियांसारखे झालो पाहिजे. आज काल युरोपची प्रगती होऊन त्याचे जसे नाव झाले आहे - अर्थात ज्यांच्या मनात युरोपीय विचार शिरले आहेत आणि ज्यांना युरोप जितका प्रगत वाटतो - तशीच हिंदुस्थानची प्रगती करून त्याचे नाव करावे असा त्यांचा आशय आहे. त्यांनी सहा वर्ष कारावास भोगला आहे, परंतु तोही युरोपियांप्रमाणे बहाद्दुरी दाखवण्याकरिता आणि जे लोक आमचा आज छळ करत आहेत त्यांना आम्हीही पाच-पंचवीस वर्ष तुरुंगवास सहन करू शकतो हे दाखवून देण्याकरिता. सैबेरियातील तुरुंगात रशियातील मोठेमोठे लोकसुद्धा आयुष्यभर सडले, परंतु तिथे कोणीही आत्मज्ञानाकरिता तुरुंगात गेला नाही. अशा प्रकारे जीवन कंठून आपण आपले परमोच्च धन वाया घालवतो. टिळक महाराजांनी आध्यात्मिक दृष्टीने हे दुःख जर भोगले असते तर आज परिस्थिती काही वेगळीच असती. तुम्हांला हे समजावून सांगण्याची माझी इच्छा आहे. अनेकदा अतिशय विवेकी भाषेत मला त्यांना जितके सांगणे शक्य झाले तितके मी सांगितले आहे. असे जरी असले तरी मी स्पष्टपणे असे बोललो नव्हतो वा लिहिले नव्हते. मी जे लिहिले तेही अशा प्रकारे की मला जे सांगायचे होते ते गौण राहील. परंतु टिळक महाराजांची निरीक्षणशक्ती इतकी जबरदस्त आहे की मला काय म्हणायचे आहे ते त्यांना कळले. परंतु ही गोष्ट अशी आहे की जी सांगितल्याने वा लिहिल्याने कळू शकत नाही. मी म्हणतो त्याचा अनुभव यावा म्हणून मी त्यांना प्रत्यक्ष उदाहरण दाखवायला पाहिजे. परोक्ष पद्धतीने मी अनेकदा

सांगितले आहे परंतु प्रत्यक्ष उदाहरण दाखवण्याची जर संधी मिळाली तर ती कधीही ती मी सोडायला नको, आणि ही ती संधी आहे.

अशीच दुसरी व्यक्ती मदन मोहन मालवीय आहेत. हिंदुस्थानच्या पुढाऱ्यात ते पवित्राहून पवित्र पुरुष आहेत. राजकारणात असलेल्या आणि आपल्याला माहीत असलेल्या पुरुषांमध्ये ते सर्वाधिक पवित्र पुरुष आहेत. अदृश्य पवित्र पुरुष तर अनेक असतील. परंतु ते इतके पवित्र असूनही आणि शिवाय त्यांना धर्माचे ज्ञान असूनही त्यांना हिंदुस्थानच्या आत्म्याचा बरोबर परिचय नाही असे मला वाटते. हे मी थोडे जास्तच बोललो. हे ऐकून मालवीयजी माझ्यावर चिडतील आणि माझा तिरस्कारही करतील. त्यांना वाटेल की हा फार अहंकारी माणूस आहे. परंतु गोष्ट खरी असल्यामुळे हे सांगताना मी संकोचत नाही. मी त्यांना हे अनेकदा सांगितले आहे. त्यांच्याशी तर माझे फार निकटचे प्रेमसंबंध आहे. त्यांच्याबरोबर मी पुष्कळ भांडलोही आहे. माझ्या या सगळ्या युक्तिवादानंतरही मला ते इतकेच म्हणाले की मी म्हणतो ते सगळे खरे आहे, परंतु मला ते पटत नाही. त्यांनासुद्धा प्रत्यक्ष उदाहरण दाखवण्याची ही संधी मिळाली आहे. हिंदुस्थानचा आत्मा काय आहे हे मी या दोघांनाही दाखवून दिले पाहिजे.

वीस दिवस झाले, मी दहा हजार मजुरांकडून शिकतो आहे. त्यांनी माझ्यासमोर ईश्वराला वा खुदाला साक्षी ठेवून प्रतिज्ञा घेतली. त्या वेळी त्यांनी ती प्रतिज्ञा उत्साहाने घेतली होती. हे लोक काहीही जरी असतील तरी खुदा वा ईश्वर आहेच असे मानणारे आहेत.

त्यांना खात्रीपूर्वक असे वाटते की आपण वीस दिवस प्रतिज्ञेचे पालन केलेले असल्यामुळे खुदा वा ईश्वर आपल्याला मदत केल्याशिवाय राहणार नाही. परंतु खुदाने इतका वेळ मदत केली नाही आणि जेव्हा खुदाने त्यांची खूप कठोर परीक्षा घेतली तेव्हा त्यांची श्रद्धा थोडी दुर्बल झाली. त्यांना असे वाटले की इतके दिवस या माणसाच्या म्हणण्यावर विश्वास ठेवून आपण दुःख सहन केले असूनही आपल्याला काहीही मिळाले नाही. या माणसाचे म्हणणे ऐकले नसते तर आणि दंगे वगैरे केले असते तर यापेक्षाही कमी वेळात पस्तीस टक्केच काय त्याहूनही जास्त मिळू शकले असते. हे त्यांच्या मनाचे पृथक्करण आहे. ही परिस्थिती मी सहन करूच शकत नाही. माझ्यासमोर केलेली प्रतिज्ञा अशा प्रकारे सहजपणे तोडू देणे आणि ईश्वरावरील श्रद्धा कमी होऊ देणे म्हणजे तर धर्माचा लोप होणेच होईल. आणि अशा प्रकारे ज्या कार्यात मी सामील आहे त्यात जर धर्माचा लोप होत असेल तर मी जगूच शकणार नाही. आपण जी प्रतिज्ञा घेतो तिचा काय अर्थ होतो हे मजुरांना समजावून सांगितले पाहिजे. त्याकरिता मी

काय करीन हे मी त्यांना सांगितले पाहिजे. हे जर मी सांगितले नाही तर मी बायल्या (नामर्द) म्हणवला जाईन. जी व्यक्ती मी एक वाम (छातीसह पसरलेल्या दोन हाता एवढे अंतर) उडी मारली असे सांगते आणि एक वीतसुद्धा उडी मारत नाही तिलासुद्धा लोक भेकड म्हणतात. यामुळे दहा हजार माणसांना अधःपातापासून वाचवण्याकरिता मी हे पाऊल उचलतो आहे. यामुळेच मी प्रतिज्ञा केली आहे आणि त्याचा परिणाम विजेप्रमाणे झाला आहे. मी तर अशी कल्पनाही केली नव्हती. तिथे हजारो माणसे होती. त्यांच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. त्यांना आत्मभान झाले. त्यांच्यातील चैतन्याला जाग आली. त्यांनी घेतलेल्या प्रतिज्ञेच्या पालनाकरिता त्यांना शक्ती मिळाली. माझी एकदम खात्री पटली की हिंदुस्थानातील धर्माचा लोप झालेला नाही. माणूस आत्म्याला ओळखू शकतो. ही गोष्ट जर टिळक महाराजांना आणि मालवीयजीना समजावता आली तर हिंदुस्थान फार मोठे काम करू शकतो.

मी सध्या आनंदविभोर झालो आहे. याआधी जेव्हा मी अशी प्रतिज्ञा केली होती तेव्हा मला अशा प्रकारची शांतता जाणवत नव्हती. शरीराच्या गरजाही मला जाणवत होत्या. माझे मन पूर्णपणे शांत आहे. माझे अंतःकरण तुमच्यासमोर ओतावे असे मला वाटते. परंतु आनंदाने मी विव्हलसुद्धा झालेलो आहे.

*　　　*　　　*

आपल्या प्रतिज्ञेविषयी समजावून सांगताना ते पुढे म्हणाले -

माझी प्रतिज्ञा मजुरांची जिद्द वाढचवण्याकरिता आहे. प्रतिज्ञेचे मूल्य काय असते हे लोकांना समजावण्याकरिता आहे. देशात लोक जर हवे तेव्हा प्रतिज्ञा घेत असतील आणि तोडत असतील तर ती गोष्ट दैन्यावस्थेची सूचक असेल. आणि दहा हजार मजुरांनी आपली प्रतिज्ञा तोडली तर देशाच्या अधोगतीचे ते लक्षण आहे असेच म्हणावे लागेल. मग मजुरांचा प्रश्न तर परत उपस्थित करताच येणार नाही. मजुरांनी वीस दिवस दुःख सहन करूनही आणि गांधीसारखा त्यांचा पुढारी असूनसुद्धा त्यांचा विजय जर होऊ शकला नाही तर ते उदाहरण कुठेही दिले जाईल. यामुळे काहीही करून मजुरांनी आपल्या प्रतिज्ञेवर भक्कम राहावे असा विचार मी करत होतो. असे मी स्वतः कष्ट सहन केल्याशिवाय कसे करू शकत होतो? प्रतिज्ञेचे पालन करायला लावण्याकरिता कष्टसुद्धा सहन करावे लागत असतात असे उदाहरण त्यांच्यासमोर ठेवणे आवश्यक होते. आणि मी अशी प्रतिज्ञा घेतली. माझी प्रतिज्ञा दुषित आहे हे मला कळते. या प्रतिज्ञेमुळे गिरणी मालकांना माझी दया येईल आणि ते पस्तीस

टक्के देतील अशीही शक्यता आहे. माझी इच्छा अशी आहे की गिरणीमालकांना न्याय्य वाटत असेल तरच त्यांनी ३५ टक्के द्यावे. दया म्हणून काहीही देऊ नये. असे जरी असले तरी अखेरीस स्वाभाविक परिणाम तोच निघतो आणि ही गोष्ट माझ्याकरिता लाजिरवाणी आहे. परंतु मी दोन गोष्टींचा विचार केला. मजुरांच्या प्रतिज्ञेचा आणि माझ्या लाजेचा. पारडे मजुरांकडे झुकले आणि मी मजुरांकरिता लाजेचे ओझे उचलायचे ठरवले. सार्वजनिक काम करत असताना माणसाने असा कमीपणा घ्यायलासुद्धा तयार असायला पाहिजे. यामुळे माझी प्रतिज्ञा गिरणीमालकांना धमकी दिल्यासारखी मुळीच नाही. आणि गिरणीमालकांनी ही गोष्ट स्पष्टपणे समजून घ्यावी आणि न्याय्य वाटेल तरच ३५ टक्के द्यावे अशी माझी इच्छा आहे. मजुरांनासुद्धा माझी विनंती आहे की त्यांनी असे गिरणीमालकांना जाऊन सांगावे.

१८-३-१९१८

प्रार्थनेच्या वेळी पुढीलप्रमाणे म्हणाले -

आज दहा वाजताच्या आधी बहुधा तडजोड होईल. या तडजोडीकडे मी दोषविरहित स्थितीतून पाहतो आहे. मी कधीही स्वीकारली नसती अशी ही तडजोड आहे. परंतु हा माझ्या प्रतिज्ञेचा दोष आहे. माझ्या प्रतिज्ञेत अनेक दोष होते. गुण कमी आणि दोष जास्त अशी ही गोष्ट नाही. परंतु ज्याप्रमाणे माझी प्रतिज्ञा अनेक गुणांनी भरलेली होती त्याचप्रमाणे तिच्यात दोषही खूप आहेत. मजुरांच्या संबंधात ती गुणांनी भरलेली आहे. परिणामसुद्धा तसाच सुंदर आला आहे. मालकांच्या संबंधात माझी प्रतिज्ञा दोषपूर्ण होती आणि परिणामी मला झुकावेही लागले आहे. मालकांवर माझ्या उपवासाचे दडपण होते. याबद्दल मी कितीही जरी नाही म्हणालो तरी ही गोष्ट लोकांना जाणवल्याशिवाय राहणार नाही आणि जग माझे म्हणणे मान्यही करणार नाही. मालक माझ्या या वाईट अवस्थेबद्दल तटस्थ राहू शकले नाही. आणि जेव्हा एखादा माणूस दडपणाखाली असतो तेव्हा त्याच्याकडून काहीही लिहिवून घेणे, त्याला अटी मान्य करायला लावणे, वा त्याच्याकडून काही घेणे हे न्यायविरोधी आहे. सत्याग्रही असे कधीही करणार नाही. परंतु मला मात्र याबाबतीत नमते घ्यावे लागले. लाजेखाली दबलेला माणूस काय करत नाही? मी थोडी थोडी मागणी करत गेलो. यामुळे त्यांनी त्यातून जितकी मान्य करता येणे शक्य होते तितकी मान्य केली आणि तितकीच मला घ्यावी लागली. मी जर पूर्ण मागणी केली असती तर त्यांनी पूर्ण मागणीचासुद्धा स्वीकार केला असता. परंतु त्यांना अशा परिस्थितीत टाकून मी त्यांच्याकडून सर्व घेऊच शकत नव्हतो. असे करणे तर माझ्याकरिता उपवास तोडून नरकाचे भोजन घेण्यासारखे झाले असते. आणि अमृताचे जेवणसुद्धा वेळेवर घेणारा मी नरकाचे जेवण कसा करू शकलो असतो?

असे वाटते की आपल्या शास्त्रांमधील अनेक वचन महान अनुभवाच्या परिणामी लिहिलेली आहेत. थोरो म्हणतो की जिथे अन्याय प्रवृत्ती असते तिथे शुद्ध माणूस पैसेवाला होऊच शकत नाही. आणि जिथे न्यायप्रवृत्ती असते तिथे माणसाला कोणतीही अडचण असूच शकत नाही. आपल्या शास्त्रात याहूनही अधिक सांगितलेले आहे. ते सांगतात की जिथे अन्यायप्रवृती असते तिथे माणूस जिवंत राहूच शकत नाही. यामुळेच आपल्यापैकी काही लोक कोणत्याही प्रवृत्तीत पडत नाहीत. कामकाजाला कंटाळून ते असे करतात असे नाही. परंतु ते कोणत्याही कामकाजात पडूच शकत नाहीत. त्यांना जगात इतका मोठा दंभ दिसत असतो की त्यात ते राहूच शकत नाही. खूप पाखंडी लोकांमध्ये शुद्ध माणूस

असला तर त्याने एक तर त्या पाखंडी लोकांमधून निघून जायला पाहिजे वा स्वतः अशुद्ध व्हायला पाहिजे. जगातील अनेक शुद्ध लोक हिमालयात वा विंध्याचलात निघून जातात आणि शरीर क्षीण करून टाकतात. काही लोकांना शरीर मित्थ्यावाटते आणि त्यांचा आत्म्याच्या अमरत्वावर आणि सर्वव्यापीपणावर विश्वास असतो. ते शरीराचा तेव्हाच त्याग करतात आणि शुद्ध मोक्ष प्राप्त करतात. काही परतसुद्धा येतात, परंतु ते स्वतःला इतके काही शुद्ध करून टाकत असतात की त्यानंतर दांभिक जगात राहूनसुद्धा ते स्वतः जे ठरवतात तेच करतात. अशा ज्ञानी लोकांशी मी जेव्हा माझी तुलना करतो तेव्हा मला मी इतका काही तुच्छ वाटतो की विचारू नका. असे असले तरी मला माझ्या शक्तीचा अंदाज नाही असे नाही. परंतु ती शक्ती जेवढी असते त्याहून बाहेरच्यांना ती किती तरी जास्त वाटत असते. जगात मला दिवसेंदिवस इतका काही दंभ आढळतो की त्यामुळे अशा वातावरणात मी जगूच शकत नाही असे मला वाटत असते. मी फिनिक्समध्ये अनेकदा सांगितले आहे की एखाद्या दिवशी मी तुमच्यात दिसलो नाही तर नवल वाटण्याचे कारण नाही. मला जर कधी अशी तीव्रतेने जाणीव झाली तर मी अशा ठिकाणी निघून जाईन की मग मी कोणालाही दिसणार नाही. अशा वेळी तुम्ही न घाबरता हाती घेतलेले काम करत राहा.

१९-३-१९१८

. . . चे पत्र. माझ्यावर अन्याय करण्यात आला आहे अशी भावना. सार्वजनिक कार्यात भाग घेण्याचा अधिकार नाही असे म्हणून तुम्ही मला खुश करत असता. याचे उत्तर -

## (एका सार्वजनिक कार्यकर्त्याला पत्र)

“तुमचे पत्र मिळाले. तुम्हाला जर माझ्याकडून न्याय मिळालाच नाही तर तुम्ही माझा त्याग का करत नाही? मी तुम्हाला जे काही सांगितले ते सल्ल्याच्या स्वरूपाचे होते. मी तुम्हाला सांगितले होते की मी तुम्हाला जे काही सांगतो आहे ते जर तुम्हाला पटत असेल तरच करा. तुम्हाला माझा सल्ला पटल्यामुळे तुम्ही सार्वजनिक कार्याचा त्याग करायचा निश्चय केला. आता तुम्हाला माझ्या सल्ल्यात कठोरपणाशिवाय जर काहीही दिसत नाही तर तुम्ही माझा सल्ला टाकून देऊ शकता. आता माझा सल्ला आहे की आधी तुम्ही जशा प्रकारे काम चालवत होता तसेच चालवा. हे मी रागात लिहीत नसून योग्य वाटते तेच लिहितो आहे. तुमच्यात आधी सांगितलेले शब्द आठवण ठेवण्याची शक्ती नसल्यामुळे वाटते की सध्या तरी तुम्ही स्वतंत्र मार्गच अनुसरला पाहिजे. त्यातच तुमची उन्नती आहे. तुम्ही जर माझ्या सल्ल्याला आज्ञा समजत असाल आणि त्यात किंचितही इकडे तिकडे होऊ शकत नाही असे समजत असाल तर त्यात तुमची अधोगतीच आहे. मला वाटते की तुमच्याकरिता योग्य मार्ग होमरूलचे काम करत असताना अटक करवून घेणे आहे, आणि तोच मार्ग तुम्ही स्वीकारावा. तुम्ही निश्चितपणे समजा की परिषदा वगैरेंच्या कामाला लागला तर मला तुमचा किंचितही राग येणार नाही. माझा सल्ला आणि माझी आज्ञा यांतील भेद कळत असेल तर अधूनमधून माझा सल्ला घेत जा. हे पत्र केवळ तुमच्या मनःशांतीकरिता आहे, तुम्हाला दुःखी करण्याकरिता नाही.

मोहनदास गांधी”

२१-३-१९१८

बापू जेव्हा कोणाची प्रशंसा करतात, तेव्हा स्तुत्य व्यक्तीत इतके प्रेम मिळवण्याची पात्रता आहे की नाही, याची चिंता न करता आपले संपूर्ण प्रेम उधळत असतात.. प्रेम करणारे लोक ज्या व्यक्तीवर प्रेम करतात ती तुच्छ जरी असली, तरी ते तिला महान बनवू शकतात. पण असे करताना कधी त्या व्यक्तीचे नुकसान होत नसेल काय? आणि जेव्हा अशा प्रकारचे अतिशयोक्तीने भरलेले स्तुतीपर शब्द मोठ्या समुदायासमोर उच्चारले जातात, तेव्हा काहींना यामुळे खंत वाटते, काहींना वाटते की या स्तुतीला विशेष किंमतच नाही, आणि काहींना तर अपमानित झाल्यासारखे वाटते. एक प्राध्यापक तर एकदा म्हणाले होते की — जर कोणत्याही माणसाला 'सुंदर' म्हटले गेले, आणि मग आपल्यालाही 'सुंदर' म्हणाले, तर असे समजावे की बापूंना आपली फारशी किंमत वाटत नाही; ते स्वतःलाही पहिल्यासारखेच समजत असतात.

आज ॲन्ड्र्यूजसाहेबांशी गोष्टी सुरू असतानाच तिथे चहा वगैरे घेऊन मी पोहोचलो. माझी प्रशंसा ऐकून मी संकोचलो.

"तुझ्यावरील याचे प्रेम उतू जात आहे. याला वाटते की तू इतका सगळा खजूर खाऊ शकशील आणि इतका सगळा चहा तू प्यायलाच पाहिजे. याच्या उपस्थितीत याची प्रशंसा करून तू याला बिघडवू नकोस. याने आश्रम पूर्ण भरून टाकला आहे. आश्रम याला महान करत नाही तर हा आश्रमाला महान करतो. हे सांगताना मला संकोच वाटतो, पण मला इथे जे थोडेसे मोती मिळाले आहेत आहेत त्यातील हा एक आहे. तुला मी हे इतक्याकरिता सांगतो आहे की तू याला भेट, याच्यावर प्रेम कर आणि याला शाबासकी दे.

"अर्थातच मगनलालने फिनिक्समध्ये फार मोठे कार्य केले आहे. पण तो ज्या काळात फिनिक्समध्ये होता, त्याच्या तुलनेत तो येथे शंभरपट अधिक 'भीम' झाला आहे. त्याने आपले जीवन पूर्णपणे त्यागाने भरून टाकले आहे. त्याने फार मोठा त्याग केला आहे. फक्त एकदोन गोष्टींसाठीच त्याने आपल्या सर्व आशाआकांक्षांचे बलिदान केले आहे. त्याला माहीत आहे की, तो माझ्या सत्याग्रहाच्या लढ्यात चांगल्या प्रकारे सहभागी होऊ शकत होता. पण तरीही त्यात सामील झाला नाही आणि आश्रमाचेच काम करत राहिला. सरळपणात तो एखाद्या बालकासारखा आहे. सार्वजनिक कामात भाग घेण्यामध्ये आणि तुरुंगात जाण्यामध्येही त्याला खूप आनंद वाटतो. पण त्याने या सगळ्या गोष्टींचा त्याग

केला आहे. केवळ यासाठी की त्याला समजले आहे की आश्रम जर चांगला हवा असेल, तर असे करणे अपरिहार्य आहे, आणि म्हणूनच आपण आश्रम सोडायला नको.

खेडाच्या गोष्टी निघाल्या असता म्हणाले -

"तिथल्या हवेत खूप जोम दिसतो. लोकांना आता वाटू लागले आहे की आपली सार्वजनिक कामे इंग्रजांच्या मदतीशिवाय आपणच केली पाहिजे. तू कबूल करशील की काही विशिष्ट मर्यादेपर्यंत त्यांचे म्हणणे बरोबर आहे. काल तुझी तार आली आणि मी ती काही मित्रांसमोर उघडून वाचली. तेव्हा मला सुचले की, तुला इथे मदतीसाठी बोलावून घ्यावे. मी विचार केला की तू आलास तर मी दिल्लीला जाऊ शकेन, किंवा माझ्या ऐवजी तू दिल्लीला जाऊ शकशील. तू खेडाच्या प्रश्नांकडे लक्ष दे किंवा अलीभाईंच्या नजरकैदेसंबंधीचा मुद्दा हाती घे. खेडाची समस्या खरी आहे. तरीही बिहारमध्ये काम करणाऱ्यांइतके येथील कार्यकर्ते नैतिक दृष्टिकोनातून परिपक्व नाहीत. मी असे म्हणत नाही की इथले कार्यकर्ते प्रामाणिक नाहीत, पण बिहारमधील परिस्थिती काही वेगळीच आहे. अध्यात्मिक दृष्टिकोनातून पाहता, तिथे काम करणारे वरचढ आहेत. तरीही इथले सर्व कार्यकर्ते धाडसी आहेत आणि त्यांच्यात उत्साह भरलेला आहे. त्यांच्यासोबत काम करण्यात तुला आनंदच मिळेल. खेडा हे हिंदुस्थानातील अतिशय सुपीक प्रदेशातील एक आहे. हे रमणीयसुद्धा आहे. इथे नैसर्गिक सुंदर स्थळे नाहीत, परंतु लोकांनी आपल्या स्वतःच्या मेहनतीने या प्रदेशाला सुंदर केले आहे. बिहार मुळातच सुंदर आहे. तो निसर्गानेच तयार केलेला बगिचा आहे. इथे लोकांनी झाडे लावून आणि ती वाढवून या भागाला बागेचे रूप दिले आहे. आणि खेडामधील गावकऱ्यांची गणना कदाचित हिंदुस्थानातील सर्वात उत्तम ग्रामीणांमध्ये होईल. यांना शेतीची शास्त्रीय पद्धत आवडते. एक पीक घेतल्यानंतर दुसरे पीक घेण्याच्या कलेचा त्यांचा चांगला अभ्यास आहे. आणि पिकांमध्ये फेरबदल कसा करावा याचेही त्यांना चांगले ज्ञान आहे. लढ्याची परिस्थिती फार कठीण आहे. आम्ही महसुलाचा हप्ता भरू शकतो, परंतु मुद्द्याचा प्रश्न तो नाही. मुद्द्याचा प्रश्न नागरी अंमलदारांच्या वर्तणुकीचा आहे. आणि तुमची ही वर्तणूक आम्ही सहन करू असे नाही हे आम्हांला त्यांना दाखवून द्यायचे आहे. त्यांना माहीत आहे की लोकांवर फार मोठे संकट आले आहे. वर्ष तर वाईट आहेच आणि त्यात भर पडली आहे संपूर्ण जिल्ह्यात पसरलेल्या प्लेगची. असे असतानाही अंमलदारांचा जुलूम सुरूच आहे. माझी ही भाषा फार कठोर आहे असे मला वाटत नाही. माझी तर खात्री पटली आहे आणि व्हाईसरायलासुद्धा मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की ब्रिटिश

राज्याची मुळे सडू लागली आहेत. गावातील तलाठी हा त्यांचा प्रतिनिधी आहे. आणि वर्षाच्या पिकाचा ते जो अंदाज काढतात तो मोठे अंमलदार स्वीकारतात. ही परिस्थिती अतिशय दुःखद आहे. तुलासुद्धा असे वाटेल आणि मी असे समजतो की या सर्व कामात मला सावध राहावे लागत असते. मला याबद्दल वाटते तर खूप काही, परंतु तुझ्यासारखी भाषा माझ्याजवळ नाही."

प्राध्यापक कृपलानींचे शोकपूर्ण पत्र. भावाचा आणि भावजयीचा मृत्यू. त्यांच्यावर कोसळलेले नवीन दुख. समाजसेवेचा त्याग करावा लागेल अशी भीती. वगैरे . . .

त्याचे उत्तर -

२७-३-१९१८

## (जीवतराम भगवानदास कृपलानी यांना पत्र)

"प्रिय मित्र,

"मी तुम्हाला आधी पत्र लिहिले नाही त्याकरिता माफ कराल. गिरधारीने माझा संदेश तुम्हाला सांगितला असेल. तुम्हाला आश्वस्त करता येईल आणि शांत वाटेल असे पत्र मला लिहायचे होते. यामुळे मी उशीर केला. अजूनही असे पत्र लिहू शकेन की नाही याबद्दल शंका आहे. परंतु आता तुम्हाला लिहायला मी अधिक वेळ करू शकत नाही. हृदयीच्या वेदना व्यक्त करणारे तुमचे पत्र आज माझ्यासमोर पडलेले आहे. परंतु प्रियहून प्रिय व्यक्तीला जरी मत्यू आपल्याजवळून हिरावून घेत असेल, जसे तुमच्या भावासंबंधात घडले आहे, तरी आपण त्यामुळे पंगू का व्हायला पाहिजे? परिवर्तन आणि विस्मरण काही केवळ मृत्यूमुळेच होते काय? तो अकस्मात आल्यामुळे काही फरक पडतो काय? तुम्हाला तर ही सुंदर संधी मिळाली आहे. तुमच्या श्रद्धेचा आणि तुमच्या तत्त्वज्ञानाचा कस लागतो आहे. प्रामाणिक मार्गाने कुटुंबातील दोन माणसांचे तुम्ही भरणपोषण करत असाल तर तीसुद्धा खरी देशसेवाच आहे. कुटुंबाचे भरणपोषण करणारे सर्वच जर स्वतःला राष्ट्रसेवक म्हणवू लागले तर राष्ट्राचे काय होईल?

"आता तुमची परीक्षा होते आहे. आणि मला माहीत आहे की त्यात तुम्ही कच्चे असल्याचे आढळणार नाही. तुमच्या सगळ्या मित्रांचीसुद्धा या वेळी कसोटी आहे. तुमचा काय करायचा विचार

आहे हे कळवाल. जर येऊ शकत असाल तर मला भेटून जा. तुमच्या योजनांची आपण चर्चा करू. माझ्याकडून होऊ शकेल ती मदत करायला मी तयार आहे इतके तर तुम्हाला माहीतच आहे.

"खूप प्रेम आणि सहानुभूती.

बापू"

५-४-१९१८

खेडासंबंधी वर्तमानपत्रांना पत्र लिहिले (पाहा परिशिष्ट १). त्याच्या प्रती अनेकांना पाठवण्यात आल्या. त्यासंबंधात पत्रेसुद्धा लिहिली. शास्त्रीयारना पुढीलप्रमाणे पत्र लिहिले -

## (व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री यांना पत्र)

“खेडाच्या परिस्थितीविषयी माझे निवेदन तुम्ही कदाचित वाचले असेल. जनतेमधील जोम चिरडून टाकायचा अंमलदारांचा जो प्रयत्न आहे त्याविरुद्ध हा लढा आहे. अशा परिस्थितीत किसानांना मदत करणे आमचे कर्तव्य आहे असे मला वाटते. युद्धाच्या कारणाकरिता अशा जुलमाकडे डोळेझाक करता येत नाही. या जनतेबद्दल सहानुभूती दाखवण्याकरिता मुंबईत एक जाहीर सभा होणार आहे. शक्य झाले तर तुम्ही या सभेत याल आणि बोलालसुद्धा अशी मी आशा करतो.

याचे असे उत्तर आले -

## (व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री यांचे गांधीजींना पत्र)

“नडियाड, तारीख १ एप्रिलचे तुमचे पत्र मला मिळाले. या पत्राने तुम्ही माझा जो सन्मान केला आहे तो अनमोल आहे हे सांगण्याची आवश्यकता आहे काय?

“अनुभवामुळे आणि स्थानिक परिस्थितीच्या ज्ञानामुळे जे लोक माझ्यापेक्षा अधिक पात्र आहेत त्यांच्या निर्णयासमोर मी माझे मत सांगत बसण्याची माझी इच्छा नाही. परंतु मी माझ्या मताशिवाय इतरांच्या मताप्रमाणे काम करावे हे तुम्हाला विशेषेकरून आवडणार नाही. स्पष्टपणे मी सांगितले पाहिजे की खेडाच्या परिस्थितीत न्याय किसानांच्या बाजूने आहे असे जरी मान्य केले तरी सत्याग्रह करण्याच्या योग्यतेविषयी माझे मन साशंक आहे.

“परंतु याचा अर्थ सराकारची दमननिती मला पसंत आहे असा होत नाही. काल सर इब्राहीम रहीमतुल्ला आणि सर जेम्स डुबोलो यांना मी भटलो होतो. तेव्हा तडजोडीचे धोरण अनुसरणे फार आवश्यक आहे असे मी दोघांनाही अतिशय आग्रहपूर्वक म्हणालो होतो.

"तुम्ही बोलावल्यानंतर धावत येऊन तुमच्या खांद्याशी खांदा लावून उभा राहण्याऐवजी मी निमित्त सांगतो आहे याचे मला दुःख होते. परंतु याचबरोबर मला हेही माहीत आहे की जी गोष्ट अंतःकरणापासून करायची माझी इच्छा नसते ती मी करावी अशी तुमची इच्छा नसेल."

याचे परत पुढीलप्रमाणे उत्तर लिहिले -

## (व्ही. एस श्रीनिवास शास्त्री यांना पत्र)

५-४-१९१८

तुमच्या पत्राकरिता आभारी आहे. माझ्या प्रत्येक कामात तुमची सहमती मिळवण्याकरिता मी कितीही जरी उत्सुक असलो तरीही तुमच्या अंतःकरणावर कोणत्याही प्रकारचे दडपण आणायला नको हे तुमचे म्हणणे मला मान्य आहे. मला माहीत आहे की खेडाची समस्या दररोज जसजशी पुढे जाईल तसतसे तुम्ही तिच्या संपर्कात तर राहालच.

एक पत्र श्री नटराजन यांनाही लिहिले होते. त्यात, "तुमच्या विरोधकाशी लवकरात लवकर तडजोड करा" या सिद्धांताची पदोपदी जाणीव होते. यातील प्रामाणिकपणा, श्रद्धा आणि आपले विचार इतरांना समजावून सांगण्याची आतुरता दिसून येते -

## (कामाक्षी नटराजन यांना पत्र)

५-४-१९१८

"हे पाहून मला अतिशय दुःख होते की तुम्ही अनेकदा उतावीळपणे निर्णयावर येता आणि समोरच्या पक्षाचे ऐकून घ्यायचा धीरसुद्धा ठेवत नाही, तुम्हाला राष्ट्रसेवा करण्याची इच्छा आहे खरे, परंतु तुमच्या या सवयीचा राष्ट्रसेवा करण्याच्या तुमच्या शक्तीवर विपरीत परणाम होईल असे सांगण्याचे मी साहस करतो. खेडा प्रकरणाचेच उदाहरण घ्या. तुमचे मत माझ्या मताविरुद्ध आहे याचे मला काहीही वाटत नाही. उलट तुमच्या मित्रांविरुद्ध जरी तुमचे मत असले तरी ते हिंमतीने व्यक्त करता आणि तसे करताना तुम्हाला दुःखही होत असते हे माहीत असल्यामुळे तुमच्याबद्दल मला आदरच वाटत असतो. परंतु माझी तक्रार तर तुम्ही उतावीळपणाने निर्णय घेत असल्याबद्दल आहे. खेडाच्या लढ्यासंबंधीच्या आतील गोष्टी तुम्हाला माहीत नाहीत. त्यांचा अभ्यास करायला तुमच्याजवळ वेळ नाही. गोधरात राजकीय परिषद झाली तेव्हा सर्वसामान्य जनतेने तिच्यात पहिल्यांदाच भाग घेतला होता. संमेलनानंतर लोक आमच्यापैकी काही लोकांना टोमणा मारत म्हणाले होते की 'अशी परिषद बोलावून काय उपयोग? जिल्ह्यातील पीक जवळपास बुडाले आहे. शेतसारा रद्द करायला लावण्याचा हक्क आहे. परंतु तुम्ही लोक यासंबंधात काय करणार आहा?' हे ऐकणारातील काही लोकांनी हा ठपका योग्य पद्धतीने मान्य केला आणि या समस्येसंबंधात पुढील पाऊल उचलण्याची जबाबदारी घेतली. शेतसारा स्थगित व्हावा म्हणून अर्ज तयार केला, त्यावर हजारो लोकांच्या सह्या घेतल्या आणि तो सरकारकडे पाठवण्यात आला. शेतसारा स्थगित करण्याकरिता इतका अर्ज पुरेसा होता. सरकारचे केवळ व्याजाचे नुकसान होणार होते. असे करून सरकार जनतेची सद्भावना मिळवू शकणार होते. परंतु अंमलदारांनी मात्र विरुद्ध आणि चुकीचा मार्ग अनुसरला. त्यांनी आणेवारीचे पत्रक मागवायला सुरुवात केली. या आणेवारी पत्रकाबद्दल मी इतके मात्र सांगू शकतो की ती तटस्थ आणि सूक्ष्म चौकशीसमोर टिकण्यासारखी नव्हती. ही सूट मिळवण्याकरिता जितके काही मार्ग उघडे होते ते सर्व मार्ग जनतेने

अनुसरून पाहिले. दरवेळी त्यांच्यासमोर ही पत्रके ठेवण्यात येत होती. अशा परिस्थितीत लोकांनी काय करावे? त्यांनी आपली जनावरे, झाडे आणि इतर उत्पन्नाची साधने विकून टाकून महसूल भरावा? मी तर म्हणेन की तुम्ही स्वतः इथे येऊन पाहा आणि ग्रामीणांना सल्ला देण्याची हिंमत करून पाहा. शेतकऱ्याजवळ धान्य वगैरे तर नाही. अशा परिस्थितीत त्यांच्याकडून महसूल वसूल करण्याकरिता कोणकोणती उपाययोजना केली जाते हे तुम्ही स्वतः येऊन पाहायला पाहिजे. माझ्या नजरेसमोर खेडुतांना घाबरवून त्यांना पौरुषहीन बनवण्यात येत आहे. हे मी चुपचाप पाहू शकत नाही. तुम्हीसुद्धा पाहू शकणार नाही. खेडुतांचे सरकारला म्हणणे आहे, “तुम्ही आमचे अर्ज नामंजूर करत आहा म्हणून जर आम्हाला महसूल भरावा लागणार असेल तर तसे करण्याकरिता आम्हांला एक तर व्याजाने पैसे आणावे लागतील वा आमची जी काही संपत्ती आहे ती आम्हांला विकावी लागेल.” ही अगदी न्याय्य आणि खरी गोष्ट आहे. आणि पूर्णपणे घटनेनुसार आहे. हा लढा खेडूत किती उत्साहाने लढत आहेत हे जर तुम्ही इथे आला तर तुमच्या डोळ्यांनी पाहू शकाल. हृदय कठोर करून आपले जे काही नुकसान होईल ते आनंदाने सहन करण्याची त्यांच्यातील प्रत्येकाची तयारी आहे. प्रत्येक घरातील स्त्रीपुरुष या लढाईत भाग घेत आहे. स्वेच्छेने दुःख सहन करून जनता किती उच्च पातळी चढू शकते हे तर तुम्ही पाहायलाच पाहिजे. आतापर्यंत लोक हेच दुःख जेव्हा नाराजीने सहन करत असत तेव्हा त्यांची अधोगती होत असे. एक प्रकारे तर ही भाकरीकरिताची लढाई आहे. एकीकडे घटनेनुसार आंदोलन करण्यात येत असून मदत व्हावी म्हणून हजारो सभा घेण्यात येत आहेत. दुसरीकडे तुमची झाडेझुडपे, पशुपक्षी विका, घरातील गोष्टी विका पण महसूल भरा असे तुम्ही लोकांना सांगता. याला काय अर्थ आहे? हे तर लोक भाकरी मागत असताना त्यांना दगड देण्यासारखे आहे.

“माझी इच्छा आहे की या पत्राने तुमचे अंतःकरण हेलावले पाहिजे, चौकशी करण्याच्या तुमच्या प्रवृत्तीला उत्तेजित केले पाहिजे आणि खेडात येऊन हा लढा कसा सुरू आहे हे पाहण्याकरिता प्रेरित केले पाहिजे. आणि मग जर तुम्ही तुमचा अहवाल देऊ इच्छित असाल आणि तो अहवाल आमच्या उद्दिष्टाची कितीही हानी करणारा जरी असेल तरी त्याकरिता मी केवळ तयारच नसेन तर तसे करण्याकरिता मी तुम्हाला आमंत्रितही करीन. मला इतके तरी समाधान राहील की अधिक काही जरी नसले तरी तुम्ही या प्रश्नाचा सखोल अभ्यास केला आहे. इतके करणे हे तुमच्या स्वतःसंबंधातील, एका

मित्रासंबंधातील आणि राष्ट्रासंबंधातील कर्तव्य पार पाडणे होईल. तुम्ही जर इतकाही वेळ द्यायला तयार नसाल तर खेडाच्या लढ्यासंबंधी कोणतेही मत देण्याचा तुम्हाला अधिकार नसेल.

"मी तुम्हाला असे लिहिण्याचे धार्ष्ट्य केल्याबद्दल तुम्ही मला माफ कराल अशी आशा आहे. मी तुम्हाला अनेकदा सांगितले आहे की माझ्या कामात तुमचे सहकार्य मिळवण्याकरिता मी अतिशय उत्कंठित आहे. संपूर्ण विचार केल्यानंतरही जर तुम्ही मला अशी मदत करू शकणार नसाल तरीसुद्धा माझे समाधान होईल. तुम्ही सत्याग्रह शब्दाने गैरमार्गाने भटकायला नको. त्याचे प्रत्यक्ष उदाहरण तुमच्यासमोर आहे. त्याच्या गुणावगुणानुसार त्याचा न्याय करा.

तुमचा

मो. क. गांधी

यासंबंधात असे सांगतात की नटराजन दुःखी झाले. बापूजींनी पत्र परत वाचले. दोन वाक्य अपूर्ण राहिल्यासारखे होते. त्याबद्दल मला ठपका दिला - तू तर याबाबतील सूचना करायला पाहिजे होती असे मला वाटते. तू सूचना कशी केली नाही? मी म्हणालो - मी वल्लभभाईंना आणि बँकरना दाखवले होते.

बापू म्हणाले, "पण काही उपयोग झाला नाही. ते म्हणतात, 'मला लिहिण्याची पद्धत फारशी आवडली नाही, पण युक्तिवाद अगदी योग्य होता.' हे पत्र नटेसनच्या बुद्धीला धक्का द्यावा म्हणून लिहिले होते, भावना दुखावण्यासाठी नाही. जणू हे पत्र विचारते आहे, 'भाई, तुझे शहाणपण कुठे भरकटले आहे?

वासदहून नडियाडला येत असताना अनेक पत्रे लिहिली. उपवासासंबंधात कुमारी फेरिंगचे पत्र आणि तार दोन्ही आलेले होते. मला पत्र लिहायला सांगितले होते, परंतु माझे पत्र अतिशयोक्तीने भरलेले वाटले. त्यांनी स्वतः पुढीलप्रमाणे उत्तर लिहिले -

८-४-१९१८

# (इस्थर फेरिंगला पत्र)

"प्रिय इस्थर,

"असे वाटते की तुझ्यासोबतच्या पत्रव्यवहारात मी अतिशय निर्दयी बेफिकीर झालो आहे. तुला एखादी ओळ लिहिल्याने माझे समाधान होत नाही. माझी इच्छा तर तुला एक लांब प्रेमपत्र लिहिण्याची होती. परंतु असे पत्र लिहिण्याकरिता आवश्यक शांतता मला मिळत नाही आणि आता फार उशीर करण्याची मला हिंमत नाही. सध्या मी जे काही काम करून राहिलेलो आहे त्यांतील एकही काम मी शोधायला गेलो नव्हतो. मी त्याचे कसे वर्णन करू हेच मला माहीत नाही. टाळण्यासारखे नसलेले हे काम माझ्या पुढ्यात येऊन पडले होते. सर्व बाजूंनी घेरला गेलेला शिपायी करू तरी काय करू शकतो? एक हल्ला परतवायवा तो शक्ती लावतो तोच दुसरीकडून हल्ल्याला सुरुवात होते. तो शिपाई पहिल्या हल्ल्याशी सामना करत असतानाच या दुसऱ्या हल्ल्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही. त्याने जर तसे केले तर त्याने त्याच्या मृत्यूला आमंत्रित केल्यासारखेच होईल. माझी परिस्थिती जवळपास अशीच झाली आहे. चोहोकडून संकटग्रस्त लोक मला हाका मारत आहेत. मदत करण्याचा उपाय मला माहीत असताना मी मदतीकरिता नकार कसा देऊ शकतो?

"अहमदाबादच्या संपात मला जीवनातील अतिशय मूल्यवान पाठ मिळाले. संपाच्या दरम्यान मला प्रेमाचे असे काही अद्भुत दर्शन झाले की जसे त्यापूर्वी कधीही झाले नव्हते. जसा मी उपवास जाहीर केला तशीच तिथे बसलेल्या जनसमुदायाला ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव झाली. तू पाठवलेली तार सर्वाधिक भावनापूर्ण आणि सर्वाधिक खरी होती. हे चार दिवस माझ्याकरिता शांतिचे, धन्यतेचे आणि आध्यात्मिक उन्नतीचे होते. या चार दिवसात मला कणभरही अन्न खाण्याची इच्छा झाली नाही.

"खेडाच्या प्रकरणासंबंधी मी एक निवेदन प्रसृत केले आहे. त्यावरून तुला कळलेच असेल. माझ्या उपवासासंबंधीसुद्धा मी एक निवेदन दिले होते. तू जर हे निवेदन पाहिले नसशील तर मला सांगशील.

“तुझी प्रकृती चांगली असेल. लिव्हरच्या तक्रारीसंबंधात उपवासासारखा रामबाण उपाय दुसरा नाही.

“मला अहमदाबादच्या वा साबरमतीच्या पत्त्यावर लिहिशील.

प्रेम,

बापू”

# (दुर्गा महादेव देसाई यांना पत्र)

“चि. दुर्गा, (महादेवभाई देसाईंची पत्नी)

“तू विसरली असशील तर चांगले. मी विसरलो नाही. आनंदीबेनला तुझी माहिती कळवली आहे. मला वाटते की तू भाई महादेवपासून याहूनही अधिक काळापासून दूर राहिली आहे. मी त्याला सांगितले आहे की तुला जिथे जायचे असेल तिथे जाऊ शकतोस. परंतु तुझी इच्छा असेल तर मी त्याला ताबडतोबच मोकळा करायला तयार आहे. परंतु तू लक्षात ठेव की भाई महादेवला इथे जबरदस्त अनुभव मिळतो आहे. त्याचा लाभ तुलासुद्धा मिळेल. यामुळे तू जर या वियोगाचे दुःख आनंदाने शमवू शकत असशील तर महादेव इथे राहील. परंतु यात एक जोखीम आहे. मी जर इथे मोठ्या लढ्यात अडकलो तर नंतर इच्छा जरी असली तरी तो परतू शकणार नाही. यामुळे तू भेटायला येण्याची हीच योग्य वेळ आहे आहे असे समज. तू जर कंटाळली असशील तर तू इथे येऊ शकतेस. नडियाडमध्ये तू राहू शकशील की नाही याबद्दल थोडी शंका आहे. तुला तिथे जे मिळते आहे ते इथे मिळू शकणार नाही हे स्पष्ट आहे. परंतु ज्यात तू खुश राहशील ते करायला मी तयार आहे.

मोहनदासचे आशीर्वाद”

माझ्या वडिलांना -

## (हरिभाई देसाईंना पत्र)

“सुज्ञ भाईश्री,

“तुम्हाला लिहायचा बरेच दिवसांपासून विचार करतो आहे परंतु वेळच मिळत नव्हता, आणि काही वेळा विसरही पडत होता. माफ करा.

“भाई महादेवला सोपवण्यात तुम्ही चूक केलेली नाही असे सांगण्याची परवानगी घेतो. त्याच्या जीवनाच्या विकासाकरिता हा सर्व अनुभव आवश्यक होता. पैशाने सुख मिळू शकते असे नेहमीच नसते. पैशाने सुख मिळण्यासारखी भाई महादेवची प्रकृती नाही. मला वाटते की महादेव आणि दुर्गा याबाबतीत सारखेच आहेत. यांना अमूल्य अनुभव मिळत आहे.

“माझा तर हे दोघेही भेटल्याने लाभच झाला आहे. भाई महादेवने मला अनेक झंझटींमधून मुक्त केले आहे. त्याच्यासारख्या चारित्र्यसंपन्न, विद्वान आणि प्रेमळ सहकाऱ्याच्या मी शोध घेत होतो. भाई महादेवमुळे माझा हा शोध यशस्वी झाला. चि. दुर्गाचा इतका जास्त उपयोग करता येईल अशी तर मी स्वप्नातही कल्पना केली नव्हती. ईश्वरेच्छा काही वेगळीच असते.

“तुम्ही तर या दांपत्याची मुळीच काळजी करू नये आणि त्यांना पूर्ण आशीर्वाद द्यावा अशीच माझी इच्छा आहे. अशीच याचना मी करतो.

लि. तुमचा,

मोहनदास गांधी”

९-४-१९४८

एन. एम. जोशी (हिंदुस्थानात मजूर आंदोलनाची सुरुवात यांनीच केली. भारत सेवक समाजाचे प्रमुख कार्यक्रते.) असे काही तरी म्हणाले की माझी चौकशी आणि गांधींची चौकशी यांचा निष्कर्ष एकच आहे असे गांधी म्हणतात. त्यांच्या या म्हणण्याचा विरोध मी केवळ गांधींबद्दल वाटणाऱ्या आदरामुळे केला नाही. ही गोष्ट मला जमनादासकडून कळली. बँकरनीसुद्धा त्यांच्या किती तरी गोष्टी सांगितल्या. यामुळे त्यांना पुढीलप्रमाणे लिहिले -

## (नारायण मल्हार जोशी)

"प्रिय मित्र,

"मी नुकताच असे ऐकले की तुम्ही मित्रांना असे सांगत असता की पिकांच्या अंदाजाबद्दलची तुमची चौकशी माझ्या चौकशीचे परिणाम एकच आहेत असे जे मी म्हणत असतो त्याचा विरोध तुम्ही केवळ माझ्याबद्दल वाटणाऱ्या आदरामुळे केला नाही. याचबरोबर तुमचे असेही मत आहे की मी विनाकारण लोकांना अडचणीत टाकले आहे. मी जे ऐकले आहे ते जर खरे असेल तर माझ्याकरिता ही दुःखद गोष्ट आहे. तुम्हाला जे बरोबर वाटते ते सांगण्याचा तुम्हाला पूर्ण हक्क आहे, आणि एक मित्र म्हणून तुमचे हे कर्तव्यही आहे. मी तुम्हाला माझा मित्र समजतो. सार्वजनिक जीवनात असे अनेक प्रसंग येत असतात की जेव्हा मित्रांमध्ये मतभेद अनिवार्य होत असतात, आणि तरीही ते मित्र राहत असतात. यामुळे तिथे समितीसमोर तुम्ही काय म्हणत असता आणि माझ्या कामाबद्दल तुमचे काय मत आहे ते मला सांगा. तुमचे मत जरी प्रतिकुल असेल आणि मी त्याच्याशी सहमत नसेन तरीही मला त्याचे काही वाटणार नाही. इतके लक्षात ठेवा की मी तुमच्या मताला योग्य ते महत्त्व देईन.

अंतःकरणापासून तुमचा,

मो. क. गांधी"

१०-४-१९४८

नटराजनच्या पत्राचे सुंदर उत्तर आले. म्हणाले, “असाच परिणाम एन. एम. जोशींवरसुद्धा होईल. बघशील !

इंदोरच्या परिषदेत हिंदीच्या प्रचाराचे खूप काम झाले. कार्यक्रम चांगला योजिला होता. तीस हजार रुपये गोळा झाले. बाहेर जाऊन काम करायलासुद्धा स्वयंसेवकांची तयारी होती. वर्तमानपत्रामधून सहा मद्रासींना हिंदीच्या शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती देण्याचे निवेदनसुद्धा प्रकाशित झाले. त्याच्या उत्तरात भाई अण्णांचे पत्र आले, “मी, गोमती आणि माझे एक सहकारी हिंदी शिकून हिंदीचा प्रचार करण्याची ही संधी मिळण्याची वाट पाहत आहो.” याचे उत्तर दिले. खूप घाईत होते, यामुळे याचे उत्तर केवळ दोन ओळीत लिहायला मला सांगितले, परंतु बाहेर जाताजाता स्वतःच लिहून टाकले -

## (अण्णांना पत्र)

“भाईश्री अण्णा,

“तुमच्या पत्राने तर मी खूश खूश झालो. तुम्ही मला विसरतच नाही. मला तर या गोष्टीचे फार नवल वाटते. तुम्ही, गोमती आणि तुमच्या पसंतीचे तिसरे सहकारी यांच्याबद्दल मी विशेष काय लिहू? बाकी सर्व भाई महादेव तुम्हाला लिहील.

मोहनदासचे वंदेमातरम

नंतर हनुमंतरावनासुद्धा लगेच पत्र लिहिले -

## (हनुमंतरावना पत्र)

“भाईश्री हनुमंतराव,

“हिंदीसंबंधी शास्त्रीयार जर माझ्या विचारांशी सहमत असतील तर तुम्ही माझ्या आवाहनाला उत्तर म्हणून हिंदी शिकण्याचे इच्छुक म्हणून तुमचे नाव द्या आणि माझ्या तर्फे तुम्ही दोन तेलगूसुद्धा पसंत करा. मला तीन तमीळ तर मिळाले आहेत.

याच दिवशी बुधवार पेठ, पुणे येथून डॉ. नायकची पुढील तार आली -

इथे हिंदी वर्ग सुरू करण्याची जाहीरात नामदार कामतांच्या अंतर्गत अकरा मेच्या जाहीर सभेत करण्यात आली आहे. तिला आपण आशीर्वाद द्यावा ही विनंती.

उत्तराकरिता त्यांनी आठ आणेसुद्धा भरले होते. बापू फार खूश झाले आणि उत्तर म्हणून त्यांनी एक लांब तार केली.

### (हिंदी शिक्षणाच्या वर्गाला शुभेच्छा संदेशाची तार)

“तुमच्या प्रयत्नाला मी संपूर्ण यश इच्छितो. मला खात्री आहे की इतर अनेक क्षेत्रांप्रमाणेच महाराष्ट्र हिंदीला राष्ट्रभाषा हिंदीला आपलीशी करण्याच्या कामात पुढाकार घेईल आणि असे करून इंग्रजीच्या उपयोगाकरिता लागणाऱ्या मानसिक शक्तीच्या अपव्यापासून देशाला वाचवील.”

पोलाकना पत्र लिहिले -

## (पोलाक यांना पत्र)

“प्रिय हेनरी,

“मी तुला नियमितपणे लिहू शकत नाही. लिहायला  वेळसुद्धा नाही आणि शक्तीसुद्धा नाही. मी सध्या इतकी काही रचनात्मक कामे शोधून काढतो आहे की दिवसाच्या शेवटी मी अगदी थकून प्रेतवत होऊन जात असतो आणि दुसरे कोणतेही काम करण्याची शक्ती राहत नाही. लिहिणे, भाषण देणे, आणि गोष्टी करणे या गोष्टीसुद्धा माझ्याकरिता कष्टप्रद होत असतात. मला केवळ चिंतन करायची इच्छा असते. सत्याग्रहाचे लढे जेव्हा चालतात तेव्हा ते फार वेदनादायी असतात. अर्थात या वेदना उन्नतीपर असतात. मला वाटते की प्रसुतीवेदनासुद्धा अशाच असतात.

“तुला सविस्तर पत्र लिहायला मी भाई देसाईंना सांगतो आहे.”

परवाच्या दिवशी नटराजनला लिहिलेल्या पत्राचे पुढीलप्रमाणे उत्तर आले. बापू खूप खुश झाले होते.

## (कामाक्षी नटराजन यांचे पत्र)

“भाईश्री गांधी,

“तुमच्याशी भांडत असताना तुमच्या मायाळू आणि प्रेमपूर्ण पत्राचा माझ्यावर खोलवर परिणाम झाला. मी सांगायची हिंमत करीन की ‘रिफॉर्मर’च्या गेल्या अंकात मी खेडाच्या परिस्थितीसंबंधी एक लेख लिहिला होता. त्यावरून तुम्हाला माझा दृष्टिकोन कळू शकेल. मी ही गोष्ट नाकारत नाही की पीक गेल्यामुळे जिल्ह्यातील गरीब ग्रामिणांना खूप कठीण यातना सहन कराव्या लागत आहेत. मी असेसुद्धा म्हणत नाही की सरकारने वा पुढाऱ्यांनी त्यांना मदत करण्याकरिता जे काही करायला पाहिजे होते ते सर्व केले आहे. मला असेसुद्धा वाटते की स्वतंत्र जाहीर चौकशी करायला लावण्याकरिता हे प्रकरण फार मजबूत असल्याचे सिद्ध झाले आहे. अशी चौकशी सरकारने करायला लावली पाहिजे आणि तिचा निष्कर्ष कळेपर्यंत महसूलवसुली स्थगित ठेवली पाहिजे. या सर्व बाबतीत मी तुमच्याबरोबर शंभर टक्के आहे

“मी तुमच्याशी ज्या बाबतीत सहमत होऊ शकत नाही ती अशी आहे - ग्रामीणांना शेतसारा न भरण्याचा सल्ला देण्यात मला शहाणपणा वाटत नाही. ज्या ग्रामीणांजवळ काहीही राहिले नसेल त्यांनी निश्चितच महसूल भरू नये. त्यांच्या सामर्थ्यहीनतेमुळे ते महसूल भरण्याच्या कर्तव्यातून मुक्त झाले आहेत. कोणत्याही माणसाकडून जे काम होऊ शकत नाही ते करणे त्याचे कर्तव्य असूच शकत नाही. परंतु सत्याग्रहाच्या मार्गावर ते लोक अवलंबून राहिले आहेत की जे महसूल भरण्यासारखे आहेत. आणि असे असूनही महसूल भरायला ते नकार देत आहेत. सरकार आमच्याकडून महसूल वसूल करू शकत नाही असा त्यांचा समज आहे. तुम्ही विचारता की मदतीची विनंती करणाऱ्या हजारो सभांचा काय उपयोग? जेव्हा लोक असे म्हणतात की आम्ही घटनात्मक आंदोलन चालवत असताना आमची झाडेझुडपे, पशुपक्षी आणि घरदार आमच्याकडून हिरावून घेतली जात असतानाही आम्ही याकडे शांततापूर्वक पाहावे असा याचा अर्थ होत नाही काय? जेव्हा कोणालाही काही सहन करायचे नसते तेव्हाच त्याने त्याने घटनात्मक चळवळीची शिफारस केली पाहिजे पाहिजे काय? याशिवाय लोकांमध्ये

वा अनेक लोकांमध्ये महसूल भरण्याची शक्ती नसल्यामुळे सत्याग्रहाचा पुरस्कार करण्यासारखे हे प्रकरण नाही असेसुद्धा अनेकांना म्हणताना मी ऐकले आहे. या लोकांचे प्रकरण तर असे आहे की नियमानुसार खेडूतांना शेतसारा स्थगित करवून घेण्याचा अधिकार आहे आणि महसूल भरण्याची शक्ती नाही म्हणून नाही तर अशी स्थगिती करण्यात येत नाही म्हणून ते महसूल भरायला नकार देत आहेत. सरकारचे म्हणणे आहे की पीक इतक्या प्रमाणात बुडालेले नाही की ज्यामुळे शेतसाऱ्याची वसुली स्थगित केली पाहिजे. शक्य आहे की सरकारला पीक जरी कमी आले तरी ते जितके कमी आले म्हणून सांगण्यात येते तितके कमी वाटत नाही. दुसरीकडे अशीसुद्धा शक्यता आहे की लोकांनाच ते जास्त कमी आले आहे असे वाटत असावे. तुमच्यापासून ही गोष्ट लपवण्याची मला इच्छा नाही की देवधरनी केलेल्या चौकशीचा परिणाम माझ्यावर आणि इतर अनेकांवरही अशा प्रकारेच पडला आहे. यामुळे अतिशयोक्तीच्या शक्यतेची बाजू घेणे आमच्याकरिता अशक्य झाले आहे. ते काहीही असले तरी मी वर सांगितल्याप्रमाणे माझ्या लेखातूनसुद्धा या प्रकरणी निष्पक्ष चौकशीची आवश्यकता असल्याचे जाणवावे अशी पुरेशी कारणे आहेत. याकरिता आपण खूप दडपण आणायला पाहिजे. स्थानिक सरकार जर योग्य उत्तर देत नसेल तर आपण इंग्लंडमध्ये संसदेकडे जायला पाहिजे. आपण संपूर्ण हिंदुस्थानातील जनमत जागृत केले पाहिजे आणि त्याचे सरकारवर दडपण आणले पाहिजे. मला खात्री आहे यात आपल्याला निश्चितच यश मिळेल. दरम्यान गरीब खेडुतांना मदत करण्याकरिता आणि त्यांची उपासमार होऊ नये म्हणून आपण निधी गोळा केला पाहिजे. घाईघाईत माझ्या मनात आलेल्या विचाराची रूपरेषा ही अशी आहे. गेल्या आठवड्यातील 'रिफॉर्मर'मध्ये मी हा विचार अजून स्पष्ट केला आहे. या अंकाची एक प्रत यासोबत पाठवत आहे."

११-४–१९१८

आज प्रेंटना भेटले. त्यांच्याशी खूप गोष्टी केल्या. त्यांना म्हणाले, 'मी जर राजा असतो आणि लोकांनी केलेली मागणी जरी मूर्खपणाने भरलेली असती तरी जर ती सर्वांनी केलेली असती तर मी ती मागणी निदान एकदा तरी पूर्ण केलीच असती.

* * *

दुपारी 'नावली'कडे चालत गेले. गाडीत पत्रे वाचली. माझ्याबद्दलचे दुर्गाचे, माझ्या वडिलांचे बळवंतरावचे आणि पॅट्रिक गेडीझचे. लोकसाहित्य आणि लोकगीतांचा एक कार्यक्रम ठेवण्याची सूचना

केली. मला वढवाणला जायला सांगितले, परंतु ते राहून गेले. वल्लभभाई दोन तास बसले होते. त्यांनी जिनांविषयीच्या गोष्टी केल्या. त्या संपतच नव्हत्या ते म्हणाले, "त्यांना स्वातंत्र्याचा 'मॅझिनी' म्हणतात आणि तुम्ही त्यांना तसा दाखलासुद्धा दिला आहे" असे उद्गार त्यांनी काढले.

सरोजिनीदेवींविषयी लोक गोष्टी करतात. त्याविषयी बापू म्हणाले, "मी तर त्यांच्या पावित्र्याविषयीच उद्गार काढले होते. आणि मी त्यांच्यासाठी जे काही बोललो त्याच्या अर्थासंबंधी ओढाताण करण्याची आवश्यकता नाही. या बाईत इतकी अधिक शक्ती आणि तेज मला आढळले आहे की त्यांच्या चारित्र्याविषयी कोणतीही शंका घेता येऊच शकत नाही. या बाईत किती तरी खोडी आहेत. भाषणे करायची, धमाल करायची इत्यादी. परंतु हे त्यांचे जाहीर जीवन - पोषाख आहे. मी तर त्यांना म्हणालोसुद्धा होतो की तुम्ही 'हे सर्व सोडून का देत नाही?' यावर त्या मला म्हणाल्या, 'याशिवाय तर मी मरूनच जाईन.' मला हे पूर्णपणे खरे वाटते. सार्वजनिक जीवनाबद्दल त्यांना इतका उत्साह वाटत असतो. त्या मनमौजी आहेत. त्याना छप्पन भोग खाण्याची इच्छा असते. त्या कोरडपतीची मुलगी नाहीत, परंतु त्यांना करोडपतीसारखा ऐषोआराम हवा असतो. या साधेपणावरील, दुःख सहन करण्यासंबंधातील भाषण ठोकून येतील आणि लगेच छप्पनभोगाचा आस्वाद घ्यायला बसतील. पण मला खात्री आहे की माझ्यासारखा माणूस मिळाला तर त्या त्यातील अर्धे भोग सोडून देतील. ही बाईच अशी आहे. मी यांना पहिल्यांदा पाहिले तेव्हाच मला असे वाटले की, 'या बाईकडून मी हे काम कसे घेऊ शकेन?' त्या आश्रमात आल्या तेव्हा एकदाच मी त्यांना आश्रमाचे अन्न खायला लावू शकलो. इंग्लंडमध्ये मी जमिनीवर, खाली संतरंजीवर बसून काम करत होतो. अनाथाश्रमातही तुम्हाला गादीतक्के देऊ शकतात. पण तिथे गादीतक्के नव्हते. एके दिवशी तिथे त्या अचानक आल्या. मी खात होतो त्यातील घेऊन खाऊ लागल्या. त्यांच्याजवळ त्यांची गोष्ट तरी कशी काढायची? मग तर मी त्यांना सरळ प्रश्न विचारू लागलो - 'तुमचे गृहजीवन कसे आहे? तुम्ही केव्हा झोपता? उठता?' त्याचे उत्तर देत त्या म्हणाल्या, 'मुले तर माझ्या आधीच उठलेली असतात, लहानमोठी मुले माझ्या अंथरुणात येऊन माझ्या अंगावर खूप उड्या मारतात.' या परिस्थितीचे कसे वर्णन करावे? असे वाटते की ती यांच्यावर खूप प्रेम करतात. हैदराबादमध्येसुद्धा मुलांशी यांचे किती निकटचे संबंध? यांना मुले पत्र लिहितात तीसुद्धा कशी? आणि या मुलांना पत्र लिहितात ती कशी? मी पाहिले आहे की यांनी मुलांना खूप ज्ञान दिले आहे.

यांचा खोडकरपणा तरी किती? इंग्लंडमध्ये माझी रुग्णवाहिका खराब झाली होती. त्या वेळी त्या माझ्याजवळ एकट्या राहत होत्या. माझ्या सांगण्यावरून स्वयंसेवकाच्या तुकडीसमोर त्यांनी हिंदुस्थानीत भाषणसुद्धा दिले होते. यांना माझी परिस्थिती कशी कळली? मी यांना समजावून सांगितले की देशाकरिता तरी तुम्ही इंग्रजीच्या शौकाचा त्याग केला पाहिजे. हा घोट तीने घेतला. ती लगेच म्हणाली, 'तुमचे म्हणणे बरोबर आहे.' ही बाई हिंदुस्थानकरिताच जगते आहे. ही स्वतःची बोलण्याची आणि लिहिण्याची शक्ती हिंदुस्थानकरिताच खर्च करते आहे. मला वाटते की हीसुद्धा मालवीयजींप्रमाणे अफलातून वर्तन करते. हिची मौजमजा सुरू असते. मस्तीसुद्धा करत असते. पण मला वाटते की हे तर हिला शोभूनच दिसते. मी हिच्या नवऱ्याला ओळखतो. बहाद्दूर माणूस आहे. त्यानी यांना पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. मला वाटते की यांच्या वर्तनात काहीही गुप्त नाही. यातूनच यांच्या शुद्धी सिद्ध होते. मी तर या बाईला खूप तपासले आहे आणि म्हणूनच हे सगळे मी खात्रीपूर्वक सांगू शकतो. हं, यांना काही वाईट सवयी आहेत. या फार अतिशयोक्ती करतात. माझ्याबद्दल त्यांनी जे लिहिले आहे त्याबद्दल मी त्यांच्यावर ठपकाही ठेवला आहे. मी यांना म्हणालो की तुम्ही माझा अपमान केला आहे. माझ्याबद्दल तुम्ही असे शब्द लिहू शकत नाही. परंतु यांचा तर स्वभावच असा आहे की वरवंट्याखाली जरी चेंगरत असेल तरी ती वरवंट्याचीच गाणी गाईल. इतकी गोष्ट सोडली तर हिंदुस्थानकरिताच जगणारी दुसरी स्त्री कोण आहे?"

आगगाडीतून उतरून रथात बसले. वडोद गावातील लोकांचा उत्साह अपूर्व होता. सुंदर मंडप तयार केला होता.

१२-४-१९१८

गोष्टी-गोष्टीत बापू म्हणाले, "जर्मनी जर आपल्या किनाऱ्यावर आला तर किती अमूल्य संधी मिळेल! शस्त्राशिवाय तर आपल्याशी लढणार नाही आणि आपण काही म्हणालो तर ते ऐकणार नाही."

नडियाडमध्ये आयुक्तांची जंगी सभा. एकामागून एक लोक बेधडकपणे म्हणाले की आम्ही तर प्रतिज्ञापालन करणारच आहो. ती कधीही तोडणार नाही. जिल्हाधिकारी, आयुक्त यांच्यासमोरच त्यांनी गांधजींचा जयनाद केला. आयुक्तांच्या शब्दांत गोडवा होता. अंमलदार आपल्या तोऱ्यात वागत नव्हते. "गांधी माझे मित्र आहेत, ते पवित्र आत्मा आहेत, मोठे संन्यासी आहेत, परंतु अशा बाबतीत संन्यासी

तुम्हांला सल्ला देऊ शकत नाहीत” अशा त्यांनी थंडपणे गोष्टी केल्या. हा आतापर्यंतच्या आपल्या वर्तणुकीचा परिणाम आहे.

कालच्या टपालात काही जाडजूड पत्रे होती. एक बळवंतराव ठाकुरांचे आणि दुसरे पॅट्रिक गेडीझचे. पॅट्रिक गेडीझच्या (या काळात ते बॉम्बे स्कूल ऑफ इकॉनॉनिक्सचे निदेशक होते.) पत्रातील मुख्य मुद्दे असे होते.

१. परिषद खऱ्या अर्थाने इंग्रजी पद्धतीचीच होती. तिच्यात योग्य माणसे योग्य शैलीने आणि प्रसंगानुरूप पद्धतीने योग्य तेच बोलली.

२. इथे आतापर्यंत इतकी मोठी परिषद खऱ्या अर्थाने भरली नव्हती. ही गोष्ट खरोखरच इंग्रजांपासून शिकण्यासारखी आहे याचा आपण विचारच केला नाही. तिथे तर एवन नदीच्या काठावर स्टॅफर्डमध्ये शेक्सपिअरची नाटके होत असतात. तुमच्या नाटकशाळा अशा बाबतीत निष्क्रिय आहेत. तुलसीदासची नावनिशाणीही नाही.

३. पश्चिमेच्या उदाहरणे आणि पद्धतीप्रमाणे ते हे काम का करू शकत नाहीत? वेल्समध्ये दरवर्षी एक मोठा जलसा होत असतो. तिथे गेल्यानंतर मी पहिल्या जलस्यात हजर होतो. त्यात मी लॉईड जॉर्जना त्याच्या पूर्ण बहराच्या काळात त्यांच्या आग पाखडणाऱ्या वाणीत बोलताना ऐकले. याचे कारण ते आपल्या मातृभाषेत वेल्समध्ये बोलत होते. ते म्हणाले इथे मी गायला आलो आहे.

४. त्यांच्या मंडपात वेगवेगळ्या मंडळांकरिता विभाग करण्यात आले होते. वृंद संगितात प्रत्येक सुराचे मंडळ होते.

५. आयरिश लोक आपली भाषा परत जिवंत करत आहेत. त्याकरिता त्यांना विविध मुद्दे मिळतात. उदाहरणार्थ लांब सुट्यांच्या दरम्यान ते वेगवेगळे संमेलन भरवतात.

६. प्रांताचे उदाहरण घेतले तर ते महाकवी मिस्ट्रॉलची पूजा करत असतात. स्वीड लोकांनी वृद्ध मिस्ट्रॉलला नोबेल पारितोषिक दिले. त्याने या पैशातून प्रांताकरिता संग्रहालय बांधले. हे संग्रहालय काचेच्या कपाटात ठेवलेल्या वस्तुंचा केवळ संग्रह नाही. त्यातून शेती आणि गोपालनाचे प्रशिक्षण मिळते.

७. डेन्मार्कमध्ये एका बिशपने आणि एका गृहस्थाने तेथील युवकांना आणि युवतींना संगीत शिकवण्याची योजना तयार केली. तिथे लिहिणे वाचणे शिकवण्यात येत नव्हते तर गोपालनाचे प्रशिक्षण देत असत. त्याशिवाय लोकगीते आणि लोककथा शिकवण्यात येत असत.

८. तुम्हीही तुमच्या सभांसाठी अशा सार्वजनीक मंडपांची उभारणी करता - पण त्यात सर्वांपर्यंत आवाज पोहोचेल अशी कोणतीही व्यवस्था नसते — आणि ती नसलीच पाहिजे. तुमच्या मोठ्या सभा आणि नाट्यशाळा मोकळ्या मैदानातच भरायला पाहिजे. पूर्वीचे ग्रीक लोक असेच करत असत. आणि त्याच मार्गाने त्यांनी आपली भाषा आणि साहित्य फुलवले होते.

९. हिंदी आणि उर्दूला एक करण्याचे आंदोलन जोरात सुरू करा, असे करणे हे सॅक्सन आणि फ्रेंच शब्दमंडळांना एक करण्यासारखे आहे. इंग्रजांनी या दोन्हींमधून गुणग्रहण केले आहे. जर्मन भाषेला कौटुंबिकता आणि जोम आहे. त्याचबरोबर तिच्यात सुसंस्कृत साहित्यातील सावधगिरी तसेच नवीन गौरव लाभले आहे. तुम्हीसुद्धा येत्या परिषदेत हिंदी आणि उर्दूच्या संयोगाकरिता बक्षिसे द्यावी. तुम्ही या संबंधात निबंध आणि काव्य लिहून घेऊ शकत नाही काय?

याचे (बापूंनी) पुढीलप्रमाणे उत्तर दिले -

## (प्राध्यापक गेडिझ यांना पत्र)

“प्रिय प्राध्यापक गेडिझ,

“तुमच्या अतिशय जिव्हाळ्याने भरलेल्या पत्राकरिता मी खरोखरच फार आभारी आहे.

“पश्चिमेची आम्ही जी क्षुद्रपणाची नक्कल करत आहो त्याबद्दल मला जितके दुःख होते तितके दुसऱ्याला क्वचितच होत असेल. मला तर पश्चिमेकडून बरेच काही घ्यायचे आहे, परंतु विचार न करता मला काहीही घ्यायचे नाही. इंदोरच्या परिषदेत मी भाग घेत होतो कारण मला जनतेच्या हृदयापर्यंत पोहोचायचे होते आणि तिला प्रभावित करायचे होते आणि शक्य होईल तितके तिला भौतिकवादाच्या कचाट्यातून सोडवायचे होते. देशी भाषांच्या समस्येत एक बाजू आर्थिक आहे आणि दुसरी बाजू धार्मिक आहे. मी लोकांसमोर धार्मिक बाजू मांडण्याचा प्रयत्न करतो आहे. माझ्या श्रोत्यांमध्ये मी धार्मिक

बाजूबद्दल कितपत रस निर्माण करू शकतो हे तर परिषदेच्या यशापयशाच्या प्रमाणावरून ठरवले पाहिजे.

"गेल्या वर्षी परिषदेत काँग्रेसचा जो मंडप होता तो काढून टाकायचा मी प्रयत्न केला होता आणि सकाळच्या वेळी केवळ मैदानातच सभा व्हावी असे सुचवले होते. हिला हिंदुस्थानी पद्धत म्हणता येईल आणि ही फार चांगली आहे. उघडी अर्धगोलाकार नाटकशाळा यातूनच निघाली आहे की काय हे जाणून घेण्याकरिता मी उत्सुक आहे. माझा आदर्श तर झाडाखाली उभे राहून बोलावे हा आहे. हजारो वा लाखो लोक असतील आणि त्यांना आवाज पोहोचत नसेल तर त्याची मी फिकीर करणार नाही. लोक काही ऐकायला येत नसतात, पाहायला येत असतात. आणि आपण कल्पना करतो त्यापेक्षा त्यांना जास्त दिसत असते. ॲम्फीथिएटरमध्ये जागेची मर्यादा तर येऊनच जात असते. खरे कौशल्य तर यात आहे की असंख्य लोक तिथे येऊ शकतात आणि तरीही सर्व काम व्यवस्थित चालते. जुन्या काळात वार्षिक मेळावे भरत होते. आताच्या नवीन सामाजिक आणि राजकीय जीवनात धार्मिक तत्त्व जर तुम्ही जोडले तर तुम्हाला संपूर्ण गोष्ट मिळू शकेल आणि तिच्याद्वारे बरोबर काम घेता येणे शक्य आहे.

"परंतु हे सर्व मी तुम्हाला काय लिहितो आहे. आपण दोघेही कामात खूप व्यग्र आहो. पाश्चात्य संस्कृतीच्या ज्वराने ग्रस्त आहो. सनातन स्वरूपाच्या गोष्टीकरिता आपल्याजवळ वेळ नाही. आपल्याबद्दल जास्तीतजास्त इतकेच म्हणता येईल की आम्ही जरी शाश्वताची अपेक्षा करत असलो तरी आमचे काम ते खोटे ठरवतात.

"तुमचे पत्र मूल्यवान संपत्ती आहे. याचा मी जाहीर उपयोग करू काय?

"स्वस्त आणि टिकाऊ घर कसे बांधता येईल याबद्दल तुम्ही मला अवगत करू शकाल साय? पायापासून तर छपरापर्यंतची माहिती मला पाहिजे."

सेवक,

मो. क. गांधी

बापूंचा एक उद्गार - उद्या मला काय मिळेल हे माहीत असलेला एकही इंग्रज मला माहीत नाही. यामुळे ते योगी आहेत असे मला (महादेवभाई देसाईंना) वाटते. आपली प्रजा दीन आहे.

बळवंतराव ठाकोर (बलवंतराय कल्याणराय ठाकोर, गांधीजींचे सहाध्यायी, गुजराती भाषा आणि साहित्याचे विद्वान लेखक) यांच्या पत्रातील मुद्दे -

१. इंडियन सोशल रिफॉर्मरच्या अग्रलेखात जे मुद्दे आहेत त्यातील समितीशिवाय सर्व मुद्दे ठीक आहेत. इतकेच नाही तर ते अतिशय मवाळपणे मांडले आहेत असे वाटते.

२. आपल्यामध्ये जास्त उत्पन्न घेण्याचे कौशल्य नाही.

३. शेतसारा स्थगितीचे धोरण ठरवण्यात घाई होते आहे. स्वतःच निर्णय घेणारांचा आणि मदत करणारांचा प्रश्न चांगलाच मोठा आहे.

४. महसूलखात्यासारखे आडवेतिडवे काम करणाऱ्या खात्यांची रचना संपूर्ण हिंदुस्थानकरिता करण्यात आली आहे. त्याच्या शाखाप्रशाखांनी घेतलेल्या लहानमोठ्या आडनीड निर्णयाचे विविध परिणाम होत असतात. म्हाताऱ्याकोताऱ्यांचे आजार दुरुस्त करण्याकरिता ज्याप्रमाणे शस्त्रक्रिया करत नसतात, गर्भवती स्त्रीला ज्याप्रमाणे खूप जहाल औषध देत नसतात त्याचप्रमाणे अशा खात्यांमध्ये सुधारणा करण्याकरितासुद्धा तात्पुरते वा जलद उपाय करत नसतात.

५. सामान्य लोक ज्याप्रमाणे जयविजयाचे लोभी असतात, द्वेषभावना शिकवणे हीच देशसेवा आहे असे जे समजतात, लोकप्रियता आणि गडबडगोंधळाकरिता भुकेले असलेले लोक ज्याप्रमाणे वर्तन करत असतात त्याप्रमाणे तुम्ही वर्तन करत नाही. तुम्ही जे कोणते काम शिरावर घ्याल ते धर्मबुद्धीनेच घ्याल. कामाची सुरूवात करत असताना जर काही चूक झाली असेल तर ती तुम्ही लगेच स्पष्टपणे कबूल कराल आणि तुम्ही घेतलेला निर्णय बदलवण्यात तुम्ही कधी संकोचणार नाही. यामुळे खेडा प्रकरणी तुम्ही जे काही करत आहा ते मला कळू शकत नाही.

याचे उत्तर -

## (बळवंतराय ठाकोर यांना पत्र)

“भाईश्री बळवंतरायजी,

“तुमचे पत्र मिळाले. त्यातून मला तुमचे माझ्यावरील प्रेम सुचीत होते. मी कृतज्ञ झालो आहे. भाई नटराजननी मत देताना घाई केली असल्याचे मी त्यांना कळवले आहे. तुमच्या युक्तिवादाचे खंडन करण्याऐवजी मी सत्याग्रह कशाला म्हणतो हे मी तुम्हाला समजावून सांगू इच्छितो. मी ‘पॅसिव्ह रेझिस्टन्स’ हा शब्द वापरत असतो खरे, परंतु सत्याग्रहाचा माझा आशय सुचीत करणारा तो शब्द नाही. इंग्रजी ‘पॅसिव्ह रेझिस्टन्स’ हा शब्द विसरून जा. जो नियम मान्य करून आपण कुटुंबात वर्तन करत असतो तोच नियम राजकारणात लागू व्हावा अशी माझी इच्छा आहे. मी पाहत असतो की हिंदुस्थानात लोक घाबरून वर्तन करत असतात, भीतीमुळे ते खरे बोलत नाहीत, ते सरकारची फसवणूक करतात आणि स्वतःचीही फसवणूक करत असतात. लहानात लहान पोलीस अंमलदारही गडगंज श्रीमंताची लाज लुटू शकतो. या परिस्थितीमधून मुक्ती मिळवणे हा प्रत्येक पुढाऱ्याचा धर्म आहे असे मी समजतो. अंमलदार वर्ग जनतेचे ऐकत नाहीत. स्वतःचे काम ईश्वरी आदेश समजत असतात आणि त्याचे उल्लंघन कधीही करता येऊ शकत नाही अशी त्यांची मान्यता असते. या मान्यतेमधून त्यांना मुक्त करणे हीच त्यांची सेवा आहे, आणि देशसेवाही आहे. यामुळे जेव्हा केव्हा लोकांना भीतीला वश होऊन काम करताना मी पाहतो तेव्हा तेव्हा मी त्यांना सल्ला देत असतो की बळजबरीने लादण्यात आलेल्या दुःखातून मुक्त होण्याचा उपाय समजूनउमजून जाणीवपूर्वक दुःख सहन करणे आहे. हा सत्याग्रह आहे. दुःखातून सुटका होण्याकरिता दुःख देणे हा दुराग्रह आहे. पशुबल आहे. बैलाला दुःख झाले तर तो लात वा शिंग मारत असतो. माणसाला जेव्हा दुःख होते तेव्हा आत्मबल वापरून दुःखाचे निवारण करत असताना दुःख सहन करणे त्याचे कर्तव्य असते.

“खेडा जिल्ह्यातील हा झंझावात येण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. आधीही त्यांना हे प्रकार सहन करावे लागले आहेत. इतर स्त्रियाही माझ्या पत्नीशी अशा गोष्टी करत असतात. या वेळी लोकांनी महसुलासंबंधी त्यांनी आपल्या व्यथा व्यक्त केल्या. त्यांनी जरी महसूल भरला तरी तो ते आपल्या मर्जीने भरणार नाहीत, भीतीने भरतील. त्यांच्यातील अनेक आपली जनावरे विकत आहेत, वा आपली अमूल्य

झाडे कापत आहेत. हे दुःख आपल्याला कसे दिसू शकेल? मी ते माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे. याचे निवारण कसे होईल? अर्ज करून? अर्ज तर त्यांनी केले आहेत. नटराजन म्हणतात व्हाईसरायजवळ जा, इंग्लंडमध्ये जा. सर्वसामान्य रयतेला मदत कशी मिळेल? मध्यंतरी झाडे कापली जातील आणि पैसे भरले जातील. मग हाकारा कशासाठी करायचा? हा लढा कायदा बदलवण्याकरिता नाही तर कायद्याची अंमलबजावणी व्हावी म्हणून आहे हे कळायला पाहिजे. गुन्हेगार फासावर चढल्यानंतर दाद कशाची मागायची? अशी तर अनेक निर्दोष माणसे फासावर चढली आहेत आणि तेही आपल्या दुर्लक्षामुळे. आपल्याजवळ दोनच उपाय आहेत. कर वसूल करायला येईल त्याला दंडा मारून हाकलून लावण्याचा वा आम्ही कर भरणार नाही असे त्याला विनयपूर्वक सांगण्याचा. तरीही ते शेतसारा घेऊन जातील, मग मी कशाचा बचाव केला? असा प्रश्न तर तुमच्या मनात उपस्थित होत नाही. जर उपस्थित होत असेल तर सुरुवातीलाच मी याचे उत्तर दिले आहे.

"या लढ्यात अनायासे लोकांना धर्माचे, नीतीचे, संपाचे, सत्याचे आणि अहिंसेचे प्रशिक्षण मिळते आहे. सरकारलाही प्रजेचे मत मान्य करण्याचे शिक्षण मिळते आहे. यात द्वेषभावनेला अवकाशच नाही. सरकारवर दडपण आणून न्याय मिळवायचा नाही, सरकारची न्याय करण्याची वृत्ती जागी करण्याकरिता, सरकारला न्याय करायला लाण्याकरिता प्रेरित करायचे आहे. परिणाम चांगलाच होईल. अखेरीस आत्म्याचा विकासच होईल. लोक दुर्बल होऊन जरी पराभूत झाले तरी त्याचे काय? केलेले तप कधीही वाया जात नसते. परागती प्रगतीकरिताच होत असते.

नेहाभिक्रमनाशोऽस्ती प्रत्यवायो न विद्यते ।
स्वल्पमप्यस्यधर्मस्य त्रायते महतो भयात ।।

"अजून काही विचारायचे असेल तर निश्चितच विचाराल बरं काय.

मोहनदासचे वंदेमातरम"

आज देवदासला लिहिलेल्या पत्राचे उत्तर आले. देवदासने आधीच्या एका पत्रात उपवासासंबंधी प्रेमात एक टोमणा मारला होता. त्याचे उत्तर -

## (देवदास गांधींना पत्र)

"चि. देवदास

"तुझे पत्र मिळाले. मी तुला आधीच लिहिले आहे. ते मिळाले असेल. तुझ्या प्रकृतीविषयी तू कळवले नाही. तू बहिणींची सेवा करतो आहेस हे तर मला फारच आवडले. शास्त्रांमध्ये आपण वाचले आहे की शिष्य गुरूची सेवा करण्याकरिता जात असतात. हे जितक्या गोड भाषेत सांगितले आहे तितक्याच मनोहर आणि स्वाभाविक भाषेत तुझे वाक्य आहे. ही तुझी सेवा तुला किती उच्च पातळीवर नेईल याचा हिशेब करण्याचे सामर्थ्य माझ्यात नाही.

मी एका दिवसाकरितासुद्धा पस्तीस टक्क्याहून जास्त वृद्धी कधीही मागितली नाही. याचे रहस्य समजून घेणे सोपे आहे. मी हे प्रकरण अधिक ताणूच शकत नव्हतो. मजुरांच्या निर्धारामुळे मालकांनी ही वृद्धी दिलेली नसून माझ्या उपवासामुळे दिलेली आहे असे ते आताही मान्य करतात. मी जर जास्त मागितले असते तर तो अत्याचार झाला असता. मी जास्त मागण्याच्या स्थितीत होतो तरीही मी किमान मागितले. असे मला माझ्या सरळपणाने, विवेकाने, नम्रतेने सुचवले. मी उपवास केला नसता तर मजूर हारलेच असते. उपवासामुळे ते प्रतिज्ञेवर शब्दशः टिकून राहिले. या टिकावामुळेच त्यांची किमान मागणीच उचित होती. अशा प्रकारच्या टिकावात केवळ शब्दांचेच पालन होऊ शकते आणि ते झाले. माझ्या किमान मागणीमुळे माझ्या उपवासात जे दोष होते ते अगदी किमान झाले. माझ्या उपवासाचे महत्त्व इस्थरबहेनला खूप चांगले कळले. त्यांनी बायबलमधील एक वाक्य तारेने पाठवले. त्याचा अर्थ असा आहे - "माणूस जेव्हा आपल्या मित्राकरिता आपल्या जीवाचे बलिदान करतो तेव्हा तो त्यापेक्षा दुसरा कोणताही मोठा त्याग करू शकत नाही. (सेंट जॉन १५)" माझ्या या उपवासाची गणना आतापर्यंतच्या माझ्या मोठ्यात मोठ्या कामात मी करतो. या उपवासाच्या वेळी मला जो शांततेचा अनुभव आला तो अलौकिक होता.

अहमदाबादच्या कामात मला जो आनंद मिळत होता तो इथे मिळू शकत नाही. मनात उद्वेग असतो आणि नाना विचार येत असतात. लोकांना रहस्य बरोबर कळले असे अनेकदा दिसते. केव्हा

केव्हा कळले नाही असाही आभास होतो. तेव्हा मी दुःखी होतो. काम तर चांगलेच होते आहे, परंतु आता मानसिक थकवा आला आहे. महमदअलीच्या लढ्याचे ओझे मला चिरडून टाकत आहे. तो हाती घेऊनच सुटका आहे. ईश्वर मला याकरिता शक्ती देईल अशा आशेने बसलो आहे आणि यामुळे खोलवर कुठेतरी शांत वाटत आहे. बा माझ्याबरोबरच आहे.

छोटेलालला सांगशील की तुझी लेखणी परत थकल्यासारखी वाटते आहे. मला विणाईच्या कामाची अधिक विस्तृत माहिती कळवशील.

बापूचे आशीर्वाद

रात्री मुंबईला जायचे आहे. आयुक्तांची निष्फळ सभा. शेतकऱ्यांची जबरदस्त प्रतिज्ञा. या सर्वांमुळे ते खुश खुश झाले होते. बऱ्याच गोष्टी सुरू होत्या. त्या सुरू असताना निघालेले उद्गार -

इंग्रजांच्या खुबीचा मी बरोबर अभ्यास केला आहे आणि त्यांचे मी जीवनात अनुसरण केले आहे. मी जितक्या सरळपणाने वागतो तितका कोणीही वागत नसेल. माझे जितके इंग्रज मित्र आहेत तितके हिंदुस्थानात क्वचितच कोणाचे असतील. इंग्रज दीन नाहीत, आपण दीन आहो. असा एकही इंग्रज आढळणार नाही की जो आज सायंकाळी खायला काय मिळेल याचा विचार करत असेल.

आपला लढा सुरू असतानाच हा स्वराज्याकरिताचाच लढा आहे असे समजा अशी ग्रामीण लोक आपली स्वतःची समजूत करून घेत आहेत. आपल्या स्वराज्यातील संसदेचे पहिले काम आपल्याला आपली जमीन देणे असेल. मी जोपर्यंत जीवंत आहे तोपर्यंत ही गोष्ट मी कसा विसरू शकतो?

सरकार जनतेसमोर सत्याग्रह करू शकतच नाही.

मोर संघवाणी आणि त्यांच्या घोडीची गोष्ट काढली. काठियावाडमध्ये तर वीर रस खदखदतच असतो. समोरासमोर, महिनेंमहिने लढाईतील शौर्य. कटकारस्थान, संसारात वापरलेले चातुर्य, तर्कटपणा, फसवणूक हेच पैसा मिळवण्याचे सूत्र.

१३-४-१९१८

मुंबईला गेले. मुंबईत कारमाईकेल आणि दुबोलेंना भेटले. या लढ्यात लोकांचे नैतिक बळ वाढले काय? त्यांचा प्रामाणिकपणा वाढतो आहे की कमी होतो आहे? या प्रश्नांचे उत्तर त्यांनी दिले. मुलाखत दीड तास चालली. चंदावरकर भेटले.

१४-४-१९१८

मुंबईहून परतले. सत्याग्रहाचे मूळ प्रेम या विषयावर हृदयवेधक बोध. दुपारी स्वयंसेवकांकरिता सूचना लिहिल्या. महमदअलीविषयी मॅफींना (जे. एल. मॅफी) पत्र.

१५-४-१९१८

बापूंचे उद्गार - “आज शरीर बरोबर स्थितीत आले आहे.” प्रँटचे पत्र. सभा निष्फळ झाल्यामुळे दुःखी. चिडलेल्या परिस्थितील उद्गार, त्याचे उत्तर. प्रॅटच्या भाषणाचे उत्तर वर्तमानपत्रामधून (पाहा परिशिष्ट पहिले.). कारमाइकेल यांना पत्र. प्रॅटच्या भाषणाचे उत्तर असलेला गावकऱ्यांना संदेश (पाहा परिशिष्ट पहिले.) स्वामी सत्यदेवसंबंधी लेफ्टनंट गव्हर्नरचे भाषण. रात्री प्रेसची दोन्ही पत्रे पाहिली. इतरही जवळपास दहाबारा खाजगी पत्रे. इतके सगळे काम पाहून समोरचा आश्चर्याने थक्क होतो. “आत्म्याची शक्ती ओळखणे म्हणजे आत्मभान. आत्मा तर बसल्या बसल्या जग हालवतो. मी काय करतो आहे?” या शब्दांचा साक्षात्कार. “प्रतिज्ञा न केलेला माणूस सुकाणू नसलेल्या जहाजासारखा असतो. तो इकडेतिकडे भरकटतो आणि अखेरीस त्याचा नाश होतो.” - या शब्दांत मलाही बोध दिला.

१६-४-१९१८

दतेली आणि चिबोदरा. चिबोदरात सुंदर सभा. सभेला अनुरूप भाषणसुद्धा. “दयानंद स्वामींच्या नियमानुसार चालतो त्याला वेदनांचा ध्वनीही ऐकू येत असतो आणि तो यमनियमांचे पालनही करत असतो. यामुळे प्रतिज्ञेकरिता ही भूमी फार अनुकूल आहे.”

नायकाना येथील बंधूंना पत्र -

## (नायकाना येथील रहिवाश्यांना पत्र)

“तुमच्यातील पंचवीस जणांची जमीन जप्त करण्यात आल्याचे मी नुकताच ऐकले. जर तसे असेल तर सर्वप्रथम मी तुमचे अभिनंदन करतो. ही जप्ती कागदांवरच राहील असे मी समजतो. असे असले तरी तुम्ही दुःख सहन करण्याची प्रतिज्ञा केली आहे. यामुळे मला तर तुचे सांत्वन करण्याचीही आवश्यकता वाटत नाही. तुमचे मी अभिनंदन करतो.”

१७-४-१९१८

ओड येथे गेले. लोकांनी फार ठाठमाठ केला होता. परंतु सभेची कोणतीही फलनिष्पत्ती झाली नाही. लोकांमध्ये खूप फूट होती. जोहानिसबर्ग येथे टपाल लिहिला - मणिलालला, श्रीयुत, श्रीमती आणि कुमारी वेस्टला सुंदर पत्रे लिहिली. त्यांची नक्कल करून ठेवली नाही. पढियारच्या अंत्यजाने श्लोक वाचले. त्यात सुधारणा केली आणि भूमिका लिहिली. हे सर्व सभेच्या आधीच्या दोन तासात. सायंकाळी घरी परतत असताना बँकर आणि मी रस्ता चुकलो. चार मैलाचा फेरा झाला. आणि मालेज स्थानकावर पोहोचल्यानंतर बापूंचा ठपकाही खावा लागला.

१८-४-१९१८

रास येथे गेलो. तेथील निसर्गसौंदर्य, उघड्या नाटकशाळेसारखे मैदान पाहून चकितच झालो. सुंदर भाषण. ‘लोकसंग्रह’ या शब्दाचा प्रयोग.

१९-४-१९१८

नडियाड. रामनवमी. काही पत्रे लिहिली. मुख्य हनुमंतरावांना आणि काही मद्रासींना. कुंभकोणमधील वीस वकिलांनी आणि पदवीधरांनी लिहिले की आम्ही हिंदी शिकण्याची वाट पाहत आहो. कोणता तरी हिंदी शिक्षक पाठवा. देवदासला पाठवण्याचा विचार.

# (मद्रासींना पत्र)

"तुम्हा लोकांचे इतक्या अधिक संख्येतील सह्यांचे पत्र मिळाल्यामुळे मला फार आनंद झाला. शक्य तितक्या लवकर मी शिक्षक पाठवीन. मी अशा कोणत्या तरी माणसाच्या शोधात आहे की जो हिंदींच्या प्रेमामुळे पगार न घेता स्वतःहोऊन शिकवायला तयार होईल. अशा माणसाची सेवा मिळवण्याच्या मी प्रयत्नात आहे. मद्रास प्रांतातील लोक याकरिता किती प्रयत्नशील आहेत यावरच या महान राष्ट्रीय कार्याचे यश अवलंबून आहे. तमिळ बंधुभगिनींनी प्रसंगानुरूप उचीत असे शौर्य दाखवावे अशी माझी फार इच्छा आहे. हिंदुस्थानच्या एका टोकापासून तर दुसऱ्या टोकापर्यंतच्या व्यवहाराकरिता संपर्काचे माध्यम हिंदी भाषा झाली तर देशसेवा करण्याची आपली शक्ती असीम वाढेल."

सुबेदार आला. त्याच्याशी गोष्टी. आम्हांला पैसा दिसत नाही. मुंबईत पैसा गोळा केल्यानंतर तो इथे येतो. त्याचा फार वाईट परिणाम होतो. रात्री 'पेईल, फेईस्ड' शब्दाच्या गुजराती रूपाकरिता खूप डोकेफोड केली. अखेरीस कंटाळून बापू म्हणाले, "भाई राहू द्या, हे शब्द आपल्याला परवडत नाहीत. 'गोरा' शब्दच चांगला राहील."

२०-४-१९१८<br>आणि<br>२१-४-१९१८

अजरपुरा, कासोल आणि समरखा - तिन्ही ठिकाणी सभा. अजरपुरात सुंदर भाषण. अजरपुरात म्हणाले, "या लढाईत ग्रामपंचायतींचा पुनरुद्धार करायचासुद्धा हेतू आहे." रस्त्यात सुबेदारला उलटी झाली. रात्री अहमदाबादला गेलो. अंबालाल, आनंदशंकर वगैरे भेटले. दुसऱ्या दिवशी रात्री परत फिरलो. परतत असताना अहमदनगरची सत्याग्रहपद्धती शिकायला आलेल्या दक्षिणी बंधूविषयी गोष्टी निघाल्या असता म्हणाले, "हे लोक तर असे समजतात की ही पद्धती तर लगेच अंमलात आणणे शिकता येऊ शकेल अशी गोष्ट आहे. लहानात लहान दक्षिणेतील माणसाला ही खोड आहे. त्यांना पाच मनिटात गोष्ट आटपायची असते." त्यावर ॲन्ड्र्यूज म्हणाले, "हे लोक फार हुशार आहेत. एक मिनिटसुद्धा जास्तीचा घेत नाहीत." त्यावर बापू म्हणाले, "ही महाराष्ट्राची उत्तम बाजू आहे. "

२२-४-१९१८

सकाळी पडोळी आणि सुणाव गावात सभा झाल्या. सुणावमध्ये अपूर्व उत्साह. जवळपास दोन हजार लोक होते. पडोळीत झांजताशात स्वागत झाले. त्यातून सुचीत झाले की झांजताशात जो गोडवा, सुलभता वगैरे ऐकायला मिळतात तो बँडमध्ये नाही. आपली प्रवृत्ती बँडसारखी कृत्रिम होणार नाही हेच पाहायचे आहे. झांजताशात पुरातन माधुर्य असल्याचे जाणवते. बँड बेसूर आहे. आपला कल एकरागी माधुर्याकडे असला पाहिजे. भेसळीकडे नाही. सुंदर भाषण. तिथून आल्यानंतर प्रेटला पत्र, घोसलला पत्र. व्हाईसरायला पत्र.

रात्री मुंबईला जायला निघाले. मेलमध्ये गर्दी असल्यामुळे आम्ही वेगवेगळे झालो. बाकडून संतोकबेन आणि मगनलालभाईंमधील तक्रारी आणि इतर गोष्टी ऐकल्या. त्याचा निपटारा करण्याकरिता सकाळी उठून मेलमध्येच पत्र लिहिले. ते पुढीलप्रमाणे होते -

## (मगनलाल गांधींना पत्र)

२३-४-१९१८

“बाकडून ऐकले की तुझ्यात आणि संतोकमध्ये काही बोलाचाली झाली आहे. तुझा चेहरा उतरलेला होता. तुमच्याबद्दल असे होऊ नये असे इच्छितो. संतोकला तू धैर्याने पुढे ने. अधीरपणा प्रेमाचा अभाव सुचवतो. आपण तिला अपकार्यात मदत केली नाही तर तितके पुरे आहे. तुझी काळजी तुला जाळते आहे. पुढे जाऊ देत नाही. या स्थितीतून तू आता मुक्त व्हायलाच पाहिजे.

मात्रा स्पर्शास्तु कौंतेय शीतोष्ण सुखदुःखदा ।
आगमापायिनो नित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ।।

या श्लोकाचे मनन कर आणि त्याचे रहस्य तुझ्या आत्म्यात उतरव. हा श्लोक अतिशय जोरदार आहे. मी जेव्हा खूप चिंताग्रस्त असतो तेव्हा हा श्लोक मला शांतता देत असतो. भूपतरायच्या कौटुंबिक दुःखात संतोकचा उपयोग कर. ती ते दुःख दूर करू शकते. दूर व्हायलाच पाहिजे.”

# (कस्तुरबा गांधींना पत्र)

तू मगनलालच्या आईला सुख द्यायला पाहिजे. आईवडिलांनी त्याचा त्याग केला आहे. तो स्वतः माझे काम करतो आहे. माझ्या कामाचा वारसा घेण्याकरिता आता मगलालच पात्र आहे. त्याला शक्ती कशी मिळेल? त्याला दुःख झाले तर तुला रडू येते, तू त्याला प्रेमाने जेवू घालतेस. त्याच्या अनेक काळज्यांमधून त्याला बाहेर काढणे तुझे कर्तव्य आहे. भूपतरायच्या कुटुंबात क्लेश आहे. तो तू मिटव. तू असे काम करत राहावे अशी माझी इच्छा आहे. यात खरी विद्या आहे, मोठेपणा आहे. काठाशिवायची पांढरी साडी नेसण्यात काही अडचण आहे असे समजू नकोस. मी लवकर येण्याचा प्रयत्न करीन.

दुपारी ‘भिकारी समिती’च्या सभेत गेले. तिथून येऊन जेवले. मी वाट पाहत बसलो होतो. रात्री होमरूलवाल्यांनी बोलावलेल्या खेडासंबंधीच्या सभेत गेले - नामदार पटेल सभेचे प्रमुख होते. टिळकसुद्धा अकस्मात येऊन ठेपले. पटेलनी गुजरातीत सुरू केले. आणि सर्व कामकाज गुजराती आणि मराठी भाषेतच चालले. नशा केल्याप्रमाणे पटेलसाहेबांनी उत्साहत केलेले भाषण. सुबेदार, हर्निमन, वगैरेची भाषणे शिव्यांनी भरलेली होती. प्रेटची जिद्द ही अशी होती. बापूंचे शांत, सौम्य, सुरुचीपूर्ण भाषण.

२४-४-१९१८

मुंबईत माझ्या कोटातून जवळपास सवाशे रुपये आणि पंचवीसशे रुपयांची पैसे जमा केल्याची पावती चोरीला गेली. दुसऱ्या दिवशी मौलाना अब्दुल बारी भेटले. दुपारी जमनादास आले होते. त्यांच्याशी खूप गोष्टी झाल्या. त्या दरम्यान म्हणाले, “कालच्या सभेचा सूर मला मुळीच आवडला नाही. इंग्रजांच्या नावावर टीकाटिप्पणी करणे मला मुळीच आवडले नाही. आणि कालच्या सभेत हेच सुरू होते. एखाद्या दिवशी मला यांच्याशी खूप कठोरपणे बोलावे लागेल.”

दुपारी साडेचार वाजता दिल्लीला जायला निघालो. सायंकाळपर्यंत इकडच्यातिकडच्या थोड्याशा गप्पा झाल्या. लखनौत काँग्रेसचा एक स्वयंसेवक होता. त्याच्याशी ओळख काढून एक सिंधी विद्यार्थी भेटायला आला होता. त्याने तिकिट आणि जागा राखून ठेवली होती. रस्त्यात तो आमच्या डब्यात आला. तो म्हणाला की मी ‘इंडियन डिफेन्स फोर्स’मध्ये प्रशिक्षण घेऊन आलो आहे. लगेच त्याला जवळ घेतले आणि म्हणाले, “थोडे दिवस माझ्या आश्रमात का येत नाही? सुट्या केव्हा आहेत? आणि तू तिथे जितके काही शिकून आला आहेस ते सगळे आमच्या मुलांना शिकव.”

रात्री नवसारी स्थानकावर माझे वडील भेटले. मला पाहून त्यांना खूप आनंद झाला. गाडी निघत असताना बापूंनी त्यांना एकच प्रश्न केला, “कसे आहा, निश्चिंत आहा ना?” माझे वडील म्हणाले, “हो, जी.”

२५-४-१९१८

दुसऱ्या दिवशी सुरू असलेल्या मेलमध्ये पत्रे लिहून टाकली. मग हरिलालची गोष्ट निघाली, सुबेदारची निघाली, बँकरची निघाली आणि अनेकांच्या निघाल्या. सुबेदारची शिफारस घेऊन कलकत्त्याला जाण्यासंबंधी हरिलाल म्हणत होता आणि मी (महादेवभाई) त्याला कोणताही विरोध दाखवला नाही. ते पाहून मला खालीलप्रमाणे उपदेश केला. या उपदेशात मला जाणवले माझ्यावरील अपूर्व प्रेम, माझ्यात सुधारणा घडवून आणण्याची तीव्र इच्छा आणि याचबरोबर माझ्या स्वभावाची मुळापासून त्यांनी घेतलेली परीक्षा. हे पाहून मी चकित झालो. माझ्या प्रशंसेने मला जितका आनंद कधीही झाला नाही तितका मला या परीक्षेने झाला. "तू अगदी भोळा आहेस. हा तुझा दोष आहे असे मी म्हणेन. गुण नाही. तू तुझ्या आजूबाजूच्या वातावरणाने प्रभावित होत असतो. वातावरणाला दाबून वर चढण्याची शक्ती तुझ्यात दिसत नाही. याचा अर्थ दुष्टपणाच्या वातावरणात तुझे निश्चितच पतन होईल. बीभत्स वस्तू पाहिल्यानंतर ज्याप्रमाणे चित्रात बिभत्सता आल्याशिवाय राहत नाही त्याचप्रमाणे हे. तू जर अयोग्य वातावरणात सापडला तर त्यापासून पूर्णपणे अलिप्त होण्याऐवजी त्यात तू रस घेशील. रममाण होशील."

मी म्हणालो, "तुम्ही केलेले हे विश्लेषण अगदी खरे आहे. मी हे कबूल करतो आणि त्याला सुधारणा करण्याचा मी बरोबर प्रयत्न करीन. परंतु मी . . . सुधारण्याकरिता मी केव्हा बसू?"

बापू - दुसऱ्याला सुधारण्याची गोष्टच कुठे आहे? या जगात कोणीही दुसऱ्याला सुधारू शकत नाही. स्वतःलाच सुधारायचे आहे. दूर हो. अशा प्रकारे दूर राहूनच प्रभावित करशील. काही विशिष्ट गोष्टी तर तुझ्यासमोर होऊच शकत नाहीत. तुझ्यासमोर विशिष्ट शब्द बोलायला आणि करायला समोरचा माणूस जेव्हा लाजेल तेव्हाच त्याच्यावर तुझा प्रभाव आहे असे म्हणता येईल. अतिशय शुद्ध वातावरणात राहायला शीक.

कला आणि नीतीचा संबंध माहीत असूनही नीतीच्या दृष्टीने वाईट पुस्तकेही शैलीकरिता वा विषयाकरिता वाचण्याची मला जी आवड होती ती मी त्यांना सांगितली. बापू लगेच म्हणाले, "माझे तर तुझ्या या आवडीकडे सारखे लक्ष असते."

मुंबईच्या टोळीत तर मला तरी केवळ बँकरच चांगले वाटले. उमरसुद्धा खरा आहे. जबरदस्त मुसलमान आहे. मुसलमानांमध्ये प्रियअप्रियच्या वा आवडीनिवडीच्या भावना फार तीव्र असतात. हे सोडले तर तो फार चांगला माणूस आहे. खूप सुसंस्कृतसुद्धा आहे.

हरिलालने एका क्षणात आपले जीवन बिघडवून टाकले. दुर्बिणीत जशी एखादी गोष्ट मोठी दिसते तसे माझे सर्व दोष त्याच्यात मोठे होऊन दिसतात. गुण लहान दिसणाऱ्या भिंगात प्रतिबिंबित होताना दिसतात. माझ्यात ज्या गोष्टी, जशी की उदारता, ती त्याच्यात अवगुणासारखी झाली आहे. माझ्या तिन्ही मुलांच्या असंतोषाचा बदला घ्यायला देवदासच जन्माला आला आहे असे मला वाटते.

स्थानकावर येता येता म्हणाले, “माझ्या शिक्षणाच्या खर्चाकरिता विलायतेतून आल्यानंतर मी बाचे सर्व दागिने विकून टाकले होते. तुला कल्पना नसेल की बाच्या हातात केवळ एक बांगडी आहे. हरिलालसुद्धा असे करू शकतो. वराचा बाप कमीत कमी सतराशे रुपयाचे दागिने मुलीला अहेरात देत असतो. यामुळे मुलीकरिता आपल्याला काहीही खर्च करावा लागत नाही. आणि अडचणीच्या वेळी हे दागिने विकायला काही हरकत नसते.”

ट्रेनमध्ये भरतपूरपासून चंदावरकर, परांजपे आणि पटेलबरोबर पहिल्या वर्गात गेले. खूप गोष्टी केल्या असतील. मी विचारले त्यांना सहमत करू शकला काय? निश्वास टाकून ते म्हणाले, नाही, मतभेद काही विशेष नव्हते. तिथे गेल्यावर ते विचारत होते – पुढे काय करायचे?' मला आपली मोठी माणसे फारच लहान वाटतात. या प्रसंगाशी त्याचं काहीच देणंघेणं नाही, असं त्यांच्या वर्तनावरून वाटत होतं."

गाडीत ‘हिंदू’ पत्राचा प्रतिनिधी व्यासराव मथुरेहून बरोबर होता. स्वेच्छेने आणि कर्तव्य म्हणून लष्करभरतीच्या गोष्टी केल्या - अहिंसाव्रतवाले तुम्ही लष्करभरतीला उत्तेजन कसे देऊ शकता? मला तुमची भूमिका समजावून सांगा. त्यांना सांगितले की युद्धाच्या तर मी विरुद्धच आहे. परंतु ज्याला लढायचे असेल त्याला मी लढायला सांगतो आहे. वार्ताहराला हा मुद्दा कळू शकला नाही. बापू म्हणाले-

“माणसात आवेश भरलेला असतो हे मला मान्य आहे. माणसाला मरणे शिकवण्याआधी त्याच्यात मारण्याची शक्ती असली पाहिजे असे मला वाटते. कोणी जर मला सल्ला विचारायला आला की लढणे ही चांगली गोष्ट आहे की नाही तर मी त्याला स्पष्ट उत्तर देईन की ‘चांगले नाही’. कोणाच्या मनात जर निश्चितपणे लढायचेच असे ठरलेले असेल, पण या प्रसंगी लढणे चांगले आहे की नाही अशी

जर त्याच्यासमोर समस्या असेल वा त्याच्या मनात शंका असेल तर मी त्याला सांगेन की आज सुरू असलेल्या या लढाईत भाग घेतला पाहिजे."

इतके सांगितल्यानंतर त्याला विचारले, "कळले?" समजले असेल तर सांग की काय समजले? वार्ताहराने काही सांगितले, परंतु काय कळले हे सांगितलेच नाही. मग म्हणाले -

"एक साधेसरळ उदाहरण घेऊ. माझा मुलगा येऊन मला म्हणाला की लग्न केल्याशिवाय मी राहू शकेन असे नाही. मला निश्चितपणे माहीत आहे की ब्रह्मचर्य याच्यासाठी चांगले आहे. असे असले तरी मी याचे लग्न लावून दिले पाहिजे, असे एवढ्याकरिता की याने चुकीच्या मार्गाने जायला नको. त्याचे लग्न झाल्यानंतर शक्य होईल तितका संयमाने राहा असे मी त्याला समजावीन.

२६-४-१९१८

रात्री खूप भेटीगाठी घेऊन झोपले. सकाळी मला बोलावून प्रवचन दिले - तू प्रेमाने करतो म्हणून इतके का सांगावे? परंतु आध्यात्मिक दृष्टीने तू फार वाईट काम केले असे सांगणे भाग आहे. तू त्या दिवशी मी आल्याशिवाय का जेवला नाही? मला त्या दिवशी फार त्रास झाला. तू जर प्रेमभावनेने जेवला नसशील तर हे प्रेम व्यर्थ आहे. परंतु मी आलो आणि त्यानंतर आपण सर्व मिळून आनंदात एका ठिकाणी गोळा होऊन सोबतच जेवू या भावनेने तू जेवला नसशील तर ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे असे म्हणता येईल. तुला मला लवकर मोकळे करायचे होते, परंतु मी पाहिले की तू जेवलेलाच नव्हता. अशा प्रकारे मी तुझ्याकडून काम कसा घेऊ शकेन? तुला तुझ्या वाईट सवयीसुद्धा चांगल्या आहेत असे समजण्याची सवय लागली आहे. अमूक होऊ शकत नाही असे कसे चालेल? दुर्गाने आणि आणि तुझ्या वडिलांनी तुला खूप लाडावून ठेवले आहे.

सकाळी हिलच्या प्रारंभिक सभेत गेले. टिळक, श्रीमती बेझंट आणि अलीभाईविषयी पहिली तक्रार मांडली. हिलने विचारले, ”त्यांच्या अनुपस्थितीने काय बिघडते?” बापूजी ताडकन म्हणाले, “माझे बिघडते.” दुसऱ्या कोणी त्यांना पाठिंबा दिला नाही. खूप चिडून आले. पण लिहायला सुरुवात केली. लिहून ॲन्ड्र्यूजला दाखवले. सुधारणा करायला बसले. मझरूल हक होते. रोजनिशी लिहिल्यानंतर मालवीयजी आले.

# (सर क्लॉड हिल यांना पत्र)

प्रिय सर क्लॉड हिल,

या अतिशय महत्त्वाच्या परिषदेद्वारा (ही परिषद लॉर्ड चेम्सफोर्डनी बालावली होती.) नेमण्यात येणार असलेल्या कोणत्याही समितीत सामील होण्याकरिता वा कोणत्याही मुख्य प्रस्तावावर (प्रस्ताव असा होता - महामहीम व्हाईसरायना हे संमेलन अधिकार देते आणि त्यांना विनंती करते की त्यांनी सम्राटापर्यंत त्यांच्या सौजन्यपूर्वक संदेशाच्या प्रत्युत्तरात हिंदुस्थानचे कर्तव्य आणि हिंदुस्थानचे निष्ठापूर्ण वर्तन पोहोचवावे आणि साम्राज्याच्या या महान संकटाच्या प्रसंगी आपल्या कर्तव्यपथावर चालत राहण्याचा हिंदुस्थानच्या संकल्पाने त्यांना आश्वस्त करावे.) बोलण्याच्या सन्मानाचा स्वीकार करण्याला मला नकार द्यावा लागला याचे मला कमी दुःख नाही.

माझे मत आहे की सर्वाधिक शक्तिसंपन्न नेत्यांना या संमेलनापासून वेगळे ठेवण्यात आले आहे. यामुळे हे संमेलन बहुधा अपयशीच होणार आहे. श्री टिळक (टिळकांना आमंत्रित करण्यात आले नव्हते. परंतु २६ आणि २७ एप्रिलला व्हाईसरायची मुलाखत घेतल्यानंतर टिळकांना संमेलनात येण्याकरिता तारेने निमंत्रित करण्यात आले. परंतु टिळकांनी आपल्या निष्कासनाच्या विरोधातील आदेश सरकारने जारी केलेले नसल्यामुळे संमेलनात उपस्थित राहायला नकार दिला होता. श्रीमती ऍनी बेझंटलाही आमंत्रित करण्यात आले नव्हते आणि अलीबंधू तर तुरुंगातच होते.), श्रीमती बेझंट आणि अलीबंधू यांच्या अनुपस्थितीमुळे या संमेलनाला कोणतीही प्रतिष्ठा राहिलेली नाही. मी कबूल केले पाहिजे की आज आम्ही जे लोक संमेलनात उपस्थित आहो त्यापैकी कोणाचाही सर्वसामान्य जनतेवर इतका प्रभाव नाही. त्यांना संमेलनात आमंत्रित न करण्याचा इतकाच अर्थ होतो की ज्या लोकांच्या हातात सरकारचे लगाम आहेत त्या लोकांनी आतापर्यंत जे धोरण अवलंबिले त्यात बदल करण्याची त्यांची कोणतीही इच्छा नाही. आणि त्या धोरणात जोपर्यंत खरोखरीचा कोणताही बदल केला जात नाही तोपर्यंत तुम्ही कितीही जरी सवलती द्याल तरी त्यां ना तर शोभनीय असतील ना त्यांच्यात काही शक्ती असेल. अशाने सर्वसामान्य जनतेमध्ये सरकारबद्दल निष्ठा निर्माण होणार नाही. मला जर नीट कळले असेल तर तुम्ही सर्वसामान्य जनतेला प्रभावित करू इच्छिता हाच संमेलनाचा उद्देश आहे. हिंदुस्थानच्या लोकांमध्ये इंग्रजासारखी निष्ठा कशी निर्माण करावी हाच प्रश्न हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांसमोर आहे. मी नम्रपणे सांगू इच्छितो की जोपर्यंत सर्वसामान्य जनतेचा ज्या पुढाऱ्यांवर विश्वास आहे त्या पुढाऱ्यांवर तुम्ही विश्वास ठेवणार नाही, आणि विश्वासाचा जो अर्थ होतो ते सर्व करणार नाही तोपर्यंत निष्ठा निर्माण करता येणे अशक्य आहे. अलीबंधूंबद्दल मी म्हणेन की जनतेसमोर त्यांच्या अपराधाचा

कोणताही पुरावा नाही. शत्रूशी पत्रव्यवहार करण्याच्या आरोपाचा त्यांनी जोरदार शब्दात विरोध केला आहे. वर्तमान परिस्थितीत जे मत अलीबंधूंचे आहे तेच मुसलमान समाजाचे आहे.

मला वाटते की इतर कारणांकरिताही संमेलन काही विशेष काम करू शकणार नाही. विलायतेतून डाकेने आलेली वर्तमानपत्रे मी आता आता वाचली आहेत. त्यांच्या गुप्त कराराबद्दल चर्चा आहे. प्रकाशित झालेल्या गोष्टी वाचून फार दुःख झाले. वर्तमानपत्रात झालेले करार जर खरोखरच झालेले असतील तर मित्रराष्ट्रांची बाजू पूर्णपणे न्याय्य आहे असे मी आता कसे म्हणू शकतो? हिंदुस्थानातील मुसलमानांवर या करारांचा काय परिणाम होईल हे मला माहीत नाही. हिंदुस्थान सरकारकरिता साम्राज्याची सेवा करण्याचा सर्वोत्तम मार्ग हाच आहे की त्याने साम्राज्य सरकारला असा सल्ला देण्याची हिंमत करावी की अशा करारांमुळे साम्राज्य सरकारने स्वतःला ज्या वाईट आणि अनैतिक परिस्थितीत टाकले आहे त्यातून बाहेर यावे. असे जर सिद्ध झाले की वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या अगदीच चुकीच्या आहेत तर माझ्यासारखा आनंद कोणालाही होणार नाही.

जोपर्यंत स्थानिक अधिकारी आपले काम त्याच पद्धतीने करत राहतील जसे ते खेडामध्ये करत आले आहेत तोपर्यंत हिंदुस्थानात अंतर्गत शांतता निर्माण होऊ शकणार नाही. माझी खात्री आहे की व्हाईसरायची अशी इच्छा निश्चितच नसेल की लोकांनी अन्यायाचा आणि जुलमाचा प्रतिकार कोणत्याही परिस्थितीत करू नये. मला आशा आहे की खेडात लूटमार करून महसूल वसूली करण्याचा सरकारचा जो उद्देश आहे तो थांबवला जाईल आणि खेडातील लोकांच्या न्याय्य मागण्या पूर्ण केल्या जातील.

अनिवार्य सैन्यभरतीच्या विरुद्ध मी सरकारला सावध करू इच्छितो. माझी खात्री आहे की हिंदुस्थानच्या भूमीवर ही गोष्ट कधीही यशस्वी होणार नाही. परंतु स्वेच्छा भरतीचे सर्व प्रयत्न प्रामाणिकपणे केले जात नाहीत आणि ते अयशस्वी होत नाहीत तोपर्यंत अनिवार्य सैन्यभरती कोणत्याही परिस्थितीत सुरू करू नये. आतापर्यंत बळजबरीने सैन्यभरतीच्या ज्या गोष्टी ऐकू आल्या आहेत त्या दाबून ठेवण्यासंबंधात पुढाऱ्यांनी फार संयम बाळगला आहे हे तर तुम्हीही मान्य कराल. परंतु मला वाटते की आता पाणी धोक्याच्या पातळीवर पोहोचले आहे.

अखेरचे मी सांगू इच्छितो की 'होमरूल'चा विचार जनतेच्या मनात इतका काही रुजला आहे की निकटतम भविष्यात 'होमरूल'स्थापित होण्याचे ठोस प्रमाण जोपर्यंत लोकांना दिसणार नाहीत तोपर्यंत लोकांचे खरे सहकार्य मिळणार नाही.

मी समित्यांमध्ये का राहू इच्छित नाही आणि बोलायला मी का संकोचतो हे कदाचित आता तुम्हाला कळले असेल आणि तुम्हाला ते योग्यही वाटत असेल. संमेलनात भाग न घेऊनच मी सरकारबद्दलचा माझा सद्भाव सर्वाधिक चांगल्या प्रकाराने अभिव्यक्त करू शकतो.

माझी विनंती आहे की तुम्ही हे पत्र लवकरात लवकर व्हाईसरायकडे पाठवावे.

सेवक,

मो. क. गांधी

पत्र लिहिणे झाल्यानंतर मालवीयजी आले. मालवीयजींना पत्र फार कडक वाटले. बदल तर काही सुचवला नाही, परंतु शेवटच्या परिच्छेदात “and oblige” हे शब्द टाकायची सूचना केली. परंतु बापूंनी नकार दिला. ॲन्ड्र्यूज पत्र घेऊन गेले. सोबत मी आणि बापूजीसुद्धा होते. मालवीयजी त्यांच्या गाडीतून उतरून आमच्याबरोबर चालत होते. रस्त्यात किती तरी गोष्टी झाल्या. आपल्या मुलांना ‘Secret of success’, ‘Plain living and high thinking’ यशाची गुरुकिल्ली, साधी राहणी आणि उच्च विचार ही पुस्तके वाचायला पाहिजे आणि त्याचबरोबर हिंदुस्थानातील श्लोकही त्यांना सांगत राहायला पाहिजे असे म्हणाले. ऍड्र्युजना थोडे हसू आले. यामुळे या पुस्तकावर मालवीयजींनी भाषणच दिले. नंतर रस्त्यात कोणाला भेटण्याकरिता मालवीयजी वेगळ्या दिशेने गेले. ॲन्ड्र्युज तर त्या पत्राविषयी ‘कमालीचे’, ‘भव्य’ असेच म्हणत होते. मालवीयजी गेल्यानंतर बापूंना म्हणाले, “माझी खात्री आहे की पंडितजींना पत्र कळले नाही. पत्र पूर्ण झाल्यानंतर हे आले हे बरे झाले. नाही तर आपण पत्र पूर्ण करूच शकलो नसतो. या पत्राला ते इतका जास्त उशीर करायला लावत होते की त्याला काही अर्थच राहिला नसता.”

मालवीयजी वेगळ्या दिशेने गेल्यानंतर किरकोळ गोष्टी झाल्या. मेटकाफ हाऊसमध्ये पोहोचलो. ॲन्ड्र्यूज पत्र द्यायला गेले. पत्र देऊन आल्यानंतर ॲन्ड्र्यूजनी सर्व वर्णन केले -

मी हेलीला रस्त्यात भेटलो. त्यांनी मला विचारले, ‘इतक्या उशीरा रात्री कसे काय आला?’ ते आत गेले आणि आणि मी बाहेर वाट पाहत असल्याचे सर क्लॉडला सांगितले. “हे पाहा ॲन्ड्र्यूज, मी खूप कामात आहे, एक मिनिटसुद्धा तुम्हाला देऊ शकत नाही.” मी म्हणालो की “मला एक मिनिटसुद्धा नको आहे. मी तर हे पत्र तुम्हाला प्रत्यक्ष द्यायला आलो आहे. हे फार तातडीचे पत्र आहे आणि मी अपेक्षा करता की आज रात्रीच तुम्ही हे वाचाल.”

२७-४-१९१८

संमेलनात गेले नाही. मॅफीलासुद्धा वरील पत्र दिले. त्याबरोबर पुढील पत्र लिहिले -

## (जे. एल. मॅफी यांना पत्र)

एवढ्यात परिस्थितीत जो जो बदल झाला आहे त्याबद्दल माझे मत असे आहे की अलीबंधूंची मुक्ती अत्यंत आवश्यक झाली आहे. खूप संकोचाने आणि गंभीर विचार केल्यानंतर मी या निर्णयावर पोहोचलो आहे की मी परिषदेत भाग घेऊ शकत नाही आणि ज्या उद्देशाने परिषद बोलावण्यात आली आहे त्या हेतूला मदत होणार नाही. सर क्लॉड हिल यांना दिलेल्या पत्रात यासंबंधीची कारणे मी सांगितली आहेत. त्या पत्राची एक प्रत मी या पत्रासोबत देत आहे. मला माहीत नाही की व्हाईसराय साहेबांना अलीबंधूसंबंधात माझी भेट घेण्याची अजूनही इच्छा आहे की नाही. मी २९ तारखेपर्यंत दिल्लीत आहे आणि आवश्यक असेल तर माझा मुक्काम लांबवूही शकतो.

हे पत्र ११ वाजता गेले. यानंतर दुपारी मॅफीचे पत्र आले. त्यात तीन वाजता व्हाईसरायनी मुलाखतीची इच्छा दाखवली होती. व्हाईसरायना भेटले. दोन तास चर्चा झाली. परिषदेबाहेर राहून परिषद तोडू नका, परिषदेत येऊन परिषद तोडायची असेल तर ती तोडा. हे सर्व तुम्ही तुमच्या मित्रांना सांगू शकता आणि त्यांना तुमच्या बाजूने करू शकता. परंतु तुमच्या बाजूने कोणी येईल असे तुम्हाला वाटते काय? परिषदेत आला नाही तर त्याचा हिंदुस्थानवर फार वाईट परिणाम होईल.

गुप्त करारांची गोष्ट निघाली. व्हाईसरायनी विचारले की तुम्हाला असे खात्रीपूर्वक वाटते काय? जोपर्यंत इतर पक्षांकडून तुम्ही काही ऐकत नाही तोपर्यंत तुम्ही काही म्हणू शकत नाही. बापूंनी अगदी प्रामाणिकपणे व्हाईसरायना गुप्त कराराच्या परिच्छेदाची गोष्ट स्पष्टपणे सांगितली. "मला तर काही माहीत नाही, मी तर वर्तमानपत्रे वाचत नाही. मला तर ॲन्ड्र्यूजने 'नेशन'चे काही अंक वाचून दाखवले. त्यात मला हे आढळले. आणि मला आणि ॲन्ड्र्यूजला, आम्हा दोघांनाही वाटले की हे तुम्हाला सांगितले पाहिजे. यामुळे त्यांना लिहिले. मला विशेष माहिती नाही. मंत्रिमंडळाला यासंबंधात काय सांगायचे ते तुम्ही सांगितले पाहिजे इतके मात्र खरे."

२८-४-१९१८

सकाळी मनोमंथन सुरू होते. संमेलनात जायचे की नाही? ॲन्ड्रूज म्हणाला -

माझे क्षत्रियत्व माझ्या न्यायबुद्धीवर विजय मिळवते आहे. घाव माझ्या जिव्हारी लागला आहे. तो जेव्हा म्हणाला की 'काही दिवस तू हिंदुस्थानात एकटा पडशील, कोणीही तुझ्याशी सहमत होणार नाही आणि तुझे अनुसरण करणार नाही, तेव्हा मला भयंकर धक्का लागला. तुला जे काही सांगायचे आहे ते तू तुझ्या मित्रांना समजावून सांगण्याचा प्रयत्न कर आणि मग मी जे म्हणतो ते तुला कळेल'. तसे झाले की मला सांगा.

संमेलनात जाण्यापूर्वी सर विल्यम व्हिन्सेंट यांची भेट मिळवण्याकरिता ॲन्ड्रूजना पाठवले. ॲन्ड्रूजना त्यांनी पंधरा मिनिट न्हाणीघरातच बसवून ठेवले. त्यानंतर ते म्हणाले की मी एखाद मिनिट देऊ शकेन. ॲन्ड्रूजशी हस्तांदोलन न करताच श्री ॲन्ड्रूज, तुमच्याकरिता मी काय करू शकतो? असे म्हणून त्यांनी चर्चा सुरू केली. दहा वाजता बापू त्यांना भेटले. बापूंना ते म्हणाले, तुम्हाला मी एक मिनिटही देऊ शकेन असे नाही. अलीबंधूंच्या प्रश्नाचा लष्करभरतीशी काय घेणेदेणे आहे? बापू म्हणाले, बरेच घेणेदेणे आहे. अलीबंधूंच्या सुटकेने लष्करभरतीची समस्या सुटेल. सर विल्यम म्हणाले - हे तर ठीक आहे, परंतु तुम्ही युद्धप्रयत्नाकरिता काय करत आहा? मला जोपर्यंत माहीत आहे तोपर्यंत तुम्ही तर स्थानिक अंमलदारांना त्रस्त करून सोडले आहे. बापू म्हणाले, मी इंग्लंडमध्ये बरेच काम केले आहे. आणि इथेही असेच काम करण्याची परवानगी मी मागितली होती. परंतु माझी मागणी फेटाळण्यात आली. सर विल्यम म्हणाले, 'बाय'. अशा प्रकारे चर्चा संपली, बापू परत आले.

परिषदेच्या मनष्यबळ समितीत हजर राहिले. काही बोलले-चालले नाही. सायंकाळी विचार केला की परिषदेच्या सुरुवातीला व्हाईसरायना जसे पत्र लिहिले तसेच पत्र परिषदेच्या शेवटीही लिहायला पाहिजे. पत्र तयार केले. पत्र साधे होते. त्यात शस्त्रबंदीचा कायदा आणि प्रेस ॲक्ट काढून टाकण्याकरिता आणि स्वराज्य ताबडतोब देण्याकरिता लिहिले होते. या पत्रासंबंधी रात्री बारा वाजेपर्यंत मालवीयजींशी चर्चा झाली. मावीयजींनी पत्रावर सही करण्याचे रात्री वचन दिले. सकाळी त्यातून निसटले. मालवीयजींनी सही करण्याचे नाकारल्यामुळे इतर सत्तर जणांनी सही करूनही पत्र पाठवायचे नाही असे ठरवले. परिषदेत उर्दूत ठराव मांडण्याचा विचार केला. ॲन्ड्रूजना

परवानगीकरिता पाठवले. दुसऱ्या दिवशी व्हाईसरायनी परवानगी दिली. त्याचबरोबर एक निरोपही पाठवला -

तुमच्या सर्व मित्रांची खात्री पटवून द्या की माझ्याकडून जे होऊ शकत होते ते सर्व मी केले आहे. जी योजना रुजू करण्यात आली आहे ती पुरेपूर जरी काँग्रेस-लीगच्या योजनेसारखी नसली तरी तत्त्वतः ती तशीच आहे. मी आशा करतो की उद्या देवघेवीची गोष्ट मुळीच होणार नाही वा कोणत्याही शाब्दिक झटापटी होणार नाहीत. उद्या काय होईल याची संपूर्ण जग, विशेषतः इंग्लंड वाट पाहतो आहे. सगळ्यांची दृष्टी उद्यावर खिळलेली आहे आणि मी आशा करतो की उद्या कोणताही वाद होणार नाही.

२९-४-१९१८

परिषदेत दोन वाक्य उर्दूत बोलून ठराव मांडला आणि तिथून निघून आले. दुपारी मालवीयजी भेटायला आले. महाभारत आणि पुराण यांच्यातील संततीशास्त्रावर चर्चा केली. श्रीकृष्ण आणि सत्यभामा, पुंडरीक आणि सांब, बारा वर्षांच्या ब्रह्मचर्याचे फळ, माकड आणि पक्षांमधील प्रेमभावना, आनंद, निर्दोष जीवन वगैरे विषयांवर चर्चा झाली.

मालवीयजींच्या भाषणावर चर्चा करताना बापू म्हणाले, "आता यांची शक्ती संपली आहे."

सर क्लॉड हिलशी चर्चा झाली. कालच्या वर्तणुकीबद्दल त्यांना लाज वाटली.

व्हाईसरायना पत्र लिहायला सुरुवात केली. थोडा वेळ माझ्याकडून लिहवून घेतले. रात्री ॲन्ड्र्यूजला. परत पाहायला सुरुवात केली. एक वाजेपर्यंत सुधारणा केली.

व्हाईसराय परिषदेत येणार असल्याची बातमी कळल्यानंतर त्यांच्या खाजगी सचिवाला लिहिले -

"भीती आणि थरकाप होत असताना केवळ कर्तव्य म्हणून परिषदेत भाग घेण्याचे मी ठरवले आहे. व्हाईसरायच्या मुलाखतीनंतर आणि त्यानंतर तुमची भेट घेतल्यानंतर मी दुसरे काहीही करू शकत नाही असे मला वाटले."

याचे पुढीलप्रमाणे उत्तर आले -

"तुम्ही 'भीती आणि थरकाप होत असताना' परिषदेत भाग घेतला यावर व्हाईसरायचाही विश्वास नाही आणि माझाही नाही."

"तुम्ही परिषदेत भाग घेणार आहा हे ऐकून व्हाईसराय खूप खुश झाले. मी सर क्लॉड हिलला कळवले की तुम्ही मनुष्यबळ समितीतसुद्धा भाग घेणार आहा. ही अकरा वाजता भरणार आहे."

रात्री व्हाईसरायना पत्र लिहीत असतानाच मॅफीचे पत्र आले -

"भाई श्री गांधी,

"आता माझ्या लक्षात आले की आज सकाळच्या गोंधळात मी तुमच्या पत्राचा शेवटचा भाग वाचलाच नाही. यामुळे मी तुमच्या पहिल्या प्रश्नाचेच - तुमच्या भाषणासंबंधीच्या प्रश्नाचेच उत्तर दिले.

“त्याबद्दल मी म्हणेन की तुमच्या उपस्थितीने, तुम्ही जे साधे शब्द बोलला आणि ज्या पद्धतीने ते म्हणाला त्यांचा व्हाईसरायवर फार परिणाम झाला.

“युद्धप्रयासाला वेळ आहे असे जे तुम्हाला वाटते त्याबद्दल मी फार खुश झालो आहे. या कामाची खुपच आवश्यकता आहे आणि त्याबद्दल तुम्ही दिलगीर होण्याची आवश्यकता नाही. हक्क मिळवण्याकरिता आग्रही असणे हा हक्क मिळवण्याचा नेहमीच उत्तम मार्ग नसतो. आमच्यावर विश्वास असेल तर आमच्याकरिता लढा, आमच्याबद्दल धीर सोडू नका.

“आम्ही आज रात्री इथून जाणार आहो. तुमची कोणतीही सेवा जर मी करू शकत असेन तर मला कळवा.

मॅफीच्या पत्राचे उत्तर -

## (जे. एल. मॅफी यांना पत्र)

“कामाचे फार मोठे ओझे असूनही तुम्ही माझे पत्र परत वाचले आणि त्याचे उत्तर द्यायला वेळ काढला यातून तुमचे प्रेमच दिसते. व्हाईसरायसाहेबांनी जो जिव्हाळा दाखवला त्याकरिता मी त्यांचाही आभारी आहे.

“तुमच्याकरिता मी दोन पत्रे तयार करतो आहे. ती तुम्हाला सिमल्यात मिळतील. तुम्ही इथून निघण्यापूर्वी मी ते क्वचितच पूर्ण करू शकेन असे वाटते. एका पत्रात तुम्ही माझ्या सेवेचा कशा प्रकारे उपयोग करू शकाल याविषयी स्पष्ट सूचना दिल्या आहेत. दुसऱ्या पत्रात सध्याच्या परिस्थितीविषयी माझे विचार काय आहेत ते मी पूर्णपणे स्पष्ट केले आहेत.

“इंग्रजांबद्दलचे माझे विचार फटकन डळमळीत होतील असे नाही. हक्काबद्दल तुम्ही जे लिहिले आहे त्याच्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. लांब पत्र लिहून तुमचा वेळ घेणे मला योग्य वाटत नाही.

“जेव्हा-केव्हा मी तुम्हाला लिहितो तेव्हा मी एखादे पाप करतो आहे असे मला नेहमीच वाटत असते.

सेवक,

मो. क. गांधी

३०-४–१९१८

सकाळीसुद्धा व्हाईसरायच्या पत्रात दुरुस्त्या करणे सुरूच होते. हे काम सायंकाळपर्यंत सुरूच होते कारण ॲन्ड्र्यूज पत्रातील कानामात्रासह शब्दंशब्द तपासत होते. अखेरीस जे पत्र तयार झाले ते पाहून सर्व चकित झाले. रुद्र, ॲन्ड्र्यूज वगैरेंनी भव्य, उत्कृष्ट, कमालीचे अशी विशेषणे वापरली. पत्र नेण्याकरिता रेव्हरंडस आमर्लेंड यांना तयार केले. इंटर क्लासने जाऊ शकतो असे म्हणून सत्तर रुपयांऐवजी केवळ वीस रुपये घेऊन गेले. त्याच दिवशी सायंकाळी सर विल्यम व्हिंसेंट आणि मॅफी यांना दुसरे पत्र लिहिले -

## (जे. एल. मॅफी यांना पत्र)

“भाईश्री मॅफी,

“व्हाईसरायना मी लिहिलेले पत्र तुम्ही वाचावे असे मी इच्छितो. आणि नडियाडला मला तारेने कळवा की हे पत्र प्रकाशित करायला त्यांची काही हरकत आहे काय? विरोधी शक्तींना परत वळवणे हा याचा उद्देश आहे. माझ्या भूमिकेविषयी प्रश्न विचारणाऱ्या पत्रांचा माझ्यावर वर्षाव होतो आहे. लोक नाराज झाले आहेत. गावगप्पा जेवढा काही गोंधळ करू शकतात तितका करत आहेत. मला या सर्वांमध्ये परिवर्तन घडवून आणायचे आहे. यात माझा जो अधीरपणा दिसतो त्याबद्दल तुम्ही माफ कराल.

“दुसऱ्या पत्रात माझी सेवा समर्पित करण्याची गोष्ट आहे. तुम्हाला याचा जो काही उपयोग करायचा असेल तो करा. लॉर्ड चेम्सफोर्डना खरोखर काही युद्धकार्य केले असे वाटावे असे काही तरी करण्याची माझी इच्छा आहे. माझ्या मनात असा विचार येतो आहे की तुम्ही मला मुख्य भरती अंमलदार करावे. असे झाले तर मी तुमच्यावर माणसांचा वर्षाव करीन. माझ्या या धाष्टर्याकरिता माफ करा.

“काल व्हाईसराय फार निस्तेज वाटले. ते जेव्हा लक्षपूर्वक भाषणे ऐकत होते तेव्हा मी त्यांच्याकडे पाहत होतो. त्यांच्याकडे पाहून माझे मन द्रवले. त्यांच्यावर आणि त्यांचे निष्ठावान सचिव म्हणून तुमच्यावर ईश्वराची कृपा होवो आणि तुम्हा दोघांचेही तो रक्षण करो. मला वाटते त्यांच्याकरिता तुम्ही सचिवापेक्षा काही अधिकच आहा.”

सेवक,

मो. क. गांधी

# (सर विल्यम विन्सेंट यांना पत्र)

“प्रिय सर विल्यम विन्सेंट,

“रविवारी मी तुम्हाला त्रास दिला. परंतु मी तुमच्याकडे त्याच उद्दिष्टाच्या प्रगतीकरिता आलो होतो की ज्याकरिता तुम्ही अथक श्रम करत आहा. मला तुम्हाला केवळ इतकेच सांगायचे होते की अलीबंधूंच्या सुटकेमुळे लष्करभरतीला फार वेग येईल. माझे जर असे मत नसते तर तुमच्या वेळेतून तुमचा एक मिनिटसुद्धा घेणे मला पापकर्म वाटले असते.

“तुम्ही मला विचारत होता की मी सरकारला एका तरी रंगरुटाची भरती करून दिली काय? मी तुम्हाला म्हणेन की तुमचा हा प्रश्न वाजवी नव्हता. मनुष्य साम्राज्याची प्रामाणिकपणे सेवा करत असेल तरीही एकही रंगरूट आला नाही असे होऊ शकते.

“या पत्राने तुम्ही चिडणार नाही. ज्या मुलाखतीबद्दल तुम्ही उतावीळपणे गैरसमज करून घेतला त्याचा प्रामाणिक खुलासा म्हणून या पत्राचा स्वीकार करा.

सेवक,

मो. क. गांधी

त्याच दिवशी ऐकले की रविंद्रनाथ टागोर ॲन्ड्र्यूजला बरोबर घेऊन ऑस्ट्रेलियात वा हिंदुस्थानबाहेर कुठे तरी जाणार आहेत. खूप विचार आणि चर्चा करून ॲन्ड्र्यूज कलकत्त्याला गेले. त्यांच्याबरोबर कवींना पुढील पत्र पाठवले -

## (रविंद्रनाथ टागोर यांना पत्र)

"प्रिय गुरुदेव,

"ॲन्ड्र्यूजला थोडा वेळ माझ्याजवळ ठेवणे मला फार आवडले असते. असे जरी असले तरी मला निश्चितपणे वाटते की आज रात्री त्याला कलकत्त्याकरिता निघावे लागणारच आहे. मला माहीत आहे की आजकाल तुमची प्रकृती चांगली नसते. अशा वेळी जर तुमच्याजवळ ॲन्ड्र्यूज असला तर तुम्हाला फार शांत वाटेल. तुम्हाला आवश्यकता असेल तितके दिवस त्याला तुमच्याजवळ ठेवा. सध्या आपल्याला आपल्या देशात होत असलेल्या फेरफारांमधून वर उठायचे आहे. देशाच्या नवजन्माच्या या घटनेच्या वेळी देशातील सगळ्या शुभशक्तींनी सशरीर देशातच उपस्थित राहावे अशी माझी इच्छा आहे. यामुळे देशातच जर असे कोणते ठिकाण असेल की जिथे तुम्हाला आराम मिळू शकत असेल तर तुम्हाला आणि ॲन्ड्र्यूजला विनंती करीन की सध्या तुम्ही देशातच राहा आणि अधूनमधून मला ॲन्ड्र्यूजची मदतसुद्धा देत राहा. काही वेळा त्याचे मार्गदर्शन माझ्याकरिता फार मूल्यवान ठरत असते.

सेवक,

मो. क. गांधी"

व्हाईसरायना जे मुख्य पत्र लिहिले होते ते एक चिरंतन साहित्य आहे असे अनेकांचे म्हणणे आहे. यात धर्म, सत्याग्रहाचे रहस्य आणि सर्व आदर्श ओतले आहेत असे बापू म्हणाले. परंतु ते छापायची परवानगी मिळाली आणि ते पत्र प्रसिद्धही झाले. ते हे पत्र -

## (व्हाईसरायना पत्र)

“तुम्हाला माहीत आहे की पूर्ण विचार केल्यानंतरच महामहीम, तुम्हाला सांगणे माझे कर्तव्य होते की २६ एप्रिलच्या माझ्या पत्रात सांगितलेल्या कारणांप्रमाणे मी युद्धपरिषदेला उपस्थित राहू शकत नव्हतो. परंतु तुमच्या मुलाखतीनंतर मी तुमच्याशी सहकार्य केलेच पाहिजे अशी मी माझ्या मनाची समजूत घातली. इतर कोणत्याही कारणामुळे नाही तर तुमच्याबद्दल मला जो फार आदर वाटतो त्या कारणानेसुद्धा मी (परिषदेत) निश्चितच भाग घ्यायला पाहिजे. तुमच्याशी सहकार्य न करण्याच्या कारणात सर्वात मजबूत कारण लोकमान्य टिळक, श्रीमती ॲनी बेझंट आणि अलीबंधूंना या परिषदेचे निमंत्रण नव्हते हे होते. यांना मी मोठ्यातमोठे आणि जनतेचे समर्थ पुढारी समजतो. मला तर अजूनही वाटते की त्यांना निमंत्रण न देण्यात सरकारने गंभीर चूक केली आहे. (महामहीम) माझी अजूनही सादर सूचना आहे की आता जर प्रांतिक परिषद भरवणार असाल तर या पुढाऱ्यांना निमंत्रण देऊन सरकारला आपली चूक सुधारण्याची संधी आहे. प्रांतिक परिषदांमध्ये सरकारला त्यांच्या सल्ल्याचा लाभ मिळू शकेल. माझे नम्र मत आहे की जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अशा प्रौढ पुढाऱ्यांशी कितीही जरी मतभेद असले तरी कोणतेही सरकार त्यांच्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही. याचबरोबर मला असे सांगताना आनंद होतो की परिषदेत सगळ्या पक्षाच्या पुढाऱ्यांना आपले विचार मनमोकणेपणाने व्यक्त करू देण्यात आले होते. माझ्याबद्दल मी म्हणेन की वर सांगितलेल्या कारणामुळेच परिषदेतील समित्यांमध्ये मला ठेवून सन्मानित करण्यात आले होते. असे असतानाही त्यात हजर राहून मी माझे विचार व्यक्त केले नाही. परिषदेतही मी विशेष बोललो नाही. परिषदेत मांडण्यात आलेल्या ठरावांना पाठिंबा देऊनच मी परिषदेच्या हेतूंची जास्तीतजास्त चांगली सेवा करू शकतो असे मला वाटले. आणि असा पाठिंबा मी मनात कोणताही किंतू न ठेवता दिला आहे. याचबरोबर वेगळ्या पत्रात मी काही सूचना केल्या आहेत. सरकारने त्या सूचना स्वीकारताच मी माझ्या पाठिबा देण्याच्या कामाची अंमलबजावणी करायला सुरुवात करू शकेन अशी आशा आहे.

"मी असे समजतो की निकटच्या भविष्यात या साम्राज्याचे तसेच भागीदार होण्याची आकांक्षा ठेवतो जसे समुद्रापलीकडील इतर उपनिवेश आहेत. यामुळे या साम्राज्याला संकटकाळात किंचितही मागेपुढे न पाहता शक्य ती सर्व मदत करणे आमचे कर्तव्य आहे. परंतु मी इतके मात्र स्पष्ट केले पाहिजे की या समर्थनामागे आम्ही असे अपेक्षितो की या मदतीच्या परिणामी आम्ही आमच्या उद्दिष्टापर्यंत तितकेच सत्वर पोहोचू शकू. कर्तव्याचे पालन करत असतानाच त्यांच्याशी संबंधित हक्क आपोआप मिळत असतात. या न्यायाने लोकांना इतके गृहीत धरण्याचा अधिकार आहे की तुमच्या भाषणात तुम्ही ज्या सुधारणा लवकरच करण्याचे आश्वासन दिले आहे त्या सुधारणांमध्ये काँग्रेस आणि मुस्लिम लीगच्या मागण्यांचा समावेश करण्यात यावा. माझी निश्चिपणे मान्यता आहे की या श्रद्धेच्या आधारेच परिषदेतील अनेक सदस्य सरकारला अंतःकरणपूर्वक सहकार्य देण्याकरिता तयार झाले आहेत.

"मी जर माझ्या देशबांधवांना समजावून सांगू शकलो तर युद्ध सुरू असतानाच काँग्रसला तिचे सर्व ठराव मी एका बाजूला ठेवायला लावीन आणि तिला 'होमरूल' वा 'जबाबदार शसन' या शब्दांचा उच्चारही करू देणार नाही, आणि साम्राज्याच्या या संकटाच्या वेळी सगळ्या समर्थ हिंदुस्थानींना साम्राज्याच्या रक्षणाकरिता आपल्या प्राणाची आहुती देण्याकरिता प्रेरित करीन. मला माहीत आहे की इतके केल्यानंतर आम्ही साम्राज्याचे सर्वात मोठे आणि आदरणीय सहकारी होऊ आणि आमच्यामधील जातिभेद पूर्णपणे नष्ट होतील.

"परंतु हिंदुस्थानातील संपूर्ण शिक्षित वर्गाने याहून कमी परिणामकारक मार्ग अवलंबिण्याचे ठरवले आहे, आणि शिक्षित वर्गावर सर्वसामान्य जनतेचा प्रभाव नाही असे म्हणता येणे शक्य नाही. दक्षिण आफ्रिकेतून मी जेव्हा हिंदुस्थानात आलो तेव्हापासूनच जनतेशी मी निकटच्या संपर्कात येत गेलो आहे, आणि मी खात्रीपूर्वक सांगू इच्छितो की होमरूलची म्हणजे स्वराज्याची आकांक्षा जनतेमध्ये खोलवर रुजली आहे. काँग्रेसच्या मागील अधिवेशनात मी हजर होतो आणि त्या प्रस्तावातसुद्धा मी भाग घेतला होता ज्यात म्हटले होते की संसद कायद्याने जो काळ ठरवील त्या काळात हिंदुस्थानला पूर्णपणे जबाबदार सरकार द्यायला पाहिजे. मी मान्य करतो की हे पाऊल अतिशय साहसपूर्ण असेल. परंतु त्याचबरोबर मला असेसुद्धा निश्चितपणे जाणवते की किमान वेळेत जर होमरूलचे म्हणजे स्वराज्याचे दर्शन झाले नाही तर लोकांचे किंचितही समाधान होणार नाही. हिंदुस्थानात असे अनेक लोक आहेत की जे मानतात की स्वराज्य मिळवण्याकरिता जितका त्याग करावा लागेल तितका कमीच आहे.

याचबरोबर ते इतकेसुद्धा जागृत आहेत की ज्या साम्राज्यात ते आपले अंतिम उद्दिष्टाचे स्थान मिळवण्याची अपेक्षा करतात त्या साम्राज्याकरिता मोठ्यातमोठा त्याग करायची तयारी ठेवली पाहिजे याचीही त्यांना जाणीव आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की साम्राज्याला घेरलेल्या संकटातून मुक्त होण्याकरिता काहीही न बोलताचालता पूर्णपणे होमून जाण्याची तयारी ठेवली पाहिजे. असे केले तर आम्ही आमच्या ध्येयापर्यंत लवकर पोहोचू शकू. हे साधे सत्य न स्वीकारणे म्हणजे आत्मघात करणे आहे. आम्ही लक्षात ठेवले पाहिजे की साम्राज्याला वाचवण्यात जर आपण बरोबरीने सहभाग घेतला तर तेवढ्यानेच आपले स्वराज्य आपल्या मांडीवर बसलेले असल्याचे आढळेल.

यामुळे साम्राज्याकरिता आपण जितके सैनिक अर्पू शकू तितके आपण अर्पिले पाहिजे. परंतु आर्थिक मदतीबद्दल मात्र मी असे म्हणू शकत नाही. मला लोकांची आर्थिक परिस्थिती कशी आहे हे जवळून माहीत आहे आणि त्यावरून मी हे सांगतो आहे की आतापर्यंतच हिंदुस्थानने या कामाकरिता जी मदत केली आहे तीच त्याच्या शक्तीपलीकडे आहे. असे म्हणून मी माझ्या बहुसंख्य देशबांधवेच मत व्यक्त करतो आहे.

परिषदेत मी आणि ज्या इतर लोकांनी ठरावांना पाठिंबा दिला आहे त्यांनी तर मरेपर्यंत पाठिंबा द्यायचा निश्चय केलेला आहे. परंतु आमची स्थिती विषम आहे. आज आम्ही साम्राज्याचे समान भागीदार नाही. आमच्या बलिदानाचा पाया भविष्याच्या आशेवर रचलेला आहे. ही आशा काय आहे हे जर मी साफ, असंदिग्ध शब्दांत सांगितले नाही तर तुमच्या आणि माझ्या देशाशी मी अप्रामाणिक ठरेन. आज मी सौदा करायला आलेलो नाही. पण तुम्ही इतके तर लक्षात ठेवायलाच पाहिजे की आमच्या पदरी जर निराशा पडली तर साम्राज्याकडून आमच्या ज्या अपेक्षा होत्या तो भ्रमच होता असे आम्हांला समजावे लागेल.

अजून एक गोष्ट सांगायला मी विसरायला नको. तुम्ही आम्हांला घरगुती भांडणे विसरून जायला सुचवता. याचा अर्थ जर असा होत असेल की अंमलदारांचा जुलूम आणि त्यांनी केलेली दुष्कृत्ये आम्ही गुपचूप सहन केली पाहिजे तर आमच्याकरिता ही अशक्य गोष्ट आहे. प्रत्येक संघटित अत्याचाराचा सर्व शक्ती लावून प्रतिकार करणे हा मी माझा धर्म समजतो. यामुळे तुम्ही अंमलदारांना असे आवाहन केले पाहिजे की तुम्ही एकाही माणसाला त्रास देऊ नये, लोकांशी सल्लामसलत करून काम करा आणि आतापर्यंत लोकमताला तुम्ही जो मान दिला नाही तो आता तरी द्या. चंपारणमध्ये शतकांपासून सुरू

असलेल्या जुलमाविरुद्ध  ब्रिटिश न्याय सर्वोपरी आहे हे मी सिद्ध करून दाखवले आहे. खेडाचे लोक आधी सरकारला शिव्या देत होते, पण आता त्यांच्या लक्षात आले आहे की आपल्यात जर दुःख सहन करायची शक्ती असेल तर खरी सत्ता सरकारची नाही तर जनतेची असल्याचे त्यांना आढळून येईल. आज त्यांच्या मनातील कटुत्व कमी झाले आहे. आणि आता ते म्हणू लागले आहेत की जी सत्ता राज्याविरुद्ध सविनय आज्ञाभंग मान्य करू शकते ती सत्ता लोकमताची पूर्णपणे अवहेलना करणारी असू शकत नाही असा अनुभव आम्हांला आला आहे. यामुळे माझी अशी मान्यता आहे की चंपारण आणि खेडात मी जे काम केले आहे तो या युद्धात माझा सरळ, स्पष्ट आणि विशिष्ट प्रकारचा सहभाग आहे. अशा प्रकारचे काम जर तुम्ही मला बंद करायचे सांगाल तर तुम्ही मला श्वासोच्छ्वास करू नकोस असे सांगण्यासारखे होईल असे मी समजतो. मी जर शस्त्रबलाऐवजी आत्मबल म्हणजे प्रेमबलाला लोकप्रिय करण्यात यशस्वी झालो तर मी असे समजेन की सर्व जग जरी हिंदुस्थानकडे कठोर दृष्टीने पाहू लागले तरी हिंदुस्थान त्याचा सामना करू शकेल अशा प्रकारे मी हिंदुस्थानला घडवू शकेन असा मला विश्वास वाटतो. यामुळे दुःख सहन करण्याच्या सनातन नियमाप्रमाणे माझे जीवन घडवण्याकरिता मी माझ्या आत्म्याची नेहमी परीक्षा घेत राहीन आणि इतरांना याकरिता आमंत्रित करत राहीन. इतर कोणतीही गोष्ट करताना जरी मी दिसलो तरी तिचा हेतू या सनातन नियमाची अद्वितीय श्रेष्ठता सिद्ध करणे हाच असेल.

अखेरीस मुसलमान राज्यांबद्दल ब्रिटिश मंत्रिमंडळाने निश्चित आश्वासन द्यावे असे आपण सूचवावे अशी मी आपल्याला विनंती करीन. तुम्हाला माहीत आहे की प्रत्येक मुसलमान यासंबंधात चिंतातुर आहे. मी स्वतः हिंदू असूनही त्यांच्या भावनेबद्दल बेफिकीर असू शकत नाही. त्यांचे दुःख हे आमचे दुःख असले पाहिजे. या मुसलमान राज्यांच्या हक्काचे रक्षण करणे, त्यांच्या धर्मस्थानाबद्दलच्या त्यांच्या भावनांचा आदर करणे आणि हिंदुस्थानची स्वराज्याची मागणी वेळ राहताच स्वीकारणे यातच साम्राज्याचे संरक्षण आहे. मी हे लिहितो आहे कारण इंग्रज जनतेवर माझे प्रेम आहे आणि (साम्राज्याबद्दल) इंग्रजांच्या मनात जी निष्ठा आहे तीच निष्ठा हिंदुस्थांनीच्या मनात जागी करण्याची माझी इच्छा आहे.

सेवक,

मो. क. गांधी

याबरोबर जे पत्र पाठवले होते त्यात लष्करभरतीच्या कामात आपल्या सेवेचा उपयोग करण्याची त्यांनी विनंती केली होती. दक्षिण आफ्रिकेत आणि इंग्लंडमध्ये शुश्रूषा तुकडी स्थापून आपण आपली पात्रता सिद्ध केली असल्याचेही ते म्हणाले.

१-५-१९१८

दिल्लीहून निघालो. प्रकृती बरोबर नसल्यामुळे रस्ताभर पडूनच होते. गाडीतच हरिलालला पुढीलप्रमाणे पत्र लिहिले -

## (हरिलाल गांधींना पत्र)

“दिल्लीत मला तुझे पत्र मिळाले होते. तुला काय लिहू? सर्व लोक आपापल्या स्वभावाप्रमाणे करत असतात. स्वभावावर नियंत्रण मिळवण्यातच पुरुषार्थ आहे. हाच धर्म आहे. तू जितका पुरुषार्थ करशील तितके तू तुझे दोष विसरून जाशील. तू चोरी केली नाही असे म्हणतोस त्यावर मी विश्वास ठेवतो. जरंतु जग हे मान्य करणार नाही. जगाचे टोमणे सहन करशील आणि यापुढे सावध राहशील. जगाचे मत बदलव. तुझे जग तुझे मालक आहेत. न्यायालयात तुझा न्याय होत असेल तर घाबरू नकोस. माझे ऐकशील तर वकील ठेवू नकोस. त्यांच्याच वकिलाला सर्व काही समजावून सांग.

“तुझ्या हाती हिरा होता, पण साहसी अधीर प्रकृतीपायी तू तो गमावून बसलास. तू मूल नाहीस. तू संसाराची चव कमी घेतलेली नाही. जर मन भरले असेल तर परत फिर. धीर सोडू नकोस. तू जर खरा असशील तर सत्यावरील विश्वास ढळू देऊ नकोस. सत्य हाच परमेश्वर आहे. गुण जड नाहीत, ते चैतन्यमय आहेत. तुझे जीवन विचारविरहित आणि स्वच्छंदी राहिले आहेत. आता जीवन विचारपूर्ण आणि संयमी करशील अशी इच्छा आहे.

“माझ्याकडून दिल्लीत सहजपणाने एक फार मोठे काम झाले आहे. त्याचे थोडेसे वर्णन वर्तमानपत्रात आढळेल. मला लिहायला वेळ नाही. भाई महादेव वेळ मिळाला की तुला लिहील. ते सर्व त्याने पाहिले आहे. त्यांनी तुझी उणीव तर भरून काढली आहे, परंतु तू त्यांच्या जागी असतास तर किती बरे झाले असते हा ममतेने भरलेला विचार अजून जाऊ शकतेला नाही. मला जर इतर मुले नसती तर मी झुरून मरून गेलो असतो. परंतु जे झाले ते झाले. त्यांना दूर न करता तू जर ज्ञानपूर्वक पुत्र बनशील तर तुझे स्थान कायमच आहे.

बापूचे आशीर्वाद”

२-५-१९१८

सकाळी नडियाडला पोहोचलो. रात्री २-५-‘१८ ला मुंबईला जायला निघालो.

३-५-१९१८

आम्ही मुंबईला पोहोचलो. श्रीमती बेझंटना भेटले. लष्करभरतीसंबंधी बापूंची बाजू त्यांनी मान्य केली. सायंकाळी कॉंग्रेस समितीच्या बैठकीकरिता गेले. मुख्य ठराव सरकारकरिता माणसे उभी करण्यासंबंधी होता. खापर्डे, टिळक वगैरे ‘आम्हांला स्वराज्य द्याल तर आम्ही मदत करू’ असा आग्रह धरून बसले. बापूं बिनशर्त सहकाराकरिता परिणामकारक बोलले -

“सध्या साम्राज्य अतिशय कटोकटीच्या परिस्थितीतून जाऊन राहिलेले आहे. सध्याच्या परिस्थितीसंबंधी माझा अंदाज अगदी बरोबर आहे. आपण आपल्या अटी स्पष्टपणे सांगितल्या आहेत. या अटी वारंवार सांगण्याची आवश्यकता नाही. आपण आपल्यामधून लष्कर तयार केले पाहिजे आणि आवश्यकता पडली तर हेच लष्कर, जे ब्रिटिश सरकारकरिता उभे करण्यात येत आहे तेच सरकारचा सामना करण्याइतके शक्तिमान असेल. आपल्याला सरकारला मदत करायची असो वा नसो, सरकार तर देशात पाच लाख लोकांचे सैन्य उभारण्याकरिता कटिबद्ध आहे. तर आपण आधीच सावध होऊन आपल्या पसंतीचे लष्कर त्यांना का देऊ नये? मला माहीत आहे की सध्याची परिस्थिती अतिशय कठीण आहे. आणि शिवाय मला असेही वाटते की लष्करभरतीचे काम आपल्या हाती असलेले चांगले. असे केले तर आज आपली जी दुःखद आणि त्रासदायक परिस्थिती आहे तिच्यातून आपण आपल्या तरुणांना वाचवू शकू. आपण आपल्याकडून अतिशय विचारपूर्वक पाऊल उचलले पाहिजे असे जे शास्त्रीयार म्हणतात ते अगदी बरोबर आहे. परंतु मी तरी याहून पुढे जाणार आहे. परिस्थितीचा निर्णय हिंदुस्थानच करील असे मला वाटते. हिंदुस्थान जर संपला तर साम्राज्याचा नाशच होईल. साम्राज्याचा नाश झाला तरी आपण कदाचित त्याची फिकीर करणार नाही. परंतु आपल्या देशाचा नाश होत असेल तर त्याची काळजी तर आपण घ्यायलाच पाहिजे. आपल्या पुढाऱ्यांनी ग्रामीणांना सांगायला पाहिजे की तुमचे नांगर वगैरे सोडा आणि लढाईत जा. यावेळी लेचापेचा प्रस्ताव करायचा नाही. माझ्यासारखी

भावना जर तुमच्याही मनात असेल तर मी तुम्हांला लष्करभरतीकरिता समिती नेमण्याचे सुचवीन. या समितीने काम सुरू करण्याआधीच आमच्या शिफारसीला अनुकूल होईल अशी परिस्थिती निर्माण करायला सरकारला तुम्ही सांगा. काम करायची ही पद्धत आहे. आता आपली परीक्षा होते आहे. होमरूल म्हणजे स्वराज्याकरिताची ही कसोटी आहे, अशा वेळी आपण गंभीर आणि उत्साही असलो पाहिजे. आपल्यामध्ये अजून असा उत्साह दिसत नाही. माझ्या अंतःकरणात जी खळबळ सुरू आहे ती मी तुम्हांला सांगतो आहे. आपल्याला कळले पाहिजे की आता आपला देश गुलामगिरीत पडलेला आहे आणि या आणीबाणीच्या प्रसंगी आपण जर योग्य पाऊल उचलले नाही तर आपल्याला गुलामगिरीतच खितपत पडून राहावे लागेल. आणि आपल्याला जर इतिहासाला नवीन वळण लावायचे असेल तर आपण गंभीर झालो पाहिजे आणि परिस्थिती अनुकूल व्हावी म्हणून आपण सर्व काही प्रयत्न केले पाहिजे.

दुसरा ठराव खेडासंबंधी होता. सर्वांनी बापूजींना ठराव मंजूर होईल असे सांगितले. एवढ्यात शास्त्रीयारनी कायद्याचा मुद्दा (पॉईंट ऑफ ऑर्डर) उपस्थित केला. त्यांचे म्हणणे होते की पूर्वसूचनेशिवाय असा महत्त्वाचा ठराव मंजूर करता येऊ शकत नाही. पी. रामस्वामी म्हणाले की नियमानुसार शास्त्रीयारनी उपस्थित केलेला मुद्दा बरोबर आहे. परंतु सात दिवसांची पूर्वसूचना शक्य नाही असा खुलासा करून तुम्ही हा ठराव मांडा असे काही म्हणाले. परंतु बापू म्हणाले की अशा परिस्थितीत मी माझा हा ठराव मागे घेतो असे ते परत परत म्हणाले, परंतु कोणीही ते मान्य केले नाही. हा ठराव आम्हांला मान्य आहे असे सर्व म्हणाले. शास्त्रीयार उठून अतिशय दुःखाने नम्रपणाने म्हणाले, "मी या ठरावाला माझी संमती देऊ शकत नाही याकरिता मी दिलगीर आहे." रात्री घरी परतताना बापू म्हणाले, शास्त्रीयारनी आज कमाल केली. त्यांचे हृदय थरथरत असल्यासारखे जाणवत होते. परंतु ते तर पवित्र माणूस आहेत. यामुळे त्यांनी पवित्रपणे विरोध केला. रात्री त्यांना पत्र लिहिले.

त्यात लिहिले -

## (व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री यांना पत्र)

"तुमच्या नकाराला माझ्या मनात खरी किंमत आहे. सर्वांच्या होकाराला काहीही किंमत नाही."

अमृतलाल ठक्कर सांगत होते की शास्त्रीयारसुद्धा पत्र वाचून म्हणाले, “असे पत्र गांधीच लिहू शकतात.” अतिशुद्ध प्रामाणिकपणा आपल्यातच असला पाहिजे असे नाही, समोरच्यातही असाच प्रामाणिकपणा असला पाहिजे याचे हे सुंदर उदाहरण आहे.

व्हाईसरायची परवानगी आली. संपूर्ण पत्र छापायला परवानगी दिली. मी समोरच्या ओसरीत झोपलो होतो. तिथून उठवून मला पलंगावर झोपायला लावले. वडोदरा स्थानकावर आधी व्यक्त झालेले प्रेम आणि आता प्रेमाचे हे परत उदाहरण.

४-५-१९१८

पत्राचा अनुवाद दीड तासात लिहवून घेतला. प्रेसनोटचे उत्तर (खेडा जिल्ह्यातील लढ्यासंबंधात निष्पक्ष पंच नेमण्याची आवश्यकता नाही असे सुचवणारी सरकारी यादी २४-४-१८ला प्रकाशित झाली होती. हा तिचा उल्लेख आहे. उत्तराच्या मजकुराकरिता पाहा परिशिष्ट १.) दुरुस्त केले. रात्री विजापूरला जायला निघाले.

५-५-१९१८

दुपारी बिजापूरला पोपोचलो. हुटगीहून बिजापूरला जात असताना ट्रेनमध्ये अहमदनगरचे थोडे वकील होते. आपल्या जिल्ह्यात ऑस्ट्रेलियन की अमेरिकन कंपनीकरिता सरकार काही जमिनीचे अधिग्रहण करू इच्छित होते. त्याबद्दल जिल्ह्यात असंतोष पसरलेला होता. त्याबद्दल ते चर्चा करू लागले. त्यांनी सरकारकडे केलेला अर्ज आणि इतर पत्रव्यवहार आणि परिषदेत मंजूर करायचा ठराव हे सर्व दाखवले. बापूंनी त्यांना प्रश्न विचारला की तुम्ही विनाकारण लुटले जात आहा असे त्यांना सांगायचे राहूनच गेले असे तुम्हांला वाटत नाही काय? आणि यामुळे त्या वकिलांना नवीनच दिशा सुचली. ठराव मंजूर करण्याआधी लोकांना त्यांचे हक्क समजावून सांगितले पाहिजे आणि आपले हक्क बुडवले जात आहेत असे जर लोकांना खरोखर वाटत असेल तरच त्यांच्याकडून मोठा अर्ज करायला लावायला पाहिजे. त्यांनी स्पष्टपणे लिहिले पाहिजे की आमची जमीन आम्ही कधीही सोडणार नाही, एक तर आम्हांला कैदेत टाका वा आमची जमीन आमच्याजवळ राहू द्या. बापूंनी अशी सूचना केली. ही करण्याआधी . . . ला भेटून त्यांना आपल्या परिस्थितीसंबंधी त्यांना काय म्हणायचे आहे हे समजून घ्या, त्यांचे उत्तर ऐकून घ्या आणि मग त्यांना उघडे पाडा.

एक गृहस्थ, 'मराठा'चे उपसंपादक, होमरूल प्रतिनिधीमंडळाचे पारपत्र करण्याच्या विरोधात सत्याग्रहाचा अर्ज करण्याच्या दृष्टीने बापूंशी चर्चा करायला आले. सत्याग्रह करण्याकरिता माणूस फार दृढ असला पाहिजे, मोठ्या पायावर सत्याग्रह होऊ शकेल असा सत्याग्रहाचा एक प्रकार असला पाहिजे. समोरच्याचे कार्य पाशवी, जुलमी, अनैतिक आणि अन्यायी नसेल तर सत्याग्रह होऊ शकत नाही असे बापूंनी त्यांना समजावले.

नऊ वाजता विषयनियामक समितीची बैठक झाली. तिथेही लष्करभरतीसंबंधी चर्चा झाली. दिल्ली परिषदेतील आपल्या भूमिकेबद्दल दुसऱ्या दिवशी बोलायचे बापूंनी कबूल केले. कबूल करताना ते म्हणाले, ”मला जर पूर्ण अधिकार देण्यात आले तर मी एकच साधा ठराव मंजूर करीन. त्यात जर कोणत्याही प्रकारची अट ठेवण्यात आली तर मी तिचा माझ्या सर्व शक्तिनुसार विरोध करीन.”

रात्री साडेनऊ वाजल्यानंतर अंत्यज परिषद भरली. शिंदेंनी त्याकरिता बापूंना अतिशय आग्रहपूर्वक निमंत्रण दिले होते. अनेक ठराव झाल्यानंतर उशिरा रात्री जवळपास चार वाजता बापूंना एक ठराव मांडण्याकरिता सांगण्यात आले. ठराव असा होता की ही परिषद कॉंग्रेस-लीग योजनेला पाठिंबा देते आणि अंत्यजांनासुद्धा सरकारमध्ये स्थान द्यावे अशी शिफारस करते. ठराव मांडण्याआधी सभेसमोर पाहत बापूंनी विचारले, “या सभेत किती अंत्यज आहेत?” परत विचारले, तिसऱ्यांदा विचारले. कोणीही उत्तर दिले नाही. अखेरीस कोणी तरी म्हणाला की एकसुद्धा अंत्यज नाही. हे ऐकून बापू हिंदीत म्हणाले -

बारा बारा वाजल्यानंतरही आपण असे का केले पाहिजे? पोपट 'राम', 'राम' करतो तशी आपली स्थिती आहे. भाई शिंदेंना मी म्हणेन की अशा परिषदा भरवण्याचे सोडून देऊन इतर कोणते तरी महत्त्वाचे कार्यक्रम करावे. अस्पृश्यतेच्या पापातून मुक्ती हृदयशुद्धीनेच मिळू शकते. अंतःकरणापासूनच्या भावनेनेच काम होते. कृत्रिमपणाने, वरपांगीपणाने आपले काम होणार नाही. अस्पृश्यता नाहीशी करण्यासंबंधी आपण बरेच ठराव केले आहेत. परंतु त्यांनी काहीच लाभ झाला नाही. एक माणूस सर्वानुमते म्हणतो आहे की ही परिषद अव्यवहार्य आहे. मीसुद्धा म्हणतो आहे की ही परिषद अव्यवहार्य आहे.

कॉंग्रेस-लीग योजना मजूर करण्याचा ठराव मी वाचला. परंतु कोणता तरी अंत्यज तिला अनुमोदन देईल असे मला वाटत होते. परंतु इथे तर एकही अंत्यज नाही. मग हा ठराव मंजूर करण्याचा

फायदा काय? या ठरावाचा मॉंटेग्यूवर कोणता प्रभाव पडेल? मी हा ठराव मांडत नाही. हा ठराव मंजूर करण्याचा आपल्याला किंचितही अधिकार नसल्यामुळे आपण हा ठराव इथे मांडू शकत नाही. आपण आपल्यामधील वरपांगीपणा टाकून देऊन सरळसाधेपणाने वागू लागलो तर तितकेच पुरेसे आहे. आपण वर्णाश्रम पाळत नाही, ब्राह्मणांनी ब्राह्मणांच्या धर्माचा त्याग केला आहे, क्षत्रियांनी क्षत्रियांच्या धर्माचा त्याग केला आहे, वैश्यांनी वैश्य धर्माचा त्याग केला आहे आणि जी गोष्ट आपल्या धर्मात नाही ती आपण धरून ठेवली आहे. आपण स्वराज्याकरिता पात्र नाही.

आपण जे स्वराज्य मागत आहो ते अंत्यजांकरिता काय करणार आहे? हा प्रश्न लॉर्ड सिडेनहॅम सारखे बंधू आपल्याला निश्चितच विचारतील. आणि त्याचे उत्तर देताना आपली परिस्थिती लाजिरवाणी होईल. जे स्वराज्य मागतात त्यांनी दुसऱ्यांना स्वराज्य दिले पाहिजे हा नियम आहे. मी तुम्हा सर्वांना सागू इच्छितो की हा खेळ सोडा आणि आपले पाप, आपली कठोरता नष्ट व्हावी अशी या मध्यरात्री अंतकरणपूर्वक प्रार्थना करा.

६-५-१९१८

उद्या सकाळी दिल्ली परिषदेसंबंधी आपले मत सांगतील हे सर्वांना माहीत असल्यामुळे सर्व ऐकण्याकरिता उत्सुक होते. बापूजी पुढीलप्रमाणे बोलले -

मी एक गंभीर चूक केली आहे. एका मित्राने येऊन सांगितले की बिजापूरमध्ये दोन पक्ष आहेत आणि त्यात मी तोंड खुपसून विनाकारण गोधळ घालतो आहे. मला खऱ्या परिस्थितीची कल्पना नव्हती. मी या भांडणात तेल ओतायला अथवा दोन पक्षांच्या भावना भडकवण्याकरिता इथे आलेलो नाही. तुम्हांला आणि मला मार्गदर्शन करण्याकरिता लोकमान्य टिळकांनी इथे यायला पाहिजे होते. राजकारणात तर मी तीन वर्षाचा मुलगा आहे. मला तर अजून बरेच काही पाहायचे, विचार करायचे आणि शिकायचे राहिलेले आहे. यामुळे मी जर खळबळ निर्माण केली असेल तर त्याकरिता मी तुमची माफी मागतो. जाहीर सभेत माणूस जेव्हा आपले विचार पूर्ण मनमोकळेपणाने व्यक्त करतो तेव्हा त्याच्यावर खळबळ निर्माण करण्याच्या विचाराचा आरोप करता येत नाही. मी जो कार्यक्रम आखतो आहे तो मला स्वतःला अंमलात आणता यावा म्हणून आहे. यामुळे हिंदुस्थानच्या वेगवेगळ्या भागात कोणत्या भावना आहेत हे जाणून घेण्याची मला आवश्यकता वाटत नाही. परंतु तुम्ही इथे आधीपासूनच

काही पूर्वविचार निर्धारित करून आलेला असल्यामुळे मी माझ्या स्थितीची चर्चा करू शकत नाही. मला तुमच्याबरोबर विचारांचे आदानप्रदान करणे, तुमच्या भावना आणि तुमचे विचार यामागे काय कारणपरंपरा आहे हे समजून घेणे आणि तुमच्या अंतर्मनात डोकावणे आवडले असते. परंतु याकरिता वातावरण जेव्हा शांत असेल तेव्हाच मी येण्याचे ठरवीन. तसेच आपण जेव्हा ठरावांशी बांधलो गेलोलो नसू तेव्हा तुमचे हृदय चोरण्याचा मी प्रयत्न करीन. मला वाटते की श्री केळकर योग्य तेच बोलले आहेत. आताच्या वेळी तर आपण काँग्रेसचा ठराव स्वीकारायलाच पाहिजे.

यानंतर गिरमिट प्रथा रद्द करण्यासंबंधी एक ठराव मांडला आणि दुपारी विजापूरकरिता निघालो.

७-५-१९१८

सकाळी मुंबई. दिवस लोकांच्या भेटीगाठीत गेला. अवंतिकाबाईंकडचे प्रिय जेवण जेवलो. रात्री निघालो. इथूनच बिहार सरकारला स्वामी सत्यदेवविषयी एक पत्र लिहिले होते. त्याचे उत्तर म्हणून बिहार सरकारचे एक सुंदर पत्र आजच्या डाकेतून मिळाले. स्वामीं सत्यदेवचे कसे दफन करण्यात आले, यांची कोणती भाषणे वादांनी भरलेली होती, आता पुढे काय करायचे असे सविस्तर वर्णन त्यात होते. आणि असेसुद्धा लिहिलेले होते की स्वामीजींवर तुम्ही जे नियंत्रण ठेवत आहा त्याबद्दल लेफ्टनंट गव्हर्नर तुमचे आभारी आहेत.

८-५-१९१८

नडियाड. गोष्टी. पत्रे लिहिली.

९-५-१९१८

मी बापूंना एक पत्र लिहून ते वल्लभभाईंबरोबर पाठवले. त्याचे वल्लभभाईंच्या हस्तेच उत्तर.

## (महादेव देसाई यांना पत्र)

"भाईश्री महादेव,

"जी गोष्ट मी तुझ्यावरील अतिशय श्रद्धेने म्हणालो होतो त्यांचा तू उलटच अर्थ करशील हे तर माझ्या स्वप्नातही नव्हते. तू माझ्यात इतका काही गुंतला आहेस की त्यामुळे तुला जर चंपारणला जायला सांगितले तर तुला धक्का लागेल असे मी समजत होतो. परंतु तू कल्पनाच कशी केलीस की तू मला अपूर्ण वाटल्यामुळे तूला दूर करण्याकरिता मी ही निंदनीय युक्ती शोधली आहे? तूच माझ्या अपेक्षा पूर्ण करू शकशील असे वाटल्याने मी तुला चंपारणला जाण्याकरिता सुचवले. बडहरवांचे काम दुर्गाच्या शक्तीपलीकडील नाही असेही मला वाटले. माझे हा अंदाज चुकीचाही असू शकेल. सध्या तर तुझ्या मनःशांतीकरिता मी इतकेच म्हणेन की तू केलेली सर्व कल्पना चुकीची आहे. तुम्हा दोघांच्या शक्तीबद्दल माझ्या मनात आदर असल्यामुळेच मी ही सूचना केली होती. तुझ्या मदतीशिवाय मला हे सर्व करणे कठीण जाईल असे मी रावजीभाई आणि देवदासजवळही बोललो होतो. तू अशी काही परिस्थिती निर्माण केली आहे की तुझी जागा भरून काढणे जवळपास अशक्य आहे. पोलाकला लिहिलेली वाक्ये खरीच आहेत. तू मला मुळीच निराश केलेले नाहीस. मी तुला माझ्या राजकीय कार्याच्या सिद्धीकरिता, तुझ्या कौशल्याकरिता आणि तुझ्या चारित्र्याकरिता पसंत केले आहे. तू मला निराश केलेले नाहीस. याशिवाय तू मला अतिशय प्रेमाने केलेली खिचडी खाऊ घालू शकतोस हे विशेष. अधिक तू भेटशील तेव्हा."

१०-५-१९१८

रात्री अहमदाबादला पोहोचलो.

११-५-१९१८

सकाळी माझ्या मुर्खपणाने भरलेल्या पत्रावर भाषण. तू असा अनर्थ करशील याची मला कल्पनाच नव्हती. तू माझ्यावर फार अन्याय केला आहे. हिंदुस्थानात ज्याला मी सर्वाधिक निर्भय माणूस समजत होतो त्याला तू भेकड ठरवलेस. मी जे तुला सरळपणे सांगू शकत नाही ते आडवळणाने मी सांगेन काय ! तुला गमावल्याने मला जो त्रास सहन करावा लागणार आहे तो केवळ मी बडहरवांच्या शाळेकरिता सहन करायला तयार झालो होतो इतकेसुद्धा तुला कळत नाही? मला तर खात्रीपूर्वक वाटत होते की मी तुला कुठेही जरी टाकले तरी तू तेथील काम पूर्ण करूनच येशील.

मी म्हणालो, "नरहररीला पाठवू शकत नाही असे तुम्ही मला सांगितले. यावरून माझी आवश्यकता फार कमी आहे असे मला वाटले."

बापू - ही गोष्ट खरी आहे. इथल्या शाळेकरिता नरहरीची गरज आहे. मग त्याला तिथे कसा पाठवू? मी माझ्या सचिवाशिवाय चालवू शकत नाही. तुला सोपवलेले काम दुसरा करू शकत नाही. परंतु मी तर माझे काम कसे तरी करून चालवू शकतो. परंतु तू असला तर मी दुप्पट काम करू शकतो. यामुळे मी हा त्रास सहन करायला तयार होतो.

दुपारी टपाल लिहिला. सायंकाळी शहरात गेले.

टपालात इस्थरला एक महत्त्वाचे पत्र लिहिले -

## (इस्थर फेरिंग यांना पत्र)

"प्रिय इस्थर,

"तुझे पत्र मिळाले. तू नाताळमध्ये आश्रमात येशील तेव्हा मी अथवा आम्ही तुझी वाट पाहत असू. त्या वेळी मुख्य इमारत बांधलेली असेल आणि हवा खूप सुंदर असेल. मला आशा आहे की व्हाईसरायना मी लिहिलेले पत्र आणि प्रेंटच्या भाषणाचे उत्तर म्हणून मी लिहिलेले निवेदन हे दोन्ही तू वाचलेले असशील. या दोन्ही पत्रात सरकार विषयीचे विचार आणि जीवनाच्या तत्त्वज्ञानाविषयीचे माझे विचार थोडक्यात आले आहेत. व्हाईसरायना लिहिलेल्या पत्रात प्रेम आणि कष्ट सहन करण्याचा नियम यांच्याविषयीचे माझे विचार स्पष्टपणे दर्शविले आहेत. 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' हे शब्द वास्तविक विचारांची फार विचित्र अभिव्यक्ती आहेत. खरे म्हणजे 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' हे 'दुर्बलांचे शस्त्र' आहे आणि मला त्याची घृणा आहे. हे शब्द 'प्रेमाचा कायदा' अगदी चुकीच्या पद्धतीने अभिव्यक्त करतात. प्रेम तर शक्तीचा सार आहे. ज्याच्यात भीतीचा पूर्णपणे अभाव असतो तोच मुक्तपणे प्रेम करू शकतो. प्रेमीजनांची शिक्षा ही तर आत्म्यावरील शीतल मलमाप्रमाणे असते.

"तुझ्या 'लिव्हर'करिता तू संपूर्ण उपवासाचा प्रयोग करणार नाहीस काय? उकळलेले पाणी भरपूर पी आणि ते जमत नसेल तर त्यात संत्र्याचा रस टाकून ते पी, त्यामुळे अशक्तपणा जाणवत असेल आणि चक्कर येत असतील तर अंथरुणात पडून रहा. आणि अजून बरे वाटावे म्हणून पाय आणि शरीराचा वरचा भाग पाण्याबाहेर ठेवून कटिस्नान घे. ही गोष्ट अतिशय तरतरी आणणारी आहे. यकृताची तक्रार दूर करणारा उपवासासारखा एकही उपाय नाही.

१२-५-१९१८

अहमदाबाद. काल रात्री बिनशर्त लष्करभरती करण्याचा ठराव गुजरात सभेने मंजूर केला.

१३-५-१९१८

ढुंडाकुआत सभा. ढुंडाकुआहून सरळ अहमदाबादला गेलो. बरोबर दुर्गा आणि बासुद्धा होत्या. रात्री दुर्गादास अडवाणी आले.

१४-५-१९१८

कठलालमध्ये नरहरीकडे मुक्काम. बापूंना जबरदस्त लू लागली आहे. दिवसभर भिजलेले कापड पांघरून झोपून राहिले.

१५-५-१९१८

ढुंडवामधील भाषणाचा अहवाल न विचारता मी 'क्रॉनिकल'ला पाठवल्यामुळे थोडेसे चिडले. खांडवाचा एक 'बेकार'अहवाल पाहिल्यामुळे. आज काही तातडीचा टपाल लिहिला.

डॉक्टर प्राणजीवन महेतांना -

## (डॉ. प्राणजीवन महेतांना पत्र)

"खेडाच्या लढ्याबद्दल काय लिहू? हा लढा अतिशय कठीण आहे. दोनतीन हजार रुपयांच्या प्रवासखर्चाच्या बळावर लढला जाऊ शकतो असे कोणाच्या ध्यानीमनीही नव्हते. २५००० रुपये गोळा झाले होते तेसुद्धा परत केले. आणि अनेक ठिकाणावरून पैसे देण्यासंबंधी लिहून आले होते त्यांना नकार कळवावा लागला. पैसा घेतला असता तर लढा बिघडला असता. अनैतिकता लढ्यात शिरली असती आणि लोकांचा अधःपात झाला असता. पैसा न घेतल्यामुळे या सर्वांपासून वाचलो आणि लढा शुद्ध ठेवू शकलो. या लढ्याकडे सर्व हिदुस्थान पाहतो आहे आणि त्याला तो कळतो आहे. शास्त्रियारना तो कळू शकला नाही याचा मला खेद होतो. परंतु कालांतराने त्यांनाही तो कळू शकेल. ते स्वतः पवित्र आत्मा आहेत, यामुळे मी निश्चिंत आहे. लढ्याच्या योग्यतेविषयी माझ्या मनात कोणतीही शंका नाही."

दाभोलकरचे पत्र. बिनशर्त पाठिंब्याविरुद्ध. मागितले नाही तर आईही वाढत नाही. सरकारला मागतलेच पाहिजे असा आशय. तुमचे व्हाईसरायना लिहिलेले पत्र तीनदा वाचल्यानंतरसुद्धा ते अंतर्गत धोरणासंबंधीच वाटते.

त्याचे उत्तर -

## (दाभोलकरांना पत्र)

“तुमचे पत्र मिळाले. तुम्ही मला इतक्या मनमोकळेपणाने लिहिले याकरिता मी तुमचा आभारी आहे. माझ्या लेखनाशी धोरणाचा नाममात्रही संबंध नाही. मला जे मान्य आहे तेच मी अक्षरशः लिहिले आहे. तुम्हाला मी माझ्या विचारांचा शुद्ध सारांश पाठवला आहे. निश्चितच माझी मान्यचा आहे की आपण वल्गना न करता लाखो लोकांची आहुती दिली तर आजच आम्हांला स्वराज्य मिळू शकते. ते कसे असेल हे तुम्हाला माझ्या पत्रावरून कळू शकेल. परंतु ते जर तुम्हाला कळू शकले नसेल तर या पत्रातूनही ते मी तुम्हाला समजावून सांगण्याकरिता असमर्थ आहे. यामुळे माझी विनंती आहे की तुम्हाला ते कळेपर्यंत ते परत परत वाचा आणि त्यातील शब्दाशब्दावर विचार करा. हा प्रयत्न वाया जाणार नाही. ही पत्रे मी उतावीळपणात लिहिलेली नाहीत. खूप प्रयत्नपूर्वक, शुद्ध भावनेने आणि देशप्रेमानेच लिहिलेली आहेत. हे जर पूर्ण समजू शकत नसाल वा यांच्यातून जर दोन अर्थ निघत असतील तर ती माझ्या तपश्चर्येची उणीव समजा. माझी योजना जर देश समजून घेऊ शकत असेल आणि त्यावर अंमल करील तर त्यात स्वराज्याचा आणि इतर शेकडो गोष्टींचा समावेश होईल. स्वराज्य द्या आणि मग लढू असे म्हणणे हे मला स्वराज्यतत्त्व न समजण्यासारखे वाटते. जनप्रतिनिधी म्हणून मी व्हाईसरायना जितकी काही पत्रे लिहितो ती सर्व जनतेसमोर ठेवणे माझे कर्तव्य आहे असे मी समजत नाही. मी माझ्या जीवनात प्रतिनिधी म्हणून जे काही कार्य केले आहे त्यांतील बहुतेक आणि माझ्या मते महत्त्वाचे कार्य तर गुप्तच राहील आणि राहायलाही पाहिजे. व्हाईसरायसाहेबांना मी लिहिलेले पहिले पत्र तर केवळ त्यांच्याकरिताच होते. त्यात मी माझे काही विचार मित्र समजून त्यांच्यासमोर ठेवले होते. ते मी जाहीर करू शकत नाही. त्या पत्रात उपयोजिलेली विनम्र परंतु कटू भाषा जनतेसमोर ठेवण्याने अनर्थच होईल. त्यांच्यासमोर ठेवलेली गोष्ट जितकी सांगता येणे शक्य आहे तितकी मी सांगितली आहे. माझे दुसरे पत्र माझ्या भावी कार्यक्रमासंबंधी आहे आणि पहिल्या पत्राच्या तुलनेत ते काहीही नाही.”

हनुमंतरावांचे पत्र. शास्त्रीयारनी दिल्ली परिषदेत जे भाषण दिले त्यावर ‘हिंदू’ने जी कठोर टिका केली होती तिचे उत्तर देण्याची हनुमंतरावांची विनंती. ‘हिंदू’च्या टिकेचा मुद्दा हा होता - शास्त्रीयारचे भाषण काही चांगले नव्हते आणि देशाचे प्रतिनिधी म्हणून आम्ही त्यांचा स्वीकार करू शकत नाही. त्यांना लिहिले -

## (हनुमंतरावांना पत्र)

“श्री शास्त्रीयाच्या भाषणावर ‘हिंदू’ने केलेली टिका दोषपूर्णच आहे. आणि मला असे वाटते की हिच्याकडे दुर्लक्ष करणे हेच हिचे समर्पक उत्तर असेल. कस्तुरी आयंगार असे गृहस्थ आहेत की ज्यांची युक्तिवादाने वा न्याबुद्धीने खात्री पटवता येऊ शकत नाही. त्यांची स्वतःची काही मते असतात आणि ते त्यांना इतके काही दृढपणे चिकटून असतात की दुसरा कोणताही माणूस त्यांचे ते मत बदलवू शकत नाही. जे शास्त्रीयारना ओळखतात त्याच्यावर ‘हिंदू’च्या टीकेचा कोणताही परिणाम होणार नाही. आणि जे कस्तुरी आयंगारच्या शब्दांना वेदवाक्य समजतात ते दुसऱ्या कोणाचेही म्हणणे ऐकून घेणार नाहीत. शास्त्रीयारचे उच्च चारित्र्य आणि विद्वत्ता यांच्यासमोर त्यांच्या कट्टराहून कट्टर शत्रूही उभा राहू शकणार नाही असा विश्वास आपण ठेवला पाहिजे. मला वाटते की ज्या कसोटीत दुसरा कोणताही माणूस टिकू शकणार नाही ती कसोटीही शास्त्रीयार सुरक्षितपणे बाहेर पडू शकतील. मला वाटते की याची त्यांनाही कल्पना आहे आणि म्हणूनच ते आपल्या ठिकाणी निश्चल आहेत. यामुळे कस्तुरी आयंगार वा अजून कोणी जरी त्यांच्यावर हल्ला केला तरी आपण काळजी करण्याचे कारण नाही. करण्यासारखी गोष्ट तर ही आहे की आपण सर्वांनी त्यांना शरीराची काळजी घेण्याकरिता भाग पाडले पाहिजे. त्यांची प्रकृती दुरुस्त होण्याच्या पलीकडची आहे असे मला वाटत नाही.

सेवक,

मो. क. गांधी

रात्री गुजरातसभेची सर्वसाधारण सभा भरली. बिनशर्त सहकार्य करण्याचा ठराव मंजूर झाला.

रात्री खांडवावाल्याचे प्रकरण हाती घेतले. अहवालासंबंधी काही सूचक उद्गार काढले -

अहवाल असे तयार करत असतात? तुम्ही असे कसे करता? तुम्हाला वेळ तर भरपूर असतो. अहवाल तर असा असला पाहिजे की एका दिवसाच्या अहवालाशी दुसऱ्या दिवसाशी आणि दुसऱ्याचा तिसऱ्या दिवसाशी संबंध जुळला पाहिजे आणि संपूर्ण अहवालातून संपूर्ण इतिहास उलगडायला पाहिजे. मी नाव विसरलो, परंतु बहुधा त्यांचे नाव रसेल असावे, पेकिंगवरील आक्रमणाचे असे काही चित्र रेखाटले होते की ते वाचून सर्व थक्क झाले होते. एडविन अर्नोल्डने "जपान बाय लँड ऍंड सी" च्या प्रवासात पत्र लिहिली आहेत. तेसुद्धा असेच सुंदर आहेत. तुम्ही रसेल वा अर्नोल्ड होऊ शकत नाही असे समजण्याचे काही कारण नाही. हे लोक काही सुरुवातीपासून अशी शक्ती घेऊन आले नव्हते. ते प्रयत्नाने असे झाले आहेत. खरे पाहता तुम्ही तर काल असे पत्र लिहायला पाहिजे होते की -

"मला खेद होतो की एक बेकार अहवाल पाहून मला मार्गदर्शनाची आवश्यकता वाटली आणि मी तुम्हाला पत्र लिहिले आणि त्यामुळे तुम्ही अतिशयोक्तीपूर्ण 'रयत आणि सरकारमधील दरी वाढते आहे' असा मथळा दिला.

दुसऱ्या दिवशी त्यांनी असाच मसुदा तयार करून दिला.

१६-५-१९१८

सकाळी नडियाडला येऊन पोहोचलो. संदसर गावी जायला निघालो. तिथे अद्भुत सभा झाली. दोनहजार पुरुषांची आणि पाचशे स्त्रियांची हजेरी. अद्भुत स्वागत. अद्भुत भाषण. मी हजर नव्हतो. मूर्खपणामुळे तिथे काही तरी गमावले हे निश्चित.

१७-५-१९१८

अहमदाबादला जाण्याकरिता रात्रीच्या गाडीने निघालो. रात्री स्थानकावर मी आणि दुर्गा वेगवेगळे झालो. दुर्गा रात्रीच्या ट्रेनने नवसारीला गेली.

१८-५-१९१८

ट्रेनमध्ये. बयानाला पोहोचताच दोन पत्रे शाईने लिहिली. नक्कल राहू शकली नाही.

१९-५-१९१८

ट्रेनमध्ये. मालवीयजी अहमदाबादेत भेटले. माझ्या डोक्यावर पाण्याची घागर होती. गर्दीच्या धक्क्यात ती घागर सांडली आणि मला आंघोळ घातली गेली. गाडीत बसल्यानंतर मला विचारले, "टाकी पाण्याने भरली नाही वाटते?" माझे लक्ष नव्हते. "तुला अशा गोष्टीही सांगाव्या लागतात काय? प्रवासात कशाकशाची आवश्यकता असते ते तुला कळायला पाहिजे. इथे लोक भरपूर काही करायला तयार असतात, तर तू इतके तर करवून घ्यायलाच पाहिजे होते. मी बाहेर जातो तेव्हा तू अशा गोष्टींकडे लक्ष ठेवायला पाहिजे. हे सर्व तू आधीच शिकून घ्यायला पाहिजे होते." मी चूप राहिलो. रात्री बांकीपूरला पोहोचलो.

२०-५-१९१८

दुसऱ्या दिवशी मोतिहारीला जायला निघालो. ट्रेनला वेळ असल्यामुळे रस्त्यात आगबोटीवर बसून भाषण ऐकावे लागले, "सकाळी पाच वाजल्यानंतरच तुला सांगितले नव्हते काय?" ट्रेनमध्ये झोपलो. मोतीहारीला साडेतीन वाजता पोहोचलो. रयतेला संबोधन. रुक्ष स्वागत. सायंकाळी खूप गोष्टी. स्वामीजींबरोबर चर्चा. स्वामीजींच्या स्वभावात एकदम बदल झालेला. बापूंबद्दल अतिशय सन्मान आणि भक्ती दाखवली. माझ्याबद्दल पूर्वीप्रमाणे उपेक्षा नाही तर आदर.

२१-५-१९१८

राजेंद्रबाबू पटण्याहून आले. त्यांच्यासमोर गोरखबाबूंशी चर्चा. हेकॉकला भेटले. मुलाखतीत हेकॉकला म्हणाले, "चंपारणचे काम आटोपून तुम्ही इथे आला असाल." ते उत्तरले, "माझ्या मृत्यूनंतरच हे सगळे संपेल." लष्करभरतीकरितासुद्धा मी खूप प्रयत्न करतो आहे असे सांगून आले. दुपारी स्वामींना

उपवासाचे अहमदाबादच्या लढ्याचे रहस्य समजावून सांगितले. मी दिल्लीतील गोष्ट सांगितली. रात्री राजेंद्रबाबूंनी मन भरून माझ्याशी गप्पा मारल्या. रात्री दोन वाजता भीतीहरवाला जायला निघालो.

२२-५-१९१८

भीतीहरवाला पोहोचलो. पूर्वी डॉ. देवना पत्र लिहिले होते. त्यात त्यांना थोड्या दिवसात शाळेकरिता इमारत बांधून देण्यासंबंधी लिहीले - "तुमच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकतो आहे." सकाळी पोहोचले. खूप गोष्टी झाल्या. इमारत पाहून खूप खुश झाले. दुपारी मुलांशी गप्पा. "चांगले होण्याकरिता शरीर, मन आणि कपडे स्वच्छ ठेवले पाहिजे" हे त्यांच्या मनावर ठसवण्याचा प्रयत्न. रामायणातील भरतासंबंधीचे दोन छंद म्हणाले आणि मुलांना समजावून सांगत म्हणाले,

सियाराम प्रेमपियूषपुरण होत जनम न भरतको
मनिमनअगम यमनियम शमदम विषमव्रत आचरतको
दुःखदाह दारिद्रदंभ दुषण सुयशमिस अपहरतको
कलिकाल तुलसीसे शठं हि हरिराम सन्भुज करतको.

पाठशाळेचा इतिहास काय आहे ते समजावून सांगितले. स्वार्थत्यागी आणि वकील असतानाही शारीरिक श्रम करायचा संकोच वाटणार नाही असे गुरू होण्याचा उपदेश केला.

रात्री मला म्हणाले की हा छंद फार भव्य आहे. तू तो नीट वाचून पाहिला काय? अयोध्याकांड वाचत असताना माझे डोळे नेहमी भरून येत असतात.

केंद्रीय कार्यलयाच्या गोष्टी झाल्या, "मोतिहारीत तर आपले घर नाही. परंतु जमीन आणि इमारत दोन्ही आपले असले पाहिजे. कॅथेड्रलची तुम्हाला माहिती आहे ना? कॅथेड्रलसारखी इमारत असली पाहिजे. त्यात दर वर्षी वाढ करता आली पाहिजे. एका कामाकरिता एक भाग. दुसऱ्या कामाकरिता नवीन. शिवाय तिसऱ्या कामाकरिता तिसरा भाग. अशा प्रकारे भाग वाढतच जातील. वेस्ट मिनिस्टर ॲबे ज्याप्रमाणे महान अल्फ्रेड राजाच्या काळापासून आहे आणि अजूनही त्यात खंड आणि विभागांची भर पडतेच आहे. राजेंद्रबाबू आणि ब्रिजकिशोरबाबू या दोघांपैकी एकाने तरी इथे राहायची तयारी ठेवली पाहिजे." गोरखबाबू म्हणाले की जमीन घेण्याकरिता अमूक एका महिन्याच्या आत जमीन घ्यायचीच

असा तुम्ही निर्धार केला पाहिजे. मी हसलो, तर समोरचे हसून म्हणाले, “माझे तर सर्व काम असेच आहे.” मला प्रश्न पडला की जिथे ऑफिसचे भाडे देताना नाकी नऊ येत आहेत तिथे आपली जमीन असण्याची गोष्ट कशी ! असे असल्यामुळे मी पोचट ठरलो. रात्री बेतियाला पोहोचलो.

२३-५-१९१८

बेतियाहून दुपारी मोतिहारीला आलो. पिअर्सनच्या अटकेसंबंधात टपालात ॲन्ड्र्यूजची दोन लांब पत्रे होती. त्यांचे स्वतःचे प्रयत्न निष्फळ ठरल्यामुळे ते दुःखी होते.

## (सी. एफ. ॲन्ड्र्यूजचे पत्र)

"अखेरीस गेल्या काही वर्षात माझ्या पदरी मोठ्यातमोठी जर कोणती निराशा पडली असेल तर त्यातील ही एक आहे. मी व्हाईसरायकडे गेलो. ते मला ठामपणे 'नाही' म्हणाले. त्यांचा तपास करायची मुळीच इच्छा नाही.

"मी मॅफींना भेटलो. ते एकदम तुझी गोष्ट करू लागले आणि तुझ्या पत्राचे काय उत्तर द्यावे आणि त्यात येणाऱ्या अडचणीसंबंधी माझ्याशी चर्चा केली. ते म्हणाले की या सगळ्या गोष्टी प्रांतिक आहेत आणि यासंबंधात मला लॉर्ड विलिंग्डन यांच्याशी बोलावे लागेल, वगैरे . . .

"मी सांगितले की बंगालमधील काही नेत्यांना मी भेटलो आहे. आणि मला असे वाटते की गांधींना बोलवायला ते फार इच्छुक आहेत. नंतर मी त्यांना म्हणालो की तुमच्याबरोबर काम करणे फार कठीण आहे. त्यांना भीती वाटते की एखादा असा मुद्दा न निघो की ज्यामुळे फूट पडेल. मी तुला हे सांगायची आवश्यकता नाही की मी एकदम ताठ झालो आणि तुझा बचाव केला. मला आशा आहे की मी अतिशय शांतपणे आणि चांगल्या पद्धतीने बोललो. याबाबतीत काय गुंता आहे ते माझ्या लक्षात आले. त्यांनी खेडाचे उदाहरण दिले. तू त्यांना जेव्हा युद्धकार्य म्हणाला तेव्हा या विचाराने त्यांना हसू आले. मग परत मी त्यांच्याशी वाद घालायला तयार झालो आणि सर्व काही त्यांना समजावून सांगितले. लॉर्ड विलिंग्डनची भूमिका मी त्यांना जेव्हा समजावून सांगितली तेव्हा ते काहीसे नरमले. परंतु अखेरीस ते म्हणाले की हे सर्व तर ठीक आहे, परंतु मी इतके मात्र म्हणेन की मी जर जिल्हाधिकारी असतो आणि कोणी येऊन माझ्या वसुलीच्या आडवा आला असता तर मी प्राणपणाला लावून त्याला विरोध केला असता.

"मुसलमानांसंबंधीची माझी सूचना मवाळ आणि मित भाषेत होती. मी त्यांना पत्र दाखवल्यानंतर ते अजूनच नरमले. परंतु त्यांच्यावर व्हाईसराय एकदम चिडले. ते कठोर भाषेत मला

म्हणाले, "आम्हांला युद्ध पुढे न्यायचे आहे." सरकारचा जडपणा, मूर्खपणा, दृष्टीचा अभाव, पूर्ण विचार करून त्यावर बेधडकपणे कायम राहण्याची तयारी हे सर्व उपाय युद्ध चालवण्याकरिता आवश्यक असतात. तुझी तर त्यांनी गोष्टच काढली नाही.

"या शेवटच्या आठवड्यात विलीच्या (पिअर्सन) विचाराचा माझ्या मनावर फार ताण पडला आहे आणि मी फार दुःखी आहे."

याचे उत्तर दिले -

## (सी. एफ. ॲन्ड्र्यूज यांना पत्र)

विलीला अटक झाल्याचे वाचून मला धक्का लागला नाही. व्हाईसरायच्या भावनांबद्दलही मला सहानुभूती वाटते. जोपर्यंत हे भयानक युद्ध सुरू आहे तोपर्यंत या गोष्टींची चौकशी करायला त्यांना सांगण्याची आवश्यकताच काय? विलीने आणि आपण हे सर्व नम्रपणे सहन केले पाहिजे. विलीच्या प्रकरणात कोणत्याही सिद्धांताचा प्रश्न उपस्थित होत नाही. त्यात जातिद्वेषाचाही प्रश्न येत नाही. जनभावनेचाही प्रश्न येत नाही. आपल्या विचारांमुळे वा कामामुळे आपल्याला जेव्हा तुरुंगात जावे लागते तेव्हा आपल्याला समाधान वाटायला पाहिजे. आवश्यकता तर विलीबरोबर पत्रव्यवहाराचा संबंध स्थापित करण्याची आहे. आपल्यावर अन्याय होतो आहे असे जर त्याला वाटत असेल तर तो का लढणार नाही? त्याच्यावर अन्याय होतो आहे याची काळजी आपण का करायची? असे करून आपण त्याच्यावर अन्यायसुद्धा करतो. माझी खात्री आहे की तो जिथे पडला आहे तिथे सुखी आहे. मला वाटते की जाहीर आंदोलन आवश्यक नाही. माझ्याशी तू सहमत होत असशील तर व्हाईसरायला त्रास दिल्याबद्दल त्यांची माफी मागणारे एक पत्र न घाबरता लिही. मला केव्हा केव्हा वाटत असते की लढाईचा भयंकर ताण असतानाही हिंमत न सोडणारे इंग्रज योगी असले पाहिजे. त्यांनी जर या योगभावनेचा सर्व क्षेत्रात उपयोग केला तर ते मोक्षाचे अधिकारी होतील."

दुसऱ्या टपालात मॅकफरसनला स्वामीजीसंबंधी पत्र लिहिले. रीडला पत्र लिहिले. खुरशेदला पत्र लिहिले. दुपारी तीन वाजता बडहरला जायला निघालो. कॉलऱ्याची साथ सुरू झाल्याने धक्का लागला. रात्री अकरा वाजता परत आलो.

मोतीहारीत जमिनीचे नक्की ठरले. पायाभरणीची तयारीसुद्धा झाली आहे. खुश खुश झाले आहेत.

२४-५-१९१८

जमीन विश्वस्तांच्या नावाने करण्याकरिता आणि बांधकामाची परवानगी घेण्याकरिता सकाळी पत्र लिहिले. बक्षिसाच्या गोष्टी. काही गोंधळ झाला तर प्रत्येक विश्वस्ताने तिथे ठिय्या मांडून बसायला पाहिजे. बांधलेली इमारत तोडली तर बांधावी, परत तोडली तर बांधावी. अशा प्रकारे मरेपर्यंत तिथे ठाण मांडून बसावे, तिथून हलू नये. विश्वस्त होण्याकरिता ही अट असली पाहिजे. न्यासपत्र लिहिले.

३०-५-१९१८

(गुजराती प्रतीत इथे ३० तारीख आहे. पण ती स्पष्टपणे चूक आहे.)

हनुमंतरावांना एक तातडीचे पत्र लिहिले.

## (हनुमंतरावांना पत्र)

तुम्ही सोसायटीशी (भारत सेवक समाजाशी) संबंध तोडावा अशी माझी इच्छा नाही. सोसायटीत राहूनच तुम्ही हिंदीचे काम करा. माझी इच्छा आहे की शास्त्रीयारनी तुम्हाला अलाहाबादला जाण्याची परवानगी द्यावी. तिथे तुम्ही एक वर्ष राहा आणि व्यवस्थित हिंदी शिका. मग मद्रासला जाऊन तुमच्या इतर कामांबरोबर तेलगु लोकांमध्ये हिंदी प्रचाराचे काम करा. तुम्ही जर हिंदीचा अभ्यास केलेला असेल तर तुम्ही तुमच्या कामाचे क्षेत्र विशाल करू शकाल आणि प्रसंग पडला तर मद्रास प्रांताबाहेरसुद्धा सर्वसामान्य जनतेत काम करण्याची शक्तीही तुमच्यात येईल. या गोष्टीकडे तुमचे लक्ष गेले होते की नाही हे मला माहीत नाही. परंतु माझे लक्ष तर या गोष्टीकडे आहेच. द्रविड लोक आणि इतर हिंदुस्थानी यांच्यात मोठी दरी निर्माण झालेली आहे. ही दरी बुजवण्याचा अगदी जवळचा परिणामकारक मार्ग हिंदी भाषाच आहे. इंग्रजी कधीही यांचे स्थान घेऊ शकणार नाही. जेव्हा सुशिक्षित लोकांची संपर्क भाषा हिंदी होईल तेव्हा हिंदी शब्दभांडारातील शब्द आपोआपच सामान्य जनतेच्या तोंडी रुळतील. हिंदीत वर्णन करता येणार नाही असे काय आहे? हिंदी शिकायला अतिशय सोपी भाषा आहे. कारण काहीही असो पण हिंदी व्याकराणात मी जितकी सूट घेऊ शकतो तितकी दुसऱ्या कोणत्याही भाषेत घेता येत असल्याचे मला माहीत नाही. परिणामी हिंदी शिकण्याकरिता स्मरणशक्तीचीच आवश्यकता आहे. इतके तर मी म्हणेनच की राष्ट्रकार्य करण्याकरिता हिंदीच्या ज्ञानाची आवश्यकता अनिवार्य आहे. सोसायटीचा एक सदस्य जर हिंदी शिकून घेईल तर याहून अधिक चांगली गोष्ट काय होईल? एकदा गोखले माझ्याजवळ म्हणाले होते की सोसायटीच्या सर्व सदस्यांकरिता हिंदी आवश्यक करावी असे मला वाटते आणि सोसायटीच्या सदस्यांनी सोयाटीच्या सभेत हिंदीतच बोलावे अशी माझी इच्छा आहे. परंतु त्यांच्यासमोर मोठ्यातमोठी अडचण तमिळ लोकांची आणि विशेषेकरून शास्त्रीयारची होती. हिंदी शिकण्याच्या दृष्टीने ते स्वतःला फार म्हातारे समजतात.

सत्याग्रहाश्रमाला तुम्ही सोसायटीपेक्षा वेगळे मानू लागला आहा. मी असे समजत नाही. गोखलेजींची शेवटच्या दिवसात अशी इच्छा होती की गुजरातमध्ये सोसायटीती एक शाखा उघडावी आणि जे प्रांत राजकीय दृष्टीने मृतावस्थेत आहेत त्यांना जिवंत करावे. हा कार्यक्रम अंमलात आणण्याकरिता माझा जो नम्र सहभाग राहिला आहे त्याचा मला अभिमान आहे. सत्याग्रहाश्रमाला काही महत्त्वाच्या कारणांकरिता शाखा म्हणून मान्यता नाही ही गोष्ट महत्त्वाची नाही. याचे काम तर आजही सुरूच आहे. त्यात जे काही चांगले आहे त्याचे श्रेय माझ्या मते सोसायटीला मिळावे आणि त्यात ज्या उणिवा आहेत त्या माझ्या मर्यादांमुळे आहेत असे समजण्यात यावे. त्यांची जबाबदारी सोसायटीची नाही. जसजसा काळ लोटेल तसतशा माझ्या मर्यादांची मला ओळख पटेल आणि मग आश्रम सोसायटीत सामावून जाईल. सर्वांना सांगा की तुम्हांला जर आश्रमात भरती व्हायचे असेल तर तुमचासुद्धा स्वीकार सोसायटीने आश्रमाला दिलेली देणगी म्हणून केला जाईल, इतर प्रकारे नाही. या सर्वांवरून तुमच्या लक्षात येईल की हिंदी शिकण्याचा तुम्ही जो विचार करताहात त्यामुळे तुमचा सोसायटीशी संबंध तुटेल अशा शक्यतेची मी कल्पनासुद्धा करू शकत नाही.

सेवक,

मो. क. गांधी

चंपारणहून निघालो त्या दिवसांची रोजनिशी अनियमित होती. चंपारणहून इथे येत असताना घडलेल्या घटना -

रात्री एक वाजता पटना स्थानकावर पंख्याने खूप वारा घातला. बापू गाडीत झोपले. शेजारच्या प्रवाशाच्या सतरंजीवर बापूंचे पाय होते. सतरंजी काढली असती तर बापू उठून गेले असते. यामुळे त्यांना न उठवता सतरंजी न घेताच ते गाडीतून उतरले. हा माणूस पोलिसात होता आणि त्याची परिस्थिती अगदी साधारण होती असे त्याच्या नंतरच्या बोलण्यावरून लक्षात आले. बापूंना ती सतरंजी परत करण्याची फार काळजी वाटू लागली. अबोलपणे काम करणारे सर गिबी हे येथीलच आहेत असे बापूजी म्हणाले. मलासुद्धा ही गोष्ट फार भावली. मलासुद्धा मनातून असे वाटले की अबोलपणे काम करणारा या जगात मी एकही माणूस पाहिलेला नाही. परंतु हा प्रसंग मी लोकांच्या स्वभावातील वैविध्य दाखवण्याकरिता लिहिला आहे. सकाळी मी सतरंजीची गोष्ट सांगितली. तिथे बसलेला एक मारवाडी ती ऐकत होता. मुगलसराय स्थानकावर उतरत असताना तो म्हणाला, “तुम्हाला हिचा काय उपयोग आहे?” बापू म्हणाले, “नाही, ही मूळ मालकाला द्यायची आहे.”

ते जेव्हा दक्षिण आफ्रिकेत गेले होते तेव्हा ते अशा कामाकरिता गेले होते की ज्यात हिशेबाचेच काम जास्त होते. “मी जेव्हा समोरच्या वकिलाला जमा आणि उधारीच्या गोष्टी करताना ऐकले तेव्हा वाटले की जमाउधारीचा हा भेद मला कसा कळेल? माझ्या मनात तर रात्रभर तेच विचार येत होते. निश्चय केला की शिकून घ्यायचेच. माझ्या अशिलाला मी दोन हिशेबनीस नेमायला सांगितले. समजले नाही तर मी वारंवार विचारत असे. एकदा समजले नाही तर दुसऱ्यांदा, तिसऱ्यांदा, चौथ्यांदा मी विचारत असे आणि त्यांना थकवत असे. अखरीस मी ही केस सहजपणे मांडू शकलो आणि जिंकलोही.”

गाडीच्या रचनेकडे पाहून मला म्हणाले, “महादेव, मी ठरवले असते तर उत्तम अभियंता होऊ शकलो असतो. मी जी कोणती गोष्ट पाहतो तिचे वैशिष्ट्य लगेच माझ्या लक्षात येते. आणि लगेच तिच्या रचनेतील गुणदोष मला दिसू लागतात. कितीही लहान चूक असली तरी मी ती पकडू शकतो. मला तर वाटते की मी जर डॉक्टरी केली असती तर मी हिंदुस्थानात पहिल्या नंबरचा डॉक्टर झालो असतो. सर्व माझ्याकडे पाहून थरथर कापले असते आणि चुकीचे काम करण्यापूर्वी त्यांनी दोनदा विचार केला असता. माझ्यासारखी चिकित्सा तर आजही कोणी करू शकत नाही अशी मान्यता आहे. मी जे कोणते रुग्ण डॉक्टरला सोपवले आहेत त्यांची मी केलेली चिकित्सा आणि शुश्रूषा पाहून डॉक्टर चकित होत

असतात. माझी तर डॉक्टर व्हायची इच्छा होती. पण माझे वडील म्हणायचे की आपल्याला कातडीची चिरफाड करायला जायचे नाही. मला तर जाऊन शरीरशास्त्र, जीवशास्त्र, प्राणविद्या शिकायची होती. परंतु दररोज बेडके चिरायच्या कल्पनेने माझे विचार बदलले. वैद्यकशास्त्राच्या चांगल्या अध्ययनाकरितासुद्धा जिवंत प्राण्यांना चिरण्याची आवश्यकता नाही असे मला वाटते.

यानंतर थोडावेळ बसले. गंभीर होऊन मला हरवलेले पैसे घ्यायचा आग्रह करू लागले. विविध प्रकारे माझी समजूत घालू लागले. परंतु माझी काही ते पैसे घेण्याची इच्छा होईना. यामुळे त्यांनी माझ्यावर फारसे दडपण आणले नाही. परिणामी मी वाचलो.

उद्या रात्री पटण्यात भाषण होणार आहे. त्याबद्दल रस्त्यात जात असताना मझरुल हकशी माझ्या गप्पा सुरू असताना मी पुनर्जन्माबद्दल शंका व्यक्त केली. त्याबद्दल मला उद्देशून ते म्हणाले, “महादेव, तू असा असशील असे मला वाटत नव्हते. पुनर्जन्म न मानणाराला तर मी हिंदूच समजत नाही.”

मी - हिंदू नका समजू, वाटल्यास ख्रिस्ती समजा वा अजून कोणी समजा, पण मी माझ्या मनातील गोष्ट का लपवू?

मी त्याबद्दल वाद घालू लागलो तर म्हणाले की वादाचे कामच नाही. तुला दिसत नाही काय की क्षणोक्षणी करोडो जन्मतात आणि करोडो मरतात? हीच गोष्ट पुनर्जन्म असलाच पाहिजे असे सुचवते.

‘या मति सा गति’प्रमाणे माणसाला घोडा करणारी वा घोड्याला माणूस करणारी मती असते हे खरे आहे काय? या प्रश्नाच्या उत्तरात ते म्हणाले, “ही गोष्ट वेगळी आहे ना? असे असतानाही ॲना किंग्जफर्ड म्हणते की ‘मला वाटते की ‘फ्रांसमधील अनेक लोक वाघाच्या योनीतून जन्म घेतील’. हे काय सुचवते?”

मी - काहीही सुचवत नाही. यातून इतकेच लक्षात येते की ॲना किंग्जफर्डला लोकांच्या दुष्कृत्याचा फार मोठा धक्का बसला आणि त्यातून तिने हे निषेधात्मक उद्गार काढले.

बापू काहीच बोलले नाही. अखेरीस मी त्यांना म्हणालो, “मी विश्वास ठेवण्याचा प्रयत्न करीन. जो हे मान्य करत नाही त्याचा प्रगतीवर विश्वास असू शकत नाही. सेवा करणाराचा तर असा विश्वास असलाच पाहिजे. यावर मी म्हणालो, या दृष्टीने माझा पुनर्जन्मावर विश्वास आहे. आणि जेव्हा मला स्पष्ट

अनुभव येईल तेव्हा माझा पूर्ण विश्वास बसेल" मी जॉन क्रिस्टोफरच्या दुसऱ्या एका पुस्तकातील गॉटफ्रीड आणि क्रिस्टोफरचा जो संवाद आहे तो दाखवला आणि म्हणालो की अशा प्रकारेच तुम्ही मला 'विश्वास ठेवायला, निरीक्षण करायला आणि प्रार्थना करायला' सांगत आहा ना? तर ते 'हो' म्हणाले. शेवटी समारोप करताना ते म्हणाले, "तू अर्नोल्डचे 'मरणोत्तर जीवन' (लाईफ बियाड डेथ) वाचायला पाहिजे."

२८-५-१९१८

नडियाड आले. दोन दिवस राहिलो. किरकोळ कागदपत्रात वेळ गेला. तिथे दोन ठिकाणी सुंदर भाषण केले. ही दोन्हीही भाषणे छापण्यात आली आहेत.

३०-५-१९१८

अहमदाबादला गेलो. सायंकाळी प्रागजीबरोबर निश्चितपणे ठरले की मी दुर्गाला चंपारणला जायला सांगायला पाहिजे. प्रागजी आणि त्यांच्या सुनेलाही तिथे पाठवण्याचे नक्की झाले. रात्री . . . ला सांगायचा निरोप सांगितला. कामातुराणां न भय न लज्जा हे फिनिक्सचे उदाहरण देऊन समजावून सांगितले.

१ ते ८-६-१९१८

सकाळी मी काठियावाडला जायला निघालो. तिथे ८ तारखेपर्यंत राहिलो. कागदपत्रे सुरू होती. मी गेलो त्या दरम्यान मॅफीला पत्र, दक्षिण आफ्रिकेसंबंधी वर्तमानपत्रांना पत्र. सर जॉर्ज बांस यांनासुद्धा पत्र. खेडाचे प्रकरण समजावून सांगतले. त्यासंबंधात वर्तमानपत्रांना पत्रे. हे सर्व प्रकाशित झाले. बिहार सरकारला स्वामीजींना सोडण्यासंबंधी तार केली. दुर्गाचा चंपारणला जाण्याला नकार. बापूंना तिचे पत्र.

८ ते १२-६-१९१८

बापू इथूनच रात्री मुंबईला जायला निघाले. मीसुद्धा सकाळी मुंबईला पोहोचलो. टिळकांबरोबर सल्लामसलत. ठरावावर न बोलण्यासंबंधी आणि मनुष्यबळसंबंधी समितीवर काम न करण्यासंबंधी राज्यपालांना पत्र. दुसऱ्या दिवशी मुलाखत. राज्यपालांची बढाई. ‘चेम्सफर्डकरिताही माझे भाषण जड झाले. परिषदेत गोंधळ. रात्री राज्यपालांना पत्र. चंदावरकरांना भेटले. दुसऱ्या दिवशी पुण्याला जायला निघाले. भारत सेवक समाजाचा प्रसंग. रात्री शास्त्रीयारचे भाषण. त्याआधी अनाथ विद्यार्थी गृहात आणि चिंचवड विद्यार्थी गृहात भाषणे. केळकर अध्यक्ष होते. सुंदर भाषण.’

१३-६-१९१८

सकाळी मोठ्या पहाटेसच निघालो. पुणे मेलमध्ये खूप झोप येत होती. जागेची खूप मारामार होती. अर्धशिर्षमुळे डोके दुखत होते. तरीसुद्धा मला एक गोष्ट सांगायची होती ती सांगितली -

तू काल शहाणपणाचे वर्तन केले नाही. तू . . . ला कशाला सांगितले की तुला सोसायटीच्या वार्षिक समारंभाला जाण्याकरिता सुटी मिळाली आहे. तू तर इतकेच सांगायला पाहिजे होते की येथील नियमाप्रमाणे बाहेरच्या माणसाला जाऊ देत नसतात.

मी - मी खोटे बोलू शकत नाही. मला आणि देवदासला तर जाण्याची परवानगी देण्यात आली होती.

बापू - नाही, यांत खोटे बोलण्याचा प्रश्नच येत नाही. तू इतकेच सांगायचे होते की ‘तू जाऊ शकत नाही, कारण असा नियम आहे.’ यात काही खोटे नाही. . . . तू विचारलेच नाही की तू जाणार आहेस काय? असे केल्याने ... च्या मनात जे जहर भरलेले आहे, अपमानाची भावना आहे, आणि तिथे झालेली हिंसा हे सर्व तू टाळू शकला असता. आणि सोसायटीलासुद्धा तू वाचवू शकला असता. डॉ. देवनी तुझ्याबरोबर . . . ला जो निरोप पाठवला होता तो तू असे करशील असे समजून.

मी - परंतु सोसायटीचे वर्तन सौजन्याने भरलेले असते ना? की नाही?

बापू - तसे का समजले जाणार नाही? माझ्याबरोबर तर अनेक लोक येत असतात. वेगवेगळ्या प्रकारचे लोक येत असतात. या सर्वांना हे लोक कसे प्रवेश देऊ शकतील? शास्त्री काल जे म्हणाले आणि बोलले त्याचे समर्थन करण्याची त्यांच्यात शक्तीही आहे. परंतु इतरांमध्ये नसली तर? आणि शिवाय सकाळी तर सर्वांना आपापल्या कामाचा अहवाल सादर करायचा आहे. अशा वेळी ते सभापक्षाच्या माणसाला कसे येऊ देऊ शकतील? येऊ देणारच नाहीत. तुला तर हे सर्व प्रकारे ओळखतात. तटस्थ म्हणून तू परिचित आहेस. आणि तुझ्यावर त्यांचा विश्वास आहे म्हणून ते तुला येऊ देतील. परंतु हे तर काहीही नाहीत. भविष्यात असे होऊ नये. मी हे तुला दोष देण्याकरिता सांगून राहिलेलो नाही. परंतु तुला समजावून सांगतो आहे की तू जर इथे सुज्ञपणाने काम घेतले असतेस तर चांगले चांगले झाले असते.

रात्री अहमदाबादकरिता निघालो.

१४-६-१९१८

सकाळी नडियाड. मी अहमदाबादला गेलो. रात्री परत मुंबईला जायला निघालो.

१५-६-१९१८

राज्यपालांची मुलाखत. निष्फळ. रात्री एक वाजेपर्यंत बसून उद्याच्या सभेकरिता भाषणाचे श्रुतलेखन करायला लावले. अद्भुत भाषण.

१६-६-१९१८

मुंबईत परिषद झाली. टिळकांना अपमान वाटला. निषेधसभा झाली. बापूंनी आपल्या पद्धतीने सरकारशी सहकार्य करण्याच्या अटी ठामपणे मांडल्या. सभा मोठी झाली. नंतर शंकरलाल बँकर यांचे विचार सरकारच्या कामात हस्तक्षेप करणारे आहेत असे वाटू लागले. "ही परिषद झाल्यावर आमची सरकारवर श्रद्धा कशी टिकणार? लोकांची मदत करायची काहीच इच्छा नाही. तुम्ही आमचे नेते आहा.

तुमच्याशिवाय आम्ही काहीच करू शकत नाही. आता या कामात आमचे पुढारी व्हा. नाहीतर मी होमरूल लीग सोडून तुमच्याकडेच येतो." या अर्थाचे त्यांचे पत्र.

याचे उत्तर -

## (शंकरलाल बँकर यांना पत्र)

तुमचे पत्र मिळाले. तुम्ही होमरूल लीग सोडावी आणि माझ्याबरोबर येऊन काम करावे असे तर मी मुळीच म्हणणार नाही. उलट तुम्ही होमरूल लीगमध्ये राहावे आणि होमरूल लीगचे धोरण शुद्ध दिशेने संचालित व्हावे अशी माझी इच्छा आहे. तुम्हाला तर जी दिशा आहे तीच शुद्ध वाटते. मला तर आता ती भयंकर वाटते आहे. होमरूल लीग जर भरतीत भाग घेणार नाही तर तसे करणे मुंबईच्या ठरावाविरुद्ध जाणेच होईल. होमरूल लीगमध्ये राहून भरतीच्या कामात भाग घेता येणार नाही असे जर होमरूल लीगच्या सर्व सदस्यांचे मत असेल तर मुंबईचा ठराव मंजूर व्हायलाच नको होता आणि मला अध्यक्षस्थानी बसवायला नको होते. मला सहन करून लीगने इतके तर दाखवले आहे की ज्यांना भरतीचे काम करायचे आहे ते ते करू शकतात.

माझ्यात जी श्रद्धा आहे ती इंग्रज जनतेबद्दलच आहे असे नाही, ती मानवजातीच्या स्वभावाबद्दल आहे. प्रत्येक माणसात सत्याचा काही तरी अंश असतोच. त्याचे पोषण करणे हे आपले काम आहे. असे करताना कोणी जर आपल्याला फसवले तर त्याचे परिणाम त्याला भोगावे लागतील, आपल्याला नाही.

तुम्ही जशी समजता तशी लोकांची परिस्थिती नाही हे तुम्ही निश्चितपणे लक्षात ठेवा.

तुम्ही भेटाल तेव्हा मी तुम्हाला हे समजावून सांगेन. माझी मान्यता आहे की या कार्यक्रमावर झेप घेणे हिंदुस्थानातील प्रत्येक होमरूल लीगीचे कर्तव्य आहे. याचबरोबर सरकारच्या अन्याय्य कामाबद्दल तुम्हाला जर आंदोलन करायचे असेल तर तुम्ही करू शकता. असे कराल तर दोन्ही कार्य झाल्यासारखे होतील. होमरूल लीग जर भरतीविषयी काहीही करणार नाही तर तिला मोठाच धक्का लागेल. . . .

१७-६-१९१८

नदियाडला आलो. लष्करभरतीचे महत्त्व समजावून सांगण्याकरिता अवैध सभा झाली.

१८-६-१९१८

अहमदाबादला आलो. मुंबईचे भाषण वर्तमानपत्रात आहे. सायंकाळी गुजरात सभेची सभा. अगदी मूर्खपणाच्या गोष्टी. सभेत फार असमाधान आढळले.

१९-६-१९१८

आश्रमात युद्धपरिषद. रात्री फिरायला गेलो तेव्हासुद्धा हीच चर्चा.

२०-६-१९१८

सकाळी नरहरी म्हणाला की मी भरती व्हायला तयार आहे. मणिबहेन रडू लागल्या. रात्री नडियाडला आलो.

२१-६-१९१८

लष्करभरतीकरिता आवाहन करणारे पत्रक काढले. उत्तम पत्रक. ऑफिसचे काम. नडियाडमध्ये सायंकाळी लष्करभरतीकरिता सभा. जोरदार भाषण. पत्रकाचे भाषांतर करण्याची मला आज्ञा.

रात्री इंदुलालशी व्याख्यानासंबंधी चर्चा - शास्त्रींच्या प्रसंगासंबंधी, शंकरलालसंबंधी, बापूसंबंधी, शास्त्रींच्या बोलण्याच्या शैलीसंबंधी फार उच्च अभिप्राय. शास्त्रींची भक्ति, नम्रता. १९१६ च्या उत्सवाच्या वेळी बोलताना जनक राजाने केलेल्या स्वयंवराच्या वेळी राम शिवधनुष्य उचलू शकला

हा प्रसंग घेऊन म्हणाले की मी गोखलेंची जागा घेऊ शकत नाही. वर्षे लोटल्यानंतर दुसरे शिवधनुष्य उचलण्याकरिता राम येईल तोपर्यंत.

२२-६-१९१८

अहमदाबादमध्ये दिवस गेला. मी गेलो तेव्हा गाडी चुकलेली होती. यामुळे नडियाडमध्येच राहिलो. रात्री परत नडियाडला आले.

२३-६-१९१८

सकाळी भाषांतरात सुधारणा करण्याचे काम चालले. सकाळी नऊ वाजेपर्यंत अर्धे सुधारून झाले. सुभेदार आल्यामुळे त्यांच्याबरोबर गोष्टी. तटस्थ माणसाप्रमाणे हरिलाल अपराधी आहे असे मला वाटते. तुम्ही निःशंक माणसाप्रमाणे त्याच्यावर खटला भरा. नरोत्तम सेठनासुद्धा असेच लिहिले. दुपारी भाषांतर परत पाहिले. मी त्याच्या प्रती तयार केल्या. सायंकाळी खूप पत्रे लिहिली.

सुभादारांशी झालेल्या चर्चेत -

शहरांवर आधारित सुधारणा मला सुधारणाच वाटत नाहीत. जितके गाव तितके प्रजासत्ताक असतील आणि त्यावर आधारित जे राज्य असेल ते स्वराज्य. मला तर जितके राजे आहेत ते सर्व लुटारू वाटतात. आपला इतिहास लुटारूंचा इतिहास आहे. प्रताप वगैरेंचे चरित्र वाचून माझ्या मनात कोणताही उत्साह संचारला नाही. ते फार मोठे लुटारू होते. त्यांना काही विशिष्ट हेतू साध्य करायचा होता. त्यांचा पराक्रम त्याकरिता होता. आपल्या जनतेने तर राजांना खुश करण्याचा प्रयत्न केला आहे. पशूंना नैवेद्य दिला आहे, नागांची पूजा केली आहे. हे सर्व स्वार्थसिद्धीकरिता. कितीही सुधारणा करा, परंतु निसर्गाचा उपयोग संयमाने कराल तरच सुधारणा होईल असे माझे मत आहे. जसजशी शहरे वाढत जातील तसतसा देश विनाशाकडे जात जाईल असे मला वाटते. मोठ्या धबधब्याचा प्रवाह गवताच्या पात्याने अडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या लहान मुलाची लीला पाहा. सुधारणा अडवण्याचा माझा प्रयत्न तसाच वाटेल. परंतु मला तर या बाळलीला करणेच आवडते.

"इंग्रजांनी अनेक पूण्यकर्म केले आहेत" या लष्करभरतीतील वाक्याबद्दल सुभेदार थोडे टोमणे मारू लागले.

त्याच्या  उत्तरात म्हणाले, "मी यांचे जितकी पूण्यकर्म पाहिले आहेत, तितकेच पापकर्मही पाहिली आहेत. यांच्या पापकर्माचे जसे यांना फळ मिळेल तसेच यांच्या पूण्यकर्माचेही फळ यांना मिळाले पाहिजे असे माझे म्हणणे आहे. मी तर खुनीलाही माफ करणारा आहे आणि याच्या पूर्णकर्माचे फळ यांना मिळो असे इच्छिणारा आहे. या लोकांनी हलके काम केले आहे पण यांना कमी प्रतीची गोष्ट आवडत नाही. यामुळे याच प्रजेमधून आपल्याच लोकांनी केलेल्या पापासंबंधी बोलणारे लोक निघाले आहे. जनतेमध्ये अनेक सुधारणा करण्यासंबंधी यांनी तत्परता दाखवली आहे. त्यांच्यातील सर हेन्री कँपबेल यांनी दक्षिण आफ्रिकेला संघराज्य दिले आहे. युरोपमध्ये झालेल्या अनेक सुधारणांचे मूळ इंग्लंडमध्ये आहे. दक्षिण आफ्रिकेत क्रांतीचे कोणतेही चिन्ह नसताना कॅम्पबेलने लॉर्ड मिल्नरला काढले आणि जनतेला जागे केले. लाखो रुपये खर्च करून चिनी लोकांना काढले आणि जनतेला स्वातंत्र्य दिले. चिनी लोकांना ठेवले असते तर सत्यानाशच झाला असता. खाणीच्या अनेक प्रबंधकांनी त्याविरुद्ध प्रचार केला परंतु जनता अढळ राहिली. अशी अनेक उदाहरणे आहेत. परंतु इथे यांची पूजा करण्याची आवश्यकता नाही. या लोकांना शक्य तितके आपण तपासून घेतले पाहिजे इतकेच माझे म्हणणे आहे. तुम्हाला मला एकच गोष्ट विचारायची आहे. तुमची इच्छा काय आहे? जोपर्यंत तुम्ही साम्राज्याच्या बचावाकरिता लढण्याकरिता तयार होणार नाही तोपर्यंत भागीदार होण्याची गोष्ट जर तुम्ही कराल तर तुम्ही दांभिक आहा असेच म्हणावे लागेल. जनतेजवळ चांगले बोलता परंतु ते अंमलात आणत नाही. मौनव्रत हा फार मोठा गुण आहे. तुमच्याकडून बोलल्याशिवाय राहवत नसेल तरच बोला. त्या वेळी तुम्ही जे बोलाल ते परिपक्व फळाप्रमाणे इतरांच्या कानांवर पडेल. टिळकांमध्ये जनतेबद्दल अशी घृणा नाही. हिंदी राष्ट्रभाषा परिषदेत त्यांनी जे भाषण केले आणि तेव्हा त्यांनी जनतेबद्दल जी स्तुतीसुमने वाहिली होती ती विसरता येत नाही. त्यांच्या विद्वत्तापूर्ण भाषणाबद्दल मी व्हाईसरायशीसुद्धा बोललो होतो आणि त्यांना म्हणालो होतो की तुमच्या स्थितीत मी असतो तर यांना मी माझ्याजवळ घेतले असते. या भाषणात त्यांनी केलेली योग्य प्रशंसा, त्यांची प्रचंड विद्वत्ता हे सर्व त्यांच्या शब्दांमधून वाहत होते. परक्याच्या भाषेत नाही तर त्यांच्या भाषेत अशा काही प्रकारे ते अभिव्यक्त झाले होते की हे सर्व विचार त्यांनी पचवलेले आहेत, परिपक्व झालेले आहेत असे मला वाटले. त्यातून अभिव्यक्त

झालेले तेज पाहून मला असे वाटले की जोपर्यंत आपल्याजवळ असे रत्न आहेत तोपर्यंत हिंदुस्थानबद्दल आशा सोडायची काहीही आवश्यकता नाही. या भाषणात त्यांनी स्वराज्याची बाजू बिघडवली नव्हती. भाषेच्या उत्पत्तीचा सिद्धांत मांडून परस्परांच्या संबंधांकरिता सामान्य भाषा पाहिजे या गोष्टीवर ते आले. हा इतिहास सांगता सांगता ते म्हणाले की "इंग्रजांनी खूप सेवा केलेली आहे. त्यातील एक सेवा ही आहे की त्यांनी प्रांतिक भाषांचा उद्धार केला."

लष्करभरतीच्या कामात पडलेला असतानाही देवदासने हिंदीच्या वर्गांकरिता सूचना देण्याची संधी सोडली नाही. त्याचबरोबर त्याने लष्करभरतीचे रहस्यही समजावून सांगितले -

"तुम्ही शिक्षणाच्या कामाची चांगली सुरुवात केली आहे असे दिसते. काल मी काही सूचना केल्या होत्या. व्याकरण लगेच शिकवायला सुरुवात करा. यामुळे विद्यार्थ्यांना भाषेत रस वाटेल. तसेच शब्दांचे रूप सांगणे चांगले राहील. त्यांची तमिळशी तुलना करावी. येणाऱ्याच्या वयाकडे आणि त्यांच्या अभ्यासाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे."

## (देवदास गांधींना पत्र)

"लष्करभरतीचे पहिले पत्रक इथूनच निघाले होते. त्याच्या तीन प्रती पाठवत आहे. इंग्रजीत भाषांतरही केले आहे. वाचल्यानंतर जे विचार येतील ते कळव. आजकाल मी अहिंसा धर्माला वेगळ्याच भव्य स्वरूपात पाहतो आहे. त्याचबरोबर माझ्या संयमातील उणिवांचे दर्शनसुद्धा घेतो आहे. या कार्याकरिता माझी तपश्चर्या फार तोकडी पडते. पूर्वी तपश्चर्येमुळे जे अनुभवज्ञान मिळत होते त्याच्या एक कोटीवा भागसुद्धा आजच्या प्रयोगांनी मिळत नाही. पाण्याच्या हजारो थेबांमधून दोन भाग हायड्रोजनचे आणि एक भाग ऑक्सिजनचा निघतो तरी पाणी त्यांनीच बनते असे म्हणता येत नाही. हे अनुमानज्ञान आहे. परंतु दोन भाग हायड्रोजनचे आणि एक भाग ऑक्सिजनचा घेऊन मी जर पाणी बनवले तर हे निश्चितज्ञान झाले. हे अनुभवज्ञान आहे. पाणी जरी इतर प्रकारे तयार होत असेल तरी या एकाच प्रयोगाने मी निश्चितपणे सांगू शकतो की वरील मिश्रणाने तर पाणी तयार होईलच. आपण अनेक गोष्टी अनुभवाने करतो आणि त्यात कोणतीही अडचण येत नाही. महान कार्यात अनुमानाच्या उणिवा आणि अनुभवाची भव्यता दिसून येईल."

बापूचे आशीर्वाद

लष्करभरतीवरील पत्रक साहित्यात अमर व्हावे असे आहे असे हार्निमनला कळवण्याकरिता लिहिलेले पत्र -

## (बी, जी. हार्निमन यांना पत्र)

यासोबत मी पत्रक पाठवत आहे. त्याच्या बाजूने तुमच्या लेखणीचा लाभ मिळेल की नाही हे मला माहीत नाही. परंतु जर लाभ मिळाला तर त्याला मी फार मूल्यवान समजेन. मला त्याची गरज आहे. मला निश्चितपणे वाटते की सरकारला आपण शिपाईही पुरवले पाहिजे आणि त्याचबरोबर सरकारच्या अन्यायाशी लढाही सुरू ठेवला पाहिजे. असे केले तर आपणा सर्वांमध्ये खरे एकमत होऊ शकते. सरकारी अंलदारांचा मूर्खपणा सैन्यभरतीचे काम कठीण करतो आहे. परंतु यामुळे मी निराश होऊन राहिलेलो नाही. आपण आपल्याकडून जे होऊ शकते ते करत राहिलो पाहिजे. विरोधी सभेत जे ठराव मंजूर झाले त्यांचा मी असा अर्थ करतो आहे.

सेवक,

मो. क. गांधी

होमरूलमध्ये सहभागी व्हायचे की नाही यासंबंधी विठ्ठलभाईंना लिहिले -

## (विठ्ठलभाई पटेल यांना पत्र)

"भाईश्री विठ्ठलभाई,

"तुमचे पत्र मिळाले. मला तर वाटते की तुम्ही होमरूल बाहेर राहावे आणि शक्य होईल ती सेवा करणे तुमच्यासाठी चांगले राहील. सध्यातरी होमरूल लीग कठीण परिस्थितीत आहे. तिची कठीण परिस्थिती बाहेरील त्रासामुळे नसून आतूनच तिला फार कटकटी सहन कराव्या लागत असल्यामुळे आहे. कोणता मार्ग धरावा हे तिला कळून राहिलेले नाही. त्रास द्यायचा की मदत करायची? त्रास खूप दिला. आता त्यातून निवृत्ती घेऊन थोडे बांधकाम (रचनात्मक काम) करण्याची आवश्यकता आहे. जोपर्यंत हे होणार नाही तोपर्यंत होमरूल लीगची शक्ती फुलणार नाही. होमरूल लीगला सेवाकार्याकडे वळवण्याकरिता जर तुम्ही होमरूल लीगमध्ये सामील होणार असाल तर अवश्य व्हा. परंतु लहानमोठ्या सगळ्यांशी संघर्ष करण्याकरिता होमरूल लीगमध्ये सामील झालेले तिच्या सदस्यांना आवडणार नाही. कोणी जर संस्था तोडण्याकरिता तिच्यात सामील होत असेल तर त्याला चांगलाच विरोध होईल. प्रकृतीची काळजी घेण्याची कला जर शिकाल तर बरीच काही सेवा करू शकाल.

"वल्लभभाईंचा नवीन धंदा कसा वाटतो? ते रिक्रुटिंग सार्जंट झाले आहेत"

विधवांच्या पुनर्विवाहासंबंधी विविध विचार सुरू आहेत. त्यासंबंधी खुलासा करा असे पत्र भाई मोहनदास नागजींचे आले. त्याचे उत्तर -

## (मोहनदास नागजींना पत्र)

“पुनर्विवाहासंबंधी माझे मत असे आहे की पुरुषाने वा स्त्रीने पतीचा वा पत्नीचा मृत्यू झाल्यानंतर परत विवाह न करणे आवश्यक आहे. हिंदू धर्माचा आधार संयम आहे. तसे तर सर्वच धर्मांचा आधार संयम आहे, परंतु हिंदू धर्मात संयमाला फार मोठे स्थान देण्यात आले आहे. अशा धर्मात पुनर्विवाह तर अपवादानेच व्हायला पाहिजे. माझे विचार हे असे असतानाही जोपर्यंत बालविवाह सुरू आहेत आणि पुरुषवर्ग जितक्या वेळा लग्न करायचे असेल तितक्या वेळा लग्न करत असल्यामुळे जर कोणी विधवा लग्न करायची इच्छा करत असेल तर तिला तसे करण्यापासून अडवण्याचा प्रयत्न करू नये आणि तिच्या इच्छेचा सन्मान केला पाहिजे. असे जरी असले तरी बाविधवेच्या मनात मी पुनर्विवाहाचे बिजारोपण करणार नाही परंतु तिने लग्न केले तर ते पाप आहे असेही मी समजणार नाही.

मोहनदस गांधी”

रेव्हरंड हॉज यांच्याशी बापूंचे निकटचे संबंध चंपारण पासूनच होते. बापू चंपारणला गेले तेव्हा त्यांची भेट होऊ शकली नाही. यामुळे त्यांनी लिहिलेल्या पत्रातून त्यांच्या उत्तम स्वभावाचा परिचय होतो-

## (रेव्हरंड एफ. जे. हॉज यांचे पत्र)

“मला माहीत आहे की तुम्ही चंपारणला विसरणार नाही. कधी तरी तुमची भेट होईल अशी आशा मी आनंदाने जपून ठेवली आहे. तुम्ही इथे जे काम केले आहे ते टिकून राहील. जसजसे दिवस जातील तसतसे याचे मूल्य कळत जाईल. इथे मी नवजीवनाचा उत्साह, पौरुषत्वाचे भान आणि नवजागृती अनुभवतो आहे, आणि शिवाय माझ्या अंतःकरणात भविष्याबद्दलच्या भरपूर आशा आहेत. आणि तुमच्या कार्याचा हा सरळ सरळ परिणाम आहे असे मी समजतो आणि ईश्वराला प्रार्थना करतो की तुमच्या इतर मेहनतीला असेच फळ येवो. माझा विश्वास आहे की तुम्ही ज्या शाळांची स्थापना केली आहे त्या सुरू ठेवता येतील. त्या काळोखातील दिव्यासारख्या आहेत. ते जर विझले तर फार करुण स्थिती निर्माण होईल. तुमचे जे कोणी कार्यकर्ते इथे येतील त्यांना सांगून ठेवा की त्याच्याकरिता माझ्या मिशनचे दार नेहमीच उघडे आहे आणि आम्ही त्यांचे हार्दिक स्वागत करू. आपण सर्व बंधू एकच कार्य करत आहो. मला तुमच्या संपर्कात राहण्याची इच्छा आहे. परंतु तुमचे जीवन किती व्यग्र आहे हे माहीत असल्यामुळे तुम्ही मला लिहीत राहा असे म्हणण्याचीसुद्धा मला हिंमत होत नाही. असे जरी असले तरी अधूनमधून तुमच्याकडून मला एकदोन ओळी जरी मिळाल्या तरी मी मला सर्वात भाग्यवान पुरुष समजेन. कस्तुरबाई आणि तुम्ही मला तुमच्या अंतर्गत मंडळातील समजा. असे केल्याने आम्ही काही उद्धटपणा करू असे तुम्ही समजणार नाही असा विश्वास आहे. आमचे घर तुमच्याकरिता नेहमी उघडे आहे आणि आमचा कधी तरी तुमच्या आश्रमात येण्याचा विचार आहे. तुम्ही कुठेही जरी असला तरी आमच्या प्रार्थना तुमच्यासोबत आहेत. मी आशा करतो की तुम्हीसुद्धा कधी तरी आमच्याकरिता प्रार्थना कराल. चंपारणमधील अडचणी तुम्ही समजू शकता. यामुळे तुम्हाला ज्ञानपूर्वक प्रार्थना करतो आहे. मला आशा आहे की खेडातही सर्व काही चांगले होईल. माझ्या बुद्धीप्रमाणे तर चंपारणमध्येसुद्धा परिस्थितीत स्थिर गतीने सुधारणा होत आहे. मला वाटत नाही की बनारसच्या राजाला इथे आणण्याच्या कामामुळे, यात यश मिळो वा न मिळो, इथे वाहत असलेल्या प्रवाहाला जी दिशा मिळाली आहे तिच्यावर काही परिणाम होईल.

“मी आशा करतो की तुम्हा दोघांचीही प्रकृती चांगली असेल. देवदास तुमच्या बरोबर आहे? जॉन अर्नेस्ट शाळेत राहायला गेला आहे, परंतु डोनाल्ड इथेच आहे. नेहमीप्रमाणे तो प्रसन्न आहे. आम्ही सर्व ईश्वरकृपेने कुशलक्षेम आहो.”

याचे उत्तर -

## (रेव्हरंड एफ. जे. हॉज यांना पत्र)

"तुमच्या प्रेमळ पत्राकरिता हृदयापासून आभार. आम्ही स्वतःला तुमच्या परिवाराचे सदस्यच समजतो. तुमच्याबरोबर जेव्हा केव्हा थोडा वेळ घालवण्याची मला संधी मिळायची तेव्हा मला आनंदच होत असे. तुम्ही तुमच्या पत्रात माझ्या सहकाऱ्यांचा उल्लेख केला आहे आणि या शाळा मरू नये म्हणून काळजी घेण्याची सूचना तुम्ही मला केली आहे. यामुळे बाबू ब्रिजकिशोरकडे हे पत्र पाठवण्याची मी सूट घेतो आहे. तुम्हाला माहीत असेल की चंपारण सोडायच्या आधी भीतीहरवात शाळेकरिता पक्की इमारत बांधून डॉ. देव गेले होते. स्त्री शिक्षिका मिळवण्यात मला फार अडचण जाते आहे. परंतु एखादी मिळवण्यासंबंधात मी निराश नाही. अधूनमधून तुम्ही या शाळांना भेट देत राहावे अशी माझी इच्छा आहे. वाहनाची व्यवस्था करायला तुम्ही गोरखप्रसादला सांगाल.

"देवदास सध्या मद्रासमध्ये आहे. तिथे तो तमिळ बंधुभगिनींकरिता हिंदीचे वर्ग चालवतो आहे.

"खेडाचा संघर्ष काही वेळेपूर्वीच संपला. समाधानाची जाहिरात करणारे माझे पत्र तुम्ही वर्तमानपत्रात पाहिलेच असेल? सध्या मी लष्करभरतीच्या कामाला सुरुवात केली आहे. आम्ही दोघेही श्रीमती हॉजची आठवण करत असतो. त्यांच्यात पूर्वीसारखीच शक्ती आली असेल अशी आशा आहे.

"मुले मला पाहून लाजत होती. आशा आहे की मी जेव्हा त्यांना परत भेटेन तेव्हा त्यांनी लाजाळूपणा सोडलेला असेल. दर तीन महिन्यात एकदा तरी चंपारणची भेट घ्यायचीच असा माझा विचार आहे."

त्याच दिवशी कुमारी श्लेशीनला (दक्षिण आफ्रिकेत सुरुवातीला बापूंबरोबर टंकलेखक म्हणून काम करत होत्या. मग त्या बापूंच्या अत्यंत विश्वसनीय सचिव झाल्या. सत्याग्रहाच्या लढ्यात त्यांनी खूप मदत केली. त्यांची त्यागवृत्ती, निर्भयता, प्रामाणिकपणा आणि कौशल्य यांचे वर्णन करताना बापू कधी थकत नसत.) पत्र लिहिले -

## (कुमारी श्लेशीन यांना पत्र)

“ज्या पत्राची मी दीर्घ काळापासून वाट पाहत होतो ते अखेरीस आले खरे. आम्ही सर्व तुझ्या पत्राची वाटच पाहत असतो.

“अर्थात फिनिक्स विकायचे नाही. तुला जर पाच एकर जमीन हवी असेल तर मिळू शकेल. तुझे स्वप्न मला आवडले. विशेषतः त्यात हिंदुस्थानात येण्याच्या गोष्टीचाही समावेश असल्यामुळे.

“तुला टाईपरायटरचा कंटाळा आला असल्याचे पाहून मला खूप आनंद झाला.

“रामदासला शिपी व्हायला मी सांगितलेले नाही. परंतु इतके मात्र सांगितले की शिंप्याच्या कामात कोणतेही काव्य नाही. तो आदर्श शिंपीसुद्धा होऊ शकतो. परंतु तो विचित्र मुलगा आहे. त्याला वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव मिळवणे आवडते. तो जर कवी झाला तर शब्दांचा खेळ करणारा कवी होणार नाही, शब्दांतून अनुभव व्यक्त करणारा कवी होईल. आणि तो काम करणारा कवी होईल आणि त्याच्या कार्यात काव्य असेल. रामदास स्वप्नाळू आहे आणि मला स्वप्नाळू लोक आवडतात. मी आशा करतो की तू त्याची मित्र आणि मार्गदर्शक होशील आणि त्याला सन्मार्गाला लावशील. माझी इच्छा आहे की तू थोड्या वेळेकरिता मणिलालबरोबर राहायला पाहिजे. तिथे तू तुझा अभ्यास सुरू ठेवू शकशील.

“वॉगल (श्रीमती वॉगल हिंदुस्थानी स्त्रियांना शिकवत होत्या.), फिलिप (चार्ल्स फिलिप्स ट्रांसवालमध्ये कॉंग्रेग्रेशनल चरचे धर्मगुरू होते.) आणि डोकच्या घरात (गांधीजी रेव्हरंड जोसेफ डोकची पत्नी आणि मुलगी ऑलिव्हा डोक यांच्यासंबंधी म्हणत आहेत.) सर्व कसे आहेत? कधी तरी यांना भेटत असतेस की नाही? मेक अनटायर कुठे आहे? हिंदुस्थानी समाजाचे काम कसे सुरू आहे? थंबीला भेटत असतेस की नाही? त्याचे कसे सुरू आहे? या सर्व प्रश्नाची चर्चा तू तुझ्या पत्रात करशील अशी अपेक्षा आहे. परंतु काहीही न होण्यापेक्षा थोडे थोडे होणे चांगले..

"इथे माझे शब्द फार क्लिष्ट झाले आहेत. माझी प्रकाशित झालेली निवेदने तू अगत्याने वाचायला पाहिजे. सध्या मी सैन्यभरतीच्या महाकार्यात पडलो आहे. माझ्या कामामुळे मला सतत रेल्वेने प्रवास करावा लागत असतो. एकांताकरिता आणि आरामाकरिता वेळ मिळावा असे मला खूप वाटत असते. परंतु असा दिवस माझ्या नशिबी असेल असे वाटत नाही. इथे कस्तुरबाचा विकास अद्भुत प्रकारे होतो आहे. ज्या वस्तूंकरिता ती भांडत असे त्या वस्तुंबद्दचा तिचा मोह फार चागंल्या पद्धतीने नाहीसा झाला आहे. परंतु हे सर्व वर्णन मी करणार नाही. तू इथे येशील तेव्हा तुझ्या डोळ्यांनीच पाहशील.

मो. क. गांधी"

वेस्टला पत्र -

## (श्री वेस्ट यांना पत्र)

"भाईश्री वेस्ट,

"तुमचे पत्र मिळाले. आनंद झाला. माझी इच्छा आहे की तुम्ही आर्थिक परिस्थितीसंबंधी काळजी करू नये. अल्बर्ट माझ्या भावासारखा आहे. अशी कोणतीही गोष्ट नाही की ज्यामुळे त्याच्यावरील माझ्या विश्वासाला धक्का लागेल. अल्बर्टबद्दल जर मी निराश होईन तर जगाबद्दल मी निराश होईन. मी त्याला लिहिले आहे. मला माहीत आहे की सद्यपरिस्थितीत जे करणे उत्तम असेल ते त्याने केले आहे. तुम्ही आणि सॅम दोन्ही मुलांच्या योग्य शिक्षणाकरिता व्यवस्था करू शकला याचा मला आनंद होतो. हिल्डाला माझी आठवण येते की नाही? मणिलालला असे कसे वाटले की मला काही माहीत नाही? तुम्हा दोघांबद्दलही त्याचे खूप चांगले मत आहे. आणि तुम्हीसुद्धा त्याच्यावर खूप प्रेम करता. परंतु त्याचा स्वभाव संशयी होऊ लागला आहे. मला अजूनही वाटते की त्याच्यात सुधारणा होईल. मला माहीत आहे की तुमचे प्रेम त्याचा संशय पूर्णपणे काढून टाकील. मी आशा करतो की तुम्ही त्याच्याजवळ जाल, त्याच्याशी बोलाल आणि त्याला समजावून सांगाल. तुमच्याबद्दल मणिलालच्या मनात चुकीच्या कल्पना असाव्या हे मी सहनच करू शकत नाही.

आश्रमाकरिता नवीन इमारती बांधण्याचे काम सध्या सुरु आहे. इमारतीच्या बांधकामावर देखरेख करण्याकरिता तुम्ही इथेच असायला पाहिजे होते असे मला किती वाटते? जमीन फार सुंदर ठिकाणी मिळाली आहे. मगनलाल सर्व सांभाळतो आहे. तिथे फिनिक्समध्ये इमारतींचे बांधकाम सुरू असताना अल्बर्ट जे काम करत होता ते इथे मगनलाल करतो आहे. याला आश्रमाबाहेर कशातही मजा वाटत नाही.

तुम्हा सर्वांना प्रेम.

मो. क. गांधी

२४-६-१९१८

अहमदाबादमध्ये. सकाळी पत्रे. दुपारी शिक्षकांना भेटले. मुलांना त्यांच्या प्रिय व्यवसायासंबंधी गोड गोड शब्दांत प्रश्न विचारले. कोणी विणाई, कोणी संस्कृत असे म्हणाले. नीलक लेखन म्हणाला. कृष्णदास गणित म्हणाला. आणि काकांचा बाळ म्हणाला की 'मला तर खेळायला आवडते.' मग रामायणाबंधी गोष्टी केल्या. त्यावरून घ्यावयाचा बोध सांगितला. शरीराच्या अवयवासंबंधी गोष्टी केल्या. ताठ आणि सरळ बसण्याचा त्वचेवर आणि पोटावर होणारे परिणाम मुलांना समजावून सांगितले. आणि गोष्टींवरून नीतीच्या विषयाकडे वळले. त्यांच्या तोंडून सुंदर वचन निघाले. ते म्हणाले,"तुमच्या व्यक्तिमत्वावर वाटेल तितका रीतीभातीचा प्रभाव पडला तरी तुम्ही तुमच्या व्यक्तिमत्वाला दृढ, घट्ट आणि स्वच्छ ठेवले पाहिजे. तुमचे व्यक्तमत्वच तुमचे शील आहे, तुमचे चारित्र्य आहे. रीतीभातींनी तर आपण गणित भाषा विज्ञान उत्यादींमध्ये प्रवीण होऊ शकू. परंतु आपल्याला शुद्ध ठेवण्याकरिता यांचा उपयोग होऊ शकत नाही. आपले व्यक्तिमत्व संयमामुळे, सद्विचारामुळे, सत्संगतीमुळे, सद्वचनांमुळेच चांगले राहू शकते."

सायंकाळी आश्रमात जाण्याकरिता निघालो. बा सोबतच होत्या. मी धावत जाऊन त्यांना पकडले. मला म्हणाले, "महादेव, राजकीय समस्या सोडवण्यापेक्षा संसारातील समस्या सोडवणे जास्त कठीण असते. ही चंची (हरिलाल गांधींची पत्नी) आली आहे तर बाला असे वाटते की मी नडियाडलाच जाऊन राहावे. मी चंचीबहेनला आणि पार्वतीबहेनला रडवणाऱ्या बातम्या सांगितल्या. तर म्हणाल्या सर्व आपापले दुःख रडत असतात. आपण का रडत बसायचे? सर्वांबरोबर आपण रडू लागलो तर दिवसाचे चोवीसही तास रडारडीतच जातील."

मी - स्त्री किती परतंत्र आहे? नवऱ्याला पटले तर ती तसे करते खरे परंतु परंतु तिला नवऱ्याचे म्हणणे ऐकावे लागतच असते आणि त्याचे परिणाम सहन करावे लागत असतात.

बापू - संपूर्ण जगातील स्त्रियांची परिस्थिती ही अशीच आहे. परंतु यात दुःखी होण्याचे कोणतेही कारण मला दिसत नाही. हा तर स्त्रियांचा स्वाभाविक धर्मच आहे. अवलंबून राहण्याची त्यांना आवश्यकता असते. अवलंबून राहण्याचा स्त्रियांना आनंद वाटतो. हेच त्यांचे जीवन आहे. आपण कमाई करून आणायची. बाहेरचे प्रश्न आपोआपच सुटून जातात. स्त्रीला सांगावे की यात तू तोंड खुपसायचे कारण नाही. तिला सांगावे की तू आनंदाने तुझ्या मुलांना सांभाळ, त्यांना खुश ठेव. आणि ही अगदी

स्वाभाविक व्यवस्था आहे. बकरी गरीब असते. ही गरिबी बकरीकरिता दुःखद असते काय? तसे पाहिले तर स्त्रीची मासिक पाळी आणि जननक्रियासुद्धा दुःखदच समजायला पाहिजे ना?

मी - नाही, त्यांचे परावलंबन इतके स्वाभाविक नाही.

बापू - तितकेच स्वाभाविक आहे. कोणत्याही स्त्रीचे अवलंबून राहिल्याशिवाय भागत नाही हे तर खरे आहे ना? . . . सारख्या बहाद्दूर स्त्रीलासुद्धा आधाराची आवश्यकता असतेच ना? पुरुषाशिवाय यांचे भागू शकतच नाही.

मी श्रीमती बेझंटचे उदाहरण सागितले. त्यावर ते म्हणाले हे बरोबर आहे. यांनीसुद्धा एकामागून एक आधार शोधले आहेत. आणि आता तर त्यांनी असा माणूस शोधला आहे की ज्यामुळे त्यांची किंमत कमी झाली आहे.

मी विचारले, “कोण सुब्रमण्यम ऐय्यर?”

बापू - नाही, हे ॲनी बेझंटनाच वश झालेले आहेत. सी. पी रामास्वामी त्यांचा आधार आहेत. सी. पी.ना तर त्या इतक्या काही वश झालेल्या आहेत की विचारूच नको. दोघेही स्वतः ठरवल्याप्रमाणे करतात. आणि हेसुद्धा निर्लज्जपणे. या गोष्टीचा मी असाच उल्लेख करीन. तुला शंका का वाटते? की तू लगेच पहिली गोष्ट मान्य करतोस? कुठे ब्रॅडला, ऑल्फाट, मॅडम ब्लाव्हाटस्की आणि कुठे सी. पी. रामास्वामी?

रात्री अहमदाबादमध्ये होमरूल लीगच्या निषेध सभेत सुंदर भाषण. इतरांची अगदी मूर्खपणाने भरलेली भाषणे. नडियाडहून येत असताना गाडीत म्हणाले, “मी जर राज्यपाल असतो तर लगेच या लोकांना अटक केली असती. यांची भाषणे ही अशी होती.”

रात्री अहमदाबाद स्थानकावर एक मजेदार प्रसंग घडला. ब्रोकर गाडीत आला होता. त्याला बापू म्हणाले, “साहेब, तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांचा प्रवासही तर थोडा सुखकर करा की.”

एवढ्यात वल्लभभाई म्हणाले, “तिसऱ्या वर्गात प्रवास कराल तर कळेल?” मग विनोदात म्हणू लागले, “तुम्ही दररोज चाळीस रुपयांची सिगारेट पिता, इतर खर्च करता. मग तिसऱ्या वर्गात बसून अडचण का करता? हा पैसा दुसऱ्या कामात वापरा.”

ब्रोकर - माझ्या राहणीवरून तुम्ही काही म्हणू नका. माझ्या सिगारकरिता लोकांनी मला अनेकदा एक हजार रुपये देऊ केले आहेत. माझ्या चहाकरिता आणि आईस्क्रीमकरिता अनेकदा मला हजार रुपये देऊ करण्यात आले आहेत. या जीवनात मला यांची आवश्यकता आहे. तुम्ही माझ्या या गोष्टीची फिकीर का करता? हवे असतील तर पैसे मागा. मी तुम्हाला कोणत्याही कारणाकरिता पैसे देऊ शकतो.

इतक्यात मध्येच मी म्हणालो, “रिक्रुटिंगकरिता एक हजार रुपये द्या.” लगेच त्यांनी एक हजार रुपयांची नोट काढून दिली. म्हणू लागले, “साहेब, किती तरी हजार रुपये कमावले आहेत, माझ्याकरिता एक हजारांची काय किंमत? आनंदात घेऊन जा. साहेब मी आश्रमाच्या नावाने एक व्यवसाय केला होता. आजपर्यंत ठेवला असता तर आश्रमाला दोन हजार रुपये मिळाले असते. परंतु वाट पाहिली नाही. यामुळे १०५ रुपयेच मिळाले. ते पण घ्या.” असे म्हणून त्यांनी १०५ रुपये काढून दिले. माझ्याकडे आणि त्यांच्याकडे पाहूनच जणू काय जॉर्ज इलियटला ‘अ मेरी हार्ट गोज ऑल द डे’ या ओळी आठवल्या.

२६-६-१९१८

लष्करभरतीकरिता रास येथे गेलो. दुपारी पोहोचलो. सुंदर भाषण. जवळपास दोन हजार लोक होते. लढाईसंबंधी किती तरी भव्य उद्गार - अहिंसा कोणाला शिकवावी? ज्याला हिंसा करणे माहीत नाही तो अहिंसेचे पालन काय करील? मुक्याला मौनव्रताचे रहस्य कसे कळेल? अनेक वर्षांपासून ज्याची लढायची शक्ती नाहीशी झाली आहे, ज्याकरिता आपले ऋषी तप करत होते, शस्त्रास्त्रे मिळवण्याकरिता गंभीर प्रतिज्ञा करायचे त्यांनी आपल्यामध्ये जन्म घ्यावा अशी माझी इच्छा आहे. स्त्रीपुरुषांमध्ये मर्दपणा, पौरुष यायचे असेल तर ते येण्याची हीच वेळ आहे, संधी आहे. ही संधी आपण साधली पाहिजे. इत्यादी.

सायंकाळी वासद स्थानकावर पोहोचलो. गाडी चुकली. स्थानकावरच झोपून राहावे लागले. खेडा येथे चालत गेलो. वल्लभभाईंना प्लॅटफॉर्मवर अगदीच झोप आली नाही. बापूंना गाढ झोप लागली.

२७-६-१९१८

अगदी सकाळीसच गाडीने मेहमुदाबाद येथे गेलो. तिथे गुजरात सभेचा सगळा संघच बरोबर घेतला आणि तिथून चालत आम्ही खेडा येथे चालत गेलो. पंड्या आणि जेली बंधूंना भेटलो. त्यांच्या सन्मानार्थ मिरवणूक. धर्मशाळेत बापूंचे भाषण. भाषणाच्या शेवटी काढलेले गंभीर उद्गार - हा संधी काळ आहे. संधीकाळ संपल्यानंतर रात्र येते की अरुणोदय होतो हे कोणालाही माहीत नाही. अरुणोदयाचे दर्शन तेव्हाच होईल जेव्हा तुम्ही सत्याला बिलगून राहाल. देशासमोर सत्य ठेवाल आणि सत्याकरिता वाटेल तितका त्याग करण्याची तुमची तयारी असेल.

तिथून निघून आमची यात्रा नवागामकडे गेली. खूप कडक उन्ह होते आणि रस्त्यावर दगड असल्यामुळे गाडी भयंकर खडखडाट करत चालली होती. वल्लभभाई म्हणाले, “आज तुम्हाला झोप लागू शकणार नाही.” परंतु या अशा खडखडातही बापूंना लगेच झोप लागली ! रस्त्यात तीन गावात सत्कार झाला. नवागामला सहा वाजता पोहोचलो. नगारेवाले गावाच्या शिवेवरच बसले होते. गावाप्रमाणे मिरवणूकही भव्य होती. गावातील लोकांमध्ये अपूर्व उत्साह होता. लोकांप्रमाणे भाषण सामान्य होते.

रात्री निघून बारेजडी स्थानकावर पोहोचलो. स्थानकावर बापू बाकावरच पडून होते. सकाळी आमची यात्रा नडियाडला जायला निघाली. नडियाडहून दुपारी कहलालला. कहलालमध्ये शंकरलाल परीखांनी फार प्रभावित करणारी मिरवणूक काढली. भजन करणारे लोक पखवाज घेऊन आले होते. “आजे गांधीजी पधारिया जी रे, आजरी घडी रे आनंदनी” (आज गांधीजी आलेले आहेत, आजची वेळ आनंदाची आहे) अशा घोषणा वारंवार ऐकू येत होत्या. बाकी लोक व्यवस्थेत लागलेले होते. त्या दिवशी मला वाटले की अशा भपक्याचे वर्णन तर वाल्टर स्कॉटच करू शकतो. वाल्टर स्कॉट वाचायचा संकल्प. पंड्याच्या घरी आलो. विलायतेत बहिणी मुका घेतात तशाच प्रकारे पंड्याने आपल्या ६६ वर्षाच्या बहिणीच्या गालावर लाडाने हळूच दोन चापटा मारल्या ! लाडाच्या अशा दोन चापटा खायलासुद्धा तुरुंगात जायला पाहिजे असे मला वाटले ! शंकरलाल परीखकडे विश्रांतीची व्यवस्था. अतिशय टापटिपेचे घर. घरातील सर्व वस्तू नीटनेटकेपणाने ठेवलेल्या होत्या. त्यांच्या व्यवस्थितपणा फार प्रभावी होता. सायकाळी पंड्यांनी मानपत्र दिले - एका सुंदर चौकटीत. बापूंचे भाषण - शंकरलालनी स्वतःचा उल्लेख शिष्य म्हणून जो केला होता त्यासंबंधात म्हणाले, ”अशी सूचना करतानासुद्धा भान राहिले पाहिजे. असे

असतानाही त्यांची भीती दूर करून मी म्हणेन की माझ्यात कोणाचाही गुरू होण्याची पात्रता नाही. मी कोणाचाही गुरू होऊ शकत नाही.  जो स्वतःच गुरूच्या शोधात असतो तो गुरू कसा होऊ शकतो? स्वतःला शिष्य म्हणवण्यापूर्वी एक कोटी वेळा विचार करा. शिष्याने तर गुरूच्या शब्दाचे कधीही उल्लंघन करायला नको. मला जर गुरू व्हायचे असेल तर मी निर्दोषित्वाचा दावा केला पाहिजे. मी वादळात राहणारा माणूस आहे असे समजले जाते. माझ्या सीमा तर ठरलेल्या आहेत. मी काहीही करू शकतो असे समजले जाते परंतु मी जे सांगतो ते ते कोणीही करू शकत नाही अशी सगळ्यांना भीती वाटत असते. परंतु पंड्या तर थोड्या वेळेपूर्वीच सत्याग्रह शिकू लागले आणि आता त्यात ते पारंगतही झाले". भाषणाचा लोकांवर चांगलाच परिणाम झाला.

त्या दिवशी घरी न झोपता स्थानकावरच झोपतो असे शंकरलाल आग्रहपूर्वक म्हणाले. आम्ही रात्री अकरा वाजता तिथे पोहोचलो !

२९-६-१९१८

नडियाडमध्ये बापूंना मानपत्र देण्याकरिता जाहीर सभा. दुपारी तीन वाजता तर खूप पत्रे लिहून काढली. हरिलालसंबंधी लिहिले की “मलासुद्धा हा पोरगा निर्दोष वाटत नाही. तुम्हाला जर मला खुश करायचे असेल तर याचा निवाडा न्यायालयाद्वारे होऊ द्या.” दुपारी तीन वाजता मिरवणूक निघाली. नडियाडकडून मानपत्र. सेवाधर्माबद्दल उन्नत उद्गार. वल्लभभाईंची जाहीर प्रशंसा. लढ्यात ते उपसेनापती होते. आश्रमातील भंग्यांची आणि मुलांची सेवा ही खरी सेवा आहे. त्यांनी खरी धार्मिक सेवा केली असे म्हणाले. पैशाची भूक लागलेले लोक उपाशी लोकांपेक्षाही जास्त दुष्टपणाचे वर्तन करत असतात, ते जनतेकरिता अधिक हानिकारक असतात.

रात्री लष्करभरतीसंबंधीच चर्चा. ॲन्ड्रूजना लाब पत्र.

३०-६-१९१८

स्वयंपाक केला. रासचा अहवाल लिहिला. बापूंनी पत्रे लिहिली. इंदुलालने त्यांचा इंग्रजीत अनुवाद केला. तपासून म्हणाले, “तुम्हा लोकांना अजून ही कला गवसली नाही. हे सुधारायला बसलो तर आमुलाग्रच सुधारावे लागेल. इंदुलाल सांग की भाई, हे नवीनच कौशल्य आहे, अभ्यासानेच येईल.”

१-७-१९१८

आश्रमात गेलो. आश्रमात खर्चासंबंधी चर्चा. . . . ची आई वारली. त्याकरिता त्यांच्या घरी जायचे तर लोकाचारांना वश होऊनच जायचे. त्याकरिता आश्रमाला केवळ भाड्याकरिता ८० रुपये खर्च करावे लागले असते. अशा प्रकारे सार्वजिनिक पैशाचा उपयोग करता येऊ शकत नाही. यामुळे त्याकरिता लोकांना जाऊ देऊ नये असे ठरले. ही गोष्ट दुसऱ्या दिवशी जेवता जेवता सांगितली.

२-७-१९१८

नडियाडमध्ये. ॲन्ड्रूजचे पत्र. त्यात सात वर्षांपूर्वीच्या एका पत्रातील मजकूर उद्धृत करून ॲन्ड्रूज म्हणाले की तुझी प्रवृत्ती राजकारणप्रधान झाली हे असे वाटते. आणि तू ज्या उच्च स्थानावर पोहोचला आहेस तिथून खाली घसरशील की काय अशी भीती वाटते. मी म्हणालो मलासुद्धा अशी भीती वाटते. यावर तो म्हणाला की तू तुझा आदर्श ॲन्ड्रूजला समजू नकोस. माझे राजकारण त्याच्या राजकारणासारखेच आहे असे ॲन्ड्रूजला वाटते. या सर्व कामानंतरही मी अतिशय शांत आहे. आश्रमात तर कालच मी संयमाचा पाठ शिकवून आलो.

देवधरांकडून पुणे सेवासदनचा आठ वर्षांचा अहवाल आला. त्यांना उत्तर लिहिले -

## (जी. के. देवधर यांना पत्र)

“भाईश्री देवधर,

सेवासदनच्या कामाचा अहवाल मला पाठवल्याबद्दल मी आभारी आहे. तुमच्या उद्योगाचा, तुमच्या रचनात्मक प्रकारच्या देशभक्तीचा हा कीर्तिस्तंभ आहे. हिची प्रगती खरोखरच असामान्य आहे. कदाचित संपूर्ण हिंदुस्थानात अशी दुसरी संस्था नसेल. तुम्ही जर कोणत्यातरी स्त्री शिक्षिकेला तिथे पाठवू शकत असाल तर चंपारणमध्ये अवंतिकाबाई गोखले आणि आनंदीबाईंची जागा घेण्याकरिता मला दोन शिक्षिका पाहिजे.

“आता सूचना. इंग्रजीचे सहजपणे मिळालेले ज्ञान तर बेकार आहे, वा त्याहूनही वाईट आहे. आपल्या स्त्रियांवर हे विनाकारणचे ओझे आहे. इंग्रजीचा उपयोग करण्याची ज्यांना आवश्यकता नसेल त्यांनी जर इंग्रजी भाषा वापरणे बंद केले तर निश्चितपणे समजा की इंग्रज आपल्याशी आपल्या भाषेत

बोलतील. त्यांना असे करावेच लागेल. दिल्लीच्या परिषदेत मी हिंदुस्तानीत बोलल्यामुळे लॉर्ड चेम्सफोर्ड खूप खुश झाले होते. थोड्याशा निवडक भगिनींना तुम्हाला जितके इंग्रजी शिकवायचे असेल तितके जरूर शिकवा. असे केले तर इंग्रजीतील सुंदर विचारांचे त्या इतर भगिनींकरिता भाषांतर करू शकतील. यालाच मी भाषिक प्रदेशातील काटकसर म्हणतो. मी तर इंग्रजीच्या ठिकाणी निश्चितच हिंदी ठेवीन. यामुळे महाराष्ट्रीय भगिनींचे विचार उदार होतील आणि राष्ट्रीय कार्यकर्त्या म्हणून त्यांची उपयोगिताही वाढेल. आज तर त्यांच्या इतर भगिनींप्रमाणे त्या केवळ आपल्या प्रदेशाचाच विचार करू शकतात.

"हार्मोनियम कॉन्सर्टीकरिता (स्वरपेटी वा तंबूरपेटी) एक पाऊलच पुढे आहे. मी तर भगिनींना वीणा आणि सतार देणेच पसंत करीन. ही वाद्ये स्वस्त आणि राष्ट्रीय आहेत. आणि हार्मोनियम फार उच्च पातळीवरील आहे.

"भरतकाम आणि इतर फॅन्सी कामापेक्षा तर मी भगिनींच्या हाती चरखा वा टकळी वा हातमाग देणेच पसंत करीन. आजकाल मी दोन कार्यकर्त्यांच्या मदतीने शंभर चरखे चालवतो आहे. त्यांच्या या कामामुळे जवळपास तीनशे भगिनींना काम मिळाले आहे. हिंदुस्थान आपले राष्ट्रीय स्वास्थ्य आणि शांतता मिळवील तेव्हा निश्चितच या गिरण्या कालबाह्य होतील. प्राचीन काळातील आपल्या राण्याप्रमाणे मग आपल्या भगिनीही खूप तलम सूत काततील. हे दिवस परत आणण्याकरिता तुम्ही मला मदत करावी अशी माझी इच्छा आहे. विश्वास ठेवा की थोड्याच काळात आमच्याकडे भरतकाम वगैरेसारख्या गोष्ट लोपल्या सारख्या होतील.

"सामान्य पद्धती काळाबरोबर चालण्याची असते. परंतु आपण तर आपल्या समोरील गोष्टी पारखल्या पाहिजे आणि त्यातून निवड करत राहिलो पाहिजे. आपण नेहमीच प्रवाहपतिताप्रमाणे वाहत जायला नको. आपण भविष्याचे स्वागत केले पाहिजे. माणूस जर विचार करणारा असेल तर धावपळ करत असतानाही भविष्य हस्तकलांचे आहे हे त्याला दिसू शकेल. कोणत्याही प्रकारे तुम्ही जर भगिनींना कताईविणाईचे प्रशिक्षण द्याल तर त्या काहीही गमावणार नाहीत. नागड्या लोकांचे शरीर झाकण्याकरिता त्या मदतरूप होतील.

"तुम्ही मागितले त्यापेक्षा मी भरपूर दिले आहे. अमृतलाल आणि केसरीप्रसाद दिल्याबद्दल मी तुमचा फार आभारी आहे. श्रीमती देवधरना सांगाल की त्या थोडे दिवस आश्रमात राहतील असे मी अपेक्षितो."

सेवक,

मो. क. गांधी

दुसरे पत्र डॉ. प्राणजीवन महेतांना लिहिले -

## (डॉ. प्राणजीवन महेता यांना पत्र)

"भाईश्री प्राणजीवन,

"किती तरी दिवस झाले तुम्हाला पत्र लिहू शकलो नाही. मला इथे जो पैसा मिळतो आहे त्यावर मी काम भागवत असतो. याचना करायला निघत नाही. सध्या मला पैशाची फार आवश्यकता आहे. बांधकाम सुरू आहे. त्याकरिता चाळीस हजार रुपये खर्च करून बसलो आहे. अजून निश्चितच साठ हजार रुपये खर्च होतील. कमीतकमी दोनशे माणसे काम करू शकतील अशी व्यवस्था करायची आहे आणि कमीतकमी वीस हातमाग लावायचे आहेत. कापडाचे काम फार वाढत चालले आहे. अमदाबादच्या संपानंतर अनेक विणकरांच्या संपर्कात आलो आहे. जवळपास तीनशे स्त्रिया चरखा चालवू लागलेल्या आहेत. थोड्या दिवसात हातकताईचे रोज दोन मण सूत मिळू शकेल अशी आशा आहे. या स्त्रिया बेरोजगार होत्या. त्यांना रोजगार मिळू लागला. बाहेरचे तीस विणकरसुद्धा काम करू लागले आहेत. यात काही देढ आहेत. ते मजुरी करत होते, आता स्वतंत्र व्यवसाय करू लागले आहेत. ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे. याकरितासुद्धा अजून पैसे लागतील असे दिसते. राष्ट्रीय शाळांचे कामसुद्धा असेच अगत्याचे आहे. आजच या शाळांमधील मुले इतर शाळांमधील त्यांच्याच वर्गातील मुलांपेक्षा वरचढ असल्याचे जाणवू लागले आहे. त्यांच्यात निर्भयता वगैरे जे गुण आहेत ते तर स्पष्ट दिसतात. या शाळेकरिता दरमहा एक हजार रुपये खर्च येईल असे मी समजतो. दोन्ही कामांमागे मी स्वतः लागलो तर हे काम किती तरी वाढवू शकतो. परंतु मी असे करू शकत नाही. तरीही दोन्ही काम चांगल्या प्रकारे सुरू आहेत असे वाटते. तुमच्याकडून आता मी मोठ्या रकमेची मागणी करतो आहे आणि दुसऱ्याकडून मिळालेल्या पैशात काम भागू शकत नसेल तर ती उणीव भरून काढण्याकरिता

तुम्ही काही स्थायी व्यवस्था करावी अशी माझी इच्छा आहे. इतके देता येऊ शकत असेल तर द्या. त्यामुळे मी निश्चिंत होईन. माझे काम पसंत नसेल तर मी तुम्हाला पैसं मागू शकतच नाही. परंतु तुम्हाला हे काम बरोबर वाटत असेल तर पैसे देण्यात संकोच करू नका.

“माझे लष्करभरतीचे काम तुम्ही पाहत असाल. माझ्या सर्व कामात हे काम कठीण आणि महत्त्वाचे आहे असे वाटते. यात जर यश मिळाले तर स्वराज्य मिळाल्यासारखेच आहे.

मोहनदासचे वंदेमातरम”

आज पूर्ण विश्रांती असल्यामुळे बरीच पत्रे लिहून काढली. आणि रमणभाईंचे ‘राईनो पर्वत’ आणि ‘हास्यमंदिर’ वाचायला मागवले.

देवदासला पत्र -

## (देवदास गांधींना पत्र)

“तुझे पत्र अगदी नियमितपणे येत असते हे मला फार आवडते. मला नियमांचे पालन करणे आवडते, परंतु तू माझ्या पत्राची नेहमी वाट पाहू नकोस. आज तुझे पत्र नाही. श्री नटेसनविषयी जे लिहिले ते लक्षवेधी आहे. तुला जसे योग्य वाटेल तसे कर. सध्या ज्या कामात तू गुंतलेला आहेस ते काम किती महत्त्वाचे आहे याची कल्पना कदाचित तुला आता येणार नाही. असे काम हुशार आणि बुजूर्ग लोकांनीच करावे अशी सामान्यपणे पद्धत आहे. असे असले तरी मद्राससारख्या ठिकाणी इतके लोक शिकायला येतील की नाही हा प्रश्नच आहे. मद्रास प्रांतात तू हिंदीचे दान करू शकलास आणि लोक ते घेऊ शकले तर एक महत्त्वाच्या प्रश्नाचा निपटारा झाला असे म्हणता येईल. मद्रासशी हिंदुस्थानातील इतर भागांचा तू संगम घडवून आणला असे म्हणता येईल. गंगेवर पूल बांधायला ज्या कौशल्याची आणि धैर्याची आवश्यकता आहे त्यापेक्षाही या कामाकरिता जास्त गुणांची आवश्यकता आहे. तू हिंदीला सरळसाधी आणि चित्तवेधक कर. यातच तुझ्या चातुर्याचा उपयोग होईल. असे करण्याकरिता तू हिंदी, गुजराती, इंग्रजी, तमिळ व्याकरण वाचायला पाहिजे. असे केल्याने तुला असा कोणता तरी मार्ग सापडेल की ज्यामुळे तू लोकांना थोडे शिकवूनही जास्त देऊ शकशील. धातूनी तयार झालेले खूप शब्द शिकवायला पाहिजे. यामुळे स्मरणशक्तीवर फार कमी ओझे येते. तेथील हिंदी लोकांना तमिळ शिकवण्याची व्यवस्था करण्याचा विचार केला पाहिजे हे मी तुला सांगितलेच होते. याबद्दल तू नटेसन, हनुमंतराव इत्यादींशी बोल.

रेवाशंकर सोढा आणि छोटम परत आश्रमात आले आहेत. यामुळे जरी माझी जबाबदारी वाढली आहे तरी ही गोष्ट मला फार आवडली आहे. हरिलाल राजकोटकरिता निघून आज रात्री इथून गाडीने जाईल. . . . ची आई वारल्याची बातमी कळली आहे. तू त्यांना पत्र लिहिशील. याशिवाय काल मी आश्रमात एक फार पवित्र चर्चा सुरू केली आहे. पवित्र मी याकरिता म्हणतो आहे की सर्वांनी विवेकपूर्ण आणि धार्मिक वृत्तीने चांगली उत्तरे दिली आहेत. प्रश्न असा होता - आता त्यांना भेटायला जायला पाहिजे काय? याकरिता ८० रुपये खर्च येईल. हा खर्च आश्रम करू शकतो काय? करायला पाहिजे काय?

ज्याने देशाकरिता संन्यास घेतला आहे, सेवाधर्म स्वीकारला आहे त्याची आई मरत नसते, कारण त्याच्या आईच्या वयाच्या जितक्या स्त्रिया असतात त्या सगळ्या त्याच्या आईच असतात. त्याचे वडीलही वारत नसतात कारण सर्व म्हातारेकोतारे त्याचे वडीलच असतात. त्याची पत्नी सेवा असते. मग ते मरतीलच कसे? बाकी सर्व त्याचे भाऊबहीण असतात. आई वारल्यानंतर भेटायला जाणे ही केवळ रुढी आहे. तिचे पालन करण्याकरिता, जगासमोर नमण्याकरिता किती तरी पैसा विनाकारण खर्च होत नसतो काय? अशा प्रकारे हा प्रश्न चर्चिला गेला. सर्वांनी शांतपणे उत्तर दिले आणि हा खर्च करायचा नाही असे ठरले. संतोक आणि बासुद्धा हजर होत्या. असे असतानाही या वेळी हा नियम लागू करायचा नाही असे ठरले. हे . . .च्या आणि . . . च्या बहिणीवर सोपवू. बहुतेक ते जातील.

"तू तिथे काही वर्तमानपत्रे वाचत असतोस काय? इथून काही पाठवू काय?

बापूचे आशीर्वाद"

रात्री हरिलालला भेटायला गेले. स्थानकावर सायंकाळीसुद्धा गेले होते. पण भेट झाली नाही. रात्री मेलवरसुद्धा "मी जायलाच पाहिजे" असे म्हणून गेले. हरिलाल दुसऱ्या वर्गात झोपलेला होता. त्याला तर नडियाड स्थानकावर आपल्याला कोणी तरी भेटायला येईल याचीसुद्धा फिकीर नव्हती. दोनचार गोष्टी झाल्या न झाल्यासारख्या होत्या ! बापूंनासुद्धा खूप धक्का लागला. "पोराचा चेहरा एकदम बदलून गेला आहे" असे घरी आल्यानंतर एक निश्वास टाकत म्हणाले. दुसऱ्याच दिवशी देवदासला लिहिले की त्याच्यातील गोडवा निघून गेला आहे. यामुळे तू दुःखी होऊ नकोस. परंतु इतके पाहशील की माणूस घसरू लागला की किती घसरतो. त्याच्याबद्दल बापूंना जो अभिमान होता, तो स्वातंत्र्याचे काम करील असे जे त्यांना वाटत होते तेही संपले.

'राईनो पर्वत' वाचून टाकले. पहिल्यांदा वाचणाराला जितका आनंद होतो तितका बापूंना झाला.

३-७-१९१८

आजसुद्धा विश्रांती. पत्रे लिहिली. स्वयंपाक्याला पस्तीस रुपये पगार. लोकांना खर्चाची मारामार. हे तर भयंकर म्हणायचे. आज स्वयंपाक्याला आणि नोकराला कामावरून काढून टाकले. हाताने स्वयंपाक करायचा नियम झाला. 'हास्यमंदिर' वाचायला सुरुवात केली. खूप खुश होते. लष्करभरतीचे काम सुरू केल्यानंतर अहिंसेचा उपदेश कसा काय करू शकता असे विचारणारी खूप पत्रे येत होती. अशाच प्रकारच्या चर्चेचे ॲन्ड्र्युजशी मोठेच पुराण उभे झाले. यामुळे या विषयाशी निगडित इतर पत्रेही छापण्यासारखी आहेत. कुमारी फेरिंगनेसुद्धा याबाबतीत एकदा लिहिले होते.

## (इस्थर फेरिंग यांचे पत्र)

"व्हाईसरायला तुम्ही लिहिलेले पत्र मी वाचले. सत्याग्रही म्हणून तुमच्या विचारांशी आणि भावनांशी ते कितपत सुसंगत आहे हे मला कळू शकत नाही. वा दुसऱ्या प्रकारे सांगायचे तर ज्या लोकांची अहिंसेवर दृढ श्रद्धा आहे आणि सत्याग्रहाच्या प्रयोगाकरिता ज्यांनी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले आहे ते इतरांना युद्धात सामील होण्याकरिता आणि लढण्याकरिता कसे सांगू शकतात?"

याचे उत्तर -

## (इस्थर फेरिंग यांना पत्र)

"जो माणूस मरू इच्छितो परंतु त्याला अपंग केलेले असल्यामुळे तसे करू शकत नाही त्याला मी कोणता सल्ला देऊ शकतो? न मारण्याचा म्हणजे अहिंसेचा सद्गुण त्याला कळण्याआधी तो जे गमावून बसला आहे ते मी त्याला परत मिळवून दिले पाहिजे. तरुण हिंदुस्थानींना लष्करात सामील होण्याचा सल्ला मी नेहमीच देत आलो आहे. परंतु आतापर्यंत याचा सक्रिय प्रचार करण्यापासून मी मला थांबवले होते. याचे इतकेच कारण होते की देशाला केवळ राजकीय जीवनात गुंतवून ठेवण्याची आणि मला स्वतःला युद्धात रस घेण्याची आतून प्रेरणा मिळत नव्हती. परंतु दिल्लीत माझ्यासमोर कठीण समस्या निर्माण झाली. मला एकदम जाणीव झाली की लष्करात सामील होण्याच्या प्रश्नाचा जोपर्यंत

मी गंभीरपणे विचार करणार नाही तोपर्यंत मी जीवनातील मोठ्यातमोठ्या प्रश्नाला पुरेसे महत्त्व देऊ शकणार नाही. आपण एक तर राज्यापासून मिळणाऱ्या सर्व लाभांचा त्याग केला पाहिजे अथवा युद्धसंचालनाच्या कामात आपण यथाशक्ती पुरेपूर मदत केली पाहिजे. आपण लाभांचा त्याग करायला तयार नाही. हिंदुस्थानींनी तर दुप्पट कर्तव्याचे पालन केले पाहिजे. त्यांना जरी शांततेचा प्रसार करायचा असेल तरी त्याआधी त्यांनी युद्ध करण्याची क्षमता सिद्ध केली पाहिजे. मला हा शोध लागला. हे भयंकर आहे, परंतु खरे आहे. ज्या जनतेत लढण्याची पात्रता नसेल ती लढाईचे जे गुण आहेत ते ती आपल्या अनुभवानी सिद्ध करू शकत नाही. परंतु यावरून हिंदुस्थानने लढायलाच पाहिजे असा निष्कर्ष मी काढू शकत नाही. परंतु मी इतके मात्र निश्चितच म्हणेन की हिंदुस्थानने लढायची कला आत्मसात केलीच पाहिजे. यामुळे अहिंसा एखाद्याला मारण्याची किंवा इजा पोहोचवण्याची इच्छाच नाहीशी करून टाकते. अहिंसा अशाच माणसासंबंधात आचरता येऊ शकते की जे आपल्यापेक्षा सर्वार्थांनी हीन प्रतीचे असतात. याचा अर्थ असा की ज्या व्यक्तीला परिपूर्ण अहिंसक व्हायचे आहे तिने अहिंसेत अखेरचे परिपूर्णत्व प्राप्त केलेले असले पाहिजे. असा याचा अर्थ कसा काय होऊ शकतो की आपण पूर्णपणे प्रेमधर्मी व्हायच्या आधी आपण सँडो व्हायला पाहिज? हे अनावश्यक आहे. आपण जगासमोर अढळपणे उभे राहू शकलो तर तितके पुरेसे आहे. आपल्यामध्ये अशा प्रकारची हिंमत असणे अत्यावश्यक आहे. काही लोकांमध्ये तर लढायचे प्रशिक्षण दिल्यानंतरच अशा प्रकारची हिंमत येऊ शकते. मला माहीत आहे की मी माझा हा युक्तिवाद अतिशय विचित्र पद्धतीने मांडला आहे. मी नवीन अनुभवातून जातो आहे. माझ्या मनातील विचार व्यक्त करण्याकरिता मी डोकेफोड करतो आहे. काही गोष्टी अजूनही मला स्पष्टपणे दिसत नाहीत. ज्या गोष्टी माझ्या मनात स्पष्टपणे जाणवतात त्या इतरांना सांगण्याकरिता मी योग्य शब्दांचा शोध घेतो आहे. प्रकाशाकरिता आणि मार्गदर्शनाकरिता मी प्रार्थना करतो आहे. तसेच मी खूप विचारपूर्वक काम करतो आहे. तू मला अवश्य लिहिशील आणि माझा जो युक्तिवाद तुला पटत नाही असे वाटत असेल त्याबद्दल तू माझ्याशी एकेका शब्दासाठी आणि वाक्यासाठी भांडशील. असे केल्याने माझा मार्ग शोधण्याचे माझ्यात सामर्थ्य येईल.

- बापू

याच दिवसात मगनलालभाईंना आश्रमाची व्यवस्था नीट करण्याकरिता लिहीत असताना पुढील उद्गार काढले -

“पुस्तके आलीच पाहिजे. इतर सामानही मागवून घेण्याची आवश्यकता वाटते. . . . च्या सौजन्याचा आपण दुरुपयोग केला आहे असे वाटते. ते जोर देऊन म्हणत नाहीत म्हणून आपण अडून राहिलो आहो. चोवीस तासांची धमकी दिल्यानंतर आपण जे करणार आहो ते आताच करावे अशी माझी इच्छा आहे.”

रात्री ‘राईना पर्वत’बद्दल म्हणाले, “विणावतीचे पात्र आणून रमणीभाईंनी नाटकाची किंमत कमी केली आहे. शेवटच्या भागात विधवांच्या पुनर्विवाहाची चौपानिया लिहीत असावे असे वाटते. नाटक चांगले आहे यात काही शंका नाही, परंतु ही उणीव तर आहेच.” त्यांना खूप चढवले, पण पुढे जाऊन पाडले.

४-७-१९१८

आजही सकाळपासून विश्रांतीच होती. ठक्कर आले. स्वामी आले. स्वामींबरोबर दिवसभर अहिंसा आणि हिंसेसंबंधी डोकेफोड. आज प्रभुदासचे अतिशय चातुर्य, सुज्ञपणा आणि सखोल निरीक्षणाने भरलेले पत्र आले. अबूला गेल्यानंतर सर्व शिक्षकांचा त्यांच्यावर पडलेल्या प्रभावाचे त्यांनी वर्णन केले होते. अतिशय वास्तव चित्रण केले होते. त्यांना पत्र लिहिले -

## (प्रभुदास गांधींना पत्र)

“चि. प्रभुदास,

“तुझे पत्र मी मन लावून लक्षपूर्वक वाचले. तू हे लिहिण्यात अतिशय सुज्ञपणाचा वापर केला आहे. विनयभंग कुठेही नाही. भाषा विनयपूर्ण असूनही स्वतंत्रतेच्या भावनेने विभुषित आहे. यामुळे मला ती गोड वाटली. तुझे पत्र तुझी निर्भयता दाखवते. . . . (इथे चुकून काही शब्द सुटलेले आहेत.)

“मला काहीही माहित नव्हते. परंतु तू जे लिहिलेस त्याचा आभास मात्र होत होता. तू फार चांगले केले. काही तरी उपाययोजना करण्याइतके मला ज्ञान नव्हते. तू दिलेल्या माहितीच्या आधारे मी काही इलाज करू शकेन. . . . (इथे चुकून काही शब्द सुटलेले आहेत.)

“माझी फसवणूक झाल्याने ज्याप्रमाणे तुझ्या चारित्र्याचे वा अभ्यासाचे नुकसान झाले नाही त्याचप्रमाणे आताही आपले कोणतेही नुकसान होणार नाही. आपण आपल्या उच्च आदर्शावर कायम राहिलो तर कोणतीही अडचण येणार नाही. जो माणूस आपले घर स्वच्छ ठेवतो त्याच्या घरात प्लेग वगैरे शिरूच शकत नाहीत. आणि यदाकदाचित प्रवेश केलाच तरी तो कायम मुक्काम करू शकत नाही. याचप्रमाणे आपण जर चांगले राहिलो तर आपल्या घरात दुष्टपणारुपी प्लेग शिरूच शकत नाही आणि शिरला तरी फार काळ टिकू शकणार नाही. तू पाहिले असशील की माझ्या संपर्कात आलेल्या लोकांचे दोष लवकर म्हण वा उशिरा समोर आलेच आहेत.

“तुझी परवानगी असली तर मी तुझे पत्र संबंधित लोकांना वाचायला देऊ इच्छितो. ते तुझ्यावर रागावणारही नाहीत आणि मनात ते तुझा राग धरून ठेवणारही नाहीत. तू काय आणि इतरांनी काय आपले विचार आपल्या मनात दाबून ठेवू नये ही आश्रमाची मागणी आहे. शक्य झाले तर मी आश्रमात दोन रात्री थांबेन आणि सकाळी इथे परत येईन. असे केल्याने आपल्याला रात्रीचा वेळ मिळेल.

बापूचे आशीर्वाद”

श्रीमती बेझंटना पत्र लिहिले.

## (श्रीमती ॲनी बेझंट यांना पत्र)

“बिनशर्त लष्करभरतीच्या बाजूने तुमचा निःसंदिग्ध पाठिंबा वाचायला मिळेल अशा अपेक्षेने मी ‘न्यू इंडिया’च्या पानांचा शोध घेत असतो. इतके तर तुम्हाला स्पष्टपणे जाणवले असेल की प्रत्येक ‘होमरूल लीगी’ सक्रीय लष्करभरतीवाला झाला तर ज्या परिवर्तनांवर आपण सहमत होऊ केवळ त्याच परिवर्तनाच्या आधारावर आपण कॉंग्रेस-लीग योजना निश्चितच मंजूर करायला लावू शकतो. मला वाटते की ही अशी वेळ आहे की जेव्हा आपण जनतेला स्पष्ट मार्गदर्शन करू शकतो. त्याच्या मताची वाट पाहण्याची आवश्यकता नाही. तुमचा तो उत्साह पाहण्याकरिता मी उत्सुक आहे जो विरोधासमोर अजूनच जोमदार व्हायचा. आपण रंगरुटांची पूर्ण भरती करू शकलो तर आपण आपल्या अटी कबूल करायला लावू शकू. परंतु सरकारच्या अटींची जर आपण वाट पाहत बसलो तर त्या काळात युद्ध संपेल आणि हिंदुस्थानला खरोखरीचे लष्करी प्रशिक्षण मिळायचे राहून जाईल. आणि आपल्यावर लष्करी हुकूमशाही लादली जाईल. परिस्थितीचा असा विचार करणे अतिशय स्वार्थीपणाचे होईल. परंतु आपला स्वार्थच सांगतो की देशाला मी जो मार्ग सुचवला आहे तोच यावरील प्रभावी उपाय आहे.

“मला माहीत आहे की माझ्या या पत्रात तुम्हाला उद्धटपणा आढळणार नाही.

सेवक,

मो. क. गांधी”

# (मो. अ. जीना यांना पत्र)

"भाईश्री जीना,

"लष्करभरतीसंबंधात तुम्ही स्पष्ट निवेदन करावे अशी माझी खूप इच्छा आहे. तुम्ही इतके पाहू शकत नाही काय की प्रत्येक होमरूललीगी सैनिक भरती करणारा शक्तिशाली प्रतिनिधी झाला आणि त्याचबरोबर घटनात्मक हक्कांकरिता भांडत राहिला तर काँग्रेस-लीग योजनेवर ज्या प्रमाणात आपण सहमत होऊ तितक्या बदलांसह निश्चितपणे आपण मंजूर करवून घेऊ शकू? लष्करभरती जर करू शकलो तर आता आपण जे बोलतो आहो ते अधिक प्रभावी पद्धतीने बोलू शकू. 'आधी तुम्ही लष्करभरती कार्यालय उघडा, मग तुम्हाला सर्व काही मिळू शकेल.' आपण लोकांना स्पष्ट मार्गदर्शन केले पाहिजे. लोक आपले ऐकतील की नाही याचा आपण विचार करायला नको. मी तुमच्याकडून जोरदार निवेदन अपेक्षितो, जरतारी निवेदन नाही.

"मला माहीत आहे की तुम्ही या पत्राबद्दल वाईट वाटून घेणार नाही."

आजकाल जे लोक भेटायला येत असतात त्यांच्याबरोबर लष्करभरतीचीच चर्चा सुरू असते. या चर्चेतील मुख्य मुद्दे असे -

स्वराज्याचा अर्थ - इंग्लंडबरोबर राहून पूर्ण स्वातंत्र्य. या लढाईत जर आपण इंग्लंडला मदत केली तर इंग्लंड आपल्यावर जरी राज्य करत असले तरी या मदतीमुळे आपला हात इंग्लंडच्या डोक्यावर राहील. आपण लष्करी प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. अहिंसाधर्माचे पालन करणारा हिंदुस्थानात दुसरा कोणीही झाला नसेल. मी तर प्रेमाने भरलेलो आहे. इंग्रजांचे पाप पाहू शकणारा माझ्यासारखा दुसरा कोणीही जन्मला नसेल तसेच त्यांचे पूण्यकर्म पाहू शकणाराही माझ्यासारखा दुसरा कोणी जन्मला नसेल. ज्याला शस्त्रक्रिया शिकायची आहे, ज्याला मरायचे कसे हे शिकायचे आहे त्याला मी हिंसा करणेसुद्धा शिकवीन. या वेळी जर मी काहीही करू शकलो नाही तर असे समजा की माझी तपश्चर्या तोकडी आहे. मारल्याशिवाय ज्याला मरता येत नाही त्याला मी मारून मरणे शिकवीन.

रंगा ऐय्यर या नावाच्या वकिलाचे एक पत्र आले. दिल्लीत भेटल्यानंतर खेडा येथील सत्याग्रहाच्या सहानुभूती प्रित्यर्थ मी चाळीस सभा घेईन असे ते म्हणाले होते. परंतु तसे न करू शकल्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला आणि खेडाच्या विजयाकरिता त्यांनी आभार मानले.

त्यांना उत्तर -

## (रंगा ऐय्यर यांना पत्र)

“भाई श्री रंगा ऐय्यर,

तुमच्या अभिनंदनाकरिता आभारी आहे. गावांमध्ये तुम्ही फारशा सभा घेऊ शकला नाही याचा मी चुकीचा अर्थ घेणार नाही. ही गोष्ट किती कठीण आहे ते मला माहीत आहे. असे असले तरी गावांमध्ये प्रवेश केल्याशिवाय आपली होमरूलची योजना काहीही कामाची नाही. आपण जर सर्वसामान्य जनतेचे समर्थन मिळवू शकलो तर आपण आपल्या ध्येयाकडे कोणत्याही  अडथळ्याशिवाय जाऊ शकतो. इतकी साधी गोष्ट आपल्याला कळत नाही ही गोष्ट आपल्या नजरेसमोर होत असलेल्या करुण नाटकापेक्षाही करूण घटना आहे. तुम्हाला जर या चक्रातून वाचायचे असेल तर तर तुमचे वर्तमानपत्र बंद पडण्याचा धोका पत्करूनही तुम्ही हिंदी शिकून घ्यायला पाहिजे आणि ग्रामवासीयांमध्ये राहून काम करत राहायला पाहिजे. मला माहीत आहे की तुम्ही तुमच्या वर्तमानपत्राकरिता खूप कष्ट सहन करत आहा. परंतु हे श्रम जवळपास वाया गेले आहेत असेच मी समजतो. आपण पश्चिमेकडून जे काही शिकलो आहो त्याचे चांगले फळ आपण करोडो गावकऱ्यांना दिले पाहिजे. परंतु आपण तर आपल्या लोकांमध्येच विचारविनिमय करत असतो. घाण्याच्या बैलाच्या डोळ्यांना पट्टी बांधून तो जसा गोलगोल फिरत असतो आणि आपली प्रगती होते आहे, आपण पुढे चाललो आहो असे समजतो अगदी तसेच हे.

सेवक,

मो. क. गांधी

५-७-१९१८

आजसुद्धा विश्रांती. मोर्ले (दुसरा खंड) वाचला. रावजीभाईंच्या वडिलांचे आज आग पाखडणारे पत्र आले. त्यांना केवळ इतकेच लिहिले -

## (मणिभाई पटेल यांना पत्र)

“भाईश्री मणिभाई, (रावजीभाई पटेल यांचे वडील)

“तुमचे पत्र मिळाले. तुमची भावना समजू शकतो. परंतु मी मदत करू शकत नाही. काळ त्याचे काम करून राहिलेला आहे. तो तुम्हाला शांतता देईल.”

देवदासला लिहिले -

## (देवदास गांधी यांना पत्र)

“मला काळजी वाटते आहे. आपला नियम तर तुला माहीत आहे. आजारी पडायलाच नको. आजारी न पडण्याकरिता केवळ संयमाची आवश्यकता आहे. पूर्ण कसरत होईल इतकाच आहार घेतला पाहिजे. या दोन गोष्टी कळल्या तर प्रकृती बिघडायलाच नको.”

देवदासची शुश्रूषा करणाऱ्या नटेसनला लिहिले -

## (जी. ए. नटेसन यांना पत्र)

“देवदासला तुमच्या हातून परिचारकाचे प्रेम आणि शुश्रूषा मिळते आहे. तुमच्या अनेक ओझ्यात या अजून एका ओझ्याची भर पडली आहे याकरिता मी दिलगिर आहे. मला आशा वाटत होती की देवदास आजारी पडण्याइतका असभ्य वर्तन करणार नाही. देवदासचा उपचार करणाऱ्या डॉ. कृष्णस्वामींचे माझ्याकडून आभार माना. तुमच्याकरिता तरी याने लवकर दुरुस्त व्हावे अशी इच्छा आहे. तुमच्या आईचा जो आक्षेप आहे तो मी समजू शकतो. परंतु तुम्ही जर दृढ राहाल तर देवदाससंबंधी

त्यांचा जो आक्षेप आहे तो राहणार नाही आणि भविष्याकरिता ही गोष्ट एक उदाहरण होईल. नायकरच्या वेळी त्या किती सौजन्यपूर्वक वागल्या होत्या ते तुम्हाला माहीत आहे. तुमच्याशी त्या सहमत होऊ शकल्यामुळे तुमची शक्ती दुप्पट झाली आहे. आपणा सुधारकांमध्ये आपल्या घरापासून सुधारणा न करण्याची पद्धतच पडली आहे.आपण स्वतःच सुधारणेला सुरुवात न केल्यामुळे आपल्याला या अडचणी येत आहेत. परंतु आभार मानण्याकरिता सुरु केलेले पत्र शेवटी उपदेशात्मक झाले आहे. या अपराधाकरिता मला क्षमा करा. मला माहीत आहे की देवदाससंबंधी जर काही गंभीर परिस्थिती निर्माण झाली तर तुम्ही मला तार कराल."

सेवक,

मो. क. गांधी

शास्त्रीयारांनी लिहिले होते -

“क्रॉनिकल’वरून दिसते आहे की तुमच्या प्रयत्नांना यश मिळते आहे.”

त्याचे उत्तर लिहिले -

## (श्री व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री)

“‘क्रॉनिकलम’मध्ये तुम्ही कोणता अहवाल वाचला हे मला माहीत नाही. रंगरुटांची भरती करणारा एक अंमलदार माझ्याच नावाचा आहे. तुम्ही जो उत्साहाने भरलेला अहवाल वाचला तो याचा असेल. माझे थोडेसे सहकारी सोडले तर मला आतापर्यंत एकही रंगरूट मिळालेला नाही. माझे सहकारी सैनिक म्हणून काम करण्याकरिता वा आपल्याऐवजी दुसरा रंगरूट देण्याकरिता वचनबद्ध आहेत. काम अतिशय कठीण आहे. माझ्या जीवनात इतके कठीण काम हाती घेण्याची वेळ कधीही आली नाही. असे असल्यामुळे कोणत्याही परिणामाबद्दल आधीच भाकीत करणे फार लवकर होईल.

सेवक,

मो. क. गांधी”

६-७-१९१८

तुम्ही अहिंसाधर्मी असूनही हिंसेचा उपदेश कसा करू शकता असा प्रश्न ॲन्ड्र्यूजने विचारला. त्याच्या उत्तरार्थ बापूंनी एक पत्र लिहिले -

## (चार्ल्स फ्रिअर ॲन्ड्र्यूज यांना पत्र)

लष्करभरती मी जेव्हा माझे नाव मॅफींना दिले होते तेव्हाच मी त्यांना पत्र लिहून कळवले होते की मी शत्रूला म्हणा की मित्राला, कोणालाही मारणार नाही. परंतु ज्या लोकांचा लढण्यावर आक्षेप नाही, परंतु जे घाबरटपणामुळे म्हणा की इंग्रजांबद्दलच्या द्वेषामुळे म्हणा लढण्याकरिता तयार नाहीत त्यांच्याबद्दल माझे कोणते कर्तव्य आहे? मी त्यांना असे म्हणू शकत नाही काय की ‘माझा मार्ग तुम्ही स्वीकाराल तर फार चांगले होईल, परंतु माझा मार्ग जरी तुम्ही स्वीकारत नसाल तरी तुम्ही तुमचा भित्रेपणा वा द्वेष जो काही असेल तो सोडून दिला पाहिजे आणि लढायला जायला पाहिजे?’ ज्या माणसात मारण्याची शक्ति नसते त्याला तुम्ही अहिंसा शिकवू शकत नाही. मुक्या माणसाला मौनाचे रहस्य आणि त्याचे लाभ समजावून शकत नाही. मला माहीत आहे की मौन ही उत्तम गोष्ट आहे. असे असतानाही मुक्या माणसाला वाचा मिळावी म्हणून जी उपाययोजना केली पाहिजे. ती करायला मी मागेपुढे पाहायला नको. मी शासनव्यवस्थाच मान्य करत नाही. परंतु हुकूमशाही राज्यापेक्षा कदाचित सांसदीय व्यवस्था चांगली असू शकेल. हिंसक (लष्करी) माणसाला त्याच्या हिंसेने कमीतकमी हिंसा कशी होईल हे शिकवले पाहिजे. अशा शिकवण्याच्या प्रक्रियेतच कदाचित अहिंसेचे सद्गुण शिकवण्यात मला यश येईल. अशा प्रकारेच मी अहिंसेच्या वा सत्याग्रहाच्या सिद्धांताचा मी अधिक चांगल्या प्रकारे प्रचार करू शकेन हे तर तू कबूल करशील असे मी समजतो. मी माझी परिस्थिती पुरेसी स्पष्ट केली नाही असे जर तुला वाटत असेल तर तू मला इथे भेटायला ये.”

यानंतर याच विषयावर दुसरे एक पत्रही लिहिले. त्याची प्रत ठेवू शकलो नाही. यासंबंधात बापूंनी ॲन्ड्र्यूजला जे शेवटचे पत्र लिहिले त्यातून बापूंचे संपूर्ण विचार आपल्याला कळतात -

## (चार्ल्स फ्रिअर ॲन्ड्र्यूज यांना पत्र)

"प्रिय चार्ली,

"तुझी सर्व पत्रे मिळाली. त्यांच्यामुळे मी जरी क्वचितच आश्वस्त होत असलो तरी ती फार मूल्यवान आहेत असे मी समजतो. तू दाखवल्या त्यापेक्षा माझ्या अडचणी फार जास्त आणि गंभीर आहेत. तू ज्या अडचणी दाखवतोस त्यांचे उत्तर तर मी देऊ शकतो. या पत्रात मी माझ्या अडचणी शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न करतो आहे. इतर सगळ्या गोष्टी बाजूला पडल्या असून माझ्या डोके केवळ या अडचणींनीच भरलेले आहे. दुसरे काम करताना जरी मी दिसत असलो तरी मी ते सर्व यांत्रिकपणे करत असतो. खूप विचारांचा माझ्या शरीरावरही परिणाम झाला आहे. मला कोणाशी बोलण्याची इच्छासुद्धा होत नाही. काही लिहिण्याचीसुद्धा मला इच्छा होत नाही. इतकेच नाही तर हे विचारही माझ्या मनातील नाहीत. अशा परिस्थितीत मी हे पत्र लिहायला घेतले आहे. मला माझे हे विचार स्पष्टपणे व्यक्त करता येतात की नाही हे मी पाहतो आहे. खरी गोष्ट तर ही आहे की मलाच माझ्या अडचणींचा अंदाज येऊन राहिला नाही. मग त्या दूर करण्याची गोष्ट तर वेगळीच. त्या सोडवल्याने माझ्या तात्कारिक कामावर कोणताही परिणाम होणार नाही. भविष्याचे मी सांगू शकत नाही. मी जर जास्त काळ जगलो तर कोणत्या तरी पद्धतीने मी या भेदाचा निश्चितच शोध घेईन.

"तू म्हणतोस की 'हिंदुस्थानींनी भूतकाळात एक समाज म्हणून ज्ञानपूर्वक हिंसेचा त्याग केला होता आणि मानवतेच्या बाजूने उभे राहायचे ज्ञानपूर्वत पसंत केले होते'. ऐतिहासिक दृष्टीने ही गोष्ट कशी काय खरी असू शकते? मला तर महाभारतात काय की रामायणात काय की आध्यात्मिक दृष्टीने रामायणापेक्षाही वरचढ असलेल्या तुलसीदासमध्येसुद्धा या गोष्टीची नावनिशाणीही दिसली नाही. सध्या मी या ग्रंथांचा आध्यात्मिक दृष्टीने विचार करून राहिलेलो नाही. यांतील अवतारी पुरुषांना रक्तपातात रस आहे आणि ते वैर भावनेने भरलेले आहेत. आणि शत्रूंबद्‌ल दयाहीन असल्याचे वर्णन कवींनी केले आहे. शत्रूचा पराभव करण्याकरिता त्यांनी कटकारस्थानांचाही आधार घेतलेला आहे. या ग्रंथामधील युद्धाचे वर्णनही आजकालच्या युद्धांपेक्षा कमी भडक नाही. माणूस कल्पना करू शकेल

अशा विनाशक शस्त्रांनी योद्धयांना सज्ज ठेवले होते. रामाच्या कीर्तीचे गान करताना तुलसीदासने जे पहिलेच भजन लिहिले आहे त्यात शत्रूच्या शक्तीचा नाश करण्याला पहिले स्थान दिले आहे. त्यानंतर मुसलमानांचा काळ येतो. या काळात हिंदू आणि मुसलमान लढण्याकरिता कमी तत्पर नव्हते. इतकेच की ते संगठित नव्हते. शरीरानेसुद्धा ते दुर्बल झालेले होते आणि अंतर्गत भांडणांनी ते छिन्नविच्छीन्न झालेले होते. या समाजाने जो त्याग केल्याचे तू आरोप करतोस तो त्याग मनुस्मृतीत सांगितलेला नाही. भूतमात्रावरील दयेच्या सिद्धांताच्या दृष्टीने बौद्धधर्माचा विचार केला तर त्यातही पूर्णपणे अपयश येते. दंतकथा जर खऱ्या असतील तर महान शंकराचार्य बौद्धधर्माला हिंदुस्थानातून हाकलून लावण्याकरिता घातकी युक्त्याप्रयुक्त्याचा वापर करण्याकरिता मुळीच मागेपुढे पाहत नाहीत. आणि ते यशस्वी झाले ! नंतरचा ब्रिटिश काळ घ्या. जनतेचे अनिवार्य निःशस्त्रीकरण करण्यात आले. परंतु तरीही तिच्या मनातून मारण्याची इच्छा किंचितही गेली नव्हती. जैनांमध्येसुद्धा हा सिद्धांत निष्फळ ठरला आहे. या लोकांना रक्ताची भीती वाटते असा भ्रम लोकांमध्ये फार जबरदस्त आहे. परंतु शत्रू असेल तर त्यांना त्याच्या प्राणांची किमत तितकीच कमी आहे जितकी युरोपियांना कमी आहे. माझ्या सांगण्याचा अर्थ हा आहे की शत्रूच्या विनाशामुळे या पृथ्वीवरील इतर लोकांना जितका आनंद होतो तितकाच जैनांनासुद्धा होतो. हिंदुस्थानबद्दल जास्तीतजास्त जे म्हणता येऊ शकेल ते इतकेच आहे की इथे काही व्यक्तींनी इतर देशांच्या तुलनेत अहिंसेचा सिद्धांत लोकप्रिय करण्याकरिता यशस्वीपणे जास्त प्रयत्न केले आहेत. परंतु यावरून असे मत तयार करण्याचे काही कारण नाही की येथील लोकांमध्ये अहिंसेची मूळे खोलवर रुजलेली आहेत.

"तू दुसरी गोष्ट अशी सांगतोस की, 'माझा मुद्दा असा आहे की हिंदुस्थानींना जरी याची कल्पना नसेल तरी अहिंसा ही त्यांची एक वृत्ती झाली आहे. आणि तिला कधीही जागृत करता येऊ शकते. तू (गांधीजी) जे करून दाखवण्याचा प्रयत्न करतो आहेस ते याचेच एक उदाहरण आहे.' हे खरे असावे अशी माझी इच्छा आहे. परंतु मला दिसते त्याप्रमाणे मी असे काहीही करून दाखवू शकलेलो नाही. दक्षिण आफ्रिकेत मित्र जेव्हा 'पॅसिव्ह रेझिस्टन्स हे हिंदुस्थानमधील दुर्बलांचे शस्त्र आहे' असे म्हणायचे तेव्हा ही गोष्ट आमची बदनामी आहे असे मी समजत होतो आणि त्यांच्या गोष्टीवर हसत होतो. परंतु असे म्हणणारे खरे होते आणि मी खोटा होतो. माझ्या एकट्यासंबंधी आणि माझ्या काही मित्रांविषयी असे म्हणता येऊ शकते की अहिंसा सबळांचे शस्त्र होते आणि वर वर्णिल्याप्रमाणे सत्याग्रहाचे शस्त्र होते.

परंतु जनतेकरिता तर ते शुद्ध ‘पॅसिव्ह रेझिस्टन्स’च (निःशस्त्र प्रतिकारच) होते. याचा आधार त्यांनी एवढ्याचकरिता घेतला होता की हिंसेने प्रतिकार करण्याची त्यांच्यात शक्ती नव्हती. या शोधाचा अनुभव मला खेडात वारंवार आला. येथील लोक तुलनात्मक दृष्टीने स्पष्ट असल्यामुळे निःसंकोचपणे माझ्याशी बोलत असत आणि मला स्पष्टपणे सांगत असत की हा उपाय आम्ही एवढ्याकरिताच अवलंबिला आहे कारण दुसरा कोणताही मार्ग अवलंबिण्याची आमच्यात शक्ती नाही. माझ्यामुळे त्यांना हा मार्ग फार जास्त बहाद्दुरीचा वाटत होता. मला भीती वाटते की चंपारणचे वा खेडाचे लोक निर्भयपणे फासावर चढू शकतील वा गोळ्याच्या वर्षावासमोर बेधडक उभे राहू शकतील, आणि इतका धोका पत्करून आम्ही महसूल देणार नाही आणि तुमच्याकरिता काम करू शकणार नाही असे म्हणू शकतील. ही गोष्ट मला त्याच्यात दिसलीच नाही. यामुळे माझे म्हणणे असे आहे की जोपर्यंत यांना स्वतःचे रक्षण करण्याचे प्रशिक्षण मिळणार नाही तोपर्यंत यांच्यात ही निर्भयी वृत्ती येणार नाही. अहिंसेचा पाठ तर त्यांच्याकरिता आहे ज्यांचे जीवन ओजाने, जोशाने भरलेले असेल आणि जो आपल्या विरोधकांसमोर ताठ छातीने उभा राहू शकेल. मला वाटते की अहिंसा पूर्णपणे समजण्याकरिता आणि चांगल्या प्रकारे पचवण्याकरिता शारीरिक धैर्याचा पूर्णपणे विकास होणे अनिवार्य आहे.

“मी तुझ्या या मताशी सहमत होऊ शकत नाही की हिंदुस्थानच्या उत्तर सीमेवर वा दक्षिण सीमेवेर वा पश्चिम सीमेवर वा पूर्व सीमेवर जर (कोणाचेही) लष्कर उतरले तर तो त्याला आपल्या नैतिक बळावर तेथूनच परतायला लावू शकेल. प्रश्न हा आहे की आज नैतिक शक्ती कशा प्रकारे फुलू शकेल? या नैतिक बळाचा पहिला सिद्धांत कळण्यापूर्वी माणसाने आपले शरीर बलवान करण्याची आवश्यकता नाही काय? आज करोडो लोग दररोज प्रातःकाळी जगन्नियत्याच्या नावाने अशी चेष्टा करत असतात -

तद् ब्रह्म निष्कलमंह नच भूत संघः

तो निष्फळ ब्रह्म मी आहे, पंचमहाभूतांनी बनलेला हा देह मी नाही.

प्रातः स्वरामि हृदि संस्फुरदात्मत्वम्

मी दररोज सकाळी माझ्या हृदयात स्फुरत असलेल्या आत्मतत्त्वाचे स्मरण करत असतो.

वाचो विमांति निखिला यदनुग्रहेण

यन्नेतिनेतिवचनैर्निगमा अवोचुः

त्याच्या अनुग्रहाने सर्व प्रकारची वाणी प्रगट होत असते आणि वेदसुद्धा 'नेति' 'नेति' असे त्याचे वर्णन करत असतात.

"माझे म्हणणे आहे की वरील श्लोक म्हणून आपण जगन्नियत्याची चेष्टा करत असतो. मी असे म्हणतो कारण या श्लोकाच्या अर्थाबद्दल मुळीच विचार न करता पोपटाप्रमाणे आपण या श्लोकाची पोपटपंची करत असतो. या श्लोकात भरलेल्या पूर्ण अर्थाचा जर एका हिंदुस्थानीला साक्षात्कार झाला असता तर हिंदुस्थानवर बलवानहून बलवान लष्कर जरी चढाई करून आले असते तरी तो एकटाच त्याला मागे हटवण्याकरिता पुरेसा ठरला असता. परंतु आज आपल्यामध्ये ही शक्ती नाही. आणि जोपर्यंत देशात स्वातंत्र्याचे आणि निर्भयतेचे वातावरण निर्माण होत नाही तोपर्यंत ही शक्ती येण्याची शक्यता नाही. प्रश्न हा आहे की हे वातावरण कशा प्रकारे निर्माण करायचे? जोपर्यंत देशातील मोठ्या भागातील लोकांना एखाद्या माणसाच्या वा पशूच्या हिंसेचा सामना करण्याची शक्ती आपल्यामध्ये नाही असे वाटते तोपर्यंत असे वातावरण निर्माण होऊ शकत नाही. हे तर स्पष्ट आहे की लहान मुलांना जर मला मोक्षाचा अर्थ समजावून सांगायचा असेल तर त्यापूर्वी त्याचा माणूस म्हणून पूर्ण विकास झालेला असला पाहिजे. विशिष्ट पातळीवरील या शरीराची आणि या जगाची आसक्ती त्याच्यात निर्माण झालेली असली पाहिजे. असे झाले तरच या शरीराची आणि जगाच्या क्षणभंगुर स्वरूपाची जाणीव मी त्याला सहजपणे करून देऊ शकेन आणि त्याला समजावून सांगू शकेन की हे शरीर आपल्याला भोग भोगण्याकरिता मिळालेले नाही, त्यातून मुक्ती मिळवण्याकरिता मिळालेले आहे. याचप्रमाणे कोणत्याही माणसाच्या मनात अहिंसेचा म्हणजे प्रेमाचा पूर्ण सिद्धांत रुजवायचा असेल तर त्याचे मन प्राणवान शरीराच्या माध्यमातून उमलून परिपक्व होईपर्यंत मी वाट पाहिली पाहिजे. आता इथून माझ्या अडचणींची सुरुवात होते. हे विचार व्यवहारात कसे उतरवायचे? प्राणवान शरीर असणे याचा अर्थ काय? हिंदुस्थानींनी शस्त्र चालवण्याचे प्रशिक्षण घेण्याकरिता कोणत्या सीमेपर्यंत जायला पाहिजे? प्रत्येक व्यक्तिने शस्त्र चालवण्याचे प्रशिक्षण घ्यायला पाहिजे की स्वातंत्र्याचे वातावरण निर्माण झाले की लोकांमध्ये शस्त्र धारण केल्याशिवायही आजूबाजूच्या वातावरणातून जी आवश्यक हिंमत मिळेल ती पुरेशी असेल? माझी अशी मान्यता आहे की दुसरा विचार खरा आहे. यामुळे सद्यस्थितीत मी प्रत्येकाला सैन्यात सामील होण्याकरिता सांगतो आहे. आणि त्याचबरोबर मी असेही सांगत असतो लष्करात आपल्याला जे सामील व्हायचे आहे ते रक्ताची तहान भागवण्यासाठी नाही, मृत्यूची भीती

घालवण्यासाठी. सर हेनरीचे हे कथन पाहा. हे मी मोर्लेच्या संस्मरणाच्या दुसऱ्या खंडातून घेतले आहे. तो उतारा असा आहे -

> "जगातील महान जमातींच्या जीवनात मृत्यूला फार उच्च स्थान आहे. शूर आणि उदार प्रवृत्तीचे लोक प्राणांपेक्षाही काही गोष्टींना पहिली पसंती देत असतात. या गोष्टींबद्दल माणसांच्या मनात शंका नसते आणि त्याकरिता ते मरायला घाबरत नाहीत. . . . खरी स्वाभाविक बुद्धी जीवनाचे अंतिम ध्येय म्हणून चांगल्या प्रकारे मरण्याची कला शिकण्यामागे लागलेली असते. खरे म्हणजे जो चांगल्या प्रकारे मरायला शिकला असेल त्याने आपले जीवन व्यर्थ गमावलेले नसते. हे जीवनातील मोठ्यात मोठे कर्तव्य आहे. ज्याला मरण्याच्या कलेचे ज्ञान झाले आहे त्याला स्वातंत्र्याचे ज्ञान झाले आहे. तेच खऱ्या अर्थाने मुक्त जगात राहू शकतात. ते कशालाही घाबरत नाहीत. त्यांचे संपूर्ण आयुष्य समाधानात आणि शांततेत व्यतीत होत असते. . . . ज्याचे जीवन ओझ्यासारखे झालेले असते त्यांची मरणघटिका जवळ आली असे समजावे. त्या वेळी मृत्यू आशीर्वादासारखा असतो आणि त्यांच्या जीवनात काहीही सार राहिलेला नसतो.

याबद्दल नंतर वेनबद्दल मोर्ले म्हणतात, "टॉवर हिलवर चढताना वेलची चाल तशीच प्रतिष्ठापूर्ण आणि दृढ होती."

लष्करभरतीसंबंधीच्या माझ्या प्रत्येक भाषणात मी सैनिकाच्या कर्तव्याच्या या भागावर जास्तीतजास्त भर दिला आहे. 'आपल्याला जर्मनीच्या माणसांना मारायला जायचे आहे' असे मी एकाही भाषणात म्हणालेलो नाही. माझ्या सगळ्या भाषणांचा सूर हाच आहे - 'हिंदुस्थान आणि साम्राज्य यांच्याकरिता आपल्याला लढाईत जाऊन मरायचे आहे.' माझ्या आवाहनाला प्रतिसाद देऊन लष्करात जर खूप मोठी भरती झाली आणि ते सर्व सैनिक फ्रांसमध्ये गेले आणि युद्धाचे पारडे ते जर जर्मनीकडून फ्रांसकडे झुकवू शकले तर मला वाटते की आपले म्हणणे ऐकायला लावण्याचा अधिकार हिंदुस्थानला प्राप्त होईल आणि तो टिकाऊ तडजोड घडवून आणू शकेल. आता यापुढे जाऊन कल्पना कर की निर्भयी लोकांचे सैन्य उभारण्यात जर मी यशस्वी झालो आणि हे लोक खाईत पोहोचले आणि प्रेमपूर्ण हृदयाने बंदुका टाकून देऊन जर्मनीला त्यांनी आव्हान दिले की 'या आणि आमच्यावर - तुमच्या भावांवर गोळ्या चालवा' तर माझा दावा आहे की त्यांच्या हृदयालाही पाझर फुटेल. केवळ जर्मनी राक्षसी हृदयाची आहे हा आरोप त्याच्यावर करण्याची माझी तयारी नाही.

"यामुळे या सर्वांचा अर्थ असा होतो की अपवादरुपी एक संयोग म्हणून, एक आवश्यक अनिष्ट म्हणून युद्धाचा आधार घ्यावा लागत असतो, जसा आपल्याला शरीराला आधार घ्यावा लागत असतो. आमचे शरीरही तर एक आवश्यक वाईटपणच आहे ना? जर हेतू शुद्ध असेल तर युद्धाचासुद्धा मानवजातीच्या हिताकरिता उपयोग करता येऊ शकतो. अहिंसावादी युद्धाबद्दल कोणीही तटस्थ राहू शकत नाही. आपण याला पसंती दिलीच पाहिजे. एक तर युद्धाला सक्रिय सहकार्य द्या वा युद्धाचा सक्रिय विरोध करा.

"राजकीय भांडणतंट्यात मी बुडून जाईन अशी तुला जी भीती वाटते ती तू मनातून काढून टाक. राजकीय भांडणतंटे आणि खटपटीलटपटीं मला भावतात असे मुळीच नाही. सध्या तर त्यात भाग घेण्याची माझी किमान शक्यता आहे. दक्षिण आफ्रिकेतसुद्धा त्यात भाग घेण्याची माझी मुळीच इच्छा नव्हती. तिथे मी राजकारणात पडलो खरा आणि याचे कारण त्यावेळी मला माझी मुक्ती त्यातच आहे असे वाटले. मॉंटेग्यूंनी मला विचारले होते, 'देशाच्या राजकारणार तुम्हाला भाग घेताना पाहून मला आश्चर्य वाटते.' क्षणभरही विचार न करता मी म्हणालो, 'तुम्ही मला तिथे पाहता कारण माझे धार्मिक आणि सामाजिक कार्य त्याशिवाय मी करू शकत नाही.' मला वाटते माझ्या जीवनाच्या शेवटपर्यंत माझे हे उत्तर कायम राहील.

"आता तर तू तक्रार करू शकणार नाही की पत्राच्या नावावर केवळ एक चिठ्ठीच लिहिली. आता तर मी पत्राऐवजी एक लांबलचक निबंधच लिहून टाकला आहे. परंतु या वेळी माझ्या मनात काय सुरू आहे हे तुला कळणे आवश्यक होते. हे सर्व वाचून यावरील तू तुझे मत देशील आणि माझे जे विचार तुला चुकीचे वाटत असतील त्यांची निर्दयपणे चिरफाड करशील.

"आशा आहे की तुझी प्रकृती चांगली होत असेल आणि तुझ्यात शक्ती येत असेल. प्रवास करण्यासारखी जेव्हा तुझी प्रकृती होईल तेव्हा आम्ही तुझे स्वागत करू हे सांगण्याची आवश्यकता नाही.

मोहन"

७-७-१९१८

काल रात्री आश्रमात गेले. आश्रमात सर्वांच्या भेटीगाठी घेण्यात आणि अनेक अंतर्गत बाबतीत निर्णय घेण्यात वेळ गेला. प्रभुदासच्या पत्रावर परिषद भरली. संबंधित बांधवांचे उत्तर घेतले. रात्री नडियाडला आले.

८-७-१९१८

सुप्रभाती उठून नवागामला जायला निघाले. नवागाम सरळ रस्त्याने साडेदहा मैल आहे. पायी जायचा विचार केला. सोबत आणलेली शिदोरी खाऊनच खुश झाले. चॉकलेटशी तुलना होईल असे शेंगदाण्याचे गूळ घालून तयार केलेले लाडू होते. कॅलनबाख तर ते खाऊन खुश होऊन गेले असते. शिपायाप्रमाणे बापूंनी रस्त्यात खाण्याकरिता ते लाडू हातात ठेवले. त्याचबरोबर आनंदाने म्हणत होते "शिपाईगिरी करायची आहे. आफ्रिकेत मी अशी खूप खूप केली आहे."

नंतर 'अमरसत्र' नाटकाबद्दल गोष्टी सुरू झाल्या. म्हणाले, "महादेव तर 'अमरसत्र' सारखा आहे. शिवाय श्लोकसुद्धा चांगले आहेत. कथानक मात्र अगदीच बेकार आहे. परंतु लेखन चांगले आहे. दौलतराम पंड्या अगदी सहजपणे लिहीत आहेत असे वाटते."

मी म्हणालो, "मी वाचलेच नाही तर काय सांगू? परंतु शैली क्लिष्टच असेल."

बापू - तू क्लिष्ट कशाला म्हणतोस?

मी - जे विचार अगदी सरळसाध्या भाषेत मांडता येत असूनही कठीण भाषेत व्यक्त करण्यात येतात, ज्यातील कठीणपणा भूषणास्पद नसतो, उलट त्यामुळे भाषा ओझ्यासारखी होते ती भाषा क्लिष्ट असते. दौलतराम पंड्यांची भाषा अशी आहे.

बापू - नाही, समजायला कठीण असते म्हणून तिला क्लिष्ट भाषा म्हणता येऊ शकत नाही.

मी - रमणभाईंमध्ये जो सरळपणाचा गुण आहे तो दौलतराम पंड्यांमध्ये अगदीच नाही.

यावर म्हणाले - हे खरे आहे, परंतु या भाषेला मी क्लिष्ट भाषा म्हणणार नाही. समजायला वेळ लागतो याकरिता आपण कोणत्याही भाषेला क्लिष्ट भाषा म्हणू शकत नाही.

मी - जी भाषा जाणूनबुजून कठीण केली असेल, कारण नसताना कठीण केली असेल ती क्लिष्ट भाषा. विचार न कळल्यामुळे मणिलालची भाषा कठीण वाटते, परंतु ती क्लिष्ट नाही. अलंकारांमुळे कठीण वाटावी अशी गोवर्धनभाईंची भाषा क्लिष्ट नाही. परंतु ती क्लिष्ट आहे असे म्हणावे लागेल.

यावर म्हणाले - असू शकेल. परंतु मणिलालची भाषा अनेक ठिकाणी अशी नाही काय की जिच्यात साध्या पद्धतीने अभिव्यक्त करण्याऐवजी कठीण प्रकारे विचार व्यक्त केले आहेत?

मी - नाही.

गोष्ट तिथेच थांबली. मग मी विचारले - इंग्रजी लेखकांत क्लिष्ट भाषा कोणाची?

थोडा विचार करून म्हणाले - आपल्याला क्लिष्ट लेखक शिकवत नाही असे का म्हणायचे?

मी - तुम्हाला जॉनसन तर म्हणायचे नाही?

त्यावर म्हणाले - नाही, निश्चितच नाही.

मी हसत हसत म्हणालो - ऑस्टीनचे 'ज्युरीप्रुडन्स' तर क्लिष्टच म्हणावे लागेल.

बापू - मला तर नाही वाटले. त्याची एक वेगळीच शैली होती. परंतु मला तर तो फार रसाळ वाटत होता.

मी - डाईसीसारखा प्रसाद याच्यात खरोखरच आहे काय?

तर म्हणाले - नाही, ही गोष्ट खरी आहे. प्रसाद तर नाहीच.

मग म्हणाले तू 'स्टिव्हन्स डायजेस्ट ऑफ ज्युरिप्रुडन्स' वाचला आहे काय? त्याच्यावर तर मी भाळलो आहे. आपण कायद्याची पुस्तकेसुद्धा आपल्या भाषेत आणायला पाहिजे. परंतु आपले वकील कुठे गुजरातीत बोलतात? या लोकांना ही जाणीव कुठे आहे की ही पुस्तके गुजरातीत असती तर जनता किती वर चढली असती? आणि साक्षरता म्हणजे काय हे तर आपल्याला कळलेच नाही असे वाटते. निरुपयोगी पुस्तकांचा अनुवाद करतात परंतु असे काही सुचेल तर?

मी - दौलतराव पंड्या वाचायला पाहिजे. तुम्ही वाचाल असे मला खात्रीपूर्वक वाटत होते म्हणूनच मी तुमच्याकरिता काढून ठेवायला लावले.

त्यावर म्हणाले - मी तर वाचणारच आहे. मी तर गुजरातीत कितीही निरुपयोगी पुस्तक असले तरी ते वाचूनच मोकळा होतो. हं, मला वाटते की गुजराती बायबल माझ्याकडून वाचवले जाणार नाही. याचे कारण एखादे पुस्तक अद्भुत भाषेत वाचलेले असेल तर तेच पुस्तक वाईट भाषेत वाचणे कठीण होते. बायबलच्या भाषांतराची जबाबदारी तर मिशनरी लोकांवर आली. यामुळे भव्याहून भव्य पुस्तकाचे आणि इंग्रजी साहित्यातील उत्तम नमुन्याचे भाषांतर अगदी रद्दी झाले आहे. आपल्यामधीर साक्षरांनासुद्धा हे करण्याचे सुचले नाही. कसे सुचेल?

मग म्हणाले, या गोष्टी सोडून आपण लष्करभरतीचा विचार केला पाहिजे. मला सध्या खूप शांत वाटते. तू ॲन्ड्र्यूजला लिहिलेले पत्र परत वाचले काय? त्यावर चर्चा कर. भांडल्यासारखे काही वाटते का? आज माझ्याजवळ पोलाक असायला पाहिजे होता. तो जर असता तर माझ्याशी पावलोपावली भांडला असता आणि मला विचार करायला त्याने भाग पाडले असते आणि त्या विषयावर अखेरपर्यंत विचार करायला लावले असते.

यामुळे मी ॲन्ड्र्यूजच्या पत्रावर वाद घालायला सुरुवात केली. प्रातःस्मरणीय समजले जाणाऱ्या आणि त्याप्रमाणे आचरण करणाऱ्या सर्व लोकांचे हल्ले परतवून लावण्याची क्षमता या पत्रात आहे हे खरे आहे काय?

बापू - नाही, ही क्षमता नाही. परंतु तुझ्यात ही शक्ती आहे, मग तू ती वापरतो की नाही ही वेगळी गोष्ट आहे.

मी - आजच्या राजकीय पारतंत्र्याच्या वातावरणात हे तत्त्व समजू शकणारा कोणीही नाही असे तुम्हाला वाटते काय? माझा जुन्याच वादाची मला परत आठवण होते आहे. माझे तर मत आहे की त्यांना इतरांची मुळीच काळजी वाटत नाही. हिंदुस्थानवर हल्ला होवो की हिंदुस्थानला आग लागो.

बापू - हो, परंतु मला शंका आहे.

मी - ठीक आहे, म्हणजे तुम्हाला असे म्हणायचे आहे काय की हे राजकीय पारतंत्र्य आत्मसाक्षात्काराच्याही आडवे येते? मी असे म्हणतो आहे कारण तुम्हीच म्हणत असता की याच कारणामुळे मला राजकारणात पडावे लागले आहे.

बापू - हो, हे खरे आहे. असा एखादा माणूस असेलही की ज्याच्या आडवी ही गोष्ट येत नाही. परंतु जनतेचे काय?

मी - मी अशा एखाद्याच माणसाची गोष्ट करतो आहे. जनता तर कधीही आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळवणार नाही.

बापू - हो, जनतेविषयी तुझे म्हणणे बरोबर आहे. पण मी असे समजतो की जर असे एखादे क्रांतीचे आंदोलन सुरू झाले, आणि तू म्हणतोस तसा एखादा ज्ञानी पुरुष अहमदाबादसारख्या ठिकाणी बसून सर्व काही बघत असेल — मग तो मौनव्रती जरी असला तरी — तरीही तो फक्त आपल्या विचारांनीदेखील त्या वातावरणावर प्रभाव टाकल्याशिवाय राहू शकणार नाही. असे न होणे शक्य नाही. असे पुरुष कुठे असतीलच असे मला वाटत नाही.

मी - मग आपण ही चर्चा बंद केली पाहिजे. यातून आपल्याला काहीही मिळणार नाही.

नंतर मी म्हणालो, “तुम्ही न्यूनगंडाला निरेंद्रिय म्हणता ते कसे? त्यांनी सूक्ष्म इंद्रिये गमावली आहेत म्हणून?”

बापू - नाही. मी तर ज्यांनी सुक्ष्मेंद्रिये गमावली आहेत त्यांच्याविषयीच बोलतो आहे. हातपाय कापल्या गेलेल्या माणसातसुद्धा निर्दयता तर असतेच.

मी - हे स्पष्ट केले पाहिजे. ज्यांनी इंद्रिये गमावली आहेत ते त्या इंद्रियांचा विचारच करत नाहीत असे काही आहे काय?

बापू - नपुंसक तर अतिशय विषयी असतात.

सहा महिन्यात हे लोक कसे तयार होतील? मला हीच गोष्ट कठीण वाटत होती. आणि तिथून लढून आल्यानंतर तर हे अजूनच निःसत्त्व झालेले असतात असे मला वाटते. सायंकाळी आम्ही दुसऱ्याच विषयावर आलो.

मी - बापू, मला तर अजूनही असे वाटत नाही की आपला संघ काशीला जाईल वा आपण रणांगणावर जाऊ शकू. आपल्या रंगरुटांची त्यांना गरजच पडणार नाही. आपण जाण्याकरिता तयार होईपर्यंत युद्ध संपलेले असेल.

बापू - तू हे जे म्हणतो आहेस ते बरोबर आहे ! परंतु ही गोष्ट आपल्या लोकांना कळत नाही. परंतु हे सर्व करत असतानाही मला मुसलमानांची समस्या फार बोचते आहे. मुसलमानांची समजूत कशी घालायची? या लोकांमध्ये फार तिरस्कार भरलेला आहे. मला माझ्या उणिवा विशेषत्वाने बोचत आहेत. मला वाटते की मी पूर्ण तयारीने कामाला सुरुवात केली नाही. मी जर अर्धवट मनाने कामाला सुरुवात केली असती तर वाईट वाटण्याचे काही कारण नव्हते. परंतु मी तर सर्वांना उपदेश केला आहे, अहिंसा समजावून सांगितली आहे. आता जर माझ्या उपदेशामुळे आपण लढाईत जायचेच नाही कारण गांधी अहिंसा समजावून सांगतो आहे असा जर लोकांनी विचार केला तर ते माझ्याकरिता फार धक्कादायक होईल. यामुळेच मी हे काम सुरू केले आहे. अहिंसा काय आहे हे समजावून सांगायला मी बसलो आहे.

(९-७-१९१८)

सकाळी सात मैल चालायचे होते. तेव्हा खूप गोष्टी झाल्या. सभा होऊ शकली नाही. आमच्यात झालेल्या चर्चेचा बापूंच्या जो परिणाम झाला होता तो देवदासच्या पत्रात दिसत होता. सायंकाळी साडेसहा मैल पायी चालत आलो. स्थानकावर विश्रांती. गाडीत इंदुलाल (घटनासंबंधीच्या) सुधारणाची योजना घेऊन आले होते. ती वाचली. वाचल्यानंतर म्हणाले, “या लोकांनी खूप प्रयत्न केला आहे यात काही शंका नाही. या स्वीकारल्या पाहिजे. आपल्यामध्ये जर शक्ती असेल तर आपण बरेच काही करू शकू. फार वाढवू शकू. आपण जर हे काम हाती घेतले नाही तर तो आपला दुबळेपणाच समजला जाईल. हे सगळे चेम्सफर्डमुळे घडते आहे. मी तर सुरुवातीपासूनच चेम्सफर्डवर भाळलो आहे. आपण यांच्यावर टीका करत गेलो आणि रंगरूट देऊ लागलो तर किती बरे होईल !“ दुसऱ्या दिवशी जिनांना पत्र लिहिले. त्यात लिहिले -

## (मो. अ. जिनांच्या पत्रातील काही भाग)

“रंगरुटांची भरती करा आणि त्याचबरोबर (घटनेसंबंधीच्या) सुधारणांत बदल करण्याचा आग्रह सुरू ठेवावा असे म्हणणे फार भव्य वाटते.”

आज अनेक पत्रे लिहिली. त्यांतील पहिले मगनलालला -

## (मगनलाल गांधींच्या पत्रातील काही भाग)

“पूज्य खुशालभाई आणि देवभाभींना शांती मिळावी म्हणून जे काही करता येत असेल ते करशील. प्रभुदास आणि इतर लोक तिथे जेवत आहेत याचा काही विपरीत परिणाम मला दिसतो आहे. केशू आणि राधाला फार मोठा धक्का लागला असेल. विवेकपूर्ण विचार करून जे काही करायचे ते करशील. . . .”

हरिलालचे पत्र. नरोत्तमशेठला लिहिलेल्या पत्राकरिता धोकेबाजीचा आरोप. भरतीकरिता माझी योग्यता नाही. वगैरे. त्याचे उत्तर -

## (हरिलाल गांधींना पत्र)

"तुझे पत्र मिळाले. मला जे खरे वाटते ते सांगून जर मी धोकेबाजी केली असेल तर माझे पत्र निश्चितच धोकेबाजी आहे. माझे अजूनही म्हणणे आहे की तू निर्दोष आहे असे जग कधीही कबूल करणार नाही. तू साक्षीत काहीही जरी म्हणाला असशील तरी तुझ्या सट्ट्याची कल्पना नरोत्तम शेठला येऊ शकत नाही. तू तर चुकांवर चुका करतो आहेस. दहा हजार रुपये गमावूनही तुला शांती नाही. परंतु तझ्याशी वाद घालून उपयोग नाही. ईश्वर तुला सद्बुद्धी देवो. मी चूक केली असेल तर मी ती दुरुस्त करीन. तुला अजून सांगणे शक्य होत असेल तर सांगशील.

"लढाईत भरती होण्यासंबंधी कळले. मला जेव्हा तुझ्या खरेपणाबद्दल शंका नव्हती तेव्हा मी तुला ही सूचना केली होती. आता या सूचनेला काही अर्थ राहिला आहे असे मला वाटत नाही. मला जेव्हा शंका आली तेव्हा मला काय वाटले असेल हे तुला मी सांगू शकत नाही.

"ईश्वर तुझे कल्याण करो. तुला सन्मार्ग दाखवो हीच माझी इच्छा.

बापूचे आशीर्वाद"

देवदास गांधींना पत्र -

## (देवदास गांधींना पत्र)

“चिरंजीव देवदास,

“तुझे पत्र नसल्यामुळे काळजी वाटत होती, परंतु नटेसनच्या आजच्या तारेमुळे ती दूर झाली. आजाराचे कारण शोधून परत आजारी पडणार नाही असे कर. आजारात हिंदी शिकणारांचे काय केले? कोणी अभ्यास सुरू ठेवला काय?

“अजून मला एकही रंगरूट मिळालेला नाही. देशाची स्थिती अशी भयंकर आहे.

“तू पाहिलेली तार काही तरी घोटाळा आहे. सरकारी भरती करणारा कोणी तरी माझ्या नाववाला आहे. यामुळे ही चूक झाली आहे. माझ्या अपयशावरून माझा सल्ला कोणी ऐकायला तयार नाही असे सिद्ध होते. परंतु जेव्हा मी त्यांच्या आवडीच्या कामात हात घालतो तेव्हा मात्र ते माझी सेवा घ्यायला तयार असतात. हेच योग्य आहे. या सेवेतूनच अधिकार निर्माण होत असतो. तीन वर्षांची सेवा, आणि तीही वेगवेगळ्या भागात. ही सेवा काहीच नाही. परंतु असे असूनही भरतीसंबंधात मी दुसरे काहीही करू शकत नाही. तरीही मला मनःशांती वाटते कारण या कामाची मीच सुरुवात केली. अजून काम सुरूच आहे. हा तर मी आजपर्यंतच्या कामाचा आढावा सांगितला आहे.

बापूचे आशीर्वाद”

दाभोलकर वकिलांच्या मुलाला चार रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली आणि ते त्याने आश्रमाला भेट दिले. त्याचे उत्तर -

## (दत्तात्रेय दाभोलकर यांना पत्र)

“चि. दत्तात्रेय,

“तू पाचव्या वर्गात पहिल्या नंबरने उत्तीर्ण झाला याकरिता तुझे अभिनंदन करतो. शिक्षणात जसा तू पहिला नंबर राखून ठेवला आहे तसाच चारित्र्यातही ठेवावा अशी माझी इच्छा आहे. तू पहिल्या महिन्याची शिष्यवृत्ती आश्रमाला दिली याचा मला खूप आनंद झाला. तुझ्या दानाचे महत्त्व तू जेव्हा आश्रमात येशील तेव्हा तुला कळेल. तुझे वडील आतापासून तुझ्यात परोपकारी वृत्ती रुजवत आहेत हा तुझ्याकरिता फार मोठा वारसा आहे. तू त्यांना हे कळवशील.

मोहनदास गांधीचे आशीर्वाद”

१७-७-१९१८

(घटनेतील) सुधारणेच्या योजनेसंबंधी समाधान झाले. श्रीमती बेझंट आणि श्री लोकमान्य टिळक यांनी आधी कडक उद्गार काढले होते, परंतु नंतर मवाळ पक्षाशी त्यांनी जुळते घेतल्यानंतर शास्त्रीयारचे पत्र आले. त्यात त्यांनी लिहिले -

“श्रीमती बेझंट आणि टिळकांनी वर्तमानपत्रात इतके लिहिल्यानंतर आता तुमच्या आणि माझ्या पक्षाशी जवळपास जुळते घेण्याचे ठरवले आहे हे पाहून मला आश्चर्य वाटते. काँग्रेसमधून तुम्हाला काढून टाकण्याच्या खूप गोष्टी सुरू आहेत. त्या मला पसंत नाहीत. मला हे समजूच शकत नाही.”

त्याचे उत्तर लिहिले -

## (श्री व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री यांना पत्र)

“भाई श्री शास्त्रीयार,

“तुम्ही मुंबईला जाऊ शकला याचा मला फार आनंद झाला. तुम्ही जर कॉंग्रेसमध्ये गेला तर तुमच्याकरिता ती फार धैर्याची गोष्ट होईल असे मी समजतो. मी कबूल केले पाहिजे की पंडितजींची भूमिका जशी वर्तमानपत्रातून दाखवण्यात येते तशीच जर खरोखर असेल तर मला त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटते. याकरिता ते कॉंग्रेसच्या व्यासपीठावर अनुपस्थित राहिले हे त्यांच्याकरिता फार बहादुरीचे काम आहे असे समजले जाईल. मला जे वाटते ते असे आहे -

“मी कशा प्रकारे या सभेला उपस्थित राहावे हे मला माहीत माहीत आहे. मी चुकीचे मार्गदर्शन करण्याकरिता कसा येऊ शकेन? आणि ठराव माडणारे जे बोलतील त्यांच्याशी मी सहमत नाही आणि जे ठरावाच्या बाजूने मत देणार आहेत तेच वर्तमानपत्रातून त्यावर टीका करत असतात. या प्रश्नाची दुसरी बाजूही आहे हे मला माहीत आहे. परंतु या वेळी तर मी या सर्वांपासून वेगळे राहायचे ठरवले आहे.

“तुमची प्रकृती चांगली असेल.

सेवक,

मो. क. गांधी”

हनुमंतरावांना पत्र लिहिले -

## (हनुमंतरावना पत्र)

"खपू दिवसांपासून तुम्हाला पत्र लिहायचा विचार करतो आहे परंतु लष्करभरतीच्या कामाकरिता सुरू असलेल्या माझ्या भटकंतीमुळे पत्रव्यवहाराच्या कामाकडे मी नीट लक्ष देऊ शकत नाही. आज या कामातून सुटी मिळालेली असल्यामुळे हे पत्र लिहायला घेतले आहे. तुम्ही देवदासकरिता जे केले आहे आणि जे करत आहा त्याकरिता मी तुमचा अंतःकरणापासून आभारी आहे. देवदास प्रत्येक पत्रात तुमच्या प्रेमाविषयी लिहीत असतो. म्हणतो की अशा आजारात खऱ्या मित्राची खूपच आवश्यकता असते. तमिळ शिकवण्याकरिता मी हिंदी उमेदवार पसंत करीन.

"मला माहीत आहे की लष्करभरतीच्या माझ्या कामामुळे वेगवेगळ्या कारणांमुळे - राजकीय आणि धार्मिक - माझ्या मित्रांना दुःख होते. परंतु मला हेही माहीत आहे की माझ्या या कामावर टीका करणारे दोन्ही प्रकारचे माझे मित्र चुकत आहेत. माझे विचार देशासमोर दीर्घ काळापासून आहेत. परंतु माणसाचा खरा न्याय तर त्याच्या कृत्याकडे पाहूनच होऊ शकतो. त्याच्या वाणीवरून क्वचितच होऊ शकेल. यामुळे ते जो आक्षेप घेत आहेत तो मी उतावीळपणाने फेटाळून लावू शकत नाही. ते जे म्हणतात ते प्रामाणिकपणे म्हणतात आणि प्रेमापोटी माझ्यावर टीका करत असतात. मी स्वतः अहिंसेचे पालन करत असतानाही लोकांना अहिसेची बाराखडी समजावून सांगण्यात मला मिळालेल्या अपयशामुळे मी या निष्कर्षावर आलो आहे की प्रत्येक प्रकारच्या मारण्यात हिंसा नाही. अनेकदा तर अहिंसेच्या पालनाकरिता मारण्याची गरज पडत असते. आपण एक राष्ट्र म्हणून मारण्याची खरी शक्ती गमावून बसलो आहो. हे तर स्पष्ट आहे की जो माणूस मारण्याची शक्ती गमावून बसलेला असेल तो अहिंसेचे आचरण करू शकत नाही. अहिंसेत सर्वोच्च प्रतीचा त्याग असतो. दुर्बल आणि पौरुषहीन जनता त्यागाचे हे भव्य आचरण करू शकत नाही. ज्याप्रमाणे उंदराबद्दल असे म्हणता येऊ शकत नाही की त्याने मांजरीला मारण्याच्या शक्तीचा त्याग केला आहे. ही गोष्ट फार भयंकर वाटेल परंतु ती अगदी खरी आहे. दीर्घ काळ प्रयत्न करून आपण ही शक्ती परत मिळवली पाहिजे, आणि ही शक्ती मिळवल्यानंतरच सतत त्याग करून आपण हिंसेचे यातनामय जग सोडू शकतो. आश्रमाच्या सदस्यांनीसुद्धा अहिंसेविषयी समजावून सांगण्यात मी अपयशी होत असल्यामुळे मला किती दुःख होत असते याचे पूर्ण

परिणामकारक भाषेत मी वर्णन करू शकत नाही. हे लोक माझे म्हणणे आनंदाने ऐकून घेत नसतात असे काही नाही, परंतु त्या वेळी मला भास होत असतो की, आणि आता तर स्पष्टपणे दिसते की हे सगळे ग्रहण करण्याची त्यांच्यात शक्तीच नाही. संगीत ऐकायचे कान नसलेल्यासमोर उत्तम संगीत गाण्यासारखेच हे आहे. परंतु आज आश्रमात जवळपास प्रत्येकाला ही गोष्ट कळली आहे की अहिंसा म्हणजे सबळांचा त्याग, दुर्बलांचा नाही. या विचाराने त्यांच्यात नवीन तेज आले आहे. व्यवस्थित युद्ध आणि व्यक्तिगत लढाई यांच्यात कोणताही भद करता येणे शक्य नाही. उत्तमात उत्तम योद्धा असे म्हणत असतो की मी वाटेल तितक्या मोठ्या जनसमूहासमोर निर्भिडपणे उभा राहू शकतो. त्या वेळी त्याच्या मनात मारण्याचा विचार येत नसतो. परंतु तो तर या विचाराने भारलेला असतो की पळून जाऊन जीव वाचवणे शक्य असतानाही तिथेच ताठ उभे राहून आनंदाने मरण पत्करणे चांगले. माझी स्पष्ट मान्यता आहे की आपण आपल्या मुलांना आत्मरक्षणाची कला शिकवायलाच पाहिजे. मला अगदी स्पष्टपणे जाणवते की आपण जर आत्मरक्षणाची शक्ती परत मिळवू शकलो नाही तर आपण अनंतकाळपर्यंत स्वराज्याकरिता पात्र होणार नाही. यामुळे मला आत्मविकासाविषयीच्या आणि देशाच्या विकासाविषयीच्या माझ्या किती तरी धारणांबद्दल पुनर्विचार करावा लागतो आहे. आज मी जे काही सांगितले त्याहून अधिक चर्चा मी करणार नाही. तुम्ही खरे संशोधक आहा. तुम्हाला हा अहिंसेचा विचार व्यवस्थितपणे कळावा अशी माझी अंतःकरणापासून इच्छा आहे. तो केव्हा कळतो याची मी वाट पाहतो आहे. यात पतन नाही तर उन्नती आहे. माझ्या या शोधामुळे मला प्रेमाचे जे दर्शन झाले आहे ते आधीपेक्षा अनंत पटीने मोठे आहे.

सेवक,

मो. क. गांधी”

१८-७-१९१८

आनंदशंकरला पत्र लिहिले -

## (आनंदशंकर ध्रुव यांना पत्र)

“सुज्ञ भाईश्री,

“तुमचे पत्र मिळाले. आपले सखेसोयरे मरत जावे, आजारीसुद्धा पडावे, आपल्या हातावर रेल्वेगाडीची खिडकी पडावी, पायांना ठेच लागावी अशा सर्व दुःखांमधून मुक्ती मिळेल आणि केवळ सुखच मिळेल असे औषध आपल्या या सर्व अभ्यासामध्ये आपण शोधू शकलो काय? असे असतानाही आपल्या अभ्यासामुळे आपल्या हाताच्या वेदना कशा शमू शकतील? वा वैद्य त्या कमी कशा करू शकेल? चांगले झाल्यानंतर आपली जेव्हा भेट होईल तेव्हा याचे उत्तर द्या. आणि मजुरांमध्ये तर धीर असल्यामुळे ते वाट पाहू शकतात. आणि प्रार्थना जर खरोखरच फळत असेल तर अवश्य आपला हात परत पूर्वीप्रमाणे काम करू शकण्यासारखा होण्याकरिता अवश्य प्रार्थना करा. मध्यंतरीच्या काळात तर त्या मजुरांमधील अनेकांनी पस्तीस नाही तर पन्नास टक्के पगारवाढ घेतलेली असेल. अंबालाल भाई म्हणाले की ते तुमच्याशी काही कान गोष्टी करतील. त्यांनी माझ्याशी तर कानगोष्ट केली आहे. परंतु तुम्ही ती त्यांच्या तोंडून ऐकणेच चांगले राहील.

मोहनदासचे वंदेमातरम”

बिचारे जगवानदास ना. महेतांना इथे आले आणि ताप येऊन ते आजारी पडले. त्याचे पैशाचे पाकीटही चोरीला गेले. त्यांना पत्र लिहिले -

## (जगजीवनदास महेता यांना पत्र)

तुमचे पत्र मिळाले. तुमचा कोट आणि रुपये चोरीला गेले असल्याचे ऐकले. त्याबद्दल दिलगिर आहे. दुबळी गाय आणि तिच्यावर गोमाशी अशी गोष्ट झाली. अनाथाश्रमात कोणी तरी चोर आहे. तिथे अशा दोनतीन घटना घडल्या आहेत. तुम्हाला कोणी तरी सावध करायला पाहिजे होते, परंतु हे कोणालाही सुचले नाही.

तुमचा ताप आता पूर्णपणे गेला असेल. भाई जीवराजना आजच पत्र लिहू शकलो. ते याबरोबर आहे. योग्य वाटत असेल तर पाठवून द्या.

तुमच्या व्यापाराची परिस्थितीची काहीशी कल्पना या वेळी मला आली. तुम्ही ज्या पैशाकरिता व्यापारत पडला आहा ती गोष्ट मला दुःखद वाटते. तुम्हाला माझा सल्ला कोणत्याही उपयोगाचा वाटत असेल तर तुम्ही आजच तुमचा हा व्यापार आवरा. ज्याला तुमच्याकडून पैसे घेणे आहे त्याला ते देऊऩ टाका आणि कोणती तरी नोकरी शोधा. नोकरी मिळवण्यात तुम्हाला अडचण येणारच नाही. तुम्हाला जर साधे जीवन व्यतीत करायचे असेल तर आश्रम उघडाच आहे. माझा आग्रह नाही. संसार ज्याला पुरुषार्थ समजतो तो करायचा असेल तर अवश्य करा. परंतु ते तुमच्या बळावर. या कामाला तुम्ही जितका उशीर कराल तितका तुम्हाला अधिक पश्चात्ताप करावा लागेल.

आपण कुठेही आपल्याच कारणामुळे दुःख भोगत असतो. परंतु जसजशी तुमच्या कुटुंबाच्या जाळ्याची मला कल्पना येत जाते तसतसे मला हे अधिक तीव्रतेने जाणवू लागते. साहस करत असताना प्रत्येकाच्या नशिबी जे दुःख येत असते तेवढ्यावरच समाधान माना. जास्त भानगडीत पडू नका. सर्वांशी चांगले संबंध ठेवा. बापा तर स्वतःच दुःखाचा ढीग तयार करत आहेत. ज्याला धार्मिक जीवन व्यतीत करायचे असेल त्याने इतका लोभ का ठेवावा? या सगळ्या लोभाला तुम्ही उत्तेजन कसे काय देऊ शकता? . . . (मुळात इथे काही शब्द सुटलेले आहेत.) तुम्ही जितकी काळजी लोकापवादाची फिकीर करता तितकी जर तुम्ही आतल्या आवाजाची कराल तर आपण देवीदेवतांपेक्षाही जास्त सुखी

होऊ. आपल्या अंगणात बसलेल्या सुखाला आपण ओळखत नाही आणि चोहोकडे त्याचा शोध घेतो या गोष्टीची ओळख तुम्हाला कधी पटेल?

त्यांच्या पत्नीला -

## (जगजीवनदास महेतांच्या पत्नीला पत्र)

प्रिय बहेन,

"माझ्याकडून तुमचे दुःख पाहवत नाही. असे असले तरी मला तुमच्यात जो निर्दोष आनंद दिसला तसा ना तर मला बापांमध्ये दिसला ना दिसला भाई जगजीवनदासमध्ये. यामुळे माझे हृदय विदीर्ण झाले आहे, आणि मी भाई जगजीवनदाला पत्र लिहिले आहे. ते तुम्ही दोघेही वारंवार वाचा, त्यावर विचार करा आणि मग तुम्ही पुरुषार्थ करा. हे पत्र तुम्हा दोघांकरिताही आहे."

२२-७-१९१८

डॉ. महेतांना -

## (डॉ. प्राणजीवन महेतांना पत्र)

“लष्करभरतीचे काम हाती घेण्याआधी मी खूप विचार केला होता आणि हे मोठ्यातमोठे कर्तव्य आहे असा निश्चय केला. खूप कठीण आहे. जितके कठीण आहे तितकेच परिणामकारक आहे. मृतात जीव घालण्यासारखे वाटते. असे असले तरी प्रयत्न करूनच यातून सुटका होऊ शकते. हे काम करत असताना लोकांना फार मोठे प्रशिक्षण मिळते आहे असे मला वाटते. या कामाकरिता जमनादासला मुक्त करू शकाल काय?”

# (पुंजाभाई शाह यांना पत्र)

“सुज्ञ पुंजाभाई,

“ज्याला आपण धर्म समजतो तो धर्मच नाही. अहिंसेच्या नावाने आपण हिंसा करतो. रक्तपात करायला घाबरतो, परंतु आपण अहर्निश रक्त शोषत असतो. बनिया अहिंसाधर्माचे पालन करूच शकत नाही. काही श्रावकांच्या शुष्क त्यागात वा किड्यामुंग्यांना खाऊ घालण्यात धर्म नाही. शरीराच्या मोहाचा त्याग केल्याशिवाय मोक्ष मिळू शकत नाही, आत्म्याची ओळख होऊ शकत नाही. तुम्हाला जर या गोष्टीचा स्पष्ट अनुभव असेल आणि तुम्हाला खऱ्या मोक्षमार्गाचे दर्शन घ्यायची इच्छा असेल तर माझा सल्ला आहे की तुम्ही आश्रमाला तुमचे करा. जे बांधकाम करवून घ्यायचे आहे ते तुम्ही पूर्ण करा आणि मगनलालला सध्या मुक्त करा. तुम्हाला नोकर हवा असेल तर परसरामला ठेवा. मगनलालला मोकळा करणे आवश्यक वाटते. तुम्ही सखोल विचार करा. तुम्हाला दिव्यासारखे हे ज्ञान स्पष्ट दिसत असेल तरच यात पडा. असे सूचत असेल तर आश्रमात फार शांतता मिळेल. तसे सुचणार नसेल तर थोड्याच दिवसात कंटाळाल. तुम्ही फूलचंद आणि मगनलाल यांची भेट घेऊन त्यांना विचारा. आधी तर तुम्ही एकट्यानेच विचार केला पाहिजे.

मोहनदासचे भगवतस्मरण”

श्रीमती पोलाकना -

# (श्रीमिती पोलाकना लिहिलेल्या पत्रातील काही भाग)

“जीवनाबद्दलच्या माझ्या दृष्टिकोनातील एका क्रांतिकारक बदलातून मी जातो आहे. मला असे वाटते काही जुने जाळे तुटत आहेत. परंतु याबद्दल अधिक तर मला वेळ मिळेल तेव्हा.

भाई”

मालवीयजींचा सगळ्यात लहान मुलगा गोविंद मालवीयचे एक पत्र आले. त्यात तुमचा घटनेतील सुधारणांच्या योजनेवर तुमचा विश्वास का नाही, आपण लष्करभरती का केली पाहिजे, मदत करण्याची काहीही आवश्यकता नाही असे लिहिलेले होते. त्याचे उत्तर -

## (गोविंद मदनमोहन मालवीयना पत्र)

"तुझे पत्र आल्याने मला फार आनंद झाला. आपण ज्यांना मुरब्बी समजतो त्याच्याजवळ आपण आपल्या मनात भेडसावत असलेल्या सर्व समस्या मनोकळेपणाने मांडू शकतो, मांडणे आवश्यकही आहे. मला पत्र लिहून तू योग्य तेच केले आहे. भरतीत कोणते अत्याचार होतात हे मला माहीत नाही. जर तिथे अतिरेक होत असेल तर भरतीकरिता जाणे माझ्या दृष्टीने अधिकच आवश्यक आहे.

"मॉनेग्यू-चेम्सफर्ड योजना माझ्या मते फार चांगली आहे. त्यातील उणिवा आपण आंदोलन करून दूर करायला लावू शकतो. परंतु कशीही जरी असेल तरी माझ्या मते आपण युद्धात सामील होणे आवश्यक आहे. आपण इंग्रजांवर उपकार करण्याकरिता त्यात दाखल होऊन राहिलेलो नाही तर देशाची सेवा करण्याकरिता, देशाचा स्वार्थ पाहून सैन्यात भरती होऊ इच्छितो. मी भारतवर्षाच्या दुर्दशेचे काय वर्णन करू? मला स्पष्ट दिसते की हिंदुस्थानला खरे स्वराज्य मिळू शकत नाही. मी असे समजतो की आपण सैन्यात गेल्याने दोन कार्य करू शकू. आपल्यामध्ये शौर्य निर्माण होईल, आपण थोडेबहुत शस्त्रसंचालन शिकू शकू. आणि ज्यांच्याबरोबर आम्ही भागिदार होऊ इच्छितो त्यांना मदत करून आपण आपली पात्रता अधिक प्रमाणात सिद्ध करू शकू. त्यांच्या अत्याचाराला विरोध करणे आणि त्यांना त्रासात मदत करणे या दोन्ही गोष्टी करणे आमच्याकरिता योग्य आहेत. माझी इच्छा आहे की तू या समस्येचा खूप शांततापूर्वक विचार केला पाहिजे. माझी इच्छा आहे की तू हे पत्र देवदासला पाठव आणि त्याच्याशी या विषयाची चर्चा करावी.

तुझा शुभचिंतक, मोहनदास गांधी"

२४-७-१९१८

बळवंतराव ठाकूरचे सुधारणांच्या योजनेविषयी एक पत्र. मिलिटरी कॉलेज असायला पाहिजे अशा सूचना. सुधारणांच्या योजना या संसार मांडण्यासारख्या आहेत असे रूपकात्मक उद्गार. त्याचे उत्तर -

## (बळवंतराव ठाकोर यांना पत्र)

“तुमचे पत्र मिळाले. जेव्हा आपली संसद असेल तेव्हा फौजदारी कायद्यात एक कलम दाखल करायला लावण्याकरिता आपल्याला हालचाल करावी लागेल असे मला वाटते. दोन हिंदुस्थानींना एकच भाषा येत असताना परस्परांशी वा इतरांशी इंग्रजीत बोलत असतील अथवा लिहीत असतील तर त्यांना कमीतकमी सहा महिन्याची सक्त मजुरींची शिक्षा करण्यात यावी. या कलमाबद्दल तुमचे मत कळवा आणि स्वराज्य मिळेपर्यंत जो असा अपराध करील त्याच्यावर कोणता इलाज करावा हेसुद्धा कळवा.

“सरकारी खर्च कसा कमी करावा यासंबंधीचे तुमचे मत कळले. परंतु अजून तर म्हैस गाभणच राहिलेली नाही. आपल्याला स्वराज्य मिळेल तेव्हा परिस्थिती कशी असेल यावर सर्व काही अवलंबून असेल.”

“स्वराज्याची तयारी हळूहळू होऊ शकत नाही काय? माझ्या मते तर स्वराज्याची तयारी हळूहळूच व्हायला पाहिजे. लग्नाच्याआधी साक्षगंध तर होतोच. इंग्रजांमध्ये तर फार दीर्घकाळ प्रियाराधन चालत असते. विवाहाची उपमा तर दोन्ही विचारांवर लागू होत नाही. क्रांति तात्कालिक परिवर्तन असते. असे परिवर्तन शांतपणे होऊच शकत नाही. यामुळे शांततापूर्ण क्रांती हा वदतोव्याघात आहे. हिंदुस्थानला शांतता आणि शक्य तितके लवकर परिवर्तन या दोघांचीही आवश्यकता आहे. हे कसे होईल?

“तुमच्या पत्राचा जाहीर उपयोग होऊ नये हे बरोबर आहे. थोड्या काळानंतर ‘खाजगी’ लिहिण्याची आवश्यकताच राहणार नाही अशी परिस्थिती असली पाहिजे असे आपण इच्छिले पाहिजे.

"मी आज गावामध्ये थोडी चौकशी करायला आलो आहे. थोडा वेळ आहे म्हणून आज थोडा विनोद केला आहे. अजून थोडे शिल्लक आहे. खेडाबद्दल अजून तुमची शंका कायम असेल तर खेडातील लोकांतर्फे मी तुम्हाला इथे येऊन प्रत्यक्ष पाहण्याकरिता आमंत्रित करतो. अजून शंका दूर झाली नाही असे तर माझ्या माहितीत केवळ तुम्हीच आहा.

मोहनदासचे वंदेमातरम"

नवागाममध्ये खूप आराम केला. कोणी भेटायला येणाराच नव्हता. भरतीच्या कामामुळे खूप शीण आला होता. तिथे धर्मशाळेत भरपूर गोष्टी झाल्या. मध्येच प्रयत्नपूर्वक विनोद करत होते. वल्लभभाई म्हणत होते की इथेच ‘विल्सनचे पत्र’ वाचले पाहिजे. यावरून सर सुब्रमण्यमची आठवण झाली. त्यांना पत्र लिहिले -

## (सर एस सुब्रमण्यम यांना पत्र)

“प्रिय सर सुब्रमण्यम,

“आशा करतो की हे पत्र तुम्ही माझे धाष्टर्य समजणार नाही. परंतु मला अनेक दिवसांपासून जाणवते आहे की तुमची भाषेला अंकुश नाही, योग्याला शोभेल अशी ती नाही. मला तुमचे आरोप अनेक बाबतीत अविचारीपणाचे वाटले. माझ्या नम्र मताप्रमाणे तुम्ही जितके स्पष्टवक्ते आणि निर्भयी आहा तितकेच तुम्ही सत्यवादी असता तर तुम्ही जितकी देशसेवा केली आहे त्यापेक्षा कितीतरी अधिक केली असती. विचार न करता काढलेले अनुदार शब्द तुमच्यासारख्याकरिता असत्यच गणले जातील. तुमचे राजकारण लोकांना खुश करणारे नाही, ते धार्मिक आहे. माझी तुम्हाला विनंती आहे की तुम्ही देशासमोर शुद्ध हिंदुस्थानी माणसाचे उदाहरण ठेवले पाहिजे. असे करण्याचे सामर्थ्य तुमच्यात आहे.

सेवक,

मो. क. गांधी”

मगनलालभाई अलाहाबादला गेले तेव्हा पुंजाभाईंनी त्यांना जागा दिली. त्यांना पत्र -

## (पुंजाभाईंना पत्र)

तुम्ही चांगला निश्चय केला आहे. परमार्थाने केलेले सर्व काम मोक्षाचे कारण आहे. अनोळखी माणसाची सेवा हा परमार्थ आहे. तुमचे लक्ष परक्या माणसाकडे वेधले गेले यात निश्चितच पुरुषार्थ आहे. आश्रमात सर्वांची यथाशक्ती सेवा करण्याने मिळणा आनंद असीम असतो. आश्रमात कोणी ना कोणी तर आजारी असतोच. त्यांची दिवसरात्र काळजी घेणे, मुलांचा लाड करून त्यांना खुश ठेवणे वगैरे गोष्टी असतातच. अशा कामात नाही तर काही त्रास असतो ना काही भांडणतंटा. अशानेच आत्म्याची ओळख होत असते. स्वाभाविकपणेच तुम्हाला असा अनुभव येईल. भवरजी वगैरे आजाऱ्यांजवळ बसायची सवय ठेवा.”

प्राचार्य रुद्रना अद्भुत पत्र -

युद्धात मुलाला सेकंड लेफ्टनंटचे पद मिळाले. जावई निसर्ग विज्ञानाच्या ट्रिपोसमध्ये पहिले आले. सुधीरचे सुंदर काम. या सर्व आनंदाच्या वातावरणात सहभागी होण्याकरिता आमंत्रण. बापूंचे उत्तर -

## (प्राचार्य आनंदशंकर ध्रुव यांना पत्र)

“भाईश्री रुद्र,

“तुमच्या आनंदाच्या या काळात तुम्ही मला सहभागी होण्याकरिता बोलावले याकरिता मी आभारी आहे. सुधीर फार गोड आणि हुशार आहे. तो फार चांगले काम करतो आहे. तुमच्या व्यवस्थित प्रशिक्षणाचा हा परिणाम आहे.

“तुम्हाला माझे लष्करभरतीचे काम पसंत आहे तर इकडे चार्ली याकरिता माझ्याशी भांडतो आहे. त्याला असे वाटते आहे की मी माझ्यास्वभावानुरूप वर्तन करून राहिलेलो नाही. त्याला असे वाटते की यामुळे मी माझ्या अहिंसेच्या ध्येयाला हानी पोहोचवीन. मी तर याच ध्येयाच्या उपासनेकरिता हे काम हाती घेतले आहे. मला माहीत आहे की माझी जबाबदारी फार मोठी आहे. माझी जबाबदारी इतकी मोठी असल्यामुळे लष्करभरतीच्या कामाचा माझ्या कामकाजात समावेश होत नाही अशा समजाने मी शांतपणे बाजूला बसलो होतो. माझ्या शब्दांवर विश्वास ठेवणारे ही गोष्ट अहिंसाच आहे अशा चुकीच्या समजाने अगदी नामर्द होण्याची वा नामर्द राहण्याची भीती होती. शारीरिक सामर्थ्याचे व्यर्थत्व आपल्याला कळते आणि आपण या शक्तीचा त्याग करण्यापूर्वी आपल्यामध्ये मारण्याची शक्ती असली पाहिजे. येशू ख्रिस्तामध्ये शत्रूंना भस्मसात करण्याची शक्ती होती, परंतु त्याने तिचा उपयोग केला नाही आणि स्वतःला मारून टाकू दिले. याचे कारण तो प्रेमाने ओतप्रोत झालेला होता. . . .

सेवक,

मो. क. गांधी”

# (कस्तुरबा गांधींना पत्र)

“प्रिय कस्तुर,

“तू माझ्याबरोबर राहण्याकरिता खूप आतुरलेली आहेस हे मला माहीत आहे. परंतु मला वाटते की आपल्याला जे कार्य करायचे आहे ते केलेच पाहिजे. सध्या तू तिथेच राहायला पाहिजे. इतक्या सगळ्या मुलाबाळांना जर तू तुझी मुले समजशील तर तुला मुलांची उणीव जाणवणार नाही. उतरत्या काळात इतके तर करायलाच पाहिजे. तू जसजसा सर्वांबद्दल प्रेमभाव ठेवशील, सर्वांची सेवा-चाकरी करशील तसतसा तुझ्या मनात आनंद फुलू लागेल. सकाळच्या वेळी तू आजाऱ्यांना भेटायला जायलाच पाहिजे. त्यांची सेवाचाकरी केली पाहिजे. त्यांच्याकरिता काही विशेष खायचेप्यायचे करायचे असेल तर ते करायलाच पाहिजे वा राखून ठेवलेच पाहिजे. इथे मराठी बंधू आहेत. त्यांच्या भेटीघाठी घेत राहायला पाहिजे. त्यांच्या मुलांना खेळवले पाहिजे. त्यांना घेऊन फिरायला जायला पाहिजे. ते आपल्यासाठी परके नाहीत असा ठसा त्यांच्या मनावर उमटवला पाहिजे. त्यांच्या प्रकृतीची काळजी घेतली पाहिजे.

“निर्मला वगैरेंबरोबर धर्माच्या वगैरे चांगल्या गोष्टी केल्या पाहिजे. तिला भागवत वाचायला लावून तू ऐकू शकतेस. त्यात तुलाही रस वाटेल. अशा प्रकारे तू इतरांच्या सेवाचाकरीत जर गुंतून राहशील तर तू नेहमी आनंदात राहशील. पुंजाभाईंची खाण्यापिण्याची व्यवस्था तर करायलाच पाहिजे.

मोहनदास”

# (चार्ल्स फ्रेड्रिक ॲन्ड्र्यूज यांना पत्र)

"प्रिय चार्ली,

"तुला परत पत्र लिहिण्याचा आनंद मिळवतो आहे. पराजित राष्ट्राच्या पैगंबराचा संदेश ऐकून घेण्याचा जपानला संकोच वाटत होता याचा मी फार खोडवर दडलेला अर्थ घेतो आहे. जगात नेहमीच युद्ध राहणार आहेत. संपूर्ण मानवजातीच्या स्वभावात इतके मोठे परिवर्तन होईल अशी शक्यता दिसत नाही. मोक्ष आणि अहिंसा या गोष्टी व्यक्तीच साध्य करू शकतात. पैसाअडका वा जमीनजुमला वा प्रजोत्पादन या सर्व गोष्टी अहिंसेशी पूर्णपणे विसंगत आहेत.

"शत्रू आपल्याला मारून टाकण्याचा धोका असतानाही धैर्याने आपल्या बायकोचे आणि मुलाबाळांचे रक्षण करण्यात खरी अहिंसा आहे. समोरच्या माणसाला मारायचे नाही परंतु त्याचे आघात सहन करण्यात पूर्ण अहिसा आहे. परंतु हिंदुस्थानने तर प्लासीच्या लढाईत यापैकी काहीही केले नाही. आम्ही एक भित्र्यांची टोळी होतो. आतल्याआत परस्परांशी भांडत होतो. ईस्ट इंडिया कंपनी पैशाकरिता भुकेली होती आणि धुळीसारख्या वस्तूंकरिता आम्ही आमचा आत्मा विकायला तत्पर होतो. आजसुद्धा आपली अवस्था कमीजास्त प्रमाणात अशीच आहे, बहुधा जास्तच असेल, कमी मुळीच नाही. काही व्यक्तींनी शौर्य दाखवल्याची उदाहरणे असूनही आणि त्या दिवसंधील अतिशयोक्तीपूर्ण अहवालान नंतर सुधारणा केल्यानंतरसुद्धा आम्ही केलेल्या एकूण वर्तनात अहिंसा कुठेही नव्हती. यामुळे जपानने जो संकोच दाखवला तो मला योग्यच वाटतो. जुन्या काळात ख्रिश्चन पाद्र्यांनी काय केले याची मला पुरेसी माहिती नाही. मला असे वाटते की त्यांना जो त्रास सहन करावा लागला होता तो त्यांनी आपल्या दुर्बलतेमुळे नाही तर सबळतेमुळे सहन केला होता. जुन्या काळात तर ऋषिमुनींचा असा आदर्श होता की त्यांच्या धार्मिक क्रियाकांडाचे रक्षण क्षत्रिय करत होते. विश्वामित्राच्या यज्ञान राक्षस विघ्न आणत होते तेव्हा रामाने त्यांचे रक्षण केले होते. नंतर विश्वामित्राला अशा रक्षणाची आवश्यकता राहिली नव्हती.

"सैन्यभरतीचे काम माझ्याकरिता कठीण झाले आहे. परंतु तू मान्य करशील की आजपर्यंत मला असा एकही माणूस भेटला नाही ज्याचा कोणाला मारण्यासंबंधात आक्षेप असल्यामुळे तो लष्करात भरती झाला नाही. अनेकांचा आक्षेप असा होता की त्यांना मारायची भीती वाटत होती.

मृत्यूच्या या अस्वाभाविक भीतीमुळे राष्ट्राची धूळधाण झाली आहे. या क्षणी तर मी केवळ हिंदूंचाच विचार करतो आहे. मुसलमान तरुण मृत्यूबद्दल अगदी बेदरकार आहेत. ही त्यांची अद्भुत संपत्ती आहे.

"आज मी तुला सुसंबंद्ध पत्र लिहिलेले नाही. परंतु तरीही माझे जे मनोमंथन सुरू आहे त्याची काहीशी कल्पना तुला यावरून यावी म्हणून हे सर्व मी तुला लिहिले आहे.

"सोराबजी वारले हे तुला कळले असेल. ते जोहानिसबर्ग येथे वापरले. त्यांच्याकडून खूप अपेक्षा होत्या, परंतु त्यांचा अकस्मात मृत्यू झाला. ईश्वराची कला काही वेगळीच आहे.

खूप प्रेमासह,

तुझा, मोहन"

# (देवदास गांधींना पत्र)

देवदासला -

“उन्हाळ्यात तर गावातील जीवन भव्य वाटते, परंतु मला वाटते की पावसाळ्यात तर माझ्यासारख्या माणसाला कुठे जायचे असेल तर ते कठीण होते. घाणीबद्दलची माझी घृणा वाढत चालली आहे, कमी होऊन राहिलेली नाही. पायखाना थोडासाही खराब असला तर मी अस्वस्थ होतो. मी जंगलात जातो आणि सोबत फावडे घेऊन जातो. खोदून मग बसतो. आणि क्रिया पूर्ण झाल्यानंतर खूप माती टाकतो आणि मग जागा सोडतो. हा नियम न पाळल्यामुळे असंख्य रोग होतात आणि करोडो माशा होतात. ज्यांना घाण वगैरे गोष्टींची इतकी घृणा नसते ते गावात खूप मजेत राहत असल्याचे आढळत असते. काल रात्री दोन भजनमंडळी माझ्याकडे आल्या होत्या. दोघांजवळही ५ ते १० रुपयांची वाद्ये होती. ढोलक, टाळ, चिपळ्या आणि एकतारी तंबोरा. एवढ्या साहित्यावर त्यांनी गोड सूर उत्पन्न केले. सर्व भजन श्रीकृष्णाशी संबंधित होते. त्याने कसे द्रौपदीला चीर पुरवले, विदुराघरची भाजी खाल्ली, दुर्योधनाचे गर्वहरण केले, वगैरे. या सगळ्यांची त्यांनी इतकी मधुर रचना केली होती की त्यातील प्रेमभाव आणि भक्तिभाव स्पष्टपणे व्यक्त होत होता. इतकी अधिक कृष्णभक्ती? मला तर वाटत होते की त्यात श्रीकृष्णाच्या शौर्याचे वर्णन असेल, परोपकारी वृत्तीचे वर्णन असेल. त्याने आपल्या अगाध शक्तीने पांडवांना अनेक राज्यात विजय मिळवून दिला होता, दुष्ट कौरवांचा नाश केला आणि जनतेची हालअपेष्टांमधून सुटका केली. अशा प्रकारची गाणी म्हणून त्यांनी श्रीकृष्णाला अमर केले. त्याला दुर्योधन सारख्यांची आवश्यकता वाटली नाही. त्याला पैशाची लालूच नव्हती. परंतु सुदाम्याचे पोहे त्याला गोड वाटले. कृष्णचरित्राचे चित्रण करून कवीने आपल्या कौशल्याची परिसीमा गाठली आहे. असे चतुर नर होऊन गेले यात शंका नाही. तू संपूर्ण महाभारत संस्कृतमधून वाचावे अशी माझी इच्छा आहे. जो रस मी पिऊ शकलो नाही तो तू पी. माझा विषय ग्रामजीवनाची भव्यता होता. परंतु मी कृष्णचरित्र लिहून टाकले. काल रात्रीच्या संगितामुळे मला या कृष्णजीवनाची कल्पना आली. ते स्वाभाविक आणि गोड होते. त्यात फार जास्त गोंगाट नव्हता. ढोलक वगैरे फार हळू वाजवत होते. पोर्णिमेचा चंद्र होता. एका झाडाखाली आम्ही सर्व बसलो होतो. सर्वांचा पोषाख गावकऱ्यांसारखाच होता. प्रत्येक जण घरात जे काही फडके वा गोणपाट मिळेल ते अंथरून त्यावर बसला होता. हजर

असलेले सर्व खेडूत होते. दिवसभर मजुरी करून आले होते आणि आता इथे  निर्भेळ आनंद घेत होते. प्रभुनामाचे रसपान करत होते. त्यांतील एकाला मी म्हणालो, “भाई, तुम्ही तर खूप रसपान करत आहा !” तो म्हणाला, “काय करायचे भाई, इकडच्या तिकडच्या गप्पा मारण्याऐवजी भजनकीर्तन ऐकण्यात वेळ घालवतो.” हे लोक बारेया जातीचे आहेत. सामान्यपणे यांची गणना जंगली लोकात होते. परंतु हे मुळीच जंगली नाहीत. अशिक्षित म्हणतात, परंतु मुळीच अशिक्षित नाहीत. शिक्षित वर्गाने जर त्यांना जवळ केले आणि त्यांच्यात नव्याने रस घेतला तर ते ठरवतील ते काम हे करू शकतील असे वाटते. त्यांच्या ज्ञानाला तर सीमाच नाही. त्यांचा उपयोग करणे शिकायला पाहिजे. ठोकठाक करूनआपण जसे शस्त्रामधील दोष दूर करतो तशीच आपली अवस्था आहे. आता तर मी तुला खूप लांब पत्र लिहिले आहे. ते वाचून मणिलालला पाठवशील. असे पत्र मी परत केव्हा लिहीन माहीत नाही. सकाळची वेळ आहे. थोडी सवड आहे. विचारांनी डोके भरलेले आहे. यामुळे तुझ्याजवळ थोडे रिकामे केले. जो रस मी प्यालो तो तुसुद्धा या पत्रातून थोडाफार पिऊ शकशील. असे झाले माझ्या वारशात तुला खरोखरच भागीदार केले असे म्हणता येईल. सरकारकडे आपण जसा आपला वाटा मागतो तसेच माझ्याजवळ जे आहे त्यातील तुझा वाटा तुला देऊन मी माझी कर्तव्यातून सुटका करून घेतो आहे.

नवागाम. विनोबांचे पत्र. मराठी शिक्षक गुजरातच्या आदर्शाची बरोबरी करू शकणार नाही. महाराष्ट्रात एक शाळा काढा या अर्थाचे. त्याचे उत्तर -

## (विनोबा भावे यांना पत्र)

"तुझे विचार करण्यासारखे पत्र मिळाले.

"आदर्श तर तू लिहितोस तोच आहे. आणि हा आदर्श सिद्ध करण्याकरिता शिक्षक म्हणून गुजरातीच पाहिजे हेसुद्धा खरे आहे. परंतु त्या शिक्षकांच्या अभावी महाराष्ट्रातील शिक्षकांनी भागूच शकत नाही असे नाही. चरित्रहीन गुजराती शिक्षकांपेक्षा शीलवान मराठी शिक्षक केव्हाही चांगले. सध्या तरी माझ्या पद्धतीने शिकवणारा गुजराती शिक्षक मिळणे कठीण आहे. संस्कृत शिकवण्याकरिता तू नसतास तर एकतर ते शिक्षण थांबले असते वा परत काकांना बोलवावे लागले असते अशी दीन दशा आहे. यामुळे त्या आदर्शांकरिता तूच संस्कृत शिकवायला पाहिजे.

"महाराष्ट्रात येण्याची माझी तीव्र इच्छा आहे. परंतु अजून वेळ आली नाही. माझी पात्रता नाही. माझ्याजवळ इतके लोक नाहीत. तू, काका, मामा माझ्या संबंधात आले आहा. यात ईश्वराने कोणताही भेदभाव केलेला नाही. भाई देशपांडेंशी माझा संबंध, भारत सेवक समाजावरील माझी श्रद्धा, महाराष्ट्राबद्दलचा माझा मोह, चंपारणमध्ये त्यांनी केलेली मदत, महाराष्ट्रातील संगीतशास्त्रज्ञांनी येणे, भाई कोतवालच्या बहिणींचा थोड्या काळासाठी झालेला प्रवेश, भाई नारायणरावची ओळख हे सर्व सुचवतात की महाराष्ट्रात मला काही विशेष करायचे आहे. परंतु

'नीपजे नर तो कोई न रहे दुःखी

शत्रु मारीने सहु मित्र राखे.

(माणूस असा जन्माला यावा की जो करणार नाही कोणत्याही जीवाला दुःखी;

शत्रुत्वाला जिंकून बनवेल जो सर्वांना मित्र.)

यामुळे माझी अशी महत्त्वाकांक्षा असूनही अखेरीस काय होते हे कोणाला माहीत?

"तुझी इच्छा लक्षात ठेवीन. तुला माझ्या सहवासात ठेवण्याची इच्छा आहे. परंतु सध्या तरी हे शक्य नाही असे वाटते. तू आश्रमवासीच आहेस यात काहीही शंका नाही.

- बापू"

# (देवदास गांधींना पत्र)

“आजचे माझे पत्र तुला फार दुःखद बातमी देणारे आहे. जोहानिसबर्गमध्ये भाई सोराबजी (सोराबजी शाहपूरजी अडाजणिया दक्षिण आफ्रिकेतील लढ्यात पहिल्या पंक्तीतील सत्याग्रही होते. त्यांनी लढ्याचा फार सखोल अभ्यास केला होता. यामुळे लढ्यात ते फार चांगले सल्लागार झाले. गांधीजी म्हणतात की त्यांच्या सल्ल्यात नेहमीच दृढता, विवेक उदारता, शांती वगैरे गुण आढळत असत. लढा संपल्यानंतर सत्याग्रहीमधील कोणाला तरी विलायतेत बॅरिस्टर होण्याकरिता डॉ. प्राणजीवन महेतांनी शिष्यवृत्ती दिली होती. यामागील उद्देश शिकून आल्यानंतर त्या व्यक्तीने गांधीजींची जागा घेऊन समाजाची सेवा करावी हा होता. सोराबजी दक्षिण आफ्रिकेत गोखलेजींच्या वेळी गेले होते. सोराबजी विलायतमधून शिकून आले आणि गोखलेजींचे मनसुद्धा त्यांनी जिंकले. गोखलेजींनी त्यांना सर्व्हंट्स ऑफ सोसाटीत सामील होण्याचा आग्रहसुद्धा केला. बॅरिस्टर होऊन आल्यानंतर त्यांनी दक्षिण आफ्रिकेत वकिली सुरू केली. त्यांचा साधेपणा, सरळपणा आणि मिळूनमिसळून राहण्याची वृत्ती या सर्व गुणांमुळे ते समाजात प्रिय झाले. अशा होतकरू व्यक्तीच्या मृत्यूचा गांधीजींना धक्का लागणे स्वाभाविक होते.) थोड्या परंतु गंभीर आजाराने वारले आहेत. मरणाच्या भीतीतून तर आपण थोडेफार मुक्त झालो आहो. असे जरी असले तरी असा मृत्यू सलल्याशिवाय राहू शकत नाही. भाई सोराबजी दक्षिण आफ्रिकेत ढाल होऊन राहतील आणि माझे काम करतील अशी आशा होती. आज ती नष्ट झाली आहे. दक्षिण आफ्रिकेत दुःखाचे वातावरण आहे हे तिथून आलेल्या तारांवरून स्पष्ट दिसते. ईश्वरेच्छा काही वेगळीच होती. कर्माचा नाश होत नसतो, परंतु प्रकृती कडूगोड फळ देतच असते. ज्याला आपण अकस्मात समजतो ते खरे म्हणजे अकस्मात नसते. आपल्याला ते अकस्मात जाणवत असते. कोणीही आपल्या मरणाच्या आधी मरत नसतो. आणि त्या गोष्टीचे अंतिम रुपांतर एकमेव मृत्यूच असतो. हा पूर्णपणे विनाश नाही. आत्मा तर अमर आहे. रुपांतर शरीराचे होत असते. स्थिती बदलते, आत्मा बदलत नाही. हे सर्व ज्ञान शांतता देण्याकरिता पुरेसे आहे. हे ज्ञान आपण पचवू शकलो की नाही हे अशाच वेळी कळत असते. सोराबजी तर अमर झाले. त्यांनी सर्व काम आपल्या देशाची कीर्ती उज्ज्वल होईल असेच केले आहे. आपल्याला आपले कर्तव्य दाखवून ते गेले आहेत. ज्याच्या मृत्यूने आपल्याला आपल्या कर्तव्याची जाणीव करून दिली जाते त्याचा वियोग सलत नाही.”

२५-७-१९१८

# (रावजीभाई पटेल यांना पत्र)

“भाई श्री रावजीभाई,

“तुमचे पत्र मिळाले. तुम्हाला जे काही विचारायचे असेल ते विचारा. याचे लेखी उत्तर देईन. मग यावर विचार करता येईल. तुम्ही मणिभाई आणि त्यांच्या मुलांबद्दलचे कर्तव्य पूर्णपणे पार पाडत असाल अशी माझी पूर्ण मान्यता आहे. असे असल्यामुळेच तुमचा वियोग सहन होतो. त्यांच्याबरोबर राहून तुम्ही तुमचे आणि त्यांचेही नुकसान कराल असे मला वाटते. तुम्ही सोजित्रात राहून मणिभाई म्हणतात तसे करून विमलाची स्वार्थपूर्ती करू शकणार नाही. परंतु तुम्ही बाहेर राहून तपश्चर्या करून तुमचे चरित्र जर दृढ केले तर सर्वांचे हित करू शकाल. मणिभाईसमोर तर तुमचा सत्याग्रहच आहे. आणि सत्याग्रह कधी खोटा असूनच शकत नाही. मणिभाईबद्दलचा तुमचा वैरभाव तुम्हाला बाहेर राहू देत नाही, परंतु त्यांच्याबद्दलचे प्रेम तुम्हाला बाहेर राहू देईल. मीराबाईने प्रेमाच्या दृष्टीने आपल्या पतीचा त्याग केला होता. बुद्धाने प्रेमभावाने आपल्या सतीसारख्या पत्नीचा आणि आपल्या प्रिय आईवडिलांचा त्याग केला होता. जे तुम्हाला लागू पडते तेच शिवाभाईंना लागू पडते. कल्पना करा की तुम्ही सहीसलामत बाहेर पडला तर त्यामुळे तुमची अवस्था बदलेल काय? तेव्हा तुम्ही तुमच्या मुलाबाळाची काळजी घेण्याकरिता अधिक सक्षम होणार नाही काय? युद्धात जाण्याचा हेतू मौजमजा करण्याचा नसून आपल्या आणि आपल्या देशाच्या व्यथा दूर करण्याचा आहे. यामुळे झालेली चूकसुद्धा नुकसान करणार नाही.

“मला भेटून तुम्हाला शांती मिळणे असंभव आहे. जोपर्यंत आपण आपल्या मनातील मळ दूर करत असतो तोपर्यंत खडखडाट तर राहणारच. आपल्याला अशांततेतच शांतता अनुभवता आली पाहिजे. लुगडे, धोतर वगैरे जेव्हा धुतो तेव्हा त्यांना दगडावर आपटावे लागते, घासावे लागते. परंतु यामुळे ते स्वच्छ होतील अशी आपल्याला खात्री वाटत असते. यामुळे आपल्याला आनंद मिळतो.

मोहनदासचे वंदेमातरम”

# (मगनलाल गांधींना पत्र)

“चि. मगनलाल.

“तुला रावजीभाई घाबरवत आहेत. रावजीभाईंना मी घाबरवले आहे. माझ्या वाक्यात नसलेला अर्थ घेतला.

“माझे आदर्श बदललेले नाहीत. हिंदुस्थानात अनेक कटू अनुभव येऊनही माझी मान्यता होती तशीच आहे. पश्चिमेकडून आपल्याला फार थोडे शिकायचे आहे. मी इथे अनुभवलेल्या भ्रष्टाचारामुळे माझ्या विचारात बदल झालेला नाही. या लढाईतसुद्धा बदल झालेला नाही. जे आहे ते स्पष्ट आहे. पश्चिमेतील सुधारणा आपण आपल्याकडे केल्या पाहिजे असे मला वाटत नाही. दारू, मांसाहार ग्रहण केला पाहिजे असेही मला वाटत नाही. स्वामीनारायण आणि वल्लभाचार्यांनी आपल्या माणूसकीचे हरण केले आहे असे वाटते. त्यांनी माणसाची रक्षणशक्ती हिरावून घेतली आहे. लोकांनी दारू, बिडी वगैरेंचा त्याग केला हे तर ठीकच आहे. परंतु हे काही आपले साध्य नव्हते. ते साधन होते. बिडी पिणारा चारित्र्यवान असेल तर तो सत्संगाला पात्र असेल. आणि जन्मापासून बिडीला स्पर्शही न करणारा जर व्यभिचारी असेल तर तो सत्संगाला अपात्र आहे. स्वामीनारायण आणि वल्लभांनी शिकवलेले प्रेम निष्फळ बडबड आहे. त्यातून शुद्ध प्रेम निर्माण होऊ शकत नाही. अहिंसेच्या शुद्ध लक्षणांचा तर त्यांनी विचारसुद्धा केलेला नाही. अहिंसा चित्तवृतीचा निरोध आहे. आजूबाजूच्या माणसांशी आपले संबंध कसे आहेत, त्यांच्याशी कसे संबंध असावे यासंबंधीचा तिचा प्रयोग आहे. याचा तर त्यांच्या लेखनात दुरूनही वास येत नाही. त्यांचा जन्म आपल्या विषम काळात झाला आहे आणि त्यातून ते मुक्त होऊ शकलेले नाहीत. त्यांचा गुजरातवर फार जास्त प्रभाव आहे. तुकाराम आणि रामदासांचा तसा प्रभाव नाही. तुकारामाच्या अभंगांत आणि रामदासांच्या श्लोकांत पुरुषार्थ फार आहे. तेसुद्धा वैष्णव होते. वैष्णव संप्रदाय आणि वल्लभ स्वामीनारायणांची शिकवण यांची भेसळ करू नये. वैष्मव संप्रदाय फार जुने तत्त्व आहे. हिंसेत अहिंसा असते हे मला आधी कळले नव्हते. ते आता कळले आहे. हा मोठा फेरबदल आहे. दारूने मस्त झालेल्या माणसाला अडवण्याचे कर्तव्य मला पुरेसे कळले नव्हते. वेदनांनी तडफडणाऱ्या कुत्र्याला मारून टाकण्याचे कर्तव्य मला कळले नव्हते. वेड लागलेल्या कुत्र्याला मारण्याचे कर्तव्य मला समजले नव्हते. या सर्व हिंसेत अहिंसा आहे. हिंसा हा शरीराचा गुण आहे.

विषयवृत्तीचा त्याग हे ब्रह्मचर्य आहे. तसेच आपण आपल्या मुलाचे पालन तो नपुंसक व्हावा अशा प्रकारे करत नसतो. अत्यंत वीर्यवान असूनही तो आपल्या विषयेंद्रियांवर नियंत्रण ठेवत असेल तर तो ब्रह्मचारी. ते खरे ब्रह्मचर्य. तसेच आपला मुलगा शरीराने बलवान असलाच पाहिजे. तो हिंसक वृत्तीचा त्याग करू शकत नसेल तर त्याला हिंसा करू द्यावी, लढण्याच्या शक्तीचा उपयोग करू द्यावा. असे करून त्याला अहिंसक करता येऊ शकते. अहिंसेचा उपदेश क्षत्रियांनी केला आहे.

"पूर्वपश्चिममधील अंतर मी दाखवले आहे. हेच असे अंतर आहे आहे की जे फार भारी आहे. पश्चिमेची सुधारणा स्वच्छंदी आहे, आपली संयमी. आपण हिंसा करू तर ती अनिवार्य असेल आणि तिचा उद्देश लोकसंग्रह असेल. पश्चिम स्वच्छंदीपणाने हिंसा करते. मी पार्लमेंट वगैरेंमध्ये जो भाग घेतो ते काही नवीन काम नाही. ते जुनेच काम आहे आणि संस्थेचे नियम कायम ठेवण्यापुरते आहे. मानेग्यू साहेबांवरील लेख वाचशील तर तुला हे कळेल. मला त्यात रस वाटूच शकत नाही. परंतु माझे आदर्श त्यात भाग घेण्याकरिता मला प्रेरीत करतात. जेव्हा माझ्या आदर्शाचा भंग होण्याची वेळ आली तेव्हा मी तिच्यापासून वेगळे होण्याचा विचार केला.

"मला वाटते की मी जे इतके लिहिले आहे त्यातून तुला उत्तर मिळाले असेल. मी जेव्हा एक दिवस येतो तेव्हा विशेष खुलासा होऊ शकत नाही. यामुळे लिहून मोकळा झालो. तिथे तू मला विचारू शकशील आणि अजून काही शंका असतील तर त्याही विचारू शकशील. सध्या तर माझा मुक्काम नवागाममध्येच आहे. आज इथून निघायचा विचार होता, परंतु वेळेवर निघू शकलो नाही.

बापूचे आशीर्वाद"

२९-७-१९१८

# (किशोरीलाल मशरूवाला यांना पत्र)

"भाई किशोरीलाल,

"हे पत्र तुझ्याकरिता तसेच नरहरीकरिता आहे. दक्षिणी गुजरातीविषयीचा नारायणरावांचा आरोप जितका वास्तविक आणि उच्च दर्जाचा असेल तितकेच तो दूर करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. हे अहिंसेचे श्रेत्र आहे. पहिले पाऊल तर हे आहे की या आरोपात कितपत तथ्य आहे हा प्रश्न तुम्ही सर्वांनी मिळून स्वतःलाच विचारला पाहिजे. गुजराती भगिनींनी दक्षिणेकडील महाराष्ट्रीय भगिनींच्या खूप भेटीगाठी घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मुलांमध्ये अशा प्रकारची भेदभावाची भावना मुळीच असायला नको. हे सर्वाधिक आवश्यक आहे. माझ्या लिहिण्याकडे फार वाढवून पाहण्यात येऊ नये. परंतु त्यावर क्षणभर विचार करावा आणि जे काही करता येत असेल ते करावे या दृष्टीने मी हे लिहिले आहे.

"प्रार्थनेसंबंधीचे इतके विचार तुझ्यासमोर ठेवू इच्छितो. आपल्या दुर्बलतेचा विचार आपण इतका ताणायला नको की आपल्याला कोणतेही कार्य करताच येणार नाही. आपल्या शक्तीप्रमाणे आपण शिकवत राहिलो पाहिजे आणि त्यात ज्या काही उणिवा असतील त्या प्रयत्नपूर्वक दूर करत राहायला पाहिजे. मला संस्कृत शिकवावे लागले तर मीच या दुर्बलतेचा उपयोग कसा करीन? मला माहीत आहे की माझे संस्कृत संस्कृत नाहीच. परंतु दुसरा कोणी शिकवणारा नसेल तर मी संस्कृत शिकवायलाच पाहिजे आणि दिवसेंदिवस माझ्या उणिवा दूर करत राहिलो पाहिजे. अशाच प्रकारे पारनेल हाऊस ऑफ कॉमन्सच्या नियमाच्या माहितीत सर्वांत पुढे निघून गेला होता. तू तुझ्या दुर्बलतेचाच विचार करून कोणतेही काम करण्याकरिता घाबरत असतोस. तू जर समोर आलेले काम जितकी काही शक्ती असेल तितक्यानेच निपटवून टाकत जाशील तर मला किती तरी अधिक आनंद होणार नाही काय?

"मुलांमध्ये शक्ती कशी येईल? ते स्वतःचा बचावही करतील आणि उद्धटही होणार नाहीत हे पाहिजे. हे शिकवणे कठीण आहे. आजपर्यंत मुलांना आपण हेच शिकवत होतो की कोणी मारत असेल तर मार खा. आता हे शिक्षण देता येईल? मुलांवर या शिक्षणाचा काय परिणाम होईल? यामुळे मुले

क्षमावान होतील की भित्रे? माझी अक्कल काम करत नाही. तू तुझी बुद्धी चालव, नाही पळव. अहिंसेचे हे जे नवीन स्वरूप दिसते आहे त्याने मी तर अनेक प्रश्नांच्या जाळ्यात फसलो आहे. सर्व समस्यांची एकच गुरुकिल्ली सापडली नाही. ती मिळवली पाहिजे. आपल्या मुलाला कोणी थापड मारली तर त्याला दोन दोन थापडा मारायला शिकवायचे? की त्याने दुर्बलाची थापड खावी, परंतु कोणी सबळ मारायला आला तर त्याला ठोशास ठोसा द्यावा आणि त्यामुळे जर काही मार खावा लागत असेल तर तो सहन करावा? एखादा सरकारी अधिकारी मुलांना मारत असेल तर त्याचे काय करावे? मुलांना जेव्हा कोणी मारतो तेव्हा त्यांनी त्याचा मार सहन करून आपला सल्ला घ्यावा की त्या वेळी त्याच्या मनात जसा विचार येईल तसे त्याने वागावे? की परिणाम सहन करायचे? 'कोणी जर एक थापड मारत असेल तर त्याच्या थापडा सहन करा' हा राजमार्ग सोडल्यामुळे वरील संकटे येत असतात. यांतील पहिला मार्ग सरळ आहे परंतु तोच बरोबर आहे काय? की संकटपूर्ण मार्गाचे अनुसरण करण्यानेच खरा मार्ग हाती लागणार आहे? हिमालय चढायचा प्रयत्न अनेक दिशांनी सुरू आहे, काही वेळा तर तो मार्ग उलट मार्गानेही जात असतो. परंतु जाणकार मार्गदर्शक चढू पाहणाला टोकावर घेऊन जाईल. हिमालयावर सरळ मार्गाने जाताच येऊ शकत नाही. तसाच अहिंसेचा मार्गही बिकट आहे काय? ईश्वरच या भुलभुलैय्येतून वाचवील."

# (मिली ग्रॅहम पोलाक यांना पत्र)

“प्रिय मिली,

“सोराबजी गेले. या दुःखद बातमीची तार आताच जोहानिसबर्गहून आली. या मृत्यूत काही विशेष नाही. सोराबजीसारखे अनेक आधी वारले आहेत आणि आताही मरत आहेत. परंतु आपल्या सगळ्यांच्या जीवनात सोराबजींनी असे काही महत्त्वाचे स्थान मिळवले होते की त्याच्या अकस्मात मृत्यूने आमच्यावर कठोर आघात झाला आहे. आत्म्याचा नाश होत नसतो आणि कर्मांचे सातत्य सुरूच असते अशा श्रद्धेनेच आपण आपल्या जीवनातील काम करत गेल्यानेच आपल्याला समाधान मिळत असते. घटनांचा हेतू आणि त्यांचे औचित्य आपल्याला कळत नसते. यामुळे त्या काही अनुचित वा हेतुविरहित नसतात.

# (व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री याना पत्र)

“भाई श्री शास्त्रियार,

“भाई ठाकोर आताच आले. ते म्हणतात की तुम्ही परत आजारी पडला आहा. तुम्हाला अशा डॉक्टरची आवश्यकता आहे की जो निर्दयी होऊन तुम्हाला संपूर्ण उपवास करायला लावील आणि जलोपचार करील. परंतु आजकाल तर प्रयोग करणाऱ्या धंदेवाईक डॉक्टरांकडून तर हत्येशिवाय दुसरी कोणतीही अपेक्षा करता येत नाही. जसजसा तुमच्या आजाराविषयी मी ऐकतो तसतशी एखाद्या डॉक्टरला गोळी घालावी अशी मला इच्छा होते. परंतु माझी अहिंसा आडवी येते. तुमच्याकरिता आणि हिंदुस्थानकरिता भाग्याची गोष्ट आहे की संसदेत जाण्याची माझी कधीही महत्त्वाकांक्षा नव्हती आणि नाही. नाही तर मी असा कायदा केला असता की जो माणूस असा वारंवार आजारी पडतो तो संसदेत जाण्याकरिता  पात्र नाही.

“यासोबत पोलाकची तार जोडतो आहे. तिचा पूर्ण अर्थ मला कळला नाही. परंतु मी असे समजतो की देश घटनात्मक सुधारणा फेटाळून लावील अशी कोणतीही भीती नाही.“

३१-७-१९१८

# (मणिलाल गांधींना पत्र)

“चि. मणिलाल,

“एवढ्यात तुझे पत्र नाही. यासोबत भाई सॅमचे पत्र पाठवत आहे. तू वाचावे आणि त्यावर विचार करावा म्हणून ते पाठवत आहे. त्याच्यात कितीही जरी दोष असले तरी तुझ्या मनात त्याचा फारच राग आणि द्वेषभावना आहे अशी मला भीती वाटते. तुला जरी तुझे हक्क मिळवावेसे वाटत असेल तरी तू विनय सोडायला नको होता. तू व्यवस्थेची मागणी करतानाही त्याचा राग करण्यापासून वाचू शकला असता. त्यांनी पैसा गोळा केलेला नाही, ना चोरला आहे. देवीबहेनने काय गुन्हा केला आहे? श्री वेस्ट आणि श्री सॅम यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाचे नुकसान सहन केले आहे ही फार मोठी गोष्ट आहे. मला तर असे वाटते की माझ्यावरील राग तू त्यांच्यावर काढतो आहेस. तू त्यांच्याकडे जातसुद्धा नाही. असे मुळीच करायला नको. मला वाटते की तू त्यांची माफी मागायला पाहिजे. परंतु तुला योग्य वाटत असेल तरच तू असे कर, मला योग्य वाटते म्हणून नाही. तू स्वतंत्र आहेस असे समजून जर काम करशील तरच मला बरे वाटेल. माझ्याबद्दल राग धरायला मी अनेक कारणे दिली आहेत असे मी समजतो. याकरिता तू मला क्षमा कर. तुला मी खूप भटकवले आणि यामुळे तुझ्या नियमित शिक्षणात खोळंबा झाला. परंतु हे अनिवार्य होते असे तुला वाटत असेल तरच तू मला माफ करशील. माझे संपूर्ण जीवन मी स्वतःला ओळखण्यात घालवले आहे. माझे काय कर्तव्य आहे याचा शोध घेण्यात घालवले आहे. माझे काम शोभण्यासारखे झाले आहे कारण मला योग्य वाटले तेच मी केले आहे. असे केल्याने मी अनेक चुकांपासून वाचलो आहे. परंतु वरवर विचार केला तर लौकिक दृष्टीने मी तुझे नुकसान केले आहे. माझ्या प्रयोगाचा त्रास जसा मला सहन करावा लागला आहे तसा बालाही सहन करावा लागला आहे. बाला हे कळले. यामुळे तिने जितके मिळवले तितके दुसरी कोणतीही स्त्री मिळवू शकली नाही. हे तुला अजून पूर्णपणे उमगलेले नाही. यामुळे तुझ्या मनात राग आहे. मी अजूनही म्हणेन की तुम्हा सर्व भावांची मी जितकी सेवा केली असेल तितकी दुसऱ्या कोणत्याही बापाने केली नसेल. मी तुम्हांला माझ्या धार्मिक अनुभवांचे भागीदार केले. याहून विशेष कोण करू शकेल? इतर आईवडिलांप्रमाणे मी तुमचे जीवन लौकिक ठेवून मी माझे जीवन वेगळे घडवू शकलो असतो. तसे केले असते तर

आपल्यामध्ये कोणताही दुवा राहिला नसता आणि गोकीबहेन ज्याप्रमाणे नावापुरती बहीण आहे त्याप्रमाणे आपलीही अवस्था झाली असती. माझ्याकडून दुसरे काहीही होऊ शकत नव्हते कारण मी सत्याच्या शोधात मी तर जिथे आहे तिथेच राहिलो असतो आणि तुम्ही त्या मार्गाच्या बाहेर. हे तुमच्याकरिता चांगले झाले नसते. या गोष्टीचा तू धीर ठेवून विचार करशील तर तुझा माझ्यावरील राग जाऊ शकेल. तू पाहतास की हरिलाल आणि माझ्यामध्ये दुरावा निर्माण झाला आहे. हरिलालचे जीवन माझ्यापेक्षा वेगळे झाले आहे. पितापुत्राचे संबंध तेव्हाच असतात जेव्हा त्या दोघांचेही जीवन एक झालेले असते आणि दोघेही एकमेकांवर आधारलेले असतात. हरिलालच्या जीवनात मी रस घेऊ शकत नाही, हरिलाल माझ्या जीवनात रस घेऊ शकत नाही. हा हरिलालचा दोष नाही. त्याची बुद्धी त्याच्या कर्माचे अनुसरण करते आहे. माझा हरिलालवर राग नाही. परंतु आम्हा दोघांच्याही संबंधाची साखळी तुटली, पितापुत्राच्या जीवनातील माधुर्य गेले. संसारात असे अनेकदा होत असते. परंतु धर्माचा शोध घेत असताना हरिलालला मी माझ्याकडे ओढू शकलो नाही ही गोष्ट माझ्याकरिता आगळीवेगळी आहे. हरिलालने आपल्या मूर्खपणामुळे त्याच्या मालकाचे जवळपास ३०,००० गमावले आहेत. सेठला त्याने असे पत्र लिहिले आहे की जे त्याच्याकरिता लज्जास्पद आहे. आणि आता तो नोकरी गमावून बसला आहे. माझा मुलगा असल्यामुळे तो तुरुंगात नाही. तू माझ्या जीवनात राहिलेला आहेस पण असमाधानी आहेस. त्यातून निघूही शकत नाहीस, आणि त्यात राहणेही परवडत नाही. त्यात राहणे तर मुळीच शक्य होऊन राहिलेले नाही. यामुळे तू शांत राहू शकत नाहीस. कोणत्याही प्रकारे तुझे जर समाधान झाले तर तू शांत होशील. मी जाणीवपूर्क तुझ्या स्वार्थाला धक्का लावला नाही. जे केले ते तुझे हित समजून केले. इतके माझ्यावरील राग दूर करण्याकरिता पुरेसे नाही काय? माझ्या लेखनाबद्दल तर माझा राग मुळीच करायला नको. तू तुझे विचार मला सांगितले आहेत आणि मला ते आवडले. आता तुझ्या हाती तर सर्व व्यवस्था आलेली असेल."

**[(पुढील भाग महादेवभाईंच्या डायरीत नाही, परंतु संपूर्ण गांधी वांङ्‌मयमध्ये हा भाग दिलेला आसून हे पत्र गांधीजींच्या हस्ताक्षरात आहे आणि सुशीला गांधींनी ते दिले आहे असा आधार दिलेला आहे)**

**लष्करभरती करण्यासंबंधातील माझी पुस्तिका तू पाहशील. आश्रमातून पाच लोकांना निवडले आहे आणि इतरही उत्सुक आहेत. परंतु त्यांना सध्याच घेता येऊ शकत नाही. निवडलेल्या व्यक्तींमध्ये रामनंदन, सुरेंद्र, ठाकोरलाल, नानूभाई आणि रावजीभाई यांचा समावेश आहे. मी तर आहेच. थोड्या दिवसांनंतर इथे भऱतीकेंद्र उघडेल असा अंदाज आहे. देवदास मद्रासमध्ये हिंदीचे काम करत नसता तर तोही आला असता. त्याची खूप इच्छा आहे. हरिलाललानेही सुचीत केले होते परंतु**

**तो कशाचा येतो? तू तिथे महत्त्वाचे काम करत असल्यामुळे तुलाही म्हणता येऊ शकत नाही. बाकी राहिला रामदास. त्याची इच्छा असेल तर तोही येऊ शकतो. रामदासला नोकऱ्या बदलाव्या लागत आहेत हे चांगले वाटत नाही. तू चौकशी करत राहा.**

**निर्मला या वेळी आश्रमात आहे. स्वतःहोऊन आली आहे. किती दिवस राहील माहीत नाही. ती बहुतांश गोकी बहेनची सेवा करील. आदरणीय खुशालभाई आश्रमात राहायला आले आहेत. ते आणि छगनलाल वेगवेगळे राहतात. छगनलाल राष्ट्रीय शाळेत लागलेला आहे.**

**आता इमारती तयार झालेल्या आहेत. त्यांच्यातही राहता येऊ शकते. पुस्तकालय अजून तयार व्हायचे आहे.**

**भाई सोराबजींचा स्वर्गवास फार बोचतो. ते गेल्यामुळे परत पाढे पाठ करावे लागतील.]**

बापूचे आशीर्वाद”

## (कस्तुरबा गांधींना पत्र)

“प्रिय कस्तुर,

“तुझे दुःख मला दुःखी करते. स्त्रियांना घेऊन गेलो असतो तर मी तुला घेऊन गेलो असतो. मी बाहेर जातो याबद्दल डोके फिरवून घेण्याचे काय कारण? आपण वियोगात सुख मानणे शिकायला पाहिजे. ईश्वरेच्छा असेल तर परत भेटू आणि राहू. आश्रमात किती तरी चांगली कामे आहेत. त्यात गुंतून राहशील तर तू आनंदात राहू शकशील.”

# (एडा वेस्ट यांना पत्र)

“प्रिय देवी (दक्षिण आफ्रिकेतील श्री वेस्टची बहीण),

“सोराबजींचा मृत्यू किती करुण घटना म्हणावी? सोराबजी आता तिथे आलेले आहेत असे समजून दक्षिण आफ्रिकेबद्दल मी फार निश्चिंत झालेलो होतो आणि मी फार आशावान होतो. परंतु माझ्या सर्व आशांची धूळधाण झाली.

“लष्करभरतीचे मी जे काम सुरू केले आहे त्याबद्दल तुला काय वाटते ते मला माहीत नाही. मी माझा बहुतेक वेळ याच कामाला देतो आहे. माझ्या युक्तिवादाचा सार असा आहे - हिंदुस्थान मारण्याची शक्ती गमावून बसला आहे. मारण्याच्या शक्तीचा स्वेच्छापूर्वक त्याग करण्याआधी त्याने मारणे शिकायला पाहिजे. शक्य आहे की एकदा ही शक्ती मिळवल्यानंतर तो हिचा कधीही त्याग करणार नाही. जर तो असे करील तर तो पश्चिमेसारखा अथवा सर्व आधुनिक स्वतंत्र देशांसारखा वा त्याहूनही जास्त वाईट देश होईल. आज तर तो या दोनमधून एकही नाही. प्राचीन हिंदुस्थानला युद्धकला माहीत होती. हिंसा करण्याची त्याच्यात शक्ती होती. परंतु त्याने ही शक्ती जास्तीत जास्त कमी केली आणि जगाला शिकवले की मारण्यापेक्षा न मारणे हे जास्त चांगले आहे. आज तर पाहतो आहे की बहुतेक माणसांची इच्छा मारण्याची आहे, परंतु तसे करण्याची त्यांना भीती वाटते वा तसे करण्याची त्यांच्यात शक्ती नाही. याचा परिणाम काहीही होवो परंतु मला स्पष्टपणे वाटते की हिंदुस्थानने मारण्याची शक्ती परत मिळवलीच पाहिजे. यामुळे हिंदुस्थानमध्ये जर फार रक्तपात होणार असेल तर त्यातूनही त्याला जावेच लागेल. आजची परिस्थिती असह्य आहे.

तुझा भाई”

अलीभाईंसंबंधी त्यांचे वकील श्री घाटे यांचे पत्र. मातीजींना भेटून जाण्याचे निमंत्रण. त्याचे उत्तर-

६-८-१९१८

# (श्री घाटे वकील यांना पत्र)

(अलीबंधूंचे वकील)

“प्रिय भाई घाटे,

“माताजी तसेच तुमच्या मित्रांना खात्रीपूर्वक सांगा की (अलीबंधूंची) सुटका व्हावी म्हणून मी लवकरच एकही उपाय शिल्लक ठेवणार नाही. मौलाना महमदअलींच्या आजाराबद्दल मला माहीत आहे. या कारणामुळेसुद्धा त्यांची सुटका लवकर व्हावी असे मला वाटते. परंतु आपला स्वाभिमान कायम राहणार नाही इतके अर्ज करणे मला पसंत नाही.

“मी असे समजतो की विल्यम व्हिंसेंटबरोबर पाठवलेल्या पत्रव्यवहाराच्या नकला तुम्हाला मिळाल्या असतील. सर विल्यम त्यांची चौकशी करण्याकरिता न्यायाधिकरण नेमण्यासंबंधी बोलत आहेत. त्याचा बहिष्कार करावा अशी माझी इच्छा नाही. संपूर्ण देशात एक मोठे आंदोलन करण्याआधी सरकारला उचित आणि शोभनीय पद्धतीने आपले पाऊल मागे घेण्याची मी पूर्ण संधी देऊ इच्छितो. मी आशा करतो की जर अलीभाईंना बोलावण्यात आले तर ते लवादासमोर हजर होतील. परंतु हे आंदोलन उभारणे जर आवश्यकच असेल ते उभारण्यापूर्वी मी मातीजींची निश्चितच भेट घेईन. मी असे समजतो की त्यांचीसुद्धा अशीच इच्छा असेल. . . .

सेवक,

मो. क. गांधी”

धुळ्यात भरलेल्या एका सभेत काँग्रेसमध्ये फाटाफूट होणे घातक होईल असा ठराव मंजूर करण्यात आला होता. त्यासंबंधात देवच्या भावाचे पत्र आले. त्याचे उत्तर -

## (श्री देव यांना पत्र)

"भाई श्री देव,

"फाटाफुटीच्या भीतीविषयीचे तुमचे पत्र मला मिळाले. मला निश्चितपणे वाटते की आपल्याला अस्वाभाविक आणि यांत्रिक ऐक्याची किंमत आवश्यकतेपेक्षा फार जास्त द्यावी लागेल. आपल्यामध्ये जर दोन वेगवेगळे पक्ष स्पष्टपणे असतील आणि राजकारणात त्यांची वेगवेगळी मते असतील तर त्यांचे दोन वेगवेगळे व्यासपीठ का नसावे? त्यांनी वेगवेगळे होऊन काम का करू नये?

"देशाच्या मान्यतेकरिता प्रत्येक पक्ष देशासमोर आपापले धोरण ठेवू शकतो. लोकांना त्याचा लाभच होईल. एक पक्ष दुसऱ्या पक्षापेक्षा बलवान झाला तर त्यामुळे स्वराज्याचे आगमन लांबणार नाही. दोन्ही पक्ष दुर्बल आणि धोरणाच्या बाबतीत अनिश्चित असतील तर आपल्याला सहन करावे लागेल आणि वाकावे लागेल. उपाय तर हा आहे की दोन्ही पक्ष बलवान आणि दृढ असावे. आज तर आपल्यामध्ये खूप अहंकार भरला आहे. यामुळे लोकांमध्ये भ्रष्टाचार शिरतो. वेगवेगळ्या पक्षात कशीतरी तडजोड केल्यामुळे कोणीही फसू शकत नाही.

सेवक,

मो.क. गांधी

# (संतोक गांधींना पत्र)

"चि. संतोक,

"रुखी वारंवार आजारी कशी काय पडते? जन्मापासूनच ती अशक्त आहे हे मला माहीत आहे. परंतु याचा अर्थ असा होतो काय की तिची सतत काळजी घ्यावी लागेल? मुलांचे पालनपोषण करणे ही मोठी कला आहे. त्यांच्या आईवडिलांना कठीण व्रतांचे पालन करावे लागत असते. हे सर्व करूनही मुलांना तू चांगले करावे अशी माझी इच्छा आहे. हा दोष हळद नसल्यामुळे निर्माण झाला आहे असे जर तुला वाटत असेल तर तू हळदीचा उपयोग करू शकते हे मी तुला सांगितलेच आहे. वाटल्यास रुखीकरिता हळद टाकून वेगळा स्वयंपाक तयार कर. असे केल्याने जर तिचे शरीर चांगले होऊ शकत असेल तर आपण इतरांकरिताही हळद सुरू करू शकू. मला स्वतःला अशी भीती वाटते की रुखी जोपर्यंत आजारी पडत नाही तोपर्यंत ती पचत नाही असे पदार्थ खाते. ते तिच्या पोटात पडून राहतात आणि त्यांचे ओझे होते. मग ती आजारी पडते. ती चांगली होईल तेव्हा तू तिला मुख्यत्वेकरून दूध, भात, आणि भाजीवर ठेवशील तर ती चांगली होण्याची शक्यता आहे. सध्या किती तरी दिवसांपासून तिला पोळी पचत नाही असे मला वाटते. तुला जो अनुभव आला असेल तो खरा. काही करून तिचे शऱीर वज्रासारखे व्हावे हीच माझी इच्छा आहे.

बापूचे आशीर्वाद"

# (रामनंदनला पत्र)

“तुझे पत्र मिळाले. तुझे खाते ठेवून मी तुला जाण्याचा खर्च देऊ शकतो. भरतीत जाण्याच्या वेळी मी तो अधिकाऱ्यांकडून घेईन. जोपर्यंत भरतीकरिता जायचे नाही तोपर्यंत मी तुला परत बोलावू शकणार नाही. भाई श्यामजींबद्दल काय गोष्ट झाली होती ती तू ऐकली असशील. तुझा प्रवासखर्च आश्रमावर टाकणे अनुचित आहे. तुझी आकांक्षा मी समजू शकतो. मला वाटते की जो गृहस्थ(धर्मा)शी संबंध ठेवतो त्याला आश्रमात घ्यायलाच नको. तुला मनाई करणे योग्य वाटत नाही, तुला खर्च देणेसुद्धा योग्य वाटत नाही. मी अशा धर्मसंकटात आहे. तूच मला सोडवू शकतोस. वरील पद्धतीने जर जायचे असेल तर हे पत्र फूलचंदभाईंना दाखव. ते तुला जाण्याचा खर्च देतील.”

# (डॉ. प्राणजीवन महेता यांना पत्र)

“भाईश्री प्राणजीवन,

“तुमचा ‘देवी’च्या लसीवरील लेख आजच वाचायला सुरुवात केली. अजून थोडा शिल्लक आहे. खूप लांब आहे. आणि एकच गोष्ट वारंवार येत असते. खरे सांगायचे तर हा लेख संदर्भाबाहेर जाऊ शकतो. असे असतानाही लेखावर तुम्ही खूप मेहनत घेतली आहे आणि लेख मूल्यवान आहे. देवीप्रतिबंधक लस टोचून घेण्याच्या अंधविश्वासपूर्ण आग्रहामुळे किती मुलांचे बलिदान दिले जात असेल याबद्दलच्या विचाराची मांडणी तुम्ही फार चांगली केली आहे. परंतु तुम्ही अजून चांगले उदाहरण देऊ शकला असता. देवीच्या रोगाची एक देवी मेली आहे आणि तिची जागा दुसऱ्या देवीने घेतली आहे. तुमचा लेख पुस्तकाच्या रूपात छापून तो प्रत्येक नगरपालीकेत वाटण्याची आवश्यकता आहे. तुम्ही जर हा लेख लोकोपयोगी होण्याकरिता संक्षिप्त करत असाल आणि यासोबत दुसरा लेख द्याल आणि ते छापण्याची जर मला परवानगी द्याल तर त्याचा प्रचार करण्याची माझी इच्छा आहे. वा तुम्ही संक्षिप्त लेख गुजरातीत लिहाल तर त्याचासुद्धा छापून प्रचार करता येईल. मी हा लेख आज वा उद्या वाचून पूर्ण करीन. परंतु माझ्या मते हा प्रस्ताव लवकर केला पाहिजे. यामुळे मी हे लिहितो आहे.

“मला अजून थोड्या नकला पाठवा. मी त्या काही डॉक्टरांना अभिप्रायाकरिता पाठवीन.

मोहनदासचे वंदेमातरम”

# (सी. एफ. ॲन्ड्र्यूज यांना पत्र)

“प्रिय चार्ली,

“या वेळी मी चांगला आहे आणि तुझ्यावर प्रकृतीसंबधीच्या इश्वराच्या आणि माणसाच्या कायद्याचा भंग केल्याचा आरोप करणार नाही. परंतु यात काही शंका नाही की तुझ्याकरिता एका नियामकाची आवश्यकता आहे. साध्या शब्दात सांगायचे तर एका परिचारिकेची गरज आहे. हे पद मी घ्यावे अशी माझी फार इच्छा आहे. तुझ्यावर प्रेम करणारा आणि त्याचबरोबर डॉक्टरच्या आदेशाचे पालन करायला लावणारा कोणी परिचारक जर तुला मिळत नसेल तर तुला एका अशा पत्नीची आवश्यकता आहे की जी तुला बरोबर खायला लावील आणि तुझी काळजी घेईल. तू पोटावर पट्टा बांधल्याशिवाय बाहेर जायला नको. तसेच आपल्या सख्यासोयऱ्यांच्या आजाराबद्दलच्या बातमीनेही तू फार काळजी करायला नको. परंतु आता कदाचित लग्नाकरिता तुला फार उशीर झालेला असेल. मी स्वतः तुझी शुश्रूषा करू शकत नाही आणि तुझी परिचर्याही करू शकत नाही. यामुळे माझ्याकरिता केवळ चिडायचेच शिल्लक राहते. परंतु असे करण्याऐवजी तुझ्याकरिता प्रार्थना करणेच चांगले राहील. आणि हेच करतो आहे. ईश्वराची जर इच्छा असेल तर त्याने तुला चांगला ठेवावे आणि आणि तुला इतके शक्तिशाली करावे की तू त्याचे गुणगान करू शकील.

“मी सुरू केलेल्या कामात, जणू काय हे माझ्याकरिता स्वाभाविक आहे, मी माझा सर्व वेळ यातच घालवतो आहे. याच्या आड येणारे मुद्दे मला त्रास तर देतातच, परंतु आता मी यांचा विचार करणे सोडून दिले आहे. याचे तात्काळ निराकरण केले पाहिजे असेही मला वाटत नाही. माझ्या जीवनाची अशा प्रकारे घडणच झालेली नाही. कोणत्या कामाचा काय परिणाम होईल हे पाहून काम सुरू करण्याची माझी पद्धतच नाही. मी तर जे काम समोर येते ते घाबरत घाबरत आणि थरथरत हाती घेत असतो. मी तर चंपारण, खेडा, अहमदाबाद वा १९१४ साली जेव्हा युद्ध सुरू झाले तेव्हा माझी सेवा मी बिनशर्त देऊ केली होती. तेव्हाही मी हा हिशेब केला नव्हता. मी तर असे समजत असतो की मी जे काही करतो आहे ते ईश्वराच्या आज्ञेमुळेच करतो आहे, इतर कोणत्याही कारणाने नाही. मला भेडसावणाऱ्या घनघोर अधःकारात हीच गोष्ट मला मार्ग दाखवत असते.

"गुरुदेवांनी (रविंद्रनाथ ठाकूर) मुलांना शिकवण्याचे काम स्वतःच्या हाती घेतले आहे हे ऐकून माझे अंतःकरण आनंदाने उचंबळून आले आहे. ते अमेरिकेला जात आहेत यापेक्षा माझ्या मते हे काम फार महत्त्वाचे आहे. तूसुद्धा त्यांच्या या कामात सहभागी झाला आहेस याचा मला आनंद होतो. ईश्वर तुम्हा दोघांनाही धडधाकट ठेवो.

"मोठ्या दादांना (देवेंद्रनाथ ठाकूर) माझे प्रणाम सांगशील. प्रेम.

मोहन"

७-८-१९१८

प्रत्येकाच्या प्रकृतीबद्दल बापू किती तरी काळजी घेत होते आणि त्यांना मार्गदर्शन करत होते. यासंबंधा एवढ्यात अनेक पत्रे लिहिली होती. त्यातीलच हे एक पत्र -

## (हनमंतरावांना पत्र)

"प्रिय हनमंतराव,

"तुमच्या प्रकृतीविषयी कळून वाईट वाटले. आपल्यात मोठ्यात मोठी उणीव आपल्या शरीराकरिता आवश्यक असलेला व्यायाम करत नाही ही आहे. शरीराला आवश्यक असलेल्या व्यायामापेक्षा जर आपण कमी व्यायाम घेतला तर आपला आहारही त्या प्रमाणात कमी असला पाहिजे. त्यात नायट्रोजन आणि स्निग्ध पदार्थ मुळीच असू नये. गहू, फळे, चोखा आणि भाजीपाला यांचा आहार घेतला तर प्रकृती चांगली राहील. इतक्याने जर पूर्ण शक्ती मिळत नसेल तर त्यात डाळी आणि शेंगदाण्याची भर टाकावी. तुम्ही बंगलोर वा निलगिरीला जाऊ शकत नाही काय? जर जाऊ शकत असाल तर तेथील स्फूर्तिदायक हवामानामुळे तुमच्यात तरतरी आणि उत्साहाचा संचार होईल. स्नानाच्या उपचारामुळे आणि मानसिक आरामामुळे तुम्हाला थोडा लाभ होईल, परंतु एवढ्याने तुमची जी मुळात प्रकृती होती तशी परत होणार नाही. तुम्ही तर आधी दुरुस्त व्हायला पाहिजे.

"देवदास म्हणतो की तुम्ही त्याच्यावर फार प्रेम करता. तुम्ही जाल तर तुमची उणीव त्याला सलेल. तुमच्याबरोबर इतर पुस्तके नेण्यापेक्षा हिंदीचे पुस्तकाला पहिली पसंती द्या.

"तेम्ही जेव्हाकेव्हा हवापालटाकरिता जाल तेव्हा मला लिहाल.

सेवक,

मो. क. गांधी

शंकरलालची अनुसयाबहेनना तार. पिटीट काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती. गांधीजींना आणायलाच पाहिजे. तिचे उत्तर -

## (शंकरराव बँकर यांना पत्र)

“पूज्य ताईला तुमची तार वाचली. तुम्ही त्यांची इतकी काळजी करू नये असे मला वाटते. तुमचे प्रेम हे उद्गार काढायला लावत आहे. माझे येणे म्हणा की न येणे देशहिताकरिता असेल. मी रागाने न येणे हे तर शक्यच नाही. माझ्या न येण्यामागे अधिक सेवेचेच कारण असेल. असे असले तरी माझे येणे आवश्यक असेल तर मला सांगा.

मोहनदासचे वंदेमातरम”

९-८-१९१८

कालपासून मणिलाल नभुभाईंच्या पुस्तकांची पाने चाळत आहेत. ‘कांता’ पुस्तक वाचून टाकले. म्हणाले, कल्पकता आहे, परंतु इंग्रजी भावना फार जास्त आहे. जिथेतिथे इंग्रजीचा वास येतो. तरलाचे पात्र इंग्रजी नाटकातील पात्रासारखे आहे. वाचताना ‘रिचर्ड द थर्ड’ वा ‘मॅकबेथ’ (शेक्सपिअरची नाटके) नाटकांची आठवण येते. ‘रिचर्ड द थर्ड’ची जास्त.

आठ तारखेच्या रात्री पाऊण तास फिरले. सोबत दुर्गा होती. विनोदात म्हणाले, “म्हातारा आहे म्हणून तू माझ्याबरोबरीने चालू शकतेस. आफ्रिकेत होतो तेव्हा मी वेगात चालत असे. तरीही इंग्रज पोरी माझ्याशी स्पर्धा करायच्या..” अजून थोडा वेळ चालल्यानंतर विचारले, “. . . ची वृत्ती कशी वाटते?” याच्या उत्तरात पौणेक तास गोष्टी झाल्या. थोडक्यात याला म्हणावे विशेष ‘दासत्व’. प्रेसिडेंट क्रुगर आणि कोट्सच्या गोष्टीकडे वळले. क्रुगरच्या घरासमोरून जात असताना लात खाल्ली ती गोष्ट सांगितली. यावरून क्रुगरच्या गोष्टी निघाल्या. क्रुगरबद्दल फार चांगले मत. क्रुगरशी बिस्मार्कची काय तुलना? बिस्मार्क तर मिथ्याभिमान आणि क्रूरतेचा पुतळा होता. त्याला तर पृथ्वीवर साम्राज्य उभारायचं होतं. पण क्रुगर बिचारा – त्याला तर फक्त आपलं लहानसं घरटं सांभाळायचं होतं. आणि त्याकरिता त्याने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्याच्या जिद्दीत आणि निर्भयतेत मुळीच उणीव नव्हती. परंतु याचबरोबर ही जिद्द सौम्य आहे असे दिसून येते." ग्लॅडस्टनच्या प्रतिमेशी तुलना. “ग्लॅडस्टनमध्ये पोलादी दृढसंकल्प जाणवत नाही. आणि क्रुगर किती साधा होता! त्याची भूक आपल्या घरापुरती. आपण चालतो तसाच

धूळभरला रस्ता. अनाथाश्रमासारखे मोडकळीला आलेले तुटकेफुटके घर. त्याने आपले संपूर्ण आयुष्य विलक्षण निर्भयपणे घालवले. आणि बिस्मार्क? त्याचा त्रास किती मोठा होता? आणि क्रुगरजवळ तर लहानात लहान माणूसही जाऊ शकत होता. परंतु त्याच्या जीवनाचे शेवटचे पाऊल मला समजू शकले नाही. तो इंग्लंडमध्ये मदत मागायला गेला ते."

नंतर दुसऱ्याच गोष्टीकडे वळले. "मला तुम्हाला अनेकदा सांगायचे होते, परंतु सांगितले नाही. तुम्ही तुमच्या पत्रात 'महात्मा' हे नाव लिहू नका. यात माझा कोणताही अपमान नाही. ब्रिजकिशोरनेसुद्धा त्याच्या पत्रात 'महात्माजी' लिहू नये. इतरांना जरी 'गांधीजी' लिहिलेले कृत्रिम वाटत असेल तर वाटू द्या. यातच आपला विनम्रपणा राहतो. इतरांना तर हे चांगले वाटूच शकत नाही."

दयाळजीभाई आले. आज सकाळी बारा मैल चालले. शस्त्रबंदी काढून टाकण्याकरिता व्हाईसरायना पत्र लिहिले. त्यातील मुख्य मुद्दे -

"माझ्या मनात जे विचार येतात ते मी व्हाईसरायजवळून लपवायला नको. मी जेव्हा लाचार स्त्रीपुरुषांना भेटतो तेव्हा मला जाणवते की ते पूर्वी मुळील लष्करी जोशाशिवाय नव्हते. मग माझ्या मनात विचार येतो की ही अवस्था पाहून उच्चपदस्थ इंग्रजांनी 'असे का' हे आपल्या अंतःकरणाला विचारले पाहिजे."

फूलचंदभाईंचे महत्त्वाचे पत्र आले. खूप खर्च होत असल्याबद्दल जोरदार टीका. शाळा खात्यात शाळावगैरेंनी पुष्कळ खर्च खाल्ला आहे आणि फळ काही जाणवत नाही. आश्रमातील लोकसुद्धा कोणताही संयम न ठेवता जीवन व्यतीत करतात. शिक्षक, प्रौढ चारित्र्यशील नाहीत. वगैरे, वगैरे. काम खूप आटोक्यात घेतले पाहिजे.

याचे उत्तर –

## (फूलचंद शाह यांना पत्र)

"तुमच्या टीकेची मी वाट पाहत होतो. इतक्या वेळाने तुम्ही लिहिले हे बरोबर केले नाही. तुमची टीका बऱ्याच प्रमाणात उचित आहे. हा आश्रम मी काढला नसता तर काहीच झाले नसते. त्यात चांगल्या लोकांनी यावे असा मोह होता. चांगल्या माणसातसुद्धा दोष भरलेले असतात हे आश्रमात झालेल्या चुकांवरून सिद्ध होते. याची साक्ष आश्रमातील उणिवा आहेत. मगनलाल नसता तर आश्रमाची स्थापनाच झाली नसती. मगनलालची उणीव ही माझ्या उणीवेची साक्ष आहे. मीसुद्धा शिकतो आहे. हे मी समजूनउमजून म्हणतो आहे. आश्रमातील प्रयोग माझे रंजनही आहेत आणि प्रयोगही आहेत. प्रयोगात धावपळ होतच असते. त्यातूनच मूळ वस्तू मिळत असते. ती तिचा शोध घेणारालाच मिळत असते. तुमच्यासारखे जेव्हा प्राणवायूचे काम करतील तेव्हा कार्बोनिक ॲसिड गॅस निघून जाईल. हा वायू नेहमीच उत्पन्न होत असतो. त्याला प्राणवायू शुद्ध करत असतो. जे पिंडी तेच ब्रह्मांडी. तुम्ही मला जे सांगितले ते जर तुम्ही मगनलालला, शिक्षकांना सांगितले असते तर काम मार्गी लागले असते. तुम्ही घाबरटपणा करू नये अशी इच्छा आहे. तुमची टीका जर तुमचा निर्धार वाढवण्याकरिता आणि आश्रमात पसरलेली घाण दूर करण्याकरिता तुम्हाला कटिबद्ध करील तर ती फार फलद्रूप झाली असे म्हणता येईल. तुमच्या टीकेने तुम्ही निराश होऊ नये.

"आता आपण ग्रंथालय तयार करणार नाही. शाळेची इमारत तयार व्हायला अजून वेळ आहे. छात्रालय तयार करून माझा थांबायचा विचार आहे. आपल्याला राहता येईल इतके बांधकाम आपण शाळेच्या इमारतीतच करून टाकू. शिक्षकांवर खर्च केल्याशिवाय भागू शकत नाही असे दिसते. नवीन शिक्षक गोळा करायचे नाहीत. एक वा दोन शिक्षक अजून लागतील असे वाटते. विणकाम आणि शेतीचे काम शाळेतच शिकवले जाईल. कारण आपल्याला बांधकाम करायचे होते. अधिक जमीन घेण्याला

माझी हरकत नाही. मला आपले विणकाम बरोबर वाटत नाही. त्याचा हिशेब दिव्यासारखा स्पष्ट असला पाहिजे. त्याची देखरेख व्हायलाच पाहिजे. आणि याच कारणामुळे मगनलालला बाहेर काढले आहे.

“आपण धोतर आणि साड्यांचे विणकाम सुरू केले पाहिजे. या गोष्टींची आवश्यकता आहे. जो वर्ग या विकत घेतो त्यांत गरीबही आहेत. इतरांना सौंदर्यदृष्टीचा त्याग करायला लावणे शक्य नाही. आपण खादी विसरायला नको. माझी आकांक्षा तर खादीच्या प्रत्येक विणकराला आपल्यात सामावून घेण्याची आहे. या प्रयत्नात काही पैसा खर्च होईल हे खरे आहे.

“मी तुम्हाला सविस्तर पत्र लिहिले आहे. तुम्ही एक बाजू मांडली आहे. मी शक्य तितकी दुसरी बाजू मांडली आहे. दोन्ही खऱ्या आहेत. गुणांचे तुलना एखादा वजनदार पुरुषच करू शकतो. ती चारित्र्याची शक्ती तुमच्यात यावी अशी इच्छा आहे.

“काही चूक झाली असेल तर तिथेच आपण तिच्यात सुधारणा केली पाहिजे. असे मी दक्षिण आफ्रिकेत केले, चंपारणमध्ये केले आणि इथेही आवश्यकता पडली तर करेन. इतके लिहून टाकले आहे, परंतु चर्चा करायची राहीलीच आहे.

मोहनदासचे वंदेमातरम”

श्री देवधरना -

## (जी. के. देवधर यांना पत्र)

“कुमारी विंटरबॉटम या सुसंस्कारित वृद्ध महिला आहेत. अनेक नैतिक आंदोलनात त्या पुढाकार घेऊन भाग घेत असतात. परंतु पोलाक तुमचे मार्गदर्शक मित्र आणि सल्लागार होतील. राजकारणात असलेल्या ज्या इंग्रजांना मी ओळखतो त्या सगळ्यांजवळ ते तुम्हाला घेऊन जातील. कदाचित ते विसरून जातील म्हणून बनार्डो होम नावाची विविध उद्योग शिकवणारी शाळा आणि अशाच इतर संस्था पाहायला घेऊन जाण्याची त्यांना आधीच आठवण करून द्या. काही संस्था तर इतक्या जवळ आहेत की त्या तुम्ही स्वतःही पाहू शकाल. परंतु तुमच्याजवळ समीक्षकाची दृष्टी असली पाहिजे. चमकते ते सर्वच सोने नसते.

“तुमचा प्रवास सुखासमाधानाचा होवो आणि तुम्ही काहीही त्रास न होता परत या. मी आशा करतो की श्रीमती देवधरांची प्रकृती आता चांगली झाली असेल.

सेवक,

मो. क. गांधी”

एकाने आहारासंबंधी पत्र लिहिले होते. त्याचे विस्तृत उत्तर -

## (आहारासंबंधी चौकशी करणाऱ्या एका मित्राला पत्र)

"तुम्ही जर माझे पुस्तक परत वाचाल तर त्यातून तुम्हाला कोणती फळे खावी यासारख्या अनेक प्रश्नांचे उत्तर मिळेल.

"तेल इत्यादींचा प्रयोग कठीण गोष्ट आहे. माझा अनुभव असा आहे की अर्ध्या अंसाहून जास्त तेल घ्यायला नको. या देशात ऑलिव्ह ऑईल मिळू शकत नाही. याच्या ठिकाणी तिळाचे तेल चांगले आहे. परंतु ते ऑलिव्ह सारखे निर्दोष नाही. खजूर आणि शेंगदाणे पचायला कठीण आहेत. परंतु त्यांचाच आहार केला तर त्याचा त्रास होत नाही. बदाम फार कमी खायला पाहिजे. दुधापासून तयार झालेल्या अनेक गोष्टी खाण्याकरिता चांगल्या नाहीत. पेरू वगैरेंबरोबर शेंगदाणे खाल्ल्याने चागल्या प्रकारे भागू शकते. बदामाची जागा शेंगदाणे घेऊ शकत नाही. गहू एक प्रकारचे फळच आहे, माझ्या पुस्तकात फळ या शब्दाचा पारिभाषिक प्रयोग केला आहे आणि त्याची स्पष्ट व्याख्या केली आहे. माझ्या पुस्तकात फळाऐवजी भाज्यांबद्दल काही लिहिलेले असेल. परंतु हिंदुस्थानात भाज्या आवश्यक आहेत असे दिसते. द्विदल धान्ये म्हणजे डाळी पचायला जड आहेत. अधिक अनुभव घेतल्यानंतर माझ्या असे लक्षात आले आहे की हिंदुस्थानात सगळ्यात चांगला आहार गहू आणि भाज्या आहे. ज्याला जास्त मेहनत करावी लागते तो हवे तर द्विदल धान्याचा उपयोग करू शकतो. धार्मिक दृष्टीने दुधासंबंधी मी दिलेले मत कायम आहे. परंतु शारीरिक दृष्टीने आणि हिंदुस्थानच्या परिस्थितीत दुधाचा त्याग अशक्य आहे असे वाटते. मी अनेक वर्षांपासून दुधाचा त्याग केला आहे आणि आजन्म न खाण्याची प्रतिज्ञा आहे. परंतु इतरांना दूध सोडण्याचा सल्ला मी तोपर्यंत देऊ शकत नाही जोपर्यंत दुधासारखीच गुणवान वस्तू माझ्या हाती येत नाही. मी आशा करत होतो की तीळ आणि शेंगदाण्यांनी आपला निर्वाह होऊ शकेल, परंतु दुधाच्या तुलनेत त्यात काही थोड्या तृटी आहेत.

"तुम्हाला माझा हा सल्ला आहे. तुमचे शरीर जर निरोगी असेल तर गहू, तांदूळ, दूध इत्यादी वस्तूंचा सामान्य उपयोग करा. एकादशीच्या दिवशी फारसा त्रास न घेता जी फळे मिळतील ती घ्या. त्यांच्यावर निर्वाह करा. शरीर अस्वस्थ असताना नेहमीच उपवास करा आणि नेहमी मोठ्या पहाटे कमीतकमी दहा मैल चालण्याचा व्यायाम करा. एका प्रश्नाचे उत्तर राहिले. तेलाऐवजी तिळ वगैरे चावून

खाणे एकदम चांगले राहील. स्निग्ध पदार्थ असलेली वस्तू दौनतीन तोळ्यापेक्षा जास्त घेतल्याने हानी होऊ शकते. मिठाचा पूर्ण त्याग करण्याऐवजी वर्षातून दोनतीन महिने मीठ वर्ज्य करणे उचित वाटते. तीन दिवसांपासून मीठ खाण्याचे परिणाम मी माझ्या शरीरावर पाहतो आहे. महिना दोन महिन्यानंतर तुम्ही जर पत्र लिहाल तर मी पूर्ण माहिती देऊ शकेन.

तुमचा,

मोहनदास”

यानंतर म्हणाले की माझ्या पुस्तकाची पुरवणी छापावी लागेल असे वाटते. माझे पुस्तकसुद्धा सर्वांनी वाचावे अशी माझी इच्छा नाही. लोक याचाही उलटा उपयोग करत आहेत.

थोरो इमर्सनपेक्षा श्रेष्ठ आहे. काही ठिकाणी त्याचे लेखन द्व्यर्थी असते. थोरोच्या वाक्यावाक्यात आग भरलेली आहे. कायद्यासंबंधी आपले कर्तव्य (ऑन द ड्युटी ऑफ सिव्हिल डिसओबिडियन्स) या पुस्तकाचे दररोज पारायण केले पाहिजे. लाख वेळा जरी वाचले तरी याचा कंटाळा येणार नाही.

१०-८-१९१८

सुरेंद्रनाथ बॅनर्जींची तार. "वर्तमान राजकीय परिस्थिती पाहता काँग्रेसच्या विशेष सभेत उपस्थित राहावे की तिच्यापासून वेगळे राहावे असे विशेषेकरून विचारले आणि तात्कालीन निर्णय घेण्याकरिता वेगवेगळ्या प्रांतांच्या पुढाऱ्यांच्या खाजगी सभेत १६ ऑगस्टला येण्याकरिता तुम्हाला आमंत्रण."

त्यांना तार केली आणि पुढील पत्र लिहिले -

## (सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांना पत्र)

"प्रिय भाई बॅनर्जी,

"इथे मी लष्करभरतीच्या कामात अडकलेलो आहे. तुम्ही अहमदाबादला पाठवलेली तार मला मिळाली. कलकत्त्याला जाण्यायेण्यालाच मला एक आठवडा लागेल. मला जर माझे काम समाधानपूर्वक करायचे असेल तर मी इथे एक आठवडा गैरहजर राहणे माझ्याकरिता अशक्य आहे. आणि सध्या तर मी इथे अनुपस्थित राहूच शकत नाही. नुकताच मला सरकारडून कळले आहे की गुजरातमध्ये लष्करी प्रशिक्षण केंद्र उघडण्याची आणि गुजरातची एक लष्करी तुकडी तयार करण्याची माझी सूचना सरकारने मान्य केली आहे. मी हे काम सोडू शकत नाही हे तुम्हीही मान्य कराल.

"परंतु मी जरी येऊ शकलो असतो तरी मी काही मदत करू शकलो असतो असे मला वाटत नाही. या संबंधात माझे अतिशय दृढ आणि कदाचित वेगळेच विचार आहेत. त्यांच्याशी बहुतेक पुढारी सहमत होणार नाहीत. माझे दृढ मत आहे की इतर सर्व काम सोडून आपण लष्करभरतीच्याच कामाला लागून राहिलो तर अधिक नाही तर एक वर्षाच्या आता आपल्याला जबाबदार शासनव्यवस्था मिळेल. याशिवाय आपल्या पूर्णपणे अज्ञानी देशबांधवांना विदेशी लष्करात भरती होऊ देण्याऐवजी होमरूलवाल्यांचेच एक लष्कर उभारले जाईल. ते देशाकरिता लढाईत जातील कारण ते आनंदाने सैनिक झालेले असतील. याचबरोबर माझी अशीही मान्यता आहे की आपण मॉनेग्यू-चेम्सफर्ड योजनेबद्दलचे आपले मत स्पष्ट शब्दांत व्यक्त केले पाहिजे. आपण आपल्या किमान मागण्या निश्चित करून काहीही करून त्यांची अंमलबजावणी व्हावी म्हणून प्रयत्न केला पाहिजे. माझे मत आहे की ही

योजना मुळात चांगली आहे. परंतु तिच्यात बरेच बदल करण्याची आवश्यकता आहे. यासंबंधात सर्वसंमत निर्णय घेण्यात अडचण जाऊ नये. माझी इच्छा आहे की देशात असा एक पक्ष उभारण्यात आला पाहिजे की ज्याचे ध्येय या दोन गोष्टी साध्य करणेच असेल - एकीकडे युद्ध चालवण्याकरिता सरकारला मदत करायची आणि दुसरीकडे राष्ट्रीय मागण्यांवर अंमल करायला लावायचा.

“मला वाटत नाही की सध्याच्या अतिशय अडचणींच्या परिस्थितीत जहाल पक्ष म्हणवणाऱ्रात आणि मवाळ पक्ष म्हणवणारात थोडीफार देवघेव करून तात्पुरती तडजोड होण्यावर आपले समाधान होऊ शकेल. प्रत्येक मंडळाने वा पक्षाने आपल्या धोरणाची स्पष्टपणे व्याख्या केली पाहिजे अशी माझी इच्छा आहे. मग स्वाभाविकपणे जो कोणता पक्ष आपल्या आंतरिक गुणांनी आणि अविरत आंदोलन करून देशात बलवान होईल तो हाऊस ऑफ कॉमन्ससमोर आपला हक्क सादर करू शकेल.

सेवक,

मो. क. गांधी”

हे लिहिल्यानंतर मी विचारले - हीच गोष्ट याच शब्दांत तुम्ही सर्वांसमोर सागाल काय? यावर बापू म्हणाले - हो, मी तर असेही म्हणत असतो की इतके कराल तर मवाळ पक्ष काँग्रेसमध्ये आला नाही तरी फिकीर करू नये.

११-८-१९१८

प्रा. जेवन्स यांची ‘हिंदुस्थानचा युद्धात सहभाग’संबंधीची नोंद. त्यांनी मिठावरील कर वाढवण्याची सूचना केली. ऐक्य व्हावे अशी सूचना. यावर बापू म्हणाले, “हो, मी तर असेही म्हणेन की इतके केले तर जो मवाळ पक्ष काँग्रेसमध्ये यायला तयार नाही त्याचीसुद्धा पर्वा केली नाही ” याचे उत्तर-

## (प्रा. जेवन्स यांना पत्र)

“प्रिय प्राध्यापक जेवन्स,

“तुमची नोंद वाचली. एकंदरीत मला ती आवडली. सरकारला जितक्या लोकांची गरज असेल तितके लोक आम्ही त्यांना मिळवून दिले पाहिजे. परंतु असे सरकारी अधिकाऱ्यांद्वारे नाही तर ‘होमरूल’द्वारे झाले पाहिजे. आम्ही जर असे करू शकलो तर होमरूल - स्वराज्य आमच्या दाराशी असेल.

“तुम्ही निधीसंबंधी जे विचार व्यक्त केले आहेत त्यांच्याशी मी सहमत नाही. इंग्लंड आणि हिंदुस्थानची तुलना होऊच शकत नाही. इंग्लंड साधनसंपन्न आहे, हिंदुस्थान कंगाल. या लढाईत थोड्या लोकांनी पैसा मिळवलाही असेल, परंतु सर्वसामान्य जनतेचे काय? खेडा आणि चंपारण येथील लोकांच्या मी खूप निकटच्या संपर्कात आलो आहे. त्यांच्याजवळ काहीही नाही. खेडात सरकारच्या जुलमी महसुलपद्धतीमुळे जे लोक एके काळी सुखसंपन्न होते त्यांचे आता हालही पाहवत नाही. चंपारणमध्ये तर नीळवाल्यांनी लोकांच्या रक्ताचेच शोषण केले आहे. तुम्ही मिठावरील कर वाढवण्याची सूचना करता तेव्हा माझे शरीर थरथर कापू लागते. असे केले तर लोकांची काय अवस्था होईल हे जर तुम्हाला कळले असते तर तुम्हीच म्हणाल की, ‘दुसरे काहीही करा, परंतु हा कर गेलाच पाहिजे.’ हा कर फार जास्त आहे आणि म्हणून तो त्रासदायक आहे असे नाही, परंतु मिठाच्या एकाधिकारामुळे मिठाची किंमत कृत्रिमरित्या वाढली आहे. गरीब लोकांना वाजवी किंमतीत मीठ मिळणे फार कठीण झाले आहे. त्यांना तर हवापाण्याइतकीच मिठाची गरज असते.

“ही नोंद प्रकाशित करण्यासंबंधी माझे मत आहे की ती मुळीच प्रकाशित करू नये. सुधारकांचा सरकारवर विश्वास राहिलेला नाही. त्यांना वाटते की अजूनही (सरकार) लोकांशी व्यवहार करताना

सरकार प्रामाणिक नाही. ही एक विचित्र घटना आहे, आमचा तुमच्यावर विश्वास नाही आणि तरीही तुम्हाला आमची गरज नाही. यावरून स्पष्ट होते की लोकांवर जो अन्याय होतो आहे याची तुम्हांला जाणीव आहे. असे असले तरी त्यावरील उपाययोजना करण्याची तुमच्यात मुळीच शक्ती नाही. राष्ट्र गुलामगिरीत जखडले गेलेले आहे. इंग्रजांनी जाणीवपूर्वक असे करायचे ठरवले नसेलही, परंतु त्यांचा जरी असा हेतू असता तरी ते यापेक्षा जास्त करू शकले नसते. मी जो इंग्लंडला बिलगून आहे त्याचे कारण इतकेच आहे की इंग्लंड मुळात वाईट नाही असा माझा विश्वास आहे. याशिवाय माझे असेसुद्धा मत आहे की हिंदुस्थान जगाला आपला संदेश इंग्लंडच्या माध्यमातून अजून चांगला देऊ शकेल. दुसरीकडे हिंदुस्थानला निष्क्रिय करण्याचे इंग्लंडचे कृत्य, आमची गुलामगिरी आणि आम्हांला बिलकूल भाग न घेऊ देणारे तुमचे लष्करी धोरण आणि हिंदुस्थानची संपत्ती आणि कला इंग्रजांच्या व्यापारी लोभाने वेदीवर चढवून हिंदुस्थानला करायला लावण्यत आलेले बलिदान या गोष्टींचा मी इतका धिक्कार करतो की माझ्यात जर मुळातील श्रद्धा नसती तर मी केव्हाचाच बंडखोर झालो असतो.

"माझी इच्छा तुम्हांला लांब पत्र लिहिण्याची नव्हती. परंतु माझी लेखणी थाबू शकली नाही.

सेवक,

मो. क. गांधी"

१२-८-१९१८

हार्निमनने मानवदया स्वागतसमितीचे अध्यक्ष होण्याची विनंती करणाऱ्या पत्रात लिहिले होते की कोणत्याही कारणाकरिता तुम्ही नाही म्हणू नये म्हणून हे पत्र लिहितो आहे. त्याचे उत्तर -

## (बी. जी. हार्निमन यांना पत्र)

“तुमचे आज्ञापत्र मिळाले. हे जरी ८ तारखेला लिहिलेले असेल तरी मला हे कालच मिळाले. मला वाटते की या अतिशय तणावाच्या परिस्थितीत टपालखात्याची अशी दिरंगाई आपण निभवून घ्यायलाच पाहिजे. माझ्या डोक्यात खरोखरच लष्करभरतीचे हे वेड शिरले आहे. मी दुसरे काही करत नाही, दुसरा कोणताही विचार करत नाही, इतर काही बोलत नाही. यामुळे लष्करभरतीशिवाय इतर कशाचेही अध्यक्षपद घेणे मला योग्य वाटत नाही. तुम्ही मला माफ करा.

सेवक,

मो. क. गांधी”

हिंदू स्त्रीमंडळाच्या सचिव बहेन रसिकमणीकडून वार्षिक समारंभाचे आणि दादाभाईच्या जयंतीचे अध्यक्षपद भूषवण्याची बाना निमंत्रण देण्यात आले होते. त्याचे उत्तर. कुमारी डोरोथी एरुंडेलनाही एकदा असेच उत्तर दिले होते.

## (रसिकमणींना पत्र)

"माझ्या धर्मपत्नीला तुम्ही लिहिलेले पत्र मी कालच वाचू शकलो. यामुळे तुम्हाला उत्तर लिहिण्यात थोडा वेळ होतो आहे. माफ कराल. आम्ही दोघाही स्वतंत्र आहो आणि समान अधिकारांचा उपभोग घेत असतो. असे असले तरी व्यवस्था म्हणून आम्ही आमचे क्षेत्र वेगवेगळे ठेवले आहेत. याशिवाय आम्ही जेव्हा लग्न केले तेव्हा माझ्या धर्मपत्नीला अक्षरज्ञानही नव्हते.खूप मेहनतीने तिला थोडे देऊ शकलो. परंतु अनेक कारणांनी समाधान व्हावे इतके तिला देऊ शकलो नाही. यामुळे तुमच्या विनंतीचा स्वीकार करू शकत नाही. ती स्वतःचे भाषण तयार करू शकत नाही. तुमच्या कार्याबद्दल तिला काहीही माहिती नाही. आणि हे तिला तोंडी सांगूनही मी समजावू शकत नाही. यामुळे नाइलाजाने आम्हा दोघांना तुमची माफी मागावी लागले आहे.

मोहनदासचे वंदेमातरम"

# (फूलचंद शाह यांना पत्र)

“भाईश्री फूलचंद,

“काल आपली महत्त्वाची चर्चा झाली, आणि एक जरी माणूस चिकाटीने आश्रमाविषयीच्या माझ्या सूचना अंमलात आणील तर तुम्ही जी आश्रमाची परिस्थिती अपेक्षिता, आणि जी योग्य आहे, त्या परिस्थीत आपण लवकरच पोहोचू शकू. सध्या तरी असे व्यक्ती तुम्हीच आहा.

“मी काल पाऊणेसहा वाजताच्या दरम्यान दीडशहाणपणा करून आरोग्याच्या किल्लीचे साहित्य गोळा केले. पाऊणेसहा वाजता मी थरथरत उपवास सोडला आणि हे महादुःख गोळा केले. खाण्यातसुद्धा मर्यादा ठेवली नाही आणि तांदुळाची लापशी खाल्ली. याऐवजी मी जर केवळ भाजीचे पाणी प्यालो असतो तर ही दुःखद परिस्थिती आली नसती. आज माझ्यात उठायची वा चालायचीही शक्ती नाही. कसे तरी घसरत पायखान्यात जावे लागते. आणि तिथे अशी काही चक्कर आणि ओकारी येऊ लागली की किंचाळायची इच्छा होऊ लागली. इतके सगळे दुःख सहन कारावे लागत असूनही मनातून मी खुश आहे. (माझ्या चुकीची) लगेच झालेल्या शिक्षेचे पूर्ण चित्र माझ्यासमोर उभे राहिले. मला खात्री होती की पाऊणेसहा वाजता माझ्या वेदना कमी होतील. त्या वेळी मी चुकून जेवलो. त्याची शिक्षा म्हणून माला चोवीस तास त्रास होत राहिला. परंतु चोवीस तासांची शिक्षा ही काही खूप कठोर शिक्षा नव्हती. यामुळे मला काळजी करायची गरज नव्हती. मी असे समजतो की उद्या माझा त्रास पूर्णपणे निघून जाईल, आणि तीनचार दिवस मी काळजी घेतली तर मी पूर्वीसारखा स्वस्थ होऊन जाईन.

मोहनदासचे वंदेमातरम”

१७-८-१९१८

सोमवार ते शनिवार भयंकर आजार. सतत मुरडा. शनिवारी थोडा आराम वाटला. 'अजूनही लष्करभरतीचे काम सुरू' असे 'टाईम्स ऑफ इंडियात' आले. हे ऐकून पत्रे लिहवून घ्यायला सुरुवात केली. व्हाईसरायला लांब तार. राज्यपालाच्या स्वीय सचिवाला पत्र, जिल्हाधिकाऱ्याला पत्र आणि इतर पत्रे.

## (देवदास गांधींना पत्र)

"चि. देवदास,

"आज प्रकृती बरीच चांगली आहे असे म्हणता येईल. अजून खाटेवरच आहे. फार त्रास सहन करावा लागला. यात किंचितही अतिशयोक्ती नाही. गुन्ह्याच्या प्रमाणात शिक्षा झाली आहे. माझी काळजी मुळीच करू नको. माझ्या शुश्रूषेत मुळीच हयगय झाली नाही. एक गोष्ट करायला दहा उत्सुक लोक बसलेले असतात. माझ्यावर सर्व आपले असीम प्रेम ओतत असतात. इतके तर स्वाभाविकपणे तुला आठवत असेलच. परंतु तुझ्या अनुपस्थितीची उणीव मला जाणवली नाही. तू तेथील कामात गुंतून राहणे हीच माझी सेवा आहे. आणि याशिवाय कोणीही माणूस आजाराच्या कारणानेसुद्धा आपल्या कर्तव्याच्या जागेवरून हालणार नाही या नियमाचे आपण समजून उमजून पालन केले पाहिजे. इतका दारूण त्रास असतानाही मी माझ्या आत्म्याची शांतता क्षणभरही गमावली असेल असा आभाससुद्धा मला झाला नाही. बा इथे पोहोचली आहे. आपण आशा केली पाहिजे की थोड्याच दिवसात मी पूर्वीपेक्षाही निरोगी होईन आणि अस्वाद व्रताचे अधिक चांगले पालन करणारा होईन.

बापूचे आशीर्वाद"

अध्यक्ष होण्यासंबंधीच्या पीटीटच्या अटी जमनादासने सभेत सांगितल्या नाही आणि बाहेर पडल्यानंतर कबूल केल्या. परत स्वतःचा बचाव केला. या प्रसंगाला उद्देशून त्यांना पत्र. एक वेळा बोलला होता. आता ही गोष्ट आपल्याकरिता लाजीरवाणी आहे.

# (जमनादास द्वारकादास यांना पत्र)

“भाईश्री जमनादास,

“माझी तीव्र इच्छा असूनही अतिशय व्याधीमुळे मी तुला याआधी पत्र लिहू शकलो नाही. परंतु आज मात्र मी लिहवून घ्यायलाच पाहिजे. अजूनही मी अंथरुणावर आहे. परंतु लिहिण्याच्या परिस्थितीत पोहोचलो आहे. माझी प्रकृती निश्चितच सुधारण्याच्या मार्गावर आहे. यामुळे काळजीचे कारण नाही.

तुझे प्रकरण ऐकून मन अतिशय दुःखी झाले. हेतू शुद्ध असला तरी त्यामुळे असत्य सत्य होत नाही. जसे राजाला एक आणि चोराला चार डोळे आहेत असे म्हणतात तसेच असत्याचे अनेक मार्ग असतात. अशा अनेक मार्गाच्या जाळ्यात फसलेला पुरुष नष्ट होत असतो. आणि जर तो न्यासी असेल तर त्याला ज्यांचे रक्षण करण्याकरिता नेमलेले असते त्याचा पण तो नाश करतो. ही गोष्ट तू स्वतःच्या आणि शेकडो इतर लोकांच्या अनुभवांवरून पाहू शकतो. सत्यामुळे कोणाची हानी झाली आहे असे आजपर्यंत कधीही घडले नाही, आणि यानंतरही घडणार नाही. हा राजमार्ग तू कसा सोडू शकतो? कसा सोडला?

मोहनदासचे वंदेमातरम”

आनंदशंकरचे काळजी व्यक्त करणारे मला पत्र. औषध का घ्यायचे नाही याविषयीचा प्रश्न. त्यांनी स्वतःच उत्तर दिले -

## (आनंदशंकर ध्रुव यांना पत्र)

"भाईश्री आनंदशंकरभाई,

"माझ्याबद्दल तुम्ही जी काळजी करत आहा त्यातून तुमचे प्रेम दिसते. माझ्या स्थितीचे असे वर्णन करता येईल - मी सोमवारी आणि मंगळवारी असह्य वा त्याहून अधिक जोरदार विशेषण वापरता येईल तर तशा वेदनांनी तडफडत होतो. या दोन दिवसात मी जवळपास शुद्धीवर नव्हतो. आणि अधूनमधून खूप जोरात कण्हण्याची इच्छा होत होती. बुधवारी काही प्रमाणात शांत होतो. आणि त्यानंतर उत्तरोत्तर बरा होत गेलो. अशक्तपणा तर खूप असल्यामुळे हालचाल काय करणार? थोडे दिवस तर अंथरुणावर पडून राहावेच लागेल. परंतु अखेरीस सर्व काही चांगले होईल. असे असल्यामुळे तुम्ही उपस्थित केलेला औषधाचा प्रश्न बाजूला पडला. औषधांबद्दलचे माझे विचार समजून घ्यायचेच असतील तर एखाद्या दिवशी मी ते तुम्हाला निश्चितच समजावून सागेन. कोणताही डॉक्टर कबूल करील की मला ज्या वेदना होत होत्या त्या इतक्या कमी काळात थांबणे अशक्य होते. तुम्ही निश्चिंत व्हावे म्हणून मी ही सर्व हकिगत लिहिली आहे.

"तुमचा निर्णय मी वाचला. मजूर पावसाप्रमाणे वाट पाहत होते. आता त्यांना शांती मिळेल. मीसुद्धा याच गोष्टीची वाट पाहत होतो. मजूरांना ३५% टक्के मिळत होते. तरीही तुमच्या निर्णयाने त्यांना चांगला आधार मिळाला असता असे मी समजतो.

माझ्या दुखण्यासंबंधी मी तुम्हाला लिहायला पाहिजे. आश्रमात एक भजन अनेकदा म्हणत असतात. त्यातील एका ओळीचे मनन मी माझ्या अंथरुणात अनेकदा करत होतो. श्रीकृष्ण उद्धवाला म्हणतो -

ऊधो कर्मनकी गत न्यारी

"हे खरे आहे की आपण तर हेच गाऊ शकतो. याचे कारण अनेक गोष्टींचे आपल्याला अज्ञान असते. आपल्या अज्ञानाला सीमा नाही हेच खरे आहे. वास्तवात कर्माची गती वेगळी आहे ही तर

साधीसरळ गोष्ट आहे. जसे पेरू तसे उगवेल. जसे करू तसेच मिळेल. या वेदनेचे कारण मला पावलोपावली स्पष्ट दिसते. मी मान्य करतो की निसर्गाने मला खूप सावधगिरीच्या सूचना दिल्या. परंतु मी तर जणू काय काही कळतच नाही असा मी वागत होतो. मी चुकांवर चुका करत चाललो होतो. पहिल्या चुकीची शिक्षा मिळाली. दुसरी चूक केली तेव्हा ती शिक्षा वाढली. अशा प्रकारे नियमानुसार उत्तरोत्तर शिक्षा वाढत गेली. मला स्पष्टपणे दिसते की निसर्गासारखा दयाळू कोणीही नाही. निसर्ग हाच ईश्वर आहे. ईश्वर प्रेम आहे. प्रेमात आपण शिक्षा करतो तसा निसर्ग आपल्याला प्रेमाने शिक्षा करत असतो. या आजारात मला हा खूप मोठा धडा मिळाला.

तुमचा

मोहनदास”

खेडासंबंधी गोकुलदासभाईंनी जूनमध्ये लिहिलेले पत्र बरेच दिवसांनी मिळाले. त्यातील मुख्य मुद्दे -

"मी कबूल केले पाहिजे की तुमच्यासारख्या उच्च श्रेणीच्या लोहचुंबकाची शक्ती असलेल्या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखाली खेडामधील खेडुतांच्या संगठनशक्तीला मी कमी लेखले. पैशाच्या लाभाच्या दृष्टीने पाहिले तर कदाचित परिणाम मोठे नसतील. परंतु मला माहीत असल्याप्रमाणे खेडा जिल्ह्याइतका दुसऱ्या कोणत्याही जिल्ह्यात सत्तेचा आदर केला जात नव्हता आणि सत्तेची मूर्तिपूजा केली जात नव्हती. या मूर्तीचे तुम्ही तिच्या मंदिरातच भंजन केले आणि तिच्यातील कुरूपता उघड केली आहे. असे करून तुम्ही देशाची फार मोठी सेवा केली आहे. सत्तेचे खरे मूळ कुठे आहे हे तुम्ही लोकांना दाखवले आहे. यासारखे दुसरे मोठे काम कोणतेही नाही. तुम्ही जो पाठ सरकारला तसेच लोकांना शिकवला आहे तो लोक लवकरच विसरणार नाहीत अशी आशा आहे."

याचे उत्तर -

## (गोकळदास पारेख यांना पत्र)

"सुज्ञ भाईश्री,

"युद्ध परिषदेचा पत्ता असल्यामुळे तुमचे जून महिन्यात लिहिलेले पत्र दोन दिवसांपूर्वीच मिळाले. यावरून तुमच्या लक्षात येईल की आतापर्यंत तुम्हाला त्याची पोच का मिळू शकली नाही. तुमचे पत्र जरी माझ्या हाती इतक्या उशिरा पडले असले तरी त्याची किंमत माझ्या मनात जशीच्या तशी कायम आहे. तुम्ही प्रसन्न असावे अशी भूक मला नेहमीच असते. तुम्ही मला भेटला होता हे मी माझे सद्भाग्य समजतो. खेडा जिल्ह्यातील रयतसुद्धा काम करायला समर्थ आहे असा माझा अनुभव आहे. तेथील स्त्री-पुरुषांच्या संपर्कापासून मी खूप शिकलो आहे आणि शिकतो आहे. तुम्ही कुशल असाल.

मोहनदासचे वंदेमातरम"

मनसुखलाल रवजीभाईंचे सध्याच्या परिस्थितीविषयीचे एक पत्र. त्याचे उत्तर -

## (मनसुखलाल रवजीभाईंना पत्र)

"भाईश्री मनसुखलाल,

"तुमचे पत्र आजच मिळाले. मला गंभीर दुखणे झाले आहे. अंथरुणावर पडून आहे. कदाचित अंथरुण सुटेल. माझा स्वतःचा उपचार सुरू आहे. मन पूर्णपणे शांत आहे. माझ्या मूर्खपणामुळेच हा त्रास झाला आहे जाणवल्यामुळे दुःखाची तीव्रता जाणवत नाही.

"शिक्षित वर्गाची अवस्था दयनीय आहे असे मला वाटते. कोणत्या तरी प्रकारे त्यांना सुप्रवृत्त करू शकलो तर तसे याच दिवसात करता येईल. परंतु सध्या मी या बाबतीत काही करू शकेन असे वाटत नाही. स्वतःच निर्माण केलेल्या मोहसागरात हा वर्ग गोते मारतो आहे. टिळकनीती आणि बेझंटनीती यांनी ग्रस्त झालेले हे तरुण स्वयंनिर्मित मोहसागरातून मुक्त होऊन कधीही चालू शकणार नाही असे माझे दृढ मत आहे. या दोन्ही व्यक्तींनी राजकारणाच्या क्षेत्रात नीतीचा त्याग केला आहे. इतकेच नाही तर काही वेळा हे पुढारी त्यागाला त्रास घेणे असे समजत असतात. 'शठं प्रति शाठ्यं' हे त्यांनी समजूनउमजून स्वीकारलेले सूत्र आहे. या धोरणाने भारलेल्या लोकांना मी कोणत्याही प्रकारे काहीही देऊ शकत नाही असे मला वाटते. त्यांना जर काही घ्यायचे असेल तर ते माझ्या लेखांमधून वा भाषणातून अप्रत्यक्षपणे घेऊ शकतात. मी जर त्यांना काही द्यायला गेलो तर ते नकारच देतील आणि ते वास्तवाला धरूनच असेल. श्रीमती बेझंट आणि टिळक महाराज या दोघांचेही धोरण दोषपूर्ण आहे, परंतु त्यांनी केलेले कार्य महाभारतासारखे प्रचंड आहे. त्यांची सेवा अमाप आहे. देशप्रेमाचा मंत्र तरुणांनी त्यांच्याजवळून घेतला आहे. या गुरूंचा ते एकाएकी त्याग कसे करू शकतील? त्याग करायला मी त्यांना कधीही सांगणारसुद्धा नाही. असे असतानाही आणि त्यांना पूज्य मानत असतानाही अशी एक वेळ निश्चितच येईल की जेव्हा हा वर्ग वर निर्दिष्ट केलेल्या धोरणाचा त्याग करील. हिंदुस्थानच्या प्राचीन गौरवावर माझा इतका विश्वास आहे. त्यात कौरवांना जय मिळालेला नाही, पांडवांना मिळाला आहे. आणि ते पाच लोक लाखोंचा सामना करू शकत होते अशी कल्पना करण्यात आली आहे. या देशातील तरुण 'शठं प्रती शाठ्यंम' असे कुत्सित धोरण स्वीकारतील हे माझ्या कल्पनेच्या बाहेर आहे. मी धीर धरून बसलो आहे. मी तर श्रीमती बेझंट आणि टिळक महाराज या दोघांनाही विनवीत असतो. परंतु या

सर्व कामात मी तर माझीच शैली वापरणे अनिवार्य आहे. या कामात कधी कधी खूप ढील द्यावी लागते. ते अनिवार्य असते. काही काम पडद्यामागे होत असतात, व्हायलाही पाहिजे. वरील कारणांमुळे सध्याच मी काँग्रेसमध्ये सामील व्हायचे नाही असे निश्चित केले आहे. माझी मवाळ पक्षाच्या संमेलनातसुद्धा जाण्याची इच्छा नाही. माझ्या न जाण्यानेत जनसामान्यांना धक्का लागेल. सर्व प्रश्न विचारतील तर तेव्हा आवश्यकता वाटली तर मी माझे मत प्रदर्शित करीन.

"आता तुम्हाला बरेच काही लिहिले आहे. हे पत्र प्रकाशित करायचे नाही. तुम्हीच यावर विचार करायचा आहे.

मोहनदासचे वंदेमातरम"

या महिन्याच्या सुरुवातीला सुरतेत लष्करभरतीवर एक भाषण दिले. कोणी तरी त्याचा अहवाल 'टाईम्स'मध्ये दिला. त्यात टिळक महाराजांची निंदा करणारी काही वाक्य असल्याचे जाणवत होते. अहवाल अतिशय दोषपूर्ण होता. त्या संबंधात त्यांनी 'टाईम्स'ला एक कडक पत्र लिहिले. ते पत्र वाचून श्री हँडरसन नावाच्या एका ब्रिटिशाने सुरतेहून पुढील पत्र लिहिले -

"तुम्ही लष्करभरतीसंबंधात सुरतेत जे भाषण केले त्याचा थोडक्यात सार तयार करण्यात मी जी गंभीर चूक केली त्याकरिता मी दिलगीर आहे. याबद्दल मी तुम्हाला व्यक्तिगत लिहितो आहे कारण तुम्ही खेडा जिल्ह्यात (जिथे मी अनेक वर्ष काढले आहेत) आणि इतर जिल्ह्यांत लष्करभरतीचे फार सुंदर काम करत आहा याचा मला खूप अभिमान आहे. ते भाषण मी प्रकाशित केले याबद्दल मला अजूनच खेद होतो. याचे कारण कारकुनाने केलेल्या नोंदीवरून मी थोडक्यात सार तयार केला होता. त्या नोंदीतच चूक असल्यामुळे तुम्ही जे शब्द बोलला त्याच्या उलट शब्द मी तुमच्या तोंडी घातले. भाषणकर्त्याचा जे शब्द स्वप्नातही बोलायचा विचार नसतो ते शब्द माझ्या सारात न घालण्याची मी नेहमी काळजी घेत असतो, आणि साधारण नियम म्हणून मी जे भाषण ऐकले नसते त्याचा सार देत नसतो. तुम्ही सुरतमध्ये बोलणार आहा याची मला कल्पना नव्हती. मला जर कल्पना असती तर मी तुमचे भाषण ऐकण्याकरिता निश्चितच आलो असतो. मला आशा आहे की तुम्ही परत सुरतला जेव्हा याल तेव्हा तुम्हाला भेटायची आणि तुमची ओळख करून घेण्याचा आनंद मला मिळेल. आता तर मी

इतकेच म्हणेन की तुमच्या भाषणाचा खोटा अहवाल प्रकाशित प्रकाशित केल्याबद्दल मी दिलगीर आहे.”

याचे उत्तर -

“भाईश्री हॅन्डरसन,

“अजूनही मी अंथरुणाच्या ताब्यात आहे. माझ्या जीवनात मी भोगलेल्या मोठ्यात मोठ्या आजारातून मी जातो आहे. या आधी तुमच्या पत्राचे उत्तर देणे माझ्याकरिता शक्यच नव्हते. तुमच्या साध्यासरळ आणि स्पष्ट पत्राने मी मुग्ध झालो. याकरिता मी तुमचा आभारी आहे. माझ्या भाषणांच्या अहवालातील चुकांची मी क्वचितच नोंद घेत असतो. ते वाचण्याचीसुद्धा मला फार कमी संधी मिळत असते. परंतु हा अहवाल ‘टाईम्स’मध्ये आलेला असल्यामुळे आणि त्यात झालेल्या चुकांमुळे फार नुकसान होण्याची शक्यता असल्यामुळे त्यातील चुका मी दुरुस्त केल्या पाहिजे असे मला वाटत होते. यामुळे दुष्ट लोकांची जीभ बंद झाली आहे. असो यामुळे तुमच्याशी ओळख होण्याची संधी मिळाली.

सेवक,

मो. क. गांधी”

शंकरलाल बँकरचे रामदाससंबंधी पत्र. जमनादासकडून रामनाम लिहवून घेतले. पटेलनी समजूत घातल्यामुळे ते परत घेतले आणि जमनादासवर परत बोल लावल्याबद्दल दिलगिरी.

## (शंकरलाल बँकर यांना पत्र)

"भाईश्री शंकरलाल,

"तुमचे पत्र मिळाले. माझी प्रकृती अजूनही पूर्णपणे चांगली झालेली नाही. वेळ घेईल अशी धास्ती वाटते. मी कल्पना केली त्यापेक्षा आजार किती तरी खोलवर गेला आहे. तुम्ही काळजी करू नका.

"भाई जमनादासविषयी मला काही विचारायचे राहिले नाही. भाई विठ्ठलभाईंनी आपल्या प्रकृतीमुळे जो राजीनामा दिला होता तो परत घेण्याचा सल्ला दिला आहे. आपले बोलणे आठवत असेल तर जमनादासने काम सोडून द्यावे असा माझा सल्ला नाही. परंतु भाई जमनदासने मोठ्या जबाबदारीचे पद निश्चितच सोडून दिले पाहिजे. यातच स्वकल्याण आणि लोककल्याण आहे. काँग्रेसला कोणतीही हानी पोहोचणार नाही. आजपर्यंत आपण आपल्याच गैरसमजामुळे काँग्रेसला हानी पोहोचवत आलो याचा विचार का करू नये? आता एका सरळ कामामुळे कोणती हानी पोहोचणार आहे? भाई जमनादास आपल्या निश्चयाला धरून राहतील तर त्यांची सेवाशक्ती अजून वाढेल. तुम्ही दृढ राहा, जमनादासला दृढ करा. माजींना माझे प्रणाम.

मोहनदासचे वंदेमातरम"

# (देवदास गांधींना पत्र)

“चि. देवदास,

“तुझ्या हिंदीच्या वर्गाचे दोन महिन्यांचे वर्णन वाचले. आणि समाधान वाटले. तुला हे काम इतके आवडले की तुला याच कामासाठी निर्माण केले आहे की काय असे वाटते. आणि तुझ्या ठिकाणी दुसरा माणूस पाठवणे कठीण व्हावे इतकी तू तुझी पात्रता केली आहे. आता तु दुसरे काही करू शकशील असे मला जाणवत नाही. ईश्वर तुझा निश्चय दृढ ठेवो. तुला चांगले आरोग्य आणि दीर्घायुष्य मिळो आणि मद्रास प्रांत हिंदुस्थानच्या ऐक्याच्या सुराने  गाजत राहो. तसेच उत्तर आणि दक्षिणेत जी दरी निर्माण झाली आहे ती भरून येवो आणि दोन्हीकडील जनता परस्परांशी एकजीव होवो. हे कार्य जो माणूस करील तो इतक्याच कार्यामुळे अमरपद मिळवेल. तुला हे पद मिळो. तू या कामाकरिता लायक आहेस, तू हे काम कधीही सोडू नकोस. दिवसेंदिवस तू तुझे हिंदीचे ज्ञान वाढवत जा आणि तू तुझ्या नैतिकतेवर दृढ राहा. जे सत्यवान, ब्रह्मचारी, अपरिग्रही, दयावान, शूरवीर असतात त्यांचा प्रभाव संपूर्ण पृथ्वीवर पडत असतो. या प्रभावाने तू लोकांना एकत्र करू शकशील आणि मग सहजपणे तू त्यांना हिंदीचे ज्ञान देऊ शकशील. तुझ्याबद्दल माझ्या मनात असे विचार असताना मी तुला लढाईत पाठवण्याचा विचार कसा काय करू शकतो? तू तिथे तुझे कर्तव्य करत राहिलास तर ते लढाईत जाण्यासारखेच आहे. तू धीर सोडू नकोस. तू जरी लढाईत सामील होऊ शकला नाही तरी तू त्याची काळजी करू नको. तुझ्या इतर भावांनासुद्धा मी युद्धात कसा पाठवू? हरिलाल तर भाऊ राहिलाच नाही. मणिलाल येणार नाही. रामदास येत असेल तर त्याला लिहिले आहे. जर तू प्रातःस्मरण आणि संध्या करण्याच्या नियमांचे पालन करत नसशील तर आता सुरू कर. हा तुझा फार मोठा आधार होईल असे निश्चित समज. लाखो वर्षांपासून चालत आलेल्या प्रथेला जी व्यक्ती वा जनता विनाकारण सोडून देते ती बरेच काही गमावत असते. आधुनिक काळरुपी महासमुद्राच्या लाटा आपल्यावर उसळून येत आहेत. त्यात न बुडण्याचा मार्ग सकाळ संध्याकाळची संध्या आहे. हे समजू शकशील आणि समजूनउमजून आचरू शकशील तर फार चांगले होईल.

बापूचे आशीर्वाद”

२०-८-१९१८

समर्थचे सुंदर भाषण. नामस्मरणासारखा एकही उपाय नाही. एक संस्कृत श्लोक उद्धृत. माँटफोर्ड योजना स्वीकारण्याकरिता वेगळ्या परिषदेची आवश्यकता आहे. विचार करण्याकरिता तुम्ही उद्या या वा संमती द्या. त्याचे उत्तर -

## (नाथ माधव समर्थ यांना पत्र)

"भाईश्री समर्थ,

"तुमचे पत्र मिळाले, फार आभारी आहे. धार्मिक उपचारावर माझा निश्चितच विश्वास आहे. आणि मोठ्या प्रमाणात मी याचाच आधार घेतला आहे. परंतु याचबरोबर माझा निसर्गोपचार आणि उपवासावरसुद्धा विश्वास आहे. निसर्गोपचारात मी पाण्याचे उपचार करत असतो आणि बस्ती घेत असतो. आहार म्हणून केवळ फळांचा रस, विशेषेकरून संत्र्यांचा रस घेत असतो. मी ज्या प्रमाणात हे निसर्गोपचार करतो त्या प्रमाणात माझा धर्मोपचारावरील विश्वास कमी होतो हे कबूल करण्यात मला संकोच वाटत नाही. मला जोपर्यंत माहीत आहे निसर्गनियमाचा भंग केल्यामुळेच मी या रोगाच्या कचाट्यात सापडलो आहे. यामुळे केवळ धर्मोपचारावर अवलंबून राहायची माझ्यात हिंमत नाही.

काल मी तुम्हाला भेटू शकलो नाही याकरिता मी दिलगीर आहे. तुमच्या चळवळीतही मी माझे नाव देऊ शकत नाही. माझे विचार कोणत्याही आंदोलनाला मान्य होतील असे नसल्यामुळे मी दोन्ही चळवळींपासून वेगळा राहू इच्छितो. मला वाटते की या प्रसंगी सर्व पुढाऱ्यांनी इतर सर्व काम वेगळे ठेवून लष्करभरतीच्या कामाकडे लक्ष केंद्रित करायला पाहिजे. मला माहीत आहे की जहाल पक्षाला माझे हे विचार मान्य नाहीत. आणि मी ज्या सीमेपर्यंत जाऊ इच्छितो त्या सीमेपर्यंत मवाळ पक्ष यायला तयार झाला तर ते मी माझे भाग्यच समजेन. एकूण पाहता माँटफोर्ड योजना मला स्वीकारार्ह वाटत असली तरी ती पूर्णपणे स्वीकारार्ह होण्याकरिता तिच्यात काही बदल करणे आवश्यक आहे असे माझे आग्रहपूर्वक मत आहे. माझा हा आग्रह इथपर्यंत जातो की जर या योजनेत हे फेरबदल करण्यात येत नसतील तर या योजनेतील शक्य तितके उपाय स्वीकारावे आणि मग ही योजना फेटाळून लावण्याकरितासुद्धा मी तयार होईन. माझे फेरबदल स्वीकारण्याकरिता ज्याला पॅसिव्ह रेझिस्टन्स (सविनय आज्ञाभंग) म्हणतात तोपर्यंतही मी जायला संकोचणार नाही. मवाळ पक्ष ही अट मान्य करू शकत नाही. यामुळे मी धीराने वाट पाहतो आहे आणि एकटाच माझा मार्ग चोखाळतो आहे.

सेवक,

मो. क. गांधी"

२५-८-१९१८

बी. चक्रवर्तींना पत्र. सुरेंद्रनाथना लिहिलेल्या पत्राचा अनर्थ होतो आहे. तुम्ही काँग्रेसच्या विरोधात नाही हे जाहीर करा. त्याचे उत्तर -

## (बी चक्रवर्तींना पत्र)

"भाईश्री चक्रवर्ती,

"तुमचे पत्र मिळाले. त्याकरिता आभार. मी जे विचार धारण करतो ते मुख्य नेत्यांना मान्य नाहीत हे मला माहीत असल्यामुळे मी परिषदेपासून वेगळा राहीन. माझ्या भूमिकेसंबंधी मी श्रीमती बेझंटशी चर्चा केली आहे. मी वेगळा राहायला पाहिजे या माझ्या विचाराशी त्यासुद्धा सहमत झाल्या आहेत. मी मवाळ पक्षाच्या सभेलाही हजर राहणार नाही. माझी मान्यता आहे की लष्करभरतीचे हे काम जर आपण पूर्ण केले तर आपण देशाची मोठ्यात मोठी सेवा केली असे म्हणता येईल. मी जोपर्यंत जाऊ इच्छितो तोपर्यंत जायला हे पक्ष तयार नाहीत. मॉँटफर्ड योजनेचे सिद्धांत मी स्वीकारतो हे खरे आहे, परंतु त्यात ज्या कमीतकमी सुधारणा करणे आवश्यक आहे त्या मी स्पष्टपणे सुचवीन आणि त्या मान्य करवून घेण्याकरिता मी मरेपर्यंत लढेनही. मवाळ पक्ष याकरिता निश्चितच तयार नाही. जहाल पक्ष विशिष्ट पातळीपर्यंत याकरिता तयार आहे हे खरे आहे, परंतु ज्या अर्थाने माझी इच्छा आहे त्या अर्थाने नाही. यामुळे या दोन्ही पक्षांना एक करण्याकरिता मी सध्या काहीही करायला नको. मला कोणतीही हिंसा करायची नाही आणि म्हणूनच मला (सिद्धांतासंबंधी) धरसोडीचे धोरण पसंत नाही. आज देशात स्पष्टपणे दोन पक्ष आहेत. दोघांनीही आपापले कार्यक्रम बहाद्दुरीपूर्वक सरकारसमोर तसेच जनतेसमोर मांडायला पाहिजे आणि ते मान्य करवून घेण्याकरिता आंदोलन केले पाहिजे. असे करूनच आपण प्रगती करू शकू असे माझे मत आहे. सध्या तर आपण घाणीच्या बैलाप्रमाणे गोलगोल फिरून राहिलो आहो.

सेवक,

मो. क. गांधी"

टिळक महाराजांनी पत्र लिहिले. तुम्ही येणार नाही तर मला वाईट वाटेल. त्याचे उत्तर -

## (बाळ गंगाधर टिळक यांना पत्र)

"आपले पत्र मिळाले. तुमच्या सद्भावनेने मी उपकृत झालो आहे. माझ्या प्रकृतीची तुम्ही का काळजी करणार नाही? ईश्वरकृपेने आता माझी प्रकृती चांगली आहे. अजून काही दिवस तरी मी अंथरूण सोडू शकणार नाही. खूप वेदना होत होत्या. आता त्या शांत झाल्या आहेत.

कॉँग्रेसमध्ये यायचा माझा विचार नाही. मवाळ पक्षाच्या सभेतही जाण्याचा विचार नाही. माझ्या असे लक्षात आले आहे की माझे मत दोघांपेक्षाही वेगळे आहे. हे मी आपल्याला सांगितलेलेच आहे. मला असे वाटते की या वेळी लष्करभरतीच्या कामाला आम्ही सर्वांनी प्राणपणाला लावून लागावे आणि लाखोंना जर आपण युद्धात नेऊ शकलो तर हिंदुस्थानची आपण फार मोठी सेवा करू शकू. मला माहीत आहे की माझ्या या मताशी तुम्ही आणि श्रीमती बेझंट सहमत नाही. मला हेही माहीत आहे की मवाळ पक्षही या कामात खूप जोर लावून सामील होणार नाही. ही एक गोष्ट झाली. माझे दुसरे मत असे आहे - मॉनेग्यू-चेम्सफर्ड योजनेचे तत्त्व स्वीकारणे आणि त्यातील ज्या काही सुधारणा आम्हांला हव्या आहेत त्या स्पष्टपणे सांगाव्या. आणि त्या सुधारणा मान्य करवून घेण्याकरिता आम्ही प्राणपणाने लढावे. मवाळ पक्ष हे सर्व कबूल करणार नाही हे तर स्पष्ट आहे. तुम्ही आणि श्रीमती बेझंट जरी हे मान्य कराल तरी मी ज्या प्रकारे लढू इच्छितो तसा लढा देणे तुम्ही कबूल करणार नाही. श्रीमती बेझंटनी सांगितले आहे की 'मी सत्याग्रही नाही. तुम्ही दुर्बलाना एक शस्त्र समजून सत्याग्रहाचा स्वीकार केला आहे. या वैचारिक गोंधळात पडण्याची माझी इच्छा नाही. आणि तुम्हा दोघांच्या विरोधात कॉँग्रेसमध्ये आंदोलन करण्याचीही माझी इच्छा नाही. माझ्या सूत्रावर माझा अढळ विश्वास आहे. आणि माझे असेही मत आहे की माझी तपश्चर्या जर परिपूर्ण असेल तर तुम्ही आणि श्रीमती बेझंट माझ्या सूत्राचा स्वीकार कराल. मी धैर्यपूर्वक वाट पाहू शकतो.'

"जहाल आणि मवाळ पक्षांनी अशा लहान लहान गोष्टी सोडून एकत्र येण्याचा प्रयत्न करणे ही गोष्ट मला मुळीच पसंत नाही. देशात दोन पक्ष आहेत. दोन्ही पक्षांनी आपापले मत राजा आणि प्रजा या दोघांसमोर ठेवला तर फार मोठा लाभ होईल. तुमच्या कार्यात ईश्वर तुम्हाला मदत करो.

तुमचा

मोहनदास"

२७-८-१९१८

डॉ. रायना पत्र -

## (डॉ. पी. सी. राय यांना पत्र)

“भाईश्री राय,

“तुम्ही माझ्या आजाराबद्दल ऐकले असेल. मला मुरड्याचा फार जबरदस्त आजार झाला होता. या आजारातून तर मी दुरुस्त झालो, परंतु अशक्तपणामुळे माझ्याकडून काहीही करवत नाही. मी क्वचितच माझे अंथरुण सोडू शकतो. आणि अंथरुणातसुद्धा मी फार वेळ बसू शकत नाही. माझ्यासमोर प्रश्न असा आहे की अशक्त झालेल्या या देहाची परत कशी बांधणी करावी? दूध आणि त्यापासून तयार झालेले पदार्थ किती तरी वर्षांपासून मी सोडलेले आहेत. आणि आजीवन हे पदार्थ घ्यायचे नाही असे माझे व्रत आहे. यामुळे दूध आणि लोण्याऐवजी दुसरे काही पर्यायी पदार्थ मला पाहिजे. आतापर्यंत माझ्यात शक्ती असल्यामुळे मी शेंगदाणे, अक्रोड आणि इतर गोष्टींमधून मला सुंदर पर्याय मिळत होता. परंतु आता माझ्या नाजूक झालेल्या पोटाला या गोष्टींमधून काढलेली चरबी पचायला फार जड होते. दूध आणि तुपाऐवजी मी वनस्पतीजन्य पदार्थावर भागवले पाहिजे. आधी मी खोबऱ्याचे आणि बदामाचे दूध घेत असे. या दुधाचा शरीरावर जो परिणाम होतो तो गायीच्या दुधापेक्षा अगदी वेगळा आहे. दूध, लोणी आणि तुपाची उणीव भरून काढेल असा कोणता तरी वनस्पतीजन्य पदार्थ तुमच्या लक्षात आहे काय? असेल तर कृपाकरून मला लिहून कळवा. अधिक चांगले तर हे होईल की असा काही पदार्थ मिळत असेल तर तो पाठवा. मी असे ऐकले आहे की उत्तरेकडे मोहाच्या कोवळ्या बियांपासून तूप बनवण्यात येत असते. हे सामान्य तुपासारखे नसते. परंतु ऑलिव्हच्या तेलासारखे असते. यासंबंधीची शक्य तितकी माहिती मला द्या. मला दःख होते की इतक्यात तुम्हाला एकच पत्र लिहिण्याचा प्रसंग आला आहे, आणि तोसुद्धा माझ्या स्वार्थाकरिता तुम्हाला त्रास द्यावा लागत आहे. शक्य असेल तर मला माफ करा.

सेवक,

मो. क. गांधी”

आज विल्यम विंसेंटना अलीबंधूंच्या प्रकरणाचे पुनःस्मरण करून देण्याकरिता परत पत्र लिहिले-

२९-८-१९१८

आज प्रकृती बरीच चांगली वाटते आहे.

कॉँग्रेसविषयी महेतांना लिहिले.

## (डॉ. प्राणजीवन महेतांना पत्र)

"तुम्ही मालवीयजींना कॉँग्रेसमध्ये ऐक्य घडवून आणण्यासंबधीची अखरेच्या प्रयत्न करण्यासंबंधीची माहिती कळवली आहे. ही बातमी वृत्तपत्रांमध्येसुद्धा आहे. पंडितजी असा काही प्रयत्न करतील हे तर स्पष्टच होते. परंतु आता मला भीती आहे की सर्व ठराव दुर्बल होतील. सहज जरी विचार केला तरी लक्षात येते की वाटल्यास कमी मागावे, परंतु जे मागायचे ते ठामपणे मागितले पाहिजे. जनतेला जसजसे भान होत जाईल आणि आपल्या मागण्या पूर्ण करवून घेण्याकरिता जसजशी ती समर्थ होत जाईल तसतशा तिच्या मागण्या वाढत जातील. ही आकाशकुसुमासारखी गोष्ट नसून अतिशय व्यावहारिक गोष्ट आहे."

## (देवदास गांधींना पत्र)

"चि. देवदास,

"खूप वाट पाहिल्यानंतर तुझ्या दोन पत्रांचे एकाच वेळी दर्शन झाले. माझी प्रकृती सुधारतच चालली आहे, काळजीचे काहीही कारण नाही. आज तर बरीच चांगली आहे. सुरुवातीपासून तर अखेरपर्यंत मी प्रकृतीवरील नियंत्रण गमावले नाही, आणि परिणामांविषयी मी मुळीच काळजी केली नाही. आजारात वेदनांची भीती वाटत होती, परंतु मृत्यूची भीती तर स्वप्नातही वाटत नव्हती. आणि जेव्हा मला खूप त्रास होत होता तेव्हा 'आता सुटका सुटका झाली तर किती बरे होईल' असे विचार मनात येत होते. जीवंत असेपर्यंत काम करत राहिलो पाहिजे ही गोष्ट वेगळी. परंतु कामाकरिता जगण्याची आकांक्षा नाही. मोक्षाची असते, परंतु मोक्ष मागितल्याने मिळत नसतो. त्याकरिता पात्रता हवी.

“तुझे काम मला इतके महत्त्वाचे वाटते की माझी प्रकृती पाहण्याकरितासुद्धा मी ते सोडायला लावू शकत नव्हतो. माझी पुरेशी काळजी घेण्यात येत होती हे तर मी कबूल करायलाच पाहिजे. आता मी फ्रांसला जाऊ शकेन असे तर मला मुळीच वाटत नाही. आता तर असे वाटते की लढाईच मुळीच जाणे होणार नाही. दिवसेंदिवस फ्रांसच्या रणांगणात मित्र राष्ट्रांचा विजय होत चालला आहे. अशा परिस्थितीत मला घेऊन जातील असे वाटत नाही. याविषयी आपल्याला महिना दीडमहिन्यात कळेलच. तरीही आता फ्रांसची आशा तर सोडायलाच पाहिजे. मेसोपोटोमियाला जावे लागेल असे वाटते.

“आनंदशकरभाईंनी ‘हिंदू धर्माची बालपोथी’ लिहिली आहे. परंतु ही म्हातारे लोक रसाळ पद्धतीने वाचू शकतील आणि ज्ञान मिळवू शकतील अशी आहे. मला तर हा अलौकिक ग्रंथ वाटतो. भाई महादेव दररोज सकाळी मला तो वाचून ऐकवत असतो. यातून तर मी अमृतपान करत असतो. इतर भाषांमध्ये असे लघू पुस्तक क्वचितच असेल. आनंदशंकरभाईंच्या विस्तृत वाचनमननाचा अर्क म्हणजे हे पुस्तक. तू ते परत परत वाच. या पुस्तकाशी संबंधित प्रसंग कळत नसतील तर विचार. ही पुस्तिका तुला पाठवण्याची व्यवस्था करतो आहे. तुझ्या अक्षरात सुधारणा नाही.

बापूचे आशीर्वाद”

## (हरिलाल गांधींना पत्र)

“चि. हरिलाल,

“तुझे पत्र मिळाले. माझी प्रकृती चांगली होत चालली आहे. चिंता करण्याचे कारण नाही. अजून थोडे दिवस अंथरुणावरच पडून राहावे लागेल. माझ्या शुश्रूषेत कोणतीही त्रुटी नाही. इतकी विशेष सेवा एखाद्या चक्रवर्तीचीसुद्धा होऊ शकत असेल असे मला वाटत नाही. तू स्वयंपाक करतोस आणि तो करणे तुला आवडते हे मला फार आवडले. असे करताना कदाचित तुझी घडण होईल, कदाचित तुला जीवनाचे रहस्य कळेल आणि झालेल्या चुका दुरुस्त करून तू जीवन उज्ज्वल करशील अशी आशा वाटते. नियमितपणे पत्र लिहीत राहशील तर चांगले होईल.

बापूचे आशीर्वाद”

# (चार्ल्स फ्रेड्रिक ॲन्ड्र्यूज यांना पत्र)

"प्रिय चार्ली,

"मी निश्चितच त्रस्त झालो आहे, परंतु असे मी जाणूनबुजून केलेले नाही. माझ्या आजाराचे कारण मी स्पष्ट आणि सरळपणे पाहू शकतो. त्यात मला यश येईलच असे नाही. ते माझे हेतू साध्य करतील असे नाहीत. ते मला सांगत आहेत की माझा अशक्तपणा दूर करण्याकरिता इतका अधिक प्रयत्न करूनही अजूनही माझ्यात अशक्तपणा का आहे. या आजारात मला हेसुद्धा स्पष्टपणे जाणवले की आपण सतत निसर्गनियमांचा भंग करत असतो. इतर कोणत्याही मोहावर विजय मिळवणे इतके कठीण नाही जितके जिभेच्या मोहावर. आणि हा मोह जितका कठीण आहे तितकाच आपण याचा विचार कमी करतो. माझ्या मताप्रमाणे जिभेला जिंकणे हे इतर सर्व गोष्टी जिंकण्याच्या बरोबरीचे आहे. परंतु या विषयावर अजून केव्हा तरी लिहीन.

"माझ्या प्रकृतीत सतत सुधारणा होते आहे. या आजारात मी मनःशांती कधीही गमावली नाही. माझी मुळीच काळजी करू नकोस. कोणत्याही निमित्ताने तू शांतिनिकेतन सोडावे अशी माझी इच्छा नाही. तू आणि गुरुदेव जीवनातील सर्वात महत्त्वाचे कार्य करत आहा असे मला वाटते. खरे काव्य तुम्ही आताच लिहीत आहा. हे काव्य जिवंत काव्य आहे. मला वाटते की गुरुदेवांची आणि तुझीही ती प्रवचने जपून ठेवली पाहिजे ज्यांचा लाभ भाग्यवान विद्यार्थ्यांना मिळतो आहे. मला किती वाटते की तो लाभ घेण्याकरिता मी शांतिनिकेतनमध्ये असायला पाहिजे होते आणि विद्यार्थ्यांमध्ये बसायची संधी मला मिळायला पाहिजे होती.

तुझा,

मोहन"

२९-८-१९१८

चार्लीचे दुसरे पत्र आले त्याचे उत्तर -

## (चार्ल्स फ्रेड्रिक ऍन्ड्र्यूज यांना पत्र)

"तुझे सर्व प्रेमसंदेश माझ्यासमोर पडलेले आहेत. ते सर्व शांतता देणाऱ्या मलमासारखे आहेत. या आजाराचा जसजसा मी विचार करत जातो तसतसे मला माणसाचे माणसावरील प्रेम आणि ईश्वराचे माणसावरील प्रेम यांचे मूल्य काय असते याचा साक्षात्कार अधिकच तीव्रतेने आणि खोलवर झाला. यात निसर्गाच्या कल्याणकारी हाताशिवाय मला दुसरे काहीही दिसत नाही. आणि मला वाटते की यावरून वरवरून पाहता निसर्गाचा जो प्रचंड कोप दिसतो तो वस्तुतः दुसरे काहीही नसून निसर्गाच्या प्रेमाचीच अभिव्यक्ती असते.

"माझी इच्छा आहे की तू माझी काळजी करू नको. शांतिनिकेतनच्या तुझ्या उत्तम कामात कोणताही जरी खोळंबा होत असेल तरी ती आपत्तीच म्हणायची. शांतिनिकेतनमधील तुझे आणि गुरुदेवांचे काम ऐकून मला किती आनंद होत असतो याचे वर्णन मी करू शकत नाही. मी तुला सांगायलाच पाहिजे की जेव्हा केव्हा तुझे नवीन पत्र येते तेव्हा मी तर ते थरथरतच हाती घेत असतो. गुरुदेवांच्या कामात व्यत्यय यावा असे तर कदाचित काही घडले नसेल ना अशी भीती मला वाटत असते. तुम्ही दोघांनीही लहान मुलांना शिकवण्याच्या उत्तम कार्याचे हे सत्र कोणताही व्यत्यय न येता पूर्ण केले आहे आणि तुम्हा दोघांचेही आरोग्य सुंदर राहिले आहे हे ऐकून माझ्या मनावरील ओझे एकदम कमी होत असते. बडेदादांच्या आशीर्वादाकरिता खूप आभारी आहे. त्यांचे आशीर्वाद मला फार मूल्यवान वाटत असतात. गुरुदेवांच्या शुभेच्छांकरिताही मी त्यांचा आभारी आहे. रुद्रची आठवण करशील. आम्हा दोघांतर्फे तुम्हा सर्वांना प्रेम.

तुझा,

मोहन"

३१-८-१९१८

आनंदशंकरभाईंच्या ‘बालपोथी’चे वाचन दररोज चालत असते. ‘कमाल आहे! अद्भुत भांडार उधळले आहे!’ – असे उद्गार ते वाचताना अनाहूतपणे निघायचे.

आज मिली पोलाकचे एक सुंदर पत्र आले. पोलाकही कबूल करतात की मिलीची मला आलेली पत्रेसुद्धा खूप सुंदर असतात. या पत्रातील काही भाग -

“तुम्ही आजारी आहा असे वाचण्यात आले. आता तुम्ही चांगले आहा हे ऐकल्याने मनावरील ओझे उतरल्याचे अनुभवते आहे. मला माहीत आहे की तुमचे शरीर जेव्हा सेवक राहत नाही आणि मालक होते तेव्हा तुम्हाला किती दुःख होते. आशा आहे की तुमची परिचर्या चांगली होत असेल. शक्य तितके सर्व काही करण्यात येत असेल. जेव्हा की अनावश्यक असे तुम्हाला काहीही सहन करावे लागत नसेल. तुम्ही चांगले होत चालला आहा हे कळल्यानं खूप आनंद झाला. तुमच्यातील शक्तीचा वा श्रद्धेचा लोप कसा काय होऊ शकतो? तसे झाले तर मला अपार दुःख होईल. मला माहीत आहे की आपण सगळे मरणार आहो. आणि जे जातात ते एका जगातून दुसऱ्या जगात गेल्यासारखे असतात. असे जरी झाले तरी इथे राहिलेल्या माणसांच्या मनात पोकळी निर्माण होत असते. ते काहीही असले तरी तुम्हाला इथे अजून बरीच वर्षे राहायचे आहे. यामुळे तुम्ही कृपाकरून तुमच्या शरीराची काळजी घ्या. त्याला अजून बरोच काम करायचे आहे. प्रेमासह.

तुमची बहीण मिली”

याचे सुंदर उत्तर -

## (मिली ग्रॅहम पोलाक यांना पत्र)

“मी हे लिहितो आहे आणि समोर धो धो पावसाचा भव्य वर्षाव होतो आहे. मी त्याकडे न्याहाळून पाहतो आहे. पश्चिम हिंदुस्थानवर दुष्काळाची भयंकर तलवार लटकत होती. डोळ्यांच्या पापण्यातून ही भीती डोकावत होती. आता हीचे स्थान असीम आनंदाने घेतले आहे. ही वृष्टी करोडो पशुपक्षांकरिता शांतिदायक मुक्ती सारखी आहे. केवळ पावसावरच आधारलेला हिंदुस्थानसारखा दुसरा देश या पृथ्वीतलावर क्वचितच असेल. आता तुझ्या लक्षात येईल की मला आरोग्य अर्पिण्यात या पावसाचा

किती मोठा सहभाग आहे ! मी वेदना तर खूप सहन केल्या आहेत. हे सर्व माझ्या मूर्खपणामुळे झाले आहे. मी शरीराशी मोठाच अपराध केला होता. त्याची ही योग्य अशी शिक्षा होती. मी एक दोषपूर्ण प्रयोग केला. मुरड्याचा त्रास तर मला होताच. त्यातून मी बरा झालो होतो. मी सामान्य आहार लवकर सुरू करायची घाई करायला नको होती. असे करण्याऐवजी मी खाल्ले. आणि अनिवार्य संकटात सापडलो. माझे शरीर इतके काही क्षीण झाले आहे की आता त्याची नव्याने बांधणी करावी लागत आहे. परंतु काळजी करण्याचे कोणतेही कारण नाही. सध्या मी आजारानंतरचा आराम घेतो आहे. नियमितपणे पोषण घेत असतो. दररोज ते थोडेथोडे वाढवत असतो, आणि दहाएक दिवसात माझ्यात हिंडण्याफिरण्याची शक्ती येईल अशी आशा आहे. तू मला माझ्या शुश्रूषेविषयी विचारले आहे. मानवप्रेम जे करू शकते ते सर्व माझ्याकरिता करण्यात आले आहे. माझ्याकरिता हा आजार एक प्रकारे आरामही होता आणि दुःखही होते. इतके सगळे माझी शुश्रूषा करत होते हे पाहून आनंद होत होता तर माझ्या दुर्बलतेमुळे आणि मूर्खाईमुळे मला या सगळ्याची आवश्यकता पडत असल्याचे पाहून मला दुःखही होत होते. प्रेमाच्या या मूल्यवान अनुभवामुळे माझ्यात सेवा करण्याची जी काही क्षमता असेल त्या क्षमतेप्रमाणे सेवा करण्याचा आदेशही मला मिळतो आहे. मानवजातीची सेवा ही अखेरीस तर स्वतःचीच सेवा असते. आणि ही सर्व सेवा घेत असताना मी अधिकाधिक शुद्ध कसा होईन हा प्रश्न या आजारात माझ्या मनात घोंघावत होता. माझ्याकरिता प्रार्थना करशील.

- भाई”

ॲन्ड्रयूजचे पत्र. शांतिनिकेतनमध्ये ७० गुजराती मारवाडी विद्यार्थी असल्याची आनंदाची बातमी. सर्वांना टागोर अतिशय जिव्हाळ्याने ठेवतात आणि त्यांच्या आईवडिलांचा सत्कार करतात वगैरे. त्याचे उत्तर -

## (सी. एफ. ॲन्ड्र्यूज यांना पत्र)

“तू मला नवल वाटेल अशी आनंदाची बातमी सांगितली आहेस. मला तर कल्पनाच नव्हती की शांतिनिकेतनमध्ये गुजराती मारवाड्यांची इतकी मोठी वस्ती आहे. हे सर्व विद्यार्थी तिथे पूर्ण वेळ राहिजे तर गुजरात आणि बंगाल किती सुंदर साखळीने जोडले जातील? कवी जर आताप्रमाणे आपले काम सुरू ठेवतील तर ते सर्व गुजरात्यांना आपल्याजवळ ठेवू शकतील आणि त्यांच्यामागे इतरही येतील. मला इकेच विचारायचा मोह होतो की तेथील साफसफाईवर लक्ष ठेवण्याकरिता कोणी माणूस ठेवला की नाही?

“माझ्या प्रकृतीत सुधारणा सुरू आहे. प्रगती कंटाळा यावा इतकी हळूवार आहे. शरीराची परत नव्याने बांधणी करायची आहे तर वेळ लागणे तर स्वाभाविकच आहे. विशेषेकरून ज्याला दररोजचे पोषण पाचच वस्तुंमधून मिळवायचे आहे, आणि त्यातही दूध आणि दुधापासून तयार केलेले पदार्थ चालत नसताना. परंतु मला वाटते की शरीराची परत बांधणी करता येईल. तू खात्री बाळग की लष्करभरतीच्या वा काँग्रेसच्या कामाची मला मुळीच काळजी वाटत नव्हती. तुझ्याप्रमाणे मी असे तर म्हणूच शकत नाही की या काळात या दृष्टीने मी वर्तमानपत्रेही पाहत नव्हतो. उलट काँग्रेसच्या कामकाजाचे वृत्त उत्कंठेने वर्तमानपत्रात पाहत होतो. परंतु मला त्याची काळजी वाटत नव्हती.

“मला माहीत आहे की रुद्र माझी फार काळजी करत आहेत. माझ्या प्रकतीविषयीची बातमी त्यांना सांगशील आणि त्यांना सांगशील की तुम्हा सर्वांच्या प्रार्थनेमुळे मला परत आरोग्य आणि सुखसमाधान मिळाल्याशिवाय राहणार नाही याची खात्री बाळगा.

तुझा,

मोहन”

देवदासला -

## (देवदास गांधींना पत्र)

“कॉंग्रेसमध्ये मी गेलो नाही कारण श्रीमती बेझंट आणि टिळक महाराज यांच्याशी बोलल्यानंतर तिथे जाणे कृत्रिमपणाचे होईल अशी जाणीव होत होती. आणि अशा महत्त्वाच्या काळात योजनेवर मिथ्या वादविवाद करण्याऐवजी आपल्या मागण्या कशा पूर्ण होतील याचा उपाय शोधणे आणि तो अंमलात आणणे मला आवश्यक वाटते. यासंबंधातील माझे विचार मी त्यांना सांगितले आहेत आणि सुचवले आहे की आपल्याजवळ दोन मोठे शस्त्र आहेत. एक तर लढाईत संपूर्ण आहुती द्या वा आपल्या आत्म्याला साक्षी ठेवून आपण ती पात्रता मिळवली पाहिजे, आणि ज्या बाजूने आपला आत्मा पुरावा देईल त्या बाजूने आपण आपली आंतरिक शक्ती लावली तर तिच्यासमोर कोणीही टिकाव धरू शकणार नाही. दुसरा उपाय हा आहे की आपल्या मागण्यांविषयी आपण दृढनिश्चय केला पाहिजे आणि त्यांना गोचिडाप्रमाणे चिकटून राहिलो पाहिजे आणि मरेपर्यंत लढून त्यांचा स्वीकार करायला लावला पाहिजे. या दोन्ही सूत्रांचा या दोन्ही पुढाऱ्यांनी त्याग केला. यामुळे कॉंग्रेसमध्ये जाणे निरर्थक आहे असे मला वाटले. आणि न जाऊन मी माझे विचार अदृश्यपणे जाहीर करू शकलो आहे. यामुळे मी कॉंग्रेसमध्ये जाण्याचा विचार सोडून दिला.

बापूचे आशीर्वाद”

करसनदास चितलयांचे पत्र आले. सोसायटीमधून गुजराती निघून गेले तर सोसायटी कशी निर्माण होईल? सोसायटीत गुजराती का राहू शकत नाहीत? याचे उत्तर -

## (करसनदास चितलियांना पत्र)

"भाई केसरीप्रसादच्या राजीनाम्याबद्दल ऐकून मला वाईट वाटले. काँग्रेसमध्ये जायची त्यांना फार इच्छा होती. माझ्याशी चर्चासुद्धा झाली होती. परंतु मी त्यांना सांगितले होते की परवानगी जर मिळू शकत नसेल तर ही भावना शमवण्याकरिता जो हुकूम मिळेल त्याप्रमाणे वर्तन केले पाहिजे. परंतु ते आपली भावना दाबून ठेवू शकले नाही अशी मला भीती वाटते आहे. भाई केसरीप्रसादमध्ये असंतोष तर होताच. या प्रवृत्तीला सोसायटीत (हिंदुस्थान सेवक समाज) स्थान नव्हते. काँग्रेसमध्ये जाण्याच्या मनाईने त्यांच्या असमाधानाला सीमा राहिली नाही. गुजरातींशिवाय सोसायटी निर्णय घेऊ शकत नाही असे काही नाही. सोसायटी तर अविचल आहे. शास्त्रीयारसारखे चारित्र्यवान पुढारी त्यांच्यासारख्या इतरांना आपल्याकडे ओढल्याशिवाय राहू शकत नाही. शास्त्रीयारना ईश्वराने दीर्घायुष्य दिले तर त्यांची किंमत आज नाही तर उद्या हिदुस्थानला कळल्याशिवाय राहणार नाही. अनेक प्रकारचे कार्य सुरू असतात आणि लोक आपापल्या आवडीप्रमाणे त्याकडे आकर्षित होत असतात. यामुळे उगाच एक प्रकारचे असमाधान निर्माण होत असते. अखेरीस निराशा तर असतेच. अशा वेळी शास्त्रीयारची आठवण येईल आणि पिडीत लोक त्यांचे स्मरण करतील.

मोहनदासचे वंदेमातरम"

७-९-१९१८

काल आश्रमात जाण्याचा निश्चय व्यक्त केला असता मगनलालभाईंनी चारेक दिवस इथेच राहा अशी सूचना केली. लगेच म्हणाले आता मी इथे राहू शकेन असे वाटत नाही. मला येथील वातावरण फार शुष्क वाटते. सकाळी उठल्याबरोबर तर ईश्वराचे नाव कधीही ऐकायला मिळत नाही. मला खूप वाटत होते की सकाळी उठल्याबरोबर ईश्वराचे नाव, कोणते तरी गोड संगीत कानावर पडावे. इथे तर कोणी ऐकवणाराच नाही. आज मी चारेक वाजता उठलो होतो. त्या वेळी माझ्या मनात या भावना इतक्या काही उचंबळून येऊ लागल्या की मला रडू येऊ लागले. सायंकाळी काही शांतता हवी तर कोणी तरी व्हायोलीन काढतो आणि ठाकठोक करून कान चिरून टाकतो.

आज सायंकाळीसुद्धा मला त्यांनी विचारले, आधीच्या व्हायोलिनमधून कोणते सूर निघत होते? एखादा भामटा गात गात जाताना ऐकला, तरी मला तर त्याचे गाणे ऐकून आनंद होतो. मी तुला सांगितलेच आहे की, 'तू गातोस हे ठीक आहे. त्यात काहीच गैर नाही. तुला गाण्याची सवय लागावी हीच माझी खरी इच्छा आहे'.

चार्लीला पत्र लिहिले -

## (चार्ल्स फ्रेड्रिक ॲन्ड्र्यूज यांना पत्र)

(संपूर्ण गांधी वांङ्मयात याची तारीख ३ सप्टेंबर १९१८ दिली आहे.)

"प्रिय चार्ली,

"दररोज माझ्या प्रकृतीत सुधारणा होत चालली आहे. माझी मुळीच काळजी करू नको. आपण जरी शरीराने भेटू शकत नसलो तरी आपल्या आत्म्याचे मिलन तर होतच असते. आता मी थोडे थोडे वाचायला सुरुवात केली आहे. सध्या गुजरात माविद्यालयातील प्राध्यापक आनंद शंकर ध्रुव यांचा धर्मावरील सुंदर निबंधसंग्रह वाचतो आहे. तू त्यांना भेटलेला तर आहेसच. हे निबंध शुद्ध सोने आहे. या क्षेत्रातील मोठ्यात मोठ्या विद्वानांपैकी ते एक आहेत. या निबंधामधून मला फार समाधान मिळाले आहे. आत्म्याच्या मिलनाचा अर्थ चांगल्या प्रकारे समजून घेण्यात त्याची मदत झाली आहे. हे शब्द मी आपल्याकरिता व्यापक आणि खोल अर्थाने वापरतो आहे.

"मी तुला सांगितलेच आहे की कोणत्याही कारणाकरिता का होईना मला तुला बोलपूर सोडायला लावण्याची इच्छा नाही. सध्या तुझे काम तिथेच आहे आणि इतर कुठेही नाही.

"वसाहतीच्या प्रश्नावरील रद्दी हिंदी पुस्तकाला तू प्रस्तावना का लिहिली? मी नुकताच हे पुस्तक चाळले होते, आणि मला वाटते तू पात्रता नसलेल्या पुस्तकाला प्रमाणपत्र दिले आहे. बेसुमार चुका, तितकीच खुशामत, जाहिराती या सर्व गोष्टींचा प्रचार करण्याची तर तुला इच्छा नाही ना? माझा विचार हे पुस्तक काळजीपूर्वक वाचायचा आणि त्यातील ठळक चुका तुझ्याकरिता नोंदवून ठेवायचा आहे. लेखकाने आपले नाव दिले नाही यात त्याचा काही गुण आहे असे मला वाटत नाही. लेखकाची ज्यांना आपले नाव कळावे अशी इच्छा आहे त्यांच्यापासून तर तो अज्ञात राहत नाही. या प्रस्तावनेतून तुझे सौजन्य दिसून येते. तू हिंदुस्थानी झाला आहेस आणि लॉर्ड विलिंग्डन नुकताच म्हणाले त्याप्रमाणे तुझ्यात 'नाही' म्हणायची हिंमत नाही. माझी तर खूप इच्छा आहे की याबाबतीत तू तुझा इंग्रजी स्वभावच कायम राहू द्यावा आणि जिथे खरोखर 'नाही' म्हणायची आवश्यकता असते तिथे 'नाही'च म्हणावे. अनेकदा कठोरपणे 'नाही' म्हणणे हा प्रेमाचा अधिकार असतो. परंतु मला उपदेश करायची उच्छा नाही.

या बाबतीत तू सुधरायला पाहिजे. नाही तर जितके बदमाश मला भेटायला येतात त्या सर्वांना मी तुझ्याकडे पाठवीन. मग त्यांच्याबरोबर आणि गुरुदेवांबरोबर तू तुझा हिशेब निपटवशील.

मोहन"

शंकरलाल बँकरना -

## (शंकरलाल बँकर यांना पत्र)

"अनसुयाबहेनचे पत्र पाहिल्यानंतर माझ्या लक्षात आले की तुम्ही तुमच्या प्रकृतीसंबंधी माझ्यापासून बरेच काही लपवत आहा. असे करण्याची आवश्यकता नव्हती. माझी इच्छा आहे की डॉक्टरांच्या औषधांवर अवलंबून राहून शरीरासंबंधीच्या तुमच्या वर्तनात अनुचित ढिलेपणा येऊ देऊ नका. ही गोष्ट माझ्या जीवनभरातील अनुभवांवरून माझ्या मनात खूप जबरदस्त ठसलेली आहे. मी जिभेच्या मोहाने शरीराबरोबर अनाठायी सूट घेतली आणि आता त्याची योग्य शिक्षा मी भोगतो आहे. माझी मान्यता आहे की ९९% टक्के आजारांमागे हाच इतिहास आढळेल. मी कबूल करतो की हा शारीरिक संयम फार कठीण आहे. यामुळे यातच पुरुषार्थ आहे. आपल्या शरीरात राहिलेल्या शत्रूंचा पराभव करण्यापेक्षा संपूर्ण जगाचा पराभव करणे सोपे आहे. त्याकरिता तर मी बरेच काही सहन केले आहे. यामुळे जो माणूस यांना पराजीत करील त्याच्याकरिता हा विजय फार सोपा आहे. जे स्वराज्य मला, तुम्हाला आणि सर्वांना मिळवायचे आहे ते खरे पाहता तर हेच आहे. अजून काय लिहू? हे सर्व लिहिण्याचा आशय इतकाच आहे की तुम्हाला जर देशसेवा करायची असेल तर ती याची देही याची डोळा केली पाहिजे. तुमच्या भावना उच्च आहेत. योग्य आत्मिक शक्तीशिवाय कितीही उच्च भावना असली तरी ती व्यर्थ असते.

मोहनदासचे वंदेमातरम"

९-९-१९१८

रणछोडलाल पटवारींना प्रकृतीविषयी -

**(रणछोडलाल पटवारींना पत्र)**

. . . अस्पृश्यांसंबंधीचा लेख 'पताका' शोधून वाचून टाकेन. विरोधी पक्षाला पूर्णपणे समजून घेण्याची माझी इच्छा असते, आणि त्यातच मला माझा धर्म दिसतो. यामुळे मला जरी माझा धर्म सोडावा लागला तरी मला त्यामुळे क्षणभरःही दुःख होणार नाही. आजसुद्धा मी अनेक युक्तिवाद पाहिले आहेत. ते सर्व रूढ धर्मावर आधारित आहेत. शुद्ध धर्मावर आधारलेला एकसुद्धा युक्तिवाद मी आजपर्यंत ऐकला नाही. अंत्यजांचा प्रश्न मी तर केवळ धार्मिक दृष्टीतून उपस्थित केला आहे. राजकारणाशी त्याचा काहीही संबंध नाही. राजकारणावर त्याचे निश्चितच परिणाम होतील, परंतु मी त्यावर दृष्टी ठेवली नाही. रुढीधर्माला किंचितही मान देण्यात येऊ नये असे म्हणण्याचा माझा उद्देश नाही. शुद्ध धर्म अविचल असतो. रुढीधर्म कालपरत्वे बदलत असतो. मनुस्मृतीत सांगितलेल्या प्रत्येक वचनाप्रमाणे अजूनही आपण चालू तर ती शुद्ध अनिती होईल. अशा वचनांचा तर आपण चुपचाप त्यागच केला पाहिजे. . . ."

देवदासला (आहारात झालेली गडबड आणि डॉ. राय यांना लिहिलेल्या पत्राचा सांर सांगणारे) पत्र -

## (देवदास गांधींना लिहिलेल्या पत्रातील काही भाग)

“तुला तर माहीत आहे मी अशक्त माणसाकरिता द्विदल धान्यांच्या - डाळींच्या - विरुद्ध आहे. मला तेलाबद्दल वाटणारी भितीही तुला माहीत आहे. सर्व डॉक्टरांनी मला मूग आणि मुगाचे पाणी घ्यायला सुचवले होते. शरीराची बांधणी कोणत्या तरी चरबीशिवाय म्हणजे स्निग्घ पदार्थांशिवाय आणि ज्यांना आपण प्रथिने म्हणतो त्यांच्याशिवाय करणे कठीण आहे. दुधातील प्रथिने आणि त्यातील स्निग्धांश लगेच रक्तात मिसळू शकतात. तेलातीत चरबीचे असे नाही. प्रत्येक द्विदल धान्यात प्रथिने असतात. परंतु डाळींमधील प्रथिने पचत नाहीत. असे असूनही वरीलप्रमाणे मी दोन्ही घेतले. मला वाटते की ही चूक झाली. दुधाचा पर्याय शोधताना अशा चुका होत असतातच. कोणते तरी तेल घेतल्याशिवाय भागू शकत नाही. यांचे प्रमाण कळायला पाहिजे. हा शोध घेताना चुका तर होणारच. आणि केव्हा केव्हा माघारही घ्यावी लागते.”

हरिलाललाचे पत्र. स्वयंपाकात प्रगती करण्याचे साधन शोधतो आहे, परंतु त्यात वेळ फार वाया जातो.

उत्तर -

## (हरिलाल गांधींना पत्र)

स्वयंपाकात वेळ जातो हे तर आहेच. परंतु हा वेळ वाया जातो असे माझे मत नाही. आणि या वेळात कोणते तरी मोठे काम करता येऊ शकते हेसुद्धा सामान्यपणे खरे नाही. स्वयंपाकात जितका वेळ जातो त्यापेक्षा जास्त वेळ वाया घालवणारे ९५% लोक असतात. उदारपणे मोजल्यानंतरचा ९५% हा आकडा मी सांगतो आहे. यामुळे माझे म्हणणे आहे की ज्या माणसाला खूप काम काम असते तो माणूस इतक्या झपाट्याने स्वयंपाक करून टाकतो की तुला आश्चर्य वाटेल. माझेच उदाहरण द्यायचे तर मी विलायतेत असताना  मला अभ्यासाकरिता खूप वेळ द्यावा लागायचा. तेव्हा मी स्वयंपाक करण्याकरिता अर्ध्या तासाहून अधिक वेळ देत नसे. त्याकरिता सकाळसंध्यासकाळी अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ लागत नसे. सकाळी मी सोजी करत असे. त्याकरिता बरोबर वीस मिनिट लागायचे. आणि सायंकाळचा माझा स्वयंपाक म्हणजे सूप तयार करणे. त्याला हलवावे लागत नसे. यामुळे त्याचे सामान तयार करण्याकरिता जितका वेळ लागेल तितकाच लागायचा. सूप चुलीवर ठेवल्यानंतर मी त्याच्याजवळ बसून राहत असे आणि वाचत असे. काशीचे कोणी विद्यार्थी माझ्याकडे येत असतात. त्या सर्वांना मी विचारत असतो की तुम्ही काय करता. बहुतेक ब्राह्मण स्वयंपाक करत असतात. एक विद्यार्थी म्हणाला की मी खिचडी तयार करत असतो आणि ती दूध आणि लोणच्यासोबत खातो. तो जेव्हा ती खिचडी खातो तेव्हा पोळीही तयार होत असते. सायंकाळी तो पोळी दुधाबरोबर खातो. अशा प्रकारे या सर्व कामाकरिता त्याला अंदाजे पाऊण तास लागतो. हे तर मी फार टोकाचे उदाहरण दिले आहे. तू इतक्या काटकसरीने राहावे अशी माझी इच्छा नाही. परंतु स्वयंपाकाला फार कमी वेळ देऊनही भागू शकते याचे मी उदाहरण दिले आहे. पहिल्या विद्यार्थ्याचे शरीर निरोगी आणि धष्टपुष्ट होते. याचे कारण खिचडी, दूध वा दही आणि लोणचे यातून त्याला बहुतांश पोषण मिळत असे. ज्याला चांगले दूध आणि तूप मिळेल त्याला इतर पदार्थांची फार कमी आवश्यकता असते. तू नेहमी स्वयंपाक करावा असा माझ्या लिहिण्याचा हेतू आहे असे समजू नकोस. परंतु वेळ आल्यानंतर स्वयंपाक करण्यात तू मागेपुढे

पाहू नये आणि वेळ वाया गेला असे समजून अकारण निश्वास टाकू नये म्हणून मी वरीलप्रमाणे लिहिले आहे. तसे तर तुझी परिस्थिती सुधारल्यानंतर चंचीला (चंचलबेन गांधी, हरिलाल गांधींची पत्नी) बोलावून स्वाद आणि भोग घेण्यासंबंधात मी सांगण्यासारखे काहीही नाही. परंतु जी चूक झाली आहे ती यापुढे परत व्हायला नको. एकाएकी श्रीमंत होण्याचा लोभ तू करू नये अशी माझी इच्छा आहे.

सोराबजींच्या मृत्यूची आठवण ठेव, डॉ. जीवराज महेतानी अंथरूण धरले आहे आणि जगण्यामरण्यात हेलकावे खात आहेत, सर रतन टाटा (१८७१ ते १९१८) वारले आहेत. या सगळ्यांचा विचार कर. जो देह इतका जास्त क्षणिक आहे त्याच्याकरिता इतकी अधिक धडपड का करायची? पैशाकरिता धावपळ का करायची? साधारण आणि निर्धाराने केलेल्या प्रयत्नाने जितका पैसा मिळवता येईल तितका मिळव. परंतु मनातून निर्धार कर की पैसा मिळवण्याकरिता तू सत्याचा मार्ग कधीही सोडणार नाही. असा निश्चय करून तुला जितका पैसा मिळवायचा असेल तितका आनंदाने मिळव.

बापूचे आशीर्वाद”

डॉ. रायचे पत्र आले. दुधातील काही तत्त्व द्विदल धान्यात म्हणजे डाळींमध्ये आहेत. जसे चरबी, केसीन, मिल्क शुगर काही विशिष्ट डाळींमध्ये आहेत. जास्तीत जास्त मसूर आणि वाटाण्यांच्या डाळीत आहेत. महुवा म्हणजे महुवाच्या बियांच्या तेलातसुद्धा ते असते. असे असले तरी दुधाचा सुंदर पर्याय मिळणे कठीण आहे. असे असतानाही दूध आर्थिक कारणांकरिता घेणे शक्य नसेल तर अनेक गायी वासरांना पाहिले की जास्त दूध देतात. असे लिहिल्यानंतर त्यांनी औषध म्हणून मद्यपानाचे सूत्र थोडक्यात सांगितले आणि एक मित्र म्हणून दूध घेण्याचा आग्रह केला. त्याचे उत्तर -

## (डॉ. पि. सी. राय यांना पत्र)

"माझ्याकरिता तुम्ही समजता इतका दुधाचा प्रश्न सोपा नाही. वासराबद्दलचा समताभाव मला दूध घेण्यापासून अडवतो असेही नाही. परंतु आजारातसुद्धा दूध आणि त्यापासून तयार केलेले पदार्थ न घेण्याचे व्रत मी जाणीवपूर्वक घेतले आहे. आणि मला वाटते की समजूनउमजून काही उद्दिष्टांकरिता घेतलेले व्रत तोडण्यापेक्षा तर मरणे चांगले. आता मी जे परिणाम भोगतो आहे ते सर्व परिणाम त्या वेळीही माझ्यासमोर होते. त्या वेळीही मला माहीत होते की दुधाला पर्याय मिळवणे फार कठीण आहे. तुम्ही सांगितलेल्या तेलांमधील एखादे तेल इतके शुद्ध करू शकाल काय की जे सहज पचू शकेल? तुम्हाला माहीत आहे की अमेरिकेतील रसायनशास्त्रज्ञानी सरकीच्या तेल इतक्या प्रमाणात शुद्ध केले आहे. सरकीचे तेल शुद्ध केल्याशिवाय खाण्यासारखे होत नाही. परंतु लोक आता ते बेधडक खात आहेत. मी असे म्हणत नाही की मी म्हणतो तितक्या पातळीवर त्यांना ते ते तेल शुद्ध करणे शक्य झाले आहे. परंतु हा तर प्रमाणाचा प्रश्न आहे.

सेवक,

मो. क. गांधी"

२०-९-१९१८

आता प्रकृती बरीच समाधानकारक आहे. प्रार्थनेला जात असताना दुर्गाचे हालहवाल विचारून गेले. अनेक भाषणेसुद्धा दिली. पत्र तर सुरूच असतात. राष्ट्रीय शाळांमध्ये परिवर्तन. सरोजिनी नायडू बिहार छात्र संमेलनात अध्यक्षपदी असल्यामुळे त्यांना पत्र -

## (सरोजिनी नायडू यांना पत्र)

तुम्ही मला जे प्रश्न विचारले आहेस तर त्यावरून लक्षात येते की तुम्हाला माझ्या लाजिरवाण्या परिस्थितीची, माझ्या आजाराची कल्पना आहे. माझ्या प्रकृतीत सुधारणा होत चालली आहे. मी केवळ ओसरीत थोड्या चकरा मारू शकतो. याहून जास्त चालण्याइतकी शक्ती माझ्यात नाही. पूर्णियाच्या लोकांना माझी उपस्थिती असावी अशी फार इच्छा असल्यामुळे तुमच्याबरोबर पूर्णियाला येण्याची माझी फार इच्छा होती. परंतु माझ्याकरिता तसे करणे अशक्य आहे. तरीही आशा करतो की तुम्ही तिथे सरळ जाल आणि हिंदी वा उर्दूत - राष्ट्रभाषेत, जे नाव द्यायचे असेल ते द्या, भाषण द्या. तुमच्या उदाहरणाने तेथील तरुण राष्ट्रभाषेत बोलणेचालणे शिकतील. त्यांच्याकरिता हिंदी अथवा उर्दू केवळ राष्ट्रभाषाच नाही, ही तर त्यांची स्वतःची मातृभाषा आहे. दोन शब्द अवश्य लिहाल.

तुमचा,

मो. क गांधी”

बिहारमध्ये पुंडलीकला त्रास. त्याचा निर्धार. पोलीस अधिक्षकाला न घाबरता खरे उत्तर. भविष्यात कसे वर्तन करायचे यासंबंधी त्यांना पत्र -

## (पुंडलीक यांना पत्र)

“भाईश्री पुंडलीक

“तुमचे प्रत्येक पत्र मी काळजीपूर्वक वाचत असतो. तुमची प्रत्येक उत्तर बरोबर होते. तुमचा प्रभावच असा आहे. अधिक्षकाने केलेला अपमान सहन करण्यात जे शौर्य असते ते अपमानाच्या बदल्यात अपमान करण्यात नसते. तुमच्या सहनशीलतेने अधिक्षकाला जितका त्रास झाला त्याच्या एक शतांशही त्रास त्याला तुम्ही त्याचा अपमान केल्याने झाला नसता. त्याची तर इच्छा होती की तुम्ही आवेशात येऊन त्याला काही अपशब्द म्हणावे.

“आता तुमच्या प्रश्नांचे उत्तर देतो. पाठशाळा वा भितीहरवा सोडण्याची ताकीद मिळाली तर पाठशाळा वा भीतिहरवा सोडून मला तार करा. अधिक्षक जर काही प्रश्न विचारील तर जे सत्य असेल तेच उत्तर द्या. पूर्ण सत्य सांगा. मी जे काही लिहितो ते सांगण्यात काहीही हरकत नाही.

“तुमच्या प्रामाणिकपणावर माझा पूर्ण विश्वास आहे.

मो. क. गांधी”

२१-९-१९१८

प्राणजीवन महेतांचा एक मोठा लेख. मॉनेग्यूच्या एका भाषणावरून गुजरातला स्वातंत्र्य देण्याची एक सूचना केली आणि त्यावरून एक लेख लिहून काढला. लांबलचक. तेहत्तीस पानांचा. गुजरातचे कलाकौशल्य, धर्माशी बांधिलकी, राजकीय बुद्धी वगैरे कारणांमुळे स्वराज्य मिळवण्याची विशेष पात्रता. त्याविषयी बापू म्हणाले - डॉक्टर थोडक्यात लिहिणे शिकलेच नाही. ही सूचना कोण स्वीकारील?

याच्या उत्तरार्थ तार -

## (डॉ. प्राणजीवन महेतांना तार)

"मला वाटते की लेख प्रकाशित करू नये. परंतु प्रकाशित करायचाच असेल तर गुजरातच्या विशेष पात्रतेचा भाग काढून टाका. पत्रात सविस्तर लिहितो."

त्यांना पत्र -

## (डॉ. प्राणजीवन महेतांना पत्र)

"तुमचा लेख काळजीपूर्वक वाचला. काल एक तार केली होती. आज दुसरी केली. विचार चांगले आहेत, परंतु सध्याच्या वातावरणात त्यावर अंमल होण्याची किंचितही शक्यता नाही. दुसरा कोणताही प्रांत याचे समर्थन करील असेही नाही. तुम्हाला कल्पना असेल की बंगाल याकरिता खूप धडपडतो आहे. आपल्याला सर्वात आधी स्वराज्य मिळावे म्हणून त्याचा गुप्तपणेही प्रयत्न सुरू आहे. गुजरातला सर्वात आधी स्वराज्य मिळावे म्हणून कोण तयार होणार नाही? तुमची सूचना थोड्या वेगळ्या भाषेत शर्मांनी केंद्रीय विधिसभेत काही दिवसांपूर्वी मांडली होती. त्या वेळी बहुतेक सदस्यांनी ही सूचना हास्यास्पद ठरवली होती. अर्थात ही पद्धत उचित नव्हती. मॉनेग्यूंनी तिला गंभीरपणे घेतले, परंतु सुचवले की इतका मोठा फेरबदल करणे हे ब्रिटिश अंमलदारांचे काम नाही, परंतु यानंतर तयार होणारी कौन्सिल त्यावर विचार करू शकेल. इतके तुमच्या सूचनेविषयी.

"गुजरातच्या श्रेष्ठतेविषयी तुम्ही जो युक्तिवाद केला त्यामुळे तर अडचणी अजूनच वाढतील. आज ही गोष्ट भांडणे वाढवणारी ठरेल. महाराष्ट्र स्वराज्याकरिता अजून जास्त पुरावे देऊ शकेल. मद्रास म्हणेल की आम्ही तर पश्चिमेच्या धोरणाने चिंब भिजलेलो असल्यामुळे आमची बरोबरी कोणीही करू शकत नाही. गुजरात फार मागासलेला देश आहे. असे सामान्यपणे समजले जात असते. आणि जो युक्तिवाद तुम्ही आपल्याकरिता वापरता तो समोरचा पक्ष वापरील. या सर्व परस्पर विरोधी गोष्टींनी आपण घाबरून जाण्याचे कारण नाही. परंतु स्वराज्याच्या या कामाची सुरुवात आपल्या प्रांतात करण्याकरिता आपण आपल्या पात्रतेचा विचार करणे आवश्यक आहे. इतका सगळा विचार करून जे लिहायचे असेल ते लिहा. त्यावर अंमल करायला मी तयार आहे.

मोहनदासचे वंदेमातरम"

आज अपूर्व आनंदात होते. प्रार्थनेनंतर सायंकाळी 'पिलिग्रिम्स प्रोग्रेस' वाचायला सुरुवात केली.

"मित्रहो, याचा लेखक कोण आहे? जॉन बनियन. तो कोण होता हे तुम्हांला माहीत आहे? आपल्या प्रह्लादसारखाच तो तत्त्वनिष्ठ होता. सत्याकरिता प्रह्लादला जसा संकटांचा सामना करावा लागला होता तसेच त्याला सत्याकरिता तुरुंगात जावे लागले होते. आणि ज्याप्रमाणे आपल्या टिळक महाराजांनी तुरुंगात 'गीतारहस्य' लिहिले तसेच त्यांने तुरुंगात तीर्थयात्रा करणारांचे प्रवासवर्णन लिहिले. याला प्रवासवर्णन म्हणा की उन्नती म्हणा की प्रगती म्हणा.

"गीतेवर जशी भाष्ये आहेत तसेच 'पिलिग्रिम्स प्रोग्रेस' हे बायबलवरील एक भाष्य आहे. बायबलवरील भाष्यसुद्धा म्हणता येणार नाही. बायबलमधील सर्वात सुंदर भागाचे विवेचन आहे. इंग्रजीत तर हे पुस्तक अतिशय महत्त्वाचे गणले जाते. हे जवळपास बायबलच्या बरोबरीचे पुस्तक आहे. आणि बनियनने हे इतक्या सरळ, सुंदर भाषेत मुलांकरिता लिहिले आहे की तेथील मुलांकरिता हे अद्भुत पुस्तक झाले आहे. यामुळे तुलसीदासजी जसे उपोद्घातात रामायणासंबंधी म्हणाले तसेच या पुस्तकासंबंधी लेखक म्हणतो की भविष्यात सर्व लोक हे पुस्तक वाचतील. आणि रामायणासारखेच हेसुद्धा आहे. तुलसीरामायणचे मुले रसपान करतात आणि मोठे लोक इतस्तः भरकटतात. तसेच हे पुस्तकसुद्धा मुलांना अतिशय रस वाटेल असे आहे. परंतु आता तर हे पुस्तक आपण वाचत आहो. मुलांनो, पाहा - हा प्रवासी 'संसाररुपी वनात भटकत होता. आपल्याकडेही संसाराला भयंकर अरण्याचे रूप म्हणतात. याचप्रमाणे बनियनसुद्धा संसाराला अरण्य म्हणतो. अशा प्रकारे संसाररुपी अरण्यात भटकत भटकत थकलाभागला होऊन तो एका भयंकर गुफेत येऊन पोहोचतो. तो काही शारीरिक श्रमानेच थकलाभागला झालेला नव्हता. त्यांचा आत्मासुद्धा थकला होता. खूप विचार केला, अनेक ठिकाणी अनेक गोष्टी पाहिल्या, त्यांच्याबद्दल समजून घेतले, परंतु त्या सर्व त्याला निरर्थक वाटल्या. अखेरीस बिचाऱ्यांचा आत्मा थकलाभागला होऊन कोमेजून गेला. शेवटी तो थकूनभागून झोपून गेला. झोपला आणि त्याला स्वप्न पडले. स्वप्नात त्याने काय पाहिले? रुखी (मगनलाल गांधींची मुलगी), त्याने कोणाला पाहिले माहीत आहे? एका फाटकेतुटके कपडे घातलेल्या माणसाला. बरं, मुलांनो आता सांगा सुदामा श्रीकृष्णाकडे गेला तेव्हा त्याने कसे कपडे घातलेले होते? त्याने काय रेशमी काठाचे धोतर, जरीचा कोट, खूप किमती पागोटे आणि कशिदा काढलेला दुपट्टा घातलेला होता? तुम्हांला तर कल्पना नसेल, पण मला कल्पना आहे कारण मी सुदामाच्या गावात, पोरबंदरमध्ये जन्मलेलो आहे. बरं जाऊ

द्या. सुदामाचे तोंड कुणीकडे होते? त्याच्या घराकडे होते काय? मुलांनो, तो तर घर सोडून प्रभूला भेटायला चालला होता. तसेच आपला हा प्रवासीसुद्धा घराकडे तोंड फिरवून दुसरीकडेच चालला होता. आणि त्याच्या पाठीवर काय लादलेले होते? रुखी, आपण कोचरबमध्ये होतो तेव्हा पाच मणांचे पोते घेऊन मजूर यायचा. तो घामाने ओलाचिंब झालेला असायचा. तो इतका काही वाकलेला होता की सांगू नकोस. मी त्याला सरळ उभा राहा असे कसा म्हणू शकत होतो? तसेच पोते या माणसाच्या पाठीवरही होते. याच्या हातात एक पुस्तक होते. हे पुस्तक दुसरे तिसरे काहीही नव्हते तर बायबलच होते. ते वाचून याच्या डोळ्यातून अश्रू टपकत होते. आकाशात ढग तर नव्हते, मग पाऊस कसा पडत होता? मुलांनो, गोपीचंदची गोष्ट तुम्हांला आठवते? तो जेव्हा आंघोळीला बसला होता तेव्हा त्याची आई त्याला वरून पाहत होती. आकाशात ढग तर नव्हते. मग पाऊस कुठून? तो पाऊस नव्हता, त्याच्या आईच्या डोळ्यातून पडणारे ते अश्रू होते. परंतु हा का रडत होता हे तुम्हांला नंतर समजावून सांगेन. परंतु आपल्या या प्रवाश्याच्या डोळ्यातून अश्रू टपकत होते. प्रभूच्या घरी निघालेला हा तर भक्तराज होता. यामुळे याच्या डोळ्यांमधून अश्रू वाहत होते.”

२४-९-१९१८

नानुभाईंना -

## (नानुभाईंना पत्र)

"लढाईत जाणे बंद झाले आहे असे समजण्याचे कारण नाही. (११ नोव्हेंबर १९१८ला जर्मनीने पराभव मान्य केला होता.) परंतु मला बंद होण्याचेच चिन्ह दिसते आहे. लढाईत गेल्यानेच शौर्य येते असे समजण्याचे कारण नाही. लढाईच्या बाहेर राहूनही आपण तो गुण शिकायला पाहिजे. लढाई हे अनेक साधनांमधून एक शक्तिशाली साधन आहे. परंतु हे जितके शक्तिशाली आहे तितकेच दोषपूर्णसुद्धा आहे. निर्दोष साधनानेसुद्धा आपण शूर होऊ शकतो. शरीराशीच युद्ध सुरू असल्यामुळे आत्म्याला अनात्म्याशी युद्ध करायचे आहे. ते करण्याची शक्ती जर आपण मिळवू शकलो तर त्यामुळे वीरत्व येईलच.

मोहनदासचे वंदेमातरम"

शोएब कुरेशीला -

## (शोएब कुरेशी यांना पत्र)

“माझी इच्छा आहे की माझे हस्ताक्षर तुझ्याकडे पोहोचू शकतील इतकी माझ्या बोटांच्या कांड्यात आणि बोटात शक्ती असावी. परंतु सध्या तर मित्रांच्या कांड्यांचा आणि बोटांचाच आधार घेण्यावरच समाधान मानावे लागते आहे. अलीभाईंच्या प्रकरणाची चौकशीसमितीबद्दल तर तुला सर्व काही माहीतच आहे. आपण गोगलगायीच्या वेगाने चालायला पाहिजे. आपण पुढे जातो आहो की मागे हे मला माहीत नाही. सत्याग्रहीकरिता तर मागे जावो की पुढे जावे त्याची तर प्रगतीच असते. सरकारचा हेतू चांगला असेल तर आपणा सर्वांचे चांगलेच होईल. सराकारची दानत जर वाईट असेल तर कार्यकारणाच्या अचूक कायद्याप्रमाणे सराकारवर त्याचा प्रत्याघात होईल. आणि त्यामुळे त्याचे नुकसानसुद्धा झाल्याशिवाय राहणार नाही, आपले नाही. अट इतकीच आहे की आपणही सरकारसारखे होऊ नये. मोठ्या प्रमाणात आपण वाईटाशी वागताना वाईट होत होत असतो. शठंप्रती शाठ्यप्रमाणे. असे झाले तर तणकटाप्रमाणे वाईटपण वाढतच जात असते. आपल्याकरिता तर खरा नियम ‘अनिष्टाचा सामना अनिष्टाने करू नका’ हाच आहे. जगात आपण दोन प्रकारच्या प्रवृत्ती घेऊन येत असतो. एक पशूची तर दुसरी माणसाची, म्हणजेच आसुरी आणि दैवी प्रवृत्ती. दैवी प्रवृत्ती आसुरी प्रवृत्तीवर नेहमीच विजय मिळवत असते. परंतु मी वेगळ्याच गोष्टीकडे वळलो. माझ्याकरिता जरी हा विनोदच असला तरी मी सध्या त्याकडे वळू इच्छित नाही. आपल्यासमोर जी गेष्ट आहे तिचीच जर आपण चर्चा केली तर तुझ्या लक्षात येईल की घाटेंच्या माध्यमातून मी अलीभाईंच्या निकटच्या संपर्कात आहे.

मो. क. गांधी”

१-१०-१९१८

संवत १९७४, भाद्रपद, वद्य द्वादशी. आज बापूजींचा जन्मदिवस. चार वाजताच उठून सर्व बापूजींच्या खोलीसमोर गेले. तिथे जाऊन थोडा वेळ बसले आणि भजन म्हणाले. बापूजी खोलीत झोपले होते. भजन केल्यानंतर बापूजींना प्रणाम करायला गेले. प्रणाम करणे झाल्यानंतर बापूजींनी पुढील उद्गार काढले -

## (आश्रमातील वाढदिवशी गांधीजींनी दिलेले उत्तर)

"तुम्ही सर्वांनी इथे येऊन माझ्यावर जो प्रेमाचा वर्षाव केला आहे त्याकरिता मी पात्र आहे काय? मला वाटते की मी पात्र नाही. मी सामान्यपणे इतरांशीसुद्धा सौजन्यपूर्वक शब्दात बोलत नसतो आणि आश्रमात तर मुळीच नाही. . परंतु माझ्या अंतःकरणातून मला असेच वाटत असते की तुम्ही माझ्यावर जे अगाध प्रेम करत आहा त्याकरिता मी पात्र नाही. ज्याने सेवाधर्माचा स्वीकार केला आहे त्याच्याकडून तर फार मोठ्या अपेक्षा असतात. मी जे काही केले आहे ते तर या हिशेबाने काहीही नाही. तुम्ही सगळ्यांनीसुद्धा सेवाधर्माचा स्वीकार केला आहे. मी तुम्हा सर्वांना म्हणेन की तुम्ही तुमची भक्ती जपून ठेवा. कोणताही माणूस मरेपर्यंत त्याच्याबद्दल अशी भक्ती व्यक्त करणे उचित नाही. त्याच्या मृत्यूपूर्वी त्याच्या कार्याचे परिपूर्ण मूल्यन आपण कसे काय करू शकतो? आणि तो मेल्यानंतरही त्याच्या कार्याची किंमत करण्याकरिता वेळ लागत असतो. यामुळे माणूस मेल्याशिवाय त्याच्या जयंतीचे उद्यापन करणे बेकार आहे.

"तुम्हांला दुसरे काय सांगू? आज सकाळी चार वाजण्यापूर्वी मी विचार करत होतो. सुरेंद्रने मला एक प्रश्न विचारला होता - तुम्ही माझ्याकडून जास्तीत जास्त काय अपेक्षिता? देवदासकडून काय अपेक्षिता? छोटेलालकडून काय अपेक्षिता? तुम्हा प्रत्येकाकडून मी काय अपेक्षितो हे सांगण्याऐवजी तुम्हा सर्वांकडून मी काय अपेक्षितो हे तुम्हांला सांगतो. ते हे की आपण सुरुवातीपासून तर अखेरपर्यंत जे व्रत घेतले आहे त्या सत्यव्रताचे बरोबर पालन केले पाहिजे. ज्यात आमचा मोक्ष आहे असे आपण समजतो त्या व्रताचे आपण नीट पद्धतीने पालन केले पाहिजे अशा प्रकारे काम करून तुम्ही आश्रमाचे जे उद्देश आहेत त्यांची शक्य तितकी पूर्ती करा आणि आश्रमाचे नाव उज्ज्वल करा. तुमचे काम आणि तुमचे चरित्र या सर्वांवरून लोक आश्रमाची किंमत करतील. या आश्रमाची स्थापना हिंदुस्थानच्या

सेवेकरिता करण्यात आली आहे. हिंदुस्थानच्या सेवेद्वारे आत्म्याची सेवा. आपले अनेक टीकाकार आहेत. टीकाकार तर राहणारच आहेत, परंतु आपण पहिले आणि शेवटचे सत्यपालनाचे व्रत घेतले आहे त्याचे जर आपण पालन केले तर आपण टीकेला घाबरण्याचे कोणतेही कारण नाही. आपण दंभ करत असू, पाखंड करत असू तर वेगळी गोष्ट आहे. परंतु आपले ध्येय तर हेच आहे यात काही शंका नाही. आपणा सर्वांच्या चारित्र्याची बेरीज म्हणजे आश्रम. यामुळे प्रत्येकाच्या चारित्र्यात जितकी काही वृद्धी होईल तसतशी आश्रमाची एकूण किमत वाढेल. ती वाढत जावी अशी माझी इच्छा आहे. मी हे व्रत किती प्रमाणात पाळतो आणि पाळू शकतो हे मी नेहमी तपासत असतो. मला माझ्यात अनेत उणिवा दिसत असतात. या जन्मात मी या सर्व उणिवा काढून टाकू शकेन की नाही हे मला माहीत नाही. तुमच्यात आणि आश्रमात ज्या उणिवा आहेत त्या माझ्यामुळेच आलेल्या आहेत. तुमच्यातील उणिवा काढून टाकण्यात मला यश मिळावे म्हणून तुम्ही इश्वराजवळ प्रार्थना करावी अशी माझी इच्छा आहे. ईश्वराने मला ही शक्ति द्यावी हीच माझी मागणी आहे. तुम्हीसुद्धा तुमच्या कर्तव्यात यशस्वी व्हा. मी आणि तुम्ही एकमेकांना मदत करून आपण सर्वांनी शक्तिमान व्हावे हीच माझी मागणी आहे. दुसरे काय मागू? तुमच्या भक्तीचे फळ मिळाल्याशिवाय राहणार नाही. यामुळे आता तुम्ही जा आणि सगळे आपापल्या कर्तव्यात रममाण व्हा.”

२-१०-१९१८

रात्रीच्या सुरुवातीलाच जीवाची तगमग सुरू झाली. - ऑक्टोबरच्या २ तारखेला भयंकर आजार. देवदास, हरिलाल आणि छोटेलाल यांना पत्र. गीताजीवन. गीतेच्या दुसऱ्या अध्यायाचे अध्ययन. विहाय कामान यः सर्वान् या श्लोकाचे दोनशे वेळा पठन. ब्राह्मी स्थितीचा अनुभव.

११-१०-१९१८

आश्रमात इंफ्ल्युएंझा. शंकरलाल परीख आजारी. अशक्तपणा असूनही गंगाबहेनच्या मुलीच्या आजाराचे कळतात त्यांना पत्र -

# (गंगाबहेन मजमुदारना पत्र)

तू, किकी वगैरे आजारी आहा या विषयीचे पत्र आजच मिळाले. परंतु ईश्वरकृपेने तुम्हा दोघींचीही प्रकृती सुधारणेच्या मार्गावर आहे हे वाचून आनंद झाला. सेवाधर्म ज्याने स्वीकारला आहे त्याचे शरीर वज्रासारखे असले पाहिजे. एकेकाळी आपले पूर्वज तसे करू शकत असत. आज आपण दीन झालो आहो. आणि वातावरणातील अनेक विषारी जंतू आपला ताबा घेतात. या दुर्दशेतून सुटण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे संयम वा मर्यादा. या आजारात दोन गोष्टींची काळजी घेतली तर शरीराला किमान धोका राहतो असे डॉक्टरांचे मत आहे, आणि ते खरे आहे. तब्येत चांगली झाली असे वाटल्यानंतरही द्रव आणि लवकर पचेल असा साधा आहार घे आणि अंथरुणात पडून राहा. दुसऱ्या वा तिसऱ्या दिवशी ताप उतरला की आपला आजार दुरुस्त झाला आहे अशी अनेकांची फसगत होते आणि माणूस आपले कामकाज करू लागतो, नेहमीचा आहार घेऊ लागतो. यामुळे आजार परत जोर धरतो आणि अनेकदा त्यामुळे प्राणावर बेतते. यामुळे तुम्ही दोघेही अजून अंथरुण सोडू नये अशी माझी विनंती आहे. मला प्रकृतीची माहिती सतत देत राहा. मी अजून अंथरुणाला खिळलेलो आहे. बरेच दिवस लागतील. परंतु किती हे तर मी प्रकृती सुधारल्यानंतरच सांगू शकेन. पत्रे लिहिण्याचीसुद्धा डॉक्टरांची मनाई आहे. परंतु तुम्हांला लिहिल्याशिवाय मी कसा राहू शकतो? तिथे राहणे जर कठीण होत असेल आणि इथे यायचे असेल तर अवश्य या. सध्या आश्रमात दहा आजारी आहेत आणि त्यांत शंकरलाल परिखचा आजार काळजी करण्यासारखा आहे. त्यांनासुद्धा आज थोडे बरे वाटते आहे.

मोहनदास गांधीचे वंदेमातरम"

३१-१०-१९१८

हरिलालची पत्नी (चंचलबेन गांधी) वारल्यामुळे त्यांना दररोज पत्र लिहीत असत. आजचे पत्र थोडे विशेष होते.

## (हरिलाल गांधींना पत्र)

“तुझे पत्र मिळाले. आज विशेष काय लिहावे हे सुचत नाही. तुझे स्वास्थ्य चांगले कसे राहील याचा विचार करत होतो. माझ्या एखाद्या वाक्याने तुला जर बरे वाटणार असेल तर ते वाक्य मी ताबडतोब लिहून टाकले असते. हा संसार कसा आहे हे तुझ्या लक्षात आले की नाही हे मला माहीत नाही. परंतु मला तर क्षणोक्षणी त्याचे दर्शन होत असते. आणि जसे ऋषिमुनींनी याचे गान केले तसेच मला ते दिसते आहे. आणि ते मी इतके सूक्ष्मपणे पाहू शकतो की मला यात किंचितही रस वाटत नाही. शरीर आहे तोपर्यंत काही ना काही तर करावेच लागेल. यामुळे माणसाने शुद्धाहून शुद्ध कार्यात स्वतःला गुंतवून ठेवणेच मला आवडते. आणि अशा प्रकारे जर काम करत राहता यावे म्हणून जर कोणताही संयम पाळावा लागणार असेल तर त्यामुळे मी तर आनंदलहरीतच बुडून जातो. माझ्या या म्हणण्यात मुळीच अतिशयोक्ती नाही. ही गोष्ट ज्या प्रमाणात तुला कळू शकेल आणि त्यावर तू अंमल करू शकशील त्या प्रमाणात माणूस खरे सुख मिळवू शकतो. या संकटामुळे जर तुझी मनःस्थिती अशी होत असेल की तू त्या सुखाचा भोक्ता होशील तर तर हे संकटही स्वागतार्ह आहे असे म्हणावे लागेल. तुझे मन थोड्याशा वेळेकरिता जरी काळजीमुक्त होऊ शकत असेल तर तू यावर विचार कर. सर्वांची प्रकृती चांगली आहे. सर्व आजारी चांगले होत आहेत. माझेही सर्व ठीक आहे. बाला तू सर्व पत्रे वाचून दाखवत असशील असे समजून मी वेगळे पत्र लिहीत नाही.”

५-११-१९१८

# (व्ही. एस. श्रीनिवास शास्त्री यांना पत्र)

“भाईश्री शास्त्रियार,

”तुमचे पत्र मिळाले. मी तुमच्या पत्राचे महत्त्व पूर्णपणे जाणून आहे. मी माझ्या प्रकृतीची शक्य तितकी जास्त काळजी घेतो आहे याबद्दल खात्री बाळगा. ज्या माणसाने कधीही अंथरुण धरले नाही त्या माणसाला जर सतत तीन महिने अंथरुणाचा अनुभव घ्यावा लागत असेल तर ही काही हसण्यावारी नेण्याची गोष्ट असू शकत नाही. माझा आजार अजून का लांबत आहे याबद्दल लिहायचे तर याचे कारण माझे अज्ञान अथवा मूर्खपणा आहे वा हे दोन्हींही आहेत. माझा आजार परत येण्याकरिता मी तर माझी शुश्रूषा करणारांना वा डॉक्टर मित्रांना विनाकारण जबाबदार धरणार नाही. ते तर बिचारे, त्यांच्या शब्दांत सांगायचे तर, माझ्या ‘सनकी’ स्वभावामुळे लाचार झालेले आहेत. असे असले तरी ते तर माझ्या शरीराच्या भागासारखेच झाले आहेत आणि मला आराम मिळावा म्हणून ते सतत प्रयत्नशील असतात. मोतिहारीच्या रेव्हरंड होजे यांनी लिहिलेल्या पत्रात स्व. डॉ. देव यांनी जो उल्लेख केला आहे तितका उतारा उद्धृत करून पाठवतो आहे. ते फार स्वतंत्र आणि उदार विचारांचे पाद्री आहेत. त्यांचा स्वभावही फार चांगला आहे. आशा आहे की तुमची तब्येत चांगली असेल वा सार्वजनिक कार्याचे ओझे उचलण्याकरिता जितकी चांगली असायला पाहिजे तितकी चांगली असेल.

सेवक,

मो.क. गांधी”

१८-११-१९१८

महमदअलींनी माझ्या पत्रातील आहाराच्या व्रताविरुद्ध एक अतिशय आग्रह करणारे पत्र लिहिले. त्याचे उत्तर -

## (महमदअलींना पत्र)

"प्रिय मित्र,

"असे वाटते युगांनंतर तुमचे पत्र मिळाले. मला फार आनंद झाला. तुमच्या पत्रामधून तुमचे अंतःकरणापासूनचे प्रेम निथळत होते. त्याकरिता मी आभारी आहे. तुमच्या प्रेमाला प्रतिसाद म्हणून मी माझ्या प्रतिज्ञेचा तोडूनमोडून का होईना तुम्ही म्हणता तसा अर्थ जर लावू शकलो असतो आणि तसे करू शकलो तर त्याकरिताही मी आनंदाने तयार झालो असतो. परंतु मी घेतलेल्या प्रतिज्ञेतून अशा प्रकारे पळवाट काढता येण्याची कोणतीही शक्यता नाही. जे व्रत मी खूप विचारपूर्वक आणि त्याचे सर्व परिणाम लक्षात घेऊन घेतले त्या व्रताची मी जर अवहेलना केली तर मी ईश्वराच्या, मानवजातीच्या आणि माझ्या स्वतःच्या नजरेतही मी खोटा ठरेन. मी जर मित्रांच्या आग्रहाला वश होऊन माझ्या प्रतिज्ञेत फेरबदल केला तर माझी जी काही उपयोगिता आहे ती पूर्णपणे नष्ट होऊन जाईल. या आजाराला मी माझ्या कसोटीचा आणि मोहाचा प्रसंग समजतो. सध्या तर मला मित्रांच्या प्रार्थनापूर्ण आधाराची आणि उत्तेजनाची आवश्यकता आहे. मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो की व्रताच्या बंधनाच्या मर्यादेत राहून हे शरीर वाचवण्याकरिता जितकी काही काळजी घेता येईल तितकी मी घेईन. आताच मला एक डॉक्टर मित्र भेटले. त्यांनी मला बर्फाची मालीश आणि खोलवर श्वास यांच्याद्वारे माझी शक्ती पूर्ववत आणून देण्याची जबाबदारी घेतली आहे. त्यांच्या मते दोन महिन्याच्या आत माझ्या शरीरात इतके रक्त गोळा होईल की त्यामुळे माझे वजन वाढेल आणि मी हिंडूफिरू शकेन आणि सामान्य मानसिक श्रम करू शकेन. आणि शिवाय या डॉक्टरवर माझा विश्वास बसला आहे आणि आहारात योग्य फेरबदल करून मित्रांचे भविष्य मी खरे ठरवू शकेन अशी आशा आहे.

"तुमच्यावर घेण्यात आलेले आक्षेप मला वाचून दाखवण्यात आले आहेत. इतके दुर्बल आणि छचोर आरोप मी अजून वाचले नाहीत. मी असे समजतो की तुमचे उत्तर स्पष्ट, सरळ आणि गौरवपूर्ण आहेत. मला तर स्पष्टपणे जाणवते की सरकारने या अडचणीच्या परिस्थितीतून मार्ग काढण्याकरिताच

समितीची नेमणूक केली आहे. ते काहीही असले तरी आपण तर समितीच्या निर्णयासंबंधात पूर्णपणे तटस्थ असलो पाहिजे. तुमचा बचाव इतका काही मजबूत आहे की समितीचा निर्णय जर आपल्या विरोधात गेला तर त्या अन्यायाच्या विरोधात आपण असे आंदोलन उभारू शकू की ज्यामुळे संपूर्ण देश क्रोधाने पेटून उठेल. मला असे वाटते की तुमचे उत्तर ऐकण्याकरिता मी जर त्या वेळी छिंदवाड्यात असतो तर किती बरे झाले असते? परंतु तोपर्यंत मी बरा होणार नाही.

"अम्मासाहेबांना माझे आदाबअर्ज सांगाल. तुम्हा सर्वांना भेटण्याकरिता, मुलांना भेटण्याकरिता आणि तुमच्याशी अजून निकटच्या संपर्कात येण्याकरिता मी आतुरलो आहे. लखनौच्या सभेत मी सांगितले होते त्याप्रमाणे तुमच्या मुक्तीमागे माझा हेतू पूर्ण स्वार्थी आहे. आपले ध्येय एकच आहे. आणि या ध्येयापर्यंत पोहोचण्याकरिता तुमच्या सेवेचा पुरेपूर उपयोग करण्याची माझी इच्छा आहे. हिंदू-मुसलमान प्रश्नाच्या योग्य निराकरणाकरणानेच स्वराज्यप्राप्ती शक्य आहे. परंतु याबद्दल आपण भेटू तेव्हा. आशा आहे की आपण लवकरच भेटू.

तुमचा,

मो. क. गांधी"

याच दिवशी श्रीमती सरोजिनी नायडूंना पत्र लिहिले. शस्त्रक्रियेत कदाचित मृत्यू होऊ शकेल असे गृहीत धरून त्यांनी पत्र लिहिले होते. त्याचे उत्तर -

## (सरोजनी नायडूंना पत्र)

“प्रिय बहेन,

”तुमचे लहानसे पत्र मला फार मोलाचे वाटते. शस्त्रक्रियेमधून तुम्ही वाचला असे दिसते. आशा आहे की तुम्ही या शस्त्रक्रियेतून यशस्वीपणे बाहेर पडाल आणि हिंदुस्थानला तुमची गोड गाणी अजून बरीच वर्षे ऐकायला मिळतील. आजारामुळे मी धरलेले अंथरुण कधी सुटेल हे मला माहीत नाही. काही केल्या माझे शरीर भरतच नाही आणि माझ्यातील शक्ती वाढतच नाही. मी खूप प्रयत्न करतो आहे. परंतु मी स्वतः माझ्यावर जी बंधने लादली आहेत त्यामुळे डॉक्टर लोक निराश झाले आहेत. मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो की या लांबलेल्या आजारात हे व्रतांचे बंधन माझ्याकरिता फार आश्वासक झाले आहे. संयम आणि शक्तिदायी बंधने तोडण्याच्या अटींवर मला जगण्याची मुळीच इच्छा नाही. माझ्याकरिता ही बंधने जरी शरीराला बांधणारी आहेत तरी ही आत्म्याला मुक्त करणारी आहेत. यामुळे मी भानावर राहतो, इतर कशानेही मी इतका भानावर राहू शकलो नसतो. ‘ब्रह्माची आणि मायाची एकाच वेळी भक्ती करता येऊ शकत नाही’ या वचनांचा इतका स्पष्ट अर्थ या व्रतांनंतरच मला कळू शकला. मला असे म्हणायचे नाही की हे सर्वांकरिता आवश्यक आहे. परंतु माझ्याकरिता तर हे आहेतच. मी जर हे व्रत तोडले तर मी अगदीच बेकार होऊन जाईन असे मला वाटते.

तुमचा,

मो. क. गांधी”

२६-११-१९१८

# (हरिलाल गांधींना पत्र)

चि. हरिलाल,

"तुला काल मी माझ्याविषयीची काही माहिती सांगितली होती. आज याबद्दल अजून काही सांगतो. माझी प्रक़ती चांगलीही आहे आणि वाईटही. किती तरी सुधारणा व्हायला पाहिजे होत्या परंतु त्या होऊन राहिलेल्या नाहीत असे वाटत असते. आता आहारासंबंधी काही तक्रार करता येत नाही. थोडा वेळ बाहेर राहिलो तर चांगले होईल असे सर्व सांगतात आणि ते वाजवीही आहे. यामुळे बाहेर जायचा विचार करतो आहे आणि त्याकरिता व्यवस्था करतो आहे. मी जाण्यापूर्वी तू आलास तर चांगले होईल. तुला जे काही म्हणायचे असेल ते तू मला निःसंकोचपणे सांगशील. तू जर माझ्याजवळही तुझे हृदय रिते करू शकणार नाहीस तर अजून कोणाजवळ करू शकशील? मी तुझा खरा मित्र आहे आणि आपल्यामध्ये काही मतभेद जरी असले तरी त्यामुळे काय फरक पडतो? आपण गोष्टी करू. शेवटचा निर्णय तर तुझ्याच हाती असेल. सध्या तुझी अवस्था स्वप्नात असलेल्या माणसारखी आहे हे मी बरोबर समजू शकतो. तुझ्या जबाबदाऱ्या वाढल्या, तुझ्या कसोटीतही वाढ झाली, आणि तुझी लालूचही वाढली. गृहस्थाश्रमी माणसाकरिता गृहस्थाईत सधवापण हे फार मोठ्या अंकुशाचे काम करत असते. तुझ्यावरील हा अंकुश निघून गेला आहे. आता तू जिथे उभा आहेस तिथून दोन मार्ग जातात. यांतील कोणता मार्ग घ्यायचा याचा निर्णय तुला घ्यायचा आहे. आश्रमात अनेकदा एक भजन गात असतात. त्याची पहिली ओळ आहे - निर्बल के बल राम. अहंकारी होऊन माणूस ईश्वराची मदत मागू शकत नाही, स्वतःचे दैन्य स्वीकारूनच माणूस मदत मागू शकतो. आपण किती तुच्छ आहो, रागद्वेषाने किती भरलेले आहो, किती विकार आपल्याला विचलित करत असतात याचा विचार अंथरुणावर पडल्यानंतर मी नेहमी करत असतो. अनेकदा माझ्या मनातील हलकटपणाची मला लाज वाटत असते. अनेकदा या शरीराचे लाड करण्याकरिता जे काही करावे लागते त्याने मी निराश होत असतो आणि मला शरीराच्या समाप्तीची इच्छा होत असते. आणि माझ्या या अवस्थेवरून इतरांच्या अवस्थेचा चांगल्या प्रकारे अंदाज करू शकतो. तुला मी माझ्या अनुभवाचा संपूर्ण लाभ देईन. त्यातून तुला जितके घ्यायचे असेल तितके घेशील. आणि हे सर्व तू येशील तेव्हाच होऊ शकेल.

बापूचे आशीर्वाद"

३०-११-१९१८

ते

६-१-१९१९

माथेरानला गेले. तिथे तेरा दिवस राहिले. १३-१२-१९१८ ला निघाले. १४-१२-१९१८पर्यंत मुंबईत राहिले. ६-१-१९१९ ला ॲन्ड्र्यूजला पत्र लिहिले.

## (सी. एफ. ॲन्ड्र्यूज यांना पत्र)

“माझ्या प्रकृतीत चढउतार उतार सुरू असतो. याची मला सवय व्हायला पाहिजे. असे असले तरी मी मुळीच घाबरलेलो नाही. मला माहीत आहे की या लांबलेल्या आजारातून पूर्णपणे दुरुस्त होऊन उठण्यापूर्वी मला अनेक चढउतारातून जावे लागेल. या क्षणी तर मला काहीही झालेले नसल्यासारखा मी दिसतो आहे. मी काही इंजेक्शन घ्यायला तयार झालो आहे आणि त्यांचा परिणामही दिसून राहिलेला आहे. हे इंजेक्शन भूक लागण्याकरिता आहेत. यामुळे माझ्या आहारात गुणात्मक आणि प्रमाणात इतकी काही वाढ झाली आहे की खादाड माणूसही इतके खात असलेला दिसणार नाही. परंतु यामुळे माझा आजार परत उलटेल की काय हे सांगवत नाही. मला असे वाटते की सूक्ष्मपणे निरीक्षण करणारा माणूस असेल आणि त्याप्रमाणे जर वेळापत्रक तयार केले तर माझा आजार परत केव्हा येईल हे सांगता येईल. सध्या मी अतिशय प्रसिद्ध डॉक्टरच्या परिचर्येखाली आहे. त्यांची इच्छा मला पंधरा इंजेक्शन देण्याची आहे. आतापर्यंत चार इंजेक्शन झाले आहेत. असे असतानाही माझ्यासमोरील चित्र अगदीच आशादायक नाही. आणि सुई टोचणे हे तर मुळीच आनंददायक होऊ शकत नाही. परंतु जिवंत राहण्याकरिता माणूस काय काय करत नसतो?

“कलकत्त्यातील बिशप वारल्याचे मी वर्तमानपत्रात वाचले. याचा तुला बराच धक्का लागला असेल. परंतु याचबरोबर ते दुःखातून सुटले असाही विचार माझ्या मनात येत असतो.

“माझ्या सोयीचा विचार करून तू कुमारी फेरींगला बोलपूरला घेऊन गेला हे चांगलेच केले. परंतु ते हे काम आवेगात केले असे मला वाटते. परंतु तिने माझ्या स्थानाची पूर्ती केली असेल तर माझ्याकरिता सांगण्यासारखे काहीही राहत नाही. कुमारी फेरिंगच्या पत्रावरून असे वाटते की तिला शांतिनिकेतनमध्ये वरच्या वर्गात इंग्रजी शिकवणे पटत नाही. वा असेही म्हणता येईल की खालच्या

वर्गातही तिला इंग्रजी शिकवण्याचे औचित्य कळत नाही. परंतु कुमारी फेरिंगमध्ये इतकी श्रद्धा आहे की तिच्याकरिता अशक्य काहीही नाही. जिथे हजारो अयशस्वी झाले आहेत तिथे ती यशस्वी झाली आहे. डॅनिश मिशनमधून ती मुक्त झाली काय? बोलपूरमधील तिचे काम पूर्ण झाल्यानंतर ती माझ्याकडे येणार आहे असे तू म्हणतोस म्हणून मी तुला हे विचारतो आहे. तिथे कोणतेही वाईटपण न घेता जर ती मुक्त झाली असेल तर ही फार मोठी गोष्ट म्हणावी लागेल. १५ तारखेपर्यंत मी मुंबईतच आहे. नंतर मी कोलंबोला जावे अशा गोष्टी सुरू आहेत. ते कितपत योग्य आहे याचा मी विचार करतो आहे. काँग्रेसचा प्रतिनिधी म्हणून माझी निवड झाली याची तू काळजी करू नको. मी अजून कोणत्याही अखेरच्या निर्णयावर पोहोचू शकलेलो नाही. वस्तुस्थिती जेव्हा माझ्यासमोर उभी राहील तेव्हा मला माझा मार्ग दिव्यासारखा स्पष्ट दिसेल. सध्या मी कोणतीही काळजी करून राहिलेलो नाही. प्रतिनिधी म्हणून जाण्याची मी वाट पाहून राहिलेलो नाही. परंतु माझ्याकरिता ही गोष्ट कर्तव्यासारखी असेल तर मी ही गोष्ट टाळणार नाही.

मोहन”

९-१-१९१९

डॉ. प्राणजीवन महेतांना पत्र.

## (डॉ. प्राणजीवन महेतांना पत्र)

"माझी प्रकृती चंद्रकलेसारखी आहे. चांगली होते आणि बिघडते. परंतु अमावस्येपासून मात्र ती निसटते. मुळव्याधीचा त्रास मात्र पूर्णपणे बंद झाला आहे. परंतु खाण्याची रुची नाही आणि शरीरात शक्ती नाही. हे दुखणे अजून कायम आहे."

१०-१-१९१९

## (ॲन्ड्र्यूजला पत्र)

"तर तू तिथे इंफ्ल्युएंझाच्या तावडीत सापडला आहेस. मला आश्चर्य वाटते की तू सतत इकडेतिकडे भटकंती करत असतानाही तुझी प्रकृती तू इतकी चांगली राखून ठेवली आहे. मला असे वाटते की ईश्वर ज्याला आपले साधन करतो, विशेषेकरून कोणताही विरोध न करता जो त्याच्या मार्गाचे अनुसरण करतो त्याचे तो रक्षण करत असतो. यामुळे मी तुझी मुळीच काळजी करत नाही. मला खात्री आहे की तुला तुझे काम करण्याकरिता आवश्यक अशी शक्ती मिळतच असेल. माझ्या प्रकृतीत तर चढउतार सुरूच असतो. माझ्या प्रकृतीकरिता मी इंग्लंडमध्ये जाण्याच्या आवश्यकतेविषयी, तिथे जाऊन काही सार्वजनिक काम करण्यासंबंधी तुला जसे जाणवते तसे मला स्पष्टपणे जाणवत नाही. हळू हळू माझा मार्ग मी शोधत जातो आहे आणि एकेक पाऊल पुढे टाकतो आहे."

मगनलालभाईंना -

## (मगनलाल गांधींना पत्र)

“आजकाल मी प्रत्येक विषयाचा खोलवर विचार करत असतो. अनेकदा त्यांतील काही भाग तुम्हा सगळ्यांना सांगण्याची इच्छा होत असते. परंतु मनाच्या संथपणामुळे आणि शरीराच्या दुर्बलतेमुळे मी लिहू शकत नाही. आज लिहिल्याशिवाय राहू शकत नाही. सध्या मी जे काही फेरबदल करतो आहे त्यात माझ्या दुर्बलतेचा काहीही भाग नाही अशी साक्ष माझा आत्मा देतो आहे. हे फेरबदल मी तटस्थ राहून पूर्ण शक्तिनिशी करतो आहे आणि त्याचे मुख्य कारण तुम्हा सर्वांचे आणि मित्रांचे समाधान करणे आहे. बाचा चेहरा मी पाहू शकत नाही. अनेकदा तिचा चेहरा गरीब बिचाऱ्या गायीसारखा वाटतो. आणि अनेकदा ती गाय आपल्याला काही सांगते आहे असे जसे वाटते त्याप्रमाणेच बाच्या चेहऱ्यावरून तिला काही तरी सांगायचे आहे असे वाटते. तिच्या या दीनभावामध्येही काही स्वार्थ भरलेला आहे असेसुद्धा मला जाणवते. असे असूनही तिचा विनय मला पराजीत करतो. या मुळे ज्या कोणत्या पद्धतीने या परिस्थितीतून सुटका होईल त्या पद्धतीने सुटका करून घेण्याची इच्छा होते. चार दिवसांपूर्वीच बा दुधासंबंधी आक्रंदन करत होती आणि अकस्मात म्हणाली, ‘गायीचे दूध वाटल्यास नका घेऊ, परंतु बकरीचे दूध घ्यायला काय हरकत आहे?‘ मला धक्काच बसला. मी जेव्हा हे व्रत घेतले होते तेव्हा बकरी माझ्या डोक्यातच नव्हती. त्या वेळी बकरीच्या दुधाबद्दल मला काहीही माहीत नव्हते. आणि (दुधाकरिता) बकरीला त्रास देत असताना मला कोणी दिसले नाही. माझे व्रत तर केवळ गायीच्या दुधाकरिता होते. म्हशीचासुद्धा मी विचार केला नव्हता. परंतु म्हशीचे दूध घेणे हे माझ्या मुख्य उद्दिष्टाला धक्का लावण्यासारखे झाले असते. बकरीच्या दुधाविषयी असे काहीही नव्हते. असे करून मी माझ्या मित्रांचा विलाप बऱ्याच प्रमाणात थांबवू शकतो असे मला वाटले. यामुळे मी बकरीचे दूध घेण्याचा निश्चय केला. बकरीच्या दुधाची माहिती कळल्यानंतर माझ्या व्रताला खरे म्हणजे काहीही अर्थ राहत नाही. परंतु त्याचबरोबर त्याचे मूल्य पूर्णपणे नाहीसेही होत नाही. असो, ते काहीही जरी असले तरी ही पळवाट काढायला मी कबूल झालो. याचे कारण मित्रांचे दुःख दिवसेंदिवस वाढत चालले होते, डॉक्टर महेतांच्या वरच्यावर तारा येत होत्या. बकरीचे जर नीट पालनपोषण करण्यात आले तर बकरीच्या आणि गायीच्या दुधात काहीही फरक नाही. इंग्लंडमधील बकरी तर गायीच्या बरोबरीनेच काय त्यापेक्षाही जास्त दूध

देते असे पुस्तकातसुद्धा आहे. आपण बकरीचे दूध हलके समजतो. परंतु ही गोष्ट हानिकारक असण्याऐवजी लाभदायी आहे असे समजण्यात येते. ते काहीही असो, मी तर माझ्याकडून जितकी पावले टाकणे शक्य होते तितकी टाकली आहेत. डॉक्टरलासुद्धा मी माझ्या चामडीच्या आत पिचकारीने सोमल, कुचला वा लोहभस्म टोचू देतो. असे करूनही प्रकृती जर ठिकाणावर आली नाही तर पाच वस्तूंचे व्रत सोडावे लागेल की काय हे मी सांगू शकत नाही. यानंतर कोणाला काही सांगायचे राहत नाही. या सर्व फेरबदलाचा काय परिणाम होतो याकडे आपल्याला धैर्याने पाहावे लागेल. अशी सूट तर घेतली आहे, परंतु तिच्याबद्दल अंतरात्म्याला विचारल्याशिवाय मी क्षणभरही राहत नाही, 'इतके परिश्रम कशाकरिता?' 'जगून काय करणार?' 'सुधारणा केल्यानंतर परत फिरायचे आहे काय?' असे प्रश्न उपस्थित होतात. जर्मनीतील कॅन्सरच्या स्थितीचा जेव्हा मी विचार करतो तेव्हा जसे आपण कौड्यांशी खेळतो तसेच कोणती तरी महान व्यक्ती आपल्याशी खेळत आहे की काय असे वाटत असते. एखाद्या गोळ्यावर फिरणारी मुंगी जशी लहान दिसते आणि इकडेतिकडे फिरत असते तसेच आपण या पृथ्वीतलावर मुंगीपेक्षाही लहान आहो असे वाटते. आणि मुंग्याप्रमाणे अज्ञानाने इकडेतिकडे हिंडत असतो, चिरडले जात असतो. असे विचार मनात आल्यानंतरसुद्धा कर्तव्याबद्दल माझ्या मनात मुळीच शंका निर्माण होत नाही. आपण कोणते ना कोणते काम केल्याशिवाय राहू शकत नसल्यामुळे आपले कर्तव्य पारमार्थिक वृत्तीकरिता जे काही करता येईल ते करणे आहे. असे कार्य करणारा माणूस परम शांतता अनुभवू शकतो. आपल्या आश्रमात आपण असेच काम करत असतो.

तुझ्याकडे जर ज्वारी पेरण्याविषयी आणि विणाई विषयी काही सूचना आल्या असतील तर त्यासंबंधात योग्य वाटेल ते कर. जे करशील ते मला लिहिशील. स्वयंपाकाकरिता जर स्वयंपाक्याची आवश्यकता वाटत असेल तर तू ठेवू शकतो इतके लक्षात ठेव.

बापूचे आशीर्वाद"

१३-१-१९१९

चार दिवस झाले, बकरीच्या दूधाचा प्रयोग सुरू झाला आहे. त्याची मीमांसा वरच्या पत्रात आलेली आहे. आज 'इडा' नाडीच्या विशिष्ट भागाचा रस — म्हणजेच अल्ब्युमिन वॉटर — घेण्याबाबत चर्चा झाली. बापूंनी स्पष्टपणे सांगितले, "जर तुम्ही माझे अनुकरण करणार नसाल, तर मी नक्कीच ते घेईन. मला स्पष्टपणे वाटते की दूध पिणाऱ्या व्यक्तीसाठी अल्ब्युमिन वॉटर घेण्यात काहीही अपाय नाही. दूधाच्या तुलनेत ते अधिक निष्पाप आहे. आणि ज्याला अल्ब्युमिन वॉटर घेण्याची आवश्यकता वाटते त्याला मी ते आग्रहपूर्वक देईन. 'लोकसंग्रह' या ग्रंथातील 'यद्यदाचरति श्रेष्ठः...' हा सिद्धांतच मला ते घेण्यापासून अडवतो.

१६-१-१९१९

मुंबईत गिरणी कामगारांचा भयंकर संप. काल जोशींनी येऊन सांगितले की मी सरकारला यासंबंधात लवाद नेमायला सांगणार आहे. तुम्ही त्यात काम कराल? बापूंनी कबूल केले. दुसऱ्या दिवशी परिस्थितीची माहिती करून घेण्याकरिता जहांगीर पिटीटला बोलावले. त्याने एखाद्या गिरणी मालकाप्रमाणे परिस्थिती सांगितली. 'आतापर्यंत ३५% दिले. आधी खूप नफा झाला होता, परंतु आता तितका नफा नाही. तोटा आहे. अन्नधान्याची किंमत वाढली आहे हे खरे आहे. परंतु ती जितक्या प्रमाणात वाढली असेल तितक्या प्रमाणात मजुरी देता येणे अशक्य नाही काय? आणि प्रतिष्ठेचासुद्धा प्रश्न आहे. यांनी कधी मागणी केली नाही, आणि मागणी न करता निघून जाणारांना आम्ही कशी काय वाढ देणार? आम्हांला आधी माहिती देणे इतके तर त्यांचे काम होते ना? आता परिस्थिती अशी आहे की काही दहा टक्के द्यायला तयार आहेत तर काही पंधरा. परंतु खात्रीपूर्वक समजून घ्या की आमची दोन महिने टिकून राहायची तयारी आहे. आम्हांला दररोज लाखालाखाचा तोटा येतो तो कोण भरून देणार? भविष्यात भाव कमी झाले तर हे लोक आपली मजुरी परत करतील? आणि तुम्हीसुद्धा या लोकांची कामावर येण्याकरिता समजूत घातली पाहिजे आणि मग आम्ही यांना दहापंधरा टक्के देऊ असे तुम्ही त्यांना सांगू शकता. अर्थात आमच्यावर तुमचा विश्वास असेल तर.'

आज म्हणाले की बिशप बटलरने आपले सगळे लेखन जाळून टाकले आहे आणि केवळ 'ऍनॉलॉजी' शिल्लक ठेवली आहे हे माहीत आहे काय? असे केले असेल तर कशाकरिता? माझे चालले

तर मी सगळे 'लॉ रिपोर्ट' जाळून टाकीन. तीनशे वर्षांपूर्वी कोणी काय लिहून गेले तोसुद्धा आधार मानला जाईल. सर्व गोधळ आहे. फ्रान्समध्ये 'लॉ रिपोर्ट' वापरत नाहीत.

रामदासला त्यांनी हळूहळू पत्र लिहिले -

## (रामदास गांधींना लिहिलेल्या पत्रातील काही भाग)

"मणिलाल खूप मेहनत घेतो आहे यात काही शंका नाही. त्याला मदत करायला तू सध्या तिथे राहायला पाहिजे याबद्दलही माझ्या मनात शंका नाही. हळहळू मणिलाल 'इंडियन ओपिनियनची' प्रगती करू शकेल. तूसुद्धा तुझ्या शक्तीवर विश्वास ठेवून स्वतंत्र लेख लिहू शकत असशील तर लिहू शकतोस. याकरिता एकाच गोष्टीच्या ज्ञानाची आवश्यकता आहे. ती म्हणजे हकिगतीची. तुला जर शेतीचे ज्ञान असेल तर त्यासंबंधीचे लेख अवश्य लिही. अनेक लोकांना स्वतःविषयाची माहिती नसते आणि म्हणून ते जर लिहिण्याचा शहाणपणा करू लागले तर ते लेखन निरर्थक होते. तू जर एखाद्या विषयावर प्रभुत्व मिळवून लिहिशील तर तू यशस्वी होशील. तू काछलिया शेठच्या मृत्यूचे वर्णन बरोबर करू शकतो. अशा प्रकारे सुरुवात केली तर सवय होईल आणि तू चांगले लेख लिहू शकशील. श्री पोलाक माझ्याकडे आले तेव्हा ते लांब लिहायचे आणि ते रसाळ नव्हते. चार महिन्यांनंतर त्यांना सवय झाली आणि ते चांगले लिहू लागले. आणि एक वर्षानंतर तर त्यांनी लिहिण्यात खूपच प्रगती केली. तुझ्या शक्तीबद्दलची तुझी कल्पना हीच तुझ्याकरिता मोठी आपत्ती आहे. तुला काही येत नाही असे तू समजायचे काही कारण नाही. तुझ्यात लिहिण्यावाचण्याची शक्ती तर भरपूर आहे. . . ."

१७-१-१९१९

काल चर्चा झाल्यानंतर जहांगीर पिटिटचे पुढीलप्रमाणे पत्र आले - "काल झालेल्या आपल्या चर्चेसंबधात मी तुम्हाला विनंती करतो की तुम्ही यासंबंधात काहीही करू नका. काल माझी गिरणीमालकांबरोबर चर्चा झाली तेव्हा प्रसंगोपात आपली जी चर्चा झाली ती मी त्यांना सांगितली. त्या सगळ्यांचे असे मत आहे की ही गोष्ट अशी आहे की जिचा निर्णय मालक आणि मजुरात झाला पाहिजे. बाहेरच्या कोणाच्याही मध्येस्थीशिवाय हे होऊ शकते.

सेवक,

जे. बी. पिटीट"

# १. खेडातील लढ्याविषयी प्रकाशित निवेदन

[खेडा जिल्ह्यातील जमीन महसुलासंबंधात सत्याग्रहाच्या लढाईत खेडुतांना उतरवण्याची आवश्यकता कोणत्या कारणांमुळे निर्माण झाली हे देशभरातील सर्व लोकांना कळावे म्हणून गांधीजींनी वर्तमानपत्रांमधून हे पत्रक प्रकाशित केले होते -]

## तक्रारीचे मुद्दे

खेडा जिल्ह्यात १९१७ - १९१८ साली मोठ्या प्रमाणात पीक आले नाही असे सर्व कबूल करतात. महसूल वसूल करण्याच्या नियमांप्रमाणे पीक जर चार आण्यापेक्षा कमी आले तर त्या वर्षाचा संपूर्ण महसूल स्थगित ठेवण्याचा शेतकऱ्यांना अधिकार असतो. पीक जर सहा आण्यांपेक्षा कमी आले तर निम्मे शेतसारा स्थगित ठेवता येतो. माझ्या माहितीप्रमाणे १०० गावांमधून केवळ एका गावामधून संपूर्ण महसूल, आणि जवळपास १०४ गावांमधून निम्मे महसूल स्थगित करण्याची सरकारने कृपा केली आहे. खेडुतांचे म्हणणे आहे की देण्यात आलेली ही सूट पुरेशी नाही. सरकारचे म्हणणे आहे की बहुतेक गावांमध्ये पीक सहा आण्यांपेक्षा जास्त आले आहे. यामुळे तक्रारीचा मुद्दा असा आहे की पीक किती आले - चार आणे की सहा आणे की त्यापेक्षा जास्त?

## निष्ठुर पटवारी

सरकारतर्फे पिकाचा अंदाज गाव पाटलाच्या मदतीने पटवारी करत असतो. सामान्यपणे त्यांने दिलेला आकडा बारकाईने तपासण्याची गरज नसते कारण पीक मोठ्या प्रमाणात जेव्हा येत नाही तेव्हाच या आकड्यांबद्दल शंका घेण्यात येत असते. पटवाऱ्यांचा संपूर्ण वर्ग हाजी, हाजी करणारा, कोतेपणा करण्यात मागेपुढे न पाहणारा आणि जुलमी असतो. गावप्रमुख म्हणजे पाटलाची निवड जवळपास त्याच्या खानदानीकडे पाहून करण्यात येत असते. पटावाऱ्याचा आग्रह शक्य तितका पूर्ण महसूल गोळा करण्याचा असतो. निष्ठावान पटवाऱ्याने चांगले काम केले तर त्याला पगडी बक्षीस देण्यात येत असते. पटवाऱ्यांबद्दल मी जी विशेषणे वापरली आहेत ती कोणत्याही विशिष्ट पटवाऱ्यासंबंधात नाही. परंतु जे सत्य आहे तेच मी सांगतो आहे. ते काही जन्मापासून असे नव्हते. परंतु वातावरण आणि संस्कार यांमुळे ते असे झाले आहेत. जगात वसुली करणारे दिवसेंदिवस निष्ठुर होत चालले आहेत. याशिवाय ते आपल्या मालकाचे समाधान करू शकत नाहीत. आजकाल वसुली

करणारे पटवारी कसे आहेत याचे गावकऱ्यांनी माझ्याजवळ जे वर्णन केले आहे त्याचे हुबेहूब चित्र रेखाटण्याकरिता मी असमर्थ आहे.

## सरकारचे दोषपूर्ण आणि पक्षपातपूर्ण मोजणी

पटवाऱ्यांबद्दल लिहिण्याचा माझा हेतू महसूच्या वसुलीकरिता ते पिकाचा अंदाजपत्रक किती चुकीच्या पद्धतीने तयार करतात आणि तेसुद्धा किती एकपक्षीय असते हेच दाखवणे आहे. सरकारच्या अशा खोट्या मोजणीचे लहानमोठ्या शेतकऱ्यांचे अनेक पुरावे माझ्याजवळ आहेत. यांत किती तरी प्रतिष्ठित आणि सुखी खेडूत आहेत. हे लोक जर अतिशयोक्तीच्या गोष्टी करतील तर त्यांच्या प्रतिष्ठेला धक्का लागेल. इतकेच नाही तर त्यांना पटवाऱ्यांची आणि वरच्या अधिकाऱ्यांची नाराजीही पत्करावी लागेल. इथे मला हेच स्पष्ट करायचे आहे की या आंदोलनाचा हेतू सरकारची वा कोणा अधिकाऱ्याची व्यक्तिगत बदनामी करणे मुळीच नाही. जनतेशी संबंधित बाबी योग्य पद्धतीने सांगण्याचा हक्क सुस्थापित करणे हा या लढ्याचा हेतू आहे.

## पीक न आल्यासंबधात बारकाईने चौकशी

सर्वांना माहीत आहे की ना. गोकुळदास पारेख आणि ना. विठ्ठलभाईंना आमंत्रित करून बोलावण्यात आले होते गुजरात सभेच्या मदतीने त्यांनी चौकशी केली होती. त्याचप्रमाणे हिंदुस्थान सेवक समाजाच्या सभासदांनीसुद्धा चौकशी केली होती. त्यांची चौकशी प्राथमिक आणि थोडक्यात होती. याचे कारण त्यांनी एकाच तालुक्यातील थोड्याशा गावात फिरून वस्तुस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला होता. चौकशी केल्यानंतर त्यांची खात्री पटली होती की पीक चार आण्यापेक्षा कमी आलेले आहे. ही माहिती विशाल क्षेत्रातून गोळा करण्यात आलेली नसल्यामुळे ती सप्रमाण सिद्ध करणे शक्य नव्हते. यामुळे जवळपास वीस प्रतिष्ठित, बुद्धिमान आणि अनुभवी, निष्पक्ष काम करतील अशा बांधवांची मदत घेऊन मी संपूर्ण तपास करण्याची जबाबदारी माझ्याकडे घेतली. मी स्वतः जवळपास तीस गावात फिरलो. तिथे जितक्या लोकांची भेट घेता येऊ शकत होती तितक्यांना मी भेटलो. त्यांच्या शेतांत फिरलो आणि पिकासंबंधी अतिशय बारकाईने उलटतपासणी केली. अखेरीस पीक चार आण्यापेक्षा कमी आले आहे या निर्णयावर सर्व आले. माझ्या संपर्कात जे लोक आले त्यांच्यात असेही काही लोक होते की जे अतिशयोक्तीने भरलेल्या आणि वाढवून सांगितलेल्या गोष्टी कमी करायला तयार होते. सत्यापासून वंचित होण्यात किती धोका आहे हे त्यांना चांगल्या प्रकारे माहीत होते.

रबीचे पीक आणि खरीपचे जे पीक शेतांमध्ये उभे होते त्यासंबंधी खेडुतांनी सांगितलेल्या हकिगतीची पडताळणी मी माझ्या डोळ्यांनी पाहून केली आणि त्यांची तुलना करू शकलो. माझ्या सहकाऱ्यांनीसुद्धा आज अशाच प्रकारे काम केले. अशा प्रकारे जवळपास चारशे गावांची माहिती मिळवण्यात आली आणि अगदी थोडेसे अपवाद वगळले तर सर्वत्र पीक चार आण्याशिवाय कमी असल्याची आमची खात्री पटली. केवळ तीन ठिकाणी पीक सहा आण्यांच्या वर आहे असे वाटले. खरीफ पीक किती आहे याची मोजणी करण्याची पद्धत पुढीलप्रमाणे ठरवण्यात आली होती - संपूर्ण गावात वेगवेगळ्या पिकांचा उतारा किती आला आणि गावात जेव्हा सोळा आणे पीक येत असते तेव्हा उतारा किती असतो हे आम्ही पाहिले. लोकांनी जे आकडे दिले ते खरे मानून हा अंदाज काढला आहे. हीच याची संपूर्ण आणि प्रामाणिक पद्धत आहे. दुसऱ्या कोणत्याही पद्धतीने विश्वसनीय परिणाम मिळू शकत नाहीत. इतर सर्व पद्धती अयोग्य असल्यामुळे त्या स्वीकारार्ह नाहीत. मी वर सांगितलेच आहे की या तपासात कणभरही अतिशयोक्ती नाही. उभ्या असलेल्या रबी पिकाकरिता तर केवळ अंदाजच पुरेसा होता.

## पीक मोजण्याची सरकारी रीत

सरकारी मोजणी डोळ्यांनी पाहिलेल्या अनुमानावर आधारलेली असल्यामुळे तिच्यात अंदाजाला भरपूर वाव असतो. याशिवाय तिच्यातील काही मुद्दे वादग्रस्त आहेत. त्यासंबंधात मी जिल्हाधिकाऱ्याला पत्र लिहिले आहे. याकरिता एका गावाचे उदाहरण घेऊन त्याचा पडताळा पाहण्याकरिता मी वडथल गाव निवडण्याकरिता सुचवले होते. हे प्रसिद्ध गाव आहे. ते व्यापाराचे प्रमुख केंद्र आहे आणि तिथे रेल्वेस्थानक आहे. गावातील लोकांची एकंदरित परिस्थिती चांगली आहे. या गावातील पीक चार आण्यांपेक्षाही कमी आहे आणि माझ्या माहितीप्रमाणे तर इतर साधारण आणि कमी कसाच्या जमिनीत चार आणे पीकसुद्धा जास्त वाटण्याची शक्यता असली तर नवल वाटण्याचे कारण काय? जिल्हाधिकारी या गावाची जेव्हा फेरतपासणी करतील तेव्हा मला हजर राहण्याची संधी द्यावी अशी मी अधिकाऱ्यांना विनंती केली होती. परंतु त्यांनी माझ्या विनंतीकडे लक्ष दिले नाही आणि एकट्यानेच तपास केला. जिल्हाधिकाऱ्यांनी या गावातील पिकांची फार लांब नोंद केली आहे. माझ्या धारणेप्रमाणे मी त्या नोदीचे खंडन आमूल खंडन केले. सरकारच्या मोजणीप्रमाणे या गावातील पीक आधी बारा आणे असल्याचे मला सांगण्यात आले होते. जिल्हाधिकाऱ्याच्या चौकशीप्रमाणे हे पीक

कमीत कमी सात आणे असल्याचे सांगण्यात आले. जिल्हाधिकाऱ्याने अवलंबिलेल्या स्पष्टपणे चुकीच्या पद्धतीच्या हिशेबानेसुद्धा या गावातील पीक सहा आण्यांपेक्षा कमी होते. आणि खेडुतांच्या हिशेबाने तर हे पीक चार आणेसुद्धा नव्हते.

## स्वतंत्र पंच नेमण्याची आवश्यकता

जिल्हाधिकाऱ्याची नोंद आणि मी त्याला दिलेले उत्तर या दोघांमध्ये खोल उतरल्याशिवाय मतभेदाचा हा मुद्दा जनसामान्यांच्या लक्षात येऊ शकत नाही. आणि याशिवाय मी सूचना केली होती की सरकार आणि खेडूत आपापले म्हणणे खरे मानत असल्यामुळे सरकारला जर जनमताची किंचितही फिकीर असेल तर त्याने चौकशी करण्याकरिता अशी समिती नेमली पाहिजे की जिच्यात शेतकऱ्यांचेही प्रतिनिधी असतील. या दोन्ही सूचनांकडे दुर्लक्ष करून सरकारने महसूलवसुलीकरीता कठोर पावले उचलायचे ठरवले. इथे मी हे सांगायला पाहिजे की असे कठोर पाऊल उचलल्यानंतर सरकारने ते पाऊल आतापर्यंत कधीही परत घेतले नव्हते, आणि खेडुतांनी दडपणामुळेच पैसे भरले होते. पटवारी पशुपक्षी घेऊन जायचे आणि पैसे भरल्यानंतरच ते परत करायचे. एका ठिकाणी मी अतिशय दुःखद घटना पाहिली - एका खेडुताची दुभती म्हैस घेऊन गेले होते. मी त्या गावात गेलो तेव्हा कुठे ती म्हैस परत मिळाली. त्या म्हशीवरच त्या खेडुताचा उदरनिर्वाह चालत असल्यामुळे त्याच्याकरिता ही म्हैस अतिशय मूल्यवान होती. अशा असंख्य घटना घडल्या आहत. जाहीर लोकमत जर या खेडुतांच्या बाजूने उभे राहिले नाही तर अशा घटना घडतच राहतील. नम्रतापूर्वक सूट मागण्याचा एकही इलाज मी सोडला नाही. याकरिता मी जिल्हाधिकारी, आयुक्त आणि राज्यपाल यांच्या भेटीही घेतल्या आणि त्यांच्याकडे पुढीलप्रमाणे अर्जही करण्यात आले होते.

## अंमलदारांना दिलेले अर्ज

काही थोड्याशा गावात जरी पीक सहा आण्यांपेक्षाही जास्त आले होते तरी जवळपास प्रत्येक गावातील महसूल स्थगित करायला लावण्याची मागणी करण्याचा खेडुतांना हक्क होता. असे असले तरी जिल्ह्यात केवळ अर्धाच महसूल स्थगित ठेवण्याची सरकारने उदारपणे सूट देण्याच्या घोषणेबरोबरच सरकारने जर अशीही घोषणा करायला पाहिजे होती की जे लोक सुखवस्तू आहेत त्यांनी स्वखुशीने पूर्ण महसूल भरावा अशी सरकारची इच्छा आहे. मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी अशा सुखवस्तु लोकांची समजूत घालण्याची जबाबदारी आमच्याकडे घेतली होती. असे झाले असते तर

अनेक खेडुतांना मदत मिळाली असती. मी खात्रीपूर्वक सांगतो की अंमलदारांनी हा अर्ज जर मान्य केला असता तर सरकारचे वजन आणि प्रतिष्ठा हे दोन्ही वाचले असते. लोकमताची अवहेलना करण्याने अशांतता पसरली असती आणि भयभीत गावकऱ्यांमध्ये हा असंतोष धुमसत राहिला असता. माझा प्रयत्न सरकार आणि जनता या दोघांनाही या परिस्थितीतून वाचवण्याचा होता.

## कायद्याचा दुरुपयोग

सरकार आपल्या स्थानाचे आणि प्रतिष्ठेचे समर्थन किती विचित्र पद्धतीने करते ! महसूल कायदा अंमलदारांना अमर्याद सत्ता देतो. महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांच्या निर्णयावर जनतेला दाद मागण्याचासुद्धा अधिकार नाही. अशा परिस्थितीत जनता आपल्या तत्त्वाकरिता आणि अधिकाऱ्यांच्या प्रतिष्ठेकरिता लढा देत आहे. अशा वेळी अधिकारी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करतात आणि न्यायाचा सत्यानाश करतात. न्यायमार्गापासून सुटका करून घेण्याकरिता अधिकारी महसूल कायद्याचा आधार घेतात. या कायद्यात देण्यात आलेले निरंकुश अधिकार असे आहेत -

१. कायदा ताबडतोब अंमलात आणायचा अधिकार.

२. शेतसाऱ्यावर एक चतुर्थांश दंड लावण्याचा अधिकार.

३. रैयतवारीच नाही तर सनदी वा बक्षीस देण्यात आलेली जमीनही जप्त करण्याचा अधिकार.

४. खातेदारांना अटक करण्याचा अधिकार.

वर सांगितलेली उपाययोजना वेगवेगळी वा एकाच वेळी करता येऊ शकते. परंतु वरीलपैकी शेवटच्या अधिकाराशिवाय इतर सर्व अधिकारांचा उपयोग शेतसारा वसूल करताना अधिकाऱ्यांनी केला आहे. अशा प्रकारे वंशपरंपरेने चालत आलेली हजारो रुपये किंमत असलेली शेकडो बिघे जमीन थोड्याशा शेतसाऱ्याकरिता या कायद्याचा दुरुपयोग करून अधिकारी जप्त करू शकतात. शेतकऱ्याने आपल्या सिद्धांताकरिता जर शेतसारा भरायला नकार दिला तर त्याला हा परिणाम सहन करण्याकरिता तयार राहावे लागत असते.

* * *

## जाहीर विनंती

खेडामधील खेडूत न्याय आणि सत्याकरिता सरकारशी लढा देत आहेत. त्यांना मदत करण्याकरिता पत्रकारांना आणि जनसामान्यांना जाहीर विनंती करण्याची मी परवानगी घेतो आहे. वाचकांनी हेसुद्धा लक्षात ठेवले पाहिजे की खेडा जिल्हा प्लेगच्या रोगामुळे आधीच अर्धमेला झाला आहे. अजून येथील लोक गावाबाहेर गवताच्या छपराखाली राहत आहेत. धान्याचे भाव वाढले आहेत. परंतु पीक न आल्यामुळे खेडूत या संधीचा लाभ घेऊ शकत नाहीत. इतकेच नाही तर त्यांना अनेक प्रकारच्या गैरसोयी सहन कराव्या लागत असतात. त्यांना पैशांच्या मदतीची गरज नाही. त्यांना केवळ जनसामान्याचा एका आवाजाने नैतिक आधार आणि सहानुभूती पाहिजे.

# २. आयुक्त प्रॅट यांना उत्तर

(आयुक्त प्रॅट यांनी खेडा जिल्ह्यातील शेतकऱ्यांसमोर १२-४-१९१८ला दिलेल्या भाषणात सत्याग्रही आणि गांधीजींबद्दल जे सूचक उल्लेख केले होते त्याचे गांधीजींनी वर्तमानपत्राच्या माध्यमातून दिलेले उत्तर -)

**(बाँबे क्रॉनकलला पत्र)**

नडियाद,

१५-४-१९१८)

**लढ्याचा गुंता**

खेडा जिल्ह्यातील खेडुतांसमोर आयुक्तांनी गुजरातीत केलेल्या भाषणाचे कार्यकर्त्यांना न्याय मिळावा म्हणून उत्तर देणे अपेक्षित आहे. माझ्यासमोर या भाषणाचा अक्षरशः अहवाल आहे. त्यात सरकारचे राजकीय धोरण सरळ सरळ सांगण्यात आले आहे. आयुक्तांचे म्हणणे आहे की शेतसारा स्थगित करण्याच्या निर्णयासंबंधीचे अंतिम अधिकार महसूल खात्याच्या अधिकाऱ्याकडे आहेत. ते म्हणतात की मी खेडुतांच्या तक्रारी ऐकल्या आहेत हे खरे आहे, परंतु अंमलदारांचा निर्णय यासंबंधात अंतिम असल्यामुळे त्याबद्दल कोणतीही शंका घेता येऊ शकत नाही. लढ्याचा गुंता इथेच आहे. खेडुतांतर्फे असा युक्तिवाद करण्यात येत असतो की स्थानिक अधिकार आणि आमच्यात तीव्र मतभेद असल्यामुळे अशा बाबतीत निर्णय घेण्याचे काम पंचांकडे सोपवले पाहिजे. ब्रिटिशांच्या राज्यकारभारामागे हे तत्त्व अनुस्यूत आहे असे समजले जाते. आयुक्तांनी सिद्धांत म्हणून हा युक्तिवाद मान्य केलेला नसल्यामुळे ही समस्या निर्माण झाली आहे. त्यांनी ही बाब प्रतिष्ठेची केली आहे आणि त्यांच्या निर्णयाआड राज्यपालाने येऊ नये म्हणून आधीच त्यांनी लॉर्ड विलिंग्डनकडून या आशयाचे पत्र मागवून स्वतःचे हात मजबूत केले आहेत.

आपल्या धोरणाचा बचाव करण्याकरिता ते युद्ध मध्ये आणत आहेत, आणि त्यांचे म्हणणे आहे की संपूर्ण साम्राज्यावर आलेल्या संकटाच्या या काळात तुम्ही जो निर्णय घेतला आहे त्याचा त्याग करा. परंतु माझी दृढ मान्यता आहे की आयुक्तांच्या धोरणात जर्मनीच्या आक्रमणापेक्षाही जास्त मोठे संकट सामावलेले आहे. साम्राज्यावर आतून येऊ घातलेल्या या भीषण संकटातून साम्राज्याला वाचवण्याचा

मी प्रयत्न करतो आहे. हिंदुस्थान दीर्घ झोपेतून जागा होत आहे ही गोष्ट विसरता येत नाही. आपले हक्क आणि कर्तव्य समजण्याकरिता खेडुतांना इतर कोणतीही विद्या संपादन करण्याची आवश्यकता नाही. कितीही समर्थ शासन असले तरी ते शेतकऱ्यांच्या इच्छेविरुद्ध जगू शकत नाही. त्यांच्यात प्रचंड शक्ती आहे. तिची जाणीव करून देण्याची आवश्यकता आहे. प्रजेच्या संमतीशिवाय राज्य चालवणे शक्य नाही हे तेव्हाच त्यांना कळेल. खेडातील जनता हिंदुस्थानात साम्राज्याच्या एका समस्येचा निकाल लावण्याकरिता प्रयत्नशील आहे. नागरी सेवेतील लोकांना जेव्हा ही गोष्ट कळेल तेव्हाच ते लोकांच्या हक्काचे रक्षण करणारे खरे नागरी सेवेतील लोक होतील. सध्याच्या नागरी सेवेतील लोकांचे शासन भीतीवर आधारित हालअपेष्टा सहन करायला लावणारे शासन आहे. खेडातील खेडूत प्रेमाच्या बळावर शासन चालावे म्हणून प्रयत्नशील आहेत. अशा प्रकारे आयुक्त प्रकरण चिघळवणारे आहेत. त्यांना जेव्हा वाटले की मतभेदाचे कारण उपस्थित झाले आहे तेव्हाच जनतेचे समाधान करून मतेभेदाचे कारण दूर करणे त्यांचे कर्तव्य होते. ज्याप्रमाणे कानपूर मशिदीच्या प्रकरणी जनतेची मागणी मान्य करून मशिदीचा एक कोपरा परत बांधून दिल्यामुळे साम्राज्याच्या प्रतिष्ठेला कोणताही धक्का लागला नव्हता वा जनतेच्या इच्छेप्रमाणे श्रीमती मेब्रिकनी माफ केल्यामुळे प्रशासनाला कोणताही धोका निर्माण झाला नव्हता. आयुक्तांनी नमते घेऊन जर सूट दिली असती तर त्यामुळे हिंदुस्थान सरकारच्या उत्पन्नात विशेष घट झाली नसती. आयुक्त जर तुम्हा लोकांची विनंती मान्य करायला तयार नसतील तर तुम्ही लोकसुद्धा शेतसारा न देण्याच्या तुमच्या मागण्यांवर दृढ राहा असा सल्ला जर मी ताबडतोब दिला नसता तर लोकांचा असंतोष इतक्या उघडपणे व्यक्त झाला नसता. वडिलांचा खरा मुलगा तर तोच असतो जो वडिलांच्या आज्ञेचे प्रामाणिकपणे पालन करतो, आणि तसे करणे जर शक्य नसेल तर वडिलांबद्दल कोणतीही दुर्भावना मनात न बाळगता आपल्या वडिलांना स्पष्टपणे आणि नम्रपणे मी तुमच्या आज्ञेचे का पालन करू शकत नाही हे मनमोकळपणाने सांगतो. सरकार आणि जनता यांच्यातही हाच नियम लागू होतो असे मी समजतो. माणूस आपल्या अंतःकरणाच्या हाकेला प्रतिसाद दिल्याशिवाय कधीही राहू शकत नाही. परंतु ज्याप्रमाणे एक सुज्ञ बाप मुलाबरोबर लगेच तडजोड करतो त्याचप्रमाणे समंजस लोकांचे म्हणणे सरकारने मान्य केले पाहिजे. असे झाले तर सरकारला नाराजी पत्करावी लागणार नाही. खेडुतांना अंमलदारांचे आदेश गैरवाजवी आणि अन्यायी वाटत असतील तरी युद्ध सुरू आहे म्हणून त्यांचे पालन करण्याचा आग्रह धरता येत नाही.

## आयुक्तांचे गंभीर वचन

आपला मार्ग अनुसरायला लावण्याकरिता आयुक्त असे म्हणू शकत नाही की चार लाखांच्या महसुलाकरिता मी तुमची दीड करोड रुपयांची जमीन कायमची खालसा करीन. आणि त्याचबरोबर त्या जमिनीच्या मालकाला आणि त्याच्या बायकोला आणि मुलाबाळांना खेडात जमीन धारण करण्याकरिता अपात्र ठरवीन. आयुक्त खेडुतांना गैरमार्गाला लागलेले आणि दुराग्रही असे एकाच श्वासात म्हणतात. त्यांनी गंभीर उद्गार असे आहेत -

***"तुम्ही लक्षात ठेवा की आमचे मामलतदार आणि पटवारी तुमची जंगम मिळकत जप्त करून ती विकतील आणि महसूल वसूल करतील. आमच्या अंमलदारांचा वेळ मूल्यवान आहे. ते तर तुमच्याकडून वसूल केलेल्या पैशाने तिजोरी भरण्याचेच काम करतील. ही काही धमकी नाही. आईवडील मुलांना धमकी देत नसतात हे माझे शब्द लक्षात ठेवा. ते केवळ सल्ला देत असतात. परंतु तुम्ही जर तुमचा भरणा करणार नाही तर तुमची जमीन जप्त होईल. अनेक लोक असे म्हणतात की असे होणार नाही. मला काही प्रतिज्ञा करण्याची आवश्यकता नाही. तुम्ही जर भरणा केला नाही तर तुमची जमीन जप्त होईल. हुकूम न पाळणाराला भविष्यातही जमीन मिळणार नाही. सरकार त्यांचे नाव 'रेकॉर्ड ऑफ राईट'मध्ये ठेवण्याकरिता पात्र समजणार नाही. इथून ज्यांचे नाव निघून जाईल त्यांचे नाव परत कधीही दाखल होणार नाही."***

माझे तर म्हणणे आहे की जुलूम करण्याचा आणि वैर घेण्याच्या वृत्तीच्या अशा घोषणेसमोर माणसाने मरेपर्यंत लढायला पाहिजे. प्रत्येक निष्ठावंत शहरीचे हे पवित्र कर्तव्य आहे. अमदाबादमध्ये संप करणारांनी जाणूनबुजून आपली प्रतिज्ञा तोडली, असे म्हणून आयुक्तांनी माझ्यावर आणि अमदाबादमध्ये संप करणारांवर घोर अन्याय केला आहे. ज्या सभेत तडजोड झाली त्या सभेत ते हजर होते. त्यांना असे वाटू शकते की संप करणारांनी प्रतिज्ञा तोडली. (जेव्हा की त्यांच्या भाषणातून उलटच ध्वनित होत होते.) या उलट संप संपल्यानंतर पहिल्यांदा जेव्हा ते कामाला गेले तेव्हा पगार मिळाल्यानंतरच त्यांनी काम सुरू केले होते आणि अशा प्रकारे त्यांनी आपली प्रतिज्ञा पूर्ण केली होती. आणि पगाराचा प्रश्न पंचांच्या निर्णयावर त्यांनी सोडला होता. गिरणी मालक तर लवादाला आधी नाही म्हणाले होते. गिरणी मजुरांचा लढाच मुळी पस्तीस टक्के वाढीकरिता वा लवाद ठरवील तेवढ्या वाढीकरिता होता. अशा परिस्थितीत मला सखेद सांगावे लागते की गिरणी मजुरांना आणि मला हा जो

टोमणा मारण्यात आला आहे तो आमच्यावर करण्यात आलेला एक सुप्त आणि जिव्हारी लागणारा हल्ला आहे.

# ३. सत्याग्रही खेडुतांना संदेश

[गांधीजींनी सत्याग्रह मंडपात केलेल्या भाषणाचा लाभ तिथे हजर असलेल्या लोकांनाच मिळाला होता. जेव्हा की अधिकारी आपल्या हाताखालील माणसांद्वारे प्रॅट साहेबांच्या भाषणासंबंधी वाटेल तशा बातम्या पसरवत होते. यामुळे लोकांनी चुकीच्या मार्गाने जाऊ नये म्हणून आणि लोकानी आपल्या निश्चयावर अढळ राहावे म्हणून गांधीजींनी पत्रकाद्वारे खालील संदेश गावोगावी पोहोचवला.]

मेहरबान प्रॅट साहेबांचे भाषण लक्षपूर्वक आणि विनयपूर्वक ऐकले हे तुम्ही फार चांगले केले. सत्याग्रहींना हीच गोष्ट शोभते. योगायोगाने आपल्या सरकारच्या महसुलाविषयीच्या आदेशाचा अनादर शेतकऱ्यांना करावा लागला. परंतु आपण सरकारी अधिकाऱ्यांना जो मान दिला पाहिजे तो त्यांनी विसरायला नको. आपण आपल्याला भीतीतून, गुलामगिरीतून मुक्त व्हायची इच्छा केली पाहिजे. विनय सोडण्याची इच्छा नसावी. आपण उद्धट तर व्हायलाच नको. सत्याग्रहात विनय तर नेहमीच हवा.

मेहरबान आयुक्त साहेबांनी खेडुतांना हक्क आणि कर्तव्य हे दोन्ही सांगितले. त्यांनी केलेल्या दोन्ही सूचना योग्य आहेत. परंतु मनुष्यमात्राचा खरा हक्क काय आहे हे ते सांगायला विसरले. भीतीमुळे कोणत्याही माणसाने काहीही न करणे हे त्याचे कर्तव्य असते. यामुळे कोणी जर आपल्याला धाक दाखवून काही काम करवून घेऊ इच्छित असेल तर त्या कामाला विरोध करण्याचा आपल्याला हक्क असतो. याच हक्काच्या आधाराने खेडातील जनता सरकारच्या हुकुमाचा सध्या सन्मानपूर्वक अनादर करत आहे. आपली मान्यता आहे की या वर्षी पीक चार आण्यांपेक्षा कमी आले. यामुळे शेतसारा स्थगित झाला पाहिजे. आपण जर महसूल भरू तर तो केवळ याच भीतीने भरू की आपली जंगम संपत्ती सरकार एक तर विकून टाकील वा जप्त करून टाकील. अशा भीतीसमोर जर आपण वाकू तर आपण पुरुषार्थविहीन होऊ. अशा भीतीने जवळपास ८०% शेतकऱ्यांनी शेतसारा भरला आहे. यामुळे २०% लोकांच्या हाती १००% लोकांची लाज राहिली आहे. ज्यांनी पुरुषार्थ गमावला आहे ते निष्ठावंतसुद्धा राहू शकत नाहीत. पशू आणि माणूस यांच्यातील भेद केवळ पुरुषार्थच आहे. हा लढा पुरुषार्थ दाखवण्याचा आहे.

महसूल विभागाने आपले इतर आदेश जनतेने अर्ज केल्यानंतरही जर बदलले नाही तर जनतेने ते चुपचाप सहन केले पाहिजे अशी ब्रिटिश घटना नाही. हे राजकीय धोरणही नाही. जनतेला जे हुकूम ज्ञानपूर्वक अन्याय्य वा जुलमी वाटतात त्या हुकमांना विरोध करण्याचा तिला जन्मसिद्ध हक्क आहे.

आणि जनतेचे ते कर्तव्यही आहे. जो नियम कुटुंबाला लागू होतो तोच नियम राजा आणि प्रजेच्या संबंधातही लागू होतो. या नियमाचा जर भंग झाला तर राजा आणि प्रजा यांच्यात तणाव निर्माण होतो. जनता गुप्तपणे राजसत्तेशी धोकेबाजी करू लागते. राजा अविश्वासू आणि संशयी होतो. सरकारच्या हुकुमाबद्दल आपण एक गोष्ट लक्षात ठेवलीच पाहिजे. सरकारचे हुकूम गैरवाजवी आहेत असे आपण पूर्णपणे म्हणू शकत नाही. आपण ज्या हुकमाला गैरवाजवी समजतो तो हुकूम वास्तवात वाजवीसुद्धा असू शकतो. यामुळे ज्या प्रमाणात खाजगी व्यवहाराप्रमाणेच राजा आणि प्रजा यांच्यात मतभेद झाले की आपल्याला पंचाकडे वा लवादाकडे जायला पाहिजे. पूर्वीच्या काळात राजे लोक असेच करत असत आणि खरे म्हणजे इंग्रज सरकारही नेहमी असेच करत असते. इतकेच की ते याला पंचांऐवजी 'कमिशन' वा 'कमिटी' म्हणत असतात. राज्याचा सन्मान कायम ठेवण्याकरिता ते पंचाचा निर्णय न्यायालयामार्फत लागू करत नाहीत तर शासनव्यवस्था स्वतःच त्यासंबंधी निर्णय घेत असते. एकूण पाहता अखेरीस ज्या प्रकारे पंचांचा निर्णय लागू करण्यात येत असतो त्याच प्रकारे 'कमिशन'चा वा 'कमिटी'चा निर्णय लागू केला जात असतो. जनमताचा सन्मान केल्याशिवाय राज्य चालवणे अशक्य आहे. परंतु जे राज्य 'कमिशन' वा 'कमिटी'सुद्धा नेमते त्या राज्यात जनतेने काय करावे? ज्या राज्यातील जनतेत पशुबळ प्रामुख्याने असते तिथे मारपीट चालत असते, आणि शस्त्रांचा उपयोग करून जनता न्याय मिळवण्याचा प्रयत्न करत असते. ही पद्धती निरर्थक आहे असे माझे स्वतःचे मत आहे. मी असेसुद्धा समजतो की सर्व धर्मशास्त्रांनी या पद्धतीवर टीका केली आहे. आणि ही पद्धती तर आपल्या कौटुंबिक व्यवहारात मुळीच लागू पडत नाही. सरळ मार्ग हाच आहे की शत्रू जर आपले म्हणणे मान्य करत नसेल तर त्यामुळे होणारे दुःख शत्रूबद्दल मनात कोणताही राग न धरता धैर्याने सहन केले पाहिजे. यामुळे बरेचसे हेतू साध्य होतात. आपण जर चुकीचे ठरलो तर आपण जे दुःख सहन करतो ते योग्यच म्हणावे लागेल. आणि जर आपण बरोबर असू तर विरुद्ध पक्षाच्या मनात दया निर्माण झाल्याशिवाय राहूच शकत नाही. परिणामी अखेरीस सरकारची न्याय करूनच सुटका होत असते. हीच गोष्ट शास्त्राप्रमाणे आहे. सत्याचा सदैव जय होतो असे शास्त्रात सांगितलेले आहे. आणि हे खरे असल्याचा अनुभव आपल्याला वारंवार येत असतो. अशा प्रकारे सत्याकरिता दुःख सहन करून खेडातील जनता तावूनसुलाखून निघाली आहे.

परंतु यदाकदाचीत आपला धीर सुटू नये, आपल्यात दुबळेपणा येऊ नये म्हणून आपण स्वतःला प्रतिज्ञेने बांधून घेत असतो. अशा प्रकारे प्रतिज्ञा केल्याशिवाय कोणतीही जनता प्रगती करू शकत

नाही. प्रतिज्ञा म्हणजे अढळ निश्चय. जो माणूस निश्चय करू शकत नाही तो सुकाणूशिवायच्या बोटीसारखा असतो. ती बोट इकडेतिकडे भरकटते आणि अखेरीस एखाद्या शिळेवर आदळून वा भोवऱ्यात सापडते आणि तिचा आणि त्याबरोबर तिच्यातील माणसांचा नाश होतो. आयुक्त म्हणतात की प्रतिज्ञा अयोग्य आहे आणि विचार न करता घेतली आहे. ती अयोग्य नाही. आपण ज्याला गैरवाजवी हुकूम मानतो त्याचा विरोध करणे हे आपले कर्तव्य असते हे आपण आधीच पाहिले आहे. ही प्रतिज्ञा अविचाराने घेतलेली नाही हे प्रत्येक प्रतिज्ञा घेणाराला माहीत असते. एकदा सूर्याची गती बदलेल परंतु अशी प्रतिज्ञा घेणारा माणूस आपली भूमिका कधीही सोडणार नाही.

नामदार प्रॅट साहेबांनी अमदाबादमध्ये गिरणीमजुरांच्या संपाविषयी आपल्या भाषणात वस्तुस्थितीविरुद्ध विधान केले आहे याचा मला खेद होतो. असे करून या साहेबांनी विनय, न्याय आणि मर्यादेचा भंग केला आहे. मी असे समजतो की त्यांनी हे विधान नकळत केले असेल. या जगात कोणी जर आपल्या प्रतिज्ञेचे पालन करत असेल तर ते अमदाबादच्या मजुरांनी केले आहे. पंच ठरवील तो पगार आम्ही घेऊ असे त्यांनी कबूल केलेले होते. संपाच्या दरम्यान मालकांनी हे तत्त्व नाकारले होते. यामुळेच मजुरांनी पस्तीस तक्क्याची मागणी केली होती. परंतु गिरणीमालकांनी त्याकरिता नकार दिला. त्यांनी पहिल्या दिवशी पस्तीस टक्के वाढ घेतली आणि मगच काम सुरू केले. अशा प्रकारे त्यांनी आपल्या प्रतिज्ञेचे पालन केले. त्यानंतरही त्यांनी पंच नेमण्याचा निर्णय नाकारला नव्हता. नंतर पंच नेमण्यात आले आणि मालकांचे वीस टक्के आणि मजुरांचे पस्तीस टक्के यांतील सरासरी वाढ घ्यावी आणि पंच जो निर्णय देतील तो मान्य करावा असे ठरले. अशा प्रकारे प्रतिज्ञेची भावना टिकवून ठेवली गेली. अशा प्रकारे ना. प्रॅटसाहेब म्हणतात त्याप्रमाणे मजुरांनी समजूनउमजून प्रतिज्ञा मुळीच तोडली नाही. तरीही प्रॅटसाहेबांना जर मजुरांनी प्रतिज्ञा तोडली असे समजायचे असेल तर ते तसे समजू शकतात, त्यांना कोण अडवू शकतो? तो त्यांचा प्रश्न आहे. परंतु मजुरांची मान्यता ही खरी गोष्ट आहे. ही गोष्ट ना. प्रॅटसाहेब उलट सांगतात. तडजोडीच्या अटी मजुरांना समजावून सांगण्यात आल्या होत्या आणि तेव्हा प्रॅट साहेब साक्षी होते. तेव्हा त्यांनी तडजोडीविषयी केलेले भाषण असे होते -

**तुमच्यामध्ये तडजोड झाल्यामुळे मला फार आनंद होतो. मला पूर्ण खात्री आहे की जोपर्यंत तुम्ही गांधी साहेबांचा सल्ला घ्याल आणि ते म्हणतात तसे कराल तोपर्यंत तुमच्यात सुधारणाही होईल आणि तुम्हांला न्यायही मिळेल. तुम्ही लक्षात ठेवा की गांधी साहेबांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तुमच्याकरिता फार श्रम घेतले आहेत आणि त्रास सहन केला आहे. तुमच्यावर त्यांनी प्रेम केले आहे.**

अशा प्रकारे जेव्हा ते प्रतिज्ञा तोडण्याविषयी जेव्हा बोलतात तेव्हा माझ्या अल्पमतीमुळे कदाचित मला ते कळत नसेल.

आयुक्तांनी खूप मोठी धमकी दिली आहे. ते असेही म्हणतात की मी ही धमकी खरी करून दाखवीन. अशा प्रकारे हे साहेब प्रतिज्ञा करणारांची जमीन जप्त करणार आहेत, आणि त्यांच्या वारसांचा जमीन धारण करण्याचा हक्कसुद्धा काढून घेणार आहेत.

हे वचन घोर आहे, क्रूर आहे, कठोर आहे. मला वाटते की या शब्दांमध्ये खूप संताप भरलेला आहे. नामदार आयुक्त साहेबांचा जेव्हा क्रोध शांत होईल तेव्हा त्यांनाच या गोष्टीचा पश्चात्ताप होईल. 'मुलांचे आणि आईवडीलांचे जसे संबंध असतात तसे सरकारचे आणि जनतेचे संबंध असतात' असे हे साहेब मानतात. आपल्या मुलाने सविनय विरोध केला म्हणून कोणतेही आईवडील आपल्या मुलांना पदभ्रष्ट केल्याचे उदाहरण इतिहासात आढळणार नाही. खेडातील जनतेची प्रतिज्ञा चुकीची असणे अशक्य नाही. परंतु त्या प्रतिज्ञेत अविनय, उद्धटपणा वा दांडगाई यांचा अंशही नाही. अशा धार्मिक भावनेने करण्यात आलेल्या प्रतिज्ञेकरिता तर वर सांगितल्याप्रमाणे घोर शिक्षा होणे मला अशक्य वाटते. अशी भयंकर शिक्षा हिंदुस्थानमध्ये सहन केली जाऊ शकत नाही. ब्रिटिश राज्यकर्ते असे कधीही मान्य करणार नाहीत. ब्रिटिश जनतेला अशा शिक्षेने निश्चितच दुःख होईल. ब्रिटिश सल्तनतीच्या काळात जर असे अन्याय होणार असतील तर अशा शासनांतर्गत मी तर बंडखोर म्हणूनच राहू शकतो. परंतु ब्रिटिशांच्या धोरणावर नामदार आयुक्तसाहेबांपेक्षा माझा जास्त विश्वास आहे. आणि मी आधी जे शब्द बोललो होतो ते परत उद्धृत करून सांगतो की शुद्ध भावनेने केलेल्या कामामुळे तुम्ही तुमची जमीन गमावणे मला अशक्य वाटते. असे जरी असले तरी आपली तयारी जमीन गमावण्याचीसुद्धा असली पाहिजे. एकीकडे प्रतिज्ञा आणि दुसरीकडे आपले सर्वस्व - प्रतिज्ञेच्या प्रमाणात सर्वस्वाची किंमत काहीही नाही. तुमच्या प्रतिज्ञापालनाच्या वारशाची किंमत लाखो रुपयांपेक्षाही जास्त आहे. प्रतिज्ञापालनातून हिंदुस्थानच्या प्रगतीचा मार्ग सुलभ आहे, आणि माझी खात्री आहे की तुम्ही हा मार्ग कधीही सोडणार नाही. या प्रतिज्ञपालनाकरिता ईश्वराने तुम्हांला शक्ती द्यावी अशी माझी इच्छा आहे.

नडियाड, १७-४-१९१८

# ४. सरकारी यादीचे उत्तर

[खेडाच्या लढतीसंबंधात निष्पक्ष लवाद नेमायला नकार दिल्यामुळे प्रजापक्षाच्या मागण्यांसंबधीचा युक्तिवाद अमान्य करणयात आला आणि गाधीजी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सुचवलेला मार्ग अयोग्य आहे असे सुचवणारी सरकारी यादी २४ एप्रिल १९१८ रोजी प्रकाशित झाली. या वेळी गांधीजी दिल्ली-युद्धपरिषदेत गेले होते. तिथून परतल्यानंतर त्यांनी ६ जून १९१८ रोजी हे प्रकाशित केले.]

## सरकारी यादीतील दोष

खेडातील अडचणींसंबंधात प्रकाशित झालेल्या सरकारी यादीत अनेक गोष्टी दाबून ठेवण्यात आल्या आहेत तसेच काहींची वाढवून सांगण्यात आल्या आहेत असे दिसून पडते. अशा प्रकारे ती दोन्ही प्रकारे दुषित आहे. नामदार पारेख-पटेल यांनी केलेल्या तपासातून जी वस्तुस्थिती समोर आली आहे तिच्यावर आयुक्तांचा आक्षेप आहे. आणि मी लगेच एक पंच नेमण्यासंबंधी सूचना केली होती. खरे म्हणजे सरकारकरिता हाच योग्य मार्ग होता. असे जर करण्यात आले असते तर डोळ्यांनी पाहवलेही जाणार नाहीत - उदाहरणार्थ खेडुतांच्या दुभत्या म्हशी घेऊन जाणे, स्त्रियांचे दागिने जप्त करणे आणि जमिनी खालसा करण्याचा हुकूम काढणे अशा कामांमधून सरकारची सुटका झाली असती. याऐवजी यादीत सांगण्यात आले आहे की एका दीर्घ अनुभवी जिल्हाधिताऱ्याची नेमणूक करण्यात आला होती. परंतु ते काय करू शकले? सर्वच्या सर्व अधिकाऱ्यांना वाईट वातावरणात काम करावे लागत असते. त्यांना अशा राजकीय सेवाविभागाच्या परंपरेचा निर्वाह करावा लागत असतो जे सरकारकरिता आपण सर्व बरोबरच करतो असे समजत असते. अशी मान्यता असलेल्या नोकरशाहीला हे बंधन आणि या परंपरा अनुकूल असतात.

श्री देवधर आणि त्यांच्या साक्षीदारांनी चौकशी विषयीच्या यादीत जे उल्लेख केले आहेत त्यावरून निश्चितपणे असे जाणवते की आयुक्तांनी त्यांच्या शिफारशी स्वीकारल्या आहेत. परंतु हा अहवाल सादर करत असताना मी हजर होतो. आयुक्तांनी या अहवालावर आक्षेप घेतला होता आणि स्पष्टपणे सांगितले होते की या अहवालात सांगितलेली वस्तुस्थिती खरी आणि महत्त्वाची नसल्यामुळे मदत जरी करण्यात येणार असेल तरी ती या अहवालाच्या आधारावर करण्यात येणार नाही.

मात्र तालुक्यातील परिस्थिती तर खरोखरच हृदयद्रावक आहे. या तालुक्यातील अनेक गावांची परिस्थिती इतकी वाईट आहे की तिचे मी इथे वर्णन करू शकत नाही. त्यांच्यावर आलेले संकट इतके मोठे आहे - १. अतिवृष्टीमुळे सामान्यपणे पीक आले नाही. २. पुरांमुळे झालेला सर्वनाश. या दुसऱ्या कारणामुळे तर महसूल पूर्णपणे माफ केला पाहिजे. परंतु माझ्या माहितीप्रमाणे अनेकांना तो लाभ मिळालेला नाही.

भारत सेवक समाजाच्या सदस्याने ठासरा तालुक्यावर कोणतेही संकट नसल्यामुळे तेथील काम थांबवले होते ही गोष्ट पूर्णपणे खोटी आहे. तिथे चौकशी न करण्याचे कारण तर हे होते की तिथे एकेका गावात तपास करणे आवश्यक होते ही गोष्ट त्यांनी त्यांच्या नोंदीतही लिहिली आहे.

## पिकाची मोजणी

माझ्या चौकशीला सरकारने 'अर्धवट' असे नाव ठेवून अन्याय केला आहे. माझी दृढ मान्यता आहे की जर खेडुतांनी केलेल्या वर्णनावर विश्वास ठेवायचा असेल आणि  माझ्या पद्धतीने अगदी तेच परिणाम निघतील. पिकाचा उतारा किती निघाला हे शेतकऱ्यांशिवाय दुसरा कोण सांगू शकेल? लाखो शेतकऱ्यांशी बोलल्यानंतर मी हे सांगतो आहे. लाखो लोक मिळूनमिसळून खोटे बोलू शकतात यावर मी विश्वास ठवू शकत नाही. असे केल्यामुळे त्यांचा कोणताही लाभ होणार नव्हता, उलट त्यांचा त्रास वाढणार होता. आणि हे तर अगदीच अशक्य आहे की हजारो शेतकरी दहा वर्षांच्या पीकांचे असे आकडे पाठ करून ठेवतील की ज्यामुळे पीक चार आण्यांपेक्षा कमी आल्याचे सिद्ध होईल. मी छाती ठोकून स्पष्टपणे सांगू शकतो की मी केलेले गणित चूक असू शकत नाही. त्यात फसवणुकीला वाव नाही. याशिवाय मी मी खरीप आणि रबी दोन्ही पिकांच्या सरकारी आणेवारीला आव्हान दिले होते. आणि जेव्हा मी असे केले तेव्हा रबीचे पीक शेतातच उभे होते. यामुळे हे पीक जेव्हा घेतले जाईल तेव्हा खरी आणेवारी कळेल असे मी सुचवले होते. याकरिता मी वडथल गाव पसंत केले होते. माझे म्हणणे असे होते की शेकऱ्यांचा हिवाळी पिकांचा हिशेब खरा ठरला तर त्यांचा पावसाळी पिकांचा हिशेबही खरा समजण्यात काही हरकत नाही. माझी ही मागणी मानय करण्यात आली नाही. याशिवाय माझे असेही म्हणणे होते की वडथल गावाची जेव्हा चौकशी करण्यात यीेल तेव्हा मला तिथे हजर राहू देण्यात यावे, परंतु माझ्या या मागणीकडेही लक्ष देण्यात आले नाही.

आणेवारी काढताना मी रबी आणि कापसाचे पीक लक्षात घेतले नाही असे यादीत लिहिण्यात सरकारने गंभीर चूक केली आहे. मी हे दोन्ही पीक हिशेबात घेतले आहेत. मी सरकारी मोजणी संबंधात केवळ तात्त्विक आक्षेप घेतला आहे. कारण स्पष्ट आहे. जर एक हजार माणसांच्या वस्तीत २०० लोक हिवाळी पीक घेत असतील आणि ८०० पावसाळी घेत असतील आणि हिवाळी पीक घेणारांवरून जर आणेवारी काढण्यात येत असेल तर ८०० लोकावर हा फार मोठा अन्याय होईल.

## गंभीर चुका

लिंबासी गावातील पिकाचा सरकारी यादीत उल्लेख करण्यात आहे. ते पाहून मला फार विचित्र वाटले. अधिकारी जेव्हा तपास करत होते तेव्हा मी तिथे हजर नव्हतो. आणि दुसरी गोष्ट म्हणजे ज्या गव्हाची किंमत  १३४४५ रुपये मोजण्यात आहे तिच्यात तीन गावांमधील गव्हाची किमतही जोडण्यात आली आहे. या मुळे या पिकावर तीन गावांना महसूल भरावा लागणार आहे. या शिवाय लिंबासाच्या लोकांना जवळपास तितक्याच रकमेचे भाताचे पीक झाले असे जरी गृहीत धरले तरी एका माणसाच्या खाण्यावर खर्च होतो असे समजलो तर लिबासीच्या माणसांवर ७२००० रुपये खर्च होतो. या अधिकाऱ्यांनी गव्हाच्या पिकाचा जो अंदाज काढला तो तर खरा असेल गव्हाचे पीक ८३०२१ रुपयांचे आले असेल. हे आकडे मला जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. सरकारी यादी किती अधांतरी लटकत होती याची कल्पना यावी म्हणून सांगतो की लिंबासाच्या लोकांवर विश्वास ठेवायचा तर तपासाच्या वेळी गव्हाचे संपूर्ण पीक खळ्यातच पडलेले होते. आणि लोकांच्या अंदाजाप्रमाणे ते जवळपास ९,००० रुपयांपेक्षाही कमी किमतीचे होते. सरकारच्या गणिताप्रमाणे गव्हाचे पीक १० आणे होते. परंतु पीकाच्या उताऱ्यावरून गणित केले तर गव्हाच्या पिकाची आणेवारी याच्या एकदशांशच येत होती. याशिवाय अजून एक गोष्ट आहे. गहू पेरण्याकरिता प्रत्येक बिघ्याकरिता एक मण गहू पाहिजे. आणि लिंबासी गावात एकूण १९६५ बिघ्यात गव्हाची पेरणी झाली होती. आणि गव्हाचे उत्पन्न केवळ ३,००० मण झाले होते. म्हणजे हे पीक गणिताप्रमाणे केवळ ९,००० रुपयांचे झाले होते. जिल्हाधिकाऱ्यांना या माहितीबद्दल खात्रीपूर्वक पडताळा घेण्याकरिता मी सांगितले. त्यांनी माझ्या या मागणीकडे दुर्लक्ष केले. यामुळे शेतकऱ्यांनी केलेले गणित बरोबर आहे असे निश्चितच मान्य कले पाहिजे.

## सत्याग्रहाची शिफारस

सरकारी यादी पूर्णपणे खोटेपणा भरलेली आहे दाखवण्याकरिता मी सागू इच्छितो की गुजराच सभेने सत्याग्रह करण्याचा ठराव मंजूर केला नव्हता. सभेने जबाबदारीतून सुटका करून घेण्याकरिता असे केले होते असे काही नाही. परंतु सभेच्या घटनेप्रमाणे सभेचे कामकाज बहुमताच्याच आधारावर चालत असल्यामुळे हा ठराव मंजूर करवून घेऊ नये असे मला स्वतःलाच वाटले. यामुळे सभेच्या सदस्यांना आपापल्या मताप्रमाणे वागण्याची सूट मिळाली. असे असतानाही वस्तुस्थिती ही आहे की सभेचे अनेक सदस्य खेडाच्या लढ्यात भाग घेत आहेत.

जे लोक स्वतःहोऊन महसूल भरायला तयार होते त्यांना चिथावणी देऊन पैसा भरण्यापासून अडवण्यात आले हा आरोप मला मुळीच मान्य नाही. सराकारी यादीत वेगवेगळ्या तालुक्यात वेगवेगळ्या तालुक्यातील वसुलीचे आकडे दिलेले आहेत. हे आकडे रावणीया (एक मागासवर्गीय जमात, जी वसुलीच्या कामात मदत करते) आणि पटवारी यांचे क्रौर्यच दाखवते. कायद्याच्या आधारे त्यांच्यावर केलेल्या जुलमाचे हे उदाहरण आहे. जमीनी जप्त करून त्यांचा लिलाव करण्याच्या भीतीने हा महसूल गोळा झाला आहे.

मी कबूल करतो की वसुली करण्याकरिता कायद्यात कोणतीही मनाई नाही. परंतु जर तो कायदा मोठ्या मनाने स्थगित करण्यात आला तर ही कृपा आपल्यावर केलीच पाहिजे असे कोणीही आग्रहपूर्वक म्हणू शकत नाही. परंतु हे अंमलदाराच्या लहरीवर अवलंबून नसावे. याचे नियमन करण्याकरिता परिपूर्ण नियामवली ठरलेली आहे. आणि मग सरकार असाही दावा करू शकत नाही की चार आणेसुद्धा पीक आले नसते तरीही त्यांनी शेतसारा स्थगित केलाच पाहिजे. आणेवारी खरी की खोटी हाच मुद्दा आहे. आणेवारी जर बरोबर असेल तर सूट देताना सरकार इतरही मुद्दे लक्षात घेत असते. उदाहरणार्थ ‘जिल्ह्याची सामान्य आर्थिक परिस्थिती.’ असे जर असेल तर जिल्ह्यात प्लेग सुरू आहे, आणि महागाई वाढलेली आहे. यामुळे तर सूट मिळावी म्हणून जनतेकरिता तर अजूनच कारणे आहेत. जिल्हाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की या इतर मुद्द्यांकडे मी लक्ष द्यायला नको. केवळ पीक किती आले यावरच लक्ष केंद्रित केले पाहिजे.

मला वाटते एक स्वतंत्र पंच नेमण्याच्या बाजूने मी जितके काही सांगायला पाहिजे तितके सर्व सांगितले आहे. याशिवाय एक शेतकरी जरी शेतसारा भरू शकत नसेल तरी पंच नेमण्याला वाव असू

शकतो. याचे कारण जप्त करण्याकरिता जर एकही गोष्ट हाती लागली नाही तर सरकार त्याची जमीन खालसा करण्याकरिता मागेपुढे पाहणार नाही. पटवाऱ्याने दिलेले आकडे खोटे आहेत असे सिद्ध करण्याची शेतकऱ्याची तयारी असते. किती तर पटवारी हिंमत करून सांगतात की आणेवारीचे आकडे वरून सांगण्यात आले त्याप्रमाणे ठेवण्यात आले आहेत. इतके असूनही स्वतंत्र पंच नेमण्याची जर आवश्यकता वाटत नसेल तर मग सरकार महसुलाची रक्कम स्थगित का करू शकत नाही? सरकारने जर असे केले तर चांगल्या परिस्थितीतील लोकांनी आपण लगेच फटाफट वायदा भरू असे कबूल केले आहे.

स्पष्ट आहे की आयुक्तांनी ज्या सिद्धांतांची ग्वाही दिली आहे त्यापूसन त्यांनी माघार घेतली आहे.

## ना. व्हाईसरायचा तडजोडीकरिता संदेश

ना. व्हाईसरायनी अंतर्गत मतभेद विसरून जाण्याची शिफारस केली आहे. परंतु ही विनंती केवळ जनतेकरिताच आहे की ती अंमलदारांकरिताही आहे? जनतेची मागणी जर न्याय्य आणि वाजवी असेल तर लोकमताचा आदर करून सरकारने शांतता स्थापित करण्याचा प्रयत्न करू नये काय?

या संकटाचा अर्थ उपासमार असाच जर लावला जात असेल तर मी सांगू इच्छितो की खेडातील जनता उपाशी मरून राहिलेली नाही. परंतु वायदा भरण्याकरिता जर इतर गोष्टी विकाव्या लागत असतील आणि पोट भरण्याकरिता जर अन्नधान्य विकावे लागत असेल तर या स्थितीचा संकटातच समावेश करावा लागेल. आणि आज अशी परिस्थिती खेडा जिल्ह्यात घरोघरी आहे. असंख्य खातेदारांनी झाडे, जनावरे वा इतर गोष्टी विकून महसूल भरला आहे. अशा प्रकारच्या उदाहरणांची माझ्याजवळ उणीव नाही. अधिकारी वर्ग धाक दाखवून महसूल गोळा करत आहेत याचा सरकारी यादीत उल्लेख नाही ही विचित्र गोष्ट आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या तथाकथित दुराग्रहाचा धडा शिकवण्यात येतो आहे. चार लाखाच्या महसुलाकरिता करोडो रुपयांची जमीन विकावी लागेल या भीतीपासून मुक्त नाहीत ! अधिकारी वर्गाची बाजू खोटी आहे असे वरील निवेदनावरून जाणवत नाही काय?

# ५. खेडाच्या लढ्याची पूर्णाहुती

[ही विज्ञप्ती गांधीजी आणि सरदार वल्लभाई पटेल यांच्या सहीनिशी गुजरातीत प्रकाशित करण्यात आली होती आणि इंग्रजीत ही 'एंड विदाऊट ग्रेस या शीर्षकांतर्गत 'यंग इडिया'त प्रकाशित करण्यात आली होती.']

खेडा जिल्ह्यातील जनतेने ज्या लढ्याची सुरुवात २२ मार्च १९१८ ला केली होती. तिचा शेवट व्हायची वेळ आली आहे. त्या तारखेला जनतेने पुढीलप्रमाणे प्रतिज्ञा केली होती -

***आम्हांला कल्पना आहे की आमच्या गावातील पीक चार आण्यांपेक्षा कमी आले आहे. यामुळे येत्या वर्षापर्यंत महसूलवसुली स्थगित करण्याकरिता सरकारकडे अर्ज केला होता, परंतु अर्ज करूनही सरकारने वसुली बंद केलेली नसल्यामुळे आम्ही खालील सह्या करणारे प्रतिज्ञा करतो की आम्ही सरकारचा या वर्षाचा पूर्ण महसूल वा त्याचा जो भाग देय असेल तो भरणार नाही. परंतु तो वसूल करण्याकरिता सरकारला जर राजकीय पाऊल उचलायचे असेल तर ते उचलावे. याकरिता आम्ही सर्व प्रकारचे दुःख सहन करण्याकरिता तयार आहो आणि आमची जमीन जरी खालसा होणार असेल तरी आम्ही आमच्या प्रतिज्ञेवर ठाम राहू आणि आमच्या हाताने पैसा भरून आम्ही आमचा स्वाभिमान गमावणार नाही. नामदार सरकार जर पुढील हप्त्यापर्यंत महसूल स्थगित करणार असेल तर आमच्यापैकी जे शक्तिमान लोक आहेत ते पूर्ण वा बाकी राहिलेला महसूल भरायला तयार आहेत. आमच्यापैकी जे शक्तिमान आहेत ते महसूल याकरिता भरून राहिलेले नाहीत की त्यांनी जर महसूल भरला तर आम्ही घाबरून जाऊ आणि घरातील चीजवस्तू विकून वा कर्ज काढून महसूल भरू आणि परिणामी आम्हाला दुःख सहन करावे लागेल अशी त्यांना भीती वाटते. अशा परिस्थतीत गरिबांचा बचाव करणे श्रीमंताचे कर्तव्य आहे असे आम्हांला वाटते.***

या प्रतिज्ञेचा सार हा आहे की सरकार जर गरिबांचा महसूल स्थगित करणार असेल तर श्रीमंत लोक महसूल भरायला तयार आहेत. अशा प्रकारचा आदेश उत्तराखंडाच्या मामलतदाराने ३ जूनला काढला आहे. यामुळे उत्तराखंडमधील जनतेत जे शक्तिमान लोक आहेत त्यांना महसूल भरण्याचा सल्ला देण्यात आला आहे आणि त्यांनी महसूल भरायला सुरुवात केली आहे.

उत्तराखंडमध्ये अशा प्रकारचा हुकूम निघाल्यामुळे जिल्हाधिकारी साहेबांना आम्ही विनंती केली की उत्तराखंडमध्ये जसा हुकूम निघाला आहे आणि त्यामुळे तेथील लढा संपला आहे त्याचप्रमाणे तसाच

हुकूम जर इथेही काढण्यात आला तर १० मेच्या युद्धपरिषदेच्या वेळी नामदार राज्यपाल महोदयांना या जिल्ह्यातील लढाही संपला असल्याचे सांगता येईल. मेहरबान जिल्हाधिकारी साहेबांनी उत्तर दिले की उत्तराखंडाचा मामलतदाराचा हुकूम संपूर्ण जिल्ह्याला लागू होतो. अशा प्रकारे जनतेची मागणी मान्य करण्यात आली आहे. मेहरबान जिल्हाधिकारी साहेबांनी चौथाईच्या प्रश्नाच्या उत्तरात सांगितले आहे की ज्यांच्यावर चौथाईचा हुकूम निघाला आहे ते जर महसूल भरतील तर त्यांना चौथाई माफ होईल. याकरिता आपण साहेबांचे आभार मानले पाहिजे.

आम्हांला सखेद म्हणावे लागते या लढ्याचा अंत तर झाला आहे, परंतु या अंतात गोडवा नाही. त्यात जी खुबी असायला पाहिजे होती ती नाही. वरचा हुकूम उदार मनाने करण्यात आलेला नाही. असे वाटते की तो नाराजीने करण्यात आला आहे. मेहरबान जिल्हाधिकारीसाहेब म्हणतात की "वरीलप्रमाणे सूट देण्याचा हुकूम १५ एप्रिलला मामलदारांना देण्यात आला होता. शिवाय त्याची अंमलबजावणी बरोबर व्हावी अशा हेतूने २२ मे रोजी दुसरी यादी देण्यात आली होती. आणि तिच्यात असेसुद्धा सांगण्यात आले होते की वायदा देणारांचे दोन वर्ग करण्यात यावे. एक वायदा देऊ शकणारे परंतु न दिलेले आणि दुसरा गरिबीमुळे वायदा न देऊ शकणारे." सरकारचा हा हुकूम जनतेकरिता का जाहीर करण्यात आला नाही? २५ एप्रिलला या हुकुमाची माहिती जर जनतेला झाली असती तर जनतेचे किती हाल वाचले असते? अंमलदाराचा जप्तीचा हुकूम थांबण्याकरिता जो खर्च आला तोसुद्धा टाळला गेला असता. ज्या कोणी महसूल दिला नव्हता तो जीव मुठीत धरून होता. जप्ती येऊ नये म्हणून त्यांनी घरसुद्धा सोडले होते. आणि त्यांना खायलासुद्धा पुरेसे नव्हते. वैऱ्यालासुद्धा सहन करावे लागू नये असे हाल त्यांना सहन करावे लागले. काही वेळा तर उद्धट मंडळ इंस्पेक्टरकडून त्यांना अपमान सहन करावा लागला. त्यांच्या डोळ्यासमोर दुभत्या म्हशी नेण्यात आल्या. तेही त्यांना सहन करावे लागले. त्यांनी चौथाईचा दंड भरला. जनतेला जर वरील हुकूम कळला असता तर ती अनेक दुःखांमधून वाचली असती. अधिकाऱ्यांना माहीत होते की लढाईचे मूळच जनतेच्या दुर्बलतेत होते. खेडुतांची ही दशा समोर पाहूनही नामदार आयुक्तसाहेब आधी तर नाहीच म्हणाले होते. अनेक पत्रे लिहूनही 'नाही'चे 'हो' काही झाले नाही. त्यांचे म्हणणे होते की प्रत्येक देणेदाराला सूट देता येऊ शकत नाही. आता जिल्हाधिकारी म्हणतात की सर्वांना सूट ही तर जगजाहीर गोष्ट होती. असे असेल तर जनतेने विनाकारणच दुःख सहन केले. दिल्लीला जात असताना मी नामदार आयुक्त साहेबांना असा हुकूम काढण्याची विनंती केली. मी

म्हणालो की तुम्ही जर असा आदेश काढू शकलात तर मी व्हाईसराय साहेबांना तडजोड झाल्याची आनंदाची बातमी सांगू शकेन. नामदार आयुक्त साहेबांनी माझी विनंती ऐकलीच नाही. रावसाहेब दादूभाईंनीसुद्धा आम्हा दोघांना विचारून २५ एप्रिलला अशीच मागणी केली होती. त्यांना आयुक्त साहेब म्हणाले की आता ही मागणी स्वीकारण्याची वेळच राहिलेली नाही.

जनतेचे दुःख पाहून त्यांचे हृदय हेलावले. अखेरीस त्यांच्या लक्षात त्यांची चूक आली. जनतेला खुश करण्याकरिता ते प्रत्येकाचे प्रकरण पाहून सूट द्यायला तयार झाले. अशा प्रकारे पहिल्यांदाच अधिकारी वर्गाने उदार अंतःकरणाने यश घेण्याच्या मार्गातील अडथळ्यांचा हृदयापासून त्याग केला. आणि आतासुद्धा जे दिले ते हात आखुडता हात ठेवून, कोत्या मनाने आणि चूक कबूल केल्याशिवाय. आणि जी सूट दिली तीसुद्धा असे म्हणून की अशी सूट तर आधीपासूनच दिली जात होती, या तडजोडीत नवीन काहीही नाही. या तडजोडीत गोडवा नाही.

जनतेजवळ आपले दोष कबूल करायचे नाही हा खोटा हट्ट आणि मान्यता, जनतेने मागितले म्हणून दिले असे होऊ नये या स्वतःच ठरवलेल्या सिद्धांताला बिलगून राहणे या गोष्टींमुळे अधिकारी वर्ग लोकप्रिय होऊ शकत नाही. त्यांच्यावर टीका करताना मला दुःख होते, परंतु या वर्गाचा मित्र म्हणून मी अशी टीका करण्याचे धाष्टर्य केले आहे.

अधिकारी वर्गाची अशी वर्तणूक असूनही आपली मागणी मान्य केली आणि जी सूट दिली तिचा स्वीकार करणे आपले कर्तव्य आहे. आता आठ टक्के महसूल भरणे शिल्लक राहिलेले आहे. आजपर्यंत महसूल न भरण्यात आपला स्वाभीमान होता. आता ही परिस्थिती बदललेली असल्यामुळे महसूल भरण्यातच सत्याग्रहीचा स्वाभीमान आहे. सरकारला किंचितही त्रास न देता ज्यांच्यात शक्ती आहे त्यांनी लगेच महसूल भरल्याचे दाखवून दिले पाहिजे. ज्यांचा आध्यात्मिक आणि मानवतेच्या कायद्याला विरोध नाही त्यांनी सत्याग्रहाच्या कायद्याला मान देऊन या बाबतीत आपण कोणाच्याही मागे नाही हे दाखवून दिले पाहिजे. या लढाईत कायदा आणि सत्ता शुद्ध भावनने मान दिल्यानेच आपण अंमलदारांना त्यांनी केलेल्या वर्तणुकीची जाणीव करून देऊ शकू.

महसूल भरण्याची क्षमता नसलेल्या खेडूतांची नोंद करत असताना आपण अशी कडक शिस्त दाखवली पाहिजे की तिच्यावर कोणालाही आक्षेप घेता येऊ नये. ज्यांच्या क्षमतेबद्दल किंचितही शंका

आहे त्यांनी महसूल भरणे हे त्यांचे कर्तव्य आहे. कोणामध्ये क्षमता नाही याचा निर्णय तर शेवटी अधिकारी वर्गच करील. असे असले तरी त्यांनी जनतेला पूर्ण सन्मान दिला पाहिजे असे माझे मत आहे.

खेडाच्या जनतेच्या बहाद्दुरीकडे संपूर्ण हिंदुस्थानचे लक्ष वेधले गेले आहे. निर्भयता, ऐक्य, दृढता, आणि स्वार्थत्यागाचा रसास्वाद खेडातील आज सहा महिन्यांपासून घेत होती. माझी अपेक्षा आहे खेडातील जनता या महान गुणांचे अजून संवर्धन करील आणि मातृभूमीचे नाव अजूनच उज्ज्वल करील. आम्ही असे गृहीत धरतो की ही लढाई लढून खेडा जिल्ह्यातील जनतेने स्वराज्याची आणि स्वातंत्र्याची शुद्ध सेवा केली आहे.

ईश्वर जनतेचे कल्याण करो.

आम्ही जनतेचे सदैव सेवक,
मोहनदास करमचंद गांधी,
वल्लभभाई झवेरभाई पटेल

नडियाड,
वैशाख वद्य द्वादशी, ‘७४
जून ६, १९१८

# १. परिशिष्ट - लष्करभरतीकरिता आवाहन

[पत्रिका पहिली]

खेडा जिल्ह्यातील बंधुभगिनींनो,

तुम्ही नुकताच सत्याग्रहाचा लढा पूर्ण केला आहे. त्यात तुम्ही विजय मिळवला आहे. या लढाईत तुम्ही शौर्य, चातुर्य इत्यादी गुण दाखवले आहेत. आता मी तुम्हांला याहूनही महत्त्वाच्या देशकार्याला लागावे असा सल्ला देण्याची हिंमत करतो आहे.

सरकारला सविनय विरोध कसा करावा, विरोध करत असतानानी सरकारबद्दल वाटणारा आदर कसा व्यक्त करावा आणि स्वतःचा स्वाभिमान कसा राखावा हे तुम्ही दाखवून दिले आहे. करारीपणाने लढूनही सरकारबद्दल तुमच्या मनात किंचितही अढी नाही हे दाखवून देण्याचा प्रसंग मी तुमच्यासमोर ठेवतो आहे.

तुम्ही सर्व स्वराज्यवादी आहा, काही होमरूलचे सदस्य आहा. होमरूलचा एक अर्थ साम्राज्यात राहून साम्राज्याचे भागीदार होणे असाही आहे. आज आपण साम्राज्याच्या ताब्यातील जनता आहो, आज आपल्याला इंग्रजांइतके अधिकार नाहीत. कॅनडा, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया हे इंग्लंडचे भागीदार आहेत तसे आपण नाही. आपला मुलूख तर गुलाम मुलूख म्हणवला जातो. आपल्याला इंग्रजांइतकेच हक्क हवे आहेत. दक्षिण आफ्रिका वगैरे संस्थानांबरोबरीचे स्थान आपल्याला हवे आहे. आपल्याला व्हाईसरायच्या पदावरसुद्धा जाता यावे अशी आपली इच्छा आहे. अशी स्थिती निर्माण होण्याकरिता आपल्याला आपले स्वतःचे रक्षण करता येण्याइतकी शक्ती यावी म्हणून शस्त्र धारण करून लढता यायला पाहिजे. जोपर्यंत आपले रक्षण केवळ इंग्रजांच्या आधारावर अवलंबून आहे, जोपर्यंत आपल्यामध्ये सैनिकवर्गाबद्दल घाबरटपणा आहे तोपर्यंत आपण इंग्रजांच्या बरोबरीचे आहो असे कोणीही म्हणू शकणार नाही. यामुळे आपण शस्त्रसंचालनाची कला शिकून स्वतःचे रक्षण करायची शक्ती मिळवली पाहिजे. शस्त्रसंचालन जलद गतीने शिकायचे असेल तर लष्करात भरती होणे आपले कर्तव्य आहे.

मर्द आणि नामर्दात मैत्री होऊ शकत नाही; आपली गणना नामर्दात होते. नामर्दाईच्या गणनेतून सुटका हवी असेल तर शस्त्रसंचालन शिकणे आवश्यक आहे.

आपल्याला साम्राज्यात भागीदार बनायचे आहे हे निश्चित आहे. जर असे असेल तर आपल्याला कितीही जरी त्रास सहन करावा लागला तरी मरण पत्करूनसुद्धा आपण साम्राज्याचा बचाव केला पाहिजे. या साम्राज्याचा जर नाश झाला तर त्याबरोबर आपलाही नाश होईल.

यामुळे स्वराज्य मिळवण्याचा सरळात सरळ मार्ग साम्राज्याच्या रक्षणात भाग घेणे हाच आहे. खूप पैसा देण्याची आपल्यामध्ये शक्ती नाही. परंतु पैशानेच विजय मिळवता येतो असेही नाही. असीम शक्तीचा स्रोत असलेल्या लष्करानेच विजय मिळवता येऊ शकत असतो. असे लष्कर तयार करण्याची क्षमता हिंदुस्थानमध्ये आहे. आपल्या साम्राज्याचा विजय झाला तर आपण मागितलेले हक्क आपल्याला मिळू शकतील हे स्पष्ट आहे.

कोणी म्हणतात की यामुळे आपल्याला हक्क मिळणार नाही, नंतर सरकार आपल्याला धोका देईल. ज्या सामर्थ्यामुळे आपण साम्राज्याचे रक्षण करू शकू तेच सामर्थ्य आपल्याला शक्तीही मिळवून देईल. साम्राज्याच्या दुर्बलतेमुळे मिळवलेले हक्क साम्राज्य शक्तिशाली होता हिरावून घेतले जाण्याची शक्यता असते. साम्राज्याला त्रास देऊन आपण त्याचे भागीदार होऊ शकणार नाही. साम्राज्याची सेवा करूनच आपल्याला हा हक्क मिळू शकेल. या वेळी साम्राज्याला त्रास दिल्याने हा हक्क आपल्याला मिळू शकणार नाही. साम्राज्याचा कारभार चालवणारांचा अविश्वास करणे म्हणजे आपण आपल्या शक्तीवर अविश्वास करणे. ती आपल्या दुर्बलतेची निशाणी होईल. आपल्या हक्काचा आधार राज्यकारभार चालवणारांचा दुबळेपणा वा चांगुलपणा नसायला पाहिजे. त्याचा आधार आपली पात्रता, आपली शक्ती हाच असायला पाहिजे.

देशी राज्य साम्राज्याला मदत करत आहे, यामुळे त्यांना त्याचा मोबदलाही मिळतो आहे. श्रीमंत लोक त्यांना पैशाने पूर्ण मदत करत आहेत. त्यांनासुद्धा त्याचा मोबदला मिळतो आहे. या दोघांनाही अटींवर मदत मिळून राहिलेली नाही. लष्करातील शिपाई आपल्या मिठाकरिता आपल्या आजीविकेकरिता मदत करत आहेत. त्यांना आजिविका आणि बक्षीस वगैरेही मिळत आहेत. हे सर्व आमचे भाग आहेत, परंतु यांना स्वराज्यवादी म्हणता येऊ शकत नाही. त्यांचे ध्येय स्वराज्य नाही. ते स्वदेशीला मदत करत नाहीत. हेसुद्धा शक्य आहे की आपण जर शत्रुत्वाच्या भावनेने स्वराज्य मिळवण्याची इच्छा केली तर या तिन्ही शक्ती एकत्र होतील आणि राज्यकारभार करणारांशी समेट करून त्या आपल्याला पराभूत करतील.

आपली जर स्वराज्य मिळवण्याची इच्छा असेल तर साम्राज्याला मदत करणे हे आपले कर्तव्य ठरते. तसे केले तर आपल्याला त्याचा मोबदला निश्चितच मिळेल. आपण जर प्रामाणिक असू तर सरकारसुद्धा आपल्याशी प्रामाणिकपणे काम करील. शक्य आहे की एखाद वेळी सरकार प्रामाणिक नसेलही तरी पण आपण आपल्या शुद्धतेवर विश्वास ठेवला पाहिजे. चांगल्याशी चांगले राहण्यात शौर्य नाही. वाईटाशीसुद्धा चांगला व्यवहार करण्यात शौर्य आहे.

सरकार आपल्याला कमिशन (लष्करात अधिकारी होण्याची संधी) देत नाही, शस्त्र धारण करण्याचा कायदा रद्द करत नाही, लष्करी शिक्षण देणाऱ्या शाळा उघडत नाही तर आपल्याला ते कशी काय मदत करू शकेल? ही अडचण खरीच आहे.

या बाबतीत सुधारणा न करून सरकार फार मोठी चूक करत आहे. इंग्रजांनी खूप मोठे पूण्य केले आहे. यामुळे ईश्वर त्यांचे भले करो. परंतु इग्रज जनतेच्या नावाने इंग्रज अधिकाऱ्यांनी हिंदुस्थानला निःशस्त्र केले. या पापाबद्दल अधिकारी वर्ग जर लवकरच सावध झाला नाही तर तो ते सर्व पुण्य धुऊन टाकील. यामुळे हिंदुस्थानला दुर्दैवाने जर कोणतीही इजा झाली, हिदुस्थान जर दुसऱ्या एखाद्या देशाच्या ताब्यात गेला तर हिंदुस्थानच्या तेहत्तीस कोटी जनतेला नामर्द बनवल्याबद्दलची हाय इंग्रजांना भोवल्याशिवाय राहणार नाही. मला असे वाटते की इंग्रजांमधील महापुरुषांच्या ही गोष्ट लक्षात आलेली असेल, ते सावध झालेले असतील, परंतु त्यांनी स्वतःच निर्माण केलेल्या या परिस्थितीतून बाहेर पडण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नसावे. हिंदुस्थानात येताच प्रत्येक इंग्रजाला आमचा तिरस्कार करणे, स्वतःचा मोठेपणा दाखवणे, वेगळे राहणे इत्यादी गोष्टी शिकवण्यात येत असतात. ते अशाच वातावरणात राहतात. ते उच्च वातावारणातून मुक्त होण्याचा आणि खालच्यांना त्यांच्या वातावरणातून मुक्त करण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु त्यांना यश मिळून राहिलेले नाही. विपरीत परिस्थिती नसती तर आपण त्यांच्याबरोबर रणांगणात लढत राहिलो असतो. परंतु आता जर आपण कमिशन वगैरे मिळण्याची वाट पाहत बसणार असू तर चेहऱ्यावरील राग काढण्याकरिता स्वतःचे नाक कापण्याप्रमाणे होईल. असेसुद्धा होऊ शकेल की आपण कमिशनची वाट पाहत बसू आणि इंग्लंडला मदत करण्याची संधीच निघून जाईल.

सरकार कमिशन वगैरे जर देत नसेल वा देण्यात ढिलाई करत असेल तर वा इतर प्रकारे लष्करात भरती होण्याकरिता अडवू इच्छित असेल तरी आपण आग्रहपूर्वक लष्करात भरती होण्याची आवश्यकता आहे असे माझे दृढ मत आहे.

या वेळी सरकारला लष्करात पाच लाख माणसांची गरज आहे. काहीही करून सरकार इतके लोक मिळवील. आपण जर इतके लोक देऊ शकलो तर आपण यशस्वी होऊ. आपण सेवा करायला पाहिजे आणि अयोग्य पद्धीतीने काम करणाऱ्या ब्रिटिशांच्या दलालाच्या जाळ्यात घाबरून जाऊन फसू नये. भरतीचे काम आपल्या हाती आले हा काही लहान अधिकार नाही. सरकारचा जर आपल्यावर विश्वास नसता, जर ते प्रामाणिकपणे काम करत नसते तर त्यांनी आपल्यातर्फे भरती केलीच नसती.

वर दिलेल्या तर्कावरून आपल्या लक्षात येईल की सैन्यात भरती होण्याने आणि साम्राज्याला मदत करण्याने आमच्यामध्ये स्वराज्य मिळवण्याची पात्रता येईल. यामुळे आम्ही हिंदुस्थानचा बचाव करणे शिकू आणि एका सीमेपर्यंत आपण गमावलेले पौरुष परत मिळवू.

इग्रजांच्या गुणावर माझा विश्वास आहे. यामुळेच मी वरीलप्रमाणे सल्ला देऊ शकलो आहे हे मी कबूल केलेच पाहिजे. मी कबूल करतो की या लोकांनी आपले फार नुकसान केले आहे. असे असूनही या लोकांबरोबर राहण्यात आपला लाभ आहे. या लोकांच्या गुणदोषांचे जर आपण मोजमाप केले तर गुणांचे पारडे खाली जाईल. या लोकांच्या अंतर्गत राहणे दुःखद आहे. इंग्रजांमध्ये एक मोठा दोष आहे. त्यांच्या अंतर्गत राहणाऱ्या जमातींना ते स्वाभिमान विसरायला लावतात. परंतु त्यांच्यात बरोबरीच्या लोकांना पूर्ण सन्मान देण्याचा आणि त्यांच्याशी प्रामाणिक वर्तन करण्याचा गुणही आहे. इतरांच्या जुलमाखाली चिरडले जात असलेल्या लोकांना अनेकदा त्यांनी मदतही केली असल्याचे आपण पाहिले आहे. त्यांच्याबरोबर राहून आपण बरेच काही घेऊ शकतो आणि देऊही शकतो. अशा प्रकारे आपल्या दोघांचे संबंध जगाकरिता हितकारक असण्याचीसुद्धा शक्यता आहे. मला जर अशी खात्री वाटली नसती तर आणि जमातीपासून पूर्णपणे स्वतंत्र होणे आवश्यक आहे असे जर मला वाटले असते तर मी असा सल्ला दिला नसता. इतकेच नाही तर आवश्यकता वाटली असती तर त्यांच्या विरोधात बंड करण्याचासुद्धा मी सल्ला दिला असता. आणि असे करताना मी जरी शिक्षेकरिता पात्र ठरलो असतो तरी मी जनतेला बंड करण्याचाच सल्ला दिला असता. इतर कोणत्याही देशाच्या मदतीशिवाय स्वतंत्रपणे उभे राहण्याची शक्ती सध्या तरी आपल्यामध्ये नाही. माझी अशी मान्यता आहे की साम्राज्यात

भागीदार होऊनच आमची प्रगती होऊ शकेल. आणि सर्व सर्व स्वराज्यवादीसुद्धा हे मान्य करतात असे मी संपूर्ण हिंदुस्थानात अनुभवले आहे. खेडा जिल्हा आणि गुजरातकडून मी ज्या अपेक्षा करतो ती पाचसातशे लोकांची भरती करण्याची नाही, माझी हजारोंची अपेक्षा आहे. गुजरातला जर 'नामर्दपणाच्या कलंकातून' वाचायचे असेल तर त्याने हजारो शिपाई द्यायला पाहिजे. या लष्कराच्या कल्पनेत शिक्षित वर्ग, पाटीदार, बारैया, वाघरी अशा सर्व लोकांचा समावेश आहे. हे सर्व खांद्याला खांदा लावून लढतील अशी मी अपेक्षा करतो. जोपर्यंत शिक्षित वा शिकलेला उच्च वर्ग बाहेर पडणार नाही तोपर्यंत इतर वर्गांकडून अपेक्षा करणे व्यर्थ आहे. शिकलेल्या वर्गात जे प्रौढ आहेत, तंदुरुस्त आहेत ते सर्व येतील असे मी अपेक्षितो. त्यांच्या उपयोग लढण्याकरिता होणार नसेल तर लढाईशी संबंधित इतर कामात करता येऊ शकतो, शिपायांच्या व्यवस्थेकरिता करू शकतो. ज्यांना सैन्यात जाण्यासारख्या वयाची मुले आहेत ते आपल्या मुलांना सैन्यात पाठवण्याकरिता मागेपुढे पाहणार नाहीत अशी मी अपेक्षितो. लढाईत मुलाचे जरी बलिदान दिले गेले तरी ते दुःखद नाही. शूराकरिता तर ही गोष्ट सुखकर व्हायला पाहिजे. या वेळी जर मुलाला होमिले जाईल तर ते होमिले जाणे स्वराज्याकरिता होते असेच समजायला पाहिजे.

भगिनींना माझी विनंती आहे की त्यांनी माझ्या या विनंतीपत्रामुळे घाबरून जाऊ नये. उलट तुम्ही याचे स्वागत केले पाहिजे. यातच तुमच्या रक्षणाची, तुमच्या लज्जारक्षणाची चाबी लपलेली आहे.

खेडा जिल्ह्यात ६०० गावे आहेत. प्रत्येक गावात सरासरीने १,००० लोकांची वस्ती आहे. प्रत्येक गावातून कमीतकमी २० तंदुरुस्त लोक निघाले तर खेडा जिल्हाच १२,००० लोकांचे लष्कर तयार करू शकते. खेडा जिल्ह्याची लोकवस्ती सात लाख आहे. हे पाहिले तर हे प्रमाण शेकडा १.७ टक्के येते. मृत्यूदर यापेक्षा जास्त आहे. आपण जर इतकी आहुती स्वराज्याकरिता-साम्राज्याकरिता देऊ शकत नसू आणि यामुळे जर आपण नालायक ठरलो तर मला मुळीच नवल वाटणार नाही. प्रत्येक गावाने युद्धाकरिता वीस लोक दिले आणि ते जर परत जिवंत आले तर ते गावाचे रक्षण गडकोट बनून करतील. आणि त्यांच्यानंतर परत वीस लोक तयार होऊन देशाचे रक्षण करतील.

आपल्याला जर हे कार्य करायचे असेल तर मग त्यात दिरंगाई व्हायला नको. प्रत्येक गावातून जास्तीत जास्त ताकदवान पुरुषांची नावे निवडण्यात यावी आणि ती नावे पाठवण्यात यावी असे मी इच्छितो. बहिणीकडे मी त्यांच्या भावांची मागणी करतो आहे. तुम्हांला समजावण्याकरिता आणि

तुमच्या मनात जे प्रश्न उभे राहतील त्यांचे उत्तर देण्याकरिता गावोगावी सभा होणार आहेत. स्वयंसेवकसुद्धा निघणार आहेत.

भाई वल्लभभाई झवेरभाई पटेल (बॅरिस्टर), भाई कृष्णलाल नरसीलाल देसाई (एम. ए.; एलएल. बी), भाई इंदुलाल कनैयालाल याज्ञिक (बी. ए. एलएल. बी), भाई हरिप्रसाद पितांबरदास महेता (हितेच्छु मुद्रणालयाचे मालक), भाई प्रागजी खंडूभाई देसाई, भाई मोहनलाल कामेश्वर पंड्या, भाई गणेश वासुदेव मावळंकर (बी. ए., एलएल. बी), भाई काळीदास जशकरण झवेरी (बी. ए., एलएल. बी), भाई फूलचंद बापूजी शाह, भाई गोकलदास द्वारकादास तलाटी (बी. ए., एलएल. बी), भाई शिवाभाई भाईलालभाई पटेल (बी. ए., एलएल. बी), भाई रावजीभाई मणिलाल पटेल वगैरे लोक या कार्यक्रमाकरिता हजर होते.

मोहनदास करमचंद गांधी

नडियाड, २२-६-१९१८

प्रजाबंधू, ३०-६-१९१८

# २. लष्करभरतीकरिता आवाहन

[पत्रक क्र. २]

पहिले पत्रक लिहिल्यानंतर आज एक महिना झाला. या दरम्यान मला आणि माझ्याबरोबर काम करणाऱ्या माझ्या सहकाऱ्यांना भरपूर अनुभव मिळाला. नडियाड, करमसद, रास, कडलाल, जंबुसर वगैरे ठिकाणी सभा झाल्या. शेकडो स्त्री-पुरुषांशी चर्चा झाली.

मिळालेला अनुभव तुमच्यासमोर ठेवण्याची परवानगी घेतो आहे. मुश्किलीनेच शंभर माणसे झाली आहेत. एक महिन्याचा विचार केला तर आणि केलेल्या प्रवासाचा विचार केला तर ही संख्या फार कमी आहे असे वाटते. लोकांच्या परिस्थितीचा विचार केला तर मला वाटते की इतके लोक तयार झाले हेच आश्चर्यजनक आहे. ज्या वर्गाने लढाईत कधीही भाग घेतला नाही, ज्यांनी कोणावर कधीही काठी उगारली नाही, ते लोक यात दाखल झाले आहेत. लढण्यालायक जो वर्ग तो जर यात सामील झाला तर अपार सैन्य तयार होऊ शकेल.

समंजस वर्गाच्या उणिवा या प्रसंगी स्पष्टपणे दिसून आल्या. मी 'शिक्षित'ऐवजी 'समंजस' हा शब्द वापरतो आहे. अशा स्त्रीपुरुषांनी जर आपले कर्तव्य पार पाडले तर जो वर्ग स्वाभाविकपणे जाण्यालायक आहे त्याच्यावर परिणाम होऊ शकेल. समंजस वर्गाच्या फार मोठ्या दुर्बलता असल्याचे सिद्ध करणारा माझा अनुभव आहे. ते राष्ट्रीय कार्यात पुरेसे रस घेऊन राहिलेले नाहीत. यामुळे भरतीचे काम कठीण झाले आहे. यामुळे समंजस वर्गातील ज्या कोणाच्या हाती हे पत्रक येईल ते जर या कार्यावर श्रद्धा ठेवत असतील तर त्यांनी तयार होऊन या कार्याकरिता अशिक्षित वर्गाला-समंजसशक्ती नसलेल्या वर्गाला तयार करावे, प्रेरित करावे.

परंतु माझ्या असे पाहण्यात आले आहे की समंजस वर्गाला या कार्याबद्दल श्रद्धा वाटत नाही. त्यांच्याकरिता मी हे पत्रक लिहितो आहे. त्यांनी लक्ष देऊन हे पत्रक वाचावे अशी माझी त्यांना विनंती आहे. सद्य परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी आपल्या कर्तव्याची सीमारेषा ठरवणे हे समंजस माणसाचे कर्तव्य असते. आपल्याला जर इंग्रजांशी संबंध तोडायचे असतील तर निश्चितच आपण मदत करायला नको. हे संबंध तोडण्याची मागणी करणारे लोक कमीच आढळले आहेत. संबंध तोडण्याची इच्छा असणारेसुद्धा संबंध तोडू शकत नाहीत. ते काहीही जरी असले तरी या वेळी आपण इंग्रजांना मदत

करण्यातच आपली प्रगती आहे. त्यांना मदत करणे म्हणजे आपण स्वतःला मदत करण्यासारखे आहे. आपले परस्परांचे स्वार्थ एकमेकात गुंतलेले असल्यामुळे एकमेकांच्या दोषांचे वाभाडे काढून एकमेकांना मदत न करणे हे अतिशय अविचारीपणाचे काम समजले जाईल. आपण ज्या गावात राहतो त्या गावावर जर शत्रूने धाड घातली तर त्यामुळे संपूर्ण गावाचे नुकसान होण्याची शक्यता असते. अशा वेळी आपण आपसातील शत्रुत्व विसरून आलेले संकट दूर करण्याकरिता शत्रूवर हल्ला करून शत्रूला हाकलून लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अशीच गोष्ट आज या युद्धासंबंधी आहे. सध्या आपल्यावर आलेल्या सामान्य संकटाचा सामना करण्याची आवश्यकताच नाही तर हे आपले कर्तव्यही आहे. दुसरी शंका अशी घेण्यात आली आहे की युद्धात सगळ्याच्या सगळ्या माणसांना पाठवून त्यांना मृत्यूच्या मुखात ढकलणे हा धर्म कसा काय असू शकतो? अशाने तर सर्व स्वराज्यवादी मारले जातील, मग आपण स्वराज्य कसे काय मिळवू शकू? अशी शंका बुद्धिमान माणसांनी जर घेतली नसती तर मी तिला हास्यास्पद म्हणालो असतो. हिंदुस्थानात जर पाच लाखच स्वराज्यवादी असतील तर आपण स्वराज्याकरिता पात्र नाही असेच स्पष्ट होईल. परंतु शंका घेणारे म्हणतील की स्वराज्यवादी कितीही जरी असले तरी स्वराज्याकरिता आंदोलन करणारे संमजस लोक तर पाच लांखांपेक्षाही कमी आहेत. ही गोष्ट खरी आहे. परंतु एक गोष्ट आपण विसरतो. पाच लाख लोक मरायला तयार झाले तर पन्नास लाख लोकांच्या कानापर्यंत स्वराज्य, युद्ध वगैरे गोष्टी पोहोचतील. आपली इच्छा पाच लाख स्वतंत्र माणसे तयार करण्याची आहे. असे समंजसपूर्वक आपल्या इच्छेने होईल. हे पाच लाख लोक आपल्या मित्रांचा, नातलगांचा सल्ला घेतील. यामुळे पाच लाख माणसे जर जातील तर ते आपल्यासारखे पन्नास लाख लोक मागे ठेवून जातील. खरी गोष्ट तर ही आहे की आपण लढण्याची शक्तीच हरवून बसलो आहो. आपल्यामधील शौर्य लयास गेले आहे. आपल्या स्त्रियांचे रक्षण करण्याची शक्तीसुद्धा आपल्यामध्ये नाही. धर्मानुसार कर्म करणे आपण विसरलो आहो. दिवसाढवळ्या गावावर धाड पडली तर तिचासुद्धा आपण सामना करू शकत नाही. एक हजार माणसांच्या वस्तीत आठ लोक येऊन लूटमार करून निघून जातात असे दृश्य केवळ हिंदुस्थानातच दिसू शकते. आठ माणसांना हाकलून लावू शकणार नाहीत इतके काही गावातील लोक दुबळे नाहीत. परंतु ते मरायला फार घाबरतात. असे लोक लढाईत जाऊन आपले शरीर धोक्यात कसे टाकू शकतील? डाकू लुटत असतील तर त्यांनी खुशाल लुटावे. हे तर सरकारचे काम आहे ! असा विचार करून ते घरात लपून बसतात. शेजाऱ्याचे घर

लुटले जाते, त्याची इभ्रत लुटली जाते, त्याची मालमत्ता लुटली जाते त्याची या तत्त्वज्ञांना काहीही फिकीर नसते. जोपर्यंत या तत्त्वज्ञानरुपी अंधःकाराचा नाश होत नाही तोपर्यंत हिंदुस्थानात खरी शांतता स्थापित होऊ शकत नाही. सरकारी वा इतर शिपाई येतील तरच आपला जीव वाचू शकेल ही स्वाभिमानी माणसाकरिता असह्य स्थिती आहे, असायला पाहिजे. अशा स्थितीतून निघण्याचा तातडीचा इलाज आपल्या हाती आला आहे. सैनिक म्हणून भरती झाल्याने आपल्याला शस्त्र संचालन शिकायला मिळेल. आपल्यामध्ये राष्ट्रीय जोम निर्माण होईल आणि आपल्यामध्ये गावाचे रक्षण करण्याची पात्रता येईल.

आम्ही गेलो तर आमच्या मुलाबाळांचे काय होईल? हा प्रश्न तर सगळे विचारतात. लढाईत जाणाराला कपडे, खाण्यापिण्याचे साहित्य आणि शिवाय पगार मिळत असतो. कमीतकमी अठरा रुपये मिळतात (१९१८ सालच्या तुलनेत आज सोन्याच्या किंमतीत ५५०० पट झाली आहे. त्या वेळी दहा ग्रॅम सोन्याचा भाव अठरा रुपये होता.). आणि पात्रतेप्रमाणे त्यांच्या दर्जात तसेच पगारातही वाढ होते. जर त्यांचा मृत्यू झाला तर त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था सरकार करते. लढाईतून परतल्यानंतर त्यांना बक्षिसे वगैरे मिळत असतात. अखेरीस माझी मान्यता आहे की सैन्यात जशी मिळकत होते तशी इतर कोणत्याही व्यवसायात नाही.

परंतु इतका लाभ तर इंग्रजांनाच मिळत असतो, आपल्याला काय मिळेल? असे विचारणारे मला माहीत आहेत. त्यांना मला सांगायचे आहे की आपण जर पाच लाख समंजस माणसांचे सैन्य तयार केले आणि त्यांना इंग्रजांइतकेच हक्क मिळणार नाही ही गोष्ट शक्यच नाही. असे जर होईल तर त्यांना पाच लाख लोकांची आणि त्यांच्या पुढाऱ्यांची उणीव जाणवल्याशिवाय राहणार नाही. पाच लाख स्वयंसेवकांचे लष्कर तयार झाले आणि त्या लष्कराने जर इंग्रज लष्कराची बरोबरी केली तर त्यांना तितकेच हक्क मिळतील. पाच लाख सैन्य तयार करण्यातच हे हक्क सामावलेले आहेत.

तुम्ही म्हणता की बिनशर्त लढाईत सामील व्हा. इतर सल्लागार म्हणतात की समान हक्काचे अभिवचन घेऊन जा. तिसरे म्हणतात की आपल्यावर जाण्याचे मुळीच बंधन नाही. उजेड करून झोप बिघडवून टाकू नका. अशा तीन प्रकारच्या सल्ल्यामुळे आम्ही गोंधळलो आहो. अशा परिस्थितीत आम्हांला वाटते की जिथे आहो तिथेच आम्ही राहायला पाहिजे. यातच शहाणपणा आहे. यावर माझे नम्र उत्तर आहे की असे तर भित्रे लोक बोलत असतात. जसजसा काळ जाईल तसतसे नवीन पक्ष निर्माण

होतील, वेगवेगळी मते तयार होतील. हे सर्व पाहून तुम्ही विचारत पडता. मला तर वाटते की स्वराज्य मिळवण्याची आपण जी प्रतिज्ञा केली आहे त्या प्रतिज्ञेकरिता जर आपण लढाईत भाग घेतला नाही तर आपण स्वराज्याशी द्रोह करू. अटी ठेवल्याने आपण कदाचित लष्करात भरती होऊ शकणार नाही आणि यामुळे स्वराज्याची योजनाच स्थगित होऊन जाईल अशी भीती वाटते. लष्करात भरती होण्यातच आपले आपल्या देशाचे भले आहे. सैन्यात भरती झाल्याने स्वराज्याला धक्का तर मुळीच लागणार नाही असे तर सर्वच पक्ष कबूल करतात. यामुळे तिन्ही पक्षांच्या मुद्द्यांचा जरी विचार केला तरी सैन्यात जाणे उचित आहे असाच सार निघतो. मी आशा करतो की खेडा जिल्ह्यातील बांधव आपले कर्तव्य पार पाडतील आणि सैन्यात स्वयंसेवक म्हणून आपले नाव नोंदवतील वा सरळ आश्रमात पाठवतील.

या कामात भगिनी मदत करतील अशी अपेक्षा आहे. मला माहीत आहे की किती तरी बहिणी आपल्या नवऱ्याला आणि मुलांना सैन्यात जाण्यापासून अडवत असतात. त्यांनी जर खोलवर विचार केला तर की त्यांचा मुलगा वा पती वीर पुरुष होण्यात त्यांचा स्वार्थच आहे, देशाचा तर आहेच.

तुमचा सर्वांचा आजीव सेवक

मोहनदास करमचंद गांधी

नडियाद, २२ जून १९१८

* * * * *